# प्रार्थना प्रवचन – भाग 1

अनुवादः ब्रिजमोहन हेडा

# १. प्रार्थना प्रवचन, मे १, १९४७

नवी दिल्ली, मे १, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी दिल्ली सोडून केवळ वीस दिवस झाले आहेत. परंतु मी जात असतानाच मला कदाचित लवकरच परतावे लागेल असे जाणवत होते. परंतु त्या वेळी माझी जागा बिहार आणि नोआखालीत होती आणि त्यामुळे मी एक पंधरवाडासुद्धा थांबू शकत नव्हतो. यामुळेच मी बिहारमध्ये गेलो. मी तुम्हाला सांगितलेच आहे की मी जवाहरलालचा कैदी आहे आणि ते जेव्हा मला बोलावतील तेव्हा मी परतेन. यामुळे जवाहरला आणि कृपलानी यांच्याकडून आदेश आल्याबरोबर मी परतलो.

मी बिहार सोडले तेव्हा लोकांनी मला शांततेत परत पाठवले हे ऐकून तुम्हाला आनंद होईल. त्यांनी रस्त्यात माला त्रास दिला नाही. मी शांतपणे झोपलो. मी थकलेलो नव्हतो आणि काही कामसुद्धा करू शकलो. परंतु परतीच्या प्रवासात असे नव्हते. प्रत्येक ठिकाणी लोकांच्या गोंगाटाचे दृश्य दिसत होते. माझ्यासारख्या म्हाताऱ्या गलितगात्र माणसाला शांततेत राहू द्यावे व त्याच्या झोपेत अडथळा आणू नये हे त्यांना कळतच नव्हते. चांगल्या प्रकारे झोप झाली नसल्यामुळे आज मला थकवा जाणवतो आहे. असे असतानाही दिवसाच्या वेळी मी काम केले कारण कामच अशी गोष्ट आहे की जी मला टिकवून ठेवते. कामाशिवाय मी जगू शकत नाही; परंतु मी फार कमी काम करू शकलो. लोकांचे ओरडणे व त्यांनी दिलेल्या घोषणा मी सहन करू शकत नाही. तुमच्या माध्यमातून सर्व लोकांना मी कळवू इच्छितो की त्यांनी गोंगाट करून आणि घोषणा देऊन माझे स्वागत करू नये. लोकांची इच्छा असेल तर ते रेल्वे स्थानकावर गोळा होऊ शकतात आणि ते आले तर हरिजन फंडाकरिता काही निधी गोळा करता येऊ शकेल. परंतु त्यांनी आवाज करू नये.

मी बिहारमध्ये काय केले ते मी तुम्हाला सांगू इच्छितो. तिथे भरपूर काम करण्यात आले. जनरल शाह नवाझ यांनी स्वतः एका लहानशा ठिकाणी मुक्काम ठोकला. आता त्यांना त्यांच्या कामात यश मिळत आहे. जे मुसलमान आसनसोलमध्ये पळून गेले होते ते परत आले. आसनसोलमध्ये त्यांना किती तरी हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. लोक आपल्या स्वतःच्याच ठिकाणी समाधानात राहू शकतात हे त्यांच्या लक्षात आले. त्यांची मुले इतकी रोड झाली होती की त्यांची हाडे बाहेर दिसू लागली होती. त्यांच्याकडे तिथे कोणी ढुंकूनही पाहत नव्हते. आता या मुलांना दूध देण्यात येते. आपल्या गायी आता भाकड झालेल्या असल्यामुळे त्यांना ताजे दूध पुरवता येत

नाही. यामुळे या मुलांना दुधाच्या भुकटीपासून तयार केलेले दूध देण्यात येते. ताज्या दुधात जी जीवनसत्त्वे असतात ती भुकटीपासून केलेल्या दुधात नसतात. परंतु दुधातील पोषक तत्त्वे त्यात कायम असतात. आसनसोलहून परतल्यानंतर या मुलांची प्रकृती पूर्वीप्रमाणे चांगली झाली व त्यांचे वजन वाढू लागले कारण यांना भुकटीपासून तयार करण्यात आलेले दूध देण्यात येऊ लागले होते.

यानंतर प्रौढ लोकांच्या रेशनसंबंधी प्रश्न निर्माण होत होता. परत आलेल्या इतक्या लोकांकरिता अन्न कसे पुरवावे? त्याच्यावर जिथे अत्याचार करण्यात आले होते तिथे जाऊन रेशन विकत घेण्याची त्यांना भीती वाटत होती. सरकारने त्यांच्या घरी रेशन पाठवण्याची व्यवस्था केली. परंतु त्यांच्या हिंदू यजमानांनी याचा विरोध केला. ते म्हणाले की हे आमचे पाहुणे आहेत आणि आम्ही स्वतः यांच्याकरिता रेशन आणून यांच्या घरी पोहोचवू. याकरिता सरकारी अधिकाऱ्यांनी त्रास घेण्याची आवश्यकता नाही.

दुसऱ्या एका ठिकाणी, जिथे मोठ्या संख्येत मुसलमान मारले गेले होते, वाचलेले मुसलमान परतायला घाबरत होते. त्यांचा गैरसमज दूर करण्याकरिता भारतीय राष्ट्रीय सेनेचे काही लोक त्यांच्याबरोबर आले. त्यांच्याबरोबर भारतीय राष्ट्रीय सेनेच्या लोकांना पाहून काही हिंदू म्हणाले की तुम्ही यांच्याकरिता इतकी तसदी घेण्याची आवश्यकता नाही, आम्ही या मुसलमानांची काळजी घेऊ. मरेपर्यंत आम्ही यांचे रक्षण करू. भारतीय राष्ट्रीय सेनेचे लोक म्हणाले की आमच्या सेनापतीच्या आदेशावरून आम्ही असे करत आहो आणि आम्ही परत जाऊ शकत नाही. त्यावर विनवणी करत हिंदू म्हणाले की आम्ही नेहमीच असा वेडेपणा करणार नाही. पूर्वी खरोखरच आम्ही वेड लागल्याप्रमाणे वागत होतो. एक हजार लोकांना मारण्याकरिता दहा हजार लोकांनी येण्यात कोणते शौर्य आहे? आम्ही असे पुन्हा कधीही करणार नाही. अशा प्रकारे हिंदूंनी मुसलमानांच्या मनातील भीती दूर केली व त्यांना आपल्या घरी परतण्याकरिता धीर दिला. परिणामी मुसलमानांनी स्वतःच भारासेच्या लोकांना परत जाण्याकरिता सांगितले.बिहारची परिस्थिती योग्य प्रकारे हाताळली गेली तर मला खात्री आहे की भारतातील विविध भागात सुरू असलेल्या दंगली थांबतील. मला इतकेच सांगायचे आहे की आपणा सर्वांमध्ये धैर्य असले पाहिजे. परंतु मी असे ऐकले आहे की दिल्लीतील लोकसुद्धा भ्याडपणाचे वर्तन करत होते. दररोज छद्मीपणाने लोक गुन्हे करत होते. डेरा इस्माईल खानमध्येसुद्धा लाजिरवाण्या गोष्टी होत आहेत. (मोठ्या प्रमाणात खून, जाळपोळ, लूट, संपत्तीचा विध्वंस डेरा इस्माईल खान आणि हझारा जिल्ह्यात होत होते.) ते अजूनही थांबले नाहीत.

लोक मला विचारतात की तुमच्या सह्यांचे काय झाले? शांतता अजून का प्रस्थापित झाली नाही? जिनांशी भेटल्यानंतर आणि त्यांच्याशी विचारविनिमय केल्यानंतर मी त्यावर सही केली

नव्हती. मी त्या पत्रकावर सही करावी म्हणून व्हाईसराय आग्रह करत होते. या पत्रकावर सही करण्याकरिता मला कोणता अधिकार आहे असे मी त्यांना विचारले. मला सही करावी लागली. मी कॉंग्रेसचा चार आणेवाला सदस्यसुद्धा नाही. माझ्या सहीचा काय उपयोग आहे? मी लहान माणूस आहे. कायदे आझम अर्थातच मोठे माणूस आहेत, त्यांच्या सहीचा बराच प्रभाव पडेल. परंतु व्हाईसरायनी सांगितले की जिना साहेब माझ्या सहीकरिता आग्रही आहेत. मी सही केल्याशिवाय सही करायची त्यांची तयारी नाही. ते म्हणाले की तुम्ही सही केली तर जिनासाहेबांना खरोखर काय म्हणायचे आहे ते कळेल तरी. अशा प्रकारे मी सही केली. त्यानंतर काय झाले याची चर्चा मी करणार नाही.

शांततेकरिता आवाहन करणाऱ्या परिपत्रकावर सही करणे ही गोष्ट माझ्याकरिता नवीन नाही. आयुष्भर मी हे करत आलो आहे आणि अजूनही असे करणे सुरूच आहे. परंतु जिना साहेबांची सही मोठी गोष्ट आहे. जिना साहेबांनी या आवाहनावर सही केलेली असल्यामुळे सगळ्या मुसलमानांवर जर जिना साहेबांचा प्रभाव असेल तर त्यांनी त्यांचे शब्द पाळले पाहिजे. परंतु मी त्यावर हिंदू असल्यामुळे सही केली आहे काय? माझा कोणावरही प्रभाव नाही. मी कोणत्याही पक्षाचा नाही. मी सर्वांचा आहे. बिहारचे हिंदू जर परत उन्मत्ताप्रमाणे वागणार असतील तर मी प्राणांतिक उपोषण करीन. अशाच प्रकारे नोआखालीतील मुसलमानांचा जर बुद्धिभ्रंश झाला तर मी तिथे माझा जीव ओवाळून टाकेन. मी तो हक्क मिळवला आहे. हिंदूंपेक्षा मी मुसलमानांचा कमी नाही. अशाच प्रकारे शीख, पारसी आणि ख्रिश्चन यांचाही मी आहे. माझे बोलणे कदाचित अरण्यरुदनासारखे असेल परंतु मी जे काही म्हणतो ते सर्वांना उद्देशून असते.

परंतु जिनासाहेब महान संघटनेचे अध्यक्ष आहेत. एकदा का त्यांनी आवाहनावर सही केली की मग एकही हिंदू मुसलमानांच्या हातून कसा मारला जाऊ शकतो? मुसलमान तुम्हाला मारायला आले तर आनंदाने मृत्यूचे स्वागत करा असे मी हिंदूंना सांगेन. मला कोणी भोसकले आणि माझ्या मुलाने त्याचा बदला घ्यावा असे अखेरच्या क्षणी मी इच्छिले तर मी खरोखर पापी ठरेन. वैरभावनेशिवाय मी मरायला पाहिजे. परंतु पहिली गोष्ट म्हणजे मुसलमानाला जर मारू नको असे सांगण्यात आले आहे तर तो मारीलच कशाला?

परंतु राजकारणात बळाने काहीही मिळू शकत नाही ही गोष्ट त्यांना अजून कळायची आहे. लोक विचारतात की शांततेकरिता करण्यात आलेल्या आवाहनाचा अगदीच प्रभाव का नाही. अजूनही मुसलमानांना का आवरता आलेले नाही? डेरा इस्माईल खान आणि सरहद्द प्रांतांत हिंसाचार

का माजलेला आहे? डॉ. खान साहेब आणि बादशहा खान यांनी तो थांबवण्याचा प्रयत्न केला होता परंतु तेथील लोकांचे म्हणणे आहे की आम्ही मुस्लिम लीगचे आहो.

सरहद्द प्रांतातील लोक, इतकेच नाही तर मुस्लिम लीगला पाठिंबा देणारेही जिना साहेबांचे ऐकत नसतील तर सर्व काही सोडून शांतता प्रस्थापित करण्याकरिता प्रयत्न करणे हे जिना साहेबांचे पहिले कर्तव्य आहे असे म्हणण्याचे धाडस मी करेन. ते या मार्गाचे अनुसरण का करत नाहीत? सध्याच्या मार्गाने पाकिस्तान मिळेल असे त्यांना वाटते काय? त्यांना जर पाकिस्तान हवा असेल तर त्यांनी तो शांततामय पद्धतीने घ्यावा. जेव्हा कोणी काही तरी बळजबरीने मिळवतो तेव्हा त्याहून मोठी शक्ती त्याच्याजवळून ती गोष्ट हिरावून घेते. दडपशाहीने पाकिस्तान मिळवण्याची जिना साहेबांची योजना कधीही यशस्वी होणार नाही.

आम्हा दोघांच्या सह्या मिळवल्यानंतरही व्हाईसराय काहीही का करू शकत नाहीत असे मी त्यांनासुद्धा विचारू इच्छितो. त्यांनी मला धारेवर का धरले नाही? जिनांना धारेवर का धरले नाही? यानंतर हिंदू आणि मुसलमान भांडत असतील, शिखांचे भाडत राहणे सुरू असेल तर ब्रिटिशांनी बाजूला झाले पाहिजे.

परंतु ब्रिटिशांनी येथील वास्तव्य कायम ठेवले तर तुम्ही काय करणार आहा? तुम्ही म्हणाल की आम्ही शस्त्र घेऊ. परंतु ब्रिटिश तुमच्या शस्त्रांना घाबरणारे नाहीत व शस्त्रांना घाबरून ते काहीही देणार नाहीत. आतासुद्धा तुमच्या शस्त्रांमुळे आम्ही तुम्हाला स्वातंत्र्य देतो आहो असे ते म्हणत नाहीत. भारताने जगाला नवीन मार्ग दाखवला आहे असे त्यांना वाटते. हेच ते कारण आहे की ज्यामुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळत आहे. सध्याच्या वातावरणात जगात असे अनेक लोक आहेत की जे बळाला बळाने उत्तर देत असतात. परंतु तुम्ही एकाला दहाच काय हजार लोक जरी मारले तरी जगात कधीही शांतता प्रस्थापित होणार नाही हे मला सांगायचे आहे. इतरांना मारत असताना मरण्यात कोणतेही शौर्य नाही. तो शौर्याचा भ्रम आहे. खरा हुतात्मा तो असतो जो कोणालाही न मारता मरण पत्करत असतो.

सर्व हिंदू आणि शीख यांनी मरावे काय असे तुम्ही कदाचित मागे वळून विचाराल. होय, मी म्हणेन की असे हौतात्म्य वाया जाणार नाही.

अशा प्रकारे बोलल्याबद्दल तुम्ही माझे अभिनंदन करू शकता वा मला शिव्या देऊ शकता. परंतु मी तेच सांगेन जे मला अंतःकरणापासून वाटते. तुम्ही माझे भाषण शांतपणे ऐकत असताना मी माझ्या अंतःकरणातील व्यथाच व्यक्त करीन आणि तुम्हाला धीट होण्याकरिता व न घाबरण्याकरिता मी सांगेन. कोणी जर आपल्याला भीती दाखवून काही सुपूर्द करण्याकरिता सांगत असेल तर आपण

एक कवडीसुद्धा देणार नाही. परंतु तो आपली समजूत घालू लागला तर आपण त्याला एक करोड रुपयेसुद्धा देऊ शकतो. तुम्ही जर असे धैर्य दाखवू शकत नसाल आणि हिंदू, मुसलमान, शीख या सर्वांना वेड लागले तर ब्रिटिशांनी आपल्याकरिता काहीही केले आणि त्यांनी आपल्याला काहीही दिले तरी ते आपल्या हातात राहणार नाही. जे काही आपल्याला मिळवायचे आहे ते आपण समजुतीच्या मार्गानेच मिळवले पाहिजे. आपण जर ही कला शिकलो तर आपले सर्व काही चांगले होईल. असे झाले नाही नाही तर भारताचा विनाश झाल्याशिवाय राहणार नाही याबद्दल मुळीच संशय बाळगण्याचे कारण नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन, - भाग १, पृष्ठ ५४-८

# २. प्रार्थना प्रवचन, मे २, १९४७

नवी दिल्ली, मे २, १९४७

*कुराणमधील आयती म्हटल्यानंतर एक तरुण ओरडला, "हे थांबवा. हिंदू धर्माचा विजय असो." हे ऐकून गांधीजींनी प्रार्थना थांबवली आणि ते म्हणाले -*

ठीक आहे, त्याच्या इच्छेनुसार करू या.

*गांधीजींनी त्या माणसाला शांत होण्याकरिता सांगितले परंतु त्याचा ओरडा सुरू होता.* (मध्यंतरीच्या काळात पोलीस आले आणि त्यांनी त्या माणसाला पकडून नेले.)

गांधीजी म्हणाले - माझे शब्द जर पोलिसांपर्यंत पोहोचू शकत असतील तर त्यांनी त्या माणसाला सोडावे व त्याला माझ्याजवळ इथे येऊ द्यावे अशी मी विनंती करतो. प्रार्थनेच्या वेळी पोलिसांनी इथे येऊन सुव्यवस्था ठेवावी हे मला पसंत नाही. पोलीस जर लोकांना दररोज अटक करत राहिले तर व प्रार्थना करण्याकरिता मी त्यांच्यावर विसंबून राहिलो तर ती प्रार्थनाच राहणार नाही. मी तेव्हाच प्रार्थना करू शकतो जेव्हा लोक शांततापूर्वक मला प्रार्थना करू देतील. तुम्ही पाहिलेच आहे की त्या तरुणाला जेव्हा प्रार्थना थांबवायची होती तेव्हा मी प्रार्थना थांबवली. मी उद्याही असे करावे अशी जर त्याची इच्छा असेल तर मी उद्याही प्रार्थना थांबवेन. परंतु तो म्हणाला त्याप्रमाणे हिंदू धर्माचा विजय होऊ शकत नाही. अशा प्रकारच्या कृत्यांनी आपण धर्म नाकारतो हे त्याला कळले पाहिजे. इतरांना प्रार्थनेपासून वंचित करून आपण आपल्या धर्माचे रक्षण कसे काय करू शकतो? परंतु मी त्याला दोष देत नाही. आज वातावरणच असे आहे. आज प्रत्येक गोष्ट उलटी दिसत आहे. स्पष्ट दिसणारी गोष्टसुद्धा समजून घेण्याची कोणाचीही इच्छा नाही. यामुळे मला जर कोणी प्रार्थना थांबवण्याकरिता सांगितले तर मी त्याची मागणी मान्य करीन.

परंतु मला जास्त वेदना कशाच्या होत असतील तर प्रार्थना सुरू असताना त्याने केलेल्या या गोंधळामुळे. त्याने जर सुरुवातीलाच आपला हेतू स्पष्ट केला असता तर मी प्रार्थना सुरूच केली नसती. पोलिसांनी हस्तक्षेप करण्याची काय आवश्यकता होती? प्रार्थनेच्या वेळी सुव्यवस्था कायम ठेवण्याकरिता इतक्या अधिक पोलिसांची गरज असावी ही माझ्याकरिता लाजेची गोष्ट आहे. पोलीस माझ्या धर्माचे रक्षण कसे करू शकतील? माझ्या धर्माचे रक्षण तेव्हाच होईल जेव्हा मी स्वतः माझ्या धर्माचे रक्षण करीन. किंवा मी माझ्या धर्माचे रक्षण करीन असे म्हणणे हेसुद्धा अहंभावाचेच चिन्ह असेल. तो ईश्वरच आहे की जो माझ्या धर्माचे रक्षण करतो. माझ्या अंतःकरणात जर प्रार्थना असेल

तर तर ईश्वर माझे रक्षण केल्याशिवाय राहणार नाही. बाह्य प्रार्थना केली नाही तर त्यामुळे काय बिघडते?

परंतु तुम्ही काय करू शकता? तुम्ही सर्व शांत बसलेले आहा. तुम्ही इथे ईश्वराचे ध्यान करण्याकरिता आणि अंतःकरणात काही चांगुलपणा रुजवण्याकरिता आला आहा. एका माणसाकरिता तुम्हा सर्वांना त्रास सहन कारावा लागत आहे. परंतु एका माणसावरसुद्धा दडपण आणून आणि बळजबरीने प्रार्थना करून तुम्ही ईश्वराचा अनुभव घेऊ शकत नाही. असे केल्याने तुम्ही केवळ स्वतःची फसवणूक कराल.

त्या तरुणाने शांत होऊन मला जे काय म्हणायचे आहे ते ऐकावे अशी माझी इच्छा आहे. मी त्याला समजून सांगितले असते. आज जर नाही तर उद्या आणि उद्या नाही तर परवा त्याला माझे म्हणणे पटले असते. ते काहीही असले तरी धर्माच्या विकासात बळजबरीला कोणतेही स्थान नाही ही गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे. धर्माच्या अनुसरणाकरिता आपल्याला आपले जीवन अर्पावे लागते असते. जगात असा एकही धर्म नाही की जो प्राणाची आहुती मागत नाही. माणूस जेव्हा आपल्या प्राणाची आहुती द्यायला शिकतो तेव्हा कुठे त्याचा धर्म सामर्थ्यशाली होत असतो. धर्माच्या वृक्षाला प्राणाहुतीच्या पाण्याचे सिंचन हवे असते. ईश्वराच्या नावाचा जप करणारांमुळे, ईश्वराकरिता काम करणारांमुळे, ईश्वराचे स्तवन करणारांमुळे, जे शपथ घेतात आणि उपवास करतात आणि आपल्याला मार्ग सापडत नाही म्हणून मार्ग दाखवण्याकरिता ईश्वराची काकुळतीपूर्ण विनवणी करतात त्यांच्यामुळे धर्माचा विकास होत असतो. मग लोक त्याला भक्त म्हणून ओळखतात व त्याचे अनुसरण करतात. धर्म केवळ या मार्गानेच आकार घेत असतो. कोणताही धर्म हत्येच्या बळावर वाढलेला नाही. त्याच्याकरिता मृत्यू पत्करल्यामुळेच तो विकसित झाला आहे. धर्माचा हा पाया आहे. शीख धर्माची प्रगतीही केवळ याच मार्गाने झाली आहे.

महमद पैगंबरसुद्धा अंतःकरणात किंचितही भीती न बाळगता मदिनाला पळाले होते आणि ईश्वरावरील श्रद्धेमुळे ईश्वराने त्यांचे आणि हजरत अलीचे हजारो शत्रूंपासून रक्षण केले होते. मृत्यूचा धोका पत्करून महमद पैगंबरांनी इस्लामचे सामर्थ्य वाढवले होते.

अशीच गोष्ट ख्रिश्चन धर्माची आहे. आणि बुद्ध धर्माला जर आपण हिंदू धर्मापेक्षा वेगळा समजत असू तर बुद्ध धर्माची वाढसुद्धा तेव्हाच झाली जेव्हा काही लोकांनी त्याच्याकरिता प्राणाची आहुती दिली. मला असा एकही धर्म माहीत नाही की ज्याने आपल्या प्राथमिक अवस्थेत आपल्या अनुयायांकडून बलिदानाची अपेक्षा केली नाही. जेव्हा धर्म सुस्थापित होतो तेव्हा मोठ्या संख्येत लोक त्याचे अनुसरण करू लागतात. यातून फाजील धर्माभिमानाची सुरुवात होते. हिंदू धर्माने कधीही

हिंसेचा पुरस्कार केलेला नसला तरी आता हिंदू धर्माचे अनुयायीसुद्धा हत्या आणि कत्तलीच्या अध:पाताकडे नेणाऱ्या मार्गाचा आधार घेऊ लागले आहेत.

आज धर्माच्या नावानेसुद्धा लोक घाबरू लागले आहेत. लोक इतके का घाबरतात हे मला कळत नाही. हिंदू, शीख - संपूर्ण पंजाबमध्ये इतका गलबला का? आणि दुसऱ्या टोकाकडील बंगालमधून आपल्याला किंकाळ्या ऐकू येतात. लोक म्हणतात की पंजाब आणि बंगालची फाळणी केली पाहिजे. परंतु जर त्यांची फाळणी करायची असेल तर व्हाईसरायकडे जाण्याची आवश्यकता काय? ते माझ्याकडे का येत नाहीत? ते तुमच्याकडे का येत नाहीत? जर पाकिस्तान देण्यात येत असेल तर हिंदू आणि शिखांचा विनाश करण्याकरिता करण्याकरिता तसे करण्यात येत आहे काय?

जिना साहेब म्हणाले की हिंदू, शीख आणि इतर अल्पसंख्याक पाकिस्तानमध्ये पूर्णपणे सुरक्षित असतील व त्यांचा कोणत्याही प्रकारे छळ केला जाणार नाही. परंतु आज अशी परिस्थिती का उपलब्ध होत नाही? पंजाब आणि बंगालमध्ये जे काही होते आहे त्यावरून मी पाकिस्तानचे चित्र उभे करू शकतो, नाही का? हे जर खरे नसेल तर जिना साहेब जे बोलतात ते करून का दाखवत नाहीत? मुसलमान बहुसंख्य असलेल्या भागातील प्रत्येक हिंदूचे संरक्षण का केले जात नाही? सिंधमधील हिंदूना, जे एकूण लोकसंख्येच्या केवळ पंचवीस टक्के आहेत, भयग्रस्त वातावरणात का राहावे लागते? पाकिस्तानचा अर्थ मुसलमानेतरांनी म्हणजे हिंदू, शीख, ख्रिश्चन, आणि जे इतर धर्माचे आहेत त्यांनी गुलामाप्रमाणे राहावे असा अर्थ होतो काय? जर तसे असेल तर तो खरा पाकिस्तान नसेल. हिंदुस्तानसुद्धा खरा हिंदुस्तान तेव्हाच असेल जेव्हा निरागस मुसलमान मुलालासुद्धा हिंदूबहुल प्रदेशात कोणीही धक्का लावणार नाही.

हिंदूच्या वर्तनाबद्दल जिना साहेब आपल्याला प्रश्न विचारू शकतात. बिहारमधील हिंदू याहून चांगले वागले नाहीत. ते खरोखरच दोषी आहेत. परंतु आज बिहारचे हिंदू पश्चात्ताप करत आहेत. इतकेच नाही तर मुख्यमंत्रीसुद्धा आपला अपराध मान्य करतात. जर अशीच गोष्ट प्रत्येक ठिकाणी घडली तर काही तरी चांगले साध्य करण्यात आले असे मी समजेन. परंतु आज प्रत्येकाने आपल्या धर्माचा त्याग केला आहे आणि काही लोक जर आपल्या धर्माचे पालन करत असतील तर लोक त्यांच्यावर हल्ला करण्याकरिता धावून जातात. हे बरोबर नाही. मुसलमानांनी आपल्या अल्पसंख्य शेजाऱ्यांना सांगितले पाहिजे की तुम्ही तुमच्या धर्माचे पालन करू शकता आणि आम्ही तुमच्या मार्गात आडवे येणार नाही.

अखेरीस एखादी गोष्ट आपल्या हाती येत असताना आपण ती आपल्या हातून का निसटू द्यावी? परंतु प्रत्येकजण याप्रमाणेच वागत आहे. हिंदू, मुसलमान, शीख, ख्रिश्चन या सर्वांनी

आपसातील भांडणाच्या पापातून मुक्त झाले पाहिजे आणि तसे करण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे ईश्वराला भिऊन वागण्याचा. असे झाले तर शस्त्रांना मागणी राहणार नाही. मग कोणीही सैन्याच्या वा शस्त्रांच्या मागे (संरक्षणाकरिता) लागणार नाही. परंतु आज शिखांच्या किरपाणसारख्या किरपाणींची मागणी सर्वत्र होत आहे. परत ही मागणी परंपरागत मोठ्या किरपाणींकरिता तसेच लहान किरपाणकरिताही आहे. परंतु या शस्त्रांनी ते कुणाला मारणार आहेत? जर अशा प्रकारची शस्त्रे सर्व घरांमध्ये पोहोचणार असतील तर तुम्हाला मी आजूबाजूला कुठेही आढळणार नाही.

माझ्याजवळ एकच उपाय आहे आणि तो असा आहे की त्याने ब्रिटिश सत्तेचे भक्कम संरक्षण असलेल्यांनाही काढून टाकता येईल. ती पद्धत आहे ‘नाही’ म्हणण्याची म्हणजे असहकाराची. ती फार मोठी गोष्ट आहे. एकदा तिचा अवलंब करू लागलो की आपल्याला सैनिकी प्रशिक्षणाच्या मागे जावे लागणार नाही.

हिंदीवरून, प्रार्थना प्रवचन - भाग १, पृष्ठ ५९-६२

# ३. प्रार्थना प्रवचन, मे ३, १९४७

नवी दिल्ली,

मे ३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

रोजप्रमाणे आजही तुम्ही शांत राहायला पाहिजे. तुम्ही इथे प्रार्थनेकरिता आला असल्यामुळे येताक्षणीच तुम्ही इथे शांत बसायला पाहिजे. आपण केव्हाही बोलू शकतो. प्रार्थनेनंतर तुम्ही जेव्हा बाहेर पडू लागता तेव्हाही तुम्ही बोलू शकता. परंतु तोपर्यंत तुम्ही शांत राहिले पाहिजे कारण शांतता हा प्रार्थनेचा सार आहे. (कोणी तरी कुराणमधील आयत म्हणायला विरोध केला आणि गांधीजींनी प्रार्थना थांबवली.) असे दिसते की उर्वरित प्रार्थनेची परवानगी आहे परंतु कुराणमधील भाग वाचण्यावर आक्षेप आहे. यामुळे उद्यापासून मी अझोबिलाहीने प्रार्थनेची सुरुवात करीन. आतापर्यंत प्रार्थनेची सुरुवात बुद्ध धर्माच्या स्तोत्रापासून करण्यात येत होती व हे स्तोत्र जपानी भाषेत आहे. एक जपानी साधू (रेव्हरंड जी. हैशाओ) सेवाग्राम येथे माझ्याबरोबर राहत होता. आश्रमाला फेऱ्या मारत असताना एक तास तो हे स्तोत्र झांजेसारख्या डिमडिम वाद्यावर अतिशय गोड सुरात म्हणत असे. त्याने हे स्तोत्र प्रार्थनेत म्हणण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्याच्याशी मी सहमत झालो. परंतु उद्यापासून मी प्रार्थनेची सुरुवात औझोबिलाहीने करीन आणि कोणीही अडथळा आणला नाही तरच प्रार्थना सुरू राहील. नाही तर तुम्ही शांत बसून राहाल आणि तुमच्या अंतःकरणात प्रार्थना म्हणाल.

असे असले तरी तुम्ही जेव्हा परत जाल तेव्हा तुम्ही तुमच्या मनात सर्व धर्मांची प्रार्थना म्हणा. सर्व धर्म चांगले आहेत ही गोष्ट कृपाकरून समजून घ्या. सर्व धर्म उदात्त आहेत यावर श्रद्धा ठेवा. दोष कोणत्याही धर्माचा नसतो. जर कोणाचा दोष असेल तर तो धर्म अनुसरणारांचा असतो. प्रत्येक धर्माने काही वाईट माणसे निर्माण केली आहेत. वाईट माणसे निर्माण करण्याचा कोणत्याही धर्माचा एकाधिकार नाही. आपण प्रत्येक धर्मातील मोती वेचू या आणि आपल्या धर्माला संपन्न करू या.

आता मला तुम्हाला जे काही सांगण्याचा विचार होता ते मी तुम्हाला सांगेन. आजकाल आपली परिस्थिती अतिशय नाजुक आहे. भारत इतका मोठा देश आहे की सर्व जगाचे लक्ष त्याच्याकडे वेधलेले आहे. जवाहरलालने बोलावलेल्या आंतरआशिया संबंध परिषदेत सर्व डोळे भारतावर खिळलेले असल्याचे तुम्ही पाहिलेच आहे. शहरियार (डॉ. सुलतान शहरियार, इंडोनेशियाचे प्रधानमंत्री) काही सामान्य माणूस नाही. ते फार मोठे माणूस आहेत. परंतु त्यांची नजरही

तुमच्यावर म्हणजे भारतावर खिळलेली आहे. इतकेच नाही तर अरब देशातील लोकसुद्धा भारताकडे पाहत आहेत आणि भारताने पुढाकार घेतला तर आशियायी देशसुद्धा त्याचे अनुसरण करतील असे त्यांना वाटते. जपानने फार मोठे धैर्य दाखवले यात काही संशय नाही. तोसुद्धा अतिशय चाणक्षपणाने वागला. परंतु आता तो कुठे आहे? आशियाचे नेतृत्व करण्याची क्षमता त्याच्यात नाही. तो मागे पडला आहे. त्या देशाकडे पाहिले की दुःख होते.

आपल्याबद्दल बोलायचे तर अजून आपल्याला स्वातंत्र्य मिळालेसुद्धा नाही. असे असूनही आपण कसे वागतो याकडे जगाचे लक्ष लागले आहे. याचे कारण आपण स्वातंत्र्याकरिता जो संघर्ष केला होता तसा इतर कोणत्याही देशाने केला नव्हता. हा संघर्ष धर्माच्या नावावर करण्यात आला होता. एप्रिल ६, १९१९ला स्वातंत्र्याच्या दिशेने आपण पहिले पाऊल टाकले आणि आता ते मिळण्याकरिता काही दिवसांचाच अवधी आहे. भारत स्वतंत्र होईल अशी सर्व जगाला अपेक्षा आहे. याचा अर्थ संपूर्ण जगाचा नवीन जन्म.

आंतरआशिया संबंध परिषदेला आलेले प्रतिनिधी ही दृष्टी घेऊन परतले आहेत. ते जेव्हा इथे आले होते तेव्हा वातावरण दुषीत झालेले होते. परंतु त्यांनी येथील भयाण गोष्टीकडे पाहिले नाही. उलट ते आपल्या भावी स्वातंत्र्याकडे पाहत होते. जे समजूतदार असतात त्यांना कळत असते की जेव्हा नदीला जेव्हा पूर आलेला असतो तेव्हा तिचे पाणी गढूळ असते. अशाच प्रकारे येऊ घातलेल्या स्वातंत्र्यामुळे आपले वातावरण दुषीत झालेले आहे. आपल्या देशात स्वातंत्र्याचा पूर आलेला आहे व त्यामुळे काही गोंधळ होऊ शकतो. परंतु पूर ओसरल्यानंतर गंगेचे पाणी जसे स्वच्छ होते तसे कालौघात आपल्या देशातील वातावरण स्वच्छ होईल हे पाहणे आपले कर्तव्य आहे.

हे कसे करता येईल? अधर्माला धर्म समजून भारताचे संरक्षण होऊ शकत नाही. या मार्गाने आपल्याला धार्मिक स्वातंत्र्यही मिळू शकत नाही. परंतु आज काय घडते आहे? डेरा इस्माईल खान इथे काय झाले? हझारा येथे काय झाले? सरहद्द प्रांतात इतका भयानक आगडोंब का उसळला? तलवारी, भाले, बंदुका यांच्याकरिता इतकी धाव का? या गोष्टी उघडपणे आणि गुप्तपणे का गोळा केल्या जात आहेत? गुप्तपणे बॉम्ब का तयार करण्यात येत आहेत? शस्त्रबळाच्या धमक्या देऊन आम्ही आम्हाला हवे ते करवून घेऊ अशा घोषणा लोक का करत आहेत?

या सर्व गोष्टींनी ना तर आपण स्वतःचा बचाव करू शकतो ना इतरांचा. या मार्गाने ना भारत ना आशिया स्वातंत्र्य मिळवू शकतो. उर्वरित जगालाही या मार्गाने स्वातंत्र्य मिळणार नाही.

असे असल्यामुळे आपण सर्व प्रार्थना करू या आणि सर्व धर्म एक आहेत हे समजून घेऊ या. आपण व्यक्ती म्हणून चांगले असलो तरी ती फार मोठी गोष्ट होईल.

मला दुसरी गोष्ट बोलायची आहे ती वृत्तपत्रांविषयी. व्हाईसरायनी आपल्या मंत्र्यांशी चर्चा केल्याचे वृत्त एका वृत्तपत्राने प्रकाशित केले. कॉंग्रेस कार्यकारिणीच्या सभेतील चर्चेचा वृत्तांतही त्यांनी प्रकाशित केला. ते लहानसहान वर्तमानपत्र नसून मोठे वर्तमानपत्र आहे. ते आपल्या विरोधकांच्या हिताकरिता काम करणारे वृत्तपत्रसुद्धा नाही. ते वृत्तपत्र कॉंग्रेसला पाठिंबा देणारे आहे. त्याने व्हाईसरायच्या योजनेविषयी काही निष्कर्ष काढले आहेत. अशा प्रकारच्या भाकितात या वृत्तपत्राने गुंतावे ही गोष्ट अगदीच योग्य नाही. व्हाईसरायचा काय करायचा विचार आहे हे त्यांने व्हाईसरायनाच घोषित करू द्यायला पाहिजे होते. आणि कार्यकारिणीच्या सभेतील चर्चेबद्दल तर्काचा आधार का घेण्यात यावा? कार्यकारिणीने प्रकाशित केलेला केवळ अधिकृत अहवाल प्रकाशित करण्यात यावा.

अनेक पत्रकार वेगवेगळ्या ठिकाणावरून बातम्या गोळा करतात व त्यावरून गोष्ट तयार करतात. परंतु मी म्हणेन की हे लोक जेवणानंतरचे उष्टेखरकटे गोळा करतात. पत्रकाराने खरकट्यावर विसंबून राहायचे नसते.

ब्रिटिशांनी आपल्यामधील फार चांगला माणूस इथे पाठवला आहे. तो ब्रिटिशांचा सन्मान कायम राखण्याकरिता इथे आला आहे. ज्या सद्हेतूने त्याला पाठवण्यात आले त्याच सद्भावनेने तो काम करत आहे. असे असताना त्याच्याशी चर्चा केल्याशिवाय त्याच्या कृतींचा गवगवा करण्यात काय अर्थ आहे? गोड बोलून प्रत्येक माणसापासून माहिती काढून घ्यायची व इकडूनतिकडून त्यावर तर्क करून वृत्तपत्रात बातम्या प्रकाशित करण्यात काय अर्थ आहे?

गत पन्नास वर्षांपासून मीसुद्धा वृत्तपत्रकार आहे. वृत्तपत्रे कशी चालवतात हे मला माहीत आहे. इंग्लंड आणि अमेरिकेत वृत्तपत्रे कशी चालवली जातात हे मला माहीत आहे. परंतु इंग्लंड आणि अमेरिकेतील वाईट गोष्टींची आपण नक्कल का करावी? इतरांच्या वाईट गोष्टींची आपण नक्कल केली तर आपण नष्ट होऊ.

मला असे म्हणायचे नाही की या वर्तमानपत्रकाराने प्रकाशित केलेली प्रत्येक गोष्ट चूक आहे. लिहिण्यात आलेल्या काही गोष्टी बरोबर आहेत, काही चूक. त्याने केवळ इकडूनतिकडून मिळवलेल्या माहितीची खिचडी केलेली आहे. अशा प्रकारची पत्रकारिता मला मुळीच मान्य नाही.

तुमच्या माध्यमातून मी सर्व पत्रकारांना सांगू इच्छितो की तुम्ही या पद्धतीने पैसा मिळवण्याचा प्रयत्न करू नका.आपण जर आपली आजीविका सरळ मार्गाने मिळवू शकत नसू तर आपण नष्ट झालेलो चालेल. परंतु देशाची हानी होईल अशा प्रकारे हा पत्रकार का बोलतो? इतकेच नाही तर त्याने असा काही मथळा तयार केला आहे की ज्याची कोणी कल्पनाही केली नसती.

इंग्लंड आणि अमेरिकेतील जे काही आरोग्यवर्धक नसेल ते वगळणे आणि त्यांच्या चांगल्या गोष्टी स्वीकारणे हेच योग्य होईल.

आज जवाहरलालने याबद्दल माझ्याजवळ खेद व्यक्त केला. किती लोकांजवळ जाऊन ते आपल्या भावना व्यक्त करू शकतील? आणि मी त्यांचे सांत्वन कसे करू शकतो? आपण धार्मिक मोहीम सुरू केली आहे आणि धर्माच्या माध्यमातूनच आपण स्वराज्य मिळवणार आहो. या कार्यत मदत करावी म्हणून मी वृत्तपत्रकारांनाही विनंती करीन.

हिंदीवरून, प्रार्थना प्रवचन - भाग १, पृष्ठ ६२-६६

# ४. प्रार्थना प्रवचन, मे ४, १९४७

नवी दिल्ली, मे ४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

कुराणमधील आयतीने आज प्रार्थनेची सुरुवात होणार आहे. परंतु या मोठ्या जनसमूहाने प्रार्थना करू नये असे वाटणारा कोणी आहे काय असे त्यापूर्वी मी विचारू इच्छितो. प्रार्थना सुरू झाल्यानंतर प्रार्थनेवर जर कोणाचा कोणाचा आक्षेप असेल तर प्रार्थना थांबवण्यात येईल. परंतु तसे करणे संस्कृतीला धरून होणार नाही. यामुळे जर कोणाचा आक्षेप असेल तर प्रार्थना सुरू होण्यापूर्वीच तो प्रार्थना थांबवू शकतो. तुमच्यामध्ये असे कोणी आहे काय की ज्याला असे करण्याची इच्छा आहे.

***एक माणूस ओरडला - होय माझा आक्षेप आहे.***

गां. - का?

***देवळामध्ये कुराणमधील आयती म्हटल्या जाऊ शकत नाहीत.***

इतक्या मोठ्या जनसमूहाच्या मार्गात तुम्ही अडथळा आणू इच्छिता काय?

***होय.***

तुम्ही सर्व ऐका. मी या माणसाशी बोलू इच्छितो. त्याचे मन आपण समजून घेऊ या.

नंतर त्या माणसाकडे वळत गांधीजी म्हणाले - तुम्ही उत्तेजित होण्याचे कारण नाही. मी जर दररोज देवळात प्रार्थना करतो तर आज मी देवळात प्रार्थना का करायला नको?

***हे सार्वजनिक देऊळ आहे. सार्वजनिक मंदिरात तुम्ही प्रार्थना करायला नको.***

हे सार्वजनिक देऊळ आहे यात काही संशय नाही. परंतु देवळाचा पुजारी आणि विश्वस्त मला अडवत नाहीत. मग इतके सगळे लोक ईश्वराचे भजन करण्याकरिता आले असताना तुम्ही त्यांना का थांबवू इच्छिता? मला खरोखरच हे कळत नाही.

***कारण मीसुद्धा जनतेचा भाग आहे.***

ठीक आहे, मग तुम्ही प्रार्थनेला परवानगी देणार नाही?

***नाही, मी नाही देणार.***

ठीक आहे, मग मी प्रार्थना थांबवीन. परंतु सुसंवाद आणि अहिंसा यांचे धर्मात कोणते स्थान आहे हे मी तुम्हाला स्पष्ट करून सांगेन. तुम्ही जर दररोज माझ्या प्रार्थनेत अडथळा आणण्याचा प्रयत्न कराल तर तुम्ही मला नाही तर स्वतःला अपमानित कराल. योग्य गोष्ट ही आहे की एका माणसाला इतक्या सगळ्या लोकांच्या इच्छेचा सन्मान करण्याची इच्छा नसेल तर त्याने स्वतःच हे ठिकाण सोडून जायला पाहिजे. इतक्या मोठ्या जनसमूहाच्या मार्गात एक माणूस कसा येऊ शकतो? हे केवळ माझ्या बाबतीत म्हणजे अहिंसेच्या जगात शक्य आहे. देऊळ अर्थातच सर्वांचे आहे. परंतु याचा अर्थ असा होत नाही की एका माणसाला आपल्या लहरीप्रमाणे अडथळे आणण्याचा अधिकार आहे. अशा प्रकारच्या वर्तनाला परवानगी देण्यात येऊ लागली तर देवळाचे सर्व कामकाज बंद होईल. मी जर एकटा असतो आणि त्याने मला थांबवले असते तर ती वेगळी गोष्ट असती. परंतु इतक्या सगळ्या लोकांमध्ये तो आरडाओरड करू लागला आणि मी प्रार्थना सुरू ठेवली तर तुम्ही सगळे उत्तेजित व्हाल. तुम्ही त्याला शिव्या द्याल व त्याला पोलिसांच्या ताब्यात द्याल. यामुळे आपला कोणता मोठेपणा दिसणार आहे? असे जर घडले तर जग आपल्याबद्दल काय म्हणेल?

यामुळे मी प्रार्थना थांबवली. परंतु तुम्ही औझबिलाही इत्यादीचा जप थांबू शकत नाही. तो सदैव माझ्या मनात असतो. आज आपण ते म्हणणार नाही. आपण दोन मिनिट शांतता ठेवू आणि त्या काळात तुम्हीसुद्धा हीच प्रार्थना म्हणाल. हे खरे आहे की तुम्हाला औझबिलाही पाठ नाही. परंतु मौन राहण्याच्या काळात तुम्ही राम आणि रहीम हे एक आहेत याची आठवण ठेवा. वेगळ्या शब्दांत हिंदू धर्म आणि इस्लाम दोन्ही महान आहेत व त्यांच्यात काहीही अंतर नाही. कोणत्याही दोन धर्मात शत्रुत्व का असावे हे मला कळत नाही. यामुळे तुम्ही मौन असताना तुमचा मंत्र ‘तू ईश्वर आहेस, तुझी लक्षावधी नावे आहेत‘ हा असावा. मी तुम्हाला सांगितलेच आहे की हिंदू धर्मात विष्णू सहस्रनाम अतिशय प्रसिद्ध आहे. माझा असाही विश्वास आहे की जगात जितकी माणसे आहेत तितकीच ईश्वराची नावे आहेत. ईश्वर, भगवान, खुदा, गॉड वा औहरमज्द असे जे कोणते नाव तुम्हाला घ्यावेसे वाटेल ती सर्व नावे त्याचीच आहेत. आणि तो या सर्व नावांच्याही पलीकडे आहे. तो ईश्वर इतका महान आहे की त्याला कोणीही जाणू शकत नाही आणि त्या ईश्वराचे नाव घेण्यापासून तुम्ही कोणालाही कसे अडवू शकता? अशी कृती करणे म्हणजे शुद्ध उद्धटपणा करणे आहे, रानटीपणा आहे, हिंसा आहे.

मौन पाळत असताना तुम्ही जर तुमचे डोळे बंद करून बसू शकला तर ते अजूनच चांगले. जर मध्यंतरीच्या काळात या सद्गृहस्थांना विवेक सुचला व त्यांनी प्रार्थनेत अडथळा आणायचा नाही असे

ठरवले तर आपण प्रार्थना करू शकू. त्याने जर असे केले नाही तर माझ्या मनात काय आहे ते मी तुम्हाला सांगेन. (यानंतर जमावाने दोन मिनिट मौन पाळले.)

तुम्हाला माहीतच असल्याप्रमाणे आज मी व्हाईसरायकडे गेलो होतो .(या मुलाखतीच्या अहवालाकरिता पाहा लॉर्ड मौऊंटबॅटन यांच्याशी मुलाखत, मे ४, १९४७) आम्ही दीड तास बसलो होतो आणि आमची सुंदर आणि उपयुक्त चर्चा झाली. प्रत्येक गोष्ट मी इथे तुमच्यासमोर उघड करू शकत नाही. ते काहीही असले तरी मी एका गोष्टीबद्दल मात्र बोलेन.

व्हाईसरायनी मला सांगितले की तुम्ही तुमच्या लोकांना माझ्यातर्फे सांगा किंवा माझ्यावर तुमचा विश्वास असेल तर तुम्ही स्वतःच लोकांना सांगा की मी या देशात सत्तांतर करण्याकरिता आणि ब्रिटिश राज्य गुंडाळण्याकरिता मी इथे आलो आहे. इतके मोठे साम्राज्य एका दिवसात गुंडाळणे शक्य नसते. तुम्ही जा अशी बोटाने खूण करून इतके मोठे सैन्य हालवता येत नसते. परंतु त्यांनी मला आश्वासन दिले की ब्रिटिशांना इथे ३० जून, १९४८च्यापलीकडे थांबायची इच्छा नाही. ते म्हणाले की मी इथे हे काम पूर्ण करण्याकरिता आलो आहे.

परंतु वृत्तपत्रांमध्ये जे येत आहे त्यामुळे ते दुखावले आहेत. यामुळे त्यांच्या कामात अडथळे येत आहेत. त्यांची ही तक्रार अशी आहे की आपण एकीकडे आपसात भांडतो आहोत आणि दुसरीकडे ब्रिटिशांना दोष देतो व त्यांची बदनामी करत आहो. ब्रिटिश सरकारने भूतकाळात चुका केल्याही असतील. परंतु आता आपल्या आपसातील भांडणांकरिता ब्रिटिशांची जबाबदारी आपण विसरलो पाहिजे. या वा त्या गोष्टीच्या जबाबदारीकरिता ब्रिटिशांना झोडपून आपल्या पदरी काहीही मूल्यवान पडणार नाही. आपण या सुरात बोलू नये आणि भविष्यातील प्रश्न सोडवत असताना आपण भूतकाळ विसरलो पाहिजे असा त्यांचा आपल्याला सल्ला आहे. व्हाईसरायचे म्हणणे आहे की आपली वृत्तपत्रे नेमके हेच करत आहेत आणि त्यांच्या दुराग्रहामुळे व्हाईसरायच्या कामात अडथळा येत आहे. ते म्हणाले की वर्तमानपत्रांना अंदाज करता यावा असे मी काहीही म्हणालो नाही आणि माझे जवळचे सहकारीही असे काही बोलले नाही.

व्हाईसरायची अपेक्षा आहे की भारतीयांनी किमान वाजवी सौजन्य दाखवले पाहिजे. वृत्तपत्रांमधील मथळेसुद्धा मुद्द्यांना धरून नसतात. सरहद्द प्रांतातील खान साहेबांचे सरकार उलथून टाकले जाईल असे कोणत्या आधारावर म्हणण्यात आले? जेव्हा राष्ट्रवादी वृत्तपत्रे अशा प्रकारचे लेखन करू लागतात तेव्हा मुसलमान वृत्तपत्रे त्यांच्यावरही मात करण्याचा प्रयत्न करू लागतात.

व्हाईसराय म्हणाले की अशा गोष्टींमुळे दोन्ही बाजूंमध्ये विष पसरेल आणि मी इथे विष पेरण्याकरिता आलेलो नाही. हिंदू, मुसलमान, शीख, पारसी आणि ख्रिश्चन हे सर्व शांततापूर्वक एकत्र राहतील तर अविभक्त भारत ठेवल्याबद्दल ब्रिटिशांचेसुद्धा नाव होईल.

व्हाईसरायची असेसुद्धा सांगण्याची इच्छा होती की भारतीयांना स्वातंत्र्याची इच्छा असेल तर त्यांनी शांततापूर्वक राहायला पाहिजे. ते म्हणाले की आम्ही आपसात भांडत असताना आम्हाला अशाच अवस्थेत सोडून जाण्याची त्यांची इच्छा नाही. यामुळे परिणामाची पर्वा न करता ते त्याच्यांकडून शक्य होईल तितके प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत. निश्चितपणे जून ३०, १९४८च्या पूर्वी जायचे आहे अशा पद्धतीने ते काम करत आहेत.

मला आश्वासित करत ते म्हणाले की मी प्रत्येक पाऊल माझ्या विवेकाप्रमाणे उचलेन. ते जरी नौदल सेनापती असले आणि त्यांचा भौतिक शक्तीवर विश्वास असला तरी त्यांची ईश्वरावर नितांत श्रद्धा आहे व इतर कोणाचेच मार्गदर्शन न घेता माझ्याप्रमाणेच ते आपल्या विवेकाप्रमाणे वागतात. ईश्वराने त्यांना जो प्रकाश दिला त्या प्रकाशानुसार ते वागतात. याशिवाय इतर कोणत्याही मार्गाने आपण इंग्लंडची सेवा करू शकत नाही असे त्यांना वाटते. आपल्या लोकांमध्ये सुसंवाद असावा म्हणून ते आपल्याकडून शक्य तितके प्रयत्न करू इच्छितात. अल्पसंख्याकांच्या हिताला धक्का लागेल असे काहीही करण्याची त्यांची इच्छा नाही. असे केले नाही तर त्यांनी मुसलमान, पारसी, शीख इत्यादींना दाबून हिंदूंना सर्व काही दिले असा आक्षेप त्यांच्यावर घेतला जाईल. ते गेल्यानंतर आपण जर आपसात भांडत राहिलो तर मध्यस्ती कोण करेल? सध्या ते शांतपणे तडजोड घडवून आणण्याकरिता प्रयत्न करत आहेत. परंतु एकदा त्यांची सहनशीलता संपली की मग ते गप्प बसणार नाहीत. ते म्हणाले आता संरक्षण मंत्रीसुद्धा तुमचा माणूस आहे. (सरदार बलदेव सिंग) परंतु तेसुद्धा परिस्थिती हाताळण्यात अयशस्वी ठरले तर मी ब्रिटिश सैन्याचे अजूनही सरसेनापती (क्लॉड जॉन आयर जॉन आचिनलेक) असलेले इंग्रज गृहस्थ व त्यांनी प्रशिक्षित केलेली माणसे यांच्या मदतीने, ही जबाबदारी पार पाडेन. परंतु लोकांनी सरळसरळ माझा सल्ला ऐकला तर माझे काम थोडे हलके होईल.

यात काही संशय नाही की व्हाईसरायसमोरील काम कठीण आहे. परंतु कठीण काम पाहून पळून जाणारे ब्रिटिश लोक नसतात.

हे तुम्हाला सांगण्याकरिता नव्हते परंतु आपण इथे इतक्या मोठ्या संख्येत गोळा झालेलो असताना आजच्या प्रसंगाविषयी मी तुम्हाला व तुमच्या माध्यमातून वृत्तपत्रांना सांगितले पाहिजे असे मला वाटले.

मी काल तुम्हाला सांगितले होते की जोपर्यंत मौऊंटबॅटननी विश्वासघात केला असे सिद्ध होत नाही तोपर्यंत आपण त्यांच्याबद्दल बेजबाबदारीने बोलू नये. आपण चांगले वागूनही ते काही करत नसतील तर आपण ब्रिटिश जनतेला सांगू की परंपरेप्रमाणे तुमचे व्हाईसराय आम्हाला स्वातंत्र्य देण्याकरिता आले परंतु त्यांनी आमच्यावर केवळ दडपशाही केली.

आपण हे असभ्यपणाच्या भाषेत अभिव्यक्त करण्याची आवश्यकता नाही. प्रत्येक गोष्ट समंजसपणाच्या भाषेत व्यक्त करता येऊ शकते. आपण जर सुसंस्कृपणे वागलो नाही तर आपणच आपला गळा कापून घेऊ.

आपण जर आपसात भांडणे सुरू ठेवले तर त्यांचे जाणे आपण कठीण करून टाकू. संरक्षण अर्थातच त्यांच्या हातात आहे, परंतु ते विदेशी आक्रमकांशी लढण्याकरिता. आपली अंतर्गत भांडणे ते कसे सोडवू शकतील? ते केवळ इतकेच म्हणतील हिंदू मुसलमानांना आणि मुसलमान हिंदूंना दोष देत आहेत. ते यासंबंधात काय करू शकतात? त्यांना जावे लागणारच आहे. आपण जर जून अखेरपर्यंत भांडतच राहिलो व ते काहीही करू शकले नाही तर आपण त्यांना सांगू की आता यापुढे तुम्हाला इथे थांबायचा अधिकार नाही व म्हणून तुम्ही येथून जा.

ते जर थांबले तर ते हिंदू आणि मुसलमान यांची भांडणे शक्तीच्या जोरावर थांबवू शकतात. असे त्यांनी पूर्वीही केले होते. एका इंग्रजाचा खून केल्यामुळे त्यांनी हजारो लोकांना मारले होते. परंतु आपल्या प्रस्थानाच्या वेळी ते असे करू शकत नाहीत. यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांचे प्रस्थान सोपे करणे आपले कर्तव्य आहे. त्यांच्या अडचणीत आपण भर घालू नये.

परंतु आज काय होते आहे? आज अन्नवस्त्राची चणचण आहे - तुम्हाला आणि मला ते मिळतात परंतु देशात करोडो लोक असे आहेत की ज्यांना अन्न आणि वस्त्र मिळत नाहीत. आज मद्रासचे मंत्री माझ्याकडे आले होते. त्यांनी मला सांगितले की प्रांतात पूर आलेले आहेत. परंतु दंगली नसत्या तर गरीब लोकांना अन्नधान्य पुरवता आले असते. अन्नधान्य वाटपाशी संबंधित माणूस हिंदू मुसलमान असा विचार करायचा नसतो. ते देशातील सगळ्या लोकांना पुरवावे लागत असते.

परंतु आज केवळ एकच विचार आहे. तो म्हणजे मारण्याचा आणि कत्तल करण्याचा आणि तेही पाशवी पद्धतीने. मुलमान हिंदूंना मारत आहेत आणि मुसलमान दिसला की हिंदू त्याला मारत आहेत.

आपले जर अशा पाशवी मार्गापर्यंत अधःपतन झाले असेल आणि ब्रिटिश गेल्यानंतर आम्ही योग्य मार्गाचे अनुसरण करू असे जर आपण म्हणू तर ती चुकीची वृत्ती आहे असे म्हणावे लागेल.

मला तुम्हाला अजून एक गोष्ट सांगायची आहे. जनरल शाह नवाझ आज आले. मी बिहारमधून आल्यानंतरही ते तिथेच थांबले. ते कोणताही पगार घेत नाहीत. असे असूनही त्यांनी औपचारिकता म्हणून पंधरा दिवसांची सुटी घेतली आणि ते घरी गेले. त्यांनी सांगितले की जे मुसलमान बिहारमध्ये परतायला मागेपुढे पाहत होते व ज्यांना हिंदू धाकदटपशा करत होते ते आता परतू लागले आहेत. याचे कारण कर्तव्य काय आहे ते हिंदूंना जेव्हा सतत दोन दिवस समजावून सांगण्यात आले व ते हिंदूंच्या लक्षात आले तेव्हा मुसलमानांच्या परतीचा मार्ग मोकळा झाला आणि मुसलमानांच्या ज्या झोपड्या जमीनदोस्त करण्यात आल्या होत्या त्या बांधण्याकरिताही हिंदूंनी मदत केली. इतर खेड्यांमध्येही असेच चांगले काम करण्यात आले आहे.

जर अशाच प्रकारे काम सुरू राहिले तर बिहारमधून पळालेले सर्व मुसलमान परततील. सरकार त्यांना आर्थिक मदत करत आहे. परंतु जे लोक मुसलमानांना धाक दाखवत आहेत व त्यांच्या मार्गात अडथळे निर्माण करत आहेत त्यांनासुद्धा हिंदूंनी समजावले पाहिजे. तेव्हाच हे काम पूर्ण होईल.

थोडक्यात खून आणि कत्तलीच्या या वातावरणातही काही चांगली माणसे आहेत. प्रत्येक मुसलमान, प्रत्येक शीख, प्रत्येक हिंदू वाईट माणूस नाही.

ज्याप्रमाणे बिहारमध्ये शांतता प्रस्थापित करण्यात आली तशीच डेरा इस्माईल खान आणि सरहद्द प्रांतातही यावी.

जिना साहेबांनी जे लिहिले तसाच त्यांचा अर्थ असेल तर त्यांनी दंगली थांबवल्या पाहिजे. या दंगली सैन्य थांबवू शकत नाही. दंगली तेव्हाच थाबतील जेव्हा लोकांना तसे करण्याकरिता समजावून सांगण्यात येईल. जर त्यांनी दंगली थांबवल्या नाही तर त्याचा अर्थ असा होईल की त्यांना जिना साहेबांच्या शब्दांचे महत्त्व वाटत नाही वा जिना साहेबांना दंगली थांबवण्यात रस वाटत नाही.

परंतु जिना साहेबांबद्दलचे अप्रिय विचार आपण आपल्या मनात का बाळगावे? जेव्हा सर्व काही ठीकठाक होत नाही तेव्हा माणूस संशयी होतो. मी जर कशावर तरी माझी सही केली असेल व माझी कृती त्याच्या अगदी विरोधी असेल तर संशय निर्माण होणे अपरिहार्य आहे. यामुळे याविषयीही काही संशय. परंतु अखेरच्या क्षणापर्यंत जिना साहेब काय करतात याकडे आपण लक्ष ठेवले पाहिजे

हिंदीवरून, प्रार्थना प्रवचन - भाग १, पृष्ठ ६६-७२

## ५. प्रार्थना प्रवचन, मे ५, १९४७

(वादळी हवामानामुळे मे ५ला गांधीजींचे लेखी भाषण वाचून दाखवता आले नाही. दुसऱ्या दिवशी एम. ए. जिना यांची भेट घेऊन गांधीजी वेळेवर पोहोचू शकले नाही, प्रार्थना साडेसहा वाजता सुरू झाली. कुराणमधील भाग म्हणण्यावर परत आक्षेप घेण्यात आल्यामुळे दोन मिनीट मौन पाळण्यात आले व पुढील मजकूर वाचून दाखवण्यात आला.)

नवी दिल्ली, मे ५, १९४७

वाईट गोष्टीपासून बचाव करण्याकरिता मी ईश्वराचा आसरा घेतो. हे देवा! मी प्रत्येक कार्याची सुरुवात तुझ्या नामस्मरणाने करतो.

तू कनवाळू आणि दयाळू आहेस. तू विश्वनिर्माता आहेस. तूच राजा आणि मालक आहेस. मी केवळ तुझीच महिमा गातो आणि आणि मदत मागतो. न्यायाच्या दिवशी तू सर्वांचा न्याय करशील. तू मला योग्य मार्ग दाखव, असा मार्ग की जो तुझ्या संतांनी पायाखाली तुडवला असेल, नको दाखवूस त्यांचा मार्ग ज्यांनी तुला  दुखवले असेल.

ईश्वर एक आहे. तो चिरंतन, सर्वशक्तिमान, अजन्मा आहे. त्याच्यासारखा कोणीही नाही.

कुराण ए शरीफमधून जो भाग वाचला जातो त्याचा हा अनुवाद आहे. हा भाग म्हणण्यावर कोणी कसा काय आक्षेप घेऊ शकतो हे माझ्या आकलनशक्तीपलीकडे आहे. आपल्या अंतःकरणात ही प्रार्थना जतन करून ठेवली तर त्यामुळे आपल्यापैकी प्रत्येक स्त्रीपुरुषाचे उन्नयन झाल्याशिवाय राहणार नाही असे मी खात्रीपूर्वक सांगतो.

आज मी अधिक सांगणार नाही.

हिंदीवरून, प्रार्थना प्रवचन, भाग १, पृष्ठ ७३

# ६. प्रार्थना प्रवचन, मे ७, १९४७

नवी दिल्ली, मे ७, १९४७

प्रार्थनेच्या ठिकाणी पोहोचल्याबरोबर गांधीजींनी उमादेवी आल्या आहेत काय अशी चौकशी केली... गांधीजींच्या आग्रहास्तव व्यासपीठावर बसण्याकरिता त्यांची समजूत घालण्यात आली. गांधीजींनी विभावरीबाई देशपांडे यांनासुद्धा व्यासपीठावर बसण्याकरिता निमंत्रित केले आणि ते म्हणाले की या दोन स्त्रियांनी कुराणमधील कडवी म्हणण्याला विरोध केला आहे.

काही थोड्याशा लोकांच्या विरोधामुळे प्रार्थना थांबवण्यात येऊ नये असे म्हणणाऱ्या २० लोकांच्या सह्या असलेल्या पत्राचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की तुम्हाला असे वाटते काय की दोन वा वीस लोकच याप्रमाणे विचार करणारे आहेत? मला असे वाटते की विरोध न करता जे लोक दररोज इथे येऊन शांतपणे बसतात त्यांच्या मनातही या पत्रात व्यक्त करण्यात आलेलेच विचार असावे.

परंतु मी तुम्हाला शांत राहण्याची विनंती करीन. हिंदू धर्माने सहनशीलतेला फार महत्त्व दिले आहे. गवताच्या एका पात्याच्या मदतीने सागरातील एकेक थेंब घेऊन त्या सागरातील सगळे पाणी दुसऱ्या खड्ड्यात भरण्याकरिता जेवढी सहनशीलता पाहिजे त्याहून अधिक सहनशीलता मोक्ष मिळवण्याकरिता पाहिजे असते असे सहनशीलतेचे महत्त्व सांगताना शंकराचार्य म्हणाले आहेत. आता कल्पना करा की एखादा माणूस सागरातील पाणी दुसऱ्या एका खड्ड्यात गवताच्या पात्याने न भरता एखाद्या पातेल्याने भरतो आहे. असे करत असतानासुद्धा ते पाणी दुसऱ्या खड्ड्यात भरण्याच्या दृष्टीने त्याला तो खड्डा फार मोठा वाटतो, आणि जर तो माणूस शेकडो वा हजारो वर्षे जिवंत राहिला तर कदाचित तो त्या खड्ड्यात सागराचे सगळे पाणी ओतू शकेल. परंतु सागरामध्ये सतत जे नवीन पाणी येत असते त्याचे काय करायचे? मग तो समुद्र कोरडा करण्याकरिता किती धैर्य लागेल? स्वाभाविकपणे मोक्ष इच्छिणाऱ्या व्यक्तीकरिता लागणाऱ्या असीम धैर्याबद्दलच शंकराचार्य बोलत आहेत. ते म्हणाले की एक पाऊल रिकिबीवर आणि दुसरे पाऊल घोड्याच्या पाठीवर बसण्याकरिता उचललेले अशा अवस्थेत ब्रह्म काय आहे हे माणूस आपल्या गुरूला विचारू शकत नाही. ब्रह्म जाणून घेण्याचा हा मार्ग नाही. आपण सर्व जे इथे गोळा झालेलो आहो ते काही तरी शिकण्याकरिता गोळा झालो आहो. आपणा सर्वांना मोक्ष हवा आहे. परंतु त्याकरिता आवश्यक असलेले धैर्य अंगी बाणवण्याची आपल्यामध्ये क्षमता आहे काय? तसे नसेल तर प्रार्थना करण्यापुरते तरी धैर्य आपण अंगी बाणवू या. आपल्या आजूबाजूला मुले दंगा करत असताना आपण प्रार्थना करू लागलो तर

तिने आपला कोणता लाभ होणार आहे? प्रार्थना चांगली होण्याकरिता ती अंतःकरणातून आली पाहिजे. देव इतका भोळसट नाही की केवळ आपल्या ओठांवरून आलेल्या शब्दांना प्रार्थना समजून तो भुलून जाईल. प्रार्थना म्हणजे केवळ शब्दांचा पुनरुच्चार नाही! आणि आपण जेव्हा कोणत्या तरी प्रकारच्या विरोधाला तोंड देत असतो तेव्हा अशा प्रकारच्या उच्चारणाचा आग्रह आपण का धरावा? आपल्या अधिक शक्तीच्या बळावर त्या तरुणाला गप्प बसवून आपण काय करणार आहो - तुम्ही त्याला धर्माचे अनुसरण म्हणाल काय? या तरुणाला सहन करण्यात धर्म आहे. तुम्ही इतक्या मोठ्या संख्येत इथे गोळा झाला, शांतपणे तुमच्या धर्माचे अनुसरण केले आणि या अज्ञानी तरुणाला सहन केले याचा मला आनंद होतो.

परंतु आज आपल्याला त्या तरुणाचा सामना करावा लागत नाही आहे तर या स्त्रीचा. मी दत्तक घेतलेल्या मुलीपेक्षाही ती लहान असल्याचे मला दिसते. ती एका सचिवाची (अखिल भारतीय देशी राज्य हिंदू महा सभेचे सचिव. त्यांनी राजस्थान समाचार हे दैनिकही काढले होते.) पत्नी आहे. तिने मला पत्र पाठवले होते. मी आधी त्याची चर्चा करेन.

पत्रातील माहितीवरून हिंदू धर्माचे ज्ञान दिसत नाही तर अज्ञान तेवढे दिसते. खरे म्हणजे अशा प्रकारे हिंदू धर्माचे रक्षण करण्याच्या प्रयत्नामुळे त्याची बदनामीच होते. सगळ्या हिंदूंना आणि शिखांना मी सांगू इच्छितो की तुम्ही अशी चुकीची पद्धत वापरू नका. या स्त्रीच्या प्रश्नांचे मी क्रमशः उत्तर देईन.

१. देवळात कुराणातील भाग वाचल्यामुळे देऊळ बाटते हे म्हणणे बरोबर नाही. देवळात ईश्वराचे स्तवन केले तर ती गोष्ट धर्मविरोधी कशी काय होऊ शकते? औझोबिलाही इत्यादीचा काल मी जेव्हा हिंदीत अर्थ समजावून सांगितला होता (पाहा प्रार्थना प्रवचन, मे ५, १९४७) तेव्हा कोणीही विरोध केला नव्हता. कोणी जर गीतेचे अरबी भाषेतील अनुवाद म्हणाला तर ते धर्मविरोधी कृत्य होईल काय? जर कोणी असे म्हणत असेल तर तो माणूस अडाणी आहे असे म्हणावे लागेल. सरहद्द प्रांतात एक नियम होता की कुराणचे भाषांतर करू नये. परंतु डॉ.खान साहेब, जे सध्या सरहद्द प्रांताचे प्रधानमंत्री आहेत, समंजस गृहस्थ आहेत. ते म्हणाले की कुराणचा जर अनुवाद करण्यात आला तर त्याचा प्रसार वेगात होईल. जास्त लोक तो वाचतील आणि समजू शकतील. नमाझमध्ये कुराणमधीलच कडवे म्हणत असतात. असे म्हणणे पाप होईल काय?

२. तुम्ही म्हणू शकाल की मुसलमानांनी हिंदूंच्या विरोधात पाप केले आहे. परंतु हिंदू काही कमी होते काय? हिंदूंनी बिहारमध्ये काय केले ते तुम्हाला माहीत असायला पाहिजे होते. त्यांनी स्त्रियांना आणि मुलांना मारले, घरांना आगी लावल्या आणि घरातून पळून जाणाऱ्या मुसलमानांचा

पाठलाग केला. आता जर मुसलमान इथे आले आणि म्हणाले की भग्वदगीतेच्या वाचकांनी फार मोठे पाप केले आहे तर हा सत्याचा किती मोठा अपलाप होईल? काही मर्यादेपर्यंत मला मान्य आहे की मुसलमानांनी अतिशय क्रूर कृत्ये केली आहेत व त्यामुळे त्यांनी पाप केले आहे. परंतु कुराणच्या वाचकाने पापपूर्ण वर्तन केले म्हणून कुराण कसे पापपूर्ण होऊ शकते हे मला कळत नाही. असा प्रकारे गीता, उपनिषद, वेद आणि खरे म्हणजे सर्व धर्मग्रंथ पापपूर्ण आहेत असे सिद्ध करता येईल. गीतेतूनसुद्धा लोक वेगवेगळे अर्थ काढतात. गीतेचा मी जो अर्थ लावतो त्याहून काही लोक अगदी वेगळा अर्थ लावतात. मला गीतेत अहिंसाचा संदेश आढळतो तर काही लोक म्हणतात की गीतेत आततायी माणसाची (घृणित कृत्ये करणारा म्हणजे आग लावणारा, विषप्रयोग करणारा, खुनी, लुटारू, भूमीवर अतिक्रमण करणाराआणि व्यभिचारी यांना आततायी म्हणतात. १.३६) हत्या करण्याचा आदेश आहे. त्यांच्याकडे जाऊन मी त्यांना थांबवू शकतो काय? मी त्यांचे ऐकतो आणि मला जे योग्य वाटते ते करतो.

३. मशिदीत मी गीता वाचली नाही याचा अर्थ मी भित्रा आहे इतकाच होतो, नाही का? मान्य की मी भित्रा आहे आणि मशिदीत मुसलमानांसमोर प्रार्थना करायची मला भीती वाटते. परंतु मी जर एखाद्या बाबतीत भित्रा असेन तर सर्व बाबतीत भित्रा आहे असे म्हणता येईल काय?

तुम्हाला माहीत असायला पाहिजे की मी अनेक ठिकाणी मुसलमानांबरोबर राहतो आणि त्यांच्याकडे मी निःसंकोचपणे माझी प्रार्थना करत असतो. आणि मी जेव्हा नोआखालीचा दौरा करत होतो तेव्हा अगदी मशिदीत जरी नाही तरी मशिदीच्या अगदी जवळ अनेकदा मी प्रार्थना घेत होतो. एकदा मी मशिदीच्या आवाराच्या आतील इमारतीत प्रार्थना घेतली होती. आणि माझ्याबरोबर मी नेहमी प्रार्थनेचे सर्व साहित्य घेत असे. तिथे वाद्य वाजवले जात असे आणि टाळ्या वाजवत रामधून म्हटली जात असे. मशिदीच्या आवारात प्रार्थना म्हणत असताना आमच्याजवळ वाद्य नव्हते परंतु टाळ्या वाजवत आम्ही रामधून म्हणत होतो. मुसलमानांना मी सांगितले होते की तुम्ही जसे रहीमचे नाव घेता तसाच मी रामाचे नाव घेणार आहे. मी त्यांना सांगितले की रहीमचे नाव घेणारांनी इतरांना रामाचे नाव घेऊ दिले नाही तर ही गोष्ट तुम्हाला शोभणार नाही.

तुम्ही अत्याचाराबद्दल बोलता. नोआखालीत बऱ्याच अत्याचाराच्या घटना घडल्या. परंतु नोआखालीत मुसलमानांनी केलेले अत्याचार बिहारमध्ये हिंदूंनी केलेल्या अत्याचारांसमोर काहीही नाहीत हे मी तुम्हाला सांगेन. मी या गोष्टीचा साक्षीदार आहे. मी नोआखालीतही होतो व मी बिहारचा दौराही केलेला आहे.

जो कोणी म्हणतो की मुसलमानासमोर जाऊन मी प्रार्थना करू शकत नाही तो गांधीला ओळखत नाही. गांधी कोणत्या धातूपासून बनला आहे हे या बिचाऱ्या उमादेवीला कुठे माहीत आहे? मला माझी लाज वाटत नाही तर या बाई जे म्हणत आहेत त्याची लाज वाटते. हिंदू धर्मसभेचे सचिवपद धारण करणाऱ्या या सद्गृहस्थांची लाज वाटते कारण हे पद धारण केल्यानंतरही त्यांना हिंदू धर्माचे ज्ञान नाही. जर सागरालाच आगा लागली तर ती आग कोण विझवू शकेल?

परंतु सत्य हे आहे की या बाईंचा विरोध विशिष्ट प्रार्थनेला नाही तर अरबी भाषेला आहे. काल मी जेव्हा कुराणातील भागाचा अनुवाद करून सांगितला तेव्हा कोणाच्याही भावना दुखावल्या नाही.

यानंतर गांधीजींनी अनुवादित भागाचा पुनरुच्चार केला.

आता पाहा, मी परत ती संपूर्ण प्रार्थना वाचली. यामुळे या स्त्रीच्यासुद्धा भावना दुखवल्या गेल्या नाहीत. तिला जर यात काही पापपूर्ण वाटले असते तर, ‘गप्प बसा, मला हे ऐकायचे नाही’ असे म्हणून तिने मला गप्प बसवले नसते काय?

परंतु आता ती मला थांबवू शकते काय? इतर कोणत्या मार्गाने मी ईश्वराची प्रार्थना करू शकतो? ईश्वराचा उल्लेख मी अज (अजन्मा) म्हणून करू नये? वा मी त्याला चिरंतन समजू नये? वा मी त्याला सर्वशक्तिमान म्हणू नये? वा मी त्याला मालक म्हणू नये? मग माझ्या प्रार्थनेत मी म्हणावे तरी काय? आपल्याला आपल्याला प्रार्थनेत जे काही म्हणायचे असेल ते जर आपण अरबी भाषेत म्हणालो तर हा किती मोठा अडाणीपणा असेल? अशा घोर अज्ञानापासून आपण स्वतःला वाचवले पाहिजे.

तर आम्हाला काळोखापासून वाचव अशी आपण ईश्वराची प्रार्थना करू या. आपल्या हिंदू प्रार्थनेतसुद्धा निवडण्यात आलेले शब्द ‘तमसो मा ज्योतिर्गमय’ हे म्हणजे आम्हाला काळोखापासून उजेडाकडे ने हे आहेत. (बृहदारण्यकोपनिषद३.२८, पाहा आश्रम भजनावली) अशा प्रकारच्या अनुपम धर्माचे कौतुक करण्याऐवजी त्याला एखाद्या दगडाप्रमाणे भिरकावून द्यावे याचे मला वाईट वाटते. आणि जो माणूस धर्माची सेवा करू इच्छितो त्याची बायको अशा प्रकारचे वर्तन करून धर्माची अधोगती करण्याचा प्रयत्न करते आहे या गोष्टीने मी अजून दुःखी होतो. आपल्या बायकोचे विचार असे इतस्तः न भरकटू देणे हे त्याचे कर्तव्य आहे. परंतु या सद्गृहस्थांनी आपल्या पत्नीला नितांत असहनशीलतेचे प्रशिक्षण दिले आहे. अशा प्रकारच्या परिस्थितीत धर्म कसा जिवंत राहू शकतो?

आपण जर असे सुरू ठेवले तर हिंदू धर्म निश्चितच टिकणार नाही. आणि भारतचेही अस्तित्व राहणार नाही. ब्रिटिश जरी निघून गेले तरी आपल्याला भारताला वाचवता येणार नाही. स्वतंत्र भारतात आपण भावाभावाप्रमाणे राहिलो पाहिजे. आज जे शत्रू आहेत ते उद्या मित्र होतील. मग तुम्ही तुमच्या मुसलमान शेजाऱ्याला तू कुराण वाचू नकोस म्हणून सांगाल काय? त्यामुळे हिंदू धर्माचे स्थान उंचावेल काय?

यामुळे तुम्ही मौन राहून प्रार्थना करावी असे मी तुम्हाला सांगतो आहे. कारण इतके सगळे लोक काही दोनचार लोकांबद्दल राग न धरता शांतपणे मौन धारण करून बसून राहिले तर आपण पवित्र होऊ.

तुम्हा सर्वांना माहीत आहे की काल मी जिना साहेबांना भेटायला गेलो होतो. आमच्यामध्ये काय झाले ते सर्व मी तुम्हाला सांगू शकत नाही. आपण जे काही बोलू ते आपल्यातच राहील व ते बाहेर उघड केले जाणार नाही असा आमच्यात करार झाला आहे. इतकेच नाही तर मी बादशाह खान, पंडित जवाहरलाल आणि इतर पुढाऱ्यांनाही जिनासाहेबांशी जी बोलणी झाली त्याचा गोषवारा कळवला आहे. इथेसुद्धा मी तो थोडक्यात सांगेन. आम्ही दोघांनीही एका दस्तावेजावर सही केली आहे. (गांधीजी व एम. ए. जिना यांच्या सहमतीने एक संयुक्त आवाहन एप्रिल १२, १९४७ला काढण्यात आले होते व गांधीजींच्या सहमतीचने ते प्रकाशित करण्यात आले होते.) त्यात दोन मुद्दे आहेत. पहिला मुद्दा होता आपल्या राजकीय उद्दिष्टांच्या परिपूर्तीकरिता आपण कुणावरही दडपण आणणार नाही. प्रत्येक बाजू दुसऱ्या बाजूला आपला दृष्टिकोन समजून सांगण्याचा प्रयत्न करील व धाकदपटशा दाखवण्याचा वा गुंडगिरी करण्याचा प्रयत्न करणार नाही.

दुसरा मुद्दा होता लोकांना हिंसक कृत्यांपासून आणि इतर अत्याचारी वर्तनापासून परावृत्त करणे. कालच्या जिना साहेबांच्या वक्तव्यावरून (पाहा गांधीजींच्या सहमतीसह एम. ए. जिना यांनी वृत्तपत्रांना दिलेले वक्तव्य मे ६, १९४७) तुमच्या लक्षात आलेच असावे की आमच्यामध्ये स्पष्ट राजकीय मतभेद आहेत. जिना साहेबांना पाकिस्तान हवा आहे. पाकिस्तानकरिता करण्यात आलेली मागणी मान्य करावी असा निर्णय कॉंग्रेसच्या लोकांनीही घेतला आहे. परंतु त्यांचे म्हणणे आहे की बंगाल आणि पंजाबमधील हिंदू आणि शीख (बहुसंख्य असलेल्या) भागाचा पाकिस्तानमध्ये समावेश करता येऊ शकत नाही. केवळ मुसलमानबहुल प्रदेशच भारतापासून वेगळा काढता येऊ शकतो. परंतु माझ्याबद्दल बोलायचे तर मी पाकिस्तानला कोणत्याही अटीवर मान्यता देऊ शकत नाही. देशाची फाळणी करणाऱ्या कोणत्याही प्रस्तावाला मी मान्यता देऊ शकत नाही. अशा अनेक गोष्टी घडत आहेत की ज्या मी सहन करू शकत नाही. परंतु त्या घडणे अजूनही थांबत नाही. त्या

घडणे सुरूच आहे. परंतु या बाबतीत मी जेव्हा म्हणतो की त्या मला सहन होत नाहीत तेव्हा त्याचा अर्थ असतो मी यात भागीदार होऊ शकत नाही. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर या बाबतीत मी त्यांच्या प्रभावाखाली येणार नाही. त्यांना जर पाकिस्तान हवा असेल तर त्यांनी आपल्या बांधवांशी वाटाघाटी करून तो घ्यावा. कोणत्याही एका पक्षाचा प्रतिनिधी म्हणून मी बोलू शकत नाही. मी सर्वांचे प्रतिनिधित्व करतो. या देशात राहणारे हिंदू, मुसलमान, शीख, पारसी, जैन, ख्रिश्चन या सर्वांचा विश्वस्त होण्याचा माझा प्रयत्न आहे. माझ्यात त्यांचा विश्वस्त होण्याची क्षमता वा पात्रता नसेल तरी मला त्यांचा विश्वस्त होण्याची इच्छा आहे. यामुळे पाकिस्तानच्या निर्मितीत मी भागीदार होऊ शकत नाही. जिना साहेब जे करू पाहत आहेत ते धोक्याचे आहे हे जर मला माहीत आहे तर मी पाकिस्तान मान्य करण्याच्या प्रस्तावावर सही कसा करू शकतो? हा मुद्दा मी त्यांना अतिशय शांतपणे सांगितला. आम्ही भांडलो नाही. आम्ही परस्परांशी सौजन्यपूर्वक बोललो.

जिनासाहेबांना मी सौजन्यपूर्ण शब्दांत सांगितले की शक्तीच्या बळावर तुम्हाला पाकिस्तान मिळू शकत नाही. पाकिस्तानकरिता चकार शब्द न काढता कबूली देण्याकरिता ते मला भाग पाडू शकत नाहीत. ईश्वर सोडून इतर कोणीही मला भाग पाडू शकत नाही. जर ते मला समजावून सांगू इच्छित असतील तर केवळ पाकिस्तानच का, संपूर्ण भारत का नाही?

शांततेकरिता करण्यात आलेले आवाहन प्रभावी होण्याकरिता त्यावर सही करण्याकरिता जिनासाहेबांबरोबर मी तयार झालो आणि याकरिता जे कोणते काम माझ्याकडून घ्यायचे असेल ते त्यांनी घ्यावे अशी मी त्यांना विनंती केली. मी त्यांना सांगितले की याकरिता आवश्यकता असली तर मी तुमच्याबरोबर हजार वेळा येईन.

मी तुम्हाला सांगू इच्छितो की जिना साहेबांकडे जाण्यापासून मला परावृत्त करण्याकरिता प्रत्येकाने प्रयत्न केला होता. त्यांनी मला विचारले की जिना साहेबांबरोबर गेल्याने तुम्हाला काय मिळणार आहे. परंतु मी त्यांच्याकडे काही मिळवण्याकरिता गेलो होतो काय? त्यांचे मन समजून घेण्याकरिता मी गेलो होतो. त्यांच्याकडे जाऊन मला काही मिळाले नसेल तर त्यांच्याकडे गेल्यामुळे मी काही गमावलेही नाही. मी त्यांच्या मैत्रीचा दावा करतो. अखेरीस तेसुद्धा भारताचेच आहेत. काहीही झाले तरी मला त्यांच्याबरोबर जीवन व्यतीत करायचे आहे. त्यांच्याबरोबर जाण्याकरिता मी नकार कसा देऊ शकतो?

आम्ही स्नेहभावाने राहिलो पाहिजे. सुसंवादाने राहण्याकरितासुद्धा आम्ही कोणावर बळजबरी करता कामा नये. त्यांना जर पाकिस्तान हवा असेल तर पाकिस्तानसंबंधीचा त्यांचा दृष्टिकोन त्यांनी आम्हाला पटवून दिला पाहिजे. पाकिस्तानची निर्मिती सर्वांकरिता हिताची आहे असे त्यांनी सर्वांना

पटवून दिले तर मी त्यांचा प्रस्ताव मान्य करेन. परंतु पाकिस्तान मान्य करण्याकरिता ते मला भाग पाडू शकतील अशी जर त्यांची अपेक्षा असेल तर - असो, मी त्यांना माझी संमती देऊ शकत नाही.

भारताचे विभाजन का होऊ शकत नाही असे कदाचित तुम्ही मला विचाराल. त्यामुळे किती हानी होईल हे तुम्ही ऐकले तर तुम्ही आश्चर्यचकित व्हाल. माझे डोके रिकामे नाही हे कृपाकरून लक्षात ठेवा. कृपाकरून या विचारांबद्दल ऐका आणि वाचा. आज मी तुम्हाला भरपूर वेळ दिला आहे.

आता मी कलकत्त्याला जात आहे. तिथे मी काय करू शकेन हे मला माहीत नाही. आणि मला हेही माहीत नाही की मी तिथे किती दिवस थांबेन आणि कधी परतेन. जेव्हा केव्हा जवाहरलाल, कृपलानी वा व्हाईसराय मला बोलावतील तेव्हा मी परत येईन असा शब्द मी दिला आहे. आणि मला आशा आहे की मी तुम्हाला पुन्हा पाहीन. मध्यंतरीच्या काळात लक्षात ठेवा प्रार्थना करताना मला अडवून तुमचा कोणताही लाभ होणार नाही. मला मौन राहण्याचा लाभ मिळतो. आणि राग दाबून शांत राहणाऱ्या तुम्हा लोकांचाही कमी लाभ होणार नाही. परंतु ज्यांनी अडथळा निर्माण केला त्यांच्याजवळ गमावण्यासारखे सर्व काही होते. तुम्ही लोकांनी विवेकाने वागण्याकरिता त्यांना मदत केली पाहिजे. तुम्हाला आठवत असेलच की याआधी जेव्हा प्रार्थनेत अडथळा आणण्याचा प्रयत्न झाला होता तेव्हा हिंदू महासभेच्या सचिवांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला होता. तुम्हीसुद्धा त्यांना अशाच प्रकारे समजावले पाहिजे. धाक दाखवून वा दडपण आणून नाही तर गांधीच्या प्रार्थनेत केवळ धर्म आहे, अधर्म नाही असा शांतपणे युक्तिवाद करून तुम्ही त्यांना समजावले पाहिजे. जर त्यांना पटले नाही तर मौन प्रार्थना करण्याइतकी सहनशीलता माझ्यात आहे. इतकेच नाही तर देवळातसुद्धा हीच प्रार्थना मी एकट्याने म्हणेन. परवा जेव्हा पाऊस पडत होता तेव्हासुद्धा मी हीच प्रार्थना म्हणत होतो. ते तेच मंदिर होते आणि तिथे तेच हिंदू उपस्थित होते. परंतु आज परत विरोध झाला. आपली ही अशी दुःखद अवस्था झाली आहे.

तुमची प्रार्थना अरबी भाषेत असो की फारसी भाषेत असो की संस्कृत भाषेत असो ती करण्याकरिता तुम्ही स्वतंत्र आहा असे हे लोक म्हणतील अशी तुम्ही तुमच्या अहिंसक व्यवहाराने या लोकांची समजूत घालावी अशी माझी तुम्हाला विनंती आहे.

आता कृपाकरून दोन मिनिट शांत बसा व मौन प्रार्थना करा. आणि तुम्ही तुमचे डोळे बंद ठेवले तर अजूनच चांगले.

हिंदीवरून, प्रार्थना प्रवचन - भाग १, पृष्ठ ७४-८१

# ७. प्रार्थना प्रवचन, मे ९, १९४७

(अमृत बझार पत्रिकेमधील हा अहवाल द हिंदूमधील अहवालाशी जुळतो.)

सोदेपूर,

मे ९, १९४७

*गांधीजी म्हणाले की मी कलकत्त्याला येईन असे अपेक्षित नव्हते. परंतु मला जेव्हा कलकत्त्यातील घटनांबद्दल मित्रांकडून कळले तेव्हा ज्या कामाकरिता मी नोआखाली आणि नंतर बिहारमध्ये गेलो होतो त्याच कामाकरिता मी कलकत्त्याला गेलो पाहिजे आणि माझे काम केले पाहिजे असे मला वाटले. त्यांना तिथे फुलांनी सजवलेले गुरुदेवांचे चित्र दिसले. वैशाख महिन्याची २५ तारीख गुरुदेवांची जन्मतारीख होती. यामुळे गुरुदेवांनी लिहिलेल्या दोन स्तोत्रांचे वाचन करण्यात आले. थोर पुरुषांचा कधीही मृत्यू होत नसतो आणि त्यांचे काम सुरू ठेवून त्यांना अजरामर करणे हे जनतेचे काम असते. हिंदू आणि मुसलमान आज भांडत असताना मला हिंशाय उन्मत्त पृथ्वी (जग हिंसेने वेडे झाले आहे) हे जे दुसरे स्तोत्र म्हणून दाखवण्यात आले होते त्याच्या अगदी विपरीत परिस्थिती असल्याचे मला जाणवते. या स्तोत्राचा सारांश असा आहे - ईश्वर आम्हाला अंधाराकडून प्रकाशाकडून नेवो, असत्याकडून सत्याकडे नेवो, संकटातून असीम अत्यानंदाच्या स्थितीकडे नेवो. याच मंत्राचे शस्त्र त्यांनी दीनबंधू ॲन्ड्र्यूज आणि पिअर्सन (विल्यम विन्सटेनली पिअर्सन) यांना दक्षिण आफ्रिकेत जाण्याची परवानगी देत असताना दिले होते. गुरुदेवांच्या जगातील अनेक भक्तांमधील हे सर्वोत्तम भक्त होते.*

*गांधीजी पुढे म्हणाले की कायदे आझम जिना यांना पठाणांचे जे प्रतिनिधीमंडळ भेटण्याकरिता गेले होते त्यांच्यासमोर त्यांनी काढलेल्या उद्गारांचा सूरही हाच होता ही चांगली गोष्ट आहे. ते शब्द तुम्ही स्वतःकरिताही वाचावे. तुम्ही जर या सल्ल्याचे अनुसरण केले तर हिंदुस्तान खरोखर शांततेची भूमी होईल.*

अहिंसेच्या दस्तावेजावर आम्ही संयुक्तपणे सही केली होती. (पाहा शिखांशी चर्चा एप्रिल १२, १९४७) त्यामुळे हिंदू वा मुसलमान जर दानवाप्रमाणे वा पशूप्रमाणे वागले तर माझ्यावर आमरण

उपोषण करण्याची जबाबदारी ताबडतोब येऊन पडते. बिहारमधील हिंदूंनी आणि नोआखालीतील मुसलमानांनी ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.

आपले बोलणे पुढे सुरू ठेवत गांधीजी म्हणाले की मी केलेल्या सेवेमुळे आणि अजूनही हिंदुस्तानातील मुसलमानांची मी जी सेवा करतो आहे त्यामुळे मला उपोषणाचा हा अधिकार मिळतो. कवी इकबालनी आपल्याला आधीच शिकवले आहे की खरा धर्म माणसांना एकमेकांचा द्वेश करणे शिकवत नाही. आपण सर्व हा पाठ आपल्या अंतःकरणात बाळगू या आणि हिंदभूला शांततेची व माणसामाणसातील भ्रातृभावाची भूमी करू या.

ब्रिटिश निश्चितच हिंदुस्तान सोडून जात आहेत आणि आपल्यामध्ये जर काही मतभेद असतील तर आपण संपूर्णपणे तो आपला विषय समजू व तो सोडवण्याकरिता आपण ब्रिटिशांकडे कधीही जाणार नाही. ब्रिटिशांबद्दल सांगायचे तर लवकरात लवकर देश सोडून जाणे याशिवाय त्यांचे दुसरे कोणतेही कर्तव्य नाही. त्यांनी जर ते काम पूर्ण केले तर भाऊभाऊ जसे आपसात सर्व काही मिटवतात त्याप्रमाणे आपण सर्व काही आपसात मिटवू.

अमृत बझार पत्रिका, मे १०, १९४७ आणि द हिंदू मे १०, १९४७

# ८. प्रार्थना प्रवचन, मे १०, १९४७

सोदेपूर, मे १०, १९४७

प्रार्थना प्रवचनाकरिता आलेल्या जमावाला संबोधण्याकरिता गांधीजी आले असताना त्यांना विचारण्यात आलेल्या दोन प्रश्नाची उत्तरे त्यांनी दिली. हिंदू आणि मुसलमान यांच्यामधील दैनंदिन वाढत्या कटू संबंधांकडे पाहता हे मित्र होऊ शकतील असे वाटते काय? त्यांनी ठामपणे सांगितले की हे वैमनस्य कायम टिकू शकत नाही. सध्या जरी हे विवेकभ्रष्ट झालेले असले तरी हे भाऊ आहेत आणि यांनी तसेच राहिले पाहिजे. परंतु ही भांडणे सतत चालणे अशक्य नाही कारण ती दोन व्यक्तींमध्ये नसून दोन संप्रदायांमध्ये आहेत. असे झाले तर तुम्ही भारतातील दोन्ही धर्मांचे दफन कराल व तुमचे स्वातंत्र्य भाकरीच्या तुकड्याकरिता विकाल असे भाकीत मी केले आहे. परंतु असे होणार नाही अशी मला आशा आहे.

बंगालच्या फाळणीच्या विरोधात हिंदूंचे लोकमत वळत असताना बंगालची फाळणी टाळली जाऊ शकते काय हा दुसरा प्रश्न होता. गांधीजींनी या मतामागील जोर मान्य केला. ते म्हणाले की या बाबतीत मत व्यक्त करण्याच्या परिस्थितीत मी नाही. परंतु विसंगतीची भीती न बाळगता मी इतके सांगू शकतो की जर असे झाले तर त्याकरिता बहुसंख्याक मुसलमान आणि सध्या सत्तेत असलेले मुस्लिम सरकार त्याहूनही जास्त जबाबदार असतील. मी जर बंगालचा मुख्यमंत्री असतो तर मी माझ्या हिंदू भावंडांना भूतकाळ विसरून जाण्याची विनंती केली असती. मी त्यांना म्हणालो असतो की मीही तुमच्याइतकाच बंगाली आहे. धर्म वेगवेगळा असल्यामुळे आपणा दोघांमध्ये फूट पडू शकत नाही. तुम्ही आणि मी, आपण दोघेही एकच भाषा बोलतो आणि एकाच संस्कृतीचा आपल्याला वारसा मिळाला आहे. जे काही बंगालचे आहे ते आपणा सर्वांचे आहे. बंगाल बंगाल आहे. तो ना तर पंजाब आहे ना मुंबई ना अजून काही.

मुख्यमंत्री जर अशी भूमिका घेऊ शकले तर मी त्यांच्याबरोबर ठीकठिकाणी जाईन आणि एकाही हिंदूने बंगालच्या ऐक्याला विरोध करू नये असे हिंदू श्रोत्यांना समजावून सांगेन. मी त्यांना सांगेन की हिंदू आणि मुसलमानांनी एक होऊन बंगालच्या ऐक्याकरिता अतिशय जोरदार संघर्ष केला होता आणि बंगालची काळ्या दगडावरील रेघेसारखी फाळणी (बंगालची १९०५साली फाळणी झाली होती. नंतर लॉर्ड मोर्ले यांनी तिचे वर्णन काळ्या दगडावरील रेषेप्रमाणे ठरलेली गोष्ट असे केले होते.) लॉर्ड कर्झनसारख्या व्हाईसरायला रद्द करायला लावली होती. मी जर सुऱ्हावर्दी असतो तर मी हिंदूंना बोलावून मी सांगितले असते की एकदा माझ्या शरीराचे तुकडे करा परंतु बंगालची फाळणी

करू नका. त्यांचे बंगाल आणि बंगालीबद्दलचे, मग ते हिंदू असो वा मुसलमान, प्रेम इतके घट्ट असते तर दगडासारखे कठोर अंतःकरणही त्यांच्यासमोर द्रवले असते.

आज मात्र भीती आणि संशय यांनी हिंदूंच्या मनात घर केले आहे. परंतु मी जे ऐकले ते खरे असेल तर आज बिहारमधील मुसलमानांच्या मनाचीही हीच अवस्था आहे. आणि बिहारमधील मुसलमानांच्या मनातील संशय आणि भीती तुम्ही दूर केली पाहिजे असे बिहारच्या हिंदूंना सागायलासुद्धा मी संकोच बाळगला नव्हता. गांधीजी म्हणाले की माझा वैश्विक प्रेमाच्या नियमावर विश्वास आहे व ते रंग, जात वा धर्म यांत कोणताही भेद करत नाही. यामुळे मी नोआखालीलाच नाही तर कलकत्त्यालाही विसरू शकत नाही. मला आनंद होतो की माझ्या या विश्वासात कायदे आझम जिनासारखा जोरदार भागीदार मला मिळाला आहे आणि ही गोष्ट जगापासून लपलेली नाही.

अमृत बझार पत्रिका, मे ११, १९४७

# ९. प्रार्थना प्रवचन, मे ११, १९४७

(सभेत सर्व समुदायांचे लोक आले होते व इतकी प्रचंड गर्दी झाली होती की जागेअभावी काही लोकांना परत जावे लागले होते.)

सोदेपूर,

मे ११, १९४७

महात्मा गांधी म्हणाले की मला शहीद साहेबांची भेट घेण्याचे सौभाग्य मिळाले. माझी त्यांच्या घरी जाण्याची इच्छा होती परंतु त्यांनी मला त्यांच्या घरी येण्याची परवानगी दिली नाही. मी काल जे म्हणालो त्याशिवाय या मुलाखतीबद्दल माझ्याजवळ सांगण्यासारखे काही नाही.

प्रार्थना प्रवचनात विचारण्यात आलेल्या दोन प्रश्नांचे उत्तर नंतर गांधीजींनी दिले. पहिला प्रश्न होता - "तुम्ही आम्हाला अविभाजित बंगालकरिता काम करण्याचा सल्ला दिला. परंतु विभाजित हिंदुस्तानमध्ये अविभाजित बंगाल कसा काय असू शकतो?"

या प्रश्नाचे उत्तर होते - मी जे म्हणालो ते तुम्हाला बरोबर कळले असेल तर हिंदू आणि मुसलमान या दोघांच्या संयुक्त संमतीशिवाय काहीही होऊ शकत नाही. तिसरा पक्ष जर तुमचे भवितव्य ठरवणार नसेल तर ते तुम्हा दोघांच्या संयुक्त संमतीनेच ठरवले जाऊ शकते. मग अजून तरी विभक्त हिंदुस्तानचा प्रश्नच उपस्थित होत नाही. कधी काळी जर ही दुर्दैवी घटना घडलीच तर बंगालमधील हिंदू आणि मुसलमान हिंदुस्तानच्या कोणत्या भागात राहायचे हे संयुक्त संमतीने ठरवतील.

दुसरा प्रश्न होता - "ब्रिटिश गेले नाहीत. आपली पहिली मागणी ती का नसावी? हिंदुस्तानमधील जनतेकडे सत्तेचे खरोखरी हस्तांतरण झाल्यानंतरच आपसात हे प्रकरण मिटवण्याकरिता आपण वाट का पाहू नये?"

संपूर्ण बंगालचे एकमत असेल तर खरे म्हणजे हा प्रश्नच उपस्थित होत नाही. हा प्रश्न आज विचारला जातो की ब्रिटिश खरोखर निघून गेल्यानंतर उपस्थित होतो याला काहीही महत्त्व नाही.

अमृत बझार पत्रिका, मे, १२, १९४७

# १०. प्रार्थना प्रवचन, मे १२, १९४७

(गांधीजींचा हा मौनवार असल्यामुळे त्यांचे भाषण वाचून दाखवण्यात आले.)

सोदेपूर,

मे १२, १९४७

आज जे गुंडगिरीचे राज्य आपल्या चोहोभोवती पसरत आहे त्याला आळा कसा घालावा हा विचार सतत माझ्या मनात घोळत असतो. हे मी संपूर्ण भारताबद्दल बोलतो आहे आणि कमीअधिक प्रमाणात हे संपूर्ण जगाबद्दलही सत्य आहे.

आपल्या बाबतीत सर्व काही ठाकठीक आहे या भ्रमात राहून हिंदूंनी स्वतःची फसवणूक करून घेऊ नये. माझा दावा आहे की मी एक श्रद्धावंत हिंदू आहे. यामुळे मी तुम्हाला सांगतो की आपण जर असा विचार करत राहिलो तर आपण मूर्खांच्या नंदनवनात राहू. विदेशी शासनाची जागा घेण्याकरिता गुंडगिरीची तयारी करावी लागत नसते. प्रार्थनासभेत अविचाराने आणलेला व्यत्यय हे मी वर्णन करत असलेल्या रोगाचेच चिन्ह आहे.

असहिष्णुता हा गुंडगिरीचाच एक प्रकार आहे. वृत्तपत्रांमध्ये दररोज ज्या रानटीपणाचे वर्णन करण्यात येते त्यापेक्षा ही गोष्ट कमी अशोभनीय नाही. आपल्या डोळ्यासमोर जे काही घडत आहे त्याचा सर्व राजकीय कार्यकर्त्यांनी, मग ते हिंदू असो, मुसलमान असो वा अजून कोणी असो विचार करावा. स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच ते कसे घालवावे याचा आपण अभ्यास करत होतो असे आपल्याबद्दल भावी पिढ्यांनी म्हणू नये. हिंदुस्तानच्या शाळांमधील सर्व शिक्षकांना मी सांगू इच्छितो की आता तुमच्यावर विदेशी मालकांची नजर नसल्यामुळे तुम्ही तुमचे खरे कर्तव्य ओळखून जी मने घडवण्याची तुम्हाला अभिमानास्पद संधी मिळाली आहे तिचा तुम्ही योग्य प्रकारे उपयोग करावा.

अमृत बझार पत्रिका, मे १३, १९४७

# ११. प्रार्थना प्रवचन, मे १३, १९४७

सोदेपूर,

मे १३, १९४७

आजच्या प्रार्थना प्रवचनात गांधीजींना विचारण्यात आलेल्या प्रश्नांवर गांधीजींनी चर्चा केली.

पहिला प्रश्न होता - हिंदू असो वा मुसलमान, आम्ही स्वतःला आणि आमच्या संस्कृतीला वाचवण्याकरिता काय केले पाहिजे?

गांधीजी म्हणाले की इतर कोणीही तुमच्या संस्कृतीचे रक्षण करू शकत नाही. तुम्हालाच तुमच्या संस्कृतीचे रक्षण करावे लागेल आणि तुम्ही चूक केली तर ती नष्ट होईल. अशा प्रकारे बंगालची जर एक संस्कृती असेल, जशी की ती आहे असा माझा विश्वास आहे, तर ती वाचवणे बंगालच्या लोकांचे कर्तव्य आहे.

दुसरा प्रश्न होता - वरून प्रत्येक गोष्ट चुकीची होत असताना चांगुलपणाचा खोडसाळपणा करणारांवर तळाच्या लोकांच्या प्रभाव पडू शकतो काय?

उत्तरात गांधीजी म्हणाले की ज्याप्रमाणे चुकीची छत्री जरी वर असते तरी ती आपल्या आधारावर वर टिकलेली असते आणि ती जशी आपण दूर करू शकतो त्याप्रमाणे जर वरचे लोक चूक असतील तर तळचे लोक चूक करणाऱ्या वरच्या लोकांना खचितच दूर करू शकतात आणि तसे करणे त्यांचे कर्तव्य ठरते.

पंडित नेहरू उच्च पदावर आहेत परंतु वास्तवात ते तिथे तुमच्यामुळे टिकलेले आहेत. ते जर चुकत असतील तर तळाचे लोक त्यांना कोणत्याही त्रासाशिवाय दूर करू शकतात. घराजवळच्या प्रश्नाबद्दलची चर्चा करायची तर तुम्हाला जर सुऱ्हावर्दी अपात्र वाटत असतील तर तळाशी असलेले लोक शारीरिक बळाने नाही तर मी ज्या पद्धतीतने सांगतो त्या पद्धतीने निश्चितच त्यांना दूर करू शकतात. ते मुसलमानांच्या मतावर निवडून आलेले आहेत हा मुद्दा याच्याशी संबधित विषय नाही.

या सर्व गोष्टींचा विचार केला तर आपण या निष्कर्षावर पोहोचतो की तळाचे लोक अज्ञानी आहेत, त्यामुळे त्यांची पिळवणूक होते. हीच गोष्ट इंग्रजांची आहे. लोकांना जेव्हा त्यांची ताकद कळते आणि तळातील लोक वरच्यांना उचलून धरतात हे सत्य लक्षात घेतले तर तुमचे कल्याण

होईल. यामुळे मी म्हणेन की जर वरचे चूक करत असतील तर तळातल्यांचीही काही तरी भयानक चुकते आहे. यामुळे अज्ञानावर आधारित तुमची असाहायता तुम्ही दूर करा.

प्रश्नाची चर्चा करण्यापूर्वी काही निदर्शकांना गांधीजी म्हणाले की तुम्हाला न आवडणारी गोष्ट मी करेन अशी भीती बाळगू नका. मी केवळ माझे प्रतिनिधित्व करतो, इतर कोणाचेही नाही. मी केवळ सल्ला देत असतो, तो तुम्ही स्विकारू शकता वा फेटाळू शकता. यामुळे बंगाल अविभक्त राहायचा की विभक्त हे तुम्हाला ठरवायचे आहे.

हरिजन, मे २५, १९४७

# १२. प्रार्थना प्रवचन, मे १४, १९४७

सोदेपूर,

मे १४, १९४७

गांधीजी म्हणाले की मी पटण्याला आणि नंतर दिल्लीला जात आहे आणि दिल्लीतील काम आटोपले की कलकत्त्याला परतण्याची माझी इच्छा आहे.

नुकताच झालेल्या दंगलीची दृश्ये पाहण्याकरिता मुख्यमंत्र्यांसोबत मी दोन तास खर्च केले आणि ऑगस्टमध्ये (१९४६च्या) झालेल्या दंगलीपेक्षा या दंगली लहान असल्याचे मला आढळून आले. मला आशा आहे की कलकत्त्यातील ही शेवटची दंगल असावी.

यानंतर गांधीजींना विचारण्यात आलेल्या दोन प्रश्नांचे त्यांनी उत्तर दिले. पहिला प्रश्न होता - कलकत्त्यात शब्दशः हिंदू आणि मुसलमानांचे दोन भाग झाले आहेत. परत सर्वसामान्य जीवन सुरू होण्याकरिता नागरिकांनी काय केले पाहिजे?

गांधीजींनी उत्तर दिले - किमान एक पक्षाने सत्य आणि अहिंसेचे पूर्णपणे अनुसरण करणे हाच एकमेव मार्ग आहे. असे झाले की तुम्ही ईश्वराशिवाय इतर कोणालाही घाबरणार नाही. अशी माणसे धैर्यशाली असतात. सर्व पक्ष अशा माणसाशी मैत्री करतील इतकेच नाही तर गुंडसुद्धा त्यांच्यासमोर गुंडगिरीचा त्याग करतील. याहून दुसरा चांगला मार्ग मला माहीत नाही. बहुमतात असलेल्या मुसलमानांसुद्धा मी या बाबतीत आवाहन केले आहे.

दुसरा प्रश्न होता - कुराणाचासुद्धा अभ्यास करा असे तुम्ही हिंदूंना का सांगता?

गांधीजी उत्तर देताना म्हणाले - आपल्या धर्माच्या धर्मग्रंथांशिवाय इतर धर्माच्या धर्मग्रंथांचाही अभ्यास करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असते. यामुळे आपला स्वतःचा धर्म शुद्ध ठेवण्याकरिता लोकांना मदत होते व ते त्यातील दोष दूर करू शकतात. याशिवाय आपल्या देशात ख्रिश्चन, मुसलमान, पारसी आणि इतर धर्मांचेही अनुयायी आहेत. तुम्ही जर या सर्वांना आपले भाऊ समजत असाल तर त्यांच्या धर्मग्रंथाचा अभ्यास करणे तुमचे कर्तव्य आहे.

हरिजन, मे २५, १९४७

# १३. प्रार्थना प्रवचन, मे १५, १९४७

पटना,

मे १५, १९४७

एका पंधरवाड्यानंतर गांधीजींनी पटना येथील बंकीपूर मैदानात प्रार्थनासभेला संबोधित केले. ते म्हणाले की मध्यंतरीच्या काळात मी दिल्ली आणि कलकत्त्याला होतो. मी करो वा मरोची शपथ केवळ नोआखाली आणि बिहारकरिता घेतलेली असल्यामुळे कलकत्त्याच्या भेटीची मला पूर्वकल्पना नव्हती. परंतु जे काही कलकत्त्याबद्दल ऐकले ते ऐकल्यानंतर कलकत्त्यात माझा काही उपयोग होऊ शकतो असे मला वाटले. आणि तिथे मी अगदीच अपयशी ठरलो असे म्हणता येऊ शकत नाही. कारण एकच होते. कलकत्त्याला वा जिथे कुठे मला भविष्यात बोलावण्यात येईल तिथे मी गेलो तरी, जरी अशी शक्यता फार कमी असली, मी बिहार वा नोआखाली सोडणार नाही. यामुळे माझ्या करो वा मरो कार्याचे क्षेत्र केवळ विस्तृत झाले आहे. मला असे वाटते की एका ठिकाणी यश मिळाले तर दुसऱ्या ठिकाणीही ते यश मागेमागे येते. ते काहीही असले तरी भविष्य केवळ ईश्वराच्या हातात आहे.

माझ्या अनुपस्थितीतही बिहारमध्ये काम कसे सुरू आहे याचा मी मागोवा घेत होतो. दर दिवशी मला अधिक माहिती मिळायची. बिहारमधील कामकाज हळूहळू सुरू होते. परंतु बिहारी जेव्हा वेडगळपणाची कृत्ये करत होते तेव्हा काही ते संथ नव्हते. आता दुरुस्ती करण्यात त्यांनी संथ असण्याचे कारण नाही. पाऊस येत आहे. तुम्ही वेळेच्या विरोधात काम करत आहा. कार्यक्षमतेच्या कारणाकरिता मंत्रिमंडळाने पुनर्वसनाच्या कामाचे नियंत्रण अंन्सारी साहेबांच्या हाती दिले आहे. जनरल शाह नवाझ, जे लहानशा सुटीवर गेले होते, लवकरच तुमच्यात येतील. पुरेशा स्त्री कार्यकर्त्या जर सेवाभावाने प्रेरीत होऊन मुसलमान स्त्रियांमध्ये काम करण्याकरिता पुढे आल्या तर काम वेगात पुढे जाईल अशी मला खात्री आहे.

गांधीजी म्हणाले की मुसलमानांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यात यश मिळाले तर मला खात्री आहे की त्याचा प्रभाव संपूर्ण हिंदुस्तानात पडेल. आम्ही मुसलमानांची हाजीहाजी आणि खुषामतच करत राहिलो पाहिजे काय असे काही हिंदूंनी मला विचारले. सत्य आणि अहिंसेच्या आयुधाने मी आयुष्यभर संघर्षशील राहिलो आहे. या गोष्टीला मी कधीही प्रोत्साहन देऊ शकत नाही. माझा तुम्हाला इतकाच सल्ला आहे की तुम्ही तुमच्या रागद्वेषादी हीन भावनांवर नियंत्रण ठेवले

पाहिजे. आणि कठोरपणा टाळून सौजन्याने वागणे म्हणजे खुषामत करणे असेल तर हा शब्द वापरण्याकरिताही मी मागेपुढे पाहणार नाही. जमावाला उद्देशून गांधीजी म्हणाले की या उकाड्यात ठीकठिकाणी हिंडण्याचा ताण मला सहन होऊ शकत नाही. प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या ठिकाणी प्रार्थना सभा घेण्यावरच मी समाधान मानले पाहिजे.

हरिजन, मे, २५, १९४७

# १४. प्रार्थना प्रवचन, मे १६, १९४७

गुलझारबाग,

मे १६, १९४७

प्रार्थनासभेआधी ज्या निर्वासित शिबिराला (निर्वासितांचे उद्योग केंद्र) गांधीजींनी भेट दिली होती त्या शिबिराचा त्यांनी उल्लेख केला. ते म्हणाले की जितक्या बारकाईने मी ते पाहायला पाहिजे होते तितक्या बारकाईने मी ते पाहू शकलो नाही. परंतु मी जे काही पाहिले आणि पर्यवेक्षकाकडून ऐकले ते पाहिल्यामुळे मला फार आनंद झाला.

हे शिबीर स्वावलंबनाच्या तत्त्वावर चालवले जात आहे. तिथे माणसे काम करत होती आणि ते त्याच्याकडे असलेल्या पैशाची परतफेड करत होते. मुलेसुद्धा काम करत होती. त्यांना एरव्ही जितकी मजुरी मिळाली असती त्याहून त्यांना जास्त मजुरी दिली जात होती. अशा स्वावलंबनातून स्वतःबद्दलचा आदर वाढतो.

हे सर्व स्त्री-पुरुष निष्पाप होते. त्यांना तात्पुरत्या वेडाच्या आहारी गेलेल्या हिंदूंच्या हातून त्रास सहन करावा लागला होता. यामुळे हिंदूंना आपल्या कृत्याची जी काही दुरुस्ती करता येणे असेल ती त्यांनी करणे आवश्यक आहे. तुम्ही निर्वासित शिबिराला भेट दिली पाहिजे, त्यांच्या जीवनात सर्व दृष्टींनी रस घेतला पाहिजे, आणि तुम्हाला शक्य असेल त्या पद्धतीने तुम्ही त्यांना मदत केली पाहिजे. तुम्ही जर असे केले तर अन्याय सहन करत राहावे लागत असलेल्या निर्वासितांचे जे कर्ज तुमच्यावर आहे त्याची काही प्रमाणात परतफेड होईल.

याचप्रमाणे जे निर्वासित भीतीमुळे वा खोट्या प्रचारामुळे प्रांत सोडून निघून गेले आहेत त्यांना परत या अशी भीकही तुम्ही मागू नये. तुम्ही त्यांना प्रेमाच्या जादुई शक्तीने जिकले पाहिजे. तुम्ही जर प्रेमाचे आणि भातृभावाचे असे वातावरण निर्माण करू शकला तर प्रांत सोडून निघून गेलेले बहुतेक मुसलमान परत येतील आणि यामुळे माझे आणि सरकारचे काम सोपे होईल व बिहार खरोखरीचा नावाप्रमाणे विहार होईल.

द इंडियन नेशन, मे १८, १९४७

# १५. प्रार्थना प्रवचन, मे १८, १९४७

(गांधीजींचे मौन असल्यामुळे हे लेखी भाषण वाचून दाखवण्यात आले होते.)

पटना,
मे १८, १९४७

काल मोठ्या संख्येत स्त्री-पुरुष गोळा झाले असूनही माझा आवाज तुम्हा सर्वांपर्यंत पोहोचू शकला नाही याचे मला दुःख होते. याला कारण स्वयंसेवकांचा वेंधळेपणा वा अकार्यक्षमता असू शकते वा ध्वनीक्षेपकांमध्ये काही दोष असला पाहिजे. (पाहा एक पत्र, मे १८, १९४७) परिणामी लोक शांतता ठेवू शकले नाही. ही गोष्ट आपल्याकरिता लाजिरवाणी आहे. आपण लाखोंच्या संख्येत जरी गोळा झालो तरी शांतता कशी राखावी हे आपल्याला कळले पाहिजे. आपण जर हे शिकू शकलो नाही तर आपण आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करू शकणार नाही. स्त्री असो वा पुरुष, लोकशाहीत प्रत्येकाला आपल्या जबाबदारीची जाणीव असली पाहिजे. ज्याला पंचायत राज म्हणतात ते हे आहे. शरीराचे एक अवयव जरी बरोबर काम करेनासे झाले तरी संपूर्ण शरीराची यंत्रणा बिघडते. याचप्रमाणे संपूर्ण भारत एक शरीर आहे व आपण त्याचे अवयव. आपल्यामध्ये जर ढिलाई आली तर त्याचा परिणाम संपूर्ण देशावर होईल. यामुळेच सभा, आगगाडी, वा रेल्वे स्थानक यांच्यावरील शिस्तीवर मी इतका जास्त भर देत असतो. अशाच प्रसंगी आपली परीक्षा होत असते. लाखो लोकांच्या गर्दीतही शिस्त कशी पाळावी हे आपण शिकलो असतो तर बिहारमध्ये झाल्या तशा दंगली झाल्या नसत्या असे मी नेहमी म्हणत असतो. आज लहानशा गडबडीला सामुदायिक रंग दिला जातो व परिणामी त्यामुळे सांप्रदायिक दंगली उद्भवतात. स्वयंसेवकांनी ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे व लोकांना सभा इत्यादी ठिकाणी शिस्त ठेवायला शिकवले पाहिजे. जेव्हा प्रत्यक्ष सभा असते तेव्हा ही गोष्ट साध्य करता येऊ शकत नाही. याचे प्रशिक्षण लोकांना घरापासूनच मिळाले पाहिजे. कालची सभा गोंगाटामुळे होऊ शकली नाही आणि मला परत तुमच्यामध्ये बोलवायचे असेल तर तुम्ही शांतता पाळली पाहिजे हे तुम्ही उपस्थितांनी लोकांना सांगावे असा माझा सल्ला आहे. आपल्या अवतीभवतीचा ढिलेपणा पाहिला की आपल्या देशाच्या भवितव्याबद्दल मन साशंक होते. शिथील लोक जीवनात काहीही साध्य करू शकत नाहीत, आणि त्यांच्यात धैर्यही असू शकत नाही. स्वतंत्र भारताला जर आपल्याला जागतिक उंचीवर पोहोचवण्याची इच्छा असेल तर आपण सदैव जागृत असलो पाहिजे. (मूळ स्रोताप्रमाणे हे आणि पुढील पाच प्रार्थना प्रवचने बिहार समाचारमधून पुनःप्रकाशित करण्यात आली आहेत.)

हिंदीवरून, हरिजन सेवक, जून १, १९४७

# १६. प्रार्थना प्रवचन, मे १९, १९४७

बारह,

मे १९, १९४७

परवा मी दिनापूरला गेलो होतो. तिथे इथल्याप्रमाणेच मोठा जमाव गोळा झाला होता परंतु सुव्यवस्थेच्या अभावी तिथे भरपूर गोंगाट आणि गोंधळ होता. काय चुकले ते मला माहीत नाही परंतु आपला हेतू विफल झाला. त्या गोंगाटात मी काय बोलू शकत होतो आणि कुणाला उद्देशून मी बोलायला पाहिजे होते? मी जेव्हा बोलतो तेव्हा मी माझा आवाज ऐकण्याकरिता बोलत नसतो तर लोकांनी माझे बोलणे ऐकावे म्हणून बोलत असतो व मला त्यांना त्यांचा धर्म समजावून सांगायचा असतो. लोकांपर्यंत माझा आवाज पोहोचू शकत नसेल तर माझ्या बोलण्याला काय अर्थ आहे? ईश्वरी कृपेने आज आपल्यामध्ये शांतता आहे आणि शिस्तही आहे. स्वयंसेवक आणि संघटकांनी हे जे साध्य केले त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. आता स्वयंसेवकांची भूमिका बदलली आहे. दंगली वा शिवराळ भाषा न वापरता पूर्वी लोकांना तुरुंगात जाण्याचे त्यांनी लोकांना शिक्षण द्यावे असे अपेक्षित होते. साम्राज्याशी संघर्ष करताना आपल्याला शांतचित्त राहण्याची आणि धैर्याची गरज असायची. या शांतपणाने आणि धैर्याने आपण बरेच काही मिळवले आहे. परंतु मी असे म्हणू शकत नाही की प्रत्येकामध्ये तसे धैर्य होते. त्या वेळीसुद्धा आम्हाला विशेष प्रकारचे प्रशिक्षण मिळत असे. परंतु आता आपले स्वतःचे सरकार आहे आणि आपल्याला वेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण द्यावे लागते. आवाजाने गोंधळ होतो व त्याची परिणती दंगलीत होऊ शकते. त्या वेळीसुद्धा दंगली होत असत परंतु त्या याप्रमाणे नसत. आज आपण एकमेकांशी भांडत आहो. मला काही शंका नाही की असेच जर सुरू राहिले तर आपल्याला जे स्वातंत्र्य मिळणार आहे ते आपण गमावल्याशिवाय राहणार नाही.

परंतु आज माझ्या बोलण्याचा हा विषय नाही. एव्हाना दंग्याचा पूर्ण अहवाल माझ्यापर्यंत पोहोचायला पाहिजे होता. परंतु तसे होऊ शकले नाही. ते काहीही असले तरी आम्ही गंभीर चूक केली असे इथे काम करत असलेल्या लोकांनी माझ्याजवळ कबूल केले. बिहारमध्ये करण्यात आलेल्या पापामुळे हिंदुस्तानला अपरिमित त्रास सहन करावा लागत आहे आणि पुढेही कदाचित हा त्रास सहन करत राहावा लागणार आहे. आपल्याला जर यातून बाहेर पडायचे असेल तर त्याकरिता आपल्याला याचे प्रायश्चित्त घ्यावे लागणार आहे.

प्रायश्चित्त म्हणजे केवळ शाब्दिक अभिव्यक्ती नाही, त्यात हृदयपरिवर्तन अपेक्षित असते. परत चुकायचे नाही असा निग्रह आपण केला पाहिजे. गुंडप्रवृत्तीच्या ज्या लोकांनी घृणित कृत्ये केली आणि अजूनही जे मुसलमानांना धाकदपटशा दाखवत आहेत आणि हिंसक कृत्याने त्यांना घाबरवत आहेत त्या लोकांनी आपला अपराध कबूल करावा व त्याप्रमाणे वर्तन करण्याचे थांबवावे.

पुनर्वसनाचे काम अन्सारी साहेबांकडे सोपवण्यात आले आहे. हे काम फार कठीण आहे यात काही संशय नाही. मुसलमान जर परतले नाही तर तो कोणाचा दोष असेल? आपण जर त्यांच्याशी मैत्रीपूर्ण व्यवहार करणार नाही तर त्यांना परतण्याकरिता विनवणी करू नका. ते कसे परततील?

आपली प्रामाणिक इच्छा असली व आपण त्यांना सौजन्यपूर्वक मैत्रीभावाने विनंती केली तर ते निश्चितच परततील. तुम्हाला जर तुमच्या पापाचे प्रायश्चित्त घ्यायचे असेल तर तुम्ही त्यांच्याजवळ चूक कबूल केली पाहिजे व त्याकरिता होत असलेली शिक्षा भोगली पाहिजे. तुम्हाला जरी शिक्षा टाळायची असेल तरी तुम्ही कबुली दिली पाहिजे. गुन्हेगाराने जर आपला गुन्हा कबूल केला आणि न्यायालयात मोकळेणाने तो कबूल केला तर न्यायालयसुद्धा कमी शिक्षा देते. तुमच्या कृत्याच्या परिणामापासून सुटण्याचा याशिवाय इतर कोणताही मार्ग नाही. सध्या लोक शिक्षा टाळण्याकरिता इकडून तिकडे पळत आहेत परंतु ते किती काळ शिक्षा टाळू शकतील? उद्या नाही तर परवा त्यांना अटक होणे अपरिहार्य आहे. सरकारला जर त्यांची भीती वाटत असेल व ते त्यांना अटक करत नसेल तर त्याचा अर्थ सरकार अकार्यक्षम आणि भ्रष्ट आहे असा त्याचा अर्थ होईल. त्याने असे करू नये. बिहारमधील मुसलमानांना मारून आणि त्यांना शिक्षा देऊन आम्ही नोआखालीचा बदला घेतला असे म्हणून लोक जर आपल्या पापाचे समर्थन करत असतील आणि त्याचाच परिणाम म्हणून कलकत्त्यातील घटना घडत असतील तर याला जंगलराज म्हणावे लागेल. असे वर्तन पाशवी वर्तन होईल. पशूंना कधी स्वातंत्र्य मिळाले आहे काय? तुम्ही जर तसे ऐकले असेल तर कृपा करून मला सांगा - कमीत कमी मी तरी ऐकले नाही. मुसलमान जेव्हा असे अत्याचार करतात तेव्हा आम्ही काय करावे असे मला लोक विचारतात. एका थापडीच्या बदल्यात त्यांनी दोन थापडा माराव्या काय? काही लोक असेसुद्धा करतात. परंतु हा मार्ग पशूंचा आहे. बदल्याची आणि हिंसेची ही पद्धत जगाची तर नाहीच पण हिंदुस्तानचीही नाही. या पद्धतीच्या अनुसरणाने जग कुठे आले आहे ते तुम्ही पाहिले आहे. जर्मनी, जपान, इटली या सर्वांचा विध्वंस झाला. ज्यांनी हिंसा केली आणि दंगली घडवल्या त्यांचा विनाश अपरिहार्य आहे. हा भित्र्यांचा मार्ग आहे. असा भ्याडपणा मी कधीही शिकवत नाही - उलटपक्षी मी खऱ्या शौर्याचा पाठ शिकवत असतो. (दक्षिण) आफ्रिकेत निग्रोंमध्ये हिंदुस्तानी मोजके होते. इंग्रज त्यांना दाबून टाकू शकले असते आणि मग हिंदुस्तानी तिथे कसे राहू शकले असते? असे

असूनही आपण त्यांच्याशी धैर्याने लढलो. इथे चंपारणमध्येसुद्धा आपण कसे शौर्याने लढलो होतो हे तुम्ही स्वतः पाहिले आहे. शेकडो वर्षे निळीच्या मळेवाल्यांचे जे आतंकी राज्य सुरू होते आज त्याचा मागमूसही दिसत नाही. आता आपल्यामधीलच काही लोक निळीच्या मळेवाल्यांसारखे झाले आहेत ही गोष्ट वेगळी. चंपारणमध्ये आपण कोणालाही मारले नव्हते वा त्यांचा छळही केला नव्हता. सत्याग्राहाच्या माध्यमातून आपण त्या वाईट व्यवस्थेचा अंत केला होता. शेतकऱ्यांनी निळीच्या मळेवाल्यांना सांगितले की आम्ही तुमच्याकरिता काम करणार नाही व ते आपल्या निर्णयावर कायम राहिले. आपण भित्रे नसल्याचे त्यांनी सिद्ध केले. आज आपल्याला तेच शौर्य विकसित करायचे आहे आणि तेही किती तरी मोठ्या प्रमाणात.

हिंदीवरून, हरिजन सेवक, जून १, १९४७

# १७. प्रार्थना प्रवचन, मे २०, १९४७

हिलसा,

मे २०, १९४७

इथे येत असताना रस्त्यात हिलसाबद्दल मी सर्व काही ऐकले. इथे हिंदू भावंडांनी हाहाक्कार माजवला होता. ही गोष्ट आपल्याकरिता लाजेची आणि दुःखाची आहे, खुषीची नाही. अंतःकरणापासून जर कोणी आपल्या पापाचे प्रायश्चित्त घेईल तर सर्वात मोठा पापीसुद्धा सर्वात मोठा संत होऊ शकतो. हिंदू धर्म, इस्लाम आणि ख्रिश्चन धर्म या सर्वांमध्ये फार मोठे पाप केलेल्या व्यक्ती जेव्हा अंतःकरणपूर्वक प्रायश्चित्त घेतात व पवित्र कार्य करतात तेव्हा ते संत झाल्याची उदाहरणे सापडतात. बिहारमध्ये जे घडले त्यावर काय उपाय आहे? तुमच्याशी कशा प्रकारे चांगल्यात चांगले बोललो तर तुमचे हृदयपरिवर्तन होईल असा प्रश्न मला पडतो. दुर्वर्तन करणे हे नरकात जाण्यासारखे असते. परंतु नरकात कोणालाही मनःशांती मिळू शकत नाही. कोणत्याही माणसाला तिथून शक्य तितक्या लवकर पळून जावेसे वाटेल. खरे म्हणजे वाईट कर्म करणे हे नरकात जाण्यापेक्षाही वाईट असते. या गोष्टीची शरीरावर इतकी प्रतिक्रिया होत असेल तर आत्म्यावर किती होत असेल? आपण इथे केलेल्या अपकृत्याचे जर प्रायश्चित्त घेते तर ही गोष्ट हिंदूंकरिता, हिंदुस्तानकरिता आणि जगाकरिताही हितावह ठरेल. याकरिता आपण प्रायश्चित्त कसे घ्यावे? मी इथे थांबावे, हिंसेचा अवलंब करणारांच्या घरोघरी जावे आणि मी जर असे केले तर कदाचित त्यांचे हृदयपरिवर्तन होईल. येथील उष्ण हवामानामुळे हा सल्ला मान्य करणे मला शक्य नाही. हवामानामुळे शरीराला जाणवणारी झळ कितीही तीव्र असली तरी मला होणाऱ्या वेदना आणि वाटणारी लाज यांची झळ त्या झळीपेक्षा किती तरी असह्य आहे यात काही संशय नाही. परंतु माणूस जीवनाचा मोह सोडू शकत नाही. आजारी पडण्याच्या भीतीमुळे या उकाड्यात काम करायची त्याला भीती वाटते. याला श्रद्धेचा अभावही म्हणता येईल. परंतु माझीच श्रद्धा जर पुरेशी भक्कम नसेल तर मी इतरांना काय सांगू शकतो? यामुळे माझ्याबद्दल जे बोलले जाते ते मी गुपचूप सहन करतो. ईश्वराने मला बोलण्याच्या शक्तीची जी काही भेट दिली आहे तिचा तुमच्याशी बोलताना मी माझ्या क्षमतेनुसार शक्य तितका उपयोग करतो.

मला असे आढळले की काही मुसलमान बांधव आपल्या गावात परत आले होते. परंतु त्यांची घरे पाडलेली वा जाळलेली असल्यामुळे व अजून ती परत बांधण्यात आलेली नसल्यामुळे ते परत गेले. पावसाळा येतो आहे. आपण ती घरे परत केव्हा बांधणार आहो आणि परतण्याकरिता मुसलमानांना समजावणार आहो? यात काही संशय नाही की ही जबाबदारी सरकारची आहे. परंतु

या गावात राहणाऱ्या तुम्ही सर्व लोकांनी ही जबाबदारी घ्यावी व ती घरे बांधावी असा माझा सल्ला आहे. जोपर्यंत घरे बांधली जात नाहीत तोपर्यंत एक तर त्यांच्याकरिता तुम्ही आपली घरे रिकामी करावी वा त्यांना आपल्या घरात सामावून घ्यावे. अशा प्रकारे तुम्ही मुसलमानांची समजूत घाला व तुमच्या पापाचे प्रायश्चित्त घ्या. मी असे ऐकले आहे की तुमच्यामध्ये काही लोक असे आहेत की ज्यांना किंचितही पश्चात्ताप झालेला नाही. ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. तुम्ही सर्व इतक्या मोठ्या संख्येत इथे माझे ऐकण्याकरिता गोळा झाला आहा आणि आपली इथे प्रचंड सभा भरली आहे. ज्यांना माझे बोलणे ऐकू येऊ शकते त्यांना मी माझ्या सल्ल्याप्रमाणे वागण्याची विनंती करतो. असे केल्याने तुमची कोणतीही गैरसोय होणार नाही. फिजी बेटातून वा दक्षिण आफ्रिकेतून आलेल्या आपल्या नातेवाईकांना आपण आपल्या घरात सामावून घेतो, नाही का? सध्याच्या प्रकरणीसुद्धा आपण अपराधी आहो. ज्या मुसलमानांना शत्रू समजून आपण हाकलून लावले त्यांचे मित्र म्हणून मुसलमानांचे आपण स्वागत करू या. बिहारचे लोक महान कार्यकर्ते आहेत. ज्यांच्यात शक्ती असेल त्यांनी रक्ताच्या नात्यातील माणसाप्रमाणे मुसलमानांबरोबर राहावे. एखाद्याने काका व्हावे, दुसऱ्याने भाऊ व्हावे आणि तिसरीने बहीण व्हावे. असे झाले तर शत्रुत्व भूतकालीन गोष्ट होईल. तुम्ही जर माझ्या सल्ल्याप्रमाणे वागाल व तुमचे मन आणि अंतःकरण स्वच्छ करून स्थलांतर केलेल्या मुसलमानांचे स्वागत करून त्यांना तुमच्यामध्ये सामावून घ्याल तर ती फार मोठी गोष्ट असेल.

हिंदीवरून, हरिजन सेवक, जून १, १९४७

# १८. प्रार्थना प्रवचन, मे २१, १९४७

बिक्रम,

मे २१, १९४७

इतका प्रचंड जनसमुदाय असतानाही संपूर्ण प्रार्थना संपेपर्यंत तुम्ही जी शांतता कायम ठेवली त्याबद्दल आणि योग्य ताल धरल्याबद्दल सर्वातआधी मी तुमचे अभिनंदन करतो. ताल धरणाऱ्या लोकांनी योग्य पद्धतीने ताल धरणे शिकायला पाहिजे कारण त्यावरून ते अंतःकरणपूर्वक प्रार्थना करत असल्याचे दिसून येते. भगिनींनी ही गोष्ट नीट शिकून घेतली पाहिजे.

मी असे ऐकले आहे की या ठाण्याच्या क्षेत्रात किंचितही अराजक झाले नाही. कॉंग्रेसचे लोक आणि इतर लोक इथे सोबत आले व इथे कोणताही गोंधळ होऊ नये याची त्यांनी काळजी घेतली. सामान्यपणे एकदा दंगल सुरू झाली की ती एखाद्या साथीच्या रोगाप्रमाणे पसरू लागते व तिचा सर्वांना संसर्ग होऊ लागतो. जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे सचिव चांद साहेबांनी मला सांगितले की तणाव होता व काही तरी घडेल अशी भीती लोकांना वाटत होती. परिणामी अनेक मुसलमान पळाले. त्यातील काही परतले, परंतु सर्व नाही.

अजूनही जे लोक परतले नाहीत. परतलेल्या लोकांनी त्यांची परतण्याकरिता समजूत घालावी असा माझा सल्ला आहे. इथे संपत्तीचे कोणतेही नुकसान करण्यात आलेले नाही. रिकामी पडलेली घरे तुम्ही स्वच्छ करा. त्यांच्या संपत्तीची देखभाल केली जात आहे हे ऐकल्यानंतर ते सर्व परततील. असे जर प्रत्येक ठिकणी केले गेले तर ते फार चांगले होईल.

मी काल तुम्हाला जे सांगणार होतो ते मी आता तुम्हाला सांगतो. कॉंग्रेसची स्वतःची परंपरा आहे. अनेक वर्षांपासून - साठ वर्षांपासूनही अधिक - तिने ब्रिटिश सरकारशी संघर्ष केला आहे. तुलसीदास म्हणतात की रामापेक्षा रामनाम मोठे झाले आहे. याचप्रमाणे कॉंग्रेसपेक्षा कॉंग्रेसचे नाव मोठे झाले आहे. परंतु आज कॉंग्रेसची काय परिस्थिती आहे? कॉंग्रेसच्या लोकांना वाटते की आता त्यांचे सरकार आहे. पूर्वी कॉंग्रेसच्या निधीत १००-२००रुपयेही नसत आणि त्याचाही सविस्तर हिशेब ठेवावा लागायचा. टिळक स्वराज निधीकरिता मोठ्या मुश्किलीने १ कोटी रुपये गोळा करण्यात आले होते. कॉंग्रेसकरिता परत इतका निधी कधीही गोळा करता आला नाही. आता प्रत्येक प्रांतात कॉंग्रेसच्या खात्यात करोडो रुपये गोळा होतात व कॉंग्रेस हजारो लोकांचे नेतृत्व करते. परंतु खरे सांगायचे तर माणूस जनतेचा सेवक असू शकतो, नेता नाही. सेवाभाव जर राहिला नाही आणि

त्या करोड रुपयांतून आपल्याला किती ओढता येतील याचा जर प्रत्येक माणूस विचार करू लागला तर ती दुर्दैवाची गोष्ट ठरेल. सेवाभावना निघून गेली आणि आपण केवळ आपला, आपल्या नातलगांचा आणि मित्रांचा स्वार्थ पाहू लागलो व मुख्यमंत्र्याची हाजीहाजी करू लागलो वा आपल्या उद्दिष्टपूर्तीकरिता कॉंग्रेसकार्यालयाचा ताबा मिळवण्याचा प्रयत्न करू लागलो तर ती राष्ट्रसेवा ठरणार नाही. अशा प्रकारे सत्ता आणि वशिला लावण्याकरिता कॉंग्रेसी धडपडत आहेत. हे केवळ बिहारकरिताच खरे नाही तर सर्व प्रांतांकरिता खरे आहे. जर असेच सुरू राहिले तर कॉंग्रेस पक्षाचा लगाम आपल्या हाती घट्ट पकडून ठेवणे आपल्याला शक्य होणार नाही आणि जे लोक सरकारमध्ये आहेत त्यांनाही कार्यक्षमपद्धतीने सरकार चालवता येणार नाही अशी मला भीती वाटते. असे दिसते की सरकारजवळ केवळ सैनिकी सत्ता आहे, परंतु केवळ त्या शक्तीच्या आधारावर सरकार चालत नसते. खरी सत्ता तुमच्या हातात आहे. तुम्ही जे अधिकार त्यांना द्याल तितकीच त्यांची सत्ता असेल. यामुळे एकदा तुम्हाला स्वतःचे सरकार मिळाले की तुम्ही स्वतःचे मालक होता. तुम्हाला तुमच्या शक्तीची ओळख नसेल व तुम्ही अंधारात असाल तर गोष्ट वेगळी. परंतु तुमच्या जर लक्षात आले की खरी सत्ता हिंदुस्तानच्या म्हणजे आपल्या स्वतःच्या हाती आहे तर आपण त्या सत्तेचा उपयोग योग्य प्रकारे केला पाहिजे. यात काही शंका नाही की देशभर दंगे होत आहेत, केवळ बिहारमध्येच नाही. परंतु कॉंग्रेसच्या हाती जी सत्ता आली आहे तिच्यावर जर आपण घट्ट पकड पकड ठेवली नाही, आपल्यामध्ये जर सुसंवाद नसेल आणि आपण आपले कर्तव्य पार पाडायला नकार देऊ तर या सत्तेमागील संपूर्ण हेतूच विफल होईल अशी मला भीती वाटते. आणि मी इथे जे करायला आलो ते मलासुद्धा करता येणार नाही. मला असा सल्ला देण्यात येऊ शकतो की हिंदू आणि मुसलमानांमध्ये जो सुसंवाद निर्माण करण्याकरिता मी इथे आलो आहे तो निर्माण करावा व इतर कोणत्याही भानगडीत मी पडू नये; हिंदू-मुसलमानांमधील भांडणे आधी मिटवावी आणि नंतरच इतर समस्याकडे पाहावे. परंतु असे होत नसते, या सर्व समस्या परस्परांशी संबंधित आहेत. एक समस्या सोडवत असताना इतर समस्याही सोडवाव्या लागत असतात.

कॉंग्रेसमध्ये सडण सुरू झाली आहे. याचा अर्थ कॉंग्रेसचे लोक आता प्रामाणिक राहिलेले नाहीत. स्वार्थी लोकांनी जर कॉंग्रेसवर कब्जा मिळवला तर ती चांगल्या पद्धतीने काम करू शकणार नाही. आता कॉंग्रेसमध्ये अनेक गट आहेत आणि प्रत्येकाच्या मनात कॉंग्रेस ताब्यात घेण्याचा एकच विचार आहे. परंतु अशा प्रकारे कोणत्याही गटाला संघटनेवर ताबा मिळवता येणार नाही. कॉंग्रेस त्यांच्या हातातून निसटेल व विधिनिषेध नसलेल्या माणसांच्या हातात जाईल. आणि ते पांढरे कपडे घातलेले गुंड असतील, दिसायला ते आदरणीय असतात परंतु अंतःकरणातून ते गुंड असतात. कॉंग्रेसचे लगाम अशा माणसाच्या हातात गेले तर आपले उद्दिष्ट कसे साध्य होईल? फॉरवर्ड ब्लॉक,

समाजवादी इत्यादी गटांमध्ये आपण विभागलो गेलो तर आपणा सर्वांचा नाश होईल. आपण कॉंग्रेसचे आहो. कोणत्याही एका पक्षाची वा गटाची नाही तर संपूर्ण राष्टाची सेवा करणे कॉंग्रेसचे ध्येय आहे.

हिंदीवरून, हरिजन सेवक जून १, १९४७

# १९. प्रार्थना प्रवचन, मे २२, १९४७

फतेपूर,

मे २२, १९४७

शांततापालनाकरिता आणि रामधूनच्या वेळी योग्य वेळी ताल देण्याकरिता काल सायंकाळी जनतेचे अभिनंदन करण्याची मला संधी मिळाली होती हे माझे भाग्य समजतो. आज परत तुमचे अभिनंदन करण्याची संधी मला भाग्याने मिळाली आहे. याशिवाय स्वयंसेवकांचेही मी अभिनंदन केले पाहिजे कारण मी इथे मोटारीने येत असताना जरी मार्गावर फार थोडे लोक गोळा झाले होते तरी तिथे कोणताही गोंगाट वा आरडाओरड नव्हती. यामुळे माझ्या इच्छेप्रमाणे मला काम करता आले. दररोज वेगवेगळ्या ठिकाणी प्रार्थनासभा घेण्याचे कारण सर्व लोकांना या सभांना येता यावे आणि मला जे त्यांना सांगायचे आहे ते सांगता यावे हे आहे. तरुणांकरिता पाच मैल चालणे तर काहीच नाही परंतु लहान मुले आणि स्त्रियांकरिताही ही गोष्ट विशेष नाही. माझी अशी सूचना आहे की तुम्ही लोकांनी प्रार्थनासभेची अशी जागा ठरवावी की जे मध्यवर्ती ठिकाणी असेल. त्या ठिकाणापासून पाच मैलांच्या परिघात राहणाऱ्या लोकांना प्रार्थनेकरिता येता आले तर उत्तम होईल. पंचायत राज स्थापन करण्याकरिता लागणाऱ्या प्रशिक्षणासारखेच हे प्रशिक्षण असेल. ही चांगली कल्पना आहे.

बिहारमध्ये करण्यात आलेल्या कामाची जर योग्य प्रगती झाली तर ती गोष्ट संपूर्ण राष्ट्राकरिता चांगली होईल. इथे शांततासमिती स्थापण्यात आली आहे आणि तिच्यात हिंदू आणि मुसलमान दोन्ही असल्याचे मला सांगण्यात आले आहे. बिहारमध्ये एकूण लोकसंख्येच्या मुसलमान केवळ १३-१४ टक्के आहेत. परंतु आपण त्यांना सर्व समित्यांमध्ये घेतले पाहिजे. असे झाले तरच खऱ्या अर्थाने शांतता समिती तयार झाली असे म्हणता येईल. शांतता समितीचे काम भरपूर सोपे आहे. आपण त्यांचे जे नुकसान केले त्याची तिने नुकसान भरपाई दिली पाहिजे आणि जाळपोळ करण्यात आलेल्या घरांची दुरुस्ती केली पाहिजे. इतके करण्यात जर तिला यश मिळाले तर बाकी गोष्टी सहजगत्या साध्य करता येतील.

या कामात आम्ही स्त्रिया कशी मदत करू शकू असे एका भगिनीने मला विचारले. इथे बसलेल्या ज्या स्त्रिया पडदा ठेवत नाहीत त्या या क्षेत्रात काम करू शकतात. खरा पडदा अंतःकरणाचा असतो. बाह्य पडद्याचा काय उपयोग? कुराण शरीफमध्येसुद्धा बाह्य पडद्याचा उल्लेख नाही हेसुद्धा मी म्हणेन. आपण ज्या काळात राहत आहो तो किती वेगात पुढे जातो आहे? आज

आपण इथे आहो, उद्या आपण पुढे गेलेलो असू. अशा वेळी निरर्थक पडदा पद्धती सुरू ठेवण्यात काय अर्थ आहे? हिंदू स्त्रियांचे आपल्या मुसलमान भगिनींवर मनापासून प्रेम असेल तर मी त्यांना सांगेन की त्यांच्याजवळ जा आणि त्यांना त्यांच्या व्यथांमधून मुक्त करा. याकरिता बी. ए. वा एम. ए. असण्याची गरज नाही तर प्रामाणिकपणा आणि खरेपणाची आवश्यकता असते.

शाह नवाझ खान (पुनर्वसनाचे) काम करत असलेल्या मसौऱ्ही येथील एक घटना आज मला एका भगिनीने सांगितली. दूध वाटप केंद्रात एक मुसलमान स्त्री आपल्या मुलाला हिंदू मुलाने वापरलेल्या भांड्यात दूध पिऊ देण्याकरिता तयार नव्हती. ही गोष्ट चांगली नाही हे खरे असले तरी आपण ही गोष्ट आक्षेपार्ह समजू नये असे मी म्हणेन. अस्पृश्यता पाळणारे आपण हिंदूच आहो, इस्लामला अस्पृश्यता माहीत नाही. कोणत्याही स्वरूपातील अस्पृश्यता इस्लामला मान्य नाही. उलटपक्षी तो शांततापूर्ण सहजीवनावर भर देतो. अस्पृश्यता पाळणारे आपण पहिले आहो. नंतर ती मुसलमानांमध्ये पसरली आणि आता तर ती मुलांनाही शिकवण्यात येत आहे. ज्या भगिनी प्रामाणिक असतील आणि ज्यांना आपण मुसलमानांची लूट आणि कत्तली केल्या आहे असे वाटत असेल त्यांनी आपल्याकडून गांजल्या गेलेल्या लोकांमध्ये जावे. त्यांनी शेजारच्या मुसलमान कुटुंबांना भेट द्यावी. ज्या ठिकाणी अत्याचार झाले आहेत तिथे जाऊन काम करणे हा आपला सर्वात मोठा धर्म आहे. जिथे कोणतेही गैरप्रकार घडले नाहीत तिथेही जाऊन हिंदू आणि मुसलमानांचे मनोमिलन घडवून आणण्याचा तुम्ही प्रयत्न करावा. तुम्ही मुसलमान भगिनींना सख्ख्या बहिणी बनवा आणि मुलांना खऱ्या प्रेमाचा पाठ शिकवा.

इतक्यातच रुग्णालयात असलेल्या माझ्या नातीने इथे घडलेला माझ्यासंबंधीचा एक प्रसंग मला सांगितला. कॉंग्रेसचे लोक अतिशय उद्धट झाले आहेत असा रुग्णालयातील लोकांचा समज झाला होता. प्रत्येक गोष्ट आपली आहे असे आता त्यांना वाटू लागले आहे, इतकेच नाही तर हे रुगणालयसुद्धा आपली खाजगी मालमत्ता आहे असे त्यांना वाटते. असा विचार करणे काही चूक नाही. परंतु त्याचा चुकीचा अर्थ लावणे आणि दुरुपयोग करणे खचितच चूक आहे. पांढरी टोपी घातल्यामुळे वा खादी वापरल्यामुळे आपल्याला सर्वांवर सत्ता गाजवण्याचा वा साहेब बनण्याचा अधिकार मिळतो असे नाही. माझ्या नातीने मला सांगितले की तिला ताप असल्यामुळे तिला भेटण्याकरिता कोणालाही परवानगी देण्यात येऊ नये असे रुग्णालयाच्या द्वारपालाला सांगण्यात आले होते. परंतु जेव्हा एक खादीधारी गृहस्थ तिला भेटायला आले तेव्हा त्यांना थांबवण्यात आले असता त्यांनी मला थांबवणारा तू कोण, मी आमदार आहे आणि मला कोणीही अडवू शकत नाही असे म्हणून त्यांनी द्वारपालाला दमदाटी करायला सुरुवात केली. आपण किती उद्धट झालो आहो! मी तर

म्हणेन की केवळ आमदारच काय पण डॉ. महमूदसारखाही आला तर त्यालाही थांबवले पाहिजे. रुग्णालयात डॉ. आणि परिचारिका अधिकारी आहेत. तिथे त्यांचा शब्द पाळला गेला पाहिजे. श्रीबाबूसुद्धा अशा बाबतीत हसतक्षेप करू शकत नाहीत. एका अर्थाने कॉंग्रेसी माणसाला प्रत्येक गोष्टीत अधिकार आहे. परंतु एखाद्या संस्थेच्या अंतर्गत कारभारात तेथील अधिकाऱ्यालाच सर्वाधिकार असला पाहिजे. कोणताही भेदभाव न करता सर्व रुग्णांना रिकाम्या असलेल्या खोल्यांमध्ये भरती केले पाहिजे. मंत्र्याकरितासुद्धा कोणालाही खोली रिकामी करण्याकरिता सांगण्यात येऊ नये. माझी नात चाणक्ष आहे. याबद्दल काही करता येऊ शकत नाही काय असे तिने मला विचारले. आपण जे अधिकार मिळवले आहेत त्यांचा आपण दुरुपयोग करू नये. माझा हा संदेश सुशिक्षितांपर्यंत पोहोचला तर अधिक बरे होईल.

मला अजून एक गोष्ट सांगायची आहे. मी असे ऐकले आहे की बिहारमध्ये काळा बाजार सर्वत्र पसरला आहे. तो संयुक्त प्रांतात जास्त पसरला आहे की ओरिसा, गुजरात आणि महाराष्ट्रात जास्त पसरला आहे हे सांगणे कठीण आहे. आता मी इथे असल्यामुळे मी गृहीत धरतो की बिहारमध्ये मोठ्या प्रमाणात काळा बाजार फोफावला आहे. कालपरवाच राजेंद्र बाबू सांगत होते की जुलै-ऑगस्टमध्ये अन्नधान्याची फार मोठू तूट जाणवणार आहे आणि आपल्याला काही अन्नधान्य बाहेरून मिळू शकले तरच आपण ही परिस्थिती हाताळू शकू. मी जेव्हा असे ऐकतो तेव्हा मला फार दुःख होते. हिंदुस्तान असा देश नाही की जिथे अन्नधान्याची चणचण जाणवावी. आपण इतरांना नेहमीच खाऊ घातले आहे. आपला अन्नधान्याचा साठा भरलेला असायचा आणि प्रत्येकाला पोटभरून खाण्याकरिता मिळायचे. आपली अन्नधान्याची परिस्थिती अशी होती. आणि आता जरी ती अशी नसेल तरी आपण तशी परिस्थिती निर्माण करू शकतो. अधिक धान्य निर्माण करण्याकरिता व त्याचा साठा करण्याकरिता तुम्हाला कठोर परिश्रम करणे आवश्यक आहे असे लोकांना सांगावे लागेल. कठोर श्रमच तुमची प्रकृती उत्तम ठेवील. हे सर्व बिहारमध्ये करता येऊ शकते. मला मान्य आहे की देशात धान्य आणि कापडाची टंचाई आहे. परंतु सत्य हे आहे की जी गोष्ट उघड्यावर मिळत नाही ती जास्त किंमत जरी द्यावी लागली तरी काळ्या बाजारात मिळते. वेगळ्या शब्दांत उघड्या बाजारात प्रामाणिकपणे जी गोष्ट मिळत नाही ती अप्रामाणिकपणाच्या मार्गाने काळ्या बाजारात मिळू शकते. ही जटिल समस्या आहे. ही मंत्रिमंडळाची समस्या आहे, कॉंग्रेसी लोकांची आहे आणि प्रत्येकाची आहे. परंतु काळ्या बाजारातून काहीही घ्यायचे नाही असे प्रत्येकाने ठरवले तर सर्व काही बोरबर होईल. व्यापाऱ्यांनी काळा बाजार करायचा नाही असे ठरवले तर परिस्थितीत सुधारणा होईल. परंतु लोक सहजपणे भ्रष्टाचाराला शरण जातात. व्यापार लोकांची सेवा करण्याकरिता करायचा असतो, तिजोरी भरण्याकरिता नाही. प्रामाणिकपणाच्या मार्गानेसुद्धा पैसा मिळवता येतो. बाहेरून

आपल्याला धान्य मिळाले नाही तर आपण काय करणार? आपण जेव्हा ऑस्ट्रेलियाला विनंती केली तेव्हा त्यांनी त्याच्या मोबदल्यात जवस मागितला. त्यांना तो मागण्याचा अधिकार आहे आणि आपल्याजवळ जर तो आवश्यकतेपेक्षा अधिक असेल तर आपण त्यांना तो देऊसुद्धा. परंतु आपल्याजवळ जास्तीचा जवस नसेल तर त्याऐवजी त्यांनी पैसे घेतले पाहिजे. परंतु आज परिस्थिती अशी आहे की ते ज्या अटी सांगतील त्या आपल्याला मान्य कराव्या लागतात. आपण जर त्या मान्य केल्या नाही तर ते आक्रमक होतात. आपण जर हल्ला केला तर ते दुप्पट जोराने हल्ला करतील. यामुळे मी म्हणेन की सर्व व्यापाऱ्यांनी आपला व्यापार प्रामाणिकपणे केला तर त्यामुळे त्यांचा व्यवसायसुद्धा सुलभ होईल. बिहार ही राजा जनक आणि भगवान गौतम बुद्धाची जन्मभूमी आहे. इथले लोक जर भ्रष्टाचार आणि अप्रामाणिकपणाच्या मार्गाकडे वळत असतील तर ते फार मोठे दुर्दैव म्हणावे लागेल. काळा बाजारवाल्यांना मी कळकळीची विनंती करतो की आपल्या समोरील कठीण काळाला तोंड देता यावे म्हणून तुम्ही तुमचा व्यापार प्रामाणिकपणे करा.

हिंदीवरून. हरिजन सेवक, जून १, १९४७

# २०. प्रार्थना प्रवचन, मे २५, १९४७

नवी दिल्ली, मे २५, १९४७

बंधूभगिनींनो,

प्रार्थनेत आपण शांतता ठेवली पाहिजे हे तुम्हाला माहीत आहे. तुम्ही मला इथे शांततेची चव चाखायला दिली आणि तुमचे उदाहरण प्रत्येक ठिकाणी गिरवले जाईल. तुम्हाला ऐकून आनंद होईल की बंगालमध्ये प्रचंड सभा असूनही त्या शांततापूर्ण होत्या. सामान्यपणे मी प्रवास करत असताना जमाव गोळा होतो आणि प्रेमामुळे लोक जोरात घोषणा देऊ लागतात. मला हे प्रेम आवडते परंतु आता माझी प्रकृती हा कोलाहल सहन करू शकत नाही. अनेक अडथळयांनतरही कालच्या प्रार्थना सभेत तुम्ही शांतता राखून ठेवली आणि इतरांकरिता चांगले उदाहरण प्रस्तुत केले याकरिता मी तुमचा कृतज्ञ आहे. बिहारमधील प्रार्थना सभासुद्धा बंगालइतक्याच शांततापूर्ण होत्या. बिहारमध्ये किती तरी लोक मोठ्या संख्येत लोक गोळा होत असत. या अशा भयंकर उकाड्यात प्रवास करण्याइतका शारीरिक दृष्टीने मी सक्षम नाही. यामुळे बिहारमध्ये मी एक वा दीड तास मोटारीतून वा रेल्वेने जात असे व वेगवेगळया ठिकाणी जाऊन मी प्रार्थना सभा घेत असे. एका ठिकाणी नदीच्या काठावर एक लाखापेक्षाही जास्त लोक गोळा झाले होते. थोड्याथोड्या वेळाने नवीन लोक यायचे आणि जयजयकाराच्या घोषणा करायचे. तिथे इतका कोलाहल होता की मी प्रार्थना सभा घेऊ शकलो नाही. परंतु हा प्रसंग वगळता बिहारमध्ये प्रत्येक ठकाणी मी प्रार्थना घेऊ शकलो. बिहारमध्ये बंगालपेक्षा जास्त मोठा जनसमूह असायचा. बिहारच्या लोकांना मी माहीत आहे आणि तरीही मला परत एकदा पाहण्याकरिता ते यायचे. आपल्याकडे ४० कोटी लोक आहेत आणि एखाद्या माणसाला एकदाच थोडा वेळ पाहून आणि ऐकून त्याची आठवण कशी राहील? मला पाहण्याकरिता लोक नेहमीच उत्सुक असतात. गांधी कसा दिसतो हे त्यांना पाहायचे असते. शेपूट आणि शिंगं असलेला तो माणूस आहे काय हे त्यांना पाहायचे असते. अशा प्रकारे लोक प्रचंड संख्येत गोळा होतात. तिथे मुसलमान इतके कमी होते की अरबी भाषेतील प्रार्थना आम्हाला ऐकायची नाही म्हणून हिंदू आरडाओरड करू शकले असते. परंतु अशा प्रचंड गर्दीतसुद्धा एकही माणूस असे काही म्हणाला नाही. कोणी असे का म्हणावे? एखाद्याने कुराणातील वचन का म्हणू नये?

तुम्हीसुद्धा इथे शांतता पाळत आहा. परंतु तुम्ही जरी शांत असला तरी तुम्ही इथे अशांतता निर्माण करत आहा. जसे इथे तसेच बंगालमध्येसुद्धा. एका माणसाने प्रार्थनेत अडथळा आणण्याचे औधत्य केले. मी विचार केला की अहिंसेच्या नावावर ही हिंसा होत आहे. मी त्याच्याकडे लक्ष दिले

नाही. त्याच्या परिस्थिती लक्षात आली आणि तो गप्प बसला. सुदैवाने पोलिसांनी हस्तक्षेप केला नाही. खादी प्रतिष्ठानमध्ये आम्ही प्रार्थना घेतली आणि इतका मोठा जनसमुदाय असतानाही लोक नेहमीच अगदी शांत असायचे.

प्रार्थनेत अडथळा आणणे ही येथील दैनंदिन बाब झाली आहे. आता स्त्रियांनी मला पत्र लिहिण्याकरिता सुरुवात केली आहे. आज मला मराठी समजणाऱ्या एका स्त्रीकडून पत्र आले. तिचे म्हणणे आहे की मंदिरामध्ये कुराणातील भाग म्हणणे तिला मान्य नाही. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर कुराणचे पठन करणाऱ्या मुसलमानांनी हजारो निरपराध स्त्रियांवर आणि मुलांवर अत्याचार केलेले असल्यामुळे मंदिरातील कुराणपठनाला तुम्हा सर्वांचा विरोध आहे.

परंतु या अडथळयांच्या कारणाकरिता यापुढे मी प्रार्थना थांबवणार नाही. काही (चांगली) गोष्ट करण्यापासून अहिंसा आपल्याला परावृत्त करू शकत नाही. अहिंसेच्या नावाखाली घडत असलेल्या हिंसेचा मी साक्षीदार असू शकत नाही. यामुळे ही स्त्री जरी अडथळा आणील तरी मी माझी प्रार्थना सुरूच ठेवणार आहे. त्या स्त्रीला आणि जर तिचा पती हजर असेल तर त्यालाही मी सांगू इच्छितो की असा उद्धटपणा आपल्याला शोभत नाही. एका माणसाकरिता आपण हजारो लोकांना दुखवू शकत नाही. ते जर या प्रार्थनेला अनुकूल नसतील तर त्यांनी या प्रार्थनेला येऊ नये. असे असूनही जर ही स्त्री गोंधळ करणार असेल तर कोणीही तिला इजा पोहोचवणार नाही. तिने घाबरण्याचे कारण नाही. पोलीस जर इथे असतील तर त्यांनीसुद्धा तिला अटक करू नये. मला तिचा वा तिला पाठिंबा देणारांचा जरी आवाज ऐकू आला तरी मी प्रार्थना थांबवणार नाही. तुम्हीसुद्धा हे सहन केले पाहिजे. परंतु तुम्ही सर्व जर तिच्या मताशी सहमत असाल तर मी सागू इच्छितो की माझ्याबरोबर असलेले हे सर्व तरुण प्रार्थना म्हणणार नाही. मी एकटा प्रार्थना म्हणेन आणि तुम्ही सर्व मला घेरून मला मारून टाकू शकता. रामनाम ओठावर ठेवून मी हसत हसत मरण पत्करेन. तुम्ही इतके सर्व लोक असताना मी एकट्याने तुम्हाला मारू शकत नाही. आणि पोलीसही मला मारण्यापासून तुम्हाला अडवू शकत नाही. परंतु मला वाटते की ही स्त्री सोडली तर इतर कोणीही असा नाही की ज्याचा कुराणला विरोध आहे. या स्त्रीच्या आरडाओरडीकडे लक्ष देऊ नये अशी माझी तुम्हाला विनंती आहे. तिला कोणी स्पर्षसुद्धा करू नये.

यानंतर प्रार्थना घेण्यात आली. प्रार्थनेनंतर गांधीजी म्हणाले -

या स्त्रीचे पत्र तुम्हाला वाचून दाखवल्यामुळे तिचे समाधान झाले याकरिता मी तिची प्रशंसा करतो. उद्याही असेच केले जाईल. जे काही विरोधकांना म्हणायचे असेल ते तुम्हाला सांगितले

जाईल परंतु प्रार्थना सुरू राहील. परंतु प्रार्थनेत अडथळा आणणारा उद्या कोणीही नसेल अशी मला आशा आहे.

मी तुम्हाला सांगू इच्छितो की अत्याचार करण्यात बिहारमधील हिंदूही मागे नव्हते. केवळ नोआखालीमधील अत्याचारांचाच बदला घेण्यात आला नाही तर किती तरी जास्त करण्यात आले. आणि नंतर त्याच्या प्रतिक्रियेची साखळी डेरा इस्माईल खानपर्यंत पोहोचली. हिंदूंच्या हातून मुसलमानांना  अत्याचार सहन करावे लागलेले पाहून जर मुसलमान म्हणू लागले की आम्ही तुलसी रामायण, गीता, उपनिषद आणि वेदाचा पाठ करू देणार नाही तर ते योग्य होईल काय? जर एखादा मुसलमान असे म्हणू लागला तर रामायण आणि महाभारतने तुझे कोणते नुकसान केले आहे आणि प्राचीनतम धर्मग्रंथ असलेल्या वेदांनी तुमची कोणती हानी केली असे मी त्याला विचारेन. रामचंद्रजींनी कोणते नुकसान केले? हाच युक्तिवाद कुराण आणि महमद साहेबांना लागू होईल. त्यांनी आपले कोणते नुकसान केले? आता तुमच्या लक्षात येईल की ज्याप्रमाणे मला रामायण आणि गीता वाचण्याची इच्छा असते तशीच मला कुराण वाचण्याची आवश्यकता वाटते.

आता मी कलकत्ता आणि पटना येथे काय केले हे जाणून घेण्याची तुम्हाला इच्छा होईल. कलकत्त्यात मी केलेली प्रत्येक गोष्ट आता मी तुम्हाला सांगू शकत नाही. तिथे सुऱ्हावर्दी साहेबांशी माझी भेट झाली व त्यांच्याशी चर्चा झाली. आता त्या चर्चेच्या परिणामांची आपल्याला वाट पाहावी लागेल. ते काहीही असले तरी मी तिथे गेल्यामुळे लोकांना थोडे हायसे वाटले. शरत बाबू आपल्याकडून चांगल्यात चांगले करत आहेत. परंतु अजून तिथे हिंसा पूर्णपणे थांबलेली नाही.

बिहारमध्येसुद्धा भरपूर सुधारणा झाली आहे. निर्वासित आपल्या घरी परतत आहेत, परंतु हिंदू आणि मुसलमानांचा परस्परांवरचा राग अजून पूर्णपणे निवळला नाही. आम्हाला एकमेकांची भीती वाटत नाही वा एकमेकांवर आम्ही आक्रमण करणार नाही असे म्हणण्याच्या परिस्थितीत ते अजूनही नाहीत. परंतु वातावरण निवळत आहे याबद्दल काहीही संशय नाही.

आता प्रश्न उभा राहतो की मी इथे का आलो. स्पष्ट सांगायचे तर मी इथे का आलो हे मलाही माहीत नाही. परंतु एक गोष्ट निश्चित आहे. मी कॉंग्रेसची अनेक वर्षे सेवा केली आहे आणि लोक मला त्यांचा सेवक म्हणून ओळखतात. त्यांना माझे मत पटो वा न पटो परंतु ते काय आहे हे जाणून घेण्याची त्यांची इच्छा असते.

परंतु मी तुम्हाला सांगू इच्छितो की लंडनकडे पाहत बसण्याची आपली प्रवृत्ती बरोबर नाही. आपले स्वातंत्र्य लंडनहून पाठवले जाणार नाही. हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याचा कोहिनूर इतरांच्या हातून येणार नाही. लंडनच्या टॉवरमध्ये ठेवलेल्या कोहिनूरबद्दल मी बोलत नाही.

मी आपल्या स्वातंत्र्याच्या कोहिनूरबद्दल बोलत आहे. हा कोहिनूर येत आहे. आपली इच्छा असेल तर आपण तो फेकून देऊ शकतो व आपली इच्छा असेल तर तो आपल्याजवळ ठेवू शकतो. आपण काय करायचे ते आपल्यावर अवलंबून आहे, इतरांवर नाही.

मग आपण लॉर्ड माऊंटबॅटनकडे का पाहायला पाहिजे? ते इंग्लंडहून काय आणतात याची आपण वाट पाहिली पाहिजे काय? (मे १७ला सल्ला-मसलतीकरिता व्हाईसराय लंडनला गेले होते.) व्हाईसराय लंडनहून काय आणतात या भाकितांनी आपल्या वृत्तपत्रांचे रकाने भरलेले आहेत. परंतु आपण आपल्या शक्तीकडे का पाहू नये?

इतर अल्पसंख्याकांचे काय होईल? हिंदू, शीख आणि इतर इंग्रजांच्या तोंडाकडे पाहत नाहीत हे मान्य. परंतु मुसलमान केवळ त्या दिशेने पाहत आहेत. यामुळे हिंदूंनी आणि शिखांनीही त्या दिशेने पाहणे सुरू करावे काय? त्यांनी जर इंग्रजांच्या दिशेने पाहण्याकरिता सुरुवात केली आणि लॉर्ड माऊंटबॅटननी त्यांच्याकडे काही प्रमाणात लक्षही दिले तरी देशातील उर्वरित लोकांचे काय होईल? अत्यंत कमी संख्येत असलेल्या पारसी लोकांचे माऊंटबॅटन ऐकतील काय? आणि हिंदुस्तानात असे अनेक लोक आहेत की ज्यांची ना माऊंटबॅटन काळजी घेतात ना इतर कोणी.

अशा परिस्थितीत मी माझे कर्तव्य केले पाहिजे. वेगळ्या शब्दांत हिंदुस्तानने आपले कर्तव्य केले पाहिजे आणि स्वातंत्र्य मिळवले पाहिजे.

आपल्यामधील काही लोक भानावर नाहीत. आपण सर्व या प्रार्थना सभेत संपूर्ण सत्यपूर्ण होण्याच्या  उद्दिष्टाने आलो आहो. सत्यपूर्ण होण्याकरिता ईश्वराशिवाय इतर कोणाचेही आपण गुलाम होता कामा नये. असे झाले तर स्वातंत्र्य अगदी आपल्या हाताशी असेल. आपणसुद्धा आपले भान हरवायला पाहिजे काय? आणि हे थोडेसे धर्मांध लोक भानावर येत नाहीत तोपर्यंत लॉर्ड माऊंटबॅटन यांनी त्यांना नियंत्रणात ठेवण्याकरिता इथे थांबावे अशी तुमची इच्छा आहे काय?

मी हे मान्य करू शकत नाही. मी तुम्हाला काही वेगळे शिकवले आहे. १९१५ ( मुळात इथे १९१६ आहे ची स्पष्टपणे चूक आहे. गांधीजी जानेवारी ९, १९१५ला दक्षिण आफ्रिकेतून परतले होते.) साली हिंदुस्तानात आल्यापासून मी तुम्हाला सांगतो आहे की आपल्यापैकी प्रत्येकाने स्वतःची काळजी घेतली पाहिजे. आपण जर असे केले तर केवळ इंग्लंड, अमेरिका, रशियाच नाही तर हे तिघेही एक होऊन आले तरी ते आपला विनाश करू शकणार नाही. आपला ज्यावर जन्मसिद्ध अधिकार आहे तो कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. स्वातंत्र्य आपले आहे आणि आपले हेतू जर प्रामाणिक असतील तर ते येणे अपरिहार्य आहे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ८२-८६

## २१. प्रार्थना प्रवचन, मे २६, १९४७

नवी दिल्ली,

सोमवार, मे २६, १९४७

आज मी व्याख्यान लिहून काढले. त्यानंतर ५ वाजता मला त्या स्त्रीचे पत्र मिळाले जिने प्रार्थनेवर काल आक्षेप घेतला होता. तिचे म्हणणे आहे की प्रार्थना घेऊन मी माझे वचन मोडले आहे. ही गोष्ट तर माझ्या कल्पनेच्याही पलीकडे आहे. मी तुम्हाला आवाहन केले होते आणि आक्षेप घेणारांबद्दल संयम ठेवण्याकरिता विनविले होते आणि तुम्ही प्रार्थना घेण्याला संमती दिली होती. अशा आक्षेपांमुळे मी प्रार्थना केली नसती तर माझे वर्तन सौजन्याला धरून झाले नसते. या बाबतीत उदारपणा केला असता तर तो हावेसारखा झाला असता. अशा प्रकारे अहिंसा काम करत नाही. यामुळे या स्त्रीने मला क्षमा करावी. प्रार्थना सुरूच राहणार आहे.

मी काल जे सांगितले होते ते आज परत सांगितले पाहिजे. सार्वजनिक प्रार्थना हे अमूल्य कर्तव्य आहे. ते सहजपणे फेकून देता येत नाही. जो त्यावर आक्षेप घेतो तो अपराध करतो. परंतु आक्षेप घेणाराला मारहाण होण्याची शक्यता असेल तर मौन प्रार्थना करणे चांगले. माझ्या विनवणीला प्रतिसाद देऊन तुम्ही पूर्ण शांतता पाळली आणि आक्षेप घेणाराला मारहाण करण्यात आली नाही. परंतु मला जेव्हा जाणवले की या संयमाचा दुरुपयोग केला जाऊ शकतो तेव्हा मी दुसरा मार्ग अनुसरण्याचे ठरवले. आक्षेप घेणारी स्त्री शांत होती याचा मला आनंद होतो. तिचे स्वतःचे काहीही मत असले तरी ती आपल्या मनाची निश्चलता कायम ठेवील अशी मला आशा आहे. माणसाने किमान सौजन्य पाळलेच पाहिजे. आक्षेपक असले तरी भविष्यात मी प्रार्थना सुरूच ठेवत राहणार आहे परंतु त्याचबरोबर त्यांच्यावर चिडण्याऐवजी तुम्ही त्यांच्याशी उदार मनाने वागले पाहिजे.

मी काल तुम्हाला सांगितले की आपण लंडनकडे पाहत राहणे आपल्याला शोभत नाही. ब्रिटिश आपल्याला स्वातंत्र्य देऊ शकत नाहीत. ते केवळ आपल्या पाठीवरून उतरू शकतात. असे करायचे त्यांनी आधीच ठरवले आहे. परंतु आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करणे आणि त्याला ठोस स्वरूप देणे हे आपले काम आहे. हे आपण कसे करणार आहो? जोपर्यंत हिंदुस्थानमध्ये ब्रिटिशांची सत्ता कायम आहे तोपर्यंत यासंबंधी सुसंगतपणे आपण विचारच करू शकत नाही. हिंदुस्तानचा नकाशा बदलवणे ब्रिटिशांच्या हाती नाही. शक्य असेल तर शिष्टाचारपूर्वक त्यांनी ठरवलेल्या

तारखेपूर्वी हिंदुस्तानातून निघून जाणे आणि कोणत्याही परिस्थितीत निघून जाणे इतकेच ते करू शकतात.

सध्याच्या परिस्थितीत देशाच्या सध्याच्या नकाशात कोणताही महत्त्वाचा बदल करण्यात येऊ नये याचे अजून एक कारण आहे. राजकीय उद्दिष्टांच्या परिपूर्तीकरिता हिंसेचा आधार घेण्यात येऊ नये असे संयुक्त वक्तव्य माझ्या आणि कायदे आझमच्या सहीने काढण्यात आले आहे. या आवाहनानंतरही लोक मोठ्या प्रमाणात वेडेपणाच्या हिंसेच्या मार्गाचा आश्रय घेणे सुरूच ठेवणार असतील आणि असे केल्यामुळे सर्व काही ठीक होईल या व्यर्थ आशेने ब्रिटिश सत्ता त्या हिंसेला शरण जाणार असेल तर तसे केल्याने ब्रिटिश त्यांच्यामागे रक्तरंजित वारसाच सोडतील व त्याकरिता केवळ हिंदुस्तानच नाही तर जगसुद्धा ब्रिटिशांना दोषी समजेल. यामुळे प्रत्येक देशभक्ताला आणि ब्रिटिश सत्तेलासुद्धा मी विनंती करेन की कितीही भयानक हिंसा झाली तरी त्यांनी १६ मे १९४६च्या कॅबिनेट मिशनच्या मसुद्याप्रमाणे (पाहा कॅबिनेट मिशन आणि व्हाईसराय यांचे वक्तव्य मे १६, १९४६) येथून निघून जावे. ब्रिटिश सत्तेच्या आजच्या उपस्थितीत रक्तपात, बेलगाम हत्या, जाळपोळ आणि याहूनही वाईट कृत्यांमुळे आपले नीतिधैर्य खचले आहे. ही सत्ता निघून गेल्यानंतर हिंदुस्तान एक ठेवायचा की त्याचे दोन वा अधिक भागात विभाजन करायचे यासंबंधी सुसंगतपणे विचार करण्याची सद्बुद्धी आम्हाला सुचेल अशी आशा आहे. परंतु त्यानंतरही जरी आम्ही भांडणे सुरूच ठेवले तरी आज जितके आमचे मनोधैर्य खचलेले आहे तितके खचलेले नसेल याची मला खात्री आहे. व्यर्थ जरी असली तरी मी आशा करतो की आजप्रमाणे स्वतंत्र हिंदुस्तान हिंसेचे परत असे उदाहरण सादर करणार नाही की ज्यामुळे त्याची आज अशी दयनीय अवस्था झाली आहे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन -१, पृष्ठ ८६-८

# २२. प्रार्थना प्रवचन, मे २७, १९४७

नवी दिल्ली मे २७, १९४७

बंधूभगिनींनो,

आजसुद्धा महाराष्ट्रातील त्या स्त्रीकडून मला लांबलचक पत्र मिळाले. तिला थांबवत असताना स्वयंसेवकांनी तिच्याशी उचित व्यवहार केला नाही अशी तिची तक्रार आहे. तिचे असेही म्हणणे आहे की कुराणमध्ये मुसलमानेतरांना मारण्याची आज्ञा असल्यामुळे कुराणातील आयतींचे पठन करण्यात येऊ नये. मी कुराण वाचलेले आहे आणि त्यात मला अशा प्रकारचे काहीही आढळले नाही. उलटपक्षी मुसलमानेतरांवरही प्रेम करावे असे कुराणात सांगितले आहे. जे लोक कुराण वाचतात परंतु त्यातील शिकवणुकीचे अनुसरण करत नाहीत त्याकरिता आपण कुराणला दोष कसा देऊ शकतो? इतकेच नाही तर आपल्याकडेसुद्धा तुलसी रामायण, गीता आणि वेदांमध्ये जे लिहिले आहे त्याचे अनुसरण कोण करतो?

धर्माच्या नावावर अधर्माचे अनुसरण करणे मला समजू शकत नाही. ईश्वराची भीती मनात बाळगून मी प्रत्येक शब्द उच्चारत असतो. ज्या गोष्टीचे या स्त्रीला ज्ञान नाही त्या गोष्टीवर या स्त्रीला लिहिताना पाहून मला वेदना होतात. कुराणात असे असे लिहिले आहे कारण कोणी तरी तिला तसे सांगितले आहे यावर ती स्त्री का विश्वास ठेवते? परंतु तुम्ही तुमच्या मनात ठाम असला पाहिजे. तिने जरी विरोध केला तरी तुम्ही प्रार्थनेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. परंतु तुम्ही सर्वच तिच्याप्रमाणे बोलू लागलात तरी माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत मी प्रार्थना म्हणत राहीन.

तिला दूर करत असताना पुरुष स्वयंसेवकांनी तिच्या शरीराला स्पर्श केला अशी तिची दुसरी तक्रार आहे. माझ्या दृष्टिकोनातून त्यात गैर काहीही नाही. गोंधळ करणारांना, मग ती व्यक्ती स्त्री असो वा पुरुष,  गोंधळ करण्यापासून थांबवण्याकरिता दूर करणे हे स्वयंसेवकांचे कामच असते. त्यांनी अर्थातच स्त्रियांवर हात उगारू नये वा त्यांना मारहाण करू नये. त्यांनी त्यांना सौजन्यपूर्वक समजावून सांगितले पाहिजे. विषयवासनेचे विचार मनात नसतात एखाद्याने स्त्रीला स्पर्ष केला तरी काहीही होत नाही. मीसुद्धा फिरत असताना मुलींच्या खांद्यांवर हात ठेवत असतो. मग मी अपराध करतो काय? त्या सर्व माझ्या मुलीसारख्या आहेत. माझ्या मनात जर वाईट विचार असतील तर ते निश्चितच पापपूर्ण असेल.

सभेची व्यवस्था पाहत असताना प्रार्थनेकरिता आलेल्या स्त्रियांना स्वयंसेवकांनी आईप्रमाणे वा बहिणीप्रमाणे वागणूक दिली पाहिजे. आईला स्पर्श करावा तसा एखाद्या स्त्रीला स्वयंसेवक स्पर्श करू शकतात. ते त्यांचे कर्तव्य आहे. (त्या स्त्रीच्या आरडाओरडीनंतरही प्रार्थना सुरूच ठेवण्यात आली. यानंतरचा भाग प्रार्थनेनंतरचा आहे.)

आज बराच उशीर झाला आहे. यामुळे मी थोडक्यात सांगेन.

तुम्हा सर्वांना माहीत आहे की मी बिहारमध्ये काम करत आहे. बिहारमध्ये मुसलमान फार कमी आहेत. एकूण लोकसंख्येत ते मुश्किलीने १४ टक्के असतील. याचप्रमाणे नोआखालीत हिंदूही अतिशय कमी आहेत. माझ्या नोआखालीच्या कामाच्या संबंधातच मी बिहारमध्ये गेलो होतो.

लोक आतापासून २ जूनबद्दल विचार करू लागले आहेत असा फोन बिहारमध्ये काम करणाऱ्या एका मित्राकडून आला होता. त्याचप्रमाणे ९ तारखेला घटना समितीची बैठक होणार असल्यामुळे त्याबद्दलही लोक घाबरलेले आहेत. पुढे काय केले पाहिजे अशी विचारणा करणारी पत्रे मला चोहोकडून येत आहेत. नोआखालीतील लोकांना धमक्या देण्यात आल्या होत्या की नोव्हेंबरच्या दंगलीत काही हिंदूंना तसेच राहू दिले असले तरी या वेळी सर्व हिंदूंचे धर्मांतर केले जाईल. त्या वेळी मी त्यांना सांगितले होते की तुमची इच्छा असेल तर त्या वेळी परत येईन. परंतु जीव देण्याशिवाय तिथे मी अधिक काही करू शकणार नाही. परंतु त्यांनी मला बोलावले नाही. कोणताही प्रसंग आला तरी त्याला स्वतःच तोंड देण्याची त्यांनी तयारी केली. वस्तुस्थिती अशी आहे की सर्व हिंदूंना मुसलमान करण्यात त्यांना कधीही यश येणार नाही. तसेच मुसलमानांना बिहारमध्ये घाबरण्याचे कारण नाही. २ जूनची आपल्याला भीती का वाटावी? व्हाईसराय (लॉर्ड माऊंटबॅटन लंडनहून मे ३१ला परतणार होते व २ जूनला देशाच्या भविष्याबद्दलची घोषणा करणार होते.) लाडू आणणार आहेत हे जरी मान्य केले तरी आपण इतके उत्सुक का असावे? मी आधीच सांगितल्याप्रमाणे त्यांचा आपल्याला काहीही उपयोग नाही. आपण स्वतः ज्या गोष्टी निर्माण करू त्यांचाच आपल्याला उपयोग असतो.

बिहारमधील मुसलमानांनी का घाबरावे? रामाचे नाव घेणारे हिंदू आपल्या रामाचा विचार करणार नाहीत काय?

याचप्रमाणे सिंधमधील हिंदूंनी का घाबरावे? त्यांच्या भीतीचे कारण काय? मला तेथून पत्र मिळाले आहे की हिंदूंनी भीतीवर मात केली आहे. परंतु घाबरण्याऐवजी ते रामाचे नाव का घेत नाहीत? सिंधच्या लोकांची मी त्याच्याजवळ यावे अशी इच्छा आहे. अनेक वर्षांपासून मी सिंधमध्ये गेलोलो नसलो तरी तेथील लोकांशी माझे इतके जवळचे संबंध आहेत की एके काळी मी स्वतःला

सिंधी म्हणवून घेत असे. दक्षिण आफ्रिकेतसुद्धा माझे सिंधी सोबती होते. सिंधी, मारवाडी, पंजाबी या सर्वांनी माझ्याशी सहकार्य केले आहे. त्यातील काही असे होते की जे दारू पीत होते आणि मांसाहार करत होते. काहींनी तर माझ्याबरोबर शाकाहारी खाणेपिणे केले आहे. या गोष्टी सोडणे त्यांच्याकरिता कठीण असूनही ते स्वतःला हिंदू म्हणवत असत. मी त्या सर्वांचा मित्र होतो. एकाने तर मी त्याला आणि सिंधला विसरलो काय असे पत्र लिहून मला विचारले. परंतु मी त्यांना कसा विसरू शकतो?

२ जूनला होणाऱ्या घोषणेच्या आशंकेने लोक सर्वत्र घाबरलेले आहेत. असे सांगतात की मुसलमानांनी प्रचंड तयारी केली आहे. परंतु कशाची तयारी? ते स्वतःचे पशूत रूपांतर होण्याची तयारी करत आहेत काय? आपल्याला ईश्वराने चांगला माणूस बनवावे अशी ते मशिदीत प्रार्थना करत नाहीत काय? हिंदूसुद्धा मला लिहीत नाहीत काय की ईश्वराने ब्रिटिशांना हिंदुस्तान सोडण्याची सद्बुद्धी द्यावी आणि उन्मादग्रस्त मुसलमानांना सुजाणपणा द्यावा अशी आम्ही ईश्वराची मूकपणे प्रार्थना करतो आहोत.

पंजाबमध्येसुद्धा ते धास्तावलेले आहेत कारण ते तिथे अल्पसंख्य आहेत. तिथे हिंदूंबरोबर शीखसुद्धा आहेत. शिखांनी घाबरायचे कारण काय? तिथे दोन्ही बाजूचे लोक का घाबरलेले आहेत आणि पहिल्यांदा तलवार कोण उपसतो याची ते का वाट पाहत आहेत?

बिहारचे हिंदू मुसलमानांची कत्तल करतील तर ते मला मारतील. बिहारचे मुसलमान माझ्या रक्ताच्या भावासारखे आहेत. मला पाहिले की त्यांना आनंद होतो. निदान हा एक माणूस आपल्या बाजूने आहे अशी त्यांची खात्री पटली आहे. जर कोणीही त्यांना मारील तर तो मला मारील. ते जर त्यांच्या आयाबहिणींचा अपमान करणार असतील तर ते माझा अपमान करतील. या व्यासपीठावरून मी ही गोष्ट बिहारमधील सर्व हिंदूंना सांगू इच्छितो.

बिहारच्या मुसलमानांनी घाबरण्याचे कारण काय? दोन अतिशय चांगले मुसलमान कार्यकर्ते त्यांची सेवा करत आहेत. याशिवाय श्रीकृष्ण सिन्हा बिहारच्या मंत्रिमंडळाचे प्रमुख आहेत आणि ते फार सावध आहेत.

गांधीला बिहारमध्ये जायचे आहे आणि बिहारच्या हिंदूंची कत्तल व्हावी अशी त्याची इच्छा आहे अशा अफवा आजकाल पसरवण्यात येत आहेत. परंतु माझ्यात जो काही जोर असेल तो लावून सांगतो की बिहारमधील सर्व मुसलमानांना जरी वेड लागले तरी हिंदूंनी त्यांचे अनुकरण करू नये.

शिखांबद्दल बोलायचे तर शिखांचे म्हणणे असते की एक शीख सव्वा लाखांच्या बरोबरीचा असतो आणि पाच शीख सहा लाखांच्या बरोबरीचे. ते असे बोललेले मला आवडते. ग्रंथ साहेब आणि गुरू जितके त्यांचे आहेत तितकेच माझेही आहेत. मी जर स्वतःला मुसलमान म्हणू शकतो तर मी मला स्वतःला शीख म्हणवून घेण्यात लाज कशाची? आणि नानकाना साहेब येथे शिखांनी सत्याग्रहाच्या भावनेने शौर्यपूर्ण आचरण केले आहे. परंतु आज ते तलवारीचा विचार करत आहेत.

त्यांच्या हे लक्षातच येत नाही की तलवारीचे युग निघून गेले आहे. त्यांना कळतच नाही की तलवारीच्या बळावर कोणालाही वाचवता येऊ शकत नाही. हे युग अण्वस्त्राचे आहे.

गुरू गोविंद सिंग यांनी तलवारीचा उपयोग शिकवला. परंतु आज तो अंमलात आणता येत नाही. परंतु एक शीख सव्वा लाख शिखांच्या बरोबरीचा असतो ही त्यांची शिकवण आजही उपयोगी आहे. परंतु ती शिकवण तेव्हाच खरी ठरेल जेव्हा शीख आपल्या बांधवांकरिता आणि राष्ट्राकरिता मरण पत्करतील.

आपल्यामध्ये शूरवीर स्त्रियासुद्धा आहेत. एका ठिकाणी जेव्हा त्यांची सर्व माणसे मारली गेली होती व कोणत्याही मदतीची आशा नव्हती तेव्हा गुपचुप शरणागती न पत्करता त्यांनी मरण पत्करण्याचा निर्णय घेतला. जवळपास पंचाहत्तर स्त्रिया अशाप्रकारे मरण पावल्या. त्यांनी आपल्या हाताने आधी आपल्या मुलांना मारले कारण आपल्या मुलांशी कोणी दुर्वर्तन करावे हे त्यांना मान्य नव्हते.

मला हेच सांगयचे आहे की लोक असे वागतात तेव्हाच त्यांचा धर्म जिवंत राहतो, मग ते हिंदू असो की मुसलमान. मी तर म्हणेन की हीच गोष्ट शिखांनाही लागू होते. म्हणजे जर प्रत्येक शीख सव्वा लाखांच्या बरोबरीचा असेल तर त्या सर्वांनी ईश्वरावर लक्ष केंद्रित करावे आणि सत श्री अकाल हे शब्द ओठांवर ठेवून मरण पत्करावे. याहून अधिक शौर्याची गोष्ट कोणती असू शकते?

मला कोणी भ्याड म्हटले तर मला त्याचे काहीही वाटणार नाही. मी खरोखर भित्रा आहे की नाही हे एका ईश्वरालाच माहीत. भित्र्या माणसाने जरी शौर्याचा धडा दिला तर आपण तोसुद्धा स्वीकारला पाहिजे. मला कोणाला भ्याड करायचे नाही. मी कोणालाही भ्याड केले नाही आणि मी स्वतःही भित्रा नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ८८-९२

# २३. प्रार्थना प्रवचन, मे २८, १९४७

नवी दिल्ली,

मे २८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज कोणीही व्यत्यय आणला नाही वा विरोध केला नाही याबद्दल मला आनंद होतो. मला खात्री आहे की उन्माद फार काळ टिकत नसतो. हीच गोष्ट हिंदू-मुसलमानांच्या भांडणालाही लागू होते. मला अजूनही पत्रे येत आहेत आणि त्यांतील काही थोडीशी पत्रे फार चांगली आहेत. काही चांगल्या मुसलमानांनी मला लिहिले आहे की हिंदू आणि मुसलमानांनी वेगवेगळ्या धर्मांचे पालन केले तर त्यामुळे काही बिघडत नाही. त्यांनी यामुळे स्वतःला वेगवेगळे समजू नये इतकेच. कुराणमधील पाठ म्हणणे मी थांबवले नाही तर काही हिंदू मला गंभीर परिणामाची धमकी देत आहेत. आम्ही इथे काळे झेंडे घेऊन येऊ असे त्यांचे म्हणणे आहे. (गुजरातमधील पाकिस्तानविरोधी आघाडीने दिलेल्या धमकीचा हा संदर्भ आहे.) आणि इथे येऊन ते काय करणार आहेत? वातावरण असे आहे की लोकांना काहीही पाहण्याची वा ऐकण्याची इच्छा नाही, त्यांना केवळ गोंधळ घालायचा असतो. तेसुद्धा येऊन प्रार्थनेत व्यत्यय आणतील. परंतु जरी असे काही घडले तरी तुम्ही जोपर्यंत मला शांततापूर्ण सहकार्य देत आहा तोपर्यंत आपली प्रार्थना सुरूच राहील. परंतु तुम्ही सर्व जर काळे झेंडे घेऊन येणार असाल तर मी स्वतः एकट्याने प्रार्थना करीन. तुम्ही जरी माझ्यावर हल्ला केला तरी मी रामनामाचा जप सुरूच ठेवीन. तुमच्यापासून माझे संरक्षण व्हावे म्हणून माझ्याजवळ जरी पोलीस असले वा मी जरी तलवार वा बंदूक काढली तरी मला अखेरीस मरावेच लागेल. असे जर आहे तर रामनाम ओठावर घेऊन मी मेलो तर त्याला काय हरकत आहे? अशा प्रकारे जेव्हा मी मरेन तेव्हा तुम्हाला पश्चात्ताप होईल. तुम्हीच तुम्हाला सांगाल की तुम्ही भयानक गोष्ट केली आणि मला मारून तुम्हाला काहीही मिळाले नही. परंतु मी जर पोलिसांचे संरक्षण घेतले तर वा जर मी तुम्हाला मारले तर मला मारल्यानंतर तुम्ही उद्गाराल की मला मारले हे तुम्ही योग्यच केले. परंतु मी आशा करतो की तुम्ही आला तेव्हा जितके शांततापूर्ण होता तितकेच शांततापूर्ण राहाल.

आज मी काही प्रश्नांचे उत्तर देणार आहे. सर्वच प्रश्नाचे उत्तर अर्थातच मी देऊ शकणार नाही. काल मला कोणी तरी विचारले की पिसाळलेल्या कुत्र्याचे काय करायचे? त्याला मारायचे की नाही? हा जुनाच प्रश्न आहे. वास्तवात त्याने मला विचारायला पाहिजे होते की माणसाला वेड लागल्यानंतर

त्याचे काय करायचे? परंतु सत्य हे आहे की आपल्या अंतःकरणात जर ईश्वर असेल तर कुत्रासुद्धा आपल्याशी पिसाळल्याप्रमाणे वागू शकत नाही. एकदा माझा एक मित्र मला विचारायला आला की जर पिसाळलेला कुत्रा प्रत्येकाला चावू लागला असेल तर त्याचे काय करायचे. मी त्याला सांगितले की कुत्र्याला मारून टाका आणि त्याची जबाबदारी माझ्यावर राहील. परंतु तो प्रश्न कुत्र्याचा होता. हे उत्तर माणसाला लागू होऊ शकत नाही. मला आठवते की मी जेव्हा दहाएक वर्षाचा असेन तेव्हा माझ्या एका भावाला वेड लागले होते. त्यानंतर तो दुरुस्त झाला. तो आता नाही. परंतु तो मला चांगला आठवतो. वेडाचा झटका आला की तो पळत बाहेर यायचा आणि प्रत्येकाला मारू लागायचा. परंतु मी त्याचे काय करू शकत होतो? मी त्याला मारू शकत होतो? वा माझे आईवडील त्याला मारू शकत होते? त्याला कोणीही मारू शकत नव्हता. एका वैद्याला बोलावण्यात आले आणि मारहाण सोडून शक्य त्या प्रकारे माझ्या भावावर औषधोपचार करण्याकरिता सांगण्यात आले. तो माझा सख्खा भाऊ होता. परंतु आता मी असा भेद करत नाही. आता तुम्ही सर्व माझ्या रक्ताच्या भावासारखे आहा. तुम्हा सर्वांचे जरी भान हरवले आणि माझ्याजवळ जरी सैन्य असले तरी मी तुमच्यावर गोळी झाडली पाहिजे असे तुम्ही म्हणाल काय? इतकेच नाही तर शत्रूला जरी वेड लागले तरी त्याला गोळी घालून मारता कामा नये. जर कोणाला वेड लागले तर त्याला वेड्याच्या इस्पितळात पाठवले पाहिजे. तुम्हाला माहीतच आहे की हिंदुस्तानात अशी किती तरी रुग्णालये आहेत. मी अशी वेड लागलेली माणसे पाहिलेली आहेत की ज्यांना खरे म्हणजे मारूनच टाकले पाहिजे. परंतु आपण त्यांना डॉक्टरच्या शुश्रुषेवर सोडतो.

मला एक जवळचा मित्र होता जो जवळपास माझ्या भावासारखा होता. त्याच्या मुलाला वेड लागले होते व त्याला जेव्हा वेडाचा झटका यायचा तेव्हा तो लोकांचा खून करायला धावायचा. त्याच्या मुलाला गोळी घातली पाहिजे असे काही मी माझ्या मित्राला सुचवले नाही. माझी इच्छा असती तर मी त्याला गोळी घालून मारायला लावू शकलो असतो कारण त्या वेळी लोक मला महात्मा म्हणू लागले होते. आणि आपल्या देशात महात्म्याला काहीही करण्याचा अधिकार असतो. तो खून करू शकतो, व्यभिचार करू शकतो वा त्याला हवे ते करू शकतो. त्याला नेहमीच क्षमा करण्यात येते. त्याला कोण प्रश्न विचारणार? परंतु मी देवाला घाबरतो. मला वाटले की अजून कोणाला नसलो तरी मी ईश्वराला उत्तरदायी आहे. खरे म्हणजे आपल्यामध्ये आज कोणीही महात्मा नाही. सर्व अल्पात्मा आहेत.

असो, मी त्या मुलाला डॉक्टरकडे पाठवायला लावले. तो तेथूनसुद्धा पळाला. अजूनही तो बरा झालेला नाही. त्याला मुले आहेत आणि कुटुंबातील सर्वांची त्याला साथ आहे. या मित्राच्या समस्येप्रमाणे या वेडेपणाला कसे हाताळावे याचा मार्ग आपण शोधला पाहिजे.

आज आपले रक्त खवळत आहे. चोहोकडून २ जूनबद्दलचे अंदाज आपण ऐकत आहो. सुरुवातीला ३ वा चार ठिकाणी झटापट झाली. आता सर्व हिंदूंना मारण्याची भाषा सुरू आहे. आणि हिंदू विचारतील की मुसलमान जर आम्हाला मारणार असतील तर त्याच्या बदल्यात आम्ही त्यांना का मारू नये. त्यांना रक्तपात करण्याची इच्छा आहे. हा जर वेडेपणा नसेल तर मग इतर कशाला वेडेपणा म्हणावे? माझा विश्वास आहे की इथे शांतपणे बसलेले लोक या वेडाला बळी पडणार नाहीत. जर लोक या वेडाच्या भरात आपल्याला मारण्याकरिता उत्सुक झालेले असतील तर आपण त्यांना तसे करू देऊ या. आम्ही त्यांना आम्हाला मारू दिले तर तर त्यांचे वेड जाईल काय? हे वेड असे नाही की त्यामुळे आपणा सर्वांची विवेकबुद्धी बधिर व्हावी. इतकेच नाही तर खरोखरीचा वेडा माणूस हातात चाकू घेऊन आपल्या अंगावर धावून आला तरी आपण तो धोका पत्करला पाहिजे. आपण घाबरून जायला नको. याचप्रमाणे मुसलमान जर पाकिस्तानकरिता ओरडत तलवार उपसून येत असतील तर मी त्यांना सांगेन की तलवारीच्या धाकावर तुम्हाला पाकिस्तान मिळू शकत नाही. देशाचे तुकडे करण्याआधी तुम्हाला माझे तुकडे करावे लागतील. जर प्रत्येकजण त्यांच्याशी याच भाषेत बोलेल तर ईश्वर त्यांच्या तलवारीचे तुकडे करून इतस्ततः फेकून देईल. मी गरीब असहाय माणूस आहे. परंतु वेळ आली की तुम्हाला माझे धैर्य दिसून येईल. त्या वेळी मी काठीच्या विरोधात काठी उगारणार नाही. माझी इच्छा आहे की वेडेपणाला वेडेपणाने उत्तर देऊ नये. आपण जर समंजसपणा धारण केला तर विरोधकाचा वेडेपणा नाहीसा होईल. त्यांचे (पाकिस्तानचे) वेडसुद्धा शुष्क होऊन जाईल. जर खरा पाकिस्तान व्हायचा असेल तर तो संपूर्ण हिंदुस्तानचाच होऊ शकेल.

तुम्ही जर उन्मादग्रस्त झाला तर अहिंसा केवळ आमच्याकरिताच होती काय असे ब्रिटिश विचारतील. परस्परांत हिंसेचा प्रयोग करणाऱ्या तुम्हा लोकांच्या अहिंसचे काय झाले असा आरोप ते आपल्यावर करतील. ते स्वतःचे वर्णन आपल्यापेक्षा अधिक चांगले अहिंसेचे उपासक म्हणून करतील आणि म्हणतील की आम्ही जरी बळाचा वापर केला तरी आम्ही समाजातील सुव्यवस्था कायम ठेवली. अखेरीस त्यांना राज्य करायचे होते आणि त्यांनी असा युक्तिवाद केला तर त्यात काहीही चूक नसेल. परंतु मी त्यांना सांगेन की तुम्ही असे करू नका. त्यांना जावेच लागेल आणि आपल्या अहिंसक संघर्षामुळे त्यांना जावे लागणार आहे. इथे लाखो लोकांनी अहिंसक शौर्य दाखवले आहे. तुम्ही युनियन जॅकसमोर शरण गेला नव्हता. तुम्ही तुरुंगवास पत्करला आणि तुमचे

सर्व काही गमावले. या सर्व गोष्टींमुळेच आपण स्वतंत्र होण्याच्या बेतात आहो. परंतु आता आपण स्वातंत्र मिळवण्यासाठीच्या त्या धाडसाबद्दल बोलत नाही. जगात आपली बदनामी व्हावी अशा प्रकारे आज आपण वाहत आहो.

परंतु आपण असे कधीही करता कामा नये. तुम्हाला खरे स्वातंत्र्य तेव्हाच मिळेल जेव्हा तुम्ही कुणालाही मारण्याऐवजी स्वतः मरण पत्कराल.

लॉर्ड माऊंटबॅटन येत आहेत. ते काय आणतात याबद्दल सर्व उत्सुक आहेत. त्यांनी जर हिंदूंना काही दिले तर मुसलमानांनी क्षुब्ध होण्याचे कारण काय? आणि जर त्यांनी मुसलमानांना काही दिले तर हिंदूंनी घाबरण्याचे कारण काय? आपण त्यांच्याकडे डोळे लावून बसू नये आणि दोन जूनची वाट पाहू नये. आपण आपल्या स्वतःकडे पाहावे.

त्यांनी जर आपल्याला काहीही दिले नाही तर म्हातारेकोतारे, मुलेबाळे आणि स्त्रिया यांची कत्तल करण्याइतके आपले भान सुटले पाहिजे काय?

दुसरा प्रश्न आहे अंतरिम सरकारचे सदस्य ब्रिटिशांच्या तालावर का नाचत आहेत? हिंदुस्तानात हिंदू, मुसलमान आणि शीख हेच केवळ तीन समुदाय आहेत काय? पारसी लोकांना सल्लामसलतीत का घेण्यात येत नाही? त्यांच्याजवळ शस्त्रे नाहीत हे त्याचे कारण आहे काय? आणि जर पारशी लोकांना आमंत्रित करायचे असेल तर मग ख्रिश्चनांच्या कोणत्या दोषाकरिता वगळावे? आणि मग ज्यू का नाही? प्रश्न समर्पक आहे. मीसुद्धा या परिस्थितीमुळे व्यथित आहे. कॉंग्रेस सर्वांकरिता आहे. सर्व लोक तिला पाठिंबा देतात. मग तिच्यात धैर्याची उणीव का? ती केवळ हिंदूंकरिता नाही. हे खरे आहे की कॉंग्रेसचे बहुसंख्य लोक हिंदू आहेत, परंतु इतरही कॉंग्रेसचे सदस्य आहेत. हिंदू, शीख आणि मुसलमान यांच्यामध्ये स्वतःहोऊन सहमती होत असेल तर ते पारसी लोकांना चिरडून टाकतील काय? ज्यू आणि इतर लोकांना विनाशाकडे जावे लागेल काय? आणि त्यांच्याशी तडजोड झाल्यानंतर इतरांचे आपण काय करणार आहो? आपण त्यांना टाकून देणार आहोत काय? कॉंग्रेसच्या सुरुवातीच्या काळात आम्ही तिला जो पाठिंबा दिला त्याचे हे फळ आहे काय असे ते विचारतील. व्हाईसराय अंतरिम सरकारच्या काही सदस्यांशीच का चर्चा करतात हे जाणण्याची त्यांची इच्छा असेल. जवाहरलाल फार मोठे माणूस आहेत म्हणून असे होते काय? वा सरदार बार्डोलीचे नायक आहेत म्हणून? राजेंद्र बाबू फार मोठे विद्वान आहेत म्हणून वा राजाजी फार हुशार आहेत म्हणून?

मी तुम्हाला सांगू इच्छितो की कॉंग्रेसमध्ये केवळ हेच लोक नाहीत. तुम्ही सर्व कॉंग्रेसचे आहा. ज्या कोणी कॉंग्रेसला पाठिंबा दिला असेल व तिच्याकरिता काम केले असेल ते सर्व कॉंग्रेसचे

आहेत. जे प्रतिनिधीमंडळात जात नाहीत आणि बोलत नाहीत तेसुद्धा तितकेच कॉंग्रेसचे सदस्य आहेत जितके इतर. जर हे तीन समुदाय इतरांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून काही तडजोड करत असतील तर ती फार दुःखद गोष्ट होईल व त्यांचा शाप आपल्याला लागेल. यामुळे आपण जे काही करू ते सर्व समुदायांच्या समान हिताचे असेल याची आपण काळजी घेतली पाहिजे.

मुसलमानांच्या जेव्हा हे लक्षात येईल तेव्हा सर्व गोष्टी अतीशय सुरळीतपणे पार पडतील. तसे होईल तेव्हा राजकीय उद्दिष्टांच्या प्राप्तीकरिता आम्ही हिंसेचा आधार घेणार नाही या ज्या दस्तावेजावर जिनासाहेबांनी आणि मी सही केली आहे तो दस्तावेज सर्व विवेकी लोक स्वीकारतील.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ९३-७

# २४. प्रार्थना प्रवचन, मे २९, १९४७

नवी दिल्ली,

मे २९, १९४७

बंधूभगिनींनो,

प्रार्थना संपेपर्यंत आणि मला जे काही सांगायचे आहे ते सांगेपर्यंत कृपाकरून शांत राहा. माझी इच्छा आहे की जोपर्यंत मी इथे आहे आणि जिवंत आहे आणि जे लोक इथे भक्तिभावाने आले आहेत त्या सर्व लोकांनी ईश्वराच्या नावाचा जप करावा. जे केवळ तमाशा पाहण्याकरिता आले आहेत त्यांच्याबद्दल आपण चर्चा करण्याचे कारण नाही. यामुळे मी जे काही सांगतो ते मौन राहून ऐका. आज मी तुमच्याशी फार महत्त्वाच्या विषयावर चर्चा करणार आहे. (यानंतर प्रार्थना करण्यात आली व यानंतरचा भाग प्रार्थनेनंतरचा आहे.)

२ जूनला आता क्वचितच वेळ राहिला आहे. येत्या काही दिवसात तुमच्या मनात असलेल्या सर्वाधिक महत्त्वाच्या समस्यांवर मी बोलणार आहे. शांत राहून आणि संयम बाळगून तुम्ही मला आपलेसे करून टाकले आहे आणि असे करून तुमच्याजवळ माझे हृद्गत व्यक्त करणयाकरिता तुम्ही मला भाग पाडत आहा. स्वतःला या देशाचे सुपुत्र समजणारे लोक जर शांतपणे आणि धिराने विचार करतील तर किती बरे होईल? वृत्तपत्रांमधून जाळपोळ, लूट आणि हत्येच्या बातम्या सारख्या येत असताना असे करणे खरोखरच फार कठीण गोष्ट आहे.

२ जून काय आणणार आहे याबद्दल वा परतल्यानंतर लॉर्ड माऊंटबॅटन काय सांगणार आहेत याबद्दल मी मुळीच चिंतित नाही. सरकार काय म्हणेल याबद्दल काळजी करण्याची मला मुळीच सवय नाही. १९१५ साली मी इथे आलो तेव्हापासून माझी हीच पद्धत राहिली आहे.

माझा हिंदुस्तानमध्ये जन्म झाला होता. वयाच्या २२व्या वर्षी मी देश सोडला. जणू मी वनवासात गेलो होतो. वीस वर्षे म्हणजे माझ्या तारुण्यातील सर्वोत्तम काळ दक्षिण आफ्रिकेत घालवल्यानंतर मी घरी परतलो. मध्यंतरीच्या काळात मी कोणतीही संपत्ती गोळा केली नाही. ईश्वराने मला पैशामागे पळण्याकरिता घडवले नाही तर सेवेकरिता हे अगदी सुरुवातीपासून माझ्या लक्षात होते. याशिवाय इतर कशातही मला यश येणार नाही अशी भावना ईश्वराने माझ्या मनात निर्माण केली होती. जे काही आपण मिळवतो ते आपले नसून ईश्वराचे असते असे म्हणणाऱ्या गीतेतून मी सेवेचा

मार्ग शिकलो. मग प्रश्न निर्माण झाला ईश्वराचा साक्षात्कार कसा होईल. माझ्या लक्षात आले की ईश्वर जगातील सर्व मानवप्राण्यांमध्ये वास करतो आणि जो माणसांची सेवा करतो तो ईश्वराची सेवा करतो.

मग आपण ईशोपनिषदातील मंत्राकडे येतो. (श्लोक १) त्यात म्हटलेले आहे ''ईश्वर जगातील प्रत्येक गोष्टीत व्यापलेला आहे''. मी जेव्हा त्रावणकोरमध्ये होतो तेव्हा या मंत्राचा अर्थ दररोज स्पष्ट करून सांगत असे. हा मंत्र पुढे सांगतो ''सर्व काही सोडा आणि तुमचे कर्तव्य करा आणि दुसऱ्याच्या संपत्तीची लालसा धरू नका''.

ही इतकी साधी गोष्ट आहे की एखाद्या मुलालासुद्धा ही समजू शकते. परंतु त्याच्या सखोल अर्थ सहज लक्षात येत नाही. परंतु आपण सगळे वयस्क आहो आणि आपल्याला तो अर्थ कळलाच पाहिजे. यामुळेच त्याच्या या महान गोष्टीबद्दल मी तुमच्याशी बोललो. आपण जर हा अर्थ समजून घेतला तर आपल्याकरिता भांडणासारखे काय राहते?

मी आता तुमच्याशी जे बोललो ती फार मोठी गोष्ट आहे. आता मी मुख्य मुद्द्यावर येतो ज्यासंबंधी आज मला तुमच्याशी बोलायचे आहे. मी आज थोडा त्रास घेतला आहे. इंग्रजीत माझे भाषण लिहून काढण्याकरिता मला वेळ मिळतो काय? आपल्या इंग्रजी वृत्तपत्रांनी माझे भाषण प्रकाशित केलेच पाहिजे. त्यांच्याजवळ अर्थातच बी. ए आणि एम. ए.च्या पदव्या आहेत. परंतु माझ्या हिंदी भाषणाचा अचूक अर्थ अभिव्यक्त करता यावा इतके त्यांना इग्रजी भाषेचे ज्ञान नाही. कारण इंग्रजी त्यांची स्वतःची भाषा नाही. ती त्यांच्याकरिता परकीय भाषा आहे. इथे मात्र मी हिंदुस्तानीत बोलणार आहे कारण ती जवळपास माझी मातृभाषा आहे आणि जवळपास तुम्हा सगळ्यांचीही ती पूर्णपणे मातृभाषा आहे. यामुळे या भाषेत मी जे काही सांगतो ते तुम्हाला अचूक कळते. इथे असलेल्या या बाई (डॉ. सुशिला नाय्यर) माझ्या भाषणांचे इंग्रजीत अनुवाद करतात कारण तिला इंग्रजी बरेच चांगले कळते. तरीही तिच्या अनुवादात काही उणिवा राहून जातात. यामुळेच आज मी थोडा वेळ खर्च केला आणि इंग्रजीत माझे भाषण लिहून काढले. आज मी हे लक्षात ठेवून बोलेन. परंतु वृत्तपत्रे केवळ माझे लिखित भाषण प्रकाशित करतील.

तर आता मी त्या पत्राने सुरुवात करीन ज्या पत्रातून प्रार्थना सुरू ठेवल्याबद्दल मला शिव्या घालण्यात आल्या आहेत. त्याचे म्हणणे आहे की मी खोटारडा आहे आणि मी प्रश्नाचे नीट उत्तर देत नाही. जे अशा गोष्टी लिहितात ते बालीश आहेत. ते वयाने प्रौढ असू शकतील परंतु मानसिक विकासाच्या दृष्टीने ते अजून लहानच आहेत.

त्यांना सर्वाधिक गोष्ट काय बोचत असेल तर ती म्हणजे मी त्यांना प्राण घेण्याऐवजी प्राणार्पण करण्याकरिता सांगतो. त्यांचे म्हणणे आहे की मी हिंदूंना हिंसेचे उत्तर हिंसेने देण्याकरिता सांगावे,

जाळपोळीचे जाळपोळीने. मानवतेचा नियम नाकारून जंगलच्या कायद्याचा पुरस्कार करण्याकरिता सांगण्याचा अपराध माझ्या आयुष्यात मी कधीही करू शकत नाही. जर कोणी मला मारायला आला तर देवा याच्यावर दया कर अशी ईश्वराला प्रार्थना करत मी मरण पत्करेन. या ऐवजी या लोकांचा आग्रह आहे की आधी मी समोरच्याला मारण्याची विनंती करावी आणि नंतर आवश्यकता असली तर तुम्ही मरण पत्करा. ते म्हणत असतात की जर असे बोलण्याची माझी तयारी नसेल तर मी माझे धैर्य माझ्याजवळ ठेवावे आणि जंगलात जाऊन निवृत्त व्हावे. परंतु ते मला हे का सांगतात? मुसलमान लोकांना मारत आहेत म्हणून? यामुळे हिंदूंनीसुद्धा हत्येचा मार्ग अनुसरून स्वतःचा अधःपात घडवून आणला पाहिजे काय? आणि अशा प्रकारे दोन्ही बाजूंनी उन्मादासमोर शरणागती पत्करावी काय? मुसलमान जर चुकीच्या मार्गाने जात असतील तर आपणही जायला पाहिजे काय? त्यांचे म्हणणे आहे की सर्व मुसलमान दुष्ट आहेत, अंतःकरणातून धोकादायक आहेत. त्यांचा असाही दावा आहे की सर्व हिंदू देवदुतासारखे आहेत. परंतु मी असा दावा मान्य करू शकत नाही.

मला एका मुसलमान स्त्रीचे पत्र आले आहे. ती विचारते की मी औझोअबिल्ला उर्दूत का म्हणत नाही. याच्या उत्तरात मी इतकेच सांगू शकतो की मी जर असे केले तर मुसलमान माझ्यावर रागावतील आणि विचारतील की अरबी भाषेतून उर्दूत भाषांतर करण्याचा अधिकार मला कसा मिळतो? ते जेव्हा मला मारहाणीची भाषा करतात तेव्हा मी त्यांना काय सांगू?

सत्य हे आहे की एखादी गोष्ट तिच्या मूळ भाषेत वा ज्यावर अनेक लोकांनी कष्ट घेतलेले असतात त्या भाषेतच गोड वाटते. बिशपने भरपूर मेहनत घेतली आणि इंग्रजीतील बायबलमध्ये तोच गोडवा यावा म्हणून प्रयत्न केले आणि त्यामुळे इंग्रजी बायबल लॅटीन भाषेतील बायबलपेक्षाही गोड झाले. इंग्रजीच्या विद्यार्थ्यांनी बायबलचा अभ्यास केलाच पाहिजे. मी इंग्रजी भाषेचा द्वेष करत नाही. उलट मला तिचे कौतुक वाटते. परंतु चुकीच्या ठिकाणी ठेवल्यामुळे ती अडगळ झाली आहे. यामुळे औझोबिलाहच्या भाषेचा गोडवा हवरण्याची माझी इच्छा नाही. आपल्याजवळ असे कवी नाहीत की जे त्याचा इतक्याच गोड भाषेत अनुवाद करू शकतील.

अहिंसेच्या चिरंतन नियमावर माझा ठाम विश्वास असला तरी आज मी त्याविषयी बोलणार नाही. आवश्यक विचारविनिमय केल्यानंतर संपूर्ण हिंदुस्तानने तो नियम स्वीकारला तर तो जगाचा निर्विवाद नेता बनेल. इथे मात्र मला इतकेच सांगायचे आहे की कोणत्याही माणसाने विवेकाशिवाय इतर कशासमोरही शरण जाऊ नये.

परंतु मला असे दिसते की आपण विवेकाचा पूर्णपणे त्याग केला आहे. विवेकाचा आवाज तेव्हाच बुलंद होऊ शकतो जेव्हा आपल्यामध्ये धैर्य असते. आज जे काही घडते आहे त्यात

विवेकाला कुठेही जागा नाही. त्यात मानवतेला नाकारण्याशिवाय इतर काहीही नाही. आपण जवळपास पशू झालो आहो. हिंदूंनी आज इथे आणि मुसलमानांनी आज तिथे हाहाःक्कार माजवला अशा बातम्या वृत्तपत्रांमधून दररोज येत आहेत. हिंदू आणि मुसलमान हे दोघेही आज स्वैरपणे अधम प्रवृत्तीचे दर्शन घडवत आहेत. या बाबतीत कोण पुढे जातो हे पाहणे व्यर्थ आहे.

गुडगावशेजारच्या जिल्ह्यातील अनेक गाव जाळून टाकण्यात आले असल्याची बातमी आली आहे. या जाळपोळीत दोन समुदायातील कोण जबाबदार आहे हे शोधण्याचा मी प्रयत्न करत आहे. परंतु अचूक माहिती मिळणे कठीण आहे. तुमच्या आजूबाजूला इतके काही घडत असताना तुम्ही भाषणे देत कसे बसू शकता असे लोक मला विचारू शकतात. परंतु जेव्हा तुम्ही लोक इथे आला आहात आणि जेव्हा गुडगावमध्ये इतके काही घडत आहे तेव्हा माझ्या अंतःकरणात काय आहे ते मी तुम्हाला निश्चितच सांगेन. मला तुम्हाला इतकेच सांगायचे आहे की तुमच्या सभोवती जरी आग पेटलेली असेल तरी तुम्ही शांत राहिले पाहिजे - विचलित न होता आपली आगीच्या स्वाधीन होण्याची तयारी असली पाहिजे. घाबरून गल्यामुळे २ जूनला असे आणि असे होणार आहे असे का सांगत फिरावे? जे लोक असे धैर्य ठेवतील त्यांच्याकरिता त्या दिवशी काहीही होणार नाही याबद्दल निखालसपणे खात्री बाळगा. आपल्यापैकी प्रत्येकाला एक दिवस मरायचे आहे. कोणीही अमरपट्टा घेऊन जन्माला आलेला नाही. असे असताना आम्ही धैर्याने मरण पत्करू परंतु शेवटच्या श्वासापर्यंत चुकीचे काम करणार नाही आणि जाणीवपूर्वक आम्ही कोणालाही मारणार नाही असा निर्धार आपण का करू नये? एकदा का तुम्ही असा निर्धार केला की तुम्ही तुमचा मानसिक तोल जाऊ देणार नाही आणि मग तुम्हाला कुणाकडेही पाहण्याची गरज वाटणार नाही. ज्या लोकांना पाकिस्तान धाकदपटशा आणि दहशतीने हवा आहे त्यांना तुम्ही स्पष्टपणे सांगितले पाहिजे की या मार्गाने तुम्हाला एक इंचसुद्धा पाकिस्तान मिळणार नाही. जर तुम्ही न्यायाने वागाल, आम्हाला विवेकाने पटवून द्याल आणि आणि जगाची समजूत पटवून द्याल तर तुम्हाला संपूर्ण हिंदुस्तान मिळू शकेल. परंतु दडपशाहीने तुम्हाला काहीही मिळणार नाही.

आणि मी ब्रिटिशांना काय सांगू शकतो? ते जर कॅबिनेट मिशनच्या प्रस्तावानुसार वागणार नसतील तर तसे करणे विश्वासघाताचे होईल. आम्ही विश्वासघात करणारही नाही ना कोणाला विश्वासघात करू देऊ. आम्हा दोघांनाही १६ मेच्या घोषणेची चिंता आहे. घटना समितीची बैठक १६मेच्या पेपरच्या संदर्भातच होत आहे. (पुढील दोन वाक्ये हरिजनमधून घेतली आहेत.) सत्ता सोपवून निघून जाणे हे ब्रिटिशांचे काम आहे. त्यानंतर घटनेनुसार स्थापित झालेले स्वतंत्र हिंदुस्तानी लोकांचे सरकार काहीही करू शकते - हिंदुस्तान एक ठेवायचे की त्याचे दोन वा अधिक भागात

विभाजन करायचे. त्याच आधारावर आम्ही पुढे जाऊ शकतो. आमच्या राष्ट्रहिताच्या दृष्टीने आधी आम्ही आमच्या देशात शांतता निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जोपर्यंत तुम्ही हा रक्तपिपासू संघर्ष थांबवत नाही तोपर्यंत काहीही होणार नाही असे देशातील प्रक्षुब्ध वर्गाला सांगितले पाहिजे. (हे वाक्य हरिजनमधील आहे.) परंतु आम्ही घाबरून गप्प बसणार नाही. या चार दिवसात आपण जर हा धडा शिकलो असू तर आपण सर्व काही मिळवू. त्यांनी गोळा केलेल्या सर्व शस्त्रांचा त्यांना प्रयोग करू द्या. आपण जर इतक्या शक्तिशाली साम्राज्याविरुद्ध पाय घट्ट रोवून उभे राहू शकलो आणि त्यांच्या शस्त्रांना घाबरलो नाही, आपण जर त्यांच्या ध्वजाला घाबरलो नाही तर आता आपण लटपटण्याचे कारण काय? समोरच्याची शक्ती पाशवी शक्ती आहे असे गहीत धरले व त्यामुळे आपण जर तिच्यासमोर वाकलो नाही तर आपण स्वातंत्र्य गमावू अशा भीतीने अतिशय कठीण परिश्रम करून स्वातंत्र्याच्या या पूर्वसायंकाळी आपण चूक करता कामा नये. तो मार्ग विनाशाकडे नेणारा आहे.

लंडनहून येणाऱ्या तारांचा मी गांभिर्याने विचार करत नाही. संबंधित पक्ष स्वतःहोऊन आपसात तडजोड करून काही बदल करू इच्छित नसतील तर १६ मेच्या वक्तव्यातील शब्द आणि भावना यांच्यापासून ब्रिटन तसूभरही ढळणार नाही या आशेला मी बिलगून आहे. याकरिता त्यांनी भेटायला पाहिजे आणि मान्य होईल असा तोडगा शोधला पाहिजे. ते वक्तव्य कॉंग्रेसने आणि ब्रिटिश सरकारने मान्य केले आहे. या दोघांपैकी कोणीही आपले शब्द फिरवले तर तो विश्वासघात होईल.

लोकांमध्ये काय कुजबुज सुरू आहे ते लोकांना कळले पाहिजे. (हे आणि या आधीच्या परिच्छेदातील शेवटचे दोन वाक्य हरिजनमधून घेतलेले आहेत.) असे म्हणतात की भारतातील ब्रिटिश अधिकारी अप्रामाणिक आहेत. असे म्हणतात की या दंगलींमध्ये त्यांचा हात आहे आणि ते दोन्ही समुदायांना याकरिता हुसकावत असतात. परंतु जोपर्यंत हे गंभीर आरोप निःसंशयपणे सिद्ध होत नाहीत तोपर्यंत आपण ते फेटाळले पाहिजे. खरे म्हणजे आपली इच्छा नसेल तर या दंगली होऊच कशा शकतात असेसुद्धा मी म्हणेन. इथे असलेल्या मुलीशी मी भांडणार नसेन तर तसे करण्याकरिता मला कोण बाध्य करू शकतो?

आणि लॉर्ड माऊंटबॅटन समोरील काम काही सोपे नाही. ते फार मोठे सेनापती आहेत, शूर आहेत. परंतु ते आपले शौर्य इथे दाखवू शकत नाहीत. ते आपल्या सैनिकांसह इथे आलेले नाहीत. ते आपल्या सैनिकी गणवेषात इथे आलेले नाहीत. ते इथे मुलकी अधिकारी म्हणून आलेले आहेत आणि ब्रिटिश सत्तेपासून हिंदुस्तानला स्वतंत्र करण्याकरिता मी इथे आलो असे त्यांचे म्हणणे आहे. आता ते केव्हा आणि कोणत्या पद्धतीने परततात हे आपल्याला पाहायचे आहे. लॉर्ड माऊंटबॅटन

यांना व्हाईसरायच्या कार्यालयाची प्रतिष्ठा वाढवायची आहे. त्यांना आपले बुद्धिकौशल्य आणि खरा मुत्सद्दीपणा सिद्ध करायचा आहे. त्यांनी जर चूक केली वा विलंब लावला तर ती गोष्ट त्यांना शोभणार नाही. यामुळे ईश्वर त्यांना सद्बुद्धी देवो अशी आपण सर्व प्रार्थना करू या. आणि आपण मे १६च्या वक्तव्यात कोणताही बदल लादू शकत नाही हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. याशिवाय वेगळे काही जर ते करतील तर तो विश्वासघात होईल आणि विश्वासघात कोणालाही मदत करू शकत नाही. विश्वासघाताचे कधीही चांगले परिणाम होऊ शकत नाहीत.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ९७-१०३; आणि हरिजन जून ८, १९४७

# २५. प्रार्थना प्रवचन, मे ३०, १९४७

नवी दिल्ली, मे ३० १९४७

बंधूनो आणि भगिनींनो,

कृपाकरून लंडनकडे पाहू नका. व्हाईसरायकडे पाहू नका. असे नाही की ब्रिटनमधील इंग्रज अप्रामाणिक आहेत. त्यांच्यातील बरेचसे लोक सज्जन आहेत. लॉर्ड माऊंटबॅटनसुद्धा सज्जन गृहस्थ आहेत परंतु ते सर्व त्यांच्या ठिकाणी चांगले आहेत. परंतु ते जेव्हा इथे येतात आणि आमच्या कामात हस्तक्षेप करतात तेव्हा ते सर्व अधम होतात. आपले भविष्य ब्रिटिशांच्या संरक्षणावर अवलंबून आहे ही कल्पना आता कालबाह्य झालेली आहे. इंग्रजांना नागरी सेवेत कायम ठेवण्याकरिता आपण कर्तव्यबद्ध नाही. सेवाक्षेत्रात नसलेले लोकही त्यांची इच्छा असल्यास इथे राहू शकतात. त्याचप्रमाणे व्यापाऱ्यांची इच्छा असेल तर तेसुद्धा राहू शकतात. परंतु त्यांच्या रक्षणाकरिता एकही इंग्रज सैनिक ठेवला जाणार नाही. ते इथे केवळ सेवा आणि हिंदुस्तानी लोकांचे प्रेम यांच्या बळावर राहू शकतात. उन्मादावस्थेत कोणी त्यांना दुखापत केली तर आम्ही जबाबदार राहणार नाही. हिंदुस्तानचा अखेरचा निरोप घेण्याकरिता ब्रिटिशांना काही वेळ लागू शकतो. त्यांनी जून ३०, १९४८ ही तारीख लक्ष म्हणून ठरवली आहे. आजपासून तिला बरोबर एक वर्षाचा अवधी आहे.(मुळाप्रमाणे) त्यांना शक्य असेल तर त्यांनी त्या तारखेपूर्वीच जायला पाहिजे. वचनचिठ्ठीचा मान ठेवण्यासारखे हे आहे. वचनचिठ्ठीचे पैसे रविवारी द्यायचे असतील तर ते देणे सोमवारपर्यंत लांबवता येऊ शकत नाही. त्या तारखेनंतर ते एक दिवसही राहू शकत नाहीत. ब्रिटिश जनतेने त्यांना दिलल्या आदेशाचे त्यांनी पालन केले पाहिजे. अखेरीस व्हाईसराय ब्रिटिश जनतेचे सेवक आहेत. त्यांचा काय करण्याचा उद्देश आहे आणि कशा प्रकारे त्यांचा जाण्याचा विचार आहे हे ते २ अथवा ३ जूनला उघड करतील. हे त्यांचे कर्तव्य आहे आणि त्यांनी ते पार पाडलेच पाहिजे. आपण आपल्या कर्तव्याकडे पाहिले पाहिजे.

आणि मग मला प्रश्न पडतो की मी कोण आहे आणि मी कोणाचे प्रतिनिधित्व करतो. अनेक वर्षांपूर्वी (१९३४ साली) मी कॉंग्रेस सोडली होती. परंतु मी कॉंग्रेसचा सेवक आहे. मी अनेक वर्षे तिची सेवा केली आहे आणि अजूनही करत आहे. याचप्रमाणे मी मुस्लिम लीगचाही सेवक आहे आणि संस्थानिकांचाही. मी सर्वांची सेवा करतो परंतु कोणाचेही प्रतिनिधित्व करत नाही. मी कायदे आझमचे प्रतिनिधित्व करतो कारण शांततेकरिता करण्यात आलेल्या आवाहनावर त्यांच्याबरोबर मी सही केलेली आहे. कोणत्याही राजकीय उद्दिष्टाच्या परिपूर्तीकरिता हिंसेचा अवलंब करण्यात येऊ नये

या आवाहनावर आम्ही दोघांनीही सही केलेली आहे. ही फार मोठी गोष्ट आहे. या आवाहनावर इतर लोकांच्यासुद्धा सह्या असायला पाहिजे होत्या. परंतु या आवाहनावर गांधीचीच सही पाहिजे असा जिना साहेबांचा आग्रह होता. अशा प्रकारे मी जिना साहेबांचा प्रतिनिधी झालो. त्यांच्याशिवाय मी कोणाचेही प्रतिनिधित्व करत नाही.

परंतु मी त्या आवाहनावर हिंदू म्हणून सही केलेली नाही. मी हिंदू म्हणून जन्माला आलो होतो यात काही संशय नाही. हे सत्य कोणीही नाकारू शकत नाही. परंतु मी चांगला मुसलमानही आहे कारण मी चांगला हिंदू आहे. याच प्रकारे मी पारसी आणि ख्रिश्चनसुद्धा आहे. सर्व धर्मांच्या मुळाशी एकच ईश्वर आहे. सर्व धर्मग्रंथ हीच गोष्ट सांगतात.

मी कुराण वाचलेले आहे आणि कुराणात धर्मावर श्रद्धा नसलेल्या व्यक्तींना मारून टाकण्याचा आदेश आहे असे जे त्या बाई म्हणाल्या त्या विचारांशी मी सहमत नाही. बादशाह खान आणि अब्दुस समद खान यांच्याशी मी चर्चा केली. त्यांनी कुराणातील आयती अतिशय गोड शब्दांत म्हटल्या. आणि मुसलमानेतरांना मारण्याचा कुराणात आदेश नाही असे मला सांगितले. तुम्ही मुसलमान नाही म्हणून आम्ही तुम्हाला मारून टाकू असे बिहारमधील एकही मुसलमान मला म्हणाला नाही. आणि नोआखालीमधील मौलवीसुद्धा असे सांगत नाहीत. उलटपक्षी त्यांनी ढोलकबरोबर रामधून म्हणायला आम्हाला परवानगी दिली. धर्मावर श्रद्धा नसणारा ईश्वराला उत्तरदायी असेल इतकेच कुराणमध्ये म्हटलेले आहे. परंतु ईश्वर तर प्रत्येकाकडून स्पष्टिकरण मागेल, मुसलमानांकडूनसुद्धा. आणि तो तुम्हाला तुमच्या शब्दांबद्दल नाही तर वर्तनाकरिता स्पष्टीकरण मागेल. परंतु ज्यांना घाण पाहायची सवय असते त्यांना कुठेही घाण दिसत असते. अशी कोणतीच गोष्ट नाही की ज्यात चांगले आणि वाईट यांचे मिश्रण नाही. इतकेच कशाला आपल्या मनूस्मृतीत अस्पृश्याच्या कानात उकळत्या शिशाचा रस ओतावा असे सांगितले आहे! (वेदातील ऋचा ऐकल्या तर त्याची शिक्षा म्हणून.) परंतु धर्मग्रंथांची ही खरी शिकवण नाही असे मी म्हणेन. करुणा हे सर्व धर्माचे मूळ आहे असे जेव्हा तुलसीदास म्हणतात तेव्हा ते सर्व शास्त्रांचे सार सांगतात. कोणताही धर्म कोणालाही कधीही मारायला सांगत नाही. तुलसीदासाच्या खालील दोह्याप्रमाणे आपण वागलो पाहिजे.

*जड चेतन गुन दोषमय, विश्व कीन्ह करतार*

*संत हंस गुन गहहिं पय, परिहरि वारि विकार।*

*(जाणीव असणारे आणि नसणारे, चांगले आणि वाईट ही सर्व ईश्वराची लेकरे आहेत. ज्याप्रमाणे हंसपक्षी दूध पितो आणि पाणी टाकून देतो त्याप्रमाणे ईश्वरी प्रवृत्तीचा माणूस चांगले घेतो आणि वाईट टाकतो.)*

पाकिस्तान मिळवण्याचा हा मार्ग नाही हे आपण मुसलमानांना सांगितले पाहिजे. जोपर्यंत ते जाळपोळ आणि हत्याकांड थांबवत नाहीत तोपर्यंत त्यांना पाकिस्तान मिळू शकत नाही. त्याचप्रमाणे मुसलमानांनी पाकिस्तानच्या मागणीच्या मागे लागू नये असा आग्रह हिंदूनीसुद्धा धरू नये. परंतु माझा प्रश्न आहे - पाकिस्तानच्या नावावर तुम्ही विनाकारण भांडण्याचे कारण काय? अखेरीस पाकिस्तान काही भूतपिशाच्च नाही. खरा पाकिस्तान तो असेल जो प्रत्येक मुलाच्या संरक्षणाची ग्वाही देईल. माणूस कोणत्याही धर्माचा असला आणि त्याची जीवनपद्धती कोणतीही असली व तो ब्राह्मण असला वा बनिया असला वा पंडित असला वा अजून कोणत्याही धर्माचा असला तरी त्याला पाकिस्तान होवो वा हिंदुस्तान असो संरक्षण मिळाले पाहिजे. यामुळे देशातील हिंसक कृत्ये थांबवण्याकरिता जिनासाहेबांना माझ्याबरोबर संपूर्ण देशाचा दौरा करण्याची मी विनंती करतो.

जोपर्यंत या अतिरेकी गोष्टी सुरू आहेत तोपर्यंत पाकिस्तानसंबंधी एकही शब्द ऐकण्याची आमची तयारी नाही हे मी माझे सहकारी जिनासाहेब यांना आणि संपूर्ण जगाला सांगेन. एकदा हे थांबले की आम्ही एका ठिकाणी बसून पाकिस्तान हवा की हिंदुस्तान यासंबंधी चर्चा करू शकतो. भावाभावाप्रमाणे जेव्हा आम्ही बसू तेव्हा आम्ही मिठाई वाटू आणि रोषणाई करू. या मैत्रीपूर्ण वातावरणातूनच पाकिस्तान अस्तित्वात येऊ शकतो आणि केवळ मैत्रीपूर्ण संबंधातूनच भारत तग धरू शकतो. आपण जर भांडण सुरू ठेवले तर हिंदुस्तानचा सर्वनाश होईल.

मागील वर्षाच्या १६ मेच्या वक्तव्याच्या आधारावर तडजोडीची चर्चा होऊ शकते. त्यातील एक स्वल्पविरामसुद्धा काढता येत नाही. जी गोष्ट या वक्तव्याच्या परिक्षेत्राबाहेरील असेल तिच्यात ब्रिटिशांनासुद्धा काहीही करण्याचा अधिकार नाही. आणि त्या वक्तव्याबाहेरील काहीसुद्धा आम्ही मागत नाही. आम्ही स्पष्ट केले पाहिजे की आम्हाला जरी मरण पत्करावे लागले वा संपूर्ण देशाची राख झाली तरीही धाकदपटशाने पाकिस्तान दिला जाणार नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १०३-६

# २६. प्रार्थना प्रवचन, मे ३१, १९४७

नवी दिल्ली,

मे ३१, १९४७

व्यासपीठावर आल्याबरोबर गांधीजींनी लोकांना शांत राहण्याकरिता सांगितले आणि ते म्हणाले की प्रार्थनेत माणसाचे डोळे बंद आणि कान उघडे असले पाहिजे.

इंग्रजांप्रमाणे टोप घातलेले ते गृहस्थ (मूळ स्रोतानुसार त्यांनी कुराण पठनाला विरोध केला होता, परंतु प्रार्थना शांतपणे पार पडली.) जिनांना अटक करण्याची मागणी करत आहेत. त्यांना जिनांना खरोखरच अटक करायची आहे काय? तसे करण्याची तुमच्यात शक्ती असू शकेल. परंतु माझी वागण्याची पद्धत वेगळी आहे. दक्षिण आफ्रिकेतून आल्यापासून मी तुम्हाला माझ्या मार्गाचे प्रशिक्षण देत आहे. या बाबतीत मी इतका मोठा शिक्षक नाही. परंतु वेड्या माणसालासुद्धा आपल्या मनातील बोलण्याचा अधिकार असतो. गेल्या पन्नास वर्षांपासून मी सागतो आहे की आपण आपल्या शत्रूला धरून ठेवले पाहिजे. तुमच्याकरिता जिना शत्रू आहेत. मी तुम्हाला हे सांगितले आहे आणि हे निखालस सत्य आहे की मी त्यांचा प्रतिनिधी आहे. मग मी त्यांना माझा शत्रू कसा समजू शकतो. इतकेच नाही तर ब्रिटिश माझे शत्रू झाले असले तरी मी त्यांचा शत्रू झालो नाही. मी त्यांचा मित्र झालो, त्यांचा प्रतिनिधी झालो आणि मी त्यांना अशा गोष्टी सांगितल्या की ज्या त्यांच्या स्वतःच्या हिताच्या होत्या.

शत्रूला धरून ठेवण्याचे दोन मार्ग आहेत. एक मार्ग बळजबरीचा आहे आणि दुसरा मार्ग प्रेमाचा आहे. मी तुम्हाला प्रेमाने धरून ठेवले आहे. मी जेव्हा तुम्हाला शांत राहण्याकरिता सांगतो तेव्हा तुम्ही शांत राहता. तुम्हाला माहीत आहे की मी धरून ठेवणे हा शब्द विनोदात वापरला होता. परंतु तुम्ही तो योग्य अर्थाने घेतला असावा. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की काही वेळा जिनासाहेबांना पकडून ठेवण्यात आपल्याला निश्चितच यश मिळाले होते यात काही संशय नाही. पोलीस त्यांना अटक करतील असे तुम्हाला वाटते काय? पोलीस असे करू शकत नाही. पोलीस मला अटक करू शकत नाहीत आणि खान साहेबांनाही. ब्रिटिश अधिकारी मात्र त्यांना हवे तेव्हा अटक करू शकतात. परंतु जिनासाहेबसुद्धा अटक चुकवणार नाहीत. परंतु खरी अटक त्यांना तेव्हाच करता येईल जेव्हा मी त्यांना इथे आणून तुमच्यासमोर उभा करीन.

मीर आलम नावाचा एक माणूस होता. तो बादशाह खान यांच्या भूमीतील म्हणजे सरहद्द प्रांतातील होता. बादशाह खानच पहाडासारखे उंच आहेत आणि तो तर त्यांच्यापेक्षाही उंच होता. तो एके काळी माझा मित्र होता. परंतु पठाण लोक अतिशय साधेसरळ असतात. त्यामुळेच ते बादशाह असतात, अमीर असतात. कोणी तरी त्याला सांगितले की या माणसाने, गांधीने जनरल स्मट्सकडून १५,००० पौंड घेतले आणि त्याने हिंदुस्तानी देशबांधवांचा विश्वासघात केला. इतके पुरेसे होते. एक दिवस मीर आलम शत्रुत्व धारण करून माझ्यासमोर आला. त्याने आपल्याबरोबर मोठा सोटा आणलेला होता. त्याने त्या सोट्याने सरळ माझ्या मानेवर तडाखा दिला. मी बाजूच्या पादपथावर पडलो आणि माझे दात तुटले. ईश्वरेच्छेने मी वाचलो. तिथून जात असलेल्या काही इंग्रजांनी मीर आलमला पकडले. परंतु मी त्याला सोडवले. मी त्या इंग्रजाना सांगितले की मी पैशाला बळी पडलो अशा अफवेवर त्याचा विश्वास बसला होता आणि त्यामुळे या प्रामाणिक पठाणाचे रक्त खवळले यात काही आश्चर्य नाही. यामुळेच तो मला मारायला आला. तर अशा प्रकारे मी मीर आलमला मी धरून ठेवले. तो माझा कायमचा मित्र झाला.

ईश्वराची इच्छा असली तर एक दिवस जिना साहेबसुद्धा येतील आणि इथे बसून म्हणतील की मी तुमचा शत्रू नाही आणि कधीही नव्हतो. ते म्हणतील की मी पाकिस्तान मागतो परंतु माझे पाकिस्तान एक महान गोष्ट असेल आणि ते प्रत्येकाच्या हिताचे असेल. मग आपण सर्व गोळा होऊ, मिठाई वाटू आणि रोषणाई करू.

मी हे घाबरून वा खुशामत करण्याकरिता म्हणत नाही. मी शूर आहे असल्यामुळेच असे म्हणतो आहे. एक शीख जसा सव्वा लाखांबरोबरीचा असतो तसेच आपण शिखांप्रमाणे शूर असलो पाहिजे. एक शीख सव्वालाखांच्या बरोबरीचा कसा होतो हे मी तुम्हाला आधीच समजावून सांगितले आहे. असे त्याच्याजवळ सदैव असलेल्या किरपाणमुळे होत नाही. त्याच्याजवळ जी किरपाण असते ती तो तलवारीला कधीही घाबरत नाही हे दाखवण्याकरिता. त्याच्यावर हल्ला करण्याकरिता एक माणूस येवो की सव्वा लाख येवो तो कधीही आपला हात उचलणार नाही. जो माणूस अशा प्रकारे मरू शकतो तो भित्रा आहे असे कोण म्हणू शकेल. कोणीही त्याला खरा धैर्यशाली माणूस म्हणेल.

मी काल म्हणालो होतो की संपूर्ण भारताची जरी राखरांगोळी झाली तरी धाकदपटशाने आम्ही पाकिस्तान होऊ देणार नाही. परंतु त्यांनी जर विवेकाने आमच्या अंतःकरणाला प्रभावित केले आणि आमची समजूत घातली आणि त्यांच्या मनात कोणतीही दुर्भावना नाही अशी जर त्यांनी आमची खात्री पटवून दिली तर आम्ही त्यांची पाकिस्तानची मागणी मान्य करू. परंतु याकरिता पाकिस्तानमधील मुसलमानांना कोणीही घाबरण्याचे कारण नाही असा आत्मविश्वास आमच्या मनात

तुम्हाला निर्माण करावा लागेल. ईश्वराला साक्ष ठेवून जेव्हा तुम्ही असे घोषित कराल तेव्हा राजकीय हेतूंच्या परिपूर्तीकरिता कुठेही हिंसा होणार नाही. मग पाकिस्तान मिळवण्याकरिता हिंसेचा आधार कसा घेऊ शकाल?

हिंदुस्तानमध्ये आम्हाला ना तर बिर्ला हवे आहेत ना भोपाळच्या नबाबांचे राज्य हवे आहे. बिर्लांचे म्हणणे आहे की त्यांना सत्तेची आकांक्षा नाही. भोपाळचे नबाबसुद्धा स्वतःला त्यांच्या लोकांचे मित्र समजतात. आपल्या प्रजेच्या विरोधात जाऊन त्यांनाही सत्ता नको आहे. मग सत्तेची सुत्रे कुणाकडे जातील? ती तुमच्या हातात येतील. केवळ तुमच्याच हातात नाही तर गरिबांच्या हातात.

देशात अनेक बिर्ला आहेत. त्यांची कोणती सत्ता आहे? त्यांना त्यांचे काम मजुरांकडून करून घ्यावे लागते आणि ते जेव्हा मजुरांना त्या कामाचे पैसे देतात तेव्हाच ते ते काम करवून घेऊ शकतात. कामगार जेव्हा काम करण्याकरिता नकार देतो तेव्हा श्रीमंतांचे कोट्यवधी रुपये अडकून पडतील. या श्रीमंतांकडे जर जमीन असेल तर ते स्वतः त्या जमिनीची लागवड करणार नाहीत. त्यांची जमीन नांगरणारा जर त्यांना कोणी भेटला नाही तर त्यांच्या जमिनीचे मोठमोठे पट्टे निरुपयोगी होऊन पडून राहतील. त्याचप्रमाणे भोपाळच्या नबाबांच्या सर्व तलवारी, भाले आणि घोडेस्वार निरुपयोगी ठरणार आहेत. अखेरीस किती लोकांना ते मारून टाकू शकतील? आपल्याच प्रजेला मारून टाकल्यानंतर ते कुणावर सत्ता चालवणार आहेत? ते आपल्या प्रजेचे विश्वस्त बनूनच प्रजेवर शासन करू शकतात.

असे असूनही जर कोणी म्हणेल की भोपाळचे नबाब मुसलमान असल्यामुळे भोपाळ मुसलमानांचा प्रदेश असला पाहिजे आणि काश्मीरमध्ये मूठभर ब्राह्मणानी आपल्या हातात सत्ता ठेवावी तर हे आम्हाला मान्य होणार नाही.

हैद्राबादच्या निझामचे प्रकरण घ्या. असे म्हणतात की संधी मिळताच ते संपूर्ण हिंदुस्तान आपल्या सत्तेखाली आणण्याचा प्रयत्न करतील. परंतु हे नेमके कोण करणार? त्यांची प्रजा हिंदू आहे.

ब्रिटिश जर असे समजत असतील की हिंदुस्तान सोडल्यानंतर आपल्याला हैद्राबाद, भोपाळ, राजकोट वा इतर ठिकाणी स्थान मिळेल तर तो विश्वासघात होईल. परंतु माझे असे कोणतेही मत झालेले नाही. माझा विश्वास आहे की हिंदुस्तान सोडण्याचा ब्रिटिशांचा हेतू पूर्णपणे प्रामाणिकपणाचा आहे.आता ते हिंदुस्तान सोडत आहेत आणि त्याचबरोबर त्याच्या साम्राज्याचाही अंत होत आहे. काही पावलं इकडे आणि काही तिकडे असे करून काम कसे भागणार आहे? आणि जेव्हा ब्रिटिश जातील तेव्हा संस्थानिकांना त्यांच्या प्रजेचाच आधार असेल.

एकदा मालवीयजी मुंबईला चालले होते. मी त्याच्याबरोबर होतो. आम्ही दोघेही तिथे काही महाराजांकडे गेलो आणि त्यांना भेटलो. त्यांनी आम्हाला उच्चासनावर बसवले आणि ते स्वतः आमच्या पायाजवळ बसले. ब्रिटिश सत्ता शिखरावर असतानाचे ते दिवस होते. आता जेव्हा साम्राज्याची सत्ता निघून जात आहे तेव्हा आपण आपल्या प्रजेचे जर ऐकू तरच आपण आपले पद धारण करू शकू हे त्यांच्या ताबडतोब लक्षात येईल. प्रजेचे ऐकण्याचा एकमेव मार्ग घटनासमितीत येण्याचा आहे. ते जर दुराग्रही भूमिका घेतील व घटनासमितीत येण्याला नकार देतील तर ते सत्तवर राहू शकणार नाही.

मी सर्व हिंदूंना मारून टाकीन असे हिंदुस्तानातील कोणताही मुसलमान संस्थानिक म्हणू शकत नाही. जर कोणी असे म्हणेल तर इतक्या सर्व काळ तुम्ही तुमच्या प्रजेचे संरक्षक का होता, प्रजेच्या अन्नावर का जगत होता असे मी त्यांना विचारेन. याचप्रमाणे एखादा संस्थानिक केवळ मुसलमान आहे म्हणून मी पाकिस्तानमध्ये सामील होतो असे म्हणू शकत नाही. हिंदू संस्थानिक केवळ हिंदू आहे म्हणून  मी कॉंग्रेसबरोबर आहे असे म्हणू शकत नाही. यांपैकी कोणालाही जनतेच्या इच्छेचा आदर करावा लागेल.

आंध्रमधील जो हरिजन तरुण चक्रैय्या आश्रमात राहण्याकरिता आला होता त्याच्या मृत्यूची बातमी अखेरीस गांधीजींनी घोषित केली

तो सेवाग्राम आश्रमात राहत होता. नयी तालीममध्ये तो प्रशिक्षित झाला होता. तो मेहनती कारागीर होता. त्याच्यात खोटेपणा, भ्रष्टाचार आणि क्रोध यांसारखे विकार नव्हते. दुर्दैवाने त्याच्या मेंदूत गाठ झाली. त्याचा निसर्गोपचारावर विश्वास होता परंतु त्याच्या मित्रांचा आग्रह शल्यचिकित्सकाद्वारे त्याची शस्त्रक्रिया व्हावी अशी होती. रोगाचा परिणाम त्याच्या डोळ्यावर झाला होता. असे असूनही मोठ्या प्रयत्नाने शस्त्रक्रिया सुरू होण्यापूर्वी त्यांने मला पत्र लिहिले. त्यात तो म्हणाला की मला जरी निसर्गोपचार पसंत असला तरी मी शस्त्रक्रियेकरिता जात आहे आणि या प्रक्रियेत जर मला मरण आले तर मी रामनाम घेत मरेन. अखेरीस बॉम्बे हॉस्पिटलमध्ये तो शस्त्रक्रियेच्या टेबलवर मेला.

त्याच्या मृत्यूवर मला रडावेसे वाटते, परंतु मी रडू शकत नाही. कोणाकरिता मी रडावे आणि कोणाकरिता रडण्याचे टाळावे? हिंदमातेला जर एखादा पुत्र असेल तर तो तुलसीदास म्हणाल्याप्रमाणे उदार आणि शूर असावा. चक्रैय्या उदार होता कारण तो निस्वार्थ कार्यकर्ता होता व नेहमी समाधानी राहायचा. आणि तो शूर होता कारण त्याने मृत्यूचे स्वागत केले होते. तो हरिजन होता परंतु हरिजन

आणि सवर्ण, तसेच हिंदू आणि मुसलमान यांच्यातील भेद त्याला माहीत नव्हता. तो सर्वांना माणूस समजत होता आणि तो स्वतःही फार चांगला माणूस होता.

आज मी एका श्वासात भोपाळचे नबाब आणि चक्रैय्याबद्दल बोललो. हिंदुस्तानात या दोघांकरिताही स्थान आहे. भोपाळचे नबाब त्यांच्या प्रजेचे विश्वस्त होवो. आणि आपल्या तरुण वर्गामध्ये करोडो चक्रैय्या निर्माण होवो. तसे झाले तरच हिंदुस्तान शांततेत आणि समाधानात राहू शकेल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १०५ - ११

# २७. प्रार्थना प्रवचन, जून १, १९४७

नवी दिल्ली. जून १, १९४७

*प्रार्थनेमध्ये कुराणमधील पाठ म्हणायला आज एका ब्राह्मणाने आक्षेप घेतला परंतु प्रार्थना सुरू राहिली. दोन सशस्त्र लोकांनी त्याचे हात धरून त्याला बाहेर नेले, त्याला बसवले आणि त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. यामुळे थोडा गोंधळ झाला. त्याला पकडून नेण्याकरिता जेव्हा पोलीस आले तेव्हा गांधीजी म्हणाले -*

कॉन्सटेबल यांना कृपाकरून नेऊ नका. ते जिथे आहेत तिथे त्यांना बसू द्या. ते अजून गोंधळ करणार नाही केवळ इतकीच काळजी घ्या. कुराणचा पाठ म्हणून झाला आहे. या सद्गृहस्थानी म्हणू दिले तर आपण काही भजन म्हणू या.

*या वेळी तो ब्राह्मण सद्गृहस्थ भुवया उंचावून म्हणाला हे पाहा या झटापटीत मला हे वरखडे उमटले. ही तुमची अहिंसा आहे काय?*

त्या रक्ताचे राहू दया. मी प्रार्थना सुरू ठेवावी की नाही ते सांगा. तुम्ही होय म्हणालात तर आज भजन होतील. तुम्ही कबूल केले नाही तर भजन होणार नाहीत.

त्या सद्गृस्थानी भजन ऐकण्याला आनंदाने मान्यता दिली.

हिंदुस्तान काही केवळ तुमचा नाही. मी हिंदूसुद्धा आहे आणि तोही परिपूर्ण सनातनी. आता आम्ही केवळ गीता का वाचावी? आम्ही कुराणसुद्धा का वाचू नये? जिथे कुठे सापडतील तिथून आपण मोती गोळा केले पाहिजे. आता आपल्या हाती सत्ता येण्याच्या बेतात आहे. ती आपल्या हाती सोपवण्याकरिता व्हाईसराय उतावीळ झालेले आहेत. अशा वेळी भांडत बसून तुम्ही तुमचा दोष दाखवून देणार आहात काय? सौजन्यशील राहायला तुम्ही शिकला पाहिजे. तुम्ही बादशाह खानपासून सौजन्य शिकू शकता. आज त्यांना प्रार्थनेकरिता आणायला जेव्हा मनू गेली तेव्हा ते म्हणाले की माझ्या उपस्थितीने काही हिंदू दुखावले जाऊ शकतील. यामुळे मी दूरच राहतो. तेव्हा मी त्यांना निरोप पाठवला आणि सांगितले की तुम्ही तर धिप्पाड पठाण आहा आणि मी साधा बनिया. आणि मी जर घाबरत नाही तर मग तुम्ही घाबण्याचे कारण काय? आणि इथे आल्यानंतरही ते एखाद्या गरीब कोकराप्रमाणे बसले आहेत. यांच्यासारखा सद्वर्तनी कोण असेल? कुराणात अनुदारपणाच्या काही गोष्टी आहेत हे मान्य. परंतु असा एकही ग्रंथ आहे काय की ज्यात अशा गोष्टी नाहीत? मी अनेक मुसलमान मित्रांमध्ये राहिलो आहे. मी मुसलमान नसल्यामुळे मी अवांछनीय

माणूस आहे असे मला कोणीही म्हणाले नाही. एका मुसलमान मित्राचा (उमर झवेरी, दक्षिण आफ्रिकेतील व्यावसायिक), जो आज वारलेला आहे, जवाहराचा व्यवसाय होता आणि तोही एखाद्या हिऱ्यासारखाच होता. त्याने मला मुसलमानांपासून सावध राहण्याकरिता बाजावले होते. त्याचे म्हणणे होते की सर्व मुसलमान देवदूत नाहीत. परंतु मी त्याला सांगितले की तुम्ही याची काळी बाजू पाहत आहा. असे मित्र भेटल्यामुळे मला आनंद होतो. आणि तो एकटाच नव्हता. मी तुम्हाला अजून अशी काही नावे देऊ शकतो. त्यातील एकाला तर मी माझा मुलगा मानले होते. तो लोकांची सेवा करण्याकरिता नेहमी तत्पर असायचा. परंतु ईश्वराने त्याला नेले. अशा प्रकारचे अतिशय चांगले लोक मुसलमानांत आढळत असताना केवळ काही थोडेसे मुसलमान गैरवर्तन करतात म्हणून हिंदूंनी आपणे भान हरवू नये असे मी म्हणेन. शस्त्रांच्या बळावर ब्रिटिशांनी आपल्यावर नियंत्रण ठेवले. आता ते जात असल्यामुळे आपण भांडण्याकरिता सुरुवात केली पाहिजे काय? हे आपल्याला निश्चितच शोभत नाही.

*भजन आणि रामधून व्यवस्थितपणे पार पडल्यानंतर शांत राहिल्याबद्दल गांधीजींनी लोकांची आणि त्या सद्गृहस्थांची प्रशंसा केली.*

लोक जर थोड्या समजूतदारपणाने वागतील तर स्वातंत्र्य जवळपास तुमच्या हातात असेल कारण नवीन सरकारचे जवाहरलाल उपाध्यक्ष आहेत. हे खरे आहे की सरकारचे प्रमुख व्हाईसराय आहेत परंतु आता त्यांना निष्क्रिय राहावे लागेल. तुमचा खरा राजा जवाहरलाल आहे. तो असा राजा आहे की ज्याला केवळ हिंदुस्तानचीच नाही तर हिंदुस्तानच्या माध्यमातून संपूर्ण जगाची सेवा करायची आहे. ते जगातील सर्व लोकांशी परिचित आहेत आणि सर्व देशांमधील मुत्सद्द्यांशी व्यवहार करण्याची त्यांना सवय आहे. परंतु ते हे एकट्याने किती दिवस करतील? हा अनभिषिक्त सम्राट तुमच्या सेवेकरिता हजर आहे. त्याने गोळीबार करून तुमच्या दंगली थांबवल्या पाहिजे काय? आज जर त्याने एका व्यक्तीला धाकदपटशा करून गप्प बसवले तर उद्या त्याला दुसऱ्याशीही असेच वागावे लागेल. आणि मग ते स्वराज स्वराज तर असणारच नाही पण पंचायत राजही असणार नाही. तुम्ही जेव्हा शिस्त पाळाल तेव्हाच जवाहरलाल आपले नेतृत्व करू शकेल व आपले स्वातंत्र्य सुरक्षित राहील.

जवाहरलाल कशा प्रकारे शिस्तीचे पालन करतात ते त्यांच्याच उदाहरणातून पाहा. मागील वर्षी ते जेव्हा काश्मीरला गेले होते तेव्हा लॉर्ड वेव्हेल यांची त्यांना भेटण्याची इच्छा होती. मौलाना साहेबांना त्यांना बोलावण्याची इच्छा होती. मी जेव्हा त्यांची समजूत घातली तेव्हा त्यांनी कॉंग्रेसच्या

अध्यक्षांच्या आदेशाचे पालन केले आणि तेथील समस्या तशीच राहू दिली. (पाहा प्रार्थना प्रवचन, जून २२, १९४६)

आजही जवाहरलालचे मन काश्मीरमध्ये घोटाळत आहे. तिथे विरोधी पक्षाचे नेते शेख अब्दुल्ला (काश्मीर नॅशनल कॉन्फरन्स ही राष्ट्रवादी संघटना लोकशाही व्यवस्थेकरिता संघर्ष करत होती व महाराजांचा त्याला विरोध होता.) यांना तुरुंगात डांबण्यात आले आहे. मी जवाहरलालना सांगितले की तुमची इथे जास्त गरज आहे. आवश्यकता पडली तर तुमच्याऐवजी मी काश्मीरमध्ये जाईन आणि तुम्ही इथे राहा. मी त्यांना सांगितले की बिहारमध्ये आणि नोआखालीमध्ये करा वा मराकरिता जरी मी वचनबद्ध असलो तरी मी काश्मीरमध्ये जाऊ शकतो कारण तिथेसुद्धा मुसलमानांचा संबंध आहे. मी तिथे जाऊन काश्मीरच्या महाराजांशी मैत्री करीन आणि मुसलमानांच्या हितास्तव काम करीन. परंतु जवाहरलालना अजून हे मान्य नाही. थोडक्यात आता ज्याअर्थी आपल्याला स्वराज्य मिळालेले आहे त्याअर्थी आपल्यापैकी प्रत्येकाने शिस्तीने, नम्रतेने आणि समजूतदारपणाने वागायला पाहिजे. तेव्हाच भारत आपल्या स्वातंत्र्याकरिता पात्र ठरेल.

काल मी तुमच्याशी संस्थानिकांबद्दल बोललो होतो. त्याचप्रमाणे आज मला तुमच्याशी व्यापारी समुदायाबद्दल बोलायचे आहे. काल मी तुम्हाला सांगितले होते की हिंदुस्तानवर बिर्ला राज्य करणार नाहीत आणि ना भोपाळचे नबाब, ना निझाम, ना काश्मीरचे महाराज. संस्थानिक केवळ हिंदुस्तानचे सेवक राहतील.

हिंदुस्तानातील एका ठिकाणचे लोक स्वतंत्र होतील आणि दुसऱ्या ठिकाणचे गुलामगिरीत राहतील असे होऊ शकत नाही.स्वातंत्र्य जेव्हा येईल तेव्हा ते सर्वांकरिता येईल.

आता स्वातंत्र्य निश्चितपणे येत आहे. कारण ब्रिटिश जर प्रामाणिक असतील, आणि ते तसे आहेत असे माझे मत आहे, तर त्यांनी जायलाच पाहिजे. व्हाईसराय माऊंटबॅटनचे म्हणणे आहे की शक्य तितक्या लवकर त्यांना जायचे आहे. आणि ते आपल्या शब्दांवर कायम राहतील.

ब्रिटिश जेव्हा जातील तेव्हा आपण या देशाचे सत्ताधारी होणार आहो काय? आणि आपण जेव्हा हिंदुस्तानचे सत्ताधारी होऊ तेव्हा आपण आपसात भांडत राहणार आहो काय? त्या वेळी संस्थानिक आपल्या पाठीवर बसून राहणार आहेत काय? नाही, ते जनतेचे विश्वस्त होणार आहेत. वेगळ्या शब्दांत ते चक्रैय्यासारखे समाजसेवक असतील. तसे झाले तरच ते शासक होऊ शकतील.

अशाच प्रकारे व्यापारी समुदायाचेसुद्धा आपल्यावर शासन असू नये. आम्हाला भंग्याचे शासन हवे आहे. भंगी सर्वात श्रेष्ठ आहेत कारण ते करत असलेली सेवा सर्वोच्च आहे. यामुळेच मी

स्वतःहोऊन भंग्याचे काम स्वीकारले. भंग्यांचे शासन आले तर म्हणजे तुमचा एक मंत्री भंगी झाला तर तुम्हाला त्याच्या शब्दाला तसाच मान द्यावा लागेल जसा मान ब्रिटिश आपल्या सतरा वर्षाची राणी व्हिक्टोरियाच्या शब्दाला देतात आणि लहान, मोठा सर्व आपापले कर्तव्य पार पाडतात. ब्रिटिश आपले कर्तव्य कसे पार पाडतात हे मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे.

मी अनेकदा लंडनला गेलो आहे. एका प्रसंगी मी तिथे तीन वर्षी राहिलो. परंतु त्यावेळी मी केवळ मुलगा होता. त्यानंतर दोन की तीनदा मी लंडनला गेलो आहे. तिथे लोक कायद्याचे इतके काटोरपणे पालन करतात की पोलिसांना कधीही गोळीबार करावा लागत नाही. त्यांच्या हातात केवळ दंडुका असतो. पोलीस आपले सेवक आहेत हे लोकांना माहीत असते. यामुळे ते पोलिसांच्या सूचना पाळतात. पोलीससुद्धा लोकांना जास्तीत जास्त मदत करतात. तिथे लाचलुचपतीने काम करून घेत नाहीत. पोलिसांना लाच दिली तरी ते ती घेत नाहीत.

आपल्या भारतीय पोलिसांनीसुद्धा आता हा कित्ता गिरवला पाहिजे. त्यांनी मुळीच लाच घ्यायला नको. त्यांना जर उदरनिर्वाहाकरिता पुरेसे मिळत नसेल तर जास्त पगाराकरिता ते सरदारला सांगू शकतात. ते बलदेव सिंगकडे (अंतरिम सरकारचे संरक्षण मंत्री) जाऊ शकतात. त्यांनी नेहरूजींकडे जावे. मोठ्या अधिकाऱ्यांना आणि मंत्र्यांना जर हजारो रुपये मिळतात तर पोलिसांना अगदी अत्यल्प पगार का मिळावा? हे लोक त्याबद्दल काही तरी करतील.परंतु पोलिसांनी लाच घेणे बंद केलेच पाहिजे.

व्यापाऱ्यांबद्दलसुद्धा मला काही सांगायचे आहे. त्यांनी सर्वांनी एकत्र आले पाहिजे आणि एका आवाजात घोषित केले पाहिजे की आम्हा सर्वांना खरा बनिया आणि खरा मारवाडी व्हायचे आहे. खरा बनिया तो असतो जो वस्तूचे वजनमाप बरोबर करतो. सर्व बनिया, सर्व मारवाडी आणि सर्व व्यापाऱ्यांनी एकत्र आले पाहिजे आणि काळाबाजार करायचा नाही आणि लाच द्यायची वा घ्यायची नाही असे ठरवले पाहिजे.

ते जर इतके करू शकत असतील तर लोकांना अन्नधान्य पुरवण्याची राजेंद्र बाबूंची (राजेंद्र प्रसाद, अन्न आणि कृषीमंत्री) असहायता दूर होईल. मला एक पत्र मिळाले आहे. त्यात लिहिले आहे की मिठावरील कर जरी मी रद्द करायला लावला तरी आता मीठ पूर्वीपेक्षाही महाग आहे. हे कसे शक्य आहे? मिठावर कर रद्द झाल्यानंतर मीठ जवळपास मोफत मिळेल असे मी म्हणालो होतो. व्यापाऱ्यांनी हिंदुस्तानकरिता व्यापार केला पाहिजे, स्वतःकरिता नाही. त्यांनी काळाबाजार पूर्णपणे विसरायला पाहिजे. असे होईल तेव्हाच अंतरिम सरकारच्या मंत्र्यांना आपले काम करता येईल आणि राजाजी, राजेंद्र बाबू, जवाहरलालजी, मथाई (जॉन मथाई, अंरिम सरकारमधील रेल्वे आणि

दळणवळण मंत्री), भाभा (सी. एच. भाभा, मंत्री अंतरिम सरकार, बांधकाम, खाण, विद्युत खाते) आणि लीगच्या सर्व चार मंत्र्यांना (१. लियाकत अली खान अर्थमंत्री, २. आय. आय, चुंदर वाणिज्यमंत्री, ३. अब्दुल रब निश्तर दळवळण, पोस्ट आणि तार, ४. गझनफर अली खान आरोग्य) तुमची सर्व प्रकारे सेवा करता येईल. यानंतरही हिंदुस्तानला पुरेसे अन्नवस्त्र मिळत नसेल आणि देशाची प्रगती होत नसेल तर तुम्ही त्यांना त्यांच्या पदावरून हटवू शकता.

परंतु तुम्ही त्यांना कसे काढाल? व्हाईसरायच्या आदेशाने तुम्ही त्यांना काढाल काय? नाही, तुम्ही व्हाईसरायना सांगाल की याबद्दल तुम्ही चिंता करू नका. मी जिनांना कसे 'धरून' ठेवीन हे काल मी सांगितले त्याप्रमाणे तुम्ही मंत्र्यासा 'धरून' ठेवाल. मग तुम्ही तुमच्या इच्छेप्रमाणे त्यांना काम करायला लावू शकाल. जवाहरलालकडून मला कळले की लंडनमध्ये लोकांची उपासमार होत आहे. मला हे ऐकून वाईट वाटले. आपल्या बाबतीत ब्रिटिशांनी कितीही मोठी चूक केलेली असली तरी त्यांना खाण्याकरिता निश्चितच मिळायला पाहिजे. आपला देश विशाल आहे. आपले व्यापारी नीट वागले तर आणि ते समजूतदार असले तर आपण म्हणू शकतो की जोपर्यंत हिंदुस्तान जिवंत आहे तोपर्यंत जग उपाशी राहू शकत नाही. आपण जगाला अन्न पुरवू. मी बनिया आहे व्यापाराबद्दल मला थोडेबहुत कळते. सर्व बनिया आणि व्यापारी जर माझ्याशी आणि अंतरिम सरकारशी सहकार्य करतील, आणि सर्व मुसलमान सहकार्य करतील तर आपण प्रत्येकाला अन्न पुरवू शकतो. आपल्या देशात आपण पुरेसे धान्य पिकवत नाही हे मान्य करायला मी मुळीच तयार नाही. आपण भरपूर परिश्रम केले आणि विवेकाने वागलो आणि ईश्वरी कृपेने पुरेसा पाऊस आला तर आपल्याला भरपूर खायला मिळू शकते. परंतु एका हाताने टाळी वाजवता येऊ शकत नाही. मला जर सर्वांकडून सहकार्य मिळू शकले तरच हे होऊ शकते आणि मग असा काही टाळ्यांचा कडकडाट होईल की तुम्ही सर्व खुष व्हाल आणि संपूर्ण जगही खुष होईल. संशयाला जागा न ठेवता मी तुम्हाला निश्चितपणे सांगतो की जर स्वतंत्र हिंदुस्तानातील प्रत्येकजण आपले कर्तव्य पार पाडील तर संपूर्ण देश सुखी होईल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १११- ६

# २८. प्रार्थना प्रवचन, जून २, १९४७

सोमवार, जून २, १९४७

राजकीय परिप्रेक्षात काय झाले वा काय सुरू आहे ते मी तुम्हाला सांगण्याकरिता असमर्थ आहे. परंतु व्हाईसरायनी इंग्लंडमधून काय आणले याचा सर्वसामान्य माणसाने विचार करू नये हे जे गत तीनचार दिवस मी सांगतो आहे तेच मी आता परत सांगेन. जी कोणती परिस्थिती निर्माण होईल तिच्यात आपले काय कर्तव्य आहे याचाच आपण विचार केला पाहिजे. आणि धाकदपटशाने आम्ही काहीही मान्य करणार नाही ही एक गोष्ट मात्र देशाने स्पष्ट केली पाहिजे.

गेल्या काही दिवसात माझ्या मनात जो विचार विकसित होतो आहे तोच पुढे नेत मी विचारेन की आमचे डॉक्टर आणि वैज्ञानिक देशाकरिता काय करत आहेत. नवीन कल्पना आणि रोगदुरुस्तीचे नवनवीन तंत्रज्ञान शिकण्याकरिता ते विदेशात जाण्याकरिता तत्पर असतात. त्यांनी हिंदुस्तानमधील सात लाख खेड्यांवर लक्ष केंद्रित करावे असे मी त्यांना सुचवीन. तसे केले तर वैद्यकीय क्षेत्रातील सर्व स्त्री-पुरुषांना पाश्चात्य पद्धतीने अर्थातच नाही पण आपल्या भारतीय पद्धतीने इथे भरपूर काम असल्याचे त्यांना आढळून येईल. तसे केले तर त्यांना येथील अनेक औषधोपचाराची माहिती होईल व ते त्या गोष्टींचा उपयोग करू शकतील. इथे हिंदुस्तानात किती तरी औषधी गुण असलेल्या वनस्पती आहेत आणि आपल्या विदेशातून औषधी द्रव्याची आयात करण्याची मुळीच आवश्यकता नाही. परंतु औषधोपचारापेक्षा योग्य पद्धतीने कसे राहावे याचे शिक्षण देऊन त्यांनी लोकांना मदत करावी.

वैज्ञानिकांना मी काय सांगू? ते अधिक धान्य पिकवण्याकडे लक्ष देत आहेत काय? आणि हा प्रयत्न ते कृत्रिम खताच्या आधारे नाही तर योग्य पद्धतीने लागवड आणि सेंद्रिय खतांचा वापर यांच्या आधारे करत आहेत काय? अफलातून वाढत असणाऱ्या आणि नद्यांचा प्रवाह अडवत असणाऱ्या जलपर्णीचा (वाटर हायसिंथ) उपयोग करताना मी नोआखालीत लोकांना पाहिले आहे. आपले वैज्ञानिक तेव्हाच हे करू शकतील जेव्हा ते स्वतःकरता न जगता देशाकरिता जगतील.

जवाहरलाल करत असलेल्या अमूल्य कामाबद्दल मी काल बोलत होतो. मी त्यांचे वर्णन हिंदुस्तानचा अनभिषिक्त राजा असे केले होते. हिंदुस्तानातून इंग्रज जात असताना त्यांची जागा दुसरा कोणीही घेऊ शकत नाही. इंग्रजांशी वाटाघाटी करण्याकरिता जवाहरलालची गरज आहे कारण त्यांचे शिक्षण हॅरो आणि कॅम्ब्रीज इथे झाले आहे आणि ते बॅरिस्टर झाले आहेत. परंतु गणराज्याचा पहिला अध्यक्ष निवडण्याची वेळ वेगात जवळ येत आहे. चक्रैय्या जर जिवंत असता तर त्याच्या नावाचा

प्रस्ताव मी दिला असता. शूर, निस्वार्थी आणि शुद्ध अंतःकरणाची एखादी भंगी मुलगी आपली पहिली अध्यक्ष असावी असे मला अंतःकरणपूर्वक वाटते. हे काही दिवास्वप्न नाही. आपण जर प्रयत्न केला तर अशी मुलगी खरोखर सापडू शकेल. मी मोहम्मद अलींची मुलगी लहानशा गुलनारची निवड केली नव्हती काय? परंतु त्या वेडपटने शोएब कुरेशीशी लग्न केले. एके काळी ती फकिराचे जीवन जगत होती आणि अलीबंधू तुरुगांत होते तेव्हा ती मला भेटली होती. गुलनार आता अनेक हुशार मुलांची आई आहे परंतु आता ती माझा वारसा चालवू शकत नाही.

आपल्या भावी अध्यक्षाला इंग्रजी येण्याची आवश्यकता नसेल. परंतु त्याला अशा अनेक लोकांचे सहाय्य असेल की जे राजकारणात पारंगत असतील आणि ज्यांना विदेशी भाषांचेही ज्ञन असेल.  हे स्वप्न तेव्हाच वास्तवात येऊ शकेल जेव्हा परस्परांना मारण्याऐवजी आपण आपले सर्व लक्ष खेड्यांकडे केंद्रित करू.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ११६-८

# २९. प्रार्थना प्रवचन, जून ३, १९४७

नवी दिल्ली, जून ३, १९४७

आपल्या दृष्टिकोनातून जर लीग स्पृहणीय पद्धतीने वागत नसेल तर लीग स्पृहणीय पद्धतीने वागत नाही असे आपण म्हणू या. याचप्रमाणे कॉंग्रेस जर योग्य पद्धतीने वागत नसेल तर तुम्ही योग्य पद्धतीने वागत नाही असे कॉंग्रेसच्या लोकांनाही आपण म्हणू या. असे केले तरच लोकशाही राज्यपद्धती स्थापित होईल.

रस्त्यावरील माणसाचा आवाजसुद्धा जिथे ऐकला जातो तिथे लोकशाही असते. आपण जेव्हा लोकशाही व्यवस्था लागू करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा व्हाईसराय निवास वा जवाहरलालचे निवास या जागा सरकारी जागा राहत नसतात. जवाहरलाल अनभिषिक्त राजे आहेत असे मी वर्णन केले होते. आणि आपण गरीब राष्ट्र आहो. आपण इतके गरीब आहो की मोटारीत बसण्याऐवजी पायी चालतो. कोणी जर आपल्याला त्याच्या गाडीत बसण्याबद्दल म्हणालाही तर तुमची गाडी राहू द्या, मी आपला पायीच चालेन असे आपण त्याला म्हणू. आपल्याला जर खूप भूक लागलेली असेल तर आपण थोडेसे जास्त खाऊ. अशा प्रकारे लोकशाही म्हणजे रस्त्यावरील माणसाचे राज्य. जो नेहमी मोटारीतून जातो तो बिघडलेला असतो. जो प्रासादात राहतो तो सरकार चालवू शकत नाही. यामुळेच मी म्हणत असतो की ब्रिटिशांनी जरी जागतिक साम्राज्य स्थापन केले तरी ते आपल्याला जे सांगतील ते आपल्याकरिता कल्याणकारक असेलच असे नाही. इतकेच नाही तर हिंदुस्तानचे शासक जरी आपल्याला योग्य वाटत नसलेला विचार करत असतील तरी आपण नाही म्हणायला पाहिजे.

काल मी म्हणालो होतो की काळ्या बाजाराकरिता बनियांना दोष द्यावा लागेल. सामान्य व्यापारी आणि माझ्यात अंतर हे आहे की मी संपूर्ण देशाच्या कल्याणाकरिता काम करतो तर व्यापारी केवळ त्यांची तिजोरी भरतात. राजेंद्र बाबूंप्रमाणेच मलासुद्धा संपूर्ण देशाला अन्न पुरवण्याच्या प्रश्नाची काळजी वाटते.

मला सांगण्यात आले की आजकाल बनियांच्या हाती फारसा व्यापार राहिलेला नाही. फार कमी असे व्यापारी आहेत की जे काळाबाजार करतात आणि या सर्व गोष्टींचे नियोजन सरकार करत असल्यामुळे या गोंधळाकरिता शासकीय विभाग जबाबदार आहेत. सर्वांना अन्न पुरवणे बिहारचे राजे असलेल्या राजेंद्र बाबूंवर अवलंबून आहे. आणि हे कापड पुरवणे राजाजींच्या हाती आहे कारण ते मद्रासमधील लोकप्रिय मंत्री आहेत. अजूनही लोकांपर्यंत या गोष्टी पोहोचत नाहीत कारण देशातील

नागरी सेवेच्या लोकांमध्ये भ्रष्टाचार माजलेला आहे. राजेंद्र बाबू आणि राजाजींना जर अधम प्रवृत्तीच्या लोकांनी घेरलेले असेल, व त्यांच्यावर ते नियंत्रण ठेवू शकत नसतील तर या अध:पाताकरिता तेसुद्धा जबाबदार आहेत असे म्हणावे लागेल.

सरकारी नोकरांचे असे चित्र उभे करणे कितपत योग्य आहे हे मला माहीत नाही. परंतु मी इतके मात्र नक्कीच म्हणेन की आपल्यापैकी कोणीही काळ्या बाजाराला बळी पडू नये. काही सरकारी अधिकारी जर आपल्या जवळच्या लोकांना मिळायला पाहिजे त्यापेक्षा दुप्पट वा तिप्पट रेशनकार्ड देत असतील तर असे रेशन कार्ड देणारे आणि ते घेणारे असे दोघेही अपराधी असतील. शक्य आहे की सध्या या गोष्टी सुरू राहतील कारण अजून लोकांच्या मनात ब्रिटिश सरकारची धास्ती भरलेली आहे. परंतु ही अवस्था यापुढेही सुरू राहणार असेल तर ईश्वरच हिंदुस्तानला वाचवू शकेल. परंतु आता अशा गोष्टी सुरू राहू शकत नाहीत. आपल्या वरीष्ठाचा आदेश बरोबर आहे की नाही याचा विचार न करता त्याच्या आदेशाप्रमाणे वागणे आज सक्तीचे नाही. आता आपण विदेशी अधिकाऱ्याच्या अंतर्गत काम करत नाही. राजेंद्र बाबू अशा प्रकारे आदेश देऊ शकत नाहीत. त्यांच्या हाताखाली असे पोलीस नाहीत की जे अशा आदेशांचे सक्तीने पालन करवून घेतील. इतकेच नाही तर राजाजी वा नेहरूजी वा सरदारसुद्धा लोकांवर बळजबरी करून आपल्या आदेशांचे पालन करवून घेऊ शकत नाहीत. सरदार बलदेव सिंग यांच्या हाताखाली सैन्य नाही परंतु ते जरी असते तरी लोकांचा विरोध मोडून काढण्याकरिता व त्यांना दाबून ठेवण्याकरिता ते त्यांच्यावर हल्ला करण्याचा आदेश सैन्याला देऊ शकले नसते. तुम्ही ब्रिटिश अधिकाऱ्यांना काढू शकत नाही परंतु या लोकांना काढू शकता. तुम्हाला खुष करूनच ते तुमच्यावर राज्य करू शकतात. तुमच्या पंचायत राजची सुरुवात आजपासूनच झाली आहे हे मी तुम्हाला सांगू इच्छितो. संपूर्ण सत्ता आपल्या हाती येण्याकरिता बारा महिने लागतील. मध्यंतरीच्या काळात काय होते आणि काय होत नाही हे केवळ ईश्वरालाच माहीत. परंतु अगदी आतापासूनच लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला पाहिजे. देशाची हानी करून कोणीही आपली तुंबडी भरू नये.

जे कोणी नागरी सेवेत असतील, मग ते काळे असो की गोरे, हिंदू असो की मुसलमान, सचिवालयात काम करणारे असो वा पोलीस दलातील उच्च पदासारख्या पदावर असो, माझा आवाज पोहोचत असलेल्या सर्व लोकांना मी सांगेन की तुमचे कर्तव्य आता दहा पट अवघड झाले आहे. आता तुम्ही सर्वांनी स्वच्छ आणि सरळ झाला पाहिजे. तुम्ही असे कराल तेव्हाच आपल्या स्वातंत्र्याचे काम सोपे होईल व प्रत्येकाला आपल्या स्वातंत्र्याचा अनुभव घेता येईल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ११८-२०

# ३०. प्रार्थना प्रवचन, जून ४, १९४७

नवी दिल्ली,

जून ४, १९४७

बंधूनो आणि भगिनींनो,

तुम्हाला माहीतच आहे की मी व्हाईसरायना भेटून सरळ इथे आलो आहे. मी त्यांच्याकडे काही मागायला गेलो होतो असे नाही. त्यांनीही काही देण्याकरिता मला बोलावले नव्हते. वास्तवात आमच्यामधील बोलणे संपलेसुद्धा नव्हते. परंतु मी व्हाईसरायना क्षमा मागत सांगितले की मानवी प्रयत्नांना शक्य असेल तोपर्यंत मी प्रार्थनेची वेळ चुकवत नसतो. त्यांना माझे म्हणणे पटले आणि आपल्याला नंतरही चर्चा करता येईल असे ते म्हणाले. (मुलाखतीसंबंधी व्हाईसरायच्या टिपणाकरिता "लॉर्ड माऊंटबॅटन यांचे गांधीजींच्या मुलाखतीसंबंधी टिपण", जून ४, १९४७ पाहा)

मी तुम्हाला सांगितले होते की आम्ही धाकदपटशाने पाकिस्तान म्हणून एक इंच जमीनही देणार नाही. वेगळ्या शब्दांत धमकी देण्यात आल्यामुळे पाकिस्तान मान्य करू नये. ते जर आपल्याला शांततापूर्ण युक्तिवादाने आपला मुद्दा समजावून सांगू शकत असतील आणि त्यांचा प्रस्ताव आपल्या विवेकबुद्धिला पटत असेल तर आम्ही पाकिस्तान देऊ.

या संपूर्ण प्रश्नावर विवेकपूर्ण विचारविनिमय झाला असे मी म्हणू शकत नाही. कॉंग्रेस कार्यकारिणी ठामपणे सांगते की आम्ही घाबरून काहीही दिलेले नाही. किती लोक मेले आणि संपत्ती बेचिराख झाली यामुळे ते घाबरलेले नाहीत. हिंसेला घाबरून त्यांनी पराभव स्वीकारला यात तिळमात्रसुद्धा सत्य नाही. मी त्यांना भित्रे मुळीच म्हणणार नाही. त्यांनी हा मार्ग स्वीकारला कारण दुसऱ्या कोणत्याही मार्गाने मुस्लिम लीगचे मन वळवता येऊ शकत नाही असे त्यांना वाटले. एकदा का मुस्लिम लीग काही मुद्द्यांवर सहमत झाली तर आपले काम सोपे होईल. थोडक्यात कार्यकरिणीचा दावा आहे की तिने हिंदुस्तानची भारत आणि पाकिस्तान अशी फाळणी भीतीपोटी स्वीकारलेली नाही तर सध्याच्या परिस्थितीच्या जाणिवेमुळे स्वीकारली आहे.

कुणावरही बळजबरी करण्याची आमची इच्छा नाही. आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा केली. आम्ही त्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांनी घटनासमितीत यायला नकार दिला. लीगला पाठिंबा देणारांचे म्हणणे होते की आम्ही जर घटनासमितीत आलो तर हिंदूंच्या बहुमताची आम्हाला भीती वाटते.

अशा परिस्थितीत व्हाईसराय काय करू शकतात? काहीही जरी झाले तरी आम्हाला जून १९४८पूर्वी जायचेच आहे असे त्यांचे म्हणणे आहे. आपली जरी इच्छा असली तरी त्या तारखेच्या पलीकडे थांबण्याची त्यांची अगदीच इच्छा नाही. त्यांचे म्हणणे आहे की आम्ही हिंदुस्तानला पूर्ण स्वातंत्र्य दिलेच पाहिजे. ते हा आग्रह का धरत आहेत हा वेगळा प्रश्न आहे. तुम्ही म्हणाल की ब्रिटिश पूर्वी जसे शक्तिशाली होते तसे आता राहिलेले नाहीत, ते आता असहाय झालेले आहेत. आजही ते पहिल्या दर्जाचे शक्तिशाली असावे असे आम्हाला वाटते. हे खरे आहे आहे की दीडशे वर्षे त्यांनी आम्हाला जुलमाखाली दाबून ठेवले होते. मला हेही माहीत आहे की गत बत्तीस वर्षांपासून त्यांच्या शक्तीशी आपण संघर्ष करतो आहो. परंतु मी माझ्या विरोधकाला शत्रू समजत नसतो. अजूनही मी ईश्वराजवळ प्रार्थना करीन आणि त्याने त्यांच्यावर कृपा करावी असे मी म्हणेन. आणि ईश्वर जे करील ते न्याय्यच असेल.

ईश्वराच्या अस्खलनशील शक्तीबद्दल मी आज बोलणार नाही. प्रत्येक माणसाकडून चूक होत असते इतकेच आपण लक्षात ठेवले पाहिजे. हिंदू, मुसलमान आणि शीख हे सर्व म्हणू शकतात की मुसलमानांनी फार मोठी चूक केली आहे. परंतु आपण स्वतःही त्या दोषातून कसे मुक्त होऊ शकतो? याबद्दलचा निर्णय आपण ईश्वरावर सोडू या.

मी इतकेच म्हणेन की पाकिस्तानची मागणी करणे ही त्यांची चूक होती. परंतु ते इतर कशाचाही विचार करू शकत नाहीत. हिंदूंचे जिथे बहुमत आहे तिथे आम्ही राहू शकत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. ही मागणी करून ते स्वतःचीच हानी करून घेत आहेत आणि त्यांची हानी होईल असे काही घडणार असेल तर त्यापासून त्यांना वाचव अशी मी ईश्वराजवळ प्रार्थना करीन. माझा स्वतःचा भाऊ, मग तो माझ्या धर्माचे पालन करो वा इतर कोणाच्या, माझे नुकसान करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा मी त्याला मदत करू शकत नाही. त्या वेळी त्याला कदाचित ही जाणीव नसेल की तो माझे नुकसान करत आहे. मी जर असे केले तर मला खात्री आहे की जात्यात मीच भरडला जाईन. मग मी माझा मार्ग वेगळा का ठेवू नये?

आणि आता मी तुम्हाला ब्रिटिशांबद्दल परत आश्वासित करू इच्छितो. व्हाईसरायच्या भाषणावरून (जून ३, १९४७ला आपल्या रेडिओवरील भाषणात व्हाईसराय म्हणाले की मी ज्या मूलभूत कारणांकरिता प्रांतांच्या विभाजनाच्या विरोधात आहे त्याच मूलभूत कारणांकरिता हिंदुस्तानच्या फाळणीच्याही विरोधात आहे. ज्याप्रमाणे मला हिंदुस्तानीत्वाची जाणीव होते त्याचप्रमाणे मला बंगालीत्वाची आणि पंजाबीत्वाचीही जाणीव होते आणि ही जाणीव सर्व मतभेदांच्या पलीकडे जाणारी असली पाहिजे हे असे वाटण्याचे कारण आहे. यामुळे फाळणीच्या या

प्रश्नासंबंधी या देशातील लोकांनीच निर्णय घ्यावा असा मी निर्णय घेतला.) नाही तर माझे त्यांच्याशी जे बोलणे झाले त्यावरून मी तुम्हाला सांगू इच्छितो की व्हाईसरायचा यात कोणताही हात नाही. विचारविनिमयात सामील असलेल्या नेत्यांनी हा निर्णय घेतला आहे. पुढाऱ्यांचे म्हणणे आहे की सात वर्षे आम्ही देश अविभाजित राहावा असा आग्रह धरला. कॅबिनेट मिशननेसुद्धा विचारपूर्वक निर्णय दिला. परंतु लीग तिच्या आश्वासनावरून परत फिरली आणि यामुळे हा मार्ग पत्करावा लागला. त्यांना (मुसलमान) हिंदुस्तानात परतावेच लागेल. पाकिस्तान जरी निर्माण झाला तरी लोक इकडून तिकडे राहायला जातील आणि त्यांचे आपसात दळणवळण राहील. आपण आशा करू या की ते सहकार्य टिकेल.

परंतु आता हा निर्णय घेण्यात आला आहे. आपण सर्वांनी कॉंग्रेसच्या विरोधात बंड पुकारले पाहिजे असे मी म्हणायला पाहिजे काय? वा तुम्ही हस्तक्षेप करा असे मी व्हाईसरायना सागितले पाहिजे काय? व्हाईसरायचे म्हणणे आहे की फाळणी व्हावी असे त्यांना कधीही वाटले नव्हते. कॉंग्रेसतर्फे जवाहरलालचे म्हणणे आहे की त्यांचीही फाळणीला मान्यता नव्हती. परंतु त्या सर्वांना भीतीमुळे नाही तर परिस्थितीमुळे फाळणी मान्य करणे भाग पडले. कारण हिंदू, शीख या सर्वांचे म्हणणे आहे की आम्हाला मातृभूमीत राहायचे आहे, मुसलमानांच्या भूमीत नाही. हिंदूंचे म्हणणे आहे की आम्ही शिखांच्या सत्तेखाली राहण्याकरिता तयार आहो कारण त्यांनी तलवारीच्या बळावर ग्रंथसाहेबांसमोर झुकण्याकरिता आम्हाला कधीही बाध्य केले नाही.

आज मला भेटण्याकरिता मास्टर तारासिंग आले होते. मी त्यांना सांगितले की तुम्ही एकांडे शिलेदार राहू नका तर सव्वालाखाच्या बरोबरीचे व्हा. शिखांनी मारल्याशिवाय मरणे शिकायला पाहिजे आणि असे झाले तर पंजाबचा इतिहास पूर्णपणे बदलून जाईल. आणि त्याचबरोबर हिंदुस्तानचा इतिहासही बदलेल. शीख संख्येने कमी आहेत परंतु ते शूर आहेत. खालसाचे राज्य संपूर्ण जगात पसरेल.

तुमचे दुःख दूर करण्याकरिता हे सर्व मी तुम्हाला सांगितले. हिंदुस्तानचे दोन तुकडे होणार आहेत या विचाराने तुम्ही दुःखी होऊ नका. ही मागणी पूर्ण करण्यात आली कारण तुम्ही तशी मागणी केली होती. कॉंग्रेसने ही मागणी कधीही केली नव्हती. मी तर इथे उपस्थितही नव्हतो. परंतु कॉंग्रेसला लोकांची नाडी कळत होती. तिला माहीत होते की खालसा तसेच हिंदूंना हेच पाहिजे होते. तुम्ही गमावले काहीच नाही, शिखांनीही गमावले नाही आणि मुसलमानांनीही गमावले नाही. व्हाईसरायनी आपल्या भाषणात सांगितले आहे आणि त्यांनी मला आश्वासनही दिले आहे की आपण जर त्यांच्याकडे एक होऊन गेलो तर ते आपला निर्णय बदलतील. परंतु आपले सर्वांचे एकमत झाले तरच

ते आपला निर्णय बदलतील. सत्तांतर होईपर्यंत ब्रिटिश आपले काम प्रामाणिकपणे करतील आणि नंतर शांततापूर्वक निघून जातील असे व्हाईसरायचे म्हणणे आहे. (व्हाईसराय आपल्या भाषणात म्हणाले होते की "हिंदुस्तानातील जनतेचा जो काही निर्णय होईल त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता जो कोणी ब्रिटिश अधिकारी इथे सत्तेत असेल तो सर्व काही करील याची मला खात्री आहे".) इथून गेल्यानंतर आपल्या माघारी गोंधळ राहावा असे ब्रिटिश जनतेला वाटत नाही.

मी आधीच म्हणालो आहे की तुम्ही अराजकाची फिकीर करू नका. अखेरीस मी जुगारी आहे. परंतु माझे कोण ऐकतो? तुम्ही माझे ऐकत नाही. मुसलमानांनी मला टाकून दिले आहे. कॉंग्रेसला मी माझा दृष्टिकोन पूर्णपणे पटवूनसुद्धा देऊ शकत नाही. वास्तवात मी कॉंग्रेसचा गुलाम आहे, कारण मी हिंदुस्तानचा आहे. १६ मेचा प्रस्ताव मान्य करण्याकरिता कॉंग्रेसची समजूत घालण्याकरिता मी शक्य तो सर्व प्रयत्न केला. परंतु आता जे घडून गेले आहे ते आपण सर्वांनी मान्य केले पाहिजे. आपली जेव्हा इच्छा असेल तेव्हा ही गोष्ट आपण निरस्त करू शकतो ही त्यातल्या त्यात आनंदाची गोष्ट आहे.

अखेरीस मी तुम्हाला सांगेन की व्हाईसरायला विसरा. सरळ सरळ बोलणी करण्याऐवजी आपण मध्यस्थ म्हणून व्हाईसरायच्या माध्यामातून वाटाघाटी करतो याच्या मला वेदना होतात. लीग आपला दृष्टिकोन व्हाईसरायला कळवते, व्हाईसराय तो कॉंग्रेसला कळवतात आणि मग कॉंग्रेस आपला दृष्टिकोन व्हाईसरायला कळवतात व व्हाईसराय तो लीगला कळवतात ही गोष्ट आपल्याकरिता काही भूषणावह नाही. परंतु मुस्लिम लीग काहीही ऐकण्याकरिता तयार नसेल तर काय करता येऊ शकते? कॉंग्रेस काही गोष्टी मान्य करते आणि शीख तिच्याशी सहमत होतात. नंतर थोडे नमते घेण्याकरिता व्हाईसराय जिना साहेबांच्या रात्रंदिवस विनवण्या करतात. अखेरीस त्यांना हा उपाय सापडला. आणि व्हाईसराय सांगतात की हेसुद्धा करताना लीग काय म्हणेल आणि कॉंग्रेस काय म्हणेल असा प्रश्न मला सतत पडत होता. परंतु ते ईश्वराचे नाव घेऊन आपले काम करत होते. यामुळे जोपर्यंत त्यांच्या अप्रामाणिपणाचा आपल्याला अनुभव येत नाही तोपर्यंत आपण त्यांच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवू या.

परंतु मी जिना साहेबांना विनंती करीन, गळ घालीन की तुम्ही आता तरी आमच्याशी सरळसरळ बोलणी करा. जे झाले ते ठीक आहे. परंतु आता आपण सर्व एकत्र बसू या आणि भविष्याबद्दल ठरवू या. आता त्यांनी व्हाईसरायबद्दल सर्व काही विसरावे आणि आपणा सर्वांच्या हिताची त्यांना जी कोणती तडजोड हवी असेल ती करण्याकरिता आम्हाला आमंत्रित करावे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १२०-४

# ३१. प्रार्थना प्रवचन, जून ५, १९४७

नवी दिल्ली, जून ५. १९४७

बौद्ध धर्माचे विद्वान पंडित श्री कोसंबी यांच्या देहावसानाची घोषणा करत गांधीजी म्हणाले -

बहुधा तुम्ही त्यांचे नाव ऐकले नसावे, आणि यामुळे तुम्हाला याचे दुःख होणार नाही. तसेही कोणाच्याही मृत्यूवर आपण शोक करू नये. परंतु आपल्या जवळच्या माणसाच्या वा आदरणीय व्यक्तीच्या मृत्यूचा शोक करणे हा मानवी स्वभाव आहे. आपली घडण अशी काही झाली आहे की जो आपली तुतारी वाजवत असतो व राजकीय कोलांट्याउड्या घेतो त्याला आपण आकाशापर्यंत चढवतो परंतु शांतपणे काम करणाराचे मात्र आपण कौतुक करत नाही.

कोसंबीजी असे मूकपणे काम करणारे होते. त्यांचा जन्म एका खेड्यात झाला होता. ते जन्माने हिंदू होते परंतु इतर कोणताही धर्म, वैदिक धर्मसुद्धा अहिंसा आणि करुणेला तितके महत्त्व देत नाही जितके बौद्ध धर्मात या गोष्टींना देण्यात आले आहे. यामुळे त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि स्वतःला बौद्ध धर्मग्रंथाच्या अभ्यासाला वाहून घेतले. त्यांनी या विषयात इतके प्राविण्य मिळवले होते हिंदुस्ताममध्ये या विषयात त्यांच्या तोडीचा कोणीही नव्हता. त्यांनी गुजरात विद्यापीठात आणि काशी विद्यापीठात पालीचे अध्यापन केले आणि आपल्या सखोल विद्वत्तेचा सर्वांना निःशुल्क लाभ करून दिला.

कोणी तरी त्यांना १००० रुपये दिले होते. ते त्यांनी मला पाठवले. त्यांनी मला लिहिले की, पालीचा अभ्यास करण्याकरिता तुम्ही कोणाला तरी सिलोनला पाठवा. परंतु सिलोनमध्ये पालीचा अभ्यास केल्यामुळे त्याला बौद्ध धर्माबद्दलची अंतर्दृष्टी प्राप्त होईल काय असे मी त्यांना विचारले. जगातील सर्व बौद्ध धर्मीयांना मी सांगितले आहे की वैदिक धर्माची वेगळी शाखा म्हणून बौद्ध धर्माचा हिंदुस्तानातच उदय झालेला असल्यामुळे तुम्हाला जर बौद्ध धर्म खरोखर समजून घ्यायचा असेल तर तुम्ही तसे केवळ हिंदुस्तानात म्हणजे बौद्ध धर्माच्या जन्मभूमीतच करायला पाहिजे. तुम्हाला बौद्ध धर्माचे मर्म तेव्हाच कळेल जेव्हा तुम्ही शकराचार्यांच्या लेखनाचा अभ्यास कराल. शंकराचार्यांच्या तोडीचा बौद्ध धर्माचा अभ्यासक दुसरा नव्हता. त्यांना छद्मवेषातील बुद्ध म्हणत असत.

परंतु विद्वत्तेच्या बाबतीत कोसंबींशी माझी तुलना होऊ शकत नाही. मी केवळ बॅरिस्टर आहे आणि इंग्लंडमध्ये जेवणावळींना हजर राहून मला ही पदवी मिळाली आहे. मला संस्कृतचे फार

अल्पज्ञान आहे. मी जो आज महात्मा झालो आहो तो मी इंग्लंडमध्ये बारचा अभ्यास केला म्हणून नव्हे तर सत्य आणि अहिंसेच्या माध्यमातून मी स्वतःला जनसेवेला वाहून घेतले होते म्हणून. मी जर काही साध्य केले असेल तर ते सत्य आणि अहिंसेचे अनुसरण केल्यामुळे.

कोसंबींच्या जेव्हा लक्षात आले की शारीरिक दृष्टीने आपण कोणतेही काम करण्याकरिता समर्थ नाही तेव्हा प्रयोपवेषण करून त्यांनी प्राणत्याग करायचे ठरवले. टंडनजींच्या आग्रहास्तव मी त्यांना उपोषण सोडण्याकरिता भाग पाडले. परंतु त्यांच्या चयापचय क्रियेवर गंभीर परिणाम झाला होता आणि त्यांना काहीही खाणे शक्य होत नव्हते. त्यामुळे सेवाग्राममध्ये त्यांनी अन्नग्रहण करणे बंद केले व ते केवळ पाण्यावर राहू लागले व अशा प्रकारे त्यांनी चाळीस दिवसांनंतर प्राणत्याग केला. आजाराच्या काळात त्यांनी कोणतीही शुश्रुषा वा औषधोपचार घेण्याला नकार दिला. इतकेच नाही तर गोव्यातील आपल्या जन्मगावी जाण्याच्या इच्छेचासुद्धा त्यांनी त्याग केला होता. आपल्या मुलाला आणि इतरांनासुद्धा त्यांनी आपल्याजवळ येण्याकरिता मनाई केली होती. आपल्या मृत्यूनंतर कोणतेही स्मारक उभारू नये असेही त्यांनी सांगून ठेवले होते. जे काही कमी खर्चाचे होईल त्याप्रमाणे आपले दहन वा दफन करावे अशी इच्छाही त्यांनी व्यक्त केली होती. असा प्रकारे बुद्धाचे नाव ओठावर असताना त्यांनी चिरंतन निद्रा घेतली. जो जन्म घेतो त्या प्रत्येकाला एक ना एक दिवस या अवस्थेत जावेच लागत असते. अखेरीस मृत्यू हाच आपला मित्र असतो. एखाद्या माणसाची एकदा जन्मवेळ आधीच सांगता येईल परंतु मृत्यूच्या निश्चित वेळेचे भाकीत आजपर्यंत कोणीही करू शकलेले नाही. हीच गोष्ट आपण चक्रैय्याच्या बाबतीत पाहिली.

यावर तुमचा इतका वेळ घेतल्याबद्दल मी तुमची क्षमा मागतो.

काल मला एक तार मिळाली. त्यात म्हटले होते की चारपाच दिवसांपासून तुम्ही बढाई मारत होता की धाकदपटशासमोर झुकून पाकिस्तानकरिता एक इंचही भूमी देणार नाही, पण आमच्या हृदयाला आवाहन करून ते काहीही घेऊ शकतात. आता पाकिस्तान अस्तित्वात येत असल्यामुळे तुम्ही परत उपोषण का करत नाही?

मला विचारण्यात येते की तेव्हा अशा प्रकारे बढाईखोरपणे तुम्ही का बोलत होता आणि आता तुम्ही शांत का झाला. कॉंग्रेसच्या विरोधात तुम्ही बंड का करत नाही? गुलामाप्रमाणे तुम्ही त्यांच्या पावलावर पाऊल का टाकत आहा? तुम्ही कॉंग्रेसचे सेवक कसे राहू शकता? उपोषण करून तुम्ही प्राणत्याग का करत नाही?

त्यांना असे म्हणण्याचा अधिकार आहे. परंतु असे लिहिणारांवर रागावण्याचा मला अधिकार नाही. रागावणे म्हणजे आपला तोल गेला असे समजायचे. इंग्रजीत एक वाक्प्रचार आहे - राग हा

अल्पकालीन वेडाचाच प्रकार आहे. गीता म्हणते क्रोधात भवती संमोहः, संमोहात्स्मृतिविभ्रमः. (अध्याय २, श्लोक ६३) मग गीतेचा अभ्यास केलेल्या माणसाला क्रोधाला कसे वश होता येईल?

मी उपोषण करावे अशी कोणाची इच्छा आहे म्हणून मी उपोषण कसा करू शकतो? माझा विश्वास आहे की माझ्या या आयुष्यात मला अजून एक उपवास करावा लागणार आहे. आगाखान महालात मी उपवास केला (फेब्रुवारी १० ते मार्च ३, १९४७) तेव्हाच मला प्रकर्षाने वाटत होते की हा माझा शेवटचा उपवास नाही आणि मला अजून एक उपवास करावा लागेल. परंतु असे मी कोणाच्या सांगण्यावरून करणार नाही. ईश्वाराची आज्ञा होईल तेव्हाच मी असे करीन.

मी सांगितलेच आहे की मी जिनासाहेबांचा साक्षीदार झालो आहे. त्यांना देशात शांतता हवी आहे. मलासुद्धा शांतता हवी आहे. परंतु असे असूनही चोहोकडे दंगली उग्र स्वरूप धारण करत आहेत आणि देशात लोकक्षोभ वाढत आहे. आणि ईश्वर मला सांगेल म्हणजे माझे अंतःकरण मला सांगेल की आता तुझी या जगातून जाण्याची वेळ आली आहे तेव्हाच मी तसे करीन. राजकारणात हिंसा नसावी असे आवाहन करण्याकरिता जिना साहेब माझी समजूत घालत होते. लॉर्ड माऊंटबॅटन यांनी माझ्यावर मोहिनी घातली आणि कृपलानी वा नेहरूऐवजी मला सही करायला लावली. जवाहरलालच्या सल्ल्यानुसार मी त्या आवाहनावर सही केली. अशा प्रकारे या व्यवहारात आम्ही तीन भागीदार आहो, दोघे आम्ही कारण आम्ही त्यावर सही केली आहे आणि माऊंटबॅटन - व्हाईसराय म्हणून नाही तर व्यक्ती म्हणून - कारण साक्षीदारापेक्षा यात त्यांचा जास्त सहभाग होता. वेगळ्या शब्दांत संपूर्ण देशात शांतता असली पाहिजे. जर ती नसेल तर जिनासाहेब त्यांच्या ईश्वरासमोर गुन्हेगार असतील, माऊंटबॅटन त्यांच्या आणि मी माझ्या. परंतु तुमच्या माध्यमातून मी सांगू इच्छितो की ज्या क्षणी ते मला म्हणतील त्या क्षणी मी त्यांच्याबरोबर पायी वा ते म्हणतील त्या वाहनात बसून या कामाकरिता जाण्याकरिता तयार असेन. मी विमानाने जाऊ शकत नाही. विमानातून मी खालचे काय पाहू शकेन? याशिवाय हवाईप्रवास मी कधीच केला नाही. अर्थातच खालून मी विमाने पाहिली आहेत आणि ती माशासारखी दिसतात.

गुडगाव अजून जळत आहे. आज मला तेथील कोणतीही माहिती मिळाली नाही परंतु तेथील जाट आणि मिओ लोकांमध्ये संघर्ष सुरू आहे. सुदैवाने स्त्रिया, मुले आणि म्हातारी माणसे यांना मारण्यापर्यंत त्यांचे वेड पसरले नाही. ते सैनिकांप्रमाणे लढत आहेत. परंतु त्यांनी मुळी भांडावेच का? त्यांनी भांडावे हीच गोष्ट माझ्याकरिता, जिनासाहेबांकरिता आणि लॉर्ड माऊंटबॅटन यांच्याकरिता लाजीरवाणी आहे. तसेच ही गोष्ट सरदार बलदेव सिंग आणि जवाहरलाल यांच्याकरिताही लाजिरवाणी आहे. सुदैवाने २ जूनला वा ४ जूनला विशेष काही घडले नाही.

परंतु एक गोष्ट मात्र निश्चितपणे होणार आहे. हिंदुस्तान आणि पाकिस्तान अस्तित्वात योणार आहेत आणि त्यांच्या दोन वेगवेगळ्या घटनासमित्या बनणार आहेत. आता हे रद्द करवून घेण्याकरिता मी मेलो पाहिजे काय? अशा प्रकारे मी मरणार नाही.

मला फार मोठ्या कामावर हजर राहायचे आहे. असे म्हणतात की आता भारताचे उद्योगीकरण होणार आहे. परंतु माझ्या संकल्पनेतील उद्योगीकरणात प्रत्येक घरात चरखा फिरवला गेला पाहिजे, आणि प्रत्येक गावात कापड तयार झाले पाहिजे. अशा प्रकारचे ग्रामीण भागातील उद्योगीकरण मला हवे आहे.

बिर्लांच्या एका गिरणीच्या ठिकाणी हजार गिरण्या होणे ही उद्योगिकरणाची संकल्पना मी मान्य करू शकत नाही. मी बिर्लांच्या नावाचा उल्लेख केला कारण ते माझे मित्र आहेत. परंतु माझ्या मनात सर्व गिरणी मालक आहेत. जर तिथे भूकंप झाला वा बिर्ला मीलला आग लागली तरी मी अस्वस्थ होणार नाही. बिर्लाबंधूंसमोर मी सहानुभूतीदर्शक एकही अश्रू ढाळणार नाही. परंतु कोणी जर जाणूनबुजून त्या गिरणीला हानी पोहोचवण्याचा प्रयत्न केला तर त्या माणसाला मी नक्कीच धारेवर धरीन.

असे दिसते की कॉंग्रेसने भारतात मोठ्या संख्येत गिरण्या उभारण्याचे आणि यंत्रांवर आधारित उद्योग वाढवण्याचे ठरवले आहे. आणि तिला देशात फार मोठे सैन्य हवे आहे. परंतु मला त्याच्याशी काहीही देणेघेणे नाही. मला बिहारमधील हिंसेशी काही देणेघेणे आहे काय? आणि हिंदुस्तानमध्ये आता असे काय राहिले आहे की ज्यामुळे माझा ऊर आनंदाने भरून यावा? परंतु असे असूनही मी इथे आहे. कॉंग्रेस फार मोठी संस्था झाली आहे आणि तिला विरोध करण्यासाठी मी उपोषण करू शकत नाही. परंतु मला वाटते की मला आगीच्या भट्टीत टाकण्यात आले आहे व तिच्यात माझे अंतःकरण होरपळते आहे. असे असतानाही मी का जगतो आहे हे एका ईश्वरालाच माहीत. काहीही असले तरी मी कॉंग्रेसचा सेवक आहे. कॉंग्रेस जर वेडाच्या आहारी जात असेल तर मी सुद्धा वेडाच्या आहारी जायला पाहिजे काय? मी तुम्हा सर्वांच्या विवेकाला आवाहन करू इच्छितो, कॉंग्रेसच्या विवेकाला आवाहन करू इच्छितो, मुसलमानांच्या, माझे मित्र जिना यांच्या विवेकाला आवाहन करू इच्छितो आणि त्यांची अंतःकरणे जिंकू इच्छितो.

पाकिस्तान जिंदाबाद ही घोषणा आता अस्तित्वात आलेली असल्यानंतरही तुम्हाला लॉर्ड मौऊंटबॅटनकडे का जावेसे वाटते असे जिनासाहेबांना मी विचारू इच्छितो. तुम्ही कॉंग्रेसकडे का जात नाही? तुम्ही डॉ. बादशाह खान, डॉ. खानसाहेब यांच्याकडे का जात नाही? पाकिस्तान किती सुंदर गुलाबाचे फूल आहे हे तुम्ही का दाखवत नाही?

परंतु पाकिस्तानबद्दल माझ्याकडे तक्रारी येत आहेत. आज मला एक पत्र आले आणि त्यात सांगण्यात आले आहे की एक ब्रिटिश पेढी शस्त्रास्त्रे बनवण्याकरिता लाहोरला जाणार आहे. त्यात असेही सांगण्यात आले आहे की पाकिस्तानने राष्ट्रकुलात राहण्याचा निर्णय घेतला आहे आणि ते उपनिवेशाचा दर्जा मान्य करणार आहे.

उपनिवेशाचा दर्जा स्वीकारून कॉंग्रेसने कोणताही अपराध केलेला नाही. ब्रिटिशांचे राज्य लवकरात लवकर संपावे म्हणून तिने ही गोष्ट तात्पुरत्या स्वरूपात मान्य केली आहे. घटना तयार होताच ती संपूर्ण स्वातंत्र्याच्या बाजूने कौल देईल. मुस्लिम लीग त्यानंतर उपनिवेशाचा दर्जा कायम ठेवणार आहे काय? आपल्या दोन्ही देशांची घटना सारखी असावी. दोघांनीही संपूर्ण स्वातंत्र्य आपले ध्येय ठरवले आहे. यामुळे संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय कमी असलेली दुसरी कोणतीही गोष्ट न स्वीकारणे जिनांचे कर्तव्य ठरेल. परस्परांशी झगडून ते कर्तव्य पार पाडता येऊ शकत नाही.

जिनांची समजूत घालण्याच्या प्रयत्नात सर्व हिंदू थकून गेले आणि पाकिस्तान दिल्याने आपल्याला शांतता मिळेल अशा आशेने त्यांनी पाकिस्तान मान्य केला आहे.

असे घडण्याला मी कबुली का दिली असे कोणीही विचारू शकतो. परंतु कॉंग्रेसने कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी माझा सल्ला घेतला पाहिजे असा आग्रह मी धरू शकतो काय? मी इतका मूर्ख नाही. आणि मी जर कॉंग्रेसविरुद्ध बंड केले तर कॉंग्रेस संपूर्ण देशाची असल्यामुळे त्याचा अर्थ मी संपूर्ण देशाविरुद्ध बंड पुकारले असा होईल. कॉंग्रेस भांडवलदारांच्या बाजूची झाली असे जेव्हा वाटेल तेव्हाच मी असे करीन.

परंतु मला वाटते की कॉंग्रेस सध्या तरी गरिबांकरिता काम करते आहे. ती कदाचित माझ्या मार्गापेक्षा वेगळ्या मार्गाचे अनुसरण करत असेल आणि तिचे मन शस्त्रास्त्र, सैन्य आणि कारखान्यांवर गेले असेल. परंतु मी तिची समजूत युक्तिवादाने घातली पाहिजे, उपोषण करून नाही.

इतकेच नाही तर उपोषणसुद्धा दानवी असू शकते. अशा दानवी उपोषणापासून ईश्वर मला वाचवो. त्याने मला दानवी कृत्यापासून वाचवावे, दानवी भाषेपासून वाचवावे आणि दानवी विचारांपासून वाचवावे. आणि अशा काही गोष्टींना शरण जाण्याआधी त्याने मला घेऊन जावे. जर मी एखादे उपोषण केले तर ते शुद्ध आणि ईश्वरी असेल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन -१, पृष्ठ १२४-३०

# ३२. प्रार्थना प्रवचन, जून ६, १९४७

नवी दिल्ली, जून ६, १९४७

त्यांचे लांब पत्र वाचून दाखवण्यात मी वेळ वाया घालवणार नाही. (एका स्त्रीने प्रार्थनेत कुराणातील कडवे वाचण्यावर परत आक्षेप घेतला होता) माझा असा समज होता की मला काय म्हणायचे आहे ते लोकांना कळले असेल. परंतु आपण इतके भाग्यवान नाही हे माझ्या लक्षात आले. धर्माच्या नावावर अधर्माचे पालन होत आहे. परंतु या अधर्माबरोबरच आपल्याला राहावे लागेल. या बाई जरी अडथळा आणण्याचा प्रयत्न करत असतील तरी त्यांना कोणीही त्रास देऊ नका. आता त्या एक पाऊल पुढे गेल्या आहेत आणि त्यांनी मला लिहिले आहे की मी भाषणसुद्धा करायला नको. त्यांना जे वाटेल ते म्हणू द्या. मी प्रार्थनाही थांबणार नाही आणि भाषण देणेही थांबवणार नाही. देशात अशा प्रकारे जर कोणी वागणार असेल तर प्रशासन कामच करू शकणार नाही. तुम्ही कृपाकरून शांत राहा.

तुम्ही सर्व उकाड्याने त्रस्त झाल्याचे मला दिसत आहे. परंतु तुम्हाला ऐकायचे आहे आणि मला बोलायचे आहे. परंतु मी तुमच्याशी तेव्हाच बोलू शकतो जेव्हा तुम्ही शां◌ंतता ठेवाल. याचा अर्थ असा नाही की एखाद्या कापडाच्या तुकड्याने वा कागदाने तुम्ही हवा घेऊ शकत नाही. ही मुलगी मला हवा घालत आहे मग मी तुम्हाला मनाई कसा करू शकतो? (हवा घालणारी व्यक्ती पुरुषअसल्यामुळे हशा पिकला.) तुम्ही सर्व जर स्वतःला हवा घालाल तर हे काम स्त्रियांचे नाही असे मी म्हणेन. तुम्ही स्वतःचे पंखे आणू शकता. स्त्रीसुद्धा पुरुषाप्रमाणे वागू शकते. स्त्रीने धीर सोडला नाही तर ती पुरुषाची श्रेष्ठ अर्धांगिनी होऊ शकते.

भजनात गोपी म्हणते की बासरीवादन ऐकण्याकरिता मला वनात जाण्याची इच्छा होते. परंतु हे भजन काही केवळ स्त्रियांकरिता नाही. ईश्वरासमोर आपण सर्व गोपी आहो. स्वतः ईश्वर ना तर स्त्री आहे ना पुरुष. त्याच्याकरिता ना दर्जात भेद आहे आणि ना जन्मामुळे भेद आहे. त्याचे वर्णन नेति, नेति असेच करता येऊ शकते. ईश्वर वनात राहतो म्हणजे हृदयात राहतो आणि त्याची बासरी म्हणजे आतला आवाज. आपल्याला निर्जन वनात जाण्याची गरज नसते. आपल्या अंतःकरणात सदैव सुरू असलेले दैवी संगीत आपण ऐकले पाहिजे. आपण जेव्हा ते गोड संगीत ऐकू लागू तेव्हा हिंदुस्तानात सर्व काही चांगले होईल.

आपण हे भजन अगदी योग्य वेळी ऐकले आहे. या बाईंचे म्हणणे आहे की जिनांना बिघडवणारा मीच असल्यामुळे मी वनात जाऊन निवृत्त व्हायला पाहिजे. परंतु त्यांना बिघडवणारा मी कोण? जर असे काही शक्यच असेल तर मी त्यांच्यात परिवर्तन घडवून आणण्याची आशा करीन. आणि असे मी धाकदपटशाने करणार नाही तर प्रेमाने करीन. दडपशाहीने, अण्वस्त्राने माणूस केवळ विध्वंस करू शकतो. अण्वस्त्राने केवळ विध्वंस आणला आहे. त्याने कधीही कोणालाही आपल्याकडे आकर्षित केले नाही. माणसाला माणसाकडे आकर्षित करणारा जगात जर कोणता चुंबक असेल तर तो आहे प्रेमाचा. मी त्याचा साक्षी आहे. या बाई म्हणतात की मी कुराण वाचू नये, मुळीच बोलू नये, केवळ वनात जाऊन निवृत्त व्हावे. परंतु मी वनात जरी गेलो तरी तुम्ही मला इथे ओढून आणाल. माणसाचा जन्म एकत्र राहण्याकरिता आहे. मी जर जंगलात राहण्याची आणि लोकांना तिकडे आकर्षित करण्याची कला शिकलो तर मला भाषणे करावी लागली नसती वा काही बोलण्याची गरज भासली नसती. मी एकांतात आणि शांततेत राहिलो असतो आणि मला जे हवे ते तुम्ही केले असते. परंतु ईश्वराने मला अजून त्याकरिता पात्र ठरवलेले नाही.

व्हाईसरायबरोबरच्या आजच्या माझ्या दीर्घ मुलाखतीत काय बोलणी झाली (गांधीजींबरोबर लॉर्ड माऊंटबॅटन यांच्या मुलाखतीच्या टिपणाकरिता पाहा परिशिष्ट ४) आणि त्यांच्याकडून मी काय आणले हे तुम्हाला जाणून घेण्याची इच्छा असेल. ते काय देऊ शकतात? ते असहाय आहेत. त्यांच्याजवळ घेण्यासारखेही काही नाही आणि देण्यासारखेही काही नाही. ते म्हणाले की "मी ईश्वराची प्रार्थना करतो आहे की हिंदुस्तानातील प्रत्येक माणसाच्या, मग तो हिंदू, मुसलमान, शीख वा इतर कोणीही असो, लक्षात आले पाहिजे की हिंदुस्तानला लुबाडण्याकरिता वा अंतर्गत भांडणे लावण्याकरिता मी इथे आलेलो नाही." ते इथे केवळ निघून जाण्याकरिता आले आहेत, शक्यतोवर शांतता प्रस्थापित झाल्यानंतर आणि तसे झाले नाही तरीही ते जातील. ते म्हणतात की १५ ऑगस्टनंतर ब्रिटिश या देशात राहणार नाहीत. आपली इच्छा असली तर ते केवळ महाराज्यपाल म्हणून राहतील. व्हाईसराय म्हणाले की सध्या तरी माझ्याजवळ उपनिवेशाचा दर्जा देण्यापेक्षा जास्त काहीही नाही. आपण त्यांना हाकलून लावणार असू तर मात्र गोष्ट वेगळी. परंतु मित्र म्हणून जायचे असेल तर त्याकरिता हा सर्वोत्तम मार्ग आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

व्हाईसराय मला असेही म्हणाले की तुम्ही ब्रिटिशांना बळजबरीने घालवून देत नसल्यामुळे आम्ही मित्राप्रमाणे जात आहो. १९४२ साली लोकांनी रेल्वे, तारविभागाच्या सेवा इत्यांदींमध्ये घातपातचा प्रयत्न केला हे खरे आहे. परंतु असे करणारे फार कमी होते. समाज अशा प्रकारच्या कृत्यांमध्ये सहभागी नव्हता. आपण त्यांच्याशी सौजन्याने वागलो असे ते म्हणाले. आपण त्यांना

केवळ निघून जाण्याकरिता सांगितले कारण त्यांनी देशात विष पसरवले होते. परंतु कॉंग्रेसने त्यांना विष दिले नाही. कॉंग्रेसने त्यांच्याशी केवळ असहकार केला आणि सैनिकी प्रशानाच्या आधाराशिवाय आपण इथे राहू शकत नाही हे ब्रिटिशांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी जाण्याचा निर्णय घेतला.

आपला असहकार जर परिपूर्ण असता तर ब्रिटिश कधीचेच निघून गेले असते आणि अधिक चांगल्या पद्धतीने. आंदोलनात सहभागी होण्याकरिता कॉंग्रेसने विद्यार्थी, शासकीय कर्मचारी, आणि सैनिकाना पाचारण केले. परंतु ते दुबळे होते. त्यांच्यात आपली जागा सोडण्याचे साहस नव्हते. असे असूनही आपण त्यांना मारून टाकण्याची धमकी दिली नाही की त्यांना विष घातले नाही. आपली ही शक्ती ब्रिटिशांच्या लक्षात आली आणि म्हणूनच ते जात आहेत. परंतु व्हाईसरायचे म्हणणे आहे की लोक अजूनही आमच्यावर विश्वास ठेवत नाहीत. एका पत्रकाराने लिहिले आहे की ब्रिटिश इथे राज्य करण्याकरिता आले होते आणि आता ते देशाची दोन भागात फाळणी करून जात आहेत. दोन्ही भागांनी आपसात भांडून आपली मदत मागितली तर त्यांना इथे राहण्याकरिता निमित्त मिळेल असे लोकांना वाटते.

याचा अर्थ विश्वासघात होईल आणि या वेळी ब्रिटिश आपला विश्वासघात करणार नाहीत अशी मला आशा आहे. आणि त्यांनी जरी असे केले तरी आपण शौर्याने वागलो पाहिजे. शूर माणसाने विश्वासघाताला का घाबरावे? व्हाईसराय जर माझ्याशी इतक्या प्रांजळपणे बोलतात तर मी त्यांच्या हेतूबद्दल शंका का घ्यावी? व्हाईसरायनी मला विचारले की निदान तुमचा तरी माझ्यावर विश्वास आहे काय. मी त्यांना सांगितले की माझा तुमच्यावर विश्वास नसता तर मी तुमच्याकडे आलोच नसतो. मी त्यांना सांगितले की मी खरे बोलणारा आणि प्रामाणिक माणूस आहे.

याप्रमाणे मी व्हाईसरायशी बोललो आणि त्याचबरोबर देशाची भारत आणि पाकिस्तानमध्ये फाळणी होत असल्याबद्दल अंतःकरणातील दुःखही मी त्यांना सांगून टाकले. त्यावर ते म्हणाले की हे ब्रिटिशांनी केलेले नाही. कॉंग्रेस आणि लीगने संयुक्तपणे जे मागितले तेच आम्ही दिले. ते म्हणाले की ब्रिटिश एकाएकी सोडून जाऊ शकत नव्हते कारण लहानशा घरात जरी वाटण्या करायच्या असतील तरी त्याला वेळ लागतो, मग इथे तर संपूर्ण राष्ट्राची फाळणी करण्याचा प्रश्न होता. त्यावर मी व्हाईसरायना सांगितले की तुम्ही आता विश्रांती घ्या. आता आम्ही आपसात बसून स्वतःच फाळणीचे काम पूर्ण करून टाकू. हेच योग्य होईल.

व्हाईसरायना मी सांगितले की गेल्या दोनतीन दिवसांपासून मी जिनांना विनवणी करतो आहे की तुम्हाला जे हवे होते ते मिळाले आहे, शक्य आहे की तुमच्या अपेक्षेपेक्षा ते थोडे कमी असेल,

परंतु ते काय आहे ते आता तरी दाखवा. तो केवळ नावाचाच गुलाब आहे की त्याला सुगंधही आहे? आपल्याला त्याचा निदान सुगंध तरी मिळायाला नको का? पाकिस्तानमध्ये हिंदू आणि शिखांकरिता जागा आहे की नाही ते आम्हाला सांगा. त्यांना गुलाम होऊनच तिथे राहावे लागेल काय? आणि तुम्हाला वायव्य सरहद्द प्रांतात सार्वमत घेऊन त्याची फाळणी करायची आहे काय? तुम्हाला बलुचिस्तानचीसुद्धा फाळणी करायची आहे काय?

आतापर्यंत जरी मुसलमान हिंदूना शत्रू समजत होते तरी आता यापुढे ते हिंदूंना शत्रू समजत नाहीत हे ते आपल्या कृतीतून दाखवून देतील काय? ते पठाण, बलूच आणि हिंदूंची फाळणी करण्याचे टाळतील काय? भावाभावाप्रमाणे आपण जरी संपत्तीची वाटणी केली तरी आम्ही एक आहो आणि ब्रिटिशांशिवायही आम्ही आपसात व्यवहार करू हे ते दाखवून देतील काय?

मी या भाषेत बोलत असल्याबद्दल ते जर मला शिव्या देणार असतील तरी मी ते मनाला लावून घेणार नाही. कालसुद्धा मी अजूनही का मरत नाही असे कोणी तरी मला म्हणाला होता. तेव्हा त्याने मला शिवीच दिली होती. परंतु या लोकांच्या मनात काय आहे ते तरी त्यांनी स्पष्ट करावे. अजूनही ते माझ्याकडे का येत नाहीत? ते तुमच्याकडे का येत नाहीत? ते कॉंग्रेसच्या लोकांना वा कॉंग्रेसेतरांना भेटण्याकरिता का बोलावत नाहीत? एक वेळ अशी होती की कॉंग्रेस आणि लीगमध्ये एकमत होते. आता ते त्याहूनही बळकट करार का करत नाहीत?

आपण सर्व मिळून मित्र होण्याकरिता प्रयत्न करू या, शत्रूत्वाकरिता नाही. व्हाईसराय हे एकट्याने करू शकत नाही. आपण संघटित प्रयत्न करूनच मित्र होऊ शकतो.

हिंदीवरून. प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ १३०-४

# ३३. प्रार्थना प्रवचन, जून ७, १९४७

नवी दिल्ली,

जून ७, १९४७

बंधूनो आणि भगिनींनो,

मी तुम्हाला अतिशय नम्रपणे सांगतो की प्रार्थनेत अडथळा आणणे योग्य नाही. मी प्रार्थना थांबवू शकत नाही. ती सुरूच राहील. परंतु दररोज एक वा दुसरी तक्रार असतेच असे मला आढळून आले आहे. यामुळे मला फार वेदना होतात.

याच विषयावर मी माझे व्याख्यान सुरू ठेवणार आहे. माझ्यावर फार मोठे दडपण येत असले तरी वातावरण कसे आहे याविषयी मी तुमच्याशी बोलणार आहे. लोक मला म्हणतात की व्हाईसरायच्या वक्तव्यापर्यंत तुम्ही विरोध करत होता (पाकिस्तानच्या कल्पनेला) आणि धाकदपटशाने आम्ही काहीही देणार नाही असे म्हणत होता. आता व्हाईसरायचे वक्तव्य आल्यानंतर तुम्ही गप्प बसला आहा. लोकांचे हे म्हणणे योग्यच आहे. या निर्णयाने मी समाधानी नाही हे मी कबूल केलेच पाहिजे. परंतु जगात अनेक गोष्टी अशा होत असतात की ज्या आपल्या आवडीच्या नसतात आणि तरीही आपल्याला त्यांच्याशी जुळवून घ्यावे लागत असते. अशाच प्रकारे आपल्याला याही गोष्टीशी जुळवून घ्यावे लागते.

एका वृत्तपत्राने म्हटले आहे की अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटी हा प्रस्ताव फेटाळून लावू शकते. माझेसुद्धा मत आहे की अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटीला हा प्रस्ताव फेटाळण्याचा पूर्ण अधिकार आहे. परंतु ज्या कॉंग्रेसला इतके दिवस आपण आपली निष्ठा वाहिली होती आणि जिला जागतिक प्रतिष्ठा मिळाली आहे आणि जिने किती तरी काम केले आहे त्या कॉंग्रेसला आपण एकाएकी विरोध करू नये.

मोठ्या संख्येतील कर्मठ लोक अजूनही अस्पृश्यतेच्या राक्षसाला बिलगून आहेत आणि या राक्षसाला बिलगून आपण आपला धर्म पाळत आहो असे त्यांना वाटते. परंतु आमच्यापैकी कोण खरा सनातनी हे एक ईश्वरच ठरवेल. याचप्रमाणे धर्मविरोधी कृत्यांवर कॉंग्रेस धर्माची झूल चढवणार असेल तर आपल्याला ती संघटना गुंडाळावी लागेल. कॉंग्रेसची हत्या कोण करू शकतो? तिच्यासमोर आपण सर्व आपला प्राणत्याग करू शकतो. आपण आत्महत्या करून मरणार नाही. परंतु आपण तिच्याशी संघर्ष करत राहू व तोपर्यंत आपण तिच्यासमोर नतमस्तक होणार नाही जोपर्यंत

तिला आपण योग्य मार्गावर आणत नाही वा आपण स्वतः मरण पत्करत नाही. परंतु आपण असे तेव्हाच करू जेव्हा कॉंग्रेस जाणूनबुजून चूक करत आहे असे आपल्याला वाटेल. माझ्या मताप्रमाणे सध्या ती जाणूनबुजून चूक करत नाही आहे. अधर्माला धर्म समजून ती आतापर्यंत वागली असती तर ती आजच्या परिस्थितीत पोहोचली नसती.

हा निर्णय घेण्यापूर्वी कॉंग्रेस कार्यकारिणीने अ. भा. कॉं.चा सल्ला घ्यायला पाहिजे होता असे म्हणणे बरोबर नाही. कार्यकारिणीने उचलावयाच्या प्रत्येक पावलाआधी अखिल भारतीय कॉंग्रेसचा सल्ला घेणे आवश्यक असेल तर कार्यकारिणी कामच करू शकणार नाही. परिणामी अखिल भारतीय कॉंग्रेस कार्यकारिणीला आव्हान देऊन तिला काढून टाकू शकते आणि नवीन कार्यकारिणी तयार करू शकते.

मी जेव्हा कॉंग्रेसकरिता नियमितपणे काम करत होतो आणि कॉंग्रेसची घटना राबवण्याचा प्रयत्न करत होतो तेव्हा एका चर्चेच्या दरम्यान मी म्हणालो होतो की कॉंग्रेस दरवेळी तिचे ३०० वा एकहजार सदस्य गोळा करू शकत नाही. अशा प्रकारे कार्यकारिणी काम करू शकत नाही. नंतर अखिल भारतीय कॉंग्रेस कार्यकारिणीला अर्थातच स्पष्टिकरण मागू शकते. अविश्वासाचा ठराव मंजूर करून कॉंग्रेस कार्यकारिणीला काढूनही टाकू शकते आणि नवीन कर्यकारिणी तयार करू शकते आणि अशा चुकीची पुनरुक्ती होणार नाही याची ती खात्री करून घेऊ शकते.

कल्पना करा की कार्यकारिणीने अखिल भारतीय कॉंग्रेसच्या नावावर अनेक लाखांची हुंडी दिली आणि कॉंग्रेसने तिला मंजुरी दिली नाही. असे असले तरी अखिल भारतीय कॉंग्रेसला त्या हुंडीचा मान ठेवावाच लागेल, परंतु अशी चूक परत होऊ नये म्हणून ती कार्यकारिणीला निश्चितच काढून टाकू शकते व तिच्या जागी नवीन कार्यकारिणी तयार करू शकते. खरे म्हणजे अशा परिस्थितीत अखिल भारतीय कॉंग्रेसने असेच पाऊल उचलायलाच पाहिजे. हीच गोष्ट हिंदुस्तान - पाकिस्तान प्रकरणासंबंधीच्या निर्णयालाही लागू होते. आता हा निर्णय होऊन गेलेला आहे. परंतु अजूनही तडजोडीकरिता बराच वाव आहे. आपण हिंदुस्तान आणि पाकिस्तानला वा तुम्ही जे काही नाव द्याल त्याला आपल्या इच्छेप्रमाणे निर्माण करू शकता वा रद्द करू शकता. हे खरे आहे की कॉंग्रेस लीगचे प्रतिनिधित्व करत नाही. परंतु मी ज्याप्रमाणे कॉंग्रेसकडे पाहतो त्याप्रमाणे कॉंग्रेस संपूर्ण हिंदुस्तान राष्ट्राचे प्रतिनिधित्व करते. यामुळे मुसलमानांनी आमची फार मोठी हानी केलेली असल्यामुळे आम्हीही त्यांची हानी करू असे कॉंग्रेस म्हणू शकत नाही. कॉंग्रेसने जर असे केले तर ती कॉंग्रेस राहणार नाही. मी जेव्हा गोलमेज परिषदेकरिता गेलो होतो (१९३१साली) तेव्हासुद्धा मी म्हणालो होतो की त्यांनी जरी आमची हानी केली तरी आम्ही त्यांचे कल्याणच करू.

कॉंग्रेसला लोकशाही शासन पद्धती स्थापित करायची आहे. ती संस्थानिकांच्या हिताच्या विरोधातही काम करणार नाही. परंतु संस्थानिक आपले पद तेव्हाच राखून ठेवू शकतील जेव्हा ते औंधच्या राजाप्रमाणे (आप्पासाहेब पंत) विश्वस्त बनतील. औंधसारखे लहानसे संस्थान लोकांच्या सार्वभौमत्वासमोर झुकले म्हणून औंधची आठवण लोकांना दीर्घकाळ राहील. याउलट काश्मीरचे संस्थान जरी करोडो रुपयांचे असले तरी जर ते लोकांचा आवाज ऐकणार नसेल तर ते नष्ट होऊन जाईल. आतापर्यंत हे संस्थानिक ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या मदतीने जरी उद्दामपणाने आपल्या प्रजेशी वागले असतील तरी त्यांचे अधिकार प्रजेपासून त्यांना मिळाले आहेत हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. मी काश्मीरचा विशेष उल्लेख केला कारण आज सर्वांचे डोळे काश्मीरकडे लागलेले आहेत.

कॉंग्रेस सतत जनतेची राहावी आणि जनता कॉंग्रेसची राहावी म्हणजे तिने कॉंग्रेसच्या शिस्तीचे पालन करावे म्हणून मी इतके दीर्घ भाषण केले. आपण जर अंतर्गत संघर्षाला सुरुवात केली तर कॉंग्रेसचा विनाश होईल. तुम्हाला जर कार्यकारिणीचा निर्णय पसंत नसेल तर तसे तुम्ही अखिल भारतीय कॉंग्रेसच्या येत्या सभेत सांगू शकता. त्या सत्राला उपस्थित राहण्याचा माझा कोणताही हेतू नाही. मला बोलावले तर मी जाईन. परंतु माझ्या एकट्याचा आवाज कोण ऐकणार आहे? अखेरीस तुम्ही जनता आहा. जे काही कॉंग्रेसने केले ते तुम्हाला जर मान्य नसेल तर तुम्ही तसे कॉंग्रेसला सौजन्यपूर्ण भाषेत कळवू शकता. पाकिस्तान म्हणून जे काही दिले पाहिजे ते देणे आणि जो काही भाग तिच्याकडे राहिला त्यात प्रयत्नांची पराकाष्ठा करणे हे आता कॉंग्रेसचे कर्तव्य आहे. पाकिस्तानच्या लोकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करून आपल्या देशाची प्रगती करण्याच्या बाबतीत कॉंग्रेसच्या पुढे जावे. असे जर घडले तर हे दोघे मैत्रीभावाने सुखासमाधानात राहू शकतील.

अखेरीस जिना साहेबांना परत विनवणी करत गांधीजी म्हणाले की हिंदू, मुसलमान, पारसी आणि इतर सर्वांना तडजोडीकरता बोलवा आणि व्हाईसराय आणि कॉंग्रेसच्या नेत्यांची विनाकारण इतस्ततः जी धावपळ होत आहे तिच्या त्रासापासून त्यांना वाचवा. जिनांना विनवणी करत ते म्हणाले की तुम्ही असा पाकिस्तान उभारा की जिथे गीता आणि कुराण आजूबाजूला राहून म्हणता येईल आणि मंदिर, गुरुद्वारा आणि मशीद यांना समान आदर मिळेल. तुम्ही जर असे केले तर आतापर्यंत पाकिस्तानला विरोध करणारांना आपल्या विरोधाबद्दल पश्चात्ताप होईल व ते केवळ पाकिस्तानची प्रशंसा करतील.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, १३४-७

# ३४. प्रार्थना प्रवचन, जून ८, १९४७

नवी दिल्ली,

जून ८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

प्रार्थनेच्या दरम्यानच्या काळात जरी आकाशातून बॉम्बवर्षाव झाला वा धरणीकंप झाला तरी आपल्या शांततेचा भंग व्हायला नको. गोपी वनात ज्याप्रमाणे बासरीचे सूर ऐकते त्याप्रमाणे ईश्वरभक्त ईश्वराचा आवाज आपल्या हृदयातून ऐकत असतो. इंग्रजीत त्याचे वर्णन 'शांततेचा आवाज' असे करतात. वेगळ्या शब्दांत आपण जेव्हा शांत असतो तेव्हाच तो आवाज ऐकू शकतो.

मी तुम्हाला आधीच सांगितले आहे की प्रा. कोसंबी हे प्रकांड पंडित होते आणि पालीवर प्रभुत्व असणाऱ्या काही मोजक्या लोकांमध्ये त्यांचा अंतर्भाव होत होता. त्यांचा सेवाग्राम आश्रमात मृत्यू झाला. सेवाग्राम आश्रमाचे प्रबंधक बलवंतसिंह लिहितात की मी आजपर्यंत असा मृत्यू पाहिलेला नाही. कबिरांनी पुढील दोह्यामध्ये वर्णन केल्याप्रमाणे तो मृत्यू होता.

भक्त कबीर म्हणतात - आपण कितीही काळजीपूर्वक हे वस्त्र धारण केले तरी ते जसे आहे तसे परत करावे लागणार आहे.

दास कबीर जतन सो ओढी,

ज्यो की त्यो धर दिनी चदरिया।

अशा प्रकारे आपण सर्व मृत्यूशी मैत्री करू शकलो तर ती फार चांगली गोष्ट होईल.

मिओ आणि जाट यांच्यामध्ये मी मध्यस्थ म्हणून काम करावे असे मला सांगण्यात आले. परंतु मध्यस्थ म्हणून मी कसा काम करू शकतो? पहिली गोष्ट म्हणजे या दोघांचीही मला ओळख नाही. आणि दुसरी गोष्ट म्हणजे ज्या माणसात आपला निर्णय अंमलात आणायला लावण्याचे सामर्थ्य असते तोच मध्यस्थ होऊ शकतो. माझ्याजवळ शस्त्रेही नाहीत आणि मी न्यायालयांची मदतही घेणार नाही. परंतु मला वाटते की आता त्यांनी स्वतःच संयम पाळला पाहिजे. जे घडले ते चागले असो वा वाईट कॉंग्रेस आणि लीगलाही तडजोड करावी लागली आहे. दुसरी बाजू हार मानेपर्यंत त्यांनी भांडण सुरू ठेवू नये. मिओ शूर लोक आहेत आणि जाट व अहिरही आपण हारलो असे म्हणण्याची संधी कोणाला देणारांपैकी नाहीत. सुदैवाने ते म्हातारे, मुलगे, आणि स्त्रियांना मारत

नाहीत. दोन्ही बाजूंनी भरपूर शस्त्रे गोळा केली आहेत. दोघेही शौर्याने लढत आहेत परंतु काहीही असले तरी त्यामुळे विनाश होत आहे. गरीब माणसाची झोपडी जाळली जाते तेव्हा त्याला तितकेच दुःख होते जितके राजाचा महाल जाळला गेल्यानंतर त्याला होते. आपल्या इतक्याजवळ हाणामाऱ्या सुरू आहेत आणि तरीही त्या बाबतीत आपण काहीही करू शकत नाही. त्या भागावर काळोख पसरला आहे. असे असले तरी तुमच्यापैकी जे त्यांना ओळखतात शक्य असेल तर त्यांनी त्यांच्यापर्यंत माझा आवाज पोहोचवावा आणि त्यांच्यातील लढाई थांबवावी. (पाहा प्रार्थना प्रवचन, मे २९, १९४७ आणि प्रार्थना प्रवचन जून ५, १९४७)

बंगालमधील विद्यार्थ्यांना मी बिघडवतो असा माझ्यावर आरोप आहे. माझ्यामुळे कोणीही बिघडत नाही असा माझा दावा आहे. बंगाल, बिहार वा नोआखालीत माझ्यामुळे कोणीही बिघडला नाही. मी केवळ परिस्थितीत सुधारणा घडवून आणू शकतो आणि तसेच मी केले आहे. आता पंजाबप्रमाणेच बंगालचीसुद्धा फाळणी होणार आहे. बंगालच्या एका भागात मुसलमानांचे बहुमत आहे तर दुसऱ्यात हिंदूंचे. मोठ्या संख्येतील हिंदूंना फाळणी हवी आहे कारण माणूस किती दिवस दंगलग्रस्त अवस्थेत राहू शकेल? त्यांचे म्हणणे आहे की एकदाचे विभाजन झाले की आमच्या जन्मभूमीत निदान आम्ही शांततेत तरी राहू शकू. बंगालमधील मुस्लिम लीगने हा प्रस्ताव अमान्य केला आहे. परंतु बंगालच्या मुस्लिम लीगला गंभीरपणे कोण घेतो? या नवीन प्रस्तावांतर्गत बंगालची फाळणी निश्चित आहे.

आता बंगालच्या फाळणीला विरोध केल्याचा माझ्यावर दोषारोप करण्यात येत आहे. हे खरे आहे की मला फाळणी नको आहे. परंतु संपूर्ण देशाची हिंदुस्तान आणि पाकिस्तानमध्ये फाळणी करण्यालाही माझा विरोध आहे. मी जरी एकटा हिंदू शिल्लक राहिलो असतो तरी मुस्लिम बहुसंख्या असलेल्या भागात जाऊन राहण्याचे माझ्यामध्ये धैर्य आहे. ते जास्तीत जास्त वाईट काय करू शकतात? मारू शकतात, याहून अधिक वाईट काय करू शकतात? परंतु ते मला मारणार नाहीत. ते एका एकाकी माणसाचे रक्षण करतील. ईश्वर माझे रक्षण करील. ज्याचे रक्षण करणारा कोणी नसतो त्याचे रक्षण नेहमीच ईश्वर करत असतो. म्हणूनच कवी म्हणतात की ईश्वर हा दुर्बलांची शक्ती आहे. मला बंगालची फाळणी मुळीच आवडलेली नाही. परंतु मी म्हणेन की हिंदूंनी भीतवर विजय मिळवावा आणि जिवाच्या वा वित्ताच्या हानीची फिकिर करणे बंद करावे. त्यांना प्रांतातील त्या भागात आपण सुरक्षित राहू असे जर वाटत असेल तर मी त्यांच्या मार्गात आडवा येईन असा कोणी विचारसुद्धा मनात आणू नये.

त्या दिवशी शरत बाबू माझ्याकडे आले होते. बंगालची फाळणी व्हावी अशी त्यांची इच्छा नाही. त्यांचे म्हणणे आहे की संपूर्ण प्रांताची एकच संस्कृती आहे आणि खानपानाच्या सवयीही सारख्याच आहेत. मग धर्माच्या नावावर बंगालची फाळणी का झाली पाहिजे? शरत बाबूंचा त्यांचा दृष्टिकोन आहे, माझा माझा. माझे वैयक्तिक मत अनेकांच्या मतांच्या आड येऊ शकत नाही.

मी नेहमीच चांगल्या गोष्टीत सहकार्य करतो. वाईट माणूस रामनाम घेत असेल तर मी त्यात त्याला साथ देऊ नये काय? आणि चांगला म्हणवला जाणारा माणूस वाईट कृत्यामध्ये गुंतला असेल तर मी त्याला साथ दिली पाहिजे काय? मी जर असे केले तर मी गांधी राहणार नाही कारण गांधी दानवाची भक्ती कधीही करत नाही. जो कोणी प्रेमाने चांगल्या हेतूने काम करेल त्याला माझा पाठिंबा मिळेल.

बंगालची फाळणी टाळण्याकरिता पैसा उधळला जात असल्याचे मला कळले आहे. पैशाच्या मदतीने कोणतीही कायम टिकणारी गोष्ट साध्य करता येऊ शकत नाही. पैशाच्या आधारे मिळवलेल्या मतांमध्ये जोर नसतो. असे कृत्य माझ्या जवळच्या नातलगाने केले तरी मी त्यात सहभागी होऊ शकत नाही. (पाहा पुढील विषय)

यामुळे मी शरत बाबूंना सांगेन की तुम्हाला आणि मला जरी बंगालची फाळणी थांबवण्याची इच्छा असेल तर सध्या तरी आपण ती गोष्ट विसरायला पाहिजे. अशुद्ध साधनांनी ते साध्य करता येऊ शकत नाही. अशुद्ध साधनांनी ईश्वराचा साक्षात्कार होऊ शकत नाही आणि अशोभनीय गोष्ट साध्य करण्याकरिता कोणतेही साधन वापरले तरी ते शुद्ध असू शकत नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन, पृष्ठ १३७- ४०

# ३५. प्रार्थना प्रवचन, जून ९, १९४७

नवी दिल्ली,

जून ९, १९४७

काही दिवसांपूर्वी मी तुमच्याशी अल्लोपनिषदासंबंधी बोललो होतो ते कोणत्याही धर्मग्रंथांत सापडत नाही अशी तक्रार करणारी पत्रे काही पत्रे मला आली आहेत. मी याचा उल्लेख स्मरणाने केला होता. यामुळे मी एका मित्राशी (मथुरादास त्रिकमजी, पाहा यापुढील विषय) यासंबंधी चर्चा केली. त्यांनी मला लिहून कळवले की ज्या अल्लोपनिषदाचा मी उल्लेख केला त्यात सात मंत्र आहेत. हे उपनिषद अथर्व वेदाइतके जुने आहे. त्यांनी इतरही पुष्कळ गोष्टी सांगितल्या. त्या या विषयाच्या विद्यार्थ्यांकरिता उपयोगी असतील. यामुळे त्या पत्रातील हा भाग मी सांगत नाही.

*याशिवाय मला जयचंद्र विद्यालंकार यांचे पत्र आले. ते म्हणतात - महाराणा कुंभ, राणासंग यांचे आजोबा, हे मुसलमानांच्या आक्रमणाला संघटित विरोध करणारे पहिले होते. त्यांनी मुसलमानांनी आक्रमिलेला गुजरात आणि माळवामधील प्रदेश परत ताब्यात घेतला होता आणि चित्तोड येथे विजयस्तंभ उभारला होता. त्या विजयस्तंभावर बाजूबाजूलाच विविध हिंदू देवीदेवतांचे व त्यांच्या बाजूला ब्रह्मा, विष्णू आणि महेश व अल्ला यांचे नावसुद्धा कोरलेले आहे. महाराण रणजीतसिंह आणि छत्रपती शिवाजी महाराज इस्लामचा कसा आदर करत होते ही गोष्ट सर्वश्रुत आहे. तुमच्या प्रार्थनेत कुराणातील पाठ म्हणण्याला विरोध करणारे हिंदू धर्माचे हे कैवारी त्या विजयस्तंभावर अल्लाचे नाव कोरण्याला का विरोध करत नाहीत?*

हिंदू-मुसलमान यांच्यातील वैमनस्याचे कारण चुकीच्या इतिहास लेखनात आहे हे निदर्शनास आणून देत विद्यालंकारजी लिहितात की इतिहासाचे अध्यापन योग्य दिशेने होईल हे पाहा. तसे केल्याशिवाय हिंदू-मुसलमान ऐक्याकरिता करण्यात आलेल्या कोणत्याही प्रयत्नाला अपयश येणे अपरिहार्य आहे.

इतक्यात माझ्यावर टीकेचा भडिमार करणारी किती तरी पत्रे येत आहेत. देशाचे विभाजन म्हणजे माझ्या शरीराचे विभाजन हे माझे शब्द कसे अर्थहीन ठरले आहेत हे दाखवत एक मित्र लिहितो की देशाच्या फाळणीचा मी प्रखर प्रतिकार केला पाहिजे. परंतु या बाबतीत मला दोष देता येऊ शकतो असे मला वाटत नाही. देशाची फाळणी होऊ नये असे जेव्हा मी म्हणालो होतो तेव्हा जनतेचा मला पाठिंबा आहे असा माझा विश्वास होता. परंतु माझ्या विचाराच्या विरोधी जनमत आहे

असे मला आढळून येते तेव्हा मी माझे मत जनतेवर लादले पाहिजे काय? आपण खोटेपणा आणि अधमपणाशी तडजोड करू नये असे मी सतत म्हणत आलो आहे. आणि आज मी आत्मविश्वासाने म्हणू शकतो की माझ्याबरोबर सर्व मुसलमानेतर जरी असते तरी मी हिंदुस्तानची फाळणी होऊ दिली नसती. परंतु आज सर्वसामान्य लोकमत माझ्याबरोबर नाही हे मी मान्य केले पाहिजे आणि म्हणून मी बाजूला झालो पाहिजे. सत्य आणि अहिंसाच असत्य आणि हिंसेवर विजय मिळवू शकतात हा पाठ गत तीस वर्षांपासून आपण शिकण्याचा प्रयत्न करत आहो परंतु सध्या तो विसरण्याकडे आज आपली प्रवृत्ती झाली आहे. अधीरपणावर धीर धरूनच विजय मिळवता येतो आणि उत्तेजित अवस्थेवर शांतपणा धारण करून. आज आपण आपल्या सावलीलासुद्धा घाबरतो. माझ्यात आणि पाकिस्तानला जे विरोध करू इच्छितात त्यांच्यात देशाच्या फाळणीला विरोधाची गोष्ट सोडली तर दुसरी कोणतीही गोष्ट समान नाही. त्यांच्या आणि माझ्या विरोधात मूलभूत अंतर आहे. प्रेम आणि शत्रुत्व या गोष्टी एकत्रित कशा येऊ शकतात?

दुसरा एक मित्र लिहितो की इतर व्हाईसरायांपेक्षा हे व्हाईसराय अधिक धोक्याचे आहेत. इतर व्हाईसराय आपल्याला तलवारीच्या बळावर चिरडत होते तर हे गोडगोड बोलून कॉंग्रेसला सापळ्यात अडकवत आहेत. या मताशी मी कधीही सहमत होऊ शकत नाही. पत्रलेखकाने अनाहूतपणे व्हाईसरायची स्तुती केली आहे आणि कॉंग्रेसच्या मंत्र्याच्या बुद्दिमत्तेला व कार्यक्षमतेला कमी लेखले आहे. जनतेचे मत, म्हणजे ज्यांच्यात मत धारण करण्याची क्षमता आहे, हे कॉंग्रेसच्या नेत्यांच्या बाजूने आहे हे त्यांना का कळत नाही? पुढारी मूर्ख नाहीत. त्यांनाही फाळणी तिरस्करणीय वाटते, परंतु देशाचे प्रतिनिधी म्हणून ते लोकमताच्या विरोधात जाऊ शकत नाहीत. त्यांना जनतेकडून शक्ती मिळालेली असते. आणि पुढारी जेव्हा निवडून आलेले प्रतिनिधी असतात वा आपलेच लोक देशाशी द्रोह करतात तेव्हा कोणत्याही परिस्थितीत व्हाईसरायवर टीका करणे उचित नसते. यथा राजा तथा प्रजा या म्हणीपेक्षा हिचा व्यत्यास म्हणजे यथा प्रजा तथा राजा असे म्हणणेच अधिक बरोबर असतो.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १४०-२

# ३६. प्रार्थना प्रवचन, जून १०, १९४७

नवी दिल्ली, जून १०, १९४७

बंधूनो आणि भगिनींनो,

बंगालच्या निर्णयासंबंधी मी जे काही म्हणालो त्यात मी कोणत्याही पक्षावर आरोप केले नव्हते. मी जे काही ऐकले होते त्याचा मी केवळ पुनरुच्चार केला होता. बंगालची फाळणी वाचली आणि अविभाज्य बंगाल कायम राहिला तर कोणाला आनंद होणार नाही? परंतु असत्य, भ्रष्टाचार आणि लाचलुचपत यांच्या आधारे हे ऐक्य टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करणारांशी मी हात मिळवू शकत नाही. एकाही बंगाली माणसाने असे केले नसेल तर, मग तो हिंदू असो की मुसलमान, काहीही बोलण्याची गरज नाही. एखादी टोपी आपल्या डोक्यात नीट बसत नसेल तर ती घालण्याची गरज काय?

परंतु बंगालमध्ये काही तरी चुकीचे शिजत आहे अशा संशयाने लोकांच्या मनात घर केले आहे. ज्या लोकांनी मला हे सांगितले त्यांनी आपली नावे आणि पत्तेसुद्धा दिलेले आहेत. परंतु ते इथे उघड करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. ते जर मला खोटे सांगत असतील तर ते चूक आहे आणि त्यांना शिक्षा झाली पाहिजे. परंतु कोणालाही शिक्षा करणारा मी कोण? कोणालाही शिक्षा करण्याचा मला अधिकार नाही.

परंतु माझ्याबरोबर एक फार मोठी गोष्ट आहे आणि ती म्हणजे लोकमत. लोकमतामध्ये प्रचंड शक्ती असते. हिंदुस्तानात अजून याचे महत्त्व लोकांच्या लक्षात आलेले नाही. इंग्रजी भाषेत या अभिव्यक्ती मागे फार जोरदार गर्भितार्थ आहे. इंग्रज ज्याला लोकमत म्हणतात त्याच्यासमोर राजासुद्धा असहाय असतो. इतकेच नाही तर या लोकमतामुळे महान कुटुंबाचे वारस, घणाघाती वक्ता आणि प्रकांड पंडित असलेले दुर्दम्य चर्चिल यांनाही इतक्या मोठ्या उपलब्धीनंतरही आपले पद सांभाळून ठेवता येणे शक्य झाले नाही. याचा अर्थ इंगलंडमधील लोकमत अतिशय जागृत आहे, त्याच्या विरोधात कोणीही काहीही करू शकत नाही.

हिंदुस्तानात जनमत इतके जागृत नाही. तसे असते तर माझ्यासारखा क्षुल्लक माणूस महात्मा झाला नसता. आणि महात्मा झ्यानंतर मी जे काही करतो ते लोकांना चांगलेच वाटते. ते काहीही असले तरी हिंदुस्तानात माणूस महात्मा झाला की त्यानंतर त्याने बरेवाईट काहीही केले तरी तो जनतेला उत्तरदायी राहत नाही.

टॉलस्टॉय फार मोठे योद्धा होते. परंतु त्यांच्या जेव्हा लक्षात आले की युद्ध चांगली गोष्ट नाही तेव्हा युद्ध नाहीसे करण्याच्या कामाला त्यांनी आपले जीवन वाहून टाकले. ते म्हणाले होते की जगातील सर्वात मोठी शक्तिशाली गोष्ट जनमत आहे आणि ते सत्य आणि अहिंसेतून निर्माण होत असते.

हेच करण्याचा मी प्रयत्न करतो आहे. परंतु माझ्या प्रयत्नातूनसुद्धा काहीही निर्माण होणार नाही जोपर्यंत हिंदुस्तानातील लोकमतामागे धैर्य आणि सत्य नसेल.

परंतु आज अशी परिस्थिती नाही. आपल्याला १५ ऑगस्टला जो उपनिवेशाचा दर्जा मिळणार आहे तो आपल्याला नको आहे असा ठसा माझ्या मनावर उमटला आहे. याचे कारण इतक्या सगळ्या वर्षात जे लोकमत तयार होत होते ते संपूर्ण स्वातंत्र्याच्या बाजूने होते. उपनिवेशाची ही चर्चा देशाला बोचते. ही भावना समजून घेता येते आणि तरीही ती योग्य नाही. हे बरोबर नाही कारण उपनिवेशाच्या दर्जाच्या क्षमतेशी आपण अनभिज्ञ आहो. पहिली गोष्ट म्हणजे उपनिवेशाचा दर्जा मिळाल्याबरोबर ब्रिटिश हिंदुस्तानातून दोन महिन्यात निघून जातील. दुसरी गोष्ट म्हणजे आपली इच्छा असेल तेव्हा आपण उपनिवेशाचा दर्जा सोडून देऊ शकतो. असे असूनही आपण जर आपल्या वेडेपणाचाच आग्रह सुरू ठेवला तर इतरांना क्वचितच दोष देता येईल. असो, लोकमताच्या विषयाकडे परत वळायचे तर आपण जर जागृत राहिलो तर सर्व काही ठीक होईल. जर लोकमताच्या दडपणामुळे कोणतीही लाच न देता, कोणत्याही भ्रष्ट पद्धतीचा अवलंब न करता बंगालने जर एक राहण्याचा निर्णय घेतला ती गोष्ट फारच चांगली होईल. परंतु आपण इतक्या वर्षांपासून गुलाम आणि भ्याड होतो की आपल्याला लाजिरवाणे वर्तन सोडवत नाही.

परंतु एखादा माणूस अधमपणाकडे न वळताही लोक जर त्याच्यावर तसा आरोप करत असतील तर त्याने दुःखी होण्याचे कारण काय? उदाहरणार्थ असे अनेक उच्च पदावरील अधिकारी आहेत की जे भ्रष्ट झालेले नाहीत, स्वच्छ आहेत; आणि तरीही त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात येतात. यामुळे ते अस्वस्थ होत नाहीत. मला जर कोणी अधम आणि भ्रष्ट माणूस म्हणत असेल तर त्याकरिता मी रडत बसलो पाहिजे काय? कोणी तरी मला अधम म्हणाला म्हणून मी अधम होतो काय? मी मान्य करतो की काही वेळा लोक आकसामुळे वा भ्याडपणामुळे असे आरोप करत असतात. आपण कोणाबद्दलही वाईट बोलू नये.

आपण लोकांमधील चांगल्या गोष्टी पाहिल्या पाहिजे. आपल्याला जर स्वतंत्र व्हायचे असेल तर आपण इतरांमध्ये दोष पाहू नये, आपण त्यांच्या चांगल्या बाजूकडे पाहू या व त्या बाबतीत प्रोत्साहन देऊ या.

आता हिंदुस्तानची फाळणी वस्तुस्थिती आहे आणि कॉंग्रेसला ती स्वीकारावी लागली असे मी गृहीत धरतो. परंतु फाळणीमुळे आपल्याला आनंद होत नसेल तर तिच्यामुळे आपण दुःखीसुद्धा का व्हावे? आपण केवळ आपल्या अंतःकरणाला शरण जाऊ देऊ नये. आपल्या हृदयाला विभाजनापासून आपण वाचवले पाहिजे. असे केले नाही तर आम्ही दोन राष्ट्र आहो हा जिना साहेबांचा आरोप खरा ठरेल. माझा यावर कधीही विश्वास नव्हता. आपण जर एकाच पूर्वजांपासून जन्माला आलो असू तर केवळ आपला धर्म बदलल्यामुळे आपले राष्ट्रीयत्व  बदलते काय? सिंध, पंजाब आणि शक्य आहे की सरहद्द प्रांतसुद्धा पाकिस्तानमध्ये गेले तरी ते आपले राहणार नाहीत काय? मी तर ब्रिटनलासुद्धा विदेश मानत नाही. असे असताना मी पाकिसतानला दुसरा देश का मानले पाहिजे?

असे म्हणता येईल की मी हिंदुस्तानचा आहे आणि हिंदुस्तानमध्ये मुंबई प्रांताचा आहे. आणि मुंबई प्रांतातही गुजरातचा, गुजरातमध्ये काठेवाडचा आणि त्यातही मी लहानशा पोरबंदर शहराचा आहे. परंतु मी पोरबंदरचा आहे म्हणून मी संपूर्ण हिंदुस्तानचासुद्धा आहे म्हणजे मी पंजाबी आहे आणि मी पंजाबमध्ये गेलो तर तिथे मी माझ्या घरात असल्याप्रमाणे राहीन आणि माझा खून करण्यात आला तर मी मृत्यूचासुद्धा स्वीकार करीन.

पाकिस्तान एखाद्या सम्राटाचा होणार नाही तर तेथील जनतेचा असेल आणि अल्पसंख्याकांनासुद्धा तिथे न्यायाची वागणूक मिळेल हे जिनासाहेबांचे शब्द ऐकून मला आनंद झाला. यावर मी केवळ इतकेच म्हणेन की ते बोलतात त्याप्रमाणे त्यांनी वर्तन करावे. हे शब्द त्यांनी आपल्या अनुयायांच्या मनावरही ठसवावे आणि त्यांना युद्धाची भाषा विसरण्याकरिता सांगावे.

आम्हीसुद्धा आमच्या देशात अल्पसंख्याकांना चिरडण्याचा प्रयत्न करणार नाही. इतकेच नाही तर मूठभर पारसीसुद्धा आमचे सहभागीदार असतील. तुम्ही मद्यपी आहा असे म्हणून हिंदू आणि मुसलमान जर एक होऊन त्यांचा विध्वंस करू इच्छितील  तर ते बरोबर होणार नाही. पारसी माझे मित्र आहेत आणि मी त्यांना सांगत असतो की तुम्ही जर मद्यपान सोडणार नाही तर तुम्ही स्वतःच तुमचे मरण ओढवून घ्याल. परंतु आम्ही त्यांना मारणार नाही. अशाच प्रकारे हिंदू आणि शिखांचे पंजाबमध्ये रक्षण झाले पाहिजे. मुसलमानांनी त्यांना प्रेमाची आणि बंधुभावाची वागणूक दिली पाहिजे व त्यांना आश्वस्त केले पाहिजे. मुसलमान जर त्यांना दहशत दाखवत असतील तर हिंदू आणि शिखांनी न घाबरता त्यांना सांगितले पाहिजे की दहशतीच्या वातावरणाखाली आम्ही इस्लाम स्वीकारणार नाही आणि गोमांसही खाणार नाही. (स्रोतात मांस असा शब्द आहे.) आपण नवीन जमात झालो आहो आणि मुसलमानांना आपण सामावून घेऊ शकत नाही असे हिंदूंनी समजू नये.

हिंदुस्तानच्या या भागात आपले बहुमत आहे. आपण बहुसंख्याकांना सुजाण केले पाहिजे आणि धैर्याने काम केले पाहिजे. तलवारीत धैर्याचा वास नसतो. आपण सत्यवादी होऊ, आपण ईश्वराचे सेवक होऊ आणि गरज पडली तर आपण आपला जीव देणयाचीही तयारी ठेवू. आपण जेव्हा असे करू तेव्हा हिंदुस्तान आणि पाकिस्तान दोन वेगवेगळे देश नसतील आणि कृत्रिम फाळणी अर्थहीन होऊन जाईल. आपण जर आपसात भांडलो तर आपण दोन राष्ट्रे असल्याचा आरोप सिद्ध होईल. हिंदुस्तान आणि पाकिस्तान दोन स्वतंत्र राष्ट्र झाले असले तरी आपली हृदये वेगवेगळी होऊ नये.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १४२-६

# ३७. प्रार्थना प्रवचन, जून ११, १९४७

नवी दिल्ली, जून ११, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

बंगालच्या होऊ घातलेल्या विभाजनासंबंधी मी जरी तुमच्याशी बोललेलो असलो तरीही मी तुमच्याशी त्यासंबंधी परत तिसऱ्यांदा बोलू इच्छितो. मला नुकताच एक पत्र मिळाले आहे. (एच. एस. सुऱ्हावर्दी यांच्याकडून, पुढील विषय पाहा) ते पूर्णपणे रागाने भरलेले आहे. मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे राग हा वेडाचाच एक लहानसा प्रकार असतो. जो माणूस रागाला बळी पडतो त्याच्यात तारतम्यभाव राहत नाही. मला मिळालेले पत्र असेच रागाने भरलेले आहे.

लेखकाचे म्हणणे आहे की मी बंगालींचे फार मोठे नुकसान केले आहे. मी बंगालींचे नुकसान कसे केले आहे? बंगालचे तुकडे होऊ नये असे मी म्हणालो होतो. ते होऊ नये असे मला वाटते हे खरे आहे. याकरिता आमच्यासमोर जर एखादा न्याय्य प्रस्ताव सादर करण्यात आला तर मी म्हणेन की बंगाली हा सर्वप्रथम बंगाली असतो, मग तो हिंदू असो, मुसलमान असो वा ख्रिश्चन असो. तो जर आपल्या मातृभाषेला सुरक्षित ठेवू इच्छित असेल, देशाला सुरक्षित ठेवू इच्छित असेल तर त्यात कोण आडवा येऊ शकतो? मी तुम्हाला सांगेन की कॉंग्रेससुद्धा त्या गोष्टीच्या आड येऊ शकत नाही ना लीग आडवी येऊ शकते. बंगाल जर एक राहू शकत असेल तर ती फार चांगली गोष्ट होईल हे स्पष्ट आहे. परंतु हे कसे होईल? हा प्रश्न आहे. आपल्याला जर काही चांगले साध्य करायचे असेल परंतु त्याकरिता आपण वाईट साधनाचा उपयोग केला तर आपण आपल्या उद्दिष्टापर्यंत पोहोचू शकणार नाही. तुम्ही चुकीचा मार्ग धरला आणि तुम्हाला पूर्वेकडे जायचे असेल तर तुम्ही पश्चिमेकडे पोहोचाल. यामुळे आपण कधीही चुकीच्या मार्गाचे अनुसरण करू नये. आपण योग्य मार्गाने गेलो पाहिजे. मी नेहमी हेच सांगत असतो. जे बरोबर असते त्या बाजूने मी उभा राहत असतो. जर एखाद्याची बाजू न्याय्य बाजू नसेल, मग तो माझा भाऊ असो वा मुलगा, तर मी त्याची फिकीर करणार नाही. यामुळे बंगालींना मी सांगत असतो की जर बंगालचे विभाजन होणार असेल तर ते तुमच्या स्वतःच्या निर्णयामुळे होईल आणि बंगाल एक राहणार असेल तर तोसुद्धा तुमच्या निर्णयामुळे. अजून तरी तसे काहीही घडलेले नाही. बंगालकरिता इतके पुरे.

परंतु माझ्या नजरेस इतरही गोष्टी आणून देण्यात आल्या आहेत. आज काही मित्र चंबळपूरहून मला भेटण्याकरिता आले. ते म्हणाले, "आम्ही आतापर्यंत तिथे सुखासमाधानात राहत होतो.

अजूनही आम्ही तिथून पळ काढलेला नाही. परंतु आम्ही पुढे काय केले पाहिजे?" पाकिस्तानमध्ये आपली काय अवस्था होईल याबद्दल ते साशंक होते आणि चंबळपूरचा निश्चितपणे पाकिस्तानमध्ये समावेष होणार आहे. मी त्यांना सांगितले की पाकिस्तानमध्ये काहीही परिस्थिती असली तरी तुम्ही हिंदुस्तानात राहत आहा. हिंदुस्तानच्या नकाशाची जरी दोन भागात वाटणी झालेली असली तरी तुमच्यावर त्याचा काय परिणाम होतो? मी त्यांना म्हणालो की तुम्ही शूर लोक आहा. तुम्ही ईश्वराशिवाय इतर कोणालाही घाबरत नाही. जो ईश्वराला घाबरतो त्याला जगात इतर कोणालाही घाबरण्याची आवश्यकता नसते. यामुळे चंबळपूर सोडण्याचा सल्ला मी तुम्हाला देऊ शकत नाही. आम्ही आमचे रक्षण कसे करावे हे जाणून घेण्याची त्यांची इच्छा होती. तुम्ही जिथे आहा तिथून हालू नका असे मी नोआखालीतील हिंदूंना सांगितले होते. त्याना शस्त्र पाहिजे होती. परंतु ते शस्त्रांनी काय करणार होते? सरकारजवळ शस्त्र असतात आणि तुम्ही अल्पसंख्य असूनही जर सरकार तुमचे रक्षण करू शकत नसेल तर मग सरकार अपात्र आहे. असे सरकार गेले पाहिजे आणि मी त्यांना सांगितले की अशा सरकारला जाण्याकरिता भाग पाडा. इथे जर काही थोडे मुसलमान राहिले तर त्यांची कत्तल केली पाहिजे काय आणि सरकारने त्याकडे केवळ पाहत राहिले पाहिजे काय? असे असेल तर सरकार सरकार राहणार नाही. ते जुलमी होईल. आणि आपण जुलूमशाहीत का राहावे? ब्रिटिशांशी आपण किती तरी वर्षे झगडत होतो. आता आपण कढईतून आगीत उडी घ्यावी काय? याकरिता आपण इतका त्रास सहन केला होता काय? इतका आवाज केला, सत्याग्रह आणि असहकार सुरू केला तो याकरिता केला होता काय?

हे बरोबर होणार नाही. बिहारमधील मुसलमानांना मी हेच सांगितले होते. ते म्हणाले की तुम्ही महात्मा आहा म्हणून असे बोलू शकता, परंतु आम्ही व्यापारी आहो, आमचा व्यवसाय आहे, आमचे कुटुंब आहे, आम्हाला मुलेबाळे आहेत, या सर्वांची आम्हाला काळजी घ्यावी लागत असते. तुम्ही आम्हाला मार्ग दाखवला पाहिजे. मी म्हणालो मी असहाय आहे. माझ्या म्हातारपणी मी बदलू शकत नाही.

ते काय म्हणणार? ते चांगले लोक होते आणि मी व्यस्त होतो. मी तुम्हाला केवळ शूर होण्याचा सल्ला देऊ शकतो असे म्हणून मी त्यांना जायला सांगतले. मी मोठमोठ्या गप्पा हाणू शकत नाही. माणूस शूर होण्याकरिता जन्मला आहे. माणसाचा जन्म भ्याड होण्याकरिता वा घाबरण्याकरिता झालेला नाही. माणूस ईश्वराचा भाग आहे. त्याच्यात ती दैवी ठिणगी आहे. गाय वा बैल वा घोडा यांच्यात ती दैवी ठिणगी असल्याचे मी ऐकले नाही. हे खरे आहे आहे की प्राणिमात्र ईश्वराची लेकरे आहेत आणि आपण कमीअधिक प्रमाणात तसेच आहो. परंतु माणूस आणि इतर प्राण्यांमध्ये अंतर हे

आहे की आपण ज्याप्रमाणे माणसाबद्दल सांगू शकतो की त्याच्यात दैवी ठिणगी आहे त्याप्रमाणे इतर प्राण्यांबद्दल आपण तसे काही सांगू शकत नाही. मग आपल्यात जर दैवी ठिणगी असेल तर ती परस्परांना घाबरण्याकरिता आहे काय? अशा प्रकारे मी त्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न केला.परंतु त्यांना हे कसे कळणार?

श्रीयुत जिना काही तरी मोठे करत आहेत. या काळात पाकिस्तान वास्तवात येईल असे कोणी स्वप्नातही कल्पिले नव्हते. परंतु पाकिस्तान आज वास्तव आहे. हे खरे आहे की ते अजून अस्तित्वात आलेले नाही, अजून त्याची नर्मिती झालेली नाही. परंतु १५ ऑगस्टला त्याचा निश्चित जन्म होईल. मी जेव्हा याचा विचार करतो तेव्हा मी मलाच सांगतो की मी याकरिता शोक करण्याचे कारण नाही. कॉंग्रेसचे म्हणणे आहे की विभाजनाला पर्याय नव्हता. जिना म्हणतात की हिंदुस्तानचे विभाजन होईपर्यंत मी शांत बसणार नाही. तर विभाजन होऊ द्या. परंतु यामुळे मी हात वर करून ही फाळणी मान्य केली पाहिजे काय? मी म्हणालो होतो की कोणीही मला कापून माझे तुकडे करू शकत नाही. यामुळे कोणीही हिंदुस्तानला कापून त्याचे तुकडे करू शकत नाही. हे केवळ बोलणे आहे. मी तुम्हाला सांगतो की तुम्ही जर सत्यवादी व्हाल तर मग पाकिस्तान असो वा हिंदुस्तान असो वा अजून कोणतेही नाव तुम्ही द्या तर तुमच्यासमोरील कार्य तेच असेल. ईश्वराने ज्याला एक केले आहे त्याचे तुकडेतुकडे करून त्याला वेगवेगळे कोण करू शकतो? परंतु या लोकांचे तुम्ही काय करू इच्छिता असे मी जिनांना विचारू शकतो. पाकिस्तानमध्ये कोणकोणत्या भागांचा समावेश होईल याबद्दल सहमती झाली आहे. चंबळपूरचा अशा प्रकारे समावेश झालेला आहे. त्याला हलवता येऊ शकत नाही. तेथील लोकांनी काय करावे? त्यांनी पळून जावे काय? त्यांनी तिथेच राहावे असे त्यांना वाटते काय? ते म्हणतात की सर्वांना न्याय मिळेल. म्हणजे पाकिस्तानमध्ये सर्वांना सारखे नियम लागू होतील आणि हिंदू वा ख्रिश्चन असल्यामुळे कोणाबद्दलही भेदभाव केला जाणार नाही.

आज माझ्या जिभेतील, माझ्या शब्दातील शक्ती निघून गेलेली आहे. परंतु त्यांच्यात अजूनही शक्ती आहे. ते पाकिस्तानचे सत्ताधारी आहेत आणि हे कोणीही नाकारू शकत नाही. यामुळे तुमचा काय करण्याचा हेतू आहे असे मी पाकिस्तानच्या शासकाला विचारू इच्छितो. त्यांनी आपले हेतू जाहीर करावे. आता मी अजून थोडा पुढे जाईन. बादशाह खान मित्र आहेत. बादशाह खान इतरत्र कुठे तरी जाऊ शकतात. ते मौलाना आझादबरोबर राहू शकतात. त्यांचा सुंदर बंगला आहे. ते तिथे त्यांना हवे ते खाऊ घालू शकतात. ते जवाहरलालबरोबर राहू शकतात. त्यांचा फार मोठा प्रासाद आहे. ते काही माझ्या गरिबाच्या झोपडीसारखे नाही. आणि मी त्यांना काय खायला घालू शकतो? मी त्यांना मांसाहार देऊ शकत नाही. मी जे काही खातो ते घेण्याची त्यांची तयारी आहे. ते

अन्नधान्य, थोडीशी फळे बस इतके पुरे. इतक्याने ते खुष होतात आणि यामुळेच ते माझे मित्र आहेत. ते फकीर आहेत. डॉ. खानसाहेब त्यांचे भाऊ आहेत. बादशाह खानच्या मदतीशिवाय डॉ. खान साहेब काहीही करू शकत नाहीत. यामुळेच ते बादशाह वा राजा आहेत. ते तलवारीच्या मदतीने राजा झाले नाहीत तर प्रेमाच्या, सेवेच्या मदतीने. मी जेव्हा तिथे जातो तेव्हा त्यांना या नावाशिवाय इतर नावाने संबोधल्याचे मला आठवत नाही. केवळ इथे त्यांना सरहद्द गांधी म्हणतात. तिथे कोणी गांधीलासुद्धा ओळखत नाही, मग सरहद्द गांधीची गोष्ट दूरच.

तर बादशाह खान आणि इतरांनी सार्वमत घेण्याचे ठरवले आहे. अजून चेतवण्यात आलेल्या भावना शांत झालेल्या नाहीत कारण पठाण गरम रक्ताचे लोक आहेत. सार्वमतातून काय मिळणार आहे? ते सर्वच्या सर्व आम्हाला पाकिस्तान पाहिजे वा हिंदुस्तान पाहिजे असे म्हणणार नाहीत. तुम्हाला पठाणांमध्ये फूट पाडायची आहे काय आणि पठाणांवर कोणता तरी एक भाग लादला जाणार आहे काय असे मी पाकिस्तानच्या पुढाऱ्यांना विचारेन. यामुळे पठाणांना पाकिस्तानचे स्वरूप समजून सांगणे उचित होणार नाही काय?

पाकिस्तान देण्यात आला आहे. कॉंग्रेसने तो इच्छेने वा अनिच्छेने मान्य केला आहे. आता पंजाबचे विभाजन होणार आहे. बंगालचे विभाजन होणार आहे. मी तुम्हाला सांगतो की पंजाब आणि बंगालची फाळणी न होऊ देणे पाकिस्तानच्या पुढाऱ्यांच्या हाती आहे. ते का म्हणत नाहीत की ‘आता आम्हाला पाकिस्तान मिळाला आहे, तुम्ही का घाबरता? आम्ही झगडलो होतो. कोणाचा दोष होता आणि कोणाचा नव्हता हे आपण विसरू या. राजकीय कार्यसिद्धीकरिता आम्ही तलवारीचा उपयोग करणार नाही अशा घोषणेवर मी श्रीयुत गांधींबरोबर नुकताच सही केली आहे. त्या गोष्टी आम्ही युक्तिवादाने मिळवू. मग आपण युक्तिवाद करू या. मी सार्वमताचा आग्रह धरणार नाही.’ जिना जर म्हणतील की आम्ही सर्व पठाणांचे स्वागत करू आणि जे आम्हाला शत्रू शमजतात वा आम्ही ज्यांना शत्रू समजतो उदाहरणार्थ खुदाई खिदमदगार, खान बंधू, हिंदू, शीख पारसी, आणि ख्रिश्चन इत्यादी सर्वांचे आम्ही स्वागत करू. तर तुम्ही पाकिस्तानमध्ये काहीही गमावणार नाही असे मी म्हणेन. त्यांनी इतके का म्हणू नये? पाकिस्तान कोणता आकार घेणार आहे हे त्यांनी का सांगू नये? इतके जर त्यांनी प्रत्येकाला सांगितले तर प्रत्येकजण सुखी होईल.

पाकिस्तान ही काही काल्पनिक गोष्ट नाही. हिंदुस्तान हीसुद्धा काही काल्पनिक गोष्ट नाही. मी कॉंग्रेसलासुद्धा स्पष्ट करण्याकरिता सांगेन. कोणत्याही विषाबद्दल दयामाया दाखवू नये. विष जर पसरत राहिले तर परिणाम काय होईल? असे झाले तर निर्माण होणारे पाकिस्तान वाईट गोष्ट असेल. इंग्रज जाणार आहेत आणि त्यांना शिव्या देण्याकरिता हिंदू आणि मुसलमान इथे मागे राहतील.

पाकिस्तान अपरिहार्य नव्हता. परंतु हिंदू आणि मुसलमान घटनासमितीत एकत्रित काम करण्याबद्दल निश्चित निर्णय घेऊ शकत नाहीत असे त्यांना आढळून आले तेव्हा ते काय करू शकणार होते? मग ते दोन्ही पक्षांशी बोलले आणि हिंदुस्तान आणि पाकिस्तान ही दोन वेगवेगळी राष्ट्रे आहेत या मुद्द्यावर ते सहमत झाले. याला तुम्ही काय नाव देता याच्याशी मला काहीही देणेघेणे नाही. परंतु हे योग्य पद्धतीने केले पाहिजे. हे जर योग्य पद्धतीने केले नाही तर विष तसेच राहील. मला माफ करा, माऊंटबॅटन आजच आले आहेत. ते काही मनात वाईट हेतू घेऊन आलेले नाहीत. परंतु त्यांच्या हातून काही हानिकारक घडेल, काही वाईट होऊन जाईल अशी भीती मला वाटते. त्यांनी जे केले पाहिजे ते केले नाही आणि ते मला खुष करण्याची प्रयत्न करतील, कॉंग्रेसला खुष करण्याचा प्रयत्न करतील, जिना साहेबांना खुष करण्याचा प्रयत्न करतील, तुम्हाला खुष करण्याचा प्रयत्न करतील व सगळ्यांना खुष करण्याचा प्रयत्न करतील. परंतु असे केल्याने कोणीही खुष होणार नाही. जो माणूस सर्वांना खुष करण्याचा प्रयत्न करतो तो अपयशी होतो. हा परमेश्वराचा नियम आहे. हा संपूर्ण जगाचा अनुभव आहे. यामुळे सर्वांना खुष करण्याची ते अपेक्षा करू शकत नाही. मी तर म्हणेन की कॉंग्रेस जर चुकत असेल तर त्यांनी तिला धारेवर धरले पाहिजे. त्यांनी म्हटले पाहिजे, 'मी इथे आलो आहे. मी आरमारातील अधिकारी आहे आणि मला स्पष्ट बोलणे आवडते.' त्यांनी म्हणायला पाहिजे की तुम्ही जे करत आहा ते बरोबर नाही. कॉंग्रेस जे करते आहे ते बरोबर नाही. परंतु आपण त्यांना त्रास का द्यावा? अखेरीस त्यांचा धर्म आपल्या धर्मापेक्षा वेगळा आहे. परंतु भावांनी भावांविरुद्धा का भांडावे? आताच का? एक वेळ होती जेव्हा आम्ही भांडलो. आम्ही रक्त सांडले. ज्याकरिता आम्ही भांडलो ते तर आम्हाला मिळाले.

सौदी अरेबियाचे इब्न सौद यांनी कायदे आझमना तार पाठवल्याचे मला कळले. त्या तारेत ते म्हणाले की जे काही घडले त्याने मी खुष नाही. परंतु जगात आता शातता नांदेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. कायदे आझमनी आपल्या उत्तरात सांगितले की मलासुद्धा शांतता हवी आहे. परंतु शांतता कुठून येणार आहे? आज हिंदुस्तानात शांतता नाही आणि हिंदू आणि मुसलमान शत्रूप्रमाणे भाडत राहिले तर शांतता कुठून येणार? मी म्हणेन की मला येणाऱ्या सर्व तारा, माझ्यावर काढला जाणारा सर्व राग व्यर्थ आहे. मी इतकेच म्हणेन की जिथे अहिंसा आहे तिथेच ईश्वर आहे. जिथे हे नाही तिथे काहीही नाही. मी केवळ इतकेच म्हणेन की श्रीयुत जिनांच्या खांद्यावर फार मोठी जबाबदारी आहे. त्यांनी जगाला परत आश्वस्त केले पाहिजे. जे पाकिस्तानमध्ये आहेत आणि जे पाकिस्तानमध्ये येऊ इच्छितात त्यांना कोणत्याही परिस्थितीत त्यांनी आश्वस्त केले पाहिजे. त्यांना त्यांनी आपल्याकडे ओढले पाहिजे. जर ते असे करू शकत नसतील तर ते हिंदुस्तानकरिता वाईट असेल आणि पाकिस्तानकरिताही वाईट असेल. ते हिंदूंकरिता वाईट असेल आणि

मुसलमानांकरिताही वाईट असेल. मी कोणाचेही वाईट व्हावे असे इच्छू शकत नाही. आपण केवळ योग्य ते करावे इतकीच माझी प्रार्थना आहे.

हिंदीवरून. सौजन्य आकाशवाणी.

## ३८. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली, जून १२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

माझ्या उजव्या बाजूला ख्वाजासाहेबांना (ख्वाजा अब्दुल मजीद, अध्यक्ष, अल इंडिया नॅशर्नॅलिस्ट मजलिस) बसलेले तुम्ही पाहत आहा. स्वामी सत्यदेव यांच्याबरोबर मी यांच्या घरी गेलो होतो हे मी तुम्हाला आधी सांगितलेच आहे. त्या दिवसांत मुसलमानाने दिलेले पाणीसुद्धा स्वामी सत्यदेव पीत नसत. परंतु ख्वाजा साहेब न चीडता त्यांचे स्वागत करत असत. त्या वेळी ते अलिगढ विश्वविद्यालयाचे विश्वस्त होते. नंतर असहकार चळवळीत भाग घेण्याकरिता त्यांनी विश्वस्तपदाचा राजीनामा दिला. मला आठवते की त्या काळात मी जेव्हा त्यांच्या घरी गेलो होतो तेव्हा मुस्लिम लीगची सभा सुरू होती. या सभेत कोणी सत्याग्रही आहे काय असे मी विचारले. अलीबंधू - मौलाना महमद अली आणि शौकत अली - त्या वेळी तुरुंगात होते व प्रत्येकजण घाबरलेला होता. ख्वाजासाहेब मला म्हणाले की तुम्हाला अडीच सत्याग्रही मिळू शकतात. एक होते शौएब कुरेशी. ते सुप्रसिद्ध आणि धाडसी व्यक्ती होते. याशिवाय तिथे दुसरे एक गृहस्थ उपस्थित होते. ते कट्टर सत्याग्रही होते. एकदा जमावाने त्यांना चांगलीच मारहाण केली व त्यांच्या हाताला दोन ठिकाणी जखमाही झाल्या होत्या. ते जरी धष्टपुष्ट होते तरी ते शांत राहिले व त्यांनी कोणताही शारीरिक प्रतिकार केला नाही. शेवटी ख्वाजा साहेब म्हणाले की मीसुद्धा अर्धा सत्याग्रही आहे. तेव्हापासून हे माझ्या भावासारखे आहेत.

देशाचे तुकडे व्हावे अशी यांची इच्छा नव्हती. परंतु तसे घडले आणि त्याबद्दल शोक व्यक्त करण्याकरिता हे माझ्याकडे आले. मी त्यांना सांगितले की शोक करण्याचे कारण नाही आणि त्यांना हसवले.

जे घडले त्यामुळे सप्रू साहेबसुद्धा दुखावले आहेत. असो लीगला हे पाहिजे होते परंतु कॉंग्रेसला हे नको होते. या दोघांची असहमती झाली असे किती दिवसांपासून सुरू आहे? भुगोलाचे तुकडे झालेले असतील, देशाचे तुकडे झालेले असतील पण काय अंतःकरणाचेही तुकडे झालेले आहेत? ते जर झालेले नाहीत तर आपण रडायचे कारण नाही. जोपर्यंत आपली हृदये एक आहेत तोपर्यंत सर्व काही ठीक आहे. देशाचे आज हिंदुस्तान आणि पाकिस्तान म्हणून तुकडे झालेले असतीलही. परंतु अखेरीस आपल्याला एक व्हायचे आहे. थकव्यामुळे ते एक होतील असे मला

म्हणायचे नाही. आपली वागणूक अशी असली पाहिजे की त्यांची इच्छा असूनही ते आपल्यापासून दूर राहू शकणार नाहीत.

पाकिस्तान झाल्यानंतर शिल्लक राहिलेल्या देशाला हिंदुस्तान म्हणणेसुद्धा जवाहरलालला पसंत नाही. आता एक भाग पाकिस्तान झालेला असताना दुसऱ्या भागाला हिंदुस्तान कसे काय म्हणता येऊ शकते असे ते विचारतात. ते बरोबर आहेत. कारण याचा अर्थ होईल हा हिंदूंचा भाग आहे. मग ख्रिस्ती, ज्यू, आणि इथे राहिलेले मुसलमान यांनी  काय करावे? त्यांनी इथून निघून जावे काय? ख्वाजा साहेब संयुक्त प्रांताचे आहेत आणि पंतजींचे मित्र आहेत. पंतजींनी त्यांना निघून जा असे सागावे काय? जर असे झाले तर हृदये आधीच दुभंगलेली आहेत हे जिना साहेबांचे म्हणणे खरे ठरेल.

परंतु इतिहास असे सांगत नाही. प्रसिद्ध इतिहासतज्ज्ञ श्री जय चंद्र विद्यालंकार यांच्या पत्राबद्दल मी तुम्हाला सांगितलेच होते. ते म्हणतात की हिंदू आणि मुसलमानांचे जेव्हा युद्ध होत होते तेव्हाही ते धर्माच्या नावावर एकमेकांना मारत नव्हते. आमच्या बालपणीसुद्धा आम्ही वेगवेगळे आहो असे कधी आम्हाला वाटले नव्हते. जैनुलुद्दिन (काश्मीरचे सुलतान, चित्तोडच्या राणा कुंभचे म्हणजे राणाप्रतापचे पणजोबा यांचे समकालीन.) काशीच्या तीर्थयात्रेला हिंदूंबरोबर गेले असल्याची आणि वाटेतील सर्व मंदिरांचे त्यांनी जिर्णोद्धार केल्याचे उदाहरण आताआताचे आहे. चित्तोडच्या जयस्तंभावर अल्लाचे नाव कोरलेले आहे.

आपली अंतःकरणे इतकी मलीन झाली आहेत काय की आपण एका ठिकाणी बसूसुद्धा शकत नाही वा डोळ्याला डोळा भिडवू शकत नाही?

समजा की मुसलमान दुष्ट झाले आहेत, पण मग आपणही दुष्ट झालो पाहिजे काय? जवाहरलालला हे नको आहे. त्यांचे म्हणणे आहे की जोपर्यंत मुसलमान या देशाचे भाग होते तोपर्यंत हिंदुस्तान हे नाव ठीक होते कारण त्या वेळी जो कोणी हिंदुस्तानात जन्मला तो हिंदुस्तानी, मग त्याचा धर्म कोणताही असो असा त्याचा अर्थ होत होता. आता मात्र हिंदुस्तानचा अर्थ हिंदूंचा देश असा होतो. आणि हिंदूंमधील कोण? केवळ सवर्ण हिंदू? परंतु मी सांगितल्याप्रमाणे सवर्ण हिंदू - ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य - लोकसंख्येचा फार लहानसा भाग आहेत. अस्पृश्य आणि आदिवासी हे किती तरी जास्त आहेत. त्यांच्यावर अल्पसंख्य सवर्ण राज्य करणार आहेत काय? आज हेच लोक त्यांच्यावर राज्य करत आहेत. परंतु अस्पृश्य आणि आदिवासी यांच्यावर जर सवर्ण हिंदूंचे वर्चस्व राहिले तर मुठीत मावण्याइतके थोडेसे सवर्ण हिंदू उर्वरित बहुसंख्य समाजाला आपल्या टाचेखाली चिरडू इच्छितात हे जिनांचे म्हणणे आपण खरे ठरवू. आपण असे मूर्ख व्हावे काय? जिनांचा द्विराष्ट्र सिद्धांत

आपण मान्य करावा काय? याचा अर्थ माझा मुलगा मुसलमान झाला तर तो दुसऱ्या राष्ट्राचा नागरिक झाला असा होतो काय? आपण जर आपल्या तीनचतुर्थांश देशबांधवाना वेगळे करून त्यांना सत्तेपासून वंचित केले तर आपल्या हिंदुस्तानचे जिनांनी जसे चित्र रंगवले होते तसाच याचा अर्थ होईल.

असे झाले तर पारसीस्तान, शिखीस्तान, अस्पृश्य आणि आदिवासींकरिता वेगवेगळे भाग असे होईल आणि हिंदुस्तान हिंदुस्तान राहणारच नाही. त्याचे तुकडेतुकडे होतील.

इंग्रजांची जर अशी इच्छा असेल तर जगात त्यांना कोणतेही स्थान नसेल.

यामुळे जे काही घडले त्याकरिता आपण रडत बसू नये. जवाहरलालने भारतीय संघराज्य असे देशाचे नाव सुचवले. याचा अर्थ इथे सर्व एक होऊन राहतील. यांतील काही लोकांना वेगळे होण्याची इच्छा असेल तर आपण त्यांच्यावर एकत्र राहण्याकरिता बळजबरी करणार नाही, परंतु जे राहतील ते भावाभावाप्रमाणे राहतील. आपण त्यांना अशी वागणूक देऊ या की ते आपल्यापासून वेगळे आहेत असे त्यांना वाटणार नाही. संघराज्याशी सर्व एनिष्ठ असतील आणि त्याची सेवा करतील.

अजूनही आपण हिंदुस्तानी का सुरू ठेवावी असे काही लोक मला विचारतात. अशा प्रकारचा प्रश्न विचारलाच जाऊ नये. उर्दू ही पाकिस्तानची भाषा आहे आणि हिंदी हिंदुस्तानची अशी वृत्ती आपण धारण केली तर आपण विलगतावादी आहो हा आरोप सिद्ध होईल. हिंदुस्तानी म्हणजे बोलणे, वाचणे आणि लिहिणे यांची सोपी भाषा. एके काळी उर्दू एकच भाषा होती परंतु नंतर उर्दू फारसी शैलीवर गेली, तिच्यात फारसी शब्दांचा जास्त उपयोग होऊ लागला आणि त्यामुळे लोकांना ती समजेनाशी झाली. तसेच हिंदीमध्ये संस्कृत शब्दांनी गर्दी केली आणि यामुळे ही भाषासुद्धा लोकांना कळेनाशी झाली. आपण जर या भाषेचा उपयोग केला तर आपल्यामधून सप्रूसारख्या माणसाला काढून टाकावे लागेल. ते जरी हिंदू असले तरी त्यांची मातृभाषा उर्दू आहे. मी जर त्यांच्याशी संस्कृतप्रचूर हिंदीत बोलू लगलो तर त्याना त्यातील क की ढ कळणार नाही. यामुळे आपण हिंदुस्तानीचे - हिंदुस्तानी सभेचे काम सुरू ठेवले पाहिजे आणि ज्यांची मातृभाषा उर्दू आहे त्यांच्याबद्दलचे प्रेम व्यक्त केले पाहिजे.

जे काही घडले त्यातही मला ईश्वरेच्छाच दिसते. पाकिस्तान काय करतो आणि हिंदुस्तान किती मोठ्या मनाचा आहे हे त्याला पाहायचे आहे. आपण या परीक्षेत उत्तीर्ण झालो पाहिजे. मी आशा करतो आहे की मुसलमान ज्या ठिकाणांना पवित्र मानतात त्यांना योग्य सन्मान न देण्याचा अथवा अलिगढ विश्वविद्यालयाला मालवीयजींच्या हिंदू विद्यापीठासमान न मानण्याचा वेडगळपणा

करणारा एकही हिंदू नसेल. आपण जर त्यांच्या पवित्र ठिकांणांचा विध्वंस करू तर आपल्या स्वतःचाच विनाश होईल.

याचप्रमाणे आपण पारसी लोकांची अग्यारी आणि ज्यूंचे सिनेगॉज यांचेही हिंदू मंदिरांप्रमाणेच रक्षण करू. मी हेसुद्धा सांगितले पाहिजे की अस्पृश्यांनाही उच्चतम वर्गाच्या बरोबरीने वागवले जाईल. खरा हिंदू धर्म सर्व धर्मांना आलिंगन देईल.

यात आपण १०० टक्के यशस्वी होऊ हे आपण पाहिले पाहिजे. आपण जशास तसे या न्यायाने वागू शकत नाही. हे तत्त्व कालबाह्य झालेले आहे. काळ बदलला आहे. आता कोणी आपल्याला शिव्याशाप देत असला तरी आपण त्याच्यावर प्रेम केले पाहिजे. आपण खोटेपणाला खरेपणाने उत्तर दिले पाहिजे आणि हलकटपणाला उमदेपणाने. कोणत्याही परिस्थितीत आपले हात स्वच्छ राहिले पाहिजे, नजर स्वच्छ असली पाहिजे आणि कान स्वच्छ असले पाहिजे. असे केले तरच आपण वाचू. याबद्दल मला थोडीशीही शंका नाही. मुसलमानांना जे पाहिजे होते ते दिलेले असल्यामुळे आता आम्हाला जे पाहिजे असेल ते आम्ही करू शकतो अशा विचाराने आपण पळ काढू शकत नाही.

हिंदीवरून, प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १५०-४

# ३९. प्रार्थना प्रवचन, जून १३, १९४७

नवी दिल्ली,

जून १३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी जेव्हा नोआखालीत हिंडत होतो तेव्हा मला लोक अतिशय घाबरलेले दिसत होते. आणि घाबरलेले लोक ईश्वराचा विचार करू शकत नाहीत. तिथे आम्हाला खेड्यापाड्यातून हिंडावे लागत होते आणि शेतांमधून जाणाऱ्या अरुंद पायवाटांमधून आम्हाला आमचा मार्ग शोधावा लागत असे. नोआखालीतील फार कमी स्त्री-पुरुषांनी असे केले होते. परंतु या पदयात्रेतून मला जो अनुभव मिळाला तो इतरत्र कुठेही मिळाला नसता. आम्हाला हिंदू आणि मुसलमान यांच्या शेतांतून जावे लागायचे. यामुळे आम्ही हिंदू आणि मुसलमान या दोघांच्याही देवाचे नाव घेत असू आणि आमची पदयात्रा सुरू ठेवत असू.

जर इथे ईश्वर असेल तर तो इथला, तिथला आणि चोहोकडचा ईश्वर एकच असला पाहिजे. मग आपण जर त्याला वेगवेगळ्या नावांनी बोलावत असू आणि इतरांनी ईश्वराला दिलेल्या नावाबद्दल असहिष्णू असू तर तो ईश्वराच्या दृष्टीने मूर्खपणा असेल. यामुळेच जे लोक ईश्वराला रहीम नावाने बोलावतात त्यांनी हिंदुस्तान सोडला पाहिजे काय असा प्रश्न मी विचारत असतो - अर्थातच आपण आता आपल्या देशाला हिंदुस्तान म्हणणे बंद केले पाहिजे - आणि ज्या भागाचे वर्णन पाकिस्तान केले जाते तिथे रामाच्या नावावर बंदी असली पाहिजे काय? जर कोणी ईश्वराला कृष्ण म्हणत असेल तर त्याला पाकिस्तानमधून काढून टाकले पाहिजे काय? तिथे काहीही जरी घडत असले तरी इथे याची परवानगी देता येऊ शकत नाही. आपण ईश्वराची भक्ती कृष्ण आणि करीम या दोन्ही नावांनी करू आणि आम्ही वेडगळपणा करू इच्छित नाही हे जगाला दाखवून देऊ.

अजूनही तुमचा वेडगळपणा सुरूच आहे काय असे विचारणाऱ्या एका मित्राने मला अतिशय कठोर पत्र पाठवले. तो म्हणतो, ‘‘काहीच दिवसात तुम्ही हे जग सोडणार आहा, तरीही तुम्ही काही शिकणार नाही काय? पुरुषोत्तम दास टंडन (१८८२-१९६१, कॉंग्रेसचे पुढारी, १९२३ साली अध्यक्ष, भारत सेवक समाज, हिंदी साहित्य संमेलन आणि राष्ट्रभाषा प्रचार सभा या संस्थांचे सक्रिय कार्यकर्ते) जेव्हा म्हणतात की प्रत्येकाने तलवार घेतली पाहिजे, सैनिक व्हायला पाहिजे आणि स्वतःचे संरक्षण केले पाहिजे तेव्हा तुम्ही दुःखी का होता? तुम्ही गीतेचे उपासक आहा. तुम्ही द्वैताच्या पलीकडे

असायला पाहिजे. प्रत्येक लहानमोठ्या गोष्टीकरिता तुम्हाला सुख वा दुःख व्हायला नको. तुम्ही अशा मूर्ख साधूप्रमाणे बोलता जो पुन्हा पुन्हा दंश करणाऱ्या विंचवाला बुडण्यापासून वाचवण्याचा प्रयत्न करतो. तुम्ही जर अहिंसा सोडू शकत नाही वा तिच्यापासून दूर राहू शकत नसाल तर निदान इतरांना त्यांचा मार्ग निवडू द्या. तुम्ही त्यात अडथळा का आणता?''

मला जर गीतेतील स्थितपज्ञा असती तर मी १२५ वर्षे जगलो असतो आणि त्यापेक्षा एक दिवसही कमी नाही. आपण सर्वांनी जर आपल्यामध्ये स्थितप्रज्ञा रुजवली तर प्रत्येक माणूस १२५ वर्षे न जगू शकण्याला काहीही कारण असू शकत नाही. परंतु ईश्वराची जर इच्छा असेल तर तो मला आजही नेऊ शकतो, परंतु मला मरण्याची घाई नाही. अजून मला जगायचे आहे आणि काम करायचे आहे. पुरुषोत्तमदास माझे जुने सहकार्यकर्ते आहेत. वर्षोगणती आम्ही सोबत काम केले आहे. माझ्याप्रमाणेच त्यांनीसुद्धा स्वतःला ईश्वर भक्तीला वाहून घेतले आहे. ते जे म्हणाले ते जेव्हा मी ऐकले तेव्हा मला खेद झाला. तीस वर्षांच्या अनुभवातून आम्ही जे शिकलो होतो व जे रुजवण्याकरिता आम्ही इतके धडपडत होतो ते सर्व आम्ही गमावणार काय? तलवार घेण्याकरिता आत्मरक्षणाचा धावा केला आहे. परंतु संरक्षणापासून हल्ल्याकडे न वळणारा एकही माणूस मी पाहिलेला नाही. रक्षणात ते अध्याहृत आहे. आता माझ्या भावना दुखावल्याबद्दल. माझ्यात जर परिपूर्ण स्थितप्रज्ञा असती तर मी कधीही दुखावलो नसतो. इतकेच नाही तर आजसुद्धा मी व्यथित न होण्याचा प्रयत्न करतो आहे. परंतु दररोज मी थोडाथोडाच पुढे सरकतो. तसे नसते तर गीतेतील स्थितप्रज्ञाचे वर्णन करणाऱ्या श्लोकांचे पाठ म्हणण्यात माझ्या भंपकपणाचेच दर्शन झाले असते. मी जर रामनाम घेत असेन आणि जर ते एकही दिवस उत्सुफूर्तपणे अंतःकरणातून निघत नसेल तर मी रामनाम घेणे बंद केले पाहिजे काय? रामभज चौधरी हे माझे एक पंजाबी मित्र आहेत. आता ते नाहीत. एके काळी ते कविता करत असत. ते जेव्हा तुरुंगातून बाहेर पडले तेव्हा त्यांनी लिहिलेली एक कविता सोबत आणली आणि त्यांना गाता येत नसल्यामुळे त्यांनी आपल्या पत्नीला, सरलाला, ती कविता म्हणण्याकरिता सांगितले. आपल्या मंजुळ आवाजात सरला गाऊ लागली, ''मरावे लागले तरी पराभव पत्करू नका.'' आणि मी मलाच म्हणालो की मरण जरी आले तरी मी हार मानणार नाही. मी जर स्थितप्रज्ञाचे श्लोक दररोज म्हणत असेन तर एक ना एक दिवस मी स्थितप्रज्ञ झालोच पाहिजे. असे जर झाले तर टंडनजी वा अजून कोणी काहीही म्हणाले तरी मला सुखदुःख काहीही होणार नाही. मग मी हसणे आणि रडणे ईश्वरावर सोडून देईन आणि शोक करणे सोडून देईन.

साधू आणि विंचू यांचे उदाहरण फार सुरेख आहे. एखादा श्रद्धा नसलेला माणूस जर विचारेल की विंचवाचा गुणधर्मच डंख मारण्याचा असल्यामुळे तू त्याला वाचवण्याची धडपड का करतोस तर

तो उत्तर देईल : ‘‘डंख मारणे जर विंचवाच्या स्वभावात असेल तर माणसाच्या स्वभावात त्या डंखाशी जुळवून घेणे आहे. विंचू जर आपला स्वभाव सोडू शकत नसेल तर मी माझा स्वभाव कसा सोडू शकतो? मीसुद्धा डंख मारणारा विंचू झालो पाहिजे काय?’’

शेवटी या विद्वान मित्राने मला सल्ला दिला की तुम्ही दुराग्रहामुळे जर अहिंसा सोडू शकत नसाल व तिचे अनुसरण करत राहणारच असाल तर निदान इतरांच्या मार्गात आडवे तरी येऊ नका. मी पाखंडी झालो पाहिजे काय? मी जगाला फसवले पाहिजे काय? असे झाले जर जग म्हणेल की भारतात असा एक गोडबोल्या तथाकथित महात्मा आहे की जो अहिंसेचे गुणगान करतो परंतु त्याचे सहकारी हत्या करण्यात गुंतलेले आहेत.

ज्याची लाज वाटावी असे काही तरी घडलेले आहे. मी संस्थानिकांचा आणि त्यांच्या सेवकांचाही मित्र आहे. मी श्रीमंतांचासुद्धा सेवक आहे. मी राजे आणि श्रीमंत लोकांची मदत घेण्याकरिता त्यांना भंगी कॉलनीकडे येण्याकरिता भाग पाडतो. भंगी कॉलनीतील झोपडीकडे येण्याकरिता याशिवाय इतर असे कोणते काम त्यांना होते? परंतु मी भंगी आहे आणि ते इथे येतात.

मी सी. पी. रामस्वामी यांचे वृत्तपत्रांमधील वक्तव्य पाहिले. ते विद्वान गृहस्थ आहेत. ते ॲनी बेझंट यांचे शिष्य आहेत. माझ्या हरिजनच्या दौऱ्याच्या वेळी (१९३४ साली) त्यांच्या निमंत्रणावरून मी त्रावणकोरमध्ये गेलो होतो व त्यांच्याकडे पाहुणा म्हणून उतरलो होतो. मी तिथे भांडण्याकरिता गेलो नव्हतो तर त्यांच्यासोबत काम करण्याकरिता गेलो होतो. त्यांचे वक्तव्य मला खटकले. त्यांच्या वक्तव्याचा जर चुकीचा वृत्तांत आला असेल तर त्यांनी मला क्षमा करावी. परंतु वृत्तांत बरोबर असेल तर मी काय म्हणतो याचा त्यांनी विचार करावा. ते म्हणतात की १५ ऑगस्टला भारताला जेव्हा स्वातंत्र्य मिळेल तेव्हा त्रावणकोर स्वतंत्र झाल्याचे घोषित केले जाईल. आणि त्रावणकोर कॉंग्रेसवर सभा घेण्याची तिथे आधीच बंदी घालण्यात आली आहे ही त्यांची स्वातंत्र्याची कल्पना आहे. वृत्तांताप्रमाणे सर सी. पी. यांनी घोषित केले आहे की जे कोणी स्वातंत्र्याच्या विरोधात असतील त्यांनी त्रावणकोर सोडून निघून जावे. आणि हा आदेश अशा माणसाने दिला आहे की जो त्रावणकोरचा नसून मद्रासचा आहे. ते असे कसे म्हणू शकतात?

ब्रिटिशांचे जेव्हा राज्य होते तेव्हा त्रावणकोरला ब्रिटिशांना वंदन करावे लागत होते. आता भारत मुक्त लोकशाहीचा देश होत असताना ते त्यांना हवे ते कसे करू शकतात? आता संस्थाने आपली आहेत म्हणजे लोकशाही व्यवस्था असलेल्या भारताचे ते भाग आहेत. मी अनेकदा म्हणालो आहे की लोकशाहीत भारतात राजा आणि भंगी यांचा समान दर्जा असेल. माणूस म्हणून ते समान असतील. बौद्धिक देणगीच्या संबंधात त्यांच्यात विषमता असू शकेल. त्रावणकोरच्या महाराजांना

बौद्धिक क्षमतेची देणगी मिळाली असेल तर त्यांनी तिचा उपयोग जनसेवेकरिता करावा. ते जर आपल्या बौद्धिक देणगीचा उपयोग जनतेला दडपून ठेवण्याकरिता करणार असतील तर त्या बौद्धिक क्षमतेला काहीही अर्थ नाही. ते जर त्रावणकोरच्या जनतेला दाबून ठेवणार असतील वा चिरडून टाकू इच्छित असतील तर त्यांना केवळ भूमीवर राज्य करायचे आहे काय?

मला असे सांगण्यात आले आहे की हैद्राबादही याच मार्गाने जाणार आहे. अजून त्यांनी आपली भूमिका स्पष्टपणे जाहीर केलेली नाही. ते म्हणतात की कोणत्याही उपनिवेशात सामील न होता तिथे काय सुरू आहे ते आम्ही पाहू. परंतु निझाम कोणापासून स्वतंत्र होणार आहे? हैद्राबादमधील ९० टक्के जनता हिंदू आहे आणि त्यांत काही सुप्रसिद्ध व्यक्ती आहेत. जर हैद्राबाद आणि त्रावणकोरच्या स्वातंत्र्याच्या संकल्पनेप्रमाणे जनतेला आपण स्वतंत्र झाल्याचे जाणवणार नसेल तर ही संस्थाने टिकू शकणार नाहीत. काळ बदलला आहे आणि याची त्यांनी जाणीव ठेवली पाहिजे.

जे इंग्रज चांगले करण्याकरिता इथे आले ते अखेरीस हे निर्माण करणार आहेत काय? मी इंग्रजांना समजू शकत नाही. लोक म्हणतात की तुम्ही प्रत्येकावर विश्वास ठेवता हा तुमचा वेडेपणा आहे. होय, मी अहिंसेचा आग्रह धरणे बंद करत नाही म्हणून लोक मला वेडा म्हणतात आणि मी ब्रिटिशांवर विश्वास ठेवतो म्हणूनही लोक मला वेडा महणतात. मी माऊंटबॅटनवर का विश्वास ठेवतो? - ते विचारतात. ज्या जवळपास सहाशे संस्थानिकांना परवानगीशिवाय पूर्वी किंचितसुद्धा हालचाल करता येऊ शकत नव्हती ते आता आपल्या इच्छेप्रमाणे हवे ते करू शकतात असे म्हणणे ही स्वातंत्र्याची थट्टा नाही काय? माऊंटबॅटन जर प्रामाणिक गृहस्थ असतील तर त्यांच्यासारख्या आरमाराच्या सक्षम सेनापतीला ही गोष्ट खटकत नाही काय? भरपूर संस्थानांनी आधीच भारतात सामील होण्याचा निर्णय घेतलेला आहे हे भाग्य.

ब्रिटिश म्हणतात की आम्ही जात आहो आणि जात असताना आम्ही दुतोंडेपणाची भूमिका करणार नाही. आपण आशा करू या की ईश्वर ब्रिटिशांना आणि त्यांच्या प्रतिनिधींना सन्मती देईल. ते इतके शूर आणि सत्यवादी असले पाहिजे की ते जेव्हा सोडून जातील तेव्हा त्यांना कोणीही नावे ठेवायला नको आणि तुम्ही भारताची हानी केली असे म्हणायला नको.

जोपर्यंत माझा संबंध आहे दोन महिने वाट पाहण्याऐवजी ते अगदी आताच जाऊ शकतात. नंतर आपण सर्व एका ठिकाणी येऊ शकतो व आपसात समस्या सोडवू शकतो. मी तर इथपर्यंत म्हणेन की आम्ही जरी परस्परांची कत्तल करू लागलो तरी ती गोष्ट त्यांनी आमच्यावर सोडून दिली पाहिजे. इंग्रजांनी मात्र जायला पाहिजे.

संस्थानांबद्दल मी म्हणेन की ते राहू शकतात परंतु त्यांनी प्रजेची सेवा करण्याकरिता राहिले पाहिजे. कॉंग्रेसने जर जनतेची सेवा केली नाही तर तीसुद्धा टिकणार नाही.

कॉंग्रेसला याबाबतीत बोलण्याचा काय अधिकार आहे असे म्हणून संस्थानिकांनी कॉंग्रेसच्या अधिकाराचा प्रश्न उपस्थित करू नये. कॉंग्रेसने त्यांची बरीच सेवा केली आहे. मला आठवते की मी जेव्हा शाळेत होतो तेव्हा म्हैसूरच्या वारसासंबंधी काही तरी चुकीचे घडले होते आणि राजपुत्राला सिंहासन मिळावे म्हणून कॉंग्रेसने त्यांना मदत केली होती. अशाच प्रकारचे काही तरी काश्मीरमध्ये घडले होते आणि कॉंग्रेसने मदत केली होती. नंतर एकदा बडोदावर अपमानित होण्याची वेळ आली असता कॉंग्रेसने युवराजला पुनःस्थापित करण्याकरिता कमी प्रयत्न केले नव्हते. कॉंग्रेसने संस्थानिकांना नेहमीच आपले देशबांधव मानले होते. ती त्यांना हानी कशी पोहोचवू शकते? वेळ येताच ते सहकार्य करतील असा विचार करण्यात येत होता. आता जर संस्थानिक उभे राहतील आणि म्हणतील, “ते ठीक आहे, पण आम्ही सत्ताधारी आहो” तर ते योग्य होणार नाही. लोकप्रिय प्रतिनिधी पाठवण्याऐवजी त्यांनी स्वतः घटनासमितीत यायला पहिजे.

जर ते असे करणार नाहीत तर भारताच्या विधिलिखितात संघर्ष लिहिलेला आहे असे म्हणावे लागेल. आपण अजून हिंदू-मुसलमानांच्या संघर्षातून पुरेसे निघालेलोच नाही आणि आता संस्थानिकाशी संघर्ष समोर उभा होऊन ठाकला आहे. नंतर भारतीय नागरी सेवेतील अधिकाऱ्यांचा प्रश्न असेल. मी आशा करतो की नागरी सेवेतील लोक प्रतिष्ठापूर्वक वागतील आणि भांडणाचा कोणताही प्रसंग उद्भवणार नाही. परंतु जर भांडणे व्हायचीच असतील तर देशात अगणित गट आहेत आणि प्रत्येकजण देशाचे लहानलहान लचके तोडण्याकरिता भांडू शकेल. मग कोणाकरिताही काहीही शिल्लक उरणार नाही. देशाचा विध्वंस होईल.

माझ्या नशिबी सतत संघर्षात गुंतणे लिहिलेले आहे. आता संघर्ष संपावा असे मला वाटते. परंतु देशातील लहानसहान गटातील भांडणामुळे देशाचा विनाश झालेला मला पाहवणार नाही.

अखेरीस आपण राम-रहीम, कृष्ण-करीम ही नावे घेत राहिलो पाहिजे. आपण संस्थानिकांना अपशब्द बोलू नये परंतु तम्ही जनतेचे सेवक आहा, यापुढे तुम्ही मालक राहू शकत नाही हे आपण त्यांना सांगितले पाहिजे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १५४-६०

# ४०. प्रार्थना प्रवचन, जून १४, १९४७

नवी दिल्ली,

जून १४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

गजेंद्रची ही प्रार्थना मला फार आवडते. गजेंद्रमोक्षची कथा आपल्या सर्वोत्तम साहित्याचा भाग आहे. त्यात इतके माधुर्य भरलेले आहे की त्याची गणना होऊ शकत नाही. हत्ती प्रचंड शक्तिशाली असूनही जेव्हा असहाय होतो आणि आपल्या अचाट शक्तीने मगरापसून आपल्या प्राणाचे रक्षण करू शकत नाही हे त्याच्या लक्षात येते तेव्हा तो ईश्वराला शरण जातो.

आपली अशीच अवस्था आहे. ज्या क्षणी आपण पराभूत झालो असे आपल्याला वाटू लागते तेव्हा खरोखरी आपण पराभूत झालेलो नसतो. ज्याला आपल्या बाजूने ईश्वर आहे असे वाटत असते तो खरोखरी कधीही पराभूत होऊ शकत नसतो.

ईश्वराने माणसाला असे बनवले आहे की माणूस जेव्हा अगदी बुडण्याच्या बेतात असतो, माणसाला जेव्हा वाटते की आपण सर्व काही गमावले तेव्हा कुठे तो ईश्वराचा विचार करू लागतो.

काल मी त्रावणकोरचे दिवाण सर सी. पी. रामस्वामी काय बोलले (पाहा प्रार्थना प्रवचन जून १३, १९४७) याबद्दल बोललो होतो. हा काळ तारा आणि रेडिओचा आहे. मी जे म्हणालो ते त्यांच्यापर्यंत पोहोचले आणि त्यांची मला दीर्घ तार आली. (पाहा त्रावणकोरचे दिवाण सी. पी. रामस्वामी ऐय्यर यांची तार) त्यांनी अनेक गोष्टी स्पष्ट केल्या आहेत परंतु त्यांनी त्रावणकोर कॉंग्रेस कमेटीच्या सभा आणि मिरवणुकींवरील बंदी उचललेली नाही. त्यासंबंधी ते शब्दही बोलले नाही. हे बरोबर नाही. यातून वाईटाचा वास येतो.

ते पुढे म्हणतात की त्रावणकोर नेहमीच स्वतंत्र संस्थान राहिले आहे. एका अर्थाने ते बरोबरही आहे. प्राचीन काळात आपला देश वेगवेगळ्या राज्यांमध्ये विभागलेला होता. परंतु हिंदुस्तान नेहमी एक देश समजला जात होता. आपल्या ऋषीमुनींनी देशाच्या सर्व भागात तीर्थक्षेत्रे वसवली आणि अशा अनेक गोष्टी केल्या की ज्यामुळे सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक ऐक्याला प्रोत्साहन मिळेल. परंतु राजकीय दृष्टीने देश कधीही एक नव्हता. चंद्रगुप्त आणि अशोक यांच्या राज्याच्या काळात हिंदुस्तान मोठ्या प्रमाणात एक झाला होता परंतु त्या वेळीसुद्धा दक्षिणेकडील लहानसा भाग त्यांच्या राज्याच्या बाहेर राहिला होता. इंग्रज जेव्हा आले तेव्हा पहिल्यांदाच दिब्रुगढपासून

कराचीपर्यंत आणि कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत देश एक झाला होता. इंग्रजांनी असे आपल्या हिताकरिता केले नव्हते तर स्वतःच्या हिताकरिता केले होते, आपले राज्य स्थिरस्थावर असावे म्हणून केले होते. ब्रिटिश शासन काळात त्रावणकोर स्वतंत्र होता असे म्हणणे चूक आहे. संस्थानिक कधीही स्वतंत्र नव्हते. ते ब्रिटिशांचे अंकित होते आणि इग्रजांची खुषामत करत होते. आता ब्रिटिश शासन जाण्याच्या बेतात असताना आणि जनतेच्या हातात सत्ता येत असताना कोणत्याही संस्थानिकाने आम्ही नेहमीच स्वतंत्र होतो आणि स्वतंत्र राहू असे म्हणणे पूर्णपणे चूक आहे आणि ते मुळीच शोभण्यासारखे नाही. हे खरे आहे की सर सी. पी. माझे मित्र आहेत. परंतु त्याचे काय? इथे माझा मुलगा जरी असला तरी जे खरे आहे ते बोलण्याकरिता मी मागेपुढे का पाहावे? आता भारत स्वतंत्र होत असताना सर सी. पी. म्हणतात की त्रावणकोर स्वतंत्र आहे. याचा अर्थ त्रावणकोरला स्वतंत्र भारताशी संघर्षाची भूमिका घ्यायची आहे.

मी त्यांना इतकेच म्हणू शकतो की त्यांनी पदावरून पायउतार व्हावे आणि त्रावणकोरच्या जनतेचे सेवक व्हावे. एकदा तुमचे राज्य हिरावून घेतल्यानंतर ब्रिटिशांनी तुम्हाला परत सत्ता दिली व मालक म्हणून तुमच्या प्रजेवर जुलूम करण्याचा अधिकार दिला तर त्यात अभिमान बाळगण्यासारखे काय आहे? तुमच्या प्रजेला तुम्ही मालक समजत असाल तर ती गोष्ट अभिमानाची असेल. अर्थातच भारत अजून  खाली पडलेला नाही. परंतु त्याला जर समस्यांना तोंड द्यावे लागत असेल आणि तो खाली पडलेला असेल तर त्याला लाथ मारणे हे शालीनतेचे चिन्ह नाही. हिंदुस्तानचे जर दोन तुकडे झालेले असतील तर त्याच्याशी तुमचा संबंध नाही. ती आमच्या घरातील गोष्ट आहे. तुम्ही ते समजून घेतले पाहिजे आणि सौजन्याने वागला पाहिजे, निरर्थक संघर्षाला खतपाणी घालू नये.

रावळपिंडीहून काही मित्र तिथे घडलेल्या घटनांची माहिती घेऊन आले. सुचेता कृपलानींनीसुद्धा मला तेथील परिस्थितीचा अतिशय दुःखद अहवाल दिला. एका गोष्टीचे मला फार दुःख झाले. पाकिस्तानबद्दलचा निर्णय जेव्हा व्हायचाच होता तेव्हा तेथील परिस्थिती सहन करण्यासारखी होती परंतु आता मुसलमान दंगल करत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की आता आम्हाला पाकिस्तान मिळालेला असल्यामुळे आम्ही इतर सर्वांना गुलाम बनवू. मी जे काही म्हणतो ते मुसलमानांच्या कानापर्यंत पोहचावे म्हणून मी याचा उल्लेख प्रार्थना प्रवचनात केला. ते जिनांच्या कानापर्यंत निश्चितच पोहोचेल. मी जे म्हणतो ते चूक असेल तर माझ्या मुसलमान बांधवानी मला धारेवर धरावे आणि हे बरोबर नाही असे म्हणावे. त्यांनी मला पेशावरमधील हिंदू, शीख, स्त्रिया, मुले कसे सुखी आहेत हे पाहण्याकरिता मला पेशावरला बोलवावे. परंतु मला नावे मिळाली आहेत. जर कोणा सामान्य माणसाने ही नावे सांगितली असती तर त्याचा इतका विचार करण्याची गरज नव्हती

कारण प्रत्येक ठिकाणी काही बेजबाबदार लोक असतातच. परंतु सर्व मुसलमान असा विचार करत असतील आणि या भाषेत बोलत असतील तर ती गोष्ट फार वाईट आहे.

श्रीयुत जिना म्हणतात की बहुसंख्य मुसलमानात असले तरी अस्पसंख्याक शांततेने राहतील. परंतु वास्तवात काय घडत आहे? पाकिस्तान अस्तित्वात आल्यानंतर संघर्ष अजून चिघळला तर त्याचा अर्थ आपल्याला मूर्ख बनवण्यात आले असा होईल. याचा अर्थ होईल ते मालक होतील आणि दुसऱ्या सर्व धर्माच्या लोकांना तिथे गुलाम वा नोकर होऊन राहावे लागेल व आम्ही तुमच्यापेक्षा कमी प्रतीचे आहो हे मान्य करावे लागेल.

पाकिस्तानमध्ये सर्वांना चांगली वागणूक मिळते व मंदिर वगैरेंची चांगल्या प्रकारे काळजी घेतली जाते हे ऐकण्याकरिता मी उत्सुक आहे. मला जेव्हा असे आढळेल तेव्हा मी त्यांच्यासमोर नतमस्तक होईन. परंतु जर असे घडले नाही तर जिना खोटे बोलत होते असे मी समजेन आणि माऊंटबॅटन हे आरमाराचे सेनापती असूनही त्यांनी इतकी घाई केल्याबद्दल मी त्यांचाही संशय घेईन. त्यांनी कत्तलींची फिकीर न करता आम्ही तलवारीसमोर झुकणार नाही असे घोषित केले पाहिजे होते.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन -१, पृष्ठ १६०-३

# ४१. प्रार्थना प्रवचन, जून १५, १९४७

नवी दिल्ली, जून १५, १९४७

उद्या कार्यकारिणीची सभा होणार असल्यामुळे आज माझे मौन नेहमीपेक्षा लवकर सुरू झाले याबद्दल मला खेद होतो. यामुळे मी माझा संदेश लिहून देत आहे. विविध देशांमधून एकच प्रश्न विचारणारी पत्रे मला येत आहेत व आज त्याचे उत्तर देण्याची माझी इच्छा आहे. थोडक्यात प्रश्न असा आहे - 'राजकीय हेतू साध्य करण्याकरिता तुमच्या देशात राजकीय पक्ष हिंसेचा आधार का घेत आहेत? दिवसेंदिवस तुमच्या देशातील हिंसा वाढतच चालली आहे. तुम्ही याचे कारण स्पष्ट करू शकाल काय? तुम्ही तीस वर्ष ब्रिटिशांशी अहिंसक पद्धतीने लढला. त्याचा अंत असा का व्हावा? अजूनही तुम्ही जगाला अहिंसेचा संदेश देऊ इच्छिता काय?

या प्रश्नाचे उत्तर देताना मी माझी दिवाळखोरी जाहीर केली पाहिजे. असे असले तरी अहिंसा कधीही दिवाळे काढू शकत नाही. मी स्पष्ट केल्याप्रमाणे आम्ही गत तीस वर्षांपासून ज्या अहिंसेचे अनुसरण करत होतो ती अहिंसा दुबळ्यांची होती. माझा हा दृष्टिकोन तर्कशुद्ध आहे की नाही याचा निर्णय तुम्ही स्वतःच घ्यायचा आहे. आजच्या बदललेल्या परिस्थितीत दुर्बलांच्या अहिंसेला कोणतेही स्थान नाही हे मान्य करावे लागेल. सत्य हे आहे की हिंदुस्तानला सबळांच्या अहिंसेचे दर्शन घडवून देण्याची कधी संधीच मिळाली नाही. शुरांच्या अहिंसेसमोर जगातील कोणतीही शक्ती उभी राहू शकत नाही हे वारंवार सांगितल्याने काहीही सिद्ध करता येऊ शकत नाही. कारण अशा अहिंसेचा माझ्या जिवनात वारंवार आणि व्यापक प्रमाणात उपयोग करण्याचा प्रयत्न करूनच या सत्याचे दर्शन घडवता येऊ शकेल. परंतु शक्य आहे की असे करण्याची माझ्यात पूर्णपणे पात्रता नसेल वा शक्य आहे की मी भिकारी असेन. मी जर परिणाम दाखवून देऊ शकत नसेन तर तुम्ही माझे अनुसरण करा असे मी कसा काय म्हणून शकेन? प्रश्न प्रसंगोचित आहे आणि माझे उत्तर साधे आहे. मी कोणालाही माझे अनुसरण करा असे सांगत नाही. प्रत्येकाने आपल्या आतील आवाजाप्रमाणे वागले पाहिजे. तुम्ही जर आतील आवाज ऐकू शकत नसाल तर तुम्ही तुमच्या इच्छेप्रमाणे वागू शकता. परंतु कोणत्याही परिस्थितीत तुम्ही आंधळेपणाने कुणाचेही अनुसरण करू नये.

हिंदुस्तान चुकीच्या मार्गाचे अनुसरण करत आहे अशी जर माझी पूर्णपणे खात्री पटली असेल तर मग जे चूक करताहेत त्यांच्याबरोबर तुम्ही काम का करता हा दुसरा महत्त्वाचा दुसरा प्रश्न आहे. मी जर बरोबर असेन तर माझे सहकारी परत माझ्याकडे येतील या श्रद्धेने मी माझ्या मार्गाने का जात नाही? मला प्रश्न आवडला. याच्या विरोधात मी वाद घालणार नाही. मी इतकेच म्हणेन की माझी

श्रद्धा आणि माझा धर्म पूर्वीप्रमाणेच आहे. त्यात कोणताही दुबळेपणा आलेला नाही. शक्य आहे की माझी पद्धत चुकीची असेल. माणूस जेव्हा अडचणीत असतो तेव्हा जुन्या अनुभवांची आणि जुन्या उदाहरणांची मदत होत असली तरी माणसाने त्यांचे अनुसरण यांत्रिक पद्धतीने करू नये.

यापुढे जाऊन मला सल्ला देणारांना माझी विनंती आहे की त्यांनी माझ्याबाबतीत थोडी सहनशीलता दाखवावी आणि दुःखीकष्टी जगाचे दुःख शीतल करण्याकरिता अहिंसेचा मार्ग कितीही जिकिरीचा असला तरी अहिंसेशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही हे लक्षात घेऊन मला सहकार्य द्यावे. माझ्यासारखे करोडो लोकांची या जिवनात त्याचा अवलंब करण्याची कदाचित क्षमता नसेल. परंतु याकरिता त्यांना स्वतःलाच दोष द्यावा लागेल, अहिंसेला नाही.

इथे मी तुमच्याजवळ दुसऱ्या गोष्टीचाही उल्लेख करू इच्छितो. मी जरी या वेळी मौन पाळत असलो तरी त्रावणकोरचे काही मित्र मला भेटण्याकरिता आले आहेत. मी त्या संस्थानाबद्दल जे काही बोलत होतो त्यात रतीभरही अतिशयोक्ती नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांनी असेही सांगितले की जिथे सभा घेण्यात आल्या तिथे लाठीमार करण्यात आला आणि काल तर काही ३५ लोकांना अटक करण्यात आली. तिथे लोकांची गळचेपी केली जात आहे. ते काहीही असले तरी कोणत्याही संस्थानाने स्वतंत्र भारतात स्वतःला स्वतंत्र घोषित करणे हास्यास्पद वाटते. याचा अर्थ त्यांनी स्वतंत्र भारतातील करोडो लोकांविरुद्ध युद्ध घोषित केले असाही होईल. महाराजांना जनतेचा पाठिंबा नसताना असे करणे अतिशय असंजसपणाचे आहे. ब्रिटिशांचा जेव्हा त्यांना पाठिंबा होता तेव्हा हे शक्य होते. परंतु आता परिस्थिती अतिशय बदललेली आहे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १६३-५

# ४२. प्रार्थना प्रवचन, जून १६, १९४७

नवी दिल्ली,

जून १६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज सकाळी जेव्हा मी मौन पाळत होतो तेव्हा श्री पुरुषोत्तम दास टंडन मला भेटण्याकरिता आले. प्रत्येक माणसाने शस्त्र बाळगले पाहिजे या टंडनजींच्या वक्तव्यामुळे मी किती व्यथित झालो होतो हे मी तुम्हाला सांगितलेच आहे. तुम्ही गीतेचे भक्त असूनही तुम्हाला दुःख का व्हावे असे एका पत्रलेखकाने मला विचारले होते. तो पत्रलेखक असेही म्हणाला होता की टंडनजींचा जशास तसे या तत्त्वावर विश्वास आहे. याबद्दल मी टंडनजींना विचारले. तेव्हा टंडनजी म्हणाले की माझा 'जशास तसे' या तत्त्वावर विश्वास नसला तरी प्रत्येकाने आत्मरक्षणाकरिता शस्त्र बाळगले पाहिजे असे मला वाटते. ही गीतेचीसुद्धा शिकवण आहे असेही ते म्हणाले.

मी टंडनजींना म्हणालो की तुमचा 'जशास तसे' या तत्त्वावर विश्वास नाही असे तुम्ही तुमच्या मित्राला स्पष्ट करून सांगा म्हणजे विनाकारण त्याचा गैरसमज कायम राहणार नाही. आत्मरक्षणाकरिता गीता हिंसेचा उपदेश करते यावर माझा विश्वास नाही. गीतेचा माझा अर्थ वेगळा आहे. गीता अथवा इतर कोणत्याही संस्कृत ग्रंथात या तत्त्वाचा पुरस्कार करण्यात आला असेल तरीही शास्त्र म्हणून त्याला मान्यता देण्याची माझी तयारी नाही. केवळ एखादा उद्गार संस्कृमध्ये आहे म्हणून तो धर्मग्रंथ होत नाही. शेतीचे नुकसान करणाऱ्या वा इतर हानी करणाऱ्या माकडांना मारण्याची मी परवानगी दिली होती याची आठवण टंडनजींनी मला करून दिली होती. मला कोणत्याही प्राणिमात्राला मारणे आवडत नाही, अगदी मुंगीलासुद्धा. परंतु शेतीचा प्रश्न वेगळा आहे आणि लोकही वेगळे आहेत.

पंडितजी म्हणाले की आपण 'जशास तसे' वा 'दातास दात' वा 'ठोशास ठोसा' हे तत्त्व कदाचित मान्य करणार नाही. परंतु आपण हाती शस्त्र घेतले नाही आणि आपली शक्ती दाखवली नाही तर आपण आत्मरक्षण कसे करणार?

माझे उत्तर हे आहे की आत्मरक्षण आवश्यक आहे परंतु माणूस आत्मरक्षण कसा करणार? कोणी माझ्याकडे आला आणि म्हणाला की 'तू रामनाम म्हणतोस की नाही? जर म्हणाला नाही तर ही तलवार पाहा.' यावर मी त्याला म्हणेन की मी जरी दररोज रामनाम म्हणत असलो तरी

तलवारीच्या टोकावर मी असे करणार नाही. अशा प्रकारे आत्मरक्षणाकरिता मी माझा जीव धोक्यात घालीन. आता मी जर कलमा म्हणालो तर मी माझा धर्म गमावत नाही. अल्ला एक आहे आणि महमद त्याचा एकमेव दूत आहे असे जर मी अरबी भाषेत म्हणालो तर त्यामुळे काय होते! असे म्हणण्यात काहीही पाप नाही आणि माझ्या असे म्हणण्यामुळे ते जर मला मुसलमान म्हणून मान्यता देत असतील तर मला त्या गोष्टीची अभिमान वाटेल. परंतु कोणी माझ्याजवळ आला आणि तलवारीच्या धाकावर कलमा म्हणण्याकरिता बळजबरी करू लागला तर मी तसे कधीही करणार नाही. मी जीवाचा धोका पत्करून माझे आत्मरक्षण करीन. हा विरोधाभास दाखवण्याकरिता मी जिवंत राहीन. इतर कोणत्याही प्रकारे मला जिवंत राहण्याची इच्छा नाही.

मी म्हणालो होतो की भौगोलिक दृष्टीने जरी आपल्या भूमीचे निश्चितपणे विभाजन झालेले असले तरी आपली अंतःकरणे विभाजित होऊ नये. परंतु माझे कोण ऐकतो? एक दिवस होता जेव्हा प्रत्येकजण गांधीचे ऐकत होता कारण ब्रिटिशांशी लढण्याचा मार्ग गांधीने दाखवला होता. आणि इथे किती ब्रिटिश होते? केवळ ७५,०००. परंतु त्यांच्याजवळ अशी साधनसामुग्री होती, अशी शक्ती होती की ॲनी बेझंट म्हणाल्या त्याप्रमाणे त्यांनी ‘विटांना बंदुकीच्या गोळ्यांनी’ उत्तर दिले आणि आपल्या हिंसेचा काहीही प्रभाव पडला नाही. अहिंसा अधिक प्रभावी होईल असे दिसून येत होते म्हणून लोक गांधीकडे पाहू लागले. परंतु आज ते म्हणतात की गांधी मार्ग दाखवू शकत नाही आणि म्हणून आत्मरक्षणाकरिता शस्त्र हाती घेतले पाहिजे. यावर माझ्यासारखा माणूस इतकेच म्हणू शकतो की अहिंसेवर खर्च करण्यात आलेली तीस वर्षे वाया गेली. आपण ब्रिटिशांना हिंसेद्वारे हाकलून लावायला पाहिजे होते.

परंतु ती तीस वर्षे वाया गेली असे मी समजत नाही. अतिशय भयानक जुलमातही आपण अहिंसक राहिलो होतो ही चांगलीच गोष्ट आहे. त्यांनी आपल्या विरोधात शस्त्रांचा वापर केला. परंतु त्यांच्या शस्त्राला आपण घाबरलो नाही आणि कॉंग्रेसचा संदेश हिंदुस्तानच्या कानाकोपऱ्यात पोहोचला. तो हिंदुस्तानच्या सात लाख खेड्यांपर्यंत पोहोचू शकला नाही कारण आपली अहिंसा शंढांची अहिंसा होती. त्या वेळी ॲटम बॉम्ब कसा बनवावा हे कोणीही दाखवले नाही. तो कसा बनवावा हे आपल्याला माहीत असते तर इंग्रजांचा नाश करण्याकरिता तो बनवण्याचा आपण विचार केला असता. परंतु आपल्याजवळ कोणताही पर्याय नसल्यामुळे माझा सल्ला मान्य करण्यात आला. परंतु आज लोक म्हणतात की कोणालाही माझी पर्वा नाही. परंतु या प्रार्थना सभेला तुम्ही सर्व लोक दररोज येता. तुम्ही असे का करता? मी तुमच्यावर कशा प्रकारे बळजबरी करतो? तुम्ही प्रेमाच्या बंधनाने इथे येता आणि माझे ऐकता. अशा प्रकारे मी माझे म्हणणे जर केवळ हिंदूना ऐकायला लावू

शकलो तर हिंदुस्तानचे डोके जगात वर झाल्याचे तुम्हाला आढळेल.मी मुसलमानांबद्दल काहीही म्हणालेलो नाही. मी त्यांना त्यांचा शत्रू वाटतो. परंतु हिंंदू आणि शीख मला आपला शत्रू समजत नाहीत. हिंदू जर शुराच्या अहिंसेसंबंधीचा माझा सल्ला ऐकतील तर तुम्ही तुमची शस्त्रे समुद्रात फेकून द्या असे मी त्यांना सांगेन. शूर माणूस अहिंसेवर कशाप्रकारे विसंबून राहू शकतो हे मी त्यांना सांगेन.

कॉंग्रेस कार्यकारिणीत मूठभर लोक आहेत व एक दोन भाषणांवरून त्यांच्यातील काही संकुचित मनोवृत्तीचे असल्याचे मी पाहिले आहे. परंतु मला संपूर्ण भारतातून माहिती मिळत असते. ते म्हणतात की 'आता मुसलमान कुठे जातील? मुसलमान जे करू शकत होते ते आम्हीही करू शकतो कारण आम्ही बहुसंख्य आहो. ब्रिटिश गेल्यानंतर आम्ही त्यांच्यावर राज्य करू. आम्हाला तो हक्क आहे कारण आम्ही तुरुंगात गेलो होतो आणि मार आणि फटके खाल्ले होते.' अशा प्रकारे बोलणे आपल्याला शोभत नाही. ही हिंसा आहे. तुम्हाला जर अहिंसेसंबंधीचे कोणतेही बोलणे ऐकायचे नसेल, तुम्ही जर हिंसा करण्याचे आधीच ठरवले असेल तर ती गोष्ट लाजीरवाणी असेल. तुम्ही जर 'जशास तसे' या तत्त्वाच्या मार्गाने जाणार असाल तर दोन्ही धर्मांचा विनाश होईल हे तुम्ही माझ्याकडून लिहून घ्या. इस्लाम नष्ट होईल आणि हिंदू धर्मही.

आपण जर सबळांच्या अहिंसेचे पालन करू तर त्यांनी मिळवलेले पाकिस्तान केवळ खेळणे राहून जाईल. अहिंसेमुळे आपण काहीही गमावणार नाही.

पाकिस्तान आणि भारत हे दोन देश आहेत असे मी मानत नाही. ज्याप्रमाणे मला पंजाबमध्ये जायचे असेल तर मी पारपत्र मागणार नाही.त्याचप्रमाणे सिंधमध्ये जाण्याकरिताही मी पारपत्र मागणार नाही. मला कोणीही अडवू शकत नाही. मी त्यांचा शत्रू आहे असे ते म्हणू शकतात, परंतु मी तिथे गेलो तर कोणत्याही विधिमंडळाचा सदस्य होण्याकरिता मी तिथे जाणार नाही, मी तिथे सेवा करण्याकरिता जाईन आणि ही गोष्ट माझ्या जीवनात पहिल्यांदा घडणार नाही. मी नोआखालीत गेलो होतो आणि कोणीही आता अशी कल्पना करू नका की नोआखालीचा आता पाकिस्तानमध्ये समावेश होणार असल्यामुळे मी तिथे परत जाणार नाही. माझ्यातील एक भाग तिथे पडलेला आहे. तिथल्या हिंदूंना मी सांगेन की तुम्ही जर खरे हिंदू असाल तर तुम्हाला खुनी लोकांनी जरी घेरलेले असले तरी तुम्ही कोणालाही घाबरायला नको.

मी जर मारला गेलो आणि मरताना माझा खून करणाराकरिता मी जर ईश्वराकडे प्रार्थना केली आणि त्यावेळी केवळ माझ्या ओठांवर त्याचे नाव असणार नाही तर माझ्या अंतःकरणातही मी त्याला पाहू शकत असलो तर मी खरोखर शूर आहे असे मी समजेन. ईश्वराला शोधण्याकरिता मी मंदिरात वा मशिदीत जाणार नाही.

बादशाह खान इतके शूर असूनही आज ते शौर्य दाखवू शकले नाही. वर्षांपासून ते पठाणांना अहिंसा शिकवत आहेत. परंतु आज ते म्हणाले की मी भारतात सामील होण्याची घोषणा करू शकत नाही. असे केले तर तिथे बिहारपेक्षाही दहापट रक्तपात होईल. त्यांनी काय करावे? अहिंसा अशी वस्तू नाही की जी बाजारातून विकत घेता येऊ शकते. आपण जर खऱ्या अहिंसेचे दर्शन घडवू शकलो तर केवळ सरहद्द प्रांत संपूर्ण हिंदुस्तानला वाचवू शकतो.

मुसलमान आम्हाला सौदा करण्याकरिता भाग पाडू शकत नाही. ब्रिटिशांच्या काळात त्यांना जे देण्यात आले ते सर्व त्यांना मिळू शकत नाही. त्यांनी जर वेगळा मतदारसंघ मागितला तर तो त्यांना मिळू शकत नाही. विभक्त मतदार संघ असे विष आहे की जे इंग्रजांनी इथे पेरले होते, परंतु आपण त्यांच्याशी न्यायाने राहू. इतर मुलांप्रमाणेच त्यांच्या मुलांनाही शिकण्याची संधी असेल. खरे म्हणजे ते जर गरीब असतील तर इतरांपेक्षाही त्यांना अधिक सोयीसवलती असतील. आपण जर असा न्याय दाखवला तर आपण शूर आहो हे हिंदूस्तानातील लोक दाखवून देतील. (यानंतरचा भाग 'द हिंदू'मधून घेतलेला आहे.)

अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटीने कालच ठरावाला मंजुरी दिली. परंतु मला वृत्तपत्रातील दोन कात्रण मिळाले. मध्यप्रांताच्या मुख्यमंत्र्याच्या भाषणाचा वृत्तात असलेले एक आणि दुसरे त्या भाषणावर टीका करणारे. भाषणात अध्यक्ष पुढीलप्रमाणे म्हणतात - जिनांचा दावा आहे की मुसलमानांची वेगळी संस्कृती आहे आणि पाकिस्तानमध्ये केवळ इस्लामी कायदा चालेल. यामुळे अशा परिस्थितीत मुसलमानेतरांना पाकिस्तानमध्ये राहणे कठीण होणार आहे. पंडित शुक्लांनी निदर्शनास आणून दिले की ब्रिटिश हिंदुस्तानातील मुसलमानांच्या भागात १,८५,००,००० हिंदू आहेत तर ब्रिटिश हिंदुस्तानच्या हिंदू भागात ३ कोटी मुसलमान पिढ्यांपिढ्या राहतात. यांची काय परिस्थिती होईल असे पंडित शुक्ला विचारतात. त्यांना परकियांप्रमाणे वागणूक मिळेल. त्यांना नागरिकत्वाचे कोणतेही अधिकार मिळणार नाहीत. आज त्यांना देण्यात येणारे सरकारी अनुदान काढून घेतले जाईल आणि त्यांना आपल्या संसाधनांवर अवलंबून राहावे लागेल.

अहवाल पुढे म्हणतो - आपल्या बाजूला बसलेले मंत्री (आरोग्य) हसन यांच्याकडे बोट दाखवून पंडित शुक्ला विनोदात म्हणाले की डॉ. हसन यांना केवळ मंत्रिमंडळातूनच बाहेर पडावे लागणार नाही तर त्यांना वर्धा येथे राहण्याची परवानगीसुद्धा मिळणार नाही. त्यांना पाकिस्तानमध्ये आश्रय घ्यावा लागेल. भारतात राहणाऱ्या मुसलमानांना धार्मिक आणि सांस्कृतिक स्वातंत्र्य जरी देण्यात आले तरी त्यांना विधिमंडळात वा नोकऱ्यांमध्ये कोणतेही स्थान नसेल. त्यांना स्वतःलाच

स्वतःच्या संस्था चालवाव्या लागतील व त्यांना कोणत्याही सरकारी अनुदानाचा अधिकार राहणार नाही.

गांधीजी म्हणाले की भाषणाचा हा अहवाल जर बराचसा बरोबर असेल आणि विनोदात जरी हे भाषण केलेले असेल तरी हे भाषण दुर्दैवी आहे असे म्हणावे लागेल. संघराज्यातील प्रांतांकरिता तयार करण्यात आलेल्या या सापळ्यात ते निश्चितच अडकणार नाहीत. तथाकथित पाकिस्तानमध्ये काहीही झाले तरी त्यांच्या मंत्रिमंडळातील मुसलमान सदस्यांचे पूर्वीप्रमाणेच स्वागत आहे हे त्यांनी आपल्या वर्तनाने दाखवून दिले पाहिजे. संघराज्यातील प्रांत आपल्या मुसलमान भावंडांना न्याय्य पद्धतीने वागवतील. पाकिस्ताननेही मुसलमान आणि इतर इतर अल्पसंख्याक यांना देण्यात येणाऱ्या वागणुकीत भेदभाव करणार नाही हे दाखवून दिले पाहिजे. विदेशी सत्तेने आपल्यामध्ये भांडणे लावण्याकरिता विभक्त मतदार संघासारखे जे आमिष टाकले आहे त्याचा इथे संदर्भ नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १६६-७० आणि द हिंदू जून १७, १९४७

# ४३. प्रार्थना प्रवचन, जून १७, १९४७

नवी दिल्ली,

जून १७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

या दिवसात जे भजन म्हणण्यात येतात त्यांची निवड करण्यात माझा कोणताही हात नसतो. परंतु अनेकदा निवडण्यात आलेले भजन प्रसंगोचित असतात. आजच्या भजनात म्हटले आहे की चांगल्या माणसाच्या सहवासात माणसाची आपला-परका ही जाणीव लोपते आणि कोणीही शत्रू वा परका राहत नाही. ही खरोखर आजची गरज आहे. परंतु माझ्याकडे येणारा प्रत्येकजण म्हणतो की तुम्ही कितीही ओरडा पण ही गोष्ट आता झालेली आहे. अनेक विद्वान लोक माझ्याकडे येतात. तेसुद्धा हेच सांगतात. पण हे कसे होऊ शकते? मी जरी एकटा खरा असलो तरी मला कोण अडवू शकते? माझ्यावर कोण बळजबरी करू शकते? कोणीही माझ्यावर बळजबरी करू शकत नाही हे तर मी तुम्हाला सांगितले. अशा प्रकारचे बोलणे मला आवडत नाही, पण त्यामुळे मला त्रास होत नाही. जे झाले त्यावर लोक आपली मोहर लावतात याचा मला त्रास होतो. हं, ती मोहर जर लावली नाही तर सर्व काही ठीक होईल.

तुम्हाला माहीत आहे की काल जेव्हा प्रार्थना संपली तेव्हा एका बंधूंनी मला प्रश्न विचारला. मी त्याला तो प्रश्न लिहून देण्याकरिता सांगितले. त्यांनी तसे केले. ते म्हणाले की पाकिस्तानचा निर्णय परत घेण्यात आला नाही तर मी आणि माझी बायको, आम्ही दोघेही उपोषण करून स्वतःचे जीवन संपवून टाकू आणि आम्ही याच ठिकाणी उपोषण करू. (गांधीजी त्यांचे आतिथ्य करू शकले नाही कारण गांधीजीच तिथे अतिथी होते. यामुळे त्या जोडप्याने भंगी कॉलनीसमोर उपोषण केले. परंतु दुसऱ्या दिवशी म्हणजे १८ जूनला त्यांनी उपोषण सोडले आणि स्वतःला रचनात्मक कार्याला वाहून घ्यायचे ठरवले. पाहा प्रार्थना प्रवचन, जून, १९, १९४७) मी त्यांना आत उपोषण करू देऊ शकत नव्हतो कारण ते मंदीर माझे नव्हते. आणि पहिली गोष्ट म्हणजे जर कोणी उपोषण करायलाच पाहिजे असेल तर ते मी करायला पाहिजे होते. कोणीही उपोषण करू नये आणि करायचेच असेल तर त्याचे एक शास्त्र असते, शास्त्र शब्दाचा फार मोठा अर्थ करू नका, त्याची एक पद्धती असते, एक कायदा असतो. ती लहानशी गोष्ट असू शकेल. जसे चरखा लहानशी गोष्ट आहे. परंतु जोपर्यंत चरख्याचे शास्त्र झाले नव्हते तोपर्यंत आम्हाला माहीत नव्हते की चरख्यात किती मोठी शक्ती आहे.

माझ्यासारखा माणूसही आज सांगू शकतो की चरख्यात इतकी शक्ती आहे की तो हिंदुस्तानलाच काय सर्व जगाला स्वातंत्र्य मिळवून देऊ शकतो. जग अण्वस्त्राने स्वतंत्र होणार नाही. जगात दोन प्रकारचे शास्त्र आहेत - एक सात्विक दुसरे राजसिक., एक धर्मानुसार, दुसरे धर्मानुसार नसलेले. त्याची ईश्वरावर श्रद्धा नसते. ते ईश्वराची जागा बळकावते.

याचप्रमाणे उपोषणाचेही शास्त्र आहे. जे उपोषण शास्त्रानुसार नसते ते धर्म्य नसते. जर कोणी म्हणेल की ईश्वराचा साक्षात्कार होईपर्यंत मी उपवास करीन तर तो मरेल पण त्याला ईश्वराचा साक्षात्कार होणार नाही.

जनहितास्तव करावयाच्या उपोषणाचेसुद्धा शास्त्र आहे आणि त्याची पूर्ण माहिती असणारांमधील मी एक आहे. प्रस्तावित उपोषण धर्म्य आहे असे मी समजत नाही. त्यामुळे माझ्या हृदयाला स्पर्ष होत नाही. जगालासुद्धा त्याबद्दल सहानुभूती वाटणार नाही. यामुळे या जोडप्याला माझा सल्ला आहे की त्यांनी हा विचार सोडावा आणि घरी परतावे. याचा अर्थ असा नाही की त्यांनी गप्प बसावे. आपण वेगळे झालो आहो असा विचारच त्यांनी मनात आणू नये. पाकिस्तान निर्माण झाला आहे असे आपल्या अंतःकरणातून आपण मानूच नये. आपण कोणालाही शत्रू वा परका लेखू नये.

चांगल्या लोकांच्या सहवासात राहून, चांगले साहित्य वाचून आणि वाईट विचार टाकून देऊन हे सर्व साध्य करता येऊ शकते. असे करू तेव्हाच आपल्या अतःकरणातील वाईट विचारांची घाण निघून जाईल. अंतःकरण शुद्ध करणे सोपी गोष्ट नाही. रामनामाच्या जपानेच ही गोष्ट साध्य करता येऊ शकेल.

परंतु आज आपल्या मनाला सुखसाधनांचा सोस लागलेला आहे. आपण रामाचा विचार करणार नाही पण सिगारेटचा मात्र करू. आपले विचार चुकीच्या दिशेने भरकटत आहेत. मुसलमानांना आम्ही धडा शिकवू असे लोक सारखे म्हणत आहेत. असे करून आपण पाकिस्तानला चिरस्थायी करण्याचा प्रयत्न करत आहो.

जिनांनी पाकिस्तान निर्माण केला आहे. ते पाकिस्तान निर्माण करू शकतील असा विचार आम्ही स्वप्नातही केला नव्हता. परंतु ते शूर गृहस्थ आहेत. ब्रिटिशांच्या मदतीने पाकिस्तान मिळवण्यात ते यशस्वी झाले आहेत. या तथ्याकडे आपण ढोळेझाक केली आणि आम्ही मुसलमानांना धडा शिकवू असे म्हणत राहिलो तर पाकिस्तानचे सत्य नाहिसे करता येणार नाही.

मी तुम्हाला मुसलमानांचा शरण जाण्याकरिता सांगत नाही. माणूस आपल्या लहान भावाला शरण जात नसतो. माणूस आपल्या भावातर्फे कर्तव्य पार पाडत असतो आणि त्याचा विश्वास जिंकत असतो.

वृत्तपत्रांमधून तुम्ही वाचलेच असेल की आज मी व्हाईसरायना भेटण्याकरिता गेलो होतो. (व्हाईसराय यांच्या भेटीच्या अहवालाकरिता पाहा "लॉर्ड माऊंटबॅटन यांची गांधीजी आणि म. अ. जिना यांच्या मुलाखतीसंबंधातील नोंद", जून १७, १९४७) व्हाईसरायनी मला विचारले, "तुम्ही आजची वृत्तपत्रे पाहिली काय?" मी म्हणालो की मी क्वचितच वृत्तपत्रे पाहत असतो. मग ते म्हणाले, "आज आम्ही काही चांगले साध्य केले". त्यांना फाळणीच्या प्रश्नावर हिंदू आणि मुसलमान यांच्याकडून वेगवेगळे अहवाल मिळाले होते व त्या दोघांनी संयुक्त अहवाल द्यावा याकरिता त्यांनी त्यांची संमती मिळवली होती.

मला हे सांगायचे आहे की दोन भाऊ जेव्हा वेगळे व्हायचे ठरवतात तेव्हा संतापून ते काम करता येत नसते. घरात जर एकच खुर्ची असेल तर तिचे दोन तुकडे करता येत नाहीत. जर तिनात एकाच्या प्रमाणात वाटणी करायची असेल तर गणित फार काळजीपूर्वक करावे लागेल. आपण समिती तयार करून कामाला जी सुरुवात केली आहे ती पुढे सुरू ठेवली पाहिजे. माणसाचा चांगुलपणा केवळ त्याच्या स्मितहास्यावरून सिद्ध होत नाही. आपल्याजवळ जर केवळ गोडगोड शब्द नसतील आणि त्यांच्यासोबत काम करण्याची प्रामाणिक इच्छा असेल तर मी म्हणेन की पाकिस्तानची निर्मिती चांगल्याकरिता झाली आहे. मग व्हायसरायला तसदी देण्याचे काम पडणार नाही. तज्ज्ञांना एकत्र बसवून दोन्ही पक्षांचे समाधान होईल अशा प्रकारे वाटणी करण्याच्या वस्तूंची यादी तयार करा असे केवळ आपण त्यांना सांगू. जेथे मोजदादीची मदत होते तिथे आपण मोजदाद करू. जिथे गणित करून प्रश्न सुटत नसेल तिथे चिठ्ठ्या टाकू. परंतु आपण भांडायला नको.

शेवटचे म्हणजे त्रावणकोरचे दिवाण सी. पी. रामस्वामी यांची लांबलचक तार मिळाली आहे. त्या तारेत त्यांनी लिहिले आहे की त्यांना त्रावणकोरमधील ख्रिश्चन आणि इतरांचा पाठिंबा आहे. मला अशा तारा आवडत नाहीत. कडू गोष्टी साखरेत घोळल्याने गोड होत नाहीत. या सर्व गोष्टींचा आधार "आता या, आम्ही स्वतंत्र आहो" इतकाच आहे. कोणापासून स्वतंत्र? जनतेपासून? भारतापासून स्वतंत्र होऊन ते काय मिळवणार आहेत? अशा प्रकारे गोलगोल फिरून ते काय मिळवणार आहेत? आम्ही भारताबरोबर आहो असे त्यांनी धैर्याने सांगितले पाहिजे. असे झाले तरच ते प्रजेशी एकनिष्ठ आहेत असे म्हणता येईल. असे नसेल तर ते जनतेशी प्रामाणिक नसतील.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १७०-३

# ४४. प्रार्थना प्रवचन, जून १८, १९४७

नवी दिल्ली,

जून १८, १९४७

बंधूनो आणि भगिनींनो,

काल मी तुम्हाला सांगितले होते की एक बंधू आणि त्यांची पत्नी वाल्मिकी मंदिराबाहेर रस्त्यावर उपवास करत आहेत. आज त्यांनी मला अतिशय आदरभावाने लिहिलेले पत्र पाठवले आहे. परंतु त्या पत्रात मला समजूतदारपणा दिसत नाही. ते तरुण आहेत, मी म्हातारा. मी जर म्हणालो की माझ्यात थोडा सुज्ञपणा आहे तर माझ्या शब्दावर त्यांनी विश्वास ठेवला पाहिजे. ते म्हणतात की आम्हाला तुमच्या बोलण्यातील सुज्ञपणा जाणवतो परंतु आमचा अंतरात्मा आम्हाला उपवास सोडण्याकरिता परवानगी देत नाही.

तुम्ही टिळकांनी लिहिलेल्या गीतारहस्यबद्दल ऐकलेले असेल. तो ग्रंथ इतका विचारपरिपूर्ण आहे की त्याचा पुन्हापुन्हा अभ्यास करावा लागतो. मी तो येरवडा तुरुंगात वाचला होता. त्यात ते म्हणतात ती प्रत्येक गोष्ट मला पटली आहे असे नाही. परंतु टिळक महान विद्वान होते व त्यांना संस्कृत साहित्याचे प्रचंड ज्ञान होते हे सत्य कायम राहतेच. मी हा ग्रंथ वाचून बराच काळ लोटला आहे आणि यामुळे त्यातील नेमके शब्द मला आठवत नाहीत. परंतु ते जे म्हणतात त्याचा भावार्थ मी तुम्हाला सांगेन. ते जे म्हणतात ते बरोबर आहे असे मला वाटते.

एका ठिकाणी ते म्हणतात की सदसद्विवेकबुद्धी म्हणजे आतला आवाज, परंतु एखादा जेव्हा असे म्हणतो की माझ्या आतल्या आवाजाप्रमाणे वा सदसद्विवेकबुद्धी म्हणते त्याप्रमाणे मी वागतो तेव्हा त्याचा असा अर्थ होत नाही की तो माणूस खरोखरच आपल्या आतल्या आवाजाचे ऐकून वागतो. वैदिक तत्त्वज्ञानाप्रमाणे सर्व प्राणिमात्रांना सदसद्विवेकबुद्धी आहे. परंतु अनेक लोकांमधील ही विवेकबुद्धी वा आतला आवाज सुप्त म्हणजे झोपलेला असतो. याचा अर्थ आतला आवाज चैतन्यहीन झाला आहे. मग त्याला "आतला आवाज" कसे म्हणता येईल? आपल्या शास्त्रांप्रमाणे आतला आवाज वा अंतरात्मा तेव्हाच जागा होतो जेव्हा आपण यमनियमांदिकांचे पालन करतो. अंतरात्मा जागृत करण्याकरिता फार प्रयत्न करावे लागत असतात. ज्याचा अंतरात्मा जागृत झाला आहे तोच म्हणू शकतो की असे कर. मी टिळकांची शिकवणूक पचवली आहे म्हणून मी सांगू शकतो की ज्याला आपण आतला आवाज म्हणतो तो खरोखर आतला आवाज आहे की नाही हे मी सांगू

शकतो. एखाद्या चोराच्या आतल्या आवाजाने त्याला सांगितले की 'या मुलीचा तू खून कर, तिचे हातपाय तोड आणि तिचे दागिने लुबाड' तर तो आवाज आतला लहानसा आवाज नाही असे मी म्हणेन. तो केवळ दुष्टपणा असेल. अनेकदा आपल्याला निरागस मुलांना मारावेसे वाटते. परंतु तो अंतरात्म्याचा आवाज नसतो.

मी उपोषणाचाही तज्ज्ञ आहे. काही जैन मित्र केवळ याकरिता उपवास करतात की त्यांना हवी असलेली गोष्ट त्यांना मिळालेली नसते. उपवास सोडण्याकरिता मी त्यांची समजूत घातली. धर्मानंद कोसंबी यांच्यासारख्या महान विद्वानानेसुद्धा मी समजूत घातल्यामुळे उपवास सोडला होता. इथेच असलेल्या कालेलकरांनी मला सांगितले की धर्मानंद कोसंबींना मी उपवास सोडायला लावला हे बरोबर केले असे त्यांनी मृत्यूपूर्वी त्यांना सांगितले होते. अशा प्रकारे उपोषणातील मी तज्ज्ञ असल्यामुळे त्या दांपत्याला शक्य असेल तर उपवास सोडा असे मी त्यांना सांगितले. तीन दिवस पुरेसे होते.

वृत्तपत्रांमधून तुम्हाला कळलेच असेल की काल मी जिनांना भेटलो होतो. या भेटीबद्दल मी तुम्हाला आधी सांगू शकलो नाही कारण तेव्हा या भेटीचा निर्णय झालेलाच नव्हता. मी जेव्हा व्हाईसरायभवनमध्ये गेलो तेव्हा जिना तिथे होते आणि तुम्ही त्यांना भेटा असे व्हाईसरायनी मला सांगितले. मी त्यांना नकार देऊ शकत नव्हतो. मी तर असा माणूस आहे की मला तर जिनांना त्यांच्या घरी जाऊनही भेटायला संकोच वाटला नसता. आम्ही भेटलो आणि आम्ही बादशाह खान याचीही भेटी घेणे योग्य होईल असे आम्हाला वाटले. यानंतर सायंकाळी आम्हाला व्हाईसराना भेटायचे होते. परंतु बादशाह खान इतके साधेभोळे की ते बसमध्ये बसले आणि देवबंदला निघून गेले. यामुळे परतण्याकरिता त्यांना तीन नाही तर पाच तास लागले. यामुळे सायंकाळी व्हाईसरायना आम्ही परत भेटू शकलो नाही.

आज व्हाईसरायनी दिल्ली सोडली. परंतु आमची भेट झाली असती तर त्यांना आनंद झाला असता. यामुळे दुपारी ४.३० वाजता आम्ही लॉर्ड इस्मेकेडे गेलो. आता बादशाह खान जिनांना भेटण्याकरिता त्यांच्या घरी गेले आहेत आणि अजून ते परतायचे आहेत.

यावरून आशेचे फार मोठे पूल बांधू नका. परंतु पाकिस्तानच्या स्वरूपात आपल्याला जी जखम झाली आहे ती अजून चिघळणार नाही अशी आशा आपण करू शकतो. आपल्या हाती केवळ प्रयत्न आहेत. परिणाम ईश्वराच्या हातात आहेत. या प्रयत्नांचे चांगले परिणाम होतील अशी आपण आशा करू या.

यामुळे चांगले परिणाम कोणते होऊ शकतात? यामुळे सरहद्द प्रांतातील सर्व पठाण एक होऊ शकतात. पठाण ही तलवारप्रिय जमात आहे. तुम्हाला असा पठाण क्वचितच आढळेल की ज्याला तलवार वा बंदूक चालवता येत नाही. पिढ्यांपिढ्यापासून बदला हा त्यांच्या जीवनाचा मूलमंत्र राहिला आहे. परंतु मारण्यापेक्षा मरण पत्करून ते आपले स्वतःचे रक्षण अधिक चांगले करू शकतात हे बादशाह खान यांच्या लक्षात आले. पठाणांमध्ये हे महान शौर्य विकसित व्हावे आणि त्यांनी सेवा करावी अशी बादशाह खान यांची इच्छा आहे. परंतु हे स्वप्न वास्तवात येण्याआधीच सार्वमताचा हा प्रश्न आला.

काही लोक म्हणतील की आम्ही पठाणांची बाजू घेतली पाहिजे. इतर काही म्हणतील की ते कॉंग्रेसबरोबर राहतील. आणि काही लोकांना कॉंग्रेस ही हिंदूंची संघटना आहे असे वाटते. यामुळे पठाणांमध्ये फूट पडली आहे आणि त्यांच्यात असा संघर्ष निर्माण होऊ शकतो की ज्यावर नियंत्रण आणणे कठीण होईल. ते परस्परांची कत्तल करतील. बादशाह खानची इच्छा आहे की काहीही करून सार्वमतापासून पठाणांना मोकळे ठेवण्यात यावे. त्यांची इच्छा आहे की पठाणांनी आपले स्वतःचे कायदे करावे आणि एक राहावे. असे झाले तर हिंदुस्तानची वा पाकिस्तानची निवड करण्यात आली तरी त्यांच्याकरिता काहीही फरक पडणार नाही. ते म्हणतात की आमच्याजवळ पैसा नाही. ते गरीब लोक आहेत. त्यांना स्वतत्र राष्ट्र होण्याची इच्छा नाही. परंतु सध्याच्या भांडणातून बाहेर पडल्यानंतर कोणत्या देशात सामील व्हावे हे ठरवण्याची मुभा असावी अशी त्यांची इच्छा आहे.

याशिवाय काही हिंदूंना हरिद्वारमध्ये आश्रय घ्यावा लागला यामुळेसुद्धा डॉ. खानसाहेब व्यथित झाले आहेत. यामुळे या हिंदूंनी वायव्य रहद्द प्रांतात परतावे असे बादशाह खान यांना वाटते. अजूनही सरहद्द प्रांतात अनेक हिंदू आहेत. ते इतके गरीब आहेत की ते सरहद्द प्रांत सोडू शकत नाहीत. सार्वमताचा प्रश्न सुटल्यानंतर त्यांना सुरक्षित वाटू शकेल. याकरिताच बादशाह खान कायदे आझम यांना भेटण्याकरिता गेले आहेत. ते तिथून काय आणतात हे पाहायचे आहे.

ख्वाजा अब्दुल मजीद मला भेटायला आले होते. आता पाकिस्तान देण्यात आलेला असल्यामुळे राष्ट्रवादी मुसलमानांकडे दुर्लक्ष केले जाणार नाही. मी चांगला हिंदू असल्यामुळे ज्याप्रमाणे मी स्वतःला चांगला मुसलमानही समजतो त्याचप्रमाणे ख्वाजा साहेब चांगले मुसलमान असल्यामुळे ते स्वतःला चांगला हिंदूही समजतात.

ते म्हणतात की विभक्त मतदार संघ रद्द करावे कारण भारतीय संघ राज्यात ऐक्य असल्याचे चित्र आपण जगासमोर उभे केले पाहिजे अशी माझी इच्छा आहे. आपले धर्म वेगवेगळे असू शकतील परंतु कायद्याच्या दृष्टीने आपण सर्व हिंदुस्तानचे नागरिक आहो आणि जो कोणी भारताचा

नागरीक असेल त्याला तेच अधिकार असले पाहिजे जे इतर सर्वांना आहेत. कमीतकमी आपण दोघे परस्परांना धार्मिक व्यक्ती समजतो तसेच आपल्यामध्ये सदिच्छाही आहे. धर्माच्या नावावर कोणाच्याही अधिकाराला धक्का लागणार नाही हे आपण पाहू. याचबरोबर कोणालाही धार्मिक कारणाकरिता एकही सूट मिळणार नाही हेसुद्धा आपण पाहू. जिनांनी हेच केले. आधी त्यांनी ११ मागण्या ठेवल्या, मग चौदा, मग एकवीस आणि अखेरीस त्यांनी पाकिस्तानची मागणी केली. यापुढे कोणालाही असे करण्याची परवानगी देता येऊ शकत नाही. हिंदुस्तान विशाल देश आहे आणि जो कोणी त्याच्याशी निष्ठावंत असेल त्याच्याकरिता इथे जागा असेल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १७३-७

# ४५. प्रार्थना प्रवचन, जून १९, १९४७

नवी दिल्ली,

जून, १९,१९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काल प्रार्थना प्रवचनाच्या शेवटी एका बंधूने मला प्रश्न विचारला. मी त्याला तो लिहून देण्याकरिता सांगितला. त्याने तसे केले. परंतु ज्या कागदावर तो प्रश्न लिहिला होता तो कोणाच्या तरी खिशात राहिला आणि जेव्हा कपडे धुतले गेले तेव्हा तो कागदही धुण्यात धुतला गेला आणि जेव्हा तो माझ्या हाती आला तेव्हा त्यावरील काहीही वाचण्यासारखे राहिले नव्हते. ही लाजिरवाणी गोष्ट आहे परंतु प्रश्न विचारणारा सभेत हजर नसल्यामुळे मी कोणाची माफी मागावी हेच मला कळत नाही.

इथे ३ वा ४ दिवसांपासून उपोषण करत असलेल्या दांम्पत्याबद्दल काल मी जे तुम्हाला सांगितले होते त्यामुळे आधी तर त्यांना काहीसा राग आला होता. ते म्हणाले की हा माणूस स्वतःला उपोषणाचा तज्ज्ञ कसा म्हणू शकतो? तो इतका अहंकारी कसा? ही तर अहंकाराची परिसीमा झाली. त्यांची मला भेटायची इच्छा होती. मी त्यांना साडेसात आठ वाजता भेटलो. मी त्यांना स्पष्ट करून सांगितले की पाच फूट उंचीच्या माणसाने मी पाच फूट उंच आहे असा दावा केला तर त्याला अहंकारी म्हणता येत नाही. त्याने काय मी पाच फुटाचा नाही असे खोटेच सांगावे? त्यांनी तसे रागाच्या भरात म्हटले होते. त्यांच्या लक्षात आले की उपोषण करण्याऐवजी आपल्या हृदयात हिंदुस्तानचे तुकडे झालेच नाही असे वागायचे. त्यांनी दूध आणि फळे घेऊन उपोषण सोडले. मी त्यांचे अभिनंदन केले. “आम्ही अन्यायाचा प्रतिकार कसा करावा?” असे मला त्यांनी विचारले. मी म्हणालो, अन्यायापासून मिळणारे लाभ सोडून द्या. आपण कोणावरही जुलुमजबरदस्ती करू नये. अन्यायामुळे आपला लाभ व्हायला नको.हा अहिंसेचा मार्ग आहे. हा असहकार आहे.

काल मी तुम्हाला सांगितले होते की बादशाह खान जिनांना भेटणार आहेत ती भेट यशस्वी व्हावी म्हणून आपण प्रयत्न केला पाहिजे. आपल्या प्रार्थनेमुळे कोणते फळ मिळणार असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. जिनांनी वृत्तपत्रांमध्ये जे सांगितले त्याहून जास्त मला माहीत नाही. ते म्हणाले की चर्चा सलोख्याच्या वातावरणात झाली. हे चांगले आहे. परंतु विषय काय होता? ते म्हणतात की सरहद्द प्रांतातून बादशाह खान जेव्हा कळवतील तेव्हा विषय कळेल. याचा अर्थ

कोणताही विषय नव्हता. परंतु कालच्या प्रार्थनेचे आजच फळ मिळावे अशी अपेक्षा आपण करू शकत नाही. जो अशी अपेक्षा करतो त्याला ईश्वर कळत नाही. मी तुम्हाला प्रार्थनेचे महत्त्व सांगेन.

आपण प्रार्थनेच्या परिणामाची मागणी करू शकत नाही वा प्रार्थना करणे थांबवू शकत नाही. एकदा आपण अन्नपाण्याचा त्याग करू शकतो व कधीकधी आपण असे करतोसुद्धा. परंतु प्रार्थना करणे आपण कधीही थांबवू शकत नाही. आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत आपण प्रार्थना करत राहिलो पाहिजे. ज्याप्रमाणे अन्न देहाचे पोषण करते त्याचप्रमाणे रामनाम आत्म्याचे पोषण करते. गायत्री मंत्राकरिता सकाळ आणि संध्याकाळची वेळ सांगितली आहे. नमाझकरिताही वेळा सांगितलेल्या आहेत. परंतु रामनामाकरिता कोणतीही वेळ सांगितलेली नाही. प्रत्येक श्वासाबरोबर रामनाम म्हणणारी व्यक्ती भाग्यवान असते.असा माणूस १२५ वर्षे जगू शकतो. मी जर १२५ वर्षे पूर्ण करण्याआधी मरण पावलो तर समजा की वर वर्णन केलेल्या अवस्थेत मी पोहोचलो नव्हतो.

मी परवा हरिद्वारला जाणार आहे. जवाहरलाल माझ्याबरोबर असेल. संयुक्त प्रांतात ते सर्वोच्च आहेत. आज ते संपूर्ण हिंदुस्तानात सर्वोच्च आहेत. आज आपल्याला कठीण परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. तिथे हजारो निर्वासित आहेत. आपण त्यांच्याकरिता काय करावे? लोकांना फुकट खायला देण्याच्या मी विरुद्ध आहे. माणसाला जे अन्न मिळते त्याकरिता त्याने काही तरी केले पाहिजे. जो काम करतो त्यालाच खायला मिळेल हा नियम ईश्वराने सांगितला आहे. निर्वासितांना मी सांगितलेच पाहिजे की तुम्ही काम केलेच पाहिजे. त्याचबरोबर घरी परतण्याकरिता त्यांनी प्रयत्न केला पाहिजे आणि शक्य तितक्या लवकर घरी परतायला पाहिजे. परंतु वायव्य सरहद्द प्रांतात जे काही घडते आहे ते पाहता मी त्यांना मृत्याच्या जबड्यात शिरण्याकरिता सांगू शकत नाही. पाकिस्तानमध्ये ज्यांनी गुन्हे केले आहेत त्यांच्यावर खटले भरा असे मी मुस्लिम लीगला सांगायलाच पाहिजे. वाईटपणाला वाईटपणा आणि हिंसेला हिंसा याचा मी पुरस्कार करत नसतो. परंतु ज्या जनतेवर सरकार शासन करते त्या जनतेचे रक्षण करणे सरकारचे कर्तव्य असते, मग ती जनता वेगळ्या धर्माची का असेना. हे खरे आहे की त्यांनी प्रत्येकाला परत या असे म्हटले आहे. परंतु आपल्याला तिथे चांगली वर्तुणूक मिळणार नाही हे माहीत असतानाही लोक तिथे कसे परततील? यामुळे अपराध्यांना शिक्षा केली जाईल असे तेथील सरकारने घोषित केले पाहिजे आणि आणि जनतेचे रक्षण केले पाहिजे. जर असे झाले तर हरिद्वारमध्ये एक दिवसही शरणार्थी राहणार नाहीत हे मी पाहीन.

वायव्य सरहद्द प्रांतातील लोकांनी भारत वा पाकिस्तानच्या बाजूने मत दिले पाहिजे असे आज घोषित करण्यात आले आहे. लोकांसमोर हिदुस्तान हे हिंदू राज आहे असे चित्र रंगवले जात आहे आणि त्यांना बिहारची आठवण करून दिली जात आहे. अशा वातावरणात क्वचितच कोणी

मुसलमान पाकिस्तान सोडून हिंदुस्तानचा स्वीकार करील. अशा परिस्थितीत बादशाह खानची इच्छा आहे की वायव्य सरहद्द प्रांताला तात्पुरते स्वतत्र प्रांत घोषित करण्यात यावे म्हणजे हिंदुस्तान वा पाकिस्तानमध्ये सामील न होता वायव्य सरहद्द प्रांतातील जनता आपले कायदे करील व स्वतःची घटना तयार करील.

पठाणांना कॉंग्रेसने स्वतःची घटना तयार करायला सांगावी आणि तिच्यात कोणताही हस्तक्षेप करू नये. इतर प्रांतांप्रमाणे केंद्रीय अबकारी करासारख्या गोष्टींवर केवळ आपले नियंत्रण असावे परंतु अंतर्गत बाबतीत त्यांना शरियतप्रमाणे काम करू द्यावे.

याचप्रमाणे पाकिस्तानमध्ये समाविष्ट होणाऱ्या प्रांतांना अंतर्गत बाबतीत असेच स्वातंत्र्य असावे आणि केंद्राने केवळ काहीच बाबतीत जबाबदार असावे असे लीगनेसुद्धा जाहीर करावे. याचा अर्थ आपल्याला दोन केंद्र असतील आणि प्रांतांना अधिकात अधिक स्वायत्तता असेल. हे जर मान्य केले गेले तर सार्वमताची गरजच पडणार नाही. जर असे झाले तर मी पठाणांना सल्ला देईन की तुम्ही भौगोलिक दृष्टीने पाकिस्तानजवळ असल्यामुळे तुम्ही पाकिस्तानमध्ये सामील व्हा. आज मी पठाणांना असा सल्ला देऊ शकत नाही कारण पाकिस्तानचे कोणते स्वरूप राहील हे मला माहीत नाही.

तरीही अशा गोंधळाच्या स्थितीत जर सार्वमताची आवश्यकता असेलच तर सार्वमत हिंदुस्तान की पाकिस्तान असे घेण्यात येऊ नये तर पाकिस्तान की पठाणीस्तान असे घेण्यात यावे. सरळसरळ सांगायचे तर मी त्यांना हेच सांगण्याचा प्रयत्न करतो आहे. (यानंतरचा भाग द हिंदूमधील आहे.)

*असे असले तरी स्वतंत्र पठाणीस्तानचे आंदोलन कायम राहणार आहे कारण त्याचा पाया मजबूत आहे असे गांधीजींनी सांगितले. जर ते हिंदुस्तानविरोधी आंदोलन असेल तर ते वाईट आणि खोडसाळपणाचे आंदोलन असेल. परंतु जर त्या आंदोलनाचा अर्थ पठाणांचे जीवन आणि संस्कृती यांचे रक्षण करणे असा असेल तर, आणि तो तसा आहे असे मी समजतो, त्याला सर्व प्रकारचे प्रोत्साहन दिले पाहिजे. भौगोलिक दृष्टीने सरहद्द प्रांत हिंदुस्तानचा लहानसा भाग आहे. गणितीदृष्टीनेसुद्धा करोडो हिदुस्तानींच्या तुलनेत पठाण संख्येने फार कमी आहेत. परंतु त्यांचे युद्धकौशल्य व हिंदुस्तानच्या नकाशावरील त्यांचे स्थान यांमुळे त्याला आगळेवेगळे महत्त्व आहे.*

*याशिवाय सरहद्द प्रांत हा कॉंग्रेसचा प्रांत आहे. कॉंग्रेसला कुठेही स्थान नव्हते तेव्हापासून तसे होते आणि आता कॉंग्रेस सत्तेत असतानाही तसेच आहे. घटना समितीतही त्याचे प्रतिनिधी आहेत. परंतु आता अगदी नाजूक परिस्थितीचा त्याला सामना करावा लागत आहे. आता तिथे ताबडतोब*

*सार्वमत घेतले जाणार आहे. कॉंग्रेस आणि लीग या दोघांनीही ही गोष्ट कबूल केलेली आहे. या अटीत बदल करण्याचा अधिकार कोणत्याही पक्षाला नाही. पाकिस्तान की हिंदुस्तान हा प्रश्न घसास लागलेला आहे. त्यांच्यासमोर तिथे जे काही घडले त्या दष्टीने पाहिले असता त्याला कुटिल हेतूचा वास येतो. त्यांनी हिंदूंबरोबर राहावे की मुसलमानांबरोबर?*

*कॉंग्रेस ही हिंदूंची संघटना नव्हती. ती तशी कधीही नव्हती आणि कधीही तशी नसेल अशी त्यांना आशा होती. परंतु दिवसेंदिवस वाढत चाललेल्या गोंधळाच्या या वातावरणात पठाणांच्या डोक्यात हे कसे शिरावे? कॉंग्रेसने आपली स्थिती स्पष्ट करावी आणि मुस्लिम लीगनेही तसेच करावे असे त्यांचे म्हणणे होते. दोघांनीही पठाणांच्या भावनांचा आदर करावा व पठाणांना अंतर्गत बाबी आणि प्रशासनाकरिता स्वतःची घटना तयार करू द्यावी. यामुळे पठाणांचे ऐक्य कायम राहील, त्यांच्यातील अंतर्गत संघर्ष टळेल व पुश्तु संस्कृती आणि पुश्तु भाषा यांचे जतन केले जाईल. जर असे करण्यात आले तर ते एक होऊन पाकिस्तान वा भारतीय संघराज्यात सामील होण्याचा निर्णय अधिक चांगल्या प्रकारे घेऊ शकतील. सार्वमत होवो वा न होवो गांधीजींचा हाच सल्ला होता. याआधी अपरिपक्वावस्थेत घेण्यात आलेले सार्वमत अंधारातील उडी ठरेल असे गांधीजींचे म्हणणे होते.*

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १७८-८२ आणि द हिंदू, जून २६, १९४७

# ४६. प्रार्थना प्रवचन, जून २०, १९४७

नवी दिल्ली,

जून २०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी उद्या सकाळी हरिद्वारला जाण्याकरिता निघेन. आणि संध्याकाळी परतेन. मी परतेन तेव्हा रात्र झालेली असेल असे मला वाटते. यामुळे मी प्रार्थनेकरिता इथे हजर नसेन. तुमची इच्छा असली तर तुम्ही तरीही इथे येऊन प्रार्थना करू शकता. निर्वासितांना आश्वस्त करण्याकरिता मला तिथे जायचे आहे. मी फारसे काही करू शकेन असे मला वाटत नाही. परंतु मी माझे कर्तव्य केले पाहिजे.

आज कोणी तरी या लहानशा मनूला पत्र पाठवले आणि त्यात ताकीद देत लिहिले की तू जर प्रार्थनेत कुराणातील पाठ म्हणणे सुरू ठेवशील तर आम्ही तुला मारून टाकू. अशा प्रकारे कोणाला धमकी देणे आपल्या परंपरेत बसत नाही आणि मनू तर अगदी लहान मुलगी आहे. ती जर कुराणातील पाठ म्हणत असेल तर ती तसे माझ्या सूचनेप्रमाणे करते. माझा स्वतःचा आवाज चांगला नाही. जर हा विनोद असेल तर हा चांगला विनोद नाही.

कुराणमधील आयतींबद्दल म्हणायचे तर यासंबंधीची माझी भूमिका मी तुम्हाला सांगितली आहे.या कडव्यांमध्ये आक्षेपार्ह काहीही नाही. मी त्यांचा अर्थ तुम्हाला स्पष्ट करून सांगितला आहे. माझ्याबरोबर असलेला मुसलमान मित्र सांगतो की या आयती म्हणणाराचा सैतान कधीही छळ करत नाही. तुलसीदास रामायणाचा गुण सांगत असताना हीच गोष्ट सांगतात आणि गायत्रीमंत्राबद्दलही आपली हीच भावना आहे. मग अशा धमक्या का? यामुळे काय लाभ होणार आहे? अशा धमक्यांचा जर कोणाला फायदा होणारच असेल तर तो धमकी देण्यात आलेल्या लहान मुलीचा होईल कारण यामुळे ती अजूनच निर्भय होईल.

मला तुम्हाला सांगायचे आहे की आपण स्वदेशी विसरलो आहो. मी तुम्हाला सांगत आलो आहे की आपण जर पाश्चात्त्य पद्धतीची नक्कल करू तर स्वराज्याची अपेक्षा करणे व्यर्थ होईल. अशा धमक्या पाश्चात्य प्रभाव दाखवतात. स्वदेशीमुळे आपली हानी होत नाही आहे, आपली उपासमार होत नाही आहे. पुर्वी जर कोणी विदेशी लोकांच्या शैलीने वागू लागला तर मी त्याला धारेवर धरत असे. परंतु त्या वेळी माझा प्रभाव होता आणि बंदुकीने देशावर राज्य करता येत नाही. आज माझा शब्द चालत नाही. मी म्हातारा माणूस आहे. मी ठीकठिकाणी पळू शकत नाही. आज जरी माझा

आवाज लोकांपर्यंत पोहोचू शकला तरी मी तेच म्हणेन जे मी गत तीस वर्षांपासून मी म्हणत आलो आहे. मी आता अठ्ठयाहत्तर वर्षांचा झालो आहे परंतु मी माझे तारुण्य दक्षिण आफ्रिकेत अज्ञातवासात घालवले आहे, आणि दक्षिण आफ्रिकेपासून बत्तीस वर्षे मी जे शिकवतो आहे ते हे आहे - आतापर्यंत आपण जे काही साध्य केले आहे ते पाश्चत्त्यांच्या मार्गाची नक्कल करून आपण गमावू. स्वदेशी ही आत्म्याला आवाहन करणारी गोष्ट आहे.

मी संपूर्ण स्वदेशीबद्दल बोलत होतो व खादी तिच्या केंद्रस्थानी आहे असे मी आग्रहपूर्वक सांगत होतो. त्या वेळी आपल्याजवळ राष्ट्रध्वज नव्हता. नंतर देशातील सर्व लोकांचे प्रतिनिधित्व करणारा तिरंगा आपण तयार केला. आज तिरंग्यात सर्व रंग आहेत परंतु तो फडफडत नाही. आपण जर त्याला हृदयात स्थान दिले तर अजूनही आपण त्याला उंचावर नेऊ शकतो.

आज आपण खादी वा खादी टोपी वापरत असलो तरी आत केवळ पोकळी आहे. त्या वेळी मी म्हणालो होतो की केवळ विदेशी कापडच नाही तर हिंदुस्तानात तयार झालेले गिरणी कापडसुद्धा आपल्याकरिता निषिद्ध आहे. जो कापूर आपण इथे तयार करत नाही आणि जे फार उपयोगी आहे ते जपानमधून आयात केलेले असले तरी विदेशी राहत नाही. परंतु जी गोष्ट आपण इथे तयार करू शकतो ती जर आपण जपानमधून आयात केली तर आपल्याकरिता ती गोष्ट विषासमान असेल. आपले करोडो लोक कापड तयार करत होते. ते स्वतःच्या गरजेचे कापड तर तयार करतच होते शिवाय जहाज भरभरून कापड निर्यातही करत होते. आता त्यांनी असा काय अपराध केला आहे की त्यांनी तयार केलेल्या कापसाची निर्यात व्हावी आणि आणि त्या कापसापासून तयार केलेले कापड आयात करावे लागावे व ते कापसापेक्षाही इथे कमी भावात विकले जावे? यामागे असे काही तरी आहे की जे ऐकले तर आपल्या अंगावर शहारे उभे राहतील.

एक काळ असा होता की जेव्हा आपण ढिगांनी विदेशी कापड गोळा करत होतो आणि ते जाळून टाकत होते. त्या वेळी राष्ट्रीय संपत्तीचा नाश झाला असे कोणीही म्हणत नसे. श्रीमती नायडूंनी आपली साडी जाळून टाकली होती जी पॅरीसहून आली होती आणि मोतिलाल नेहरूंनीही आपल्या सर्व विदेशी कापडाची होळी केली होती. आम्ही जेव्हा तुरुंगात गेलो तेव्हा त्यांनी मला पत्र पाठवले होते. आता मला ते शोधता येणे शक्य नाही. त्यात त्यांनी लिहिले होते की आता मी खरे जीवन जगतो आहे आणि मला असा आनंद मिळतो आहे की जो आनंदभवनमधील सुखसाधनांनीही मिळत नव्हता. तुरुंगात त्यांना चिरुट मिळत नव्हता, मद्य मिळत नव्हते आणि मांसाहारही मिळत नव्हता. आणि तरीही ते सुखी होते. हे खरे आहे की हे फार दिवस टिकले नाही. माणसाला नेहमीच उंच भरारी घ्यावीशी वाटत असते परंतु तो तिथे फार काळ स्थिरावू शकत नाही. आपण पुन्हापुन्हा उंचावर चढतो

परंतु परत घसरतो. परंतु आपली उंच भरारी हीच आपली आवडती स्मृती असते. निदान माझ्या बाबतीत तरी असे आहे. परंतु आता तो काळ कुठे आहे?

असे नाही की काळ बदलला आहे. सद्हेतूने एका व्यापाऱ्याने मला पत्र पाठवले होते आणि त्यात तो बदललेल्या काळाबद्दल खेद व्यक्त करत होता. तो म्हणतो की आम्ही सर्व स्वार्थी झालो आहो. आणि ब्रिटिश जात असतानाही आपल्या स्वार्थाकरिता युक्त्याप्रयुक्त्या करून आपल्यामध्ये भांडण लावत आहेत. त्यांना जर जायचे आहे तर ते हाव का सोडत नाहीत? ते प्रतिष्ठितपणे का जात नाहीत? परंतु ब्रिटिशांबद्दलच का बोलायचे? कॉंग्रेसचे लोकसुद्धा स्वार्थी झाले आहेत. समुद्रालाच आग लागली तर ती कोण विझवू शकणार? मिठाने जर आपला खारटपणा गमावला तर खारटपणा आणायचा कशाने? कॉंग्रेसने किती तरी त्याग केला आहे आणि दीर्घ काळ संघर्ष केला आहे. आता तो भव्योदात्तपणा कुठे आहे? त्यांना आता अध्यक्ष आणि सचिव व्हायचे आहे. माझ्या मते या सर्व गोष्टी पाश्चात्यांचे प्रतिनिधित्व करतात.

मी असे ऐकले आहे की हिंदुस्तानी गिरणीकापडावर नियंत्रण आहे परंतु आयातीत विदेशी कापडाच्या विक्रीवर कोणतेही नियंत्रण नाही. हे सर्व काय आहे? हे स्वराज्य मी समजू शकत नाही. आपण एका हाताने जे मिळवतो ते दुसऱ्या हाताने गमावतो असे दिसते. ही खेदाची गोष्ट आहे. एका पत्रलेखकाने मला पश्चिम पंजाबला आश्वस्त करण्यासंबंधी लिहिले. मी तसे केले परंतु केवळ सहानुभूती दाखवल्यामुले फारसा फायदा होणार नाही. अखेरीस पंजाब असे ठिकाण आहे की जिथे लाला लजपतराय यांचा जन्म झाला होता. हे शूर लोकांचे घर आहे. शीख लोकांचा हा देश आहे. शीख लोकांच्या तलवार उपसणाऱ्या शौर्याचे मला कौतुक नाही. निःशस्त्र माणूस जे शौर्य दाखवतो ते खरे शौर्य असते. परंतु पंजाबमधील लोक आज शस्त्र मिळवण्यासंबंधी बोलतात. मी जेव्हा त्यांना विचारले की तुम्हाला पैसा पाहिजे काय तेव्हा ते म्हणाले की नाही, आम्हाला शस्त्र पाहिजे. ही मनोवत्तीसुद्धा पाश्चात्य आहे. मला त्यांना सांगायचे आहे की पंजाबने शेळ्यामेंढ्या निर्माण करू नये तर सिंहांना जन्म द्यावा. मला पंजाब माहीत आहे. मला पंजाबच्या स्त्रियाही माहीत आहेत. त्या शरीराने धष्टपुष्ट आहेत. त्यांचे हृदयसुद्धा मजबूत असावे असे मला वाटते. सिंहासारखे हृदय असलेले पुरुष निर्माण करण्याकरिता तेथील वातावरण पोषक राहिलेले नाही. आज पंजाबमधील स्त्रियांना भडक विदेशी कापडाचा मोह होतो आहे. त्यांना पारदर्शक साड्या हव्या आहेत. पुरुषसुद्धा फार मागे नाहीत. ते जरी अशा प्रकारचे धोतर नेसत नसतील तरी त्यांना त्यांच्या स्त्रियांना सुशोभित करण्याची इच्छा असते. पंजाबमधील बहिणी जेव्हा माझ्याकडे येतात तेव्हा तुम्ही इतक्या सगळ्या दागिन्यांचे प्रदर्शन का करता आणि असा पोषाख का करता असे मी त्यांना विचारतो तेव्हा त्या सांगतात की

आमच्या नवऱ्याचा, वा वडलांचा वा भावाचा तसा आग्रह असतो. पुरुष आपल्या स्त्रियांना बाहुल्या का बनवतो?

आपण हे सर्व सोडून दिले तर आपण घाबरणार नाही. आपण कोणाची भीती बाळगतो? मुसलमानांची? ते जर सैतान बनत असतील तर आपण माणूस बनू या. जेव्हा मी, एक गरीब बनिया, घाबरत नाही तर तुम्ही का घाबरावे? जास्तीत जास्त ते आपल्याला मारू शकतील. त्यांना मला मारू द्या. ते माझे रक्त पितील काय? त्यांना तसे करू द्या. त्यामुळे काही अन्नधान्य वाचेल आणि माझ्याकडून काही सेवा झाली असे मी समजेन. परंतु मी सेवा करणारा कोण? सेवेकरिता माझा उपयोग करणारा तो ईश्वरच आहे असे म्हणणे अधिक योग्य होईल. यामुळे मी तुम्हाला सांगतो की ‘‘घाबरू नका’’.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - , पृष्ठ १८२-८७

# ४७. प्रार्थना प्रवचन, जून २२, १९४७

नवी दिल्ली,

जून २२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

तुम्हाला माहीतच आहे की पंजाब आणि सरहद्द प्रांतांतील निर्वासितांना पाहण्याकरिता मी हरिद्वारला गेलो होतो. तिथे डेरा इस्माईल खान आणि इतर ठिकाणाहून ३२,००० निर्वासित आलेले आहेत. तिथे वाद करायला तर वेळ नव्हता. मी त्या लोकांशी पोट भरून बोललो. त्यांच्या छावणीतही गेलो. लोकांनी मला त्यांच्याबद्दलच्या तऱ्हेतऱ्हेच्या गोष्टी सांगितल्या. तिथे दोन प्रकारचे लोक आले आहेत, एक खरोखर दुःखी आणि हलाखीच्या परिस्थितीत असलेले आणि दुसरे खाऊनपिऊन सुखी आणि पैसेवाले. परंतु त्यातील काही असे आहेत की जे दारू पितात, जुगार खेळतात आणि वेगवेगळ्या मार्गांने पैसे मिळवतात. अशा संकटप्रसंगी असे वर्तन करणे त्यांना शोभत नाही असे मी म्हणेन.

तिथे लोक दुःखी होऊन आले आहेत. आपल्या नातलगांपासून वेगळे होऊन ते आले आहेत. पण आता याकरिता रडून काय होणार? मी त्यांना सांगतले की दुःखाची गोष्ट विसरा. दुःख विसरल्यानेच दुःख नाहिसे होत असते. तुम्हाला तर दुःखात सुख निर्माण करायचे आहे. इतकी मोठी गोष्ट झाली, हिंदुस्तानचे तुकडे झाले. मला त्याचे दुःख आहे. पण म्हणून काय मी रडू?

मी तुम्हाला आणि तुमच्या माध्यमातून त्यांना सागू इच्छितो की सर्वांनी दुःख विसरावे. या ३२,००० लोकांनी आपली सहकारी संघटना बनवली पाहिजे. त्यांनी उद्योग केला पाहिजे, दारू प्यायला नको, जुगार खेळू नये, गांजा ओढू नये. त्यांनी काही ना काही काम अवश्य केले पाहिजे. शासनाची त्या सर्वांना खाऊ घालण्याची जरी इच्छा असेल तरी ते तसे करू शकत नाही. आज तर चोहोकडे काळा बाजार सुरू आहे. आणि माणसे खरी असली तरी सर्वांना पूर्ण रेशन मिळू शकत नाही. परंतु त्यांनी रडायला नको. तक्रार करून, रडून जेवण मिळू शकत नाही. त्यांनी सहकार्याने काम केले पाहिजे.

दक्षिण आफ्रिकेतील ऐतिहासिक यात्रेत आम्ही दररोज २० मैल चालत होतो. बरीच माणसे बरोबर होती. त्यांना देण्याकरिता माझ्याजवळ एक अंस साखर आणि काही डबलरोटी होती. यात एका माणसाचे पोट भरत नसे. २० मैल चालून आम्ही जेव्हा पोहोचत असू तेव्हा सायंकाळ झालेली

असे. तिथे काही शिजत असल्याचे मला दिसत असे. चौकशी केल्यानंतर मला आढळले की ते लोक गवतात काही पक्षी आणि खाण्यालायक काही गोष्टी वेचून होते. थोडेसे मीठ घ्यायचे. तिथे पाणी कुठले? शिजवणे सुरू करायचे. मी खुष झालो. अशा (उद्योगी) लोकांबरोबर तर नेहमीकरिता प्रवास करता येऊ शकतो. तिथे त्यांनी जंगलातही मंगल केले होते.

हरिद्वारची माती तर अजूनच सुपीक आहे. इथे तर ते अजूनच उद्योग करू शकतात. ते असे करतील तर लोकांना त्यांचा कंटाळा येणार नाही. जे आश्रित असतात त्यांनी अशा प्रकारे राहिले पाहिजे की त्यांचा लोकांना भार वाटू नये. एकमेकांच्या सोबतीने सर्वांनी वेळ काढला पाहिजे.

हरिद्वार पवित्र आहे असे लोक म्हणतात. त्याचा त्यांनी फायदा घेतला पाहिजे. असे असतानाही त्या पवित्र ठिकाणी चोरांचे अड्डे झाले आहेत आणि भिक्षावृत्तीवर धर्माचे शिक्कामोर्तब करण्यात आले आहे हे मी कबूल केले पाहिजे. १९१५च्या कुंभमेळ्यात भारत सेवक समाजाच्या शिबिरात दक्षिण आफ्रिकेतील माझ्या सहकाऱ्यांबरोबर मला जेव्हा सेवेची संधी मिळाली तेव्हा मला अनेक दुःखद अनुभव आले. शरणार्थ्यांची इच्छा असेल तर ते या स्थानाला पवित्र ठिकाण बनवू शकतात. (हा परिच्छेद द हिंदूमधून घेतला आहे.)

लोकांनी कोणता ना कोणता व्यवसाय केला पाहिजे. तिथे मला काही भगिनी भेटल्या. त्या शिवणकताईचे काम करतात. काही माणसेही अशी भेटली की जे काही ना काही काम शोधून काढतात. मला हे आवडले. माणसाने भिक्षुक व्हायला नको. त्यांनी शूर व्हायला पाहिजे आणि घाबरायला नको.

मी काही प्रत्येक ठिकाणी जाऊ शकत नव्हतो. डॉ. सुशिला नाय्यर सर्व शिबिरात गेल्या. तिथे त्यांना फार घाण दिसली. हे काम सरकार करू शकत नाही. आपण स्वतः आपल्या साफसफाईचे काम केले पाहिजे. शिबीर चांगले पसरलेले असले पाहिजे. लोक म्हणतात की तिथे श्वापदांची भीती आहे. मी त्यांना सांगतो की जंगली श्वापदांना काय घाबरायचे? जंगली पशू तसेच माणसांना घाबरत असतात. ३२,००० हजार माणसांनी भीती सोडून दिली पाहिजे. ते जिथे वस्ती करतील तिथून जंगली पशू पळून जातील. दुधात ज्याप्रमाणे खडीसाखर मिसळते त्याप्रमाणे या लोकांनी मिळूनमिसळून राहिले पाहिजे.

माणसांना वा पशूंना घाबरत असताना तुम्हा लोकांना लाज वाटली पाहिजे. जंगली पशू माणसाच्या भीतीने पळून जात असतात. असे सर्वत्र होत असते. श्रद्धानंदजींनी नदीच्या पलीकडील काठावर, जिथे जंगली श्वापदे राहतात, आपल्या आश्रमाची स्थापना केली होती हे तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे. लक्षात ठेवा की पोलीस तुम्हाला आवश्यक तितकेच संरक्षण देतील. धैर्य, आशा,

शौर्य, शुद्धता आणि मेहनत हे गुण कायम ठेवून सहकार्याने वागलात तर तुमचे जीवन सुखकर होईल. तोपर्यंत ज्या लोकांबरोबर तुम्ही राहता त्यांच्यावर ओझे बनण्याऐवजी त्यांच्याबरोबर दुधात साखर मिसळावी तसे तुम्ही राहा. (हा परिच्छेद द हिंदू मधून घेतला आहे.)

मी एक दुःखद गोष्ट ऐकली आहे. ती गोष्ट काबूलची आहे. काबूलमध्ये जे हिंदू राहतात ते तिथल्या लोकांच्या कृपेमुळे राहतात. त्यांना तिथे एका खास रंगाची पगडी घालावी लागते. तिथले लोक पैशाकरिता असा अत्याचार सहन करतात हे ऐकून मला फार वाईट वाटले. आपण आपल्या हक्कानुसार राहू शकू तर राहायचे नाही तर नाही. मी हे सहन करू शकत नाही. कोणी बादशाह असेल तर आपल्या घरचा. आणि मग काबूल तर आपले घरच आहे. आमचे घर आहे म्हणजे पठाणांचे घर आहे. अंतर इतकेच आहे की इथे ब्रिटिश आहेत, तिथे ब्रिटिशांचे राज्य नाही. दक्षिण आफ्रिकेतील माझा लढाही अशाच प्रकारचा होता. आम्ही त्यांच्यासारखी पगडी का घालू नये? आपल्या लोकांना तिथे मोकळेपणाने राहता येऊ नये ही काही सहन करण्यासारखी गोष्ट नाही. काबूलमध्ये असे नसेल आणि ही अतिशयोक्ती असेल असे मी समजतो. मी पाहीन आणि काबूलवाल्यांना विचारीन.

प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १८७-९० आणि द हिंदू, जून २३, १९४७

संपूर्ण गांधी वाङ्मय, खंड ८८, पृष्ठ १७३-५

# ४८. प्रार्थना प्रवचन, जून २३, १९४७

नवी दिल्ली,

जून २३, १९४७

हिंदुस्तानची आणि प्रांतांची प्रस्तावित फाळणी ही आपली परीक्षा आहे. आजची वृत्तपत्रे सांगतात की हिंदुस्तानच्या फाळणीचे विधेयक फार मोठ्या समारंभासह संसदेत मांडले जाणार आहे आणि जो हिंदुस्तान आतापर्यंत एक देश होता त्याचे आता दोन देश होतील. हा दुःखद प्रसंग आहे आणि याकरिता कोणताही समारंभ होऊ शकत नाही. आम्ही अपेक्षा करत होतो की आमच्या जरी वाटण्या होत असतील तरी त्या एकाच कुटुंबातील भावाभावाच्या वाटण्याप्रमाणे होतील व काहीही झाले तरी आम्ही नेहमीकरिता मित्र राहू. वृत्तपत्रे जे म्हणतात ते खरे असेल तर ब्रिटनची आमचे दोन राष्ट्रांत विभाजन करण्याची इच्छा आहे आणि तेही वाजतगाजत असा त्याचा अर्थ होईल. हा जाता जाता त्यांनी हाणलेला टोला आहे काय?

परंतु देशाचा मोठा भाग, म्हणजे भारतीय संघराज्य जर आपले कर्तव्य पार पाडील तर ते त्यांच्याच चालीने मात खातील. आपल्याला कितीही नको असली तरी फाळणीपासून आपण सुटू शकत नाही. परंतु आपण सरळ मार्गाने चाललो पाहिजे आणि फाळणी झाल्यानंतरही अल्पसंख्य मुसलमानांना परदेशी न समजता आपण एक राष्ट्र आहो असे समजलो पाहिजे. ही उच्चतर धर्माची मागणी आहे. भारत हा जितका आपला देश आहे तितकाच त्यांचा देश आहे.

स्पष्टपणे याचा अर्थ असा आहे की हिंदू धर्मात आपण क्रांतिकारक बदल केला पाहिजे. आपल्यावर अस्पृश्यतेचा कलंक लागलेला आहे. निश्चितच ती आपली दुर्बलता आहे. पाकिस्तानमध्ये मुस्लिम लीग अस्पृश्यांकरिता विभक्त मतदार संघाची लालूच दाखवत आहे असे वाचण्यात येत आहे. पाकिस्तानमध्ये येण्याकरिता आणि इस्लामचा स्वीकार करण्याकरिता हे निमंत्रण आहे काय? बळजबरीच्या धर्मांतरांसंबंधी जे वृत्त अलीकडे येत असते त्यावर मी भाष्य करू इच्छित नाही. मी स्वतः अस्पृश्य बांधवांकडून या गोष्टी ऐकल्या आहेत. काय होईल याच्या भीतीने माझ्या मनात घर केले आहे.

या भीतीवर मात करण्याचा एकच मार्ग आहे. तो म्हणजे हिंदू धर्मातील अस्पृश्यतेच्या भुताला गाडून टाकले पाहिजे. भारतात एकही अस्पृश्य असू नये. सर्व हिंदू एक असावे. कोणी उच्चकनिष्ठ असू नये. आतापर्यंत ज्या गरिबांकडे म्हणजे अस्पृश्यांकडे आणि आदिवासींकडे आपण दुर्लक्ष केले

त्यांच्याकडे विशेष लक्ष पुरवू या, त्यांना शिक्षित करू या, त्यांना चांगल्या प्रकारे राहता येईल हे पाहू या. मतदार यादीत सर्वांचा समान पद्धतीने समावेष करू या. सध्याची परिस्थिती बदलली पाहिजे. तिच्यात किती तरी दुरुस्ती केली पाहिजे. हिंदू धर्म अशा उंचीवर पोहोचेल की तो खोट्याच मूल्यांना कवटाळून बसेल व वाईट मार्गात इतरांची नक्कल करून आत्महत्येचा मार्ग पत्करेल? आज आपल्यासमोर हा प्रश्न आहे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १९०-१

# ४९. प्रार्थना प्रवचन, जून २४, १९४७

नवी दिल्ली,
जून २४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

या भजनात रामाच्या करुणास्पद अवस्थेचे वर्णन करण्यात आले आहे. कुठे रामाचा राज्याभिषेक होणार होता आणि कुठे त्याच्यावर एकाएकी वनवासात जाण्याची वेळ आली! याहून करुणास्पद अजून काय असू शकते? असेच काही तरी आता आपल्या डोळ्यासमोर घडते आहे. एकीकडे तर लंडनमध्ये हिंदुस्तानला उपनिवेशाच्या पातळीवरील स्वातंत्र्य देण्यात येत असल्याबद्दल आनंदाच्या जल्लोषाची चर्चा सुरू आहे तर दुसरीकडे धर्माच्या रक्षणाच्या नावावर आपल्यामध्ये सांप्रदायिक दंगली सुरू आहेत. माझ्यावर टीका करणारी मला दररोज किती तरी पत्रे येत असतात. काही म्हणतात की तुम्ही हिंदूंचे नुकसान करत आहात तर काही म्हणतात की तुम्ही मुसलमानांचे तुष्टिकरण करत आहा. त्यांचा माझ्यावर काहीही परिणाम होत नाही. मी ईश्वराशिवाय इतर कोणालाही खुष करण्याचा प्रयत्न करत नाही कारण आपण सर्व त्याची मुले आहो, त्याचे सेवक आहो. आणि अशा पत्रांनी मी माझ्या मनाला त्रास का करून घ्यावा? असा कोणता अपराध मी केला आहे? इतरांवर अत्याचार करून वा पापपूर्ण वर्तन करून कोणीही आपल्या धर्माचे रक्षण करू शकत नाही इतकेच मी म्हणत असतो. ही गोष्ट हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही सारखीच लागू होते. पाकिस्तान वाईट गोष्ट आहे हे मला मान्य आहे. यात आनंद मानण्यासारखी कोणती गोष्ट आहे? आपल्या देशाची फाळणी झाली आहे. यात समारंभ करण्यासारखे काय आहे? गत साठ वर्षांपासून, मी शाळेत शिकत होतो तेव्हापासून, हिंदू, मुसलमान, पारसी वा ख्रिश्चन सर्व हिंदुस्तानी आहेत असा माझा विश्वास होता. आता आपल्या मातृभूमीची वाटणी झाली आहे. पण याचा अर्थ असा आहे काय की आपल्या मनांचीही फाळणी झाली पाहिजे? एकाच देशात राहणारे लोक वेगवेगळे होऊन परके कसे होऊ शकतात? हिंदुस्तानात केवळ एकच प्रजा असेल आणि ती केवळ हिंदुस्तानी प्रजा असेल. मी जेव्हा असे म्हणतो तेव्हा आम्ही चुकीचा इतिहास का शिकावा? आम्ही दोन प्रजा नाही असेच आम्ही म्हणू. मी असे म्हणतो तेव्हा लोक मला शिव्या देतात. त्यांचे ऐकून मी खुनी झालो पाहिजे काय? असे करून मी केवळ माझेच नुकसान करीन. माणूस स्वतःच स्वतःचा मित्र आणि शत्रू होऊ शकतो. हिंदूंच हिंदूंना नष्ट करू शकतात, इतर कोणीही नाही.

परंतु आज चोहोकडे आग भडकत असताना दिसते आहे. या आगीपासून वाचाल तेव्हाच धर्म वाचेल. या आगीच्या जाळापासून आपण वाचू शकू तरच हिंदुस्तान वाचू शकेल. माझी शारीरिक

शक्ती क्षीण होऊ लगली आहे. हा भडका सहन करण्यासारखे माझे शरीर राहिलेले नाही. मी जे सांगितले ते सत्य आहे आणि ते सर्वांना लागू होते. सत्याचा जय आणि असत्याचा नाश हा जगाचा शाश्वत नियम आहे. मी हे जे सांगतो आहे ते दुबळ्या मनाच्या लोकांकरिता नाही तर त्यांच्याकरिता आहे जे शूर आणि निस्वार्थी आहेत, ज्यांना आपल्या आयाबहिणीचे, आपल्या धर्माचे रक्षण करत असताना कसे मरावे हे माहीत आहे. मारणाऱ्यापेक्षा आनंदात मरण पत्करणारा अधिक धाडसी आणि शूर असतो. संपूर्ण हिंदुस्तानने शौर्याची ती उंची गाठावी अशी माझी इच्छा आहे.

माझ्या अवतिभवती जे सुरू आहे ते पाहून माझ्या अंगावर शहारे उभे राहतात. मी कोणाला समजावून सांगू? आपण ब्रिटिशांकडे पाहत असतो. किती दिवस आपण असे करायला पाहिजे? १५ ऑगस्टनंतर ब्रिटिश गेलेले असतील. मग आपण कोणाकडे पाहणार आहो? पंजाबमध्ये लष्करी शासन सुरू करावे असे सुचवण्यात आले आहे. सैनिकी शासन म्हणजे काय हे मला माहीत आहे. मी माणसाची हृदये बदलू शकत नाही. मी अजूनही म्हणेन की मुसलमानांना इस्लाम वाचवायचा असेल, हिंदूंना हिंदुस्तान आणि शिखांना त्यांचे गुरुद्वारा तर त्यांनी आपसात भाडणार नाही असे ठरवले पाहिजे. फाळणीसंबंधी काही वाद असतील तर ते शक्तीच्या मदतीने नाही तर लवादाच्या सहाय्याने सोडवले पाहिजे.

सर सी. पी. म्हणतात की गांधी आणि कॉंग्रेस सरहद्द प्रांताला स्वातत्र्य देण्याकरिता तयार आहेत परंतु त्रावणकोरला नाही. सर सी. पी. सारखा विद्वान माणूस इतक्या बालीशपणाचे विधान कसे करू शकतो? त्रावणकोर जर स्वतंत्र झाला तर मग हैद्राबाद, काश्मीर, इंदोर आणि इतर संस्थानेही स्वतःला स्वतंत्र घोषित करतील आणि हिंदुस्तानचे तुकडेतुकडे होतील. बादशाह खानना हिंदुस्तानपासून वेगळे व्हायचे नाही. ते म्हणतात की आम्ही पाकिस्तानमध्ये सामील होणार नाही. मग त्यांनी हिंदूंचे गुलाम व्हायला पाहिजे काय? असे म्हणतात की कॉंग्रेस त्यांना लाच देत आहे. जनतेचा पाठिंबा मिळवण्याकरिता कॉंग्रेसने लाचलुचपतीचा मार्ग अवलंबिला असता तर ती टिकून राहिली नसती. बादशाह खान म्हणतात की आधी तुम्ही तुमची घटना तयार करा. त्या काळात ते आपला निर्णय घेतील. परंतु सर सी.पी. अगदी वेगळे काही तरी म्हणतात. वायव्य सरहद्द प्रांतात तो जनतेचा आवाज आहे. परंतु त्रावणकोरमध्ये महाराज आणि त्यांचे प्रधानमंत्री हिंदूंच्या वतीने बोलत आहेत. वायव्य सरहद्द प्रांताचे उदाहरण देऊन सर सी. पी. जनतेच्या डोळ्यात धूळ फेकू शकत नाहीत. त्रावणकोरने घटनासमितीत यावे असे मी सर सी. पी. यांना सुचवीन.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १९०-४

# ५०. प्रार्थना प्रवचन, जून २५, १९४७

नवी दिल्ली,

जून २५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

वायव्य सरहद्द प्रांत आणि पंजाबमधील ज्या निर्वासितांना मी हरिद्वार येथे भेटलो त्यांनी मला सांगितले की काबूलमध्ये राहणाऱ्या हिंदूंची सहजपणे ओळख पटावी म्हणून त्यांना विशिष्ट रंगाची पगडी घालावी लागत असते. यासंबंधी अफगाणीस्तानच्या राजदुताने (गुलाम महम्मद) या वृत्ताचे खंडन करणारे लांब वक्तव्य जारी केले आहे. ते म्हणतात की काबूलमध्ये असे काहीही नाही. ते म्हणतात की काबूलमध्ये हिंदूंची देवळे आहेत आणि त्यांना तिथे देऊळ बांधण्याचा अधिकार आहे. असे असेल तर आपल्याकरिता ती अभिमानाची गोष्ट आहे.

लाहोर, अमृतसर आणि गुडगाव येथे करण्यात आलेली जाळपोळ तिन्ही समुदायांकरिता - हिंदू, मुसलमान आणि शीख - लाजिरवाणी आहे. ज्या कोणत्या साधनाने शक्य असेल त्या साधनाने ही जाळपोळ थांबवली पाहिजे आणि तिन्ही समुदायांना एकत्र आणले पाहिजे. वृत्तपत्रांमध्ये मी पाहिले की काल लाहोर येथे नबाब ममदोत यांच्या घरी तिन्ही समुदायांच्या प्रतिनिधींची एक परिषद बोलावण्यात आली होती. ती मध्यरात्रीपर्यंत सुरू होती आणि दंगली थांबवण्यात याव्या असे तिच्यात ठरवण्यात आले. ही चांगली बातमी आहे. अखेरीस पाकिस्तानची उभारणी लाहोर आणि अमृतसरच्या राखेवर होणार आहे काय? आणि ही काही लहानसहान शहरे नाहीत. त्यांच्या उभारणीकरिता पिढ्या लागलेल्या आहेत. याशिवाय अमृतसरमध्ये शिखांचे सुवर्णमंदिर आहे. अशा प्रकारे माणूस आपली माणुसकी विसरू शकतो आणि हैवान बनतो ही शोकाची गोष्ट आहे. हे पुढारी परत उद्या भेटणार आहेत. (प्रांतातील दैनंदिन कायदा आणि सुरक्षा यांचा आढावा घेण्याकरिता ममदोत येथील इफ्तिकार हुसेन खान, भीमसेन सच्चर आणि स्वरण सिंग यांची सुरक्षासमिती तयार करण्यात आली होती.) तिला जर यश आले तर या शहरात लष्करी शासन सुरू करावे लागणार नाही. यामुळे या नेत्यांचे आपण आभार मानले पाहिजे.

मी स्वतःच आज धर्मसंकटात सापडलो आहे. कधी मला बिहारमध्ये जाण्याची तीव्र इच्छा होते तर कधी नोआखालीत. नोआखालीत माझ्या कामाची नुकताच सुरुवात झाली होती व त्याने हिंदूंना बरीच मदत झाली होती. मी बिहारमध्येही जायलाच पाहिजे. माझा इथे आठ दिवस राहण्याचा

विचार होता परंतु इथे येऊन मला आताच एक महिना झालेला आहे. मी कुठे जायला पाहिजे आणि काय केले पाहिजे? मी गोंधळलो आहे. ईश्वरभक्ताकरिता एक प्रकारे हे चांगलेच आहे. भक्ताने केवळ आजचा विचार केला पाहिजे, उद्याचा नाही कारण उद्या ईश्वराच्या हातात असतो. मी अहिंसेच्या मोठमोठ्या गोष्टी करतो म्हणून काही लोक मला टोमणा मारतात आणि विचारतात की मी अमृतसर वा गुडगावला का जात नाही. परंतु तिथे जाऊन मी काय मिळवणार आहे? मी जसा आहे तसा तुम्हाला दिसलो पाहिजे अशी माझी इच्छा आहे. मी गैरसमजाला कधीही बळी पडलो नाही. परंतु आज जगात आणि हिंदुस्तानात फार गोधळ आहे आणि त्यामुळे गोष्ट स्पष्टपणे पाहणे कठीण होते. माणसाने सध्याच्या कर्तव्याकडे लक्ष दिले पाहिजे असे गीता म्हणते. किती तरी ठिकाणी मोठ्या प्रमाणात दंगली सुरू आहेत आणि कुठे जावे यासंबंधीचा माझा निर्णय होऊ शकत नाही. ईश्वर इथे मला मार्ग दाखवत नाही. मी मित्रांना विचारतो. अंतःकरण जेव्हा शंकाकुशंकांनी भरलेले असते तेव्हा उत्तम गोष्ट वाट पाहणे आणि धीराने वागणे असते. दगड फेकल्याने अजूनच गोंधळ होऊ शकतो. नबाब ममदोत म्हणतात की पाकिस्तानमध्ये अल्पसंख्याकांना न्याय्य वागणूक देण्यात येईल. मी त्यांच्यावर अविश्वास का दाखवावा? हिंदू अफगाणीस्तानमध्ये जर नागरिक म्हणून राहू शकतात तर पाकिस्तानमध्ये का नाही?

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ १९४-६

# ५१. प्रार्थना प्रवचन, जून २६, १९४७

नवी दिल्ली,

जून २६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज मी व्हाईसराय बरोबर दीड तास होतो. मला त्यांच्याशी कोणतेही विशेष काम नव्हते. मी तिथे व्हाईसरायना काही देण्याकरिता वा घेण्याकरिता गेलो नव्हतो. त्यांची स्वतःची कामाची एक पद्धत आहे. मी हिंदुस्तानच्या स्वातंत्र्याकरिता संघर्ष करतो आहे आणि जनतेची सेवा करतो आहे असे त्यांना वाटल्यामुळे इतरांप्रमाणेच मलाही बोलवावे असे त्यांना वाटले. ते सर्वांचा सल्ला घेतात आणि मग त्यांना जे करायचे असते ते ते करतात. त्यांच्या मनात काय आहे ते एका ईश्वरालाच माहीत.

मला मिळणाऱ्या पत्रांमधील बरीचशी पत्रे तर शिव्यांनीच भरलेली असतात. शिव्यांचा माझ्यावर काहीही परिणाम होत नाही कारण मला त्या स्तुतीप्रमाणे वाटतात. परंतु मी शिव्यांकडे स्तुती म्हणून पाहतो म्हणून लोक मला शिव्या देत नसतात तर मी त्यांच्या दृष्टीने मी जसा असायला पाहिजे तसा नाही म्हणून लोक मला शिव्या देत असतात. आज मिळालेल्या एका पत्रातील मी दोन प्रश्न निवडले आहेत व त्यांचे उत्तर मी देणार आहे. पहिला प्रश्न आहे : ''तुम्हाला ब्रिटिश सैन्याची अतिशय सवय झाली आहे. ते सैन्य गेल्यानंतर तुम्ही काय कराल?'' मी जेव्हा दक्षिण आफ्रिकेत होतो तेव्हा मी या प्रश्नाचे उत्तर दिले आहे आणि इथे परतल्यानंतर अनेक वर्षांपूर्वीही मी याचे उत्तर दिले आहे. आताही माझे उत्तर तेच आहे. आम्हाला ब्रिटिश सैन्याचा काहीही उपयोग नाही. त्यामुळे आमची शक्ती वाढत नाही तर कमी होते. मी तर अहिंसेचा भक्त आहे. परंतु ज्यांचा अहिंसेवर विश्वास नाही त्यांनाही ही गोष्ट लागू होते. प्रत्येकजण जर सैनिक होत असेल आणि बंदूक चालवणे शिकत असेल तर ब्रिटिश सैन्याची गरज कुठे राहील? ब्रिटिश सैन्य गेल्यामुळे जर आपल्याला धक्का बसत असेल तर आपण स्वराज्याकरिता पात्र आहो असे कसे म्हणता येईल? माणसाच्या फुफ्फुसांना जर रोग झाला तर दुसऱ्याच्या फुफ्फुसाच्या मदतीने तो जिवंत राहू शकत नाही. स्वराज्य हे हिंदुस्तानच्या फुफ्फुसाप्रमाणे आहे. आपल्याला जर जिवंत राहायचे असेल तर आपण तसे इतरांच्या मदतीने करू शकत नाही. आज आपण अशा माणसाप्रमाणे आहो की ज्याने आपले आयुष्य अंधार कोठडीत घालवले आहे आणि आता एकदम त्याला बाहेर काढल्यामुळे सुर्यप्रकाशाने तो काही काळ आंधळा

झाला आहे. आपल्याला पाठिंबा देण्याकरिता वा मदत करण्याकरिता ब्रिटिशांच्या वा इतर कोणाच्या सैन्याची सैन्याची गरज नाही.

परंतु अमृतसर, लाहोर आणि इतर ठिकाणच्या दंगलींनी आपण आत्मविश्वास गमावला आहे. आपण इतके खालच्या स्तरावर गेलो आहो की आपण परस्परांना घाबरू लागलो आहो. सैन्य नसेल तर लोक परस्परांना खाऊन टाकतील ही कल्पना आपल्या मनात घर करू लागली आहे. परंतु सत्य हे आहे की जोपर्यंत तिसरा पक्ष आपल्याला दाबून टाकण्याकरिता हजर आहे तोपर्यंत आपण स्वतः मजबूत होण्याची अपेक्षा करू शकत नाही. स्वराज्य भित्र्या लोकांकरिता नसते.

दुसरा प्रश्न आहे : "तुम्ही किती मूर्ख आहा की अजूनही तुम्हाला तुमच्या अहिंसेचा वास येत नाही. तुमची अहिंसा ना तर हिंदूंना वाचवू शकते ना मुसलमानांना. तुम्ही जगावे म्हणून आम्ही त्रास सहन करतो ते तुमच्या अहिंसेकरिता नाही तर तुम्ही केलेल्या देशसेवेकरिता.

मला तर असे वाटते की माझ्या चोहोकडे जो रक्तपात होतो आहे आणि जी भीषण हिंसा होते आहे तिचा मला दुर्गंध येतो. त्या दुर्गंधाकडे पाहता मला माझ्या अहिंसेचा जो सुगंध येतो तो अधिकच गोड वाटतो. जो माणूस अमृतच अमृत पितो त्याला अमृतात ती गोडी वाटत नाही जी गोडी विषप्राशन केल्यानंतर दोन थेंब अमृताने येईल.

मला नेहमी माझ्या अहिंसेचा सुंगंध येत नव्हता कारण तेव्हा माझ्या चोहोकडील वातावरण अहिंसामय होते. परंतु आज मला जेव्हा हिंसेचा वास येतो तेव्हा तो वास घालवणारी शक्ती माझ्याजवळ केवळ अहिंसाच आहे. पत्रात असेही लिहिले आहे की मी वारंवार जिनांना भेटण्याकरिता का जातो. ते आमचे शत्रू आहेत आणि आपण त्यांच्यापासून दूर राहिलो पाहिजे. त्याचप्रमाणे बलुचीसुद्धा आपले शत्रू आहेत आणि कॉंग्रेसला त्यांच्याशी काहीही घेणेदेणे असू नये. कॉंग्रेस असे कसे करू शकते? सर्वांची सेवा करणे तिचे ध्येय आहे. हिंदूंना, विशेषतः सवर्ण हिंदूंना शत्रू लेखून बदनाम करून जिनांनी देशाचे अनहित केले हे मला मान्य आहे. जो माणूस दुष्कर्म करतो तो वाईट आहे असे तर वाटतच असते परंतु अखेरीस तो आपला भाऊ असतो. हिंदू त्यांच्यामागे वेडे थोडेच होऊ शकतात. जिनांना पाकिस्तान मिळाला म्हणून आपण त्यांच्याशी संबंध ठेवणे बंद करावे असा अर्थ होत नाही. आपण जर भेटत राहिलो तर अनेक असे प्रश्न आहेत की जे चर्चेने सुटू शकतात.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन -१, पृष्ठ १९६-८

# ५२. प्रार्थना प्रवचन, जून २७, १९४७

नवी दिल्ली,

जून २७, ९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज मला अतिशय दुःखद पत्र मिळाले आहे. दिल्लीहून एक मित्र लिहितात की पंजाबकडून फार मोठ्या प्रमाणात निर्वासित निघाले असून ते दिल्लीच्या मार्गावर आहेत. त्यांनी आपले घर सोडले कारण आपले जीवन आणि संपत्ती धोक्यात आहे असे त्यांना वाटते. परंतु ते पळून कुठे जाऊ शकतात? आपण जर ऐकले की उद्या दिल्लीत भूकंप होणार आहे तर आपण हे ठिकाण सोडून जाऊ काय? शूर लोक कधीही पळत नसतात. मृत्यू हा नेहमी माणसाची सोबत करत असतो. कोणीही अमर नाही. राहता राहिली संपत्तीची गोष्ट. ती तर आपण नेहमीच मिळवत असतो आणि गमावत असतो. या मित्राने असेही लिहिले आहे की हे निर्वासित दिल्लीला आल्यानंतर जेव्हा घर भाड्याने घेऊ पाहतात तेव्हा घरमालक त्यांना जास्त भाडे मागतात. दिल्लीत ज्यांच्याजवळ घर वा जमीन आहे त्यांनी या असहाय निर्वासितांचे आपल्या घरात स्वागत करावे. परंतु ते जरी असे करू शकत नसतील तरी त्यांनी जास्त भाडे मागू नये आणि हे निर्वासित जितके भाडे देऊ शकत असतील तितके घ्यावे. निर्वासितांना आश्रय देणे हे त्यांचे सर्वप्रथम कर्तव्य आहे. मला मान्य आहे की काही जमीनमालकांचे घरभाडे हे एकमेव उत्पन्नाचे साधन आहे. असे असले तरी त्यांनी वाजवी भाडे घ्यावे. अंतरिम सरकारने या समस्येचा विचार करावा आणि निर्वासितांच्या अडचणी कमी होतील असा शक्य तितका प्रयत्न करावा.

वृत्तपत्रांमधून आणि पत्रांमधून मला विचारल्या जाणाऱ्या सर्व प्रश्नांचे मी उत्तर देऊ शकत नाही. परंतु मी त्यातून काही निवडेन आणि त्यांचे उत्तर देईन.आज मी तीन प्रश्न निवडले आहेत. पहिला प्रश्न आहे की या जगात ईश्वराची जागा पैशाने घेतलेली असल्यामुळे हिंदुस्तानने काय करावे? माझे उत्तर आहे की अर्थशक्ती, शारीरिक शक्ती वा पाशवी शक्ती ही चूक आहे. भजनात सांगितल्याप्रमाणे सर्वात अधिक शक्तिमान ईश्वर आहे व त्याच्यासमोर इतर शक्तींचा कोणताही प्रभाव पडत नाही.

आज जडवादी दृष्टिकोनाला महत्त्व आले आहे आणि आध्यात्मिक शक्ती वा आत्मशक्ती अशी काही गोष्ट नाही असे आपल्याला वाटू लागले आहे आणि ती इंद्रियगम्य नाही. परंतु माझा

अध्यात्मवादावर विश्वास आहे आणि पाशवी शक्तीला मी मुळीच महत्त्व देत नाही. मी असेही म्हणेन की पाशवी शक्ती क्षणिक आहे तर आध्यात्मिक वा आत्मशक्ती चिरंतन आहे कारण ती स्वतःच सत्य आहे.

दुसरा प्रश्न आहे - “ब्रिटिश गेल्यानंतर घटनासमिती घटना तयार करेपर्यंतच उपनिवेशाची स्थिती कायम राहील. त्यानंतर तुम्ही ब्रिटिशांचे मित्र राहाल की शत्रू?”

उत्तर आहे की इंग्लंडशी आपण आपले संबंध तसेच सुरू राहतील अशी आपण आशा करू. वाईट माणसाचे अपकृत्य त्याच्या मृत्यूबरोबरच पुरले जातात, केवळ चांगले शिल्लक राहतात. आज हिंदुस्तान प्रसववेदनांमधून जात आहे. या वेदनांमध्ये इंग्रज जर उत्तीर्ण होतील म्हणजे व्हाईसराय आणि त्यांचे सल्लागार देशाकरिता जे करणे चांगले तेच करतील तर ते आपले शत्रू कसे राहतील? इतकेच नाही तर आपल्याला उपनिवेशाचा जो दर्जा मिळाला आहे त्याकरिता कारणसुद्धा मैत्रीच आहे. आता आपण राष्कुलात भागीदार आहो. आणि आपण जेव्हा राष्ट्रकुल सोडू तेव्हासुद्धा आपली त्यांच्याशी मैत्री कायम राहील.यातच त्यांचे आणि आपले हित आहे. अंतरिम सरकारचे उपाध्यक्ष जवाहरलाल नेहरू आधीच म्हणाले आहेत की स्वतंत्र हिंदुस्तानला कोणीही घाबरण्याचे कारण नाही. हिंदुस्तान सर्व देशांशी मैत्री करील.

तिसरा प्रश्न आहे - “भारतीय गणराज्याचा अध्यक्ष कोण होईल? तो कोणी इंग्रज असेल काय आणि जर इंग्रज नसेल तर तर मग जवाहरलाल नेहरूंनी अध्यक्ष का होऊ नये? ते उच्चशिक्षित आहेत, त्यांना इंग्रजी आणि फ्रेंच बोलता येते व अनेक देशांचा त्यांना अनुभव आहे.” माझे उत्तर हे आहे की माझे चालले तर एखदी सद्गुणी भंगी मुलगी भारताची पहिली राष्ट्रपती व्हावी. सतरा वर्षांची इंग्रज मुलगी जर इंग्लंडची राणी बनू शकते आणि नंतर हिंदुस्तानची महाराणी बनू शकते तर देशप्रेमाने भरलेली निष्कलंक भंगी मुलगी भारतीय गणराज्याची पहिली राष्टपती का बनू नये? (हे वाक्य द हिंदू, जून २८, १९४७मधून घेतले आहे.) राष्ट्राध्यक्ष अनेक भाषा जाणणारा आणि उच्चशिक्षित असण्याची आवश्यकता नाही. उच्चशिक्षित ब्राह्मण वा कायस्थ राष्ट्राध्यक्षपदी निवडून आपल्याला आपल्या अहंकराचे जगासमोर प्रदर्शन करायचे नाही.

या पदाकरिता एका हरिजन मुलीची निवड करून आपण आपल्या आत्मशक्तीचे दर्शन घडवू. भारतात कोणीही उच्च वा कनिष्ठ नाही हे आपण जगाला दाखवून देऊ. ती मुलगी शरीर आणि मनाने स्वच्छ मात्र असली पाहजे. ती सीतेसारखी शुद्ध असली पाहिजे आणि तिचे डोळे तेजस्वी असले पाहिजे. सीतेत असे तेज होते की रावण तिला स्पर्ष करू शकला नाही.

मला जर अशी मुलगी आढळली तर ती पहिली अध्यक्ष असेल. आपण सर्वांनी तिला अभिवादन केले पाहिजे आणि जगासमोर आदर्श ठेवला पाहिजे. अखेरीस तिला भारत सरकारचे संचालन करायचे नसते. तिचे मंत्रिमंडळ असेल आणि ती मंत्रिमंडळाच्या सल्ल्याप्रमाणे वागेल. तिला केवळ कागदपत्रांवर सही करायची असते. सर्व भारतीयांनी, मग ते सवर्ण हिंदू असो की मुसलमान असो की इतर कोणत्या धर्माचे असो, एका आवाजाने घोषित केले पाहिजे की जो कोणी अध्यक्ष असेल त्याला आम्ही अभिवादन करू. ही खरी नैतिक शक्ती आहे. इतर सर्व खोटेपणा आहे. माझ्या स्वप्नातील अशी मुलगी अध्यक्ष झाली तर मी तिचा सेवक होईन आणि मी सरकारकडून खाण्याकरितासुद्धा एक पैसाही मागणार नाही. मी जवाहरलाल, सरदार पटेल आणि राजेंद्र बाबू यांना तिचे मंत्री करीन आणि यामुळे ते तिचे नोकर होतील.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन -१. पृष्ठ १९९-२०२

# ५३. प्रार्थना प्रवचन, जून २८, १९४७

नवी दिल्ली,

जून २८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज मी तुम्हाला जे काही सांगणार आहे ते फार विशेष आहे. मला आशा आहे की तुम्ही ते लक्षपूर्वक ऐकाल आणि समजून घेण्याचा प्रयत्न कराल. जेव्हा एखादा माणूस चांगले काम करतो तेव्हा तो त्या चांगल्या कामात सर्व जगाला सहभागी करून घेतो. परंतु जेव्हा कोणी वाईट काम करतो तेव्हा तो जरी त्या कृत्यात सर्व जगाला सहभागी करू शकत नसला तरी जगाची हानी मात्र करू शकतोच. घटनासमिती नागरिकांच्या अधिकारांची चर्चा करत आहे. म्हणजे मूलभूत अधिकार कोणकोणते असावेत यासंबंधी ते विचारविनिमय करत आहेत. वस्तुस्थिती तर ही आहे की खरा प्रश्न नागरिकांचे अधिकार कोणते हा प्रश्न नसून नागरिकाचे कर्तव्य कोणते हा आहे.  मूलभूत अधिकार केवळ तेच असू शकतात ज्यांच्या उपयोगामुळे त्या नागरिकाचाच नाही तर सर्व जगाचा लाभ होईल. आज प्रत्येकाला आपले अधिकार कोणते हे जाणून घेण्याची इच्छा असते परंतु जो माणूस लहानपणापासून आपले कर्तव्य पार पाडणे शिकतो व आपल्या धर्माच्या पवित्र ग्रंथांचा अभ्यास करतो त्याला आपोआपच अधिकारांचा उपयोग करता येत असतो. मी माझी कर्तव्ये आईच्या मांडीवर शिकलो. ती अशिक्षित ग्रामीण स्त्री होती. तिला आपल्या नावाची सहीसुद्धा करता येत नव्हती. शिक्षक लावून लिहायला वाचायला शिकणे याचा त्या काळात कोणी विचारसुद्धा करत नव्हता. मी तुम्हाला ही सत्तर वर्षांपूर्वीची गोष्ट सांगत आहे. माझे वडील दिवाण होते परंतु त्या काळात दिवाणला चांगले शिक्षण असणे आवश्यक नव्हते. ते स्वतः आपला अंगरखा आणि खेड्यातील पद्धतीचे जोडे घालायचे. त्यांना पैजामा काय आहे हेसुद्धा माहीत नव्हते. माझ्या आईने मला रामनामाचा जप शिकवला. तिला माझा धर्म माहीत होता. तर लहानपणापासून आपण आपला धर्म शिकलो व त्याचे अनुसरण करू लागलो तर आपले अधिकार स्वतःची काळजी घेतात. माझी आई मला जे दूध पाजत होती त्यानेच मला जगण्याचा अधिकार मिळाला. मी जर दूध पिण्याच्या धर्माचे पालन केले नसते तर मी मरून जाईन आणि मग माझ्या जगण्याचा अधिकारही राहणार नाही. सारांश कर्तव्यपालनातूनच अधिकारांचा जन्म होतो. आपण जर आपल्या धर्माचे पालन केले तर अधिकार त्यामागे पळत येतात. कर्तव्य आणि अधिकार हे वेगवेगळे होऊ शकत नाहीत. माझा धर्म काय आहे याचा मी विचार करत होतो आणि त्यातूनच सत्याग्रहाचा जन्म झाला होता.

परंतु आज तर आपल्याला विचित्र गोष्ट दिसते आहे. जो राजा असतो तो असे समजत असतो की ईश्वराने त्याला जनतेवर राज्य करण्याकरिताच जन्माला घातले आहे, म्हणजे त्याला कोणालाही फासावर चढवण्याचा अधिकार आहे, तुरुंगात टाकण्याचा अधिकार आहे आणि इतर काहींना दंड करण्याचा अधिकार आहे. लोकांनी आपली सर्व कर्तव्ये पार पाडावी असे त्याला वाटते. तो म्हणतो की त्याला राज्य करण्याचा अधिकार ईश्वराने दिला आहे. उद्योगिक कामगार आणि उद्योगपती आपापल्या अधिकारांची मागणी करत असतात. जमीनदीर आपल्या अधिकाराचा दावा करतो, तर शेतकरी आपल्या. परंतु एकाने आपले अधिकार उपभोगावे आणि दुसऱ्याने केवळ आपली कर्तव्ये पार पाडावी असे इथे दोन वर्ग नाहीत. राज्यकर्ते जर आपले कर्तव्य पार पाडणार नसतील परंतु लोक आपले कर्तव्य पार पाडत असतील तर लोकच राज्यकर्ते होऊन जातात. परंतु सत्ताधारी आपले कर्तव्य पार असतील व स्वतःला जनतेचे विश्वस्त समजत असतील तर ते टिकतील. परंतु ते जर हुकुमशहा बनतील तर या काळात ते टिकणार नाहीत. आतापर्यंत आपण काळोखात बुडालेलो होतो. राज्यकर्ते आपले कर्तव्य विसरले होते आणि त्यांची जनताही. आमचा सूर्यचंद्रापासून जन्म झाला केवळ इतकेच राजे लोक सारखे सांगत होते. परंतु खरे पाहता राजा हा जनतेचा पहिला सेवक असतो. आपल्या मालकाला सर्व काही समर्पित करणे आणि नंतर जे शिल्लक राहील त्यावर समाधान मानणे हे सेवकाचे कर्तव्य असते. लोकांनीसुद्धा आपले कर्तव्य पार पाडणे शिकले पाहिजे. ते करोडो आहेत. त्यांनी ठरवले तर ते आपल्या राजाला ठार करू शकतात. परंतु असे करून ते स्वतःचीच हानी करून घेतील. आपण आपले रस्ते स्वच्छ ठेवले, त्यावरील प्रकाशव्यवस्था नीट ठेवली वा अशाच प्रकारच्या काही गोष्टी कर्तव्ये म्हणून केल्या पाहिजे. आपल्यापैकी प्रत्येकाने भंगी व्हायला पाहिजे. जो माणूस आधी भंगी होणार नाही तो जगू शकत नाही, आणि त्याला जगण्याचा अधिकारही नसतो. आणि आपण जरी मान्य केले नाही तरी आपण सर्व कोणत्या ना कोणत्या अर्थाने भंगी आहो. लोक कर भरतात ते सत्ताधाऱ्यांची तिजोरी भरण्याकरिता नाही तर कराशिवाय प्रशासन चालू शकत नाही म्हणून ते कर भरतात. हीच गोष्ट गिरणी कामगार आणि गिरणीमालकांनाही लागू होते. इथे हाताच्या अंतरावरच आजूबाजूला हरिजन मजुरांची एक वस्ती आहे. ते ज्या घाणीत राहतात ते पाहून माझे अंतःकरण रडू लागते. आम्ही किती नालायक आहो? मी इतक्या सुंदर वातावरणात राहतो आणि ते बिचारे अशा घाणीत. अशाच प्रकारे मालकांनी आधी मजुरांना खाण्याकरिता देऊन मग स्वतः खाल्ले पाहिजे. परंतु गिरणी मालक जर आपले कर्तव्य पार पाडत नसतील तर मजुरांनी त्यांना मारून टाकावे असा त्याचा अर्थ होतो काय? ते निश्चितच असे करू शकतात. परंतु मग संपूर्ण डोलाराच कोसळेल. गिरणीमालकांना घाबरवून त्यांना काहीही मिळणार नाही. मग ते स्वतः मालकांप्रमाणे वागू लागतील. त्यांना जर आपली परिस्थिती सुधरावयाची असेल तर आपले कर्तव्य पार पाडूनच आपल्याला

आपले अधिकार मिळतील हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. आज करोडो कामगार आहेत. ते जर आपले कर्तव्य विसरले तर अराजक आणि गोंधळ निर्माण होईल.

प्रत्येक माणूस कर्जदार म्हणून जन्माला आला आहे. धर्मग्रंथसुद्धा सांगतात की आपला जन्म कर्ज फेडण्याकरिता झाला आहे आणि आपल्या जन्मापासून आपण इतरांच्या अधिकारांवर अवलंबून आहो. माणूस तेव्हाच माणूस होतो जेव्हा त्याला आपण इतरांवर अवलंबून असल्याची जाणीव होते.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २०२-५

# ५४. प्रार्थना प्रवचन, जून २९, १९४७

नवी दिल्ली,

जून २९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काल मी कर्तव्याबद्दल बोललो होतो. परंतु मला जे बोलायचे होते ते सर्व मी काल बोलू शकलो नव्हतो. माणूस कुठेही जरी गेला तरी त्याच्याबरोबर काही कर्तव्ये येत असतात. जो माणूस आपले कर्तव्य विसरतो आणि केवळ आपले हक्क जपण्याचा प्रयत्न करतो त्याला हे माहीतच नसते की जे हक्क कर्तव्य केल्याशिवाय येतात ते कधीही जपता येऊ शकत नाहीत. ही गोष्ट हिंदू-मुसलमान संबंधांनाही लागू होते. एखाद्या ठिकाणी हिंदू राहत असो की मुसलमान राहत असो वा दोघेही राहत असो ते तिथे जर आपले कर्तव्य पार पाडतील तरच त्यांना अधिकार मिळतील. मग त्यांना अधिकारांची मागणी करावी लागणार नाही. मूल आईचे दूध पिते कारण तसे करणे त्याचे कर्तव्य असते. आणि हीच गोष्ट त्याला जगण्याचा अधिकार देते. हा सर्वश्रेष्ठ नियम आहे आणि कोणीही त्यात बदल करू शकत नाही. हिंदू जर मुसलमानांना आपले भाऊ समजतील आणि त्यांना चांगली वागणूक देतील तर मुसलमानसुद्धा मैत्रीची परतफेड मैत्रीने करतील. उदाहरणार्थ एक खेडे घ्या. त्याच्यात जर पाचशे हिंदू आणि पाच मुसलमान राहत असतील तर पाचशे हिंदूंवर पाच मुसलमानांबद्दलची काही जबाबदारी येते आणि त्याचबरोबर ती जबाबदारी हिंदूंना काही अधिकारही देते. आपण मुसलमानांची हत्या करू शकतो असे अहंकारापोटी हिंदूंनी समजू नये कारण कोणालाही हत्या करण्याचा अधिकार नसतो. हत्या करण्यात कोणतेही शौर्य नाही. ती भ्याडपणाची आणि लाजिरवाणी गोष्ट आहे. मुसलमान जरी दाढी वाढवत असले आणि नमाझच्या वेळी पश्चिमेकडे तोंड करत असले तरी आपल्या सुखदुःखात त्यांना सहभागी करून घेणे आपले कर्तव्य आहे. त्यांना पुरेसे खाण्यापिण्याकरिता आहे की नाही आणि त्यांच्या इतर गरजा पूर्ण होतात की नाही हे त्यांनी पाहिले पाहिजे. पाचशे हिंदू जेव्हा आपले कर्तव्य पार पाडतील तेव्हा पाच मुसलमानांनीसुद्धा आपले कर्तव्य पार पाडावे असे अपेक्षिण्याचा त्यांना अधिकार मिळतो. गावाला जर आग लागली असेल आणि मुसलमान जर विचार करतील की आग लागली तर लागू द्या, इतकेच नाही तर ती पसरावी म्हणूनही ते जर सर्व काही करतील तर ते आपले कर्तव्य पार पाडताहेत असे म्हणता येणार नाही. आग लागण्यासारख्या घटना गावात नेहमीच होत असतात. कोणी जर बिडी पेटवली आणि जळती आगपेटीची काडी फेकून दिली व ती थोड्याशा वाळलेल्या गवताच्या वा कापसाच्या ढिगाच्या

संपर्कात आली तर आग लागते. आणि गावात बहुतेक घरांना गवताचे छप्पर असल्यामुळे थोड्याशा वाऱ्यानेसुद्धा संपूर्ण गाव आगीच्या लोळात सापडू शकते. परंतु अशा प्रसंगी पाच मुसलमानसुद्धा ती आग विझवण्याचा प्रयत्न करतील आणि बादल्या भरभरून पाणी आणण्याच्या कामाला लागतील. अशा प्रकारे कर्तव्य पार पाडत असताना त्यांना अधिकारही मिळतात. आज आपण आपले कर्तव्य करत नाही. काम सुरू आहे कारण ईश्वराने जग अशा काही प्रकारे निर्मिले आहे की त्याच्या प्रगतीत खीळ पडू नये. परंतु कल्पना करा की पाच मुसलमानांनी खोडसाळपणा करायचे ठरवले आहे. कल्पना करा की तुम्ही त्यांना खाण्यापिण्याकरिता देत आहा व त्यांना चांगली वर्तणूक देत आहा आणि तरीही ते तुम्हाला शिव्या देत आहेत. अशा वेळी पाचशे हिंदूंचे कर्तव्य काय असेल? त्यांना कापून टाकणे हे हिंदूंचे निश्चितच कर्तव्य नसेल. असे करणे पशुत्वाचे होईल, माणूस असे करू शकत नाही. माझ्या भावाला जर वेड लागले तर मी त्याला मारहाण करावी काय? मी असे करणार नाही. मी त्याला बंद खोलीत ठेवीन आणि त्याच्याशी कोणालाही धसमुसळेपणाने वागू देणार नाही. हा मानवी मार्ग आहे. याचप्रमाणे त्या मुसलमानांना मित्रत्वाच्या नात्याने वागण्याची इच्छा नसेल आणि आम्ही वेगळे राष्ट्र आहो आणि आम्ही जरी पाच असलो तरी बाहेरून पाच कोटी बोलावू शकतो असे ते म्हणत असतील तरी हिंदूंनी त्यांच्या अशा धमक्यांना घाबरू नये. आम्ही या पाच मुसलमानांशी मैत्री करू इच्छितो परंतु हे प्रतिसाद देत नाहीत व तरीही यांना मदत करण्याची जर तुमची इच्छा असेल तर तो तुमचा प्रश्न आहे परंतु जुलुमजबरदस्तीमुळे हिंदू घाबरणार नाहीत वा दबणार नाहीत असे बाहेरच्या पाच कोटी मुसलमानांना हिंदूंनी सागितले पाहिजे. जगाला कळेल की हे ५०० हिंदू चागंले लोक आहेत व आपले कर्तव्य पार पाडण्याची त्यांची इच्छा आहे. हीच गोष्ट जिथे ५०० मुसलमान आणि केवळ ५ हिंदू असतील त्या गावाला सुद्धा लागू होईल. झेलम भागातील काही लोक मला भेटण्याकरिता आले होते. आमचे तिथे काय होईल असे त्यांनी विचारले. मी त्यांना सांगितले की तेथील मुसलमान जर लोक असतील, आपले कर्तव्य पार पाडत असताना ते आत्मसंयम बाळगू शकत असतील तर तुम्हाला घाबरण्याचे काहीही कारण नाही. परंतु थोडेसेही हिंदू वाईट असतील तर मग संपूर्ण हिंदुस्तानमधील हिंदू जरी तुम्हाला वाचवायला आले तरीही काही फायदा होणार नाही.

काही संस्थानिक चिडलेले आहेत. त्यांचे म्हणणे आहे की जोपर्यंत आकाशात सूर्यचंद्र आहेत तोपर्यंत आम्ही सिंहासनावर राहू. त्यांचे म्हणणे आहे की जनतेने आम्हाला सत्ता दिलेली नसून ब्रिटिशांनी वा सूर्यचंद्राने आम्हाला सत्ता दिलेली आहे. यावरून ते आपले कर्तव्य करत आहेत असे दिसत नाही. यातून केवळ अहंकार आणि उद्धटपणा दिसून पडतो. जोपर्यंत त्यांना ब्रिटिशांचे संरक्षण होते तोपर्यंत इंग्लंड आणि हे अमेरिकेत संस्थानिक करोडोंनी रुपये उधळत होते. तऱ्हेतऱ्हेचे खेळ खेळत होते. आता हे सुरू राहू शकत नाही. आता जनतेच्या मूक संमतीने व त्यांचे सेवक म्हणूनच

सत्तेवर राहू शकतात. अर्थातच सेवकांनासुद्धा खाण्याकरिता पाहिजे असते. आतापर्यंत ते लोकांना लुटत होते. त्यांना राजवाड्यात राहू दिले जाईल कारण ते म्हणू शकतात की आम्हाला राजवाड्यात राहण्याची सवय आहे आणि झोपडीत आम्ही कधीही राहिलो नाही. त्यांना असे करू दिल्याने लोक काय गमावणार आहेत? परंतु राजे जर जनतेचा अधिकार मान्य करणार नसतील, जर ते म्हणतील की तोफांच्या भडिमाराने आम्ही तुमची राखरांगोळी करून टाकू तर ते आपले कर्तव्य पार पाडत नाहीत. मग जनतेने काय करावे? अशा प्रसंगी शासकाशी असहकार करणे हे जनतेचे कर्तव्य होते व त्याला पदच्यूत करणे हे जनतेचे कर्तव्य होते. याचा अर्थ असा होत नाही त्यांनी राजवाड्यांना आग लावावी व प्रत्येक गोष्टीचा विध्वंस करावा. तो वाईटपणा होईल. जर संस्थानिक चुकीच्या मार्गावर असेल तर त्याला फरफटत खाली ओढणे हे जनतेचे कर्तव्य नसते. लोकांनी त्याच्याशी सौजन्याने, सत्याने आणि शांततेने संघर्ष केला पाहिजे. लोकांनी केवळ अधिकारामागे पळू नये. जो अधिकारांमागे पळतो त्याला अधिकार मिळत नसतात. त्याची अवस्था त्या कुत्र्याप्रणाणे होते असते जो पाण्यातील आपले प्रतिबिंब पाहून त्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करत असतो. त्याचा अधिकार भ्रामक असतो.तुम्ही जेव्हा कर्तव्य पार पाडाल तेव्हा अधिकार तुमच्या मांडीवर येऊन पडतील.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन, पृष्ठ २०५-८

# ५५. प्रार्थना प्रवचन, जून ३०, १९४७

नवी दिल्ली,

जून ३०, १९४७

कायदेशीर दृष्टिने सरहद्द प्रांत कॉंग्रेसचा प्रांत होता आणि अजूनही आहे यामुळे लोकांची नजर आज सरहद्द प्रांतात होणाऱ्या सार्वमताकडे लागली आहे. बादशाह खान आणि त्यांच्या सहकाऱ्यांना हिंदुस्तान वा पाकिस्तानमधून एकाची निवड करण्याकरिता सांगण्यात आले आहे. हिंदुस्तान हा हिंदूंचा आणि पाकिस्तान हा मुसलमानांचा असा हिंदुस्तान या शब्दाचा चुकीचा अर्थ लावण्यात आला आहे. या अडचणीतून कसे बाहेर पडावे ही बादशाह खानसमोर समस्या आहे. खानसाहेबांशी सल्लामसलत केल्यानंतर व्हाईसराय यांच्या देखरेखीखाली सरहद्द प्रांतात सार्वमत व्हावे असा कॉंग्रेसने शब्द दिला होता. अशा प्रकारे ठरलेल्या तारखेला सार्वमत होणार आहे.

खुदाई खिदमदगार सार्वमतात भाग घेणार नाहीत. परिणामी मुस्लिम लीगचा स्पष्टपणे विजय होईल आणि खुदाई खिदमदगारांना आतला आवाज आहे असे मान्य केले तर त्यांनासुद्धा आपल्या आतल्या आवाजाविरुद्ध वागावे लागणार नाही. ही गोष्ट सार्वमताच्या अटीच्या विरुद्ध कशी असू शकते? जे खुदाई खिदमदगार इतक्या दीर्घ काळापासून ब्रिटिशांशी शौर्याने संघर्ष करत होते ते पराभवाला घाबरणारे नाहीत. आपला पराभव होणार आहे हे माहीत पूर्णपणे असूनही अनेक राजकीय पक्ष निवडणुकांमध्ये भाग घेत असतात, आणि जेव्हा पक्ष निवडणुकीत भाग घेत नसतो तेव्हा त्याचा पराभव निश्चित असतो.

पख्तुनिस्तानची नवीन मागणी केल्याबद्दल बादशाह खानवर टीका करण्यात येत असते. जोपर्यंत मला आठवते कॉंग्रेसचे मंत्रिमंडळ तयार होण्यापूर्वीच आपल्या घरात पठाणांना स्वातंत्र्य असले पाहिजे या विचाराने बादशाह खान भारले गेलेले होते. त्यांना जर त्यांची घटना तयार करण्याचा अधिकार मिळाला तर दोनपैकी कोणत्याही एका देशात ते सामील होऊ शकतात. पख्तुनिस्तानच्या या मागणीत आक्षेप घेण्यासारखे काही आहे असे मला वाटत नाही. काहीही करून पठाणांना धडा शिकवायचाच व त्यांना जेरीस आणायचे हाच हेतू असेल तर मात्र गोष्ट वेगळी. बादशाह खान अफगाणीस्तानच्या हातातील बाहुले बनले आहेत असा त्यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आला आहे. बादशाह खान कोणाच्याही विरोधात लबाडीने वागू शकत नाहीत याची मला खात्री आहे. सरहद्द प्रांत अफगाणीस्तानमध्ये सामील व्हावा हे ते कधीही मान्य करणार नाहीत.

त्यांचा मित्र असल्यामुळे त्यांच्यातील एक दोष मला माहीत आहे. ते संशयी स्वभावाचे आहेत व ब्रिटिशांच्या हेतूबद्दल त्यांच्या मनात नेहमीच संशय राहिला आहे. मी म्हणेन की त्यांनी या दुबळेपणावर मात केली पाहिजे. पण हा काही केवळ त्यांचाच दोष नाही. त्यांच्यासारख्या नेत्याला हे शोभत नाही. ही गोष्ट मी त्यांच्यातील दोष म्हणून दाखवली आहे आणि ती तशी आहेही. परंतु हीच गोष्ट त्यांचा गुणही मानता येईल कारण त्यांची इच्छा असली तरी ते आपली मते लपवून ठेवू शकत नाहीत.

सरहद्द प्रांतावरून मी तुम्हाला आता रामेश्वरमला नेऊ इच्छितो. असे म्हणतात की लंकेत जाण्याकरिता रामाने तिथे पूल बनवला होता. रामाने लंकेवर विजय मिळवल्यानंतर ती आपल्याजवळ ठेवली नाही तर रावणाचा भाऊ विभिषणला दिली होती. रामेश्वरमचे मंदिर आता हरिजनांकरिता उघडले आहे. अशा प्रकारे कोचीनचे मंदिर सोडले तर दक्षिणेकडील सर्व मंदिरे आता हरिजनांकरिता उघडली गेली आहेत. राजाजींनी मला दिलेली महत्त्वाच्या मंदिरांची यादी अशी आहे - मदुराई, तिन्नावेली, चिदंबरम, श्रीनगरम, पलनी, तिरुलिरेन, कांची आणि गुरुवायूर. ही यादी पूर्ण नाही. मद्रास विधानसभेचे हरिजन अध्यक्ष (पी. शिवशण्मुखम पिल्लै, पाहा जवाहरलाल नेहरू यांना पत्र, जून ३०, १९४७) हे इतर हरिजन आणि हरिजनेतर भक्तगणाबरोबर या मंदिरांमध्ये जात आहेत. ही सुधारणा कोणताही रक्तपात केल्याशिवाय घडवून आणलेली असल्यामुळे शक्य आहे की शिक्षित हरिजनांना आणि इतरांना या सुधारणेचे फारसे महत्त्व वाटत नसेल. आपण आशा करू या की त्रावणकोर, तामिलनाडू आणि ब्रिटिश कोचिनप्रमाणेच कोचिनचेही मंदिर हरिजनांकरिता उघडले जाईल.

जोपर्यंत मंदिरात आंतरिक सुधारणा होऊन ते खऱ्या अर्थाने पवित्र होत नाहीत तोपर्यंत मंदिरप्रवेश सुधारणा अपूर्णच राहील.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २०९-१०

# ५६. प्रार्थना प्रवचन, जुलै १, १९४७

नवी दिल्ली,

जुलै १, १९४७

बंधूंनौ आणि भगिनींनो,

आता म्हटलेले भजन (किस्मतसे राम मिला है जिसको, उसने यह तीन जगह पाई) तुम्हाला समजले असेल. मध्यप्रांतातील तुकडोजी महाराज यांनी ते लिहिले आहे. त्याची भाषा हिंदुस्तानी आहे, अशी हिंदुस्तानी नाही की जिच्यात अरबी आणि फारसी शब्द भरलेले आहेत तर ती दिल्लीची हिंदुस्तानी आहे. तिच्यात सौंदर्य आणि गोडवा आहे. या भजनात म्हटले आहे की राम त्यालाच भेटतो ज्याने आपले घर आणि संपत्ती गमावली असेल, मित्र आणि साथीदार गमावले असतील वा शारीरिक रोगाने जो ग्रस्त असेल. अशा प्रकारच्या दुर्दैवानंतरही जी व्यक्ती रामाला सोडत नाही तेव्हाच तिला राम भेटतो.

हिंदुस्तानची फाळणी कसे तरी करून निरस्त करता येईल असे मी प्रार्थना प्रवचनमध्ये म्हणत असतो अशी तक्रार एका मित्राने केली आहे. परंतु मी असे कधीही म्हटलेले नाही. जेव्हा कॉंग्रेस आणि लीग यांच्यात कशाबद्दल जर तडजोड झालेली असेल आणि देशाची फाळणी झालेली असेल तर त्याला विरोध करून काय लाभ होणार आहे? काही झाले तरी हृदयांची फाळणी झालेली नाही. कॉंग्रेसने पाकिस्तान मान्य केला आहे आणि आपण आता हे प्रकरण इथेच थांबवायला पाहिजे.

एका शीख युवकाने मला विचारले की तुम्ही शिखांवर प्रेम करता असा तुमचा दावा आहे. तर हे सिद्ध करण्याकरिता तुम्ही काय करता. हिंदू आणि मुसलमान या दोघांनीही काही तरी मिळवले आहे. परंतु शिखांनी काय मिळवले? मी इतकेच म्हणू शकतो की जर पंजाबची फाळणी झाली असेल तर त्याकरिता मी काहीही करू शकत नाही. माझ्या हातात सत्ता नाही. माझ्याकरिता शीख धर्म आणि हिंदू धर्म यांत अंतर नाही. मी ग्रंथ साहेब वाचला आहे. त्यात जे आहे ते वैदिक धर्मातसुद्धा आहे. परंतु आज हे वेगवेगळे समुदाय गणले जातात. हा लहानसा समाज आहे परंतु आपल्या शौर्याकरिता प्रसिद्ध आहे. कॅनडामध्ये राहत असलेले दोन मित्र मला भेटण्याकरिता आले होते. ते म्हणाले की कॅनडामध्ये मोठ्या संख्येत शीख आहेत आणि ते तिथे चांगले काम करत आहेत. आफ्रिकेतसुद्धा शीख आहेत. आपण कुठेही गेलो तरी आपल्याला शीख दिसतील. ते शेतकरी, अभियंता, रेल्वे यंत्रज्ञ, मोटरगाडीचे वाहक आहेत. आज शीख सुखवस्तू लोक आहेत.

आज मला मथुरेतील मुस्लिम लीगकडून तार मिळाली आहे. ते म्हणतात की तेथील हिंदू त्यांच्याशी गैरवर्तणूक करतात. हे कितपत खरे आहे हे मला माहीत नाही. परंतु हे जर खरे असेल तर हे चांगले नाही. आपण बहुसंख्येचे क्रौर्य दाखवू नये. बहुसंख्येमुळे येणारा अहंकार आपला नाश करील.

आज व्हाईसरायशी झालेल्या मुलाखतीत काय झाले हे जाणून घेण्याकरिता तुम्ही उत्सुक असाल. मी तर जवाहरलाल आणि  सरदार यांच्याबरोबर तिथे गेलो होतो. वर्तमानपत्रवाल्यांना मी म्हणेन की जोपर्यंत व्हाईसराय भवनातून अधिकृत वक्तव्य निघत नाही तोपर्यंत तुम्ही तर्कवितर्क करू नका. देशाची हानी होईल असे काहीही त्यांनी करू नये.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २११-३

# ५७. प्रार्थना प्रवचन, जुलै २, १९४७

नवी दिल्ली,

जुलै २, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एक मित्र लिहितो : ‘‘जगात अशा काही गोष्टी आहेत की ज्या लोकांना आवडतात आणि अशाही काही गोष्टी आहेत की ज्या लोकांना आवडत नाहीत. लोकांना आवडत नाही त्या गोष्टी करणे ही मूर्खपणाची सीमा असते. तुम्ही लोकांना काही मार्गदर्शन करत होता. आताही तुम्ही तसे करा व लोक जो मार्ग निवडतात त्याला पाठिंबा द्या.’’

परंतु मला हे आवडत नाही. जी गोष्ट आधीच लोकप्रिय आहे तिला पाठिंबा देण्याची गरज काय? माणसाने ती गोष्ट केली पाहिजे जी आधीच फारशी लोकप्रिय नाही. माणूस एकटा असला तरी त्यामुळे तो काहीही गमावत नाही. आपल्याला जे आवडते ते करण्याचा आपल्याला अधिकार असतो. एखाद्या माणसाला वाळूच्या कणांपासून दोर बनवायचा असेल तर त्यात त्याला यश येणार नाही. (जुलै ३, १९४७च्या हिंदुस्तान टाईम्सप्रमाणे गांधीजी म्हणाले की, आता पाकिस्तान झाल्यानंतर नागरी आणि उर्दू लिपीसह हिंदुस्तानीला लोकप्रिय करण्याचा माझा प्रयत्न वाळूच्या कणापासून दोर बनवण्यासारखा आहे असे मला सांगण्यात येत असते.) कारण दोर तंतूंपासून बनवले जातात. माणसाने तेच करावे जे करणे योग्य असते.

लोक म्हणतात की मी जेव्हा हिंदी साहित्य संमेलनात होतो तेव्हा मी त्या भाषेची वारेमाप स्तुती करत होतो. दक्षिणेत जिथे लोक तामिळ बोलतात तिथे मी हिंदीचा प्रचार करण्याचा प्रयत्न करत होतो. ते सर्व ठीक होते. पण आता हिंदुस्तानी का? माझे उत्तर आहे की हिंदुस्तानीचा जन्म हिंदीपासूनच झाला आहे. इंदोर येथील हिंदी साहित्य संमेलनात मी हजर होतो. (एप्रिल २०-२२, १९३५ला भरलेल्या हिंदी साहित्य संमेलनाचे गांधीजी अध्यक्ष होते. पाहा हिंदी साहित्य संमेलनात भाषण, एप्रिल २३, १९४७) जमनालालजींच्या प्रेमामुळे मी मारवाडी संमेलनालासुद्धा गेलो होतो. तिथे जाण्याची माझी अगदीच इच्छा नव्हती. ते प्रेमच होते की ज्याने मला तिथे ओढून नेले होते. मी स्पष्ट केले होते की माझी हिंदी विशेष प्रकारची आहे. हिंदू, मुसलमान आणि इतर लोक जी भाषा बोलतात ती ती भाषा आहे. ती देवनागरी अथवा फारसी भाषेत लिहिता येऊ शकते. माझी हिंदी अशी हिंदी आहे की जी अशिक्षित हिंदुस्तानीही बोलू शकतो. मी अशी प्राथमिक स्वरूपाची हिंदी

बोलत असतो आणि ती लोकांना कळते. मी तुलसीदास वाचला आहे परंतु हिंदीत माझे शिक्षण झालेले नाही. माझे उर्दूतसुद्धा शिक्षण झालेले नाही. मला वेळ नाही. मी ज्या हिंदीचा प्रचार करत असतो ती हिंदी साहित्य संमेलनात लोकप्रिय नाही. मी ती संस्था सोडली (जुलै २५, १९४५). आज हिंदी संस्कृतप्रचूर झाली आहे आणि उर्दूला असे स्वरूप आले आहे की ती मौलाना साहेब (अबुल कलाम आझाद) , वा सप्रू साहेब (तेज बहादूर सप्रू) बोलू आणि समजू शकतात. यामुळे मी म्हणालो होतो की मला हिंदी नको आणि उर्दूही नको. मला गंगा आणि यमुनेचा संगम हवा आहे. परंतु लोक मला वेडा म्हणतात. ते म्हणतात की अंजुमन तरक्की ए उर्दू उर्दूकरिता काम करत आहे आणि हिंदी साहित्य संमेलन हिंदीकरिता. अशात तुमचे कोण ऐकणार आहे? आणि आता पाकिस्तान झालेला असताना तू हिंदुस्तानीची गोष्ट कशाला करतोस? यामुळे हिंदुस्तानीकरिता तू जी धडपड करतो आहेस ती व्यर्थ जाणार आहे. परंतु माझे अंतःकरण याविरुद्ध बंड करते. मी हिंदुस्तानीचा त्याग का करावा? मी चांगल्या गोष्टीचा त्याग का करावा? आपण जेव्हा प्रयागला जातो तेव्हा गंगा आणि यमुना यांचा जिथे संगम होतो तिथे बुडी घेतल्याने आपण पवित्र होतो. त्याचप्रमाणे हिंदी आणि उर्दूच्या संगमात मी पवित्र होऊ इच्छितो.

मुसलमान मला आज इस्लामचा सर्वात मोठा शत्रू समजतात. परंतु मी सांगतो की मी जिवंत राहिलो तर एक दिवस ते माझ्या बाजूने होतील. प्रत्येकजण माझ्या मागे लागेल. माझी भीती इतकीच आहे की ज्या वेडाचा महापूर आज हिंदुस्तानात आला आहे त्यात आपण सर्व वाहून न जावो. हे सांगणारा मी एकटा जरी शिल्लक राहिलो तरी हिंदुस्तानी हीच राष्ट्रभाषा आहे असेच मी म्हणेन. हिंदुस्तान आणि पाकिस्तान हे दोन्ही माझे देश आहेत. मला कोणीही अडवू शकत नाही. श्रीयुत जिनासुद्धा मला अडवू शकत नाहीत. मला अटक करायाला मी काही विदेशी नागरिक झालेलो नाही. पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता मी पारपत्र घेणार नाही. तुम्हा सर्वांमध्ये हेच धैर्य असले पाहिजे. ज्या हिंदमातेचा ध्वज आपण फडकवत आहोत तिने किती तरी त्याग केलेला आहे. आता तिचा शिरच्छेद झाला आहे असे आपण समजायचे काय? उर्दूचे मूल्य देऊन हिंदीला पुढे नेण्याची चूक कोणीही करू नये. एक माणूस जर असे करील तर त्याच्या मागे अनेक येऊ शकतात. माझ्याबद्दल बोलायचे तर मी मेलो तरी माझ्या भूमिकेपासून मी एक इंचही ढळणार नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २१३-५

# ५८. प्रार्थना प्रवचन, जुलै ३, १९४७

नवी दिल्ली,

जुलै ३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

तुम्ही भजन ऐकले आहे. पाण्यातील मासा जर तहानलेला राहिला तर हसण्यासारखी गोष्ट होईल असे त्यात सांगितले आहे. आपण ईश्वराच्या जगात आहो. ईश्वर नेहमी आपल्या सोबत असतो आणि तरीही आपल्याला ईश्वर माहीत नाही हे आपले दुर्दैव आहे. ज्याप्रमाणे नख बोटांपासून वेगळे नसते त्याचप्रमाणे ईश्वर आपल्यापासून दूर नसतो. जर नख तुटले तर वेदना होतात, त्याचप्रमाणे माणूस जेव्हा ईश्वरापासून वेगळा होतो तेव्हा ते वेदनादायक होते.

आज हिंदुस्तानला वेदना होत आहेत. परंतु त्या वेदना शहरात आहेत. हिंदुस्तानची सात लाख खेडी शहरांभोवती फिरत नाहीत. हिंदुस्तान १९०० मैल लांब आणि १५०० मैल रुंद देश आहे. फाळणीने हिंदुस्तानचा नकाशा बदलत नाही. तो जसा आहे तसाच राहील.

एक मित्र लिहितो की हिंदुस्तानातील ब्राह्मण समुद्रातील खडकासारखे अत्यल्प आहेत. त्यांची संख्या फार कमी आहे. मी जर एकटा असेन तर मीही अल्पमतात असेन. खडक जर समुद्रापासून वेगळा राहील तर तो अल्पसंख्य असेल. नंतर तो वाळून जाईल. परंतु तो जेव्हा पाण्यात असतो तेव्हा तो समुद्राचा भाग असतो. ब्राह्मण जर हिंदू समुदायरुपी सागराचा भाग असतील तर ते अल्पसंख्य कसे असू शकतील?

एक काळ असा होता की जेव्हा केवळ ब्राह्मण मुले शाळेत जात होती. अगदी सुरुवातीपासून ते शिकत असल्यामुळे जे काही नवीन शिकण्यासारखे होते तेही ते शिकले. परंतु आज अर्थातच जे ब्राह्मण नाहीत तेही शिकत आहेत. आपल्या मुलांना प्रवेश मिळत नाही म्हणून ब्राह्मणांनी तक्रार का करावी? मी तुमच्याशी अधिकाराबद्दल बोलत आहे. अधिकार म्हणून काही गोष्ट नसते. ब्राह्मण जर हक्क म्हणून शिक्षणाचा दावा करत असतील तर तुम्हाला हा अधिकार कसा मिळाला हे मी विचारीन. माझा जन्मसिद्ध अधिकारावर विश्वास नाही. हक्क हे कर्तव्य पार पाडल्याच्या परिणामस्वरूपी मिळत असतात. पाप करणाऱ्या माणसाला आपल्या पापाचे फळ भोगण्याचा अधिकार असतो हे तुम्ही मान्य कराल. माझे म्हणणे आहे की जो चांगले काम करतो त्याला त्या कामाचे फळ भोगण्याचा अधिकार असतो. मला जर कोणी विचारले की ब्राह्मणांचे अधिकार कोणते

तर मी म्हणेन की ब्रह्मज्ञान मिळवणे हे त्याचे कर्तव्य आहे. ब्राह्मणाची केवळ दोन कर्तव्ये आहेत - ब्रह्मविद्या मिळवावी आणि ती विद्या इतरांना शिकवावी. जो ब्राह्मण हे कर्तव्य पार पाडतो त्याला ब्राह्मण म्हणून जगण्याचा अधिकार मिळतो. पूर्वी ब्राह्मणाची आजिविका चालावी म्हणून लोक त्याला धान्य वगैरे द्यायचे. त्यातून ब्राह्मण आवश्यक तितके घ्यायचे आणि राहिलेले परत करायचे. अशा प्रकारे ब्रह्मज्ञानाचे विज्ञान शिकवणे हा ब्राह्मणाचा अधिकार आहे. आमच्या मुलांना महाविद्यालयात जाता येत नाही अशी तक्रार त्यांनी का करावी? प्रत्येकजण महाविद्यायात कसा जाऊ शकेल? हिंदुस्तानातील सात लाख खेड्यांमधील किती मुले महाविद्यालयात जात असतात? हे नई तालीममध्येच शक्य आहे. आज मी त्याबद्दल बोलणार नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २१५-७

# ५९. प्रार्थना प्रवचन, जुलै ४, १९४७

नवी दिल्ली,

जुलै ४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज मी तुम्हाला फार मोठी गोष्ट सांगणार आहे. काही लोक मला विचारतात की जे काही होत आहे आणि आपल्याला जो उपनिवेशाचा दर्जा मिळणार होता तो आपल्याला रामराज्याकडे घेऊन जाणार आहे काय? विचारणारे मला टोमणा मारतात आणि मला कबूल करावे लागते की यातून रामराज्य निर्माण होऊ शकत नाही. मला सर्व चिन्हे त्याच्या विरोधी आढळत आहेत. इंग्रजांनी आमच्या देशाचे दोन तुकडे केले आणि यानंतर हे दोन उपनिवेश राहणार आहेत. ते जर परस्परांचे शत्रू असतील तर आपण रामराज्याची अपेक्षा कशी काय करू शकतो? उपनिवेशाचा दर्जा म्हणजे अर्थातच इंग्रजांची गुलामगिरी नाही. ते जवळपास स्वातंत्र्यासारखे आहे. परंतु राष्ट्रकुलातील इतर उपनिवेश कमी अधिक प्रमाणात त्याच वंशाच्या लोकांचे आहेत. आणि ज्याअर्थी हिंदुस्तान आशियायी देश आहे त्याअर्थी ते उपनिवेश कसे राहू शकते? जगातील सर्व देश जर उपनिवेश बनू शकले तर मग ती वेगळी गोष्ट होईल आणि मग रामराज्य आणता येईल. परंतु जे येऊ घातले आहे ते आपल्याला रामराज्याडे वा ईश्वरी राज्याकडे नेऊ शकत नाही. ब्रिटिश सरकारने आधी ३० जून १९४८पर्यंत हिंदुस्तानी लोकांच्या हाती सत्ता सोपवण्याचे ठरवले होते. परंतु आता आपण जितक्या लवकर जाऊ तितके बरे असे त्यांनी ठरवले आहे. परंतु हे ते कसे करू शकतात? यामुळे ते या निष्कर्षावर पोहोचले की विभाजित हिंदुस्तानला जर उपनिवेशाचा दर्जा दिला तर त्यात धोका राहणार नाही कारण त्यांचे आपल्याशी तरीही संबंध जुळलेले राहतील.

बाह्य जगात काय होत आहे याची कल्पना नसलेला हिंदुस्तान विहिरीतील बेडकासारखा देश असावा अशी माझी इच्छा नाही. जवाहरलाल आणि इतर पुढाऱ्यांनी सागितले आहे की आमचे कोणत्याही देशाशी शत्रुत्व नसेल. आमची ब्रिटिशांसह सर्वांशी मैत्री असेल. मग त्यांना विश्वसंघराज्य हवे आहे काय? आशियायी संमेलनात मी सांगितल्याप्रमाणे (गांधीजींच्या दोन भाषणांकरिता पाहा आशियांतर्गत देशांच्या संबंधांची चर्चा करणाऱ्या परिषदेतील भाषण, एप्रिल १, १९४७ आणि प्रार्थना प्रवचन, एप्रिल, ३, १९४७) विश्वसंघराज्य शक्य आहे आणि तसे झाले तर प्रत्येक देशाला आपले सैन्य ठेवण्याची गरज राहणार नाही. काही देश स्वतःला आज लोकशाहीवादी घोषित करतात

पण ते असे केवळ म्हणत असतात. जिथे शासन जनतेद्वारे चालवले जाते तिथे सैन्याची गरज काय? जिथे सैन्याचे शासन असते तिथे जनता शासन चालवू शकत नाही.

सैन्यातर्फे शासित होणाऱ्या देशांचे विश्वसंघराज्य निर्माण होऊ शकत नाही. जर्मनी आणि जपानच्या सैनिकी हुकुमशाहीने अनेक देशांना मैत्रीच्या मोहात गुंतवण्याचा प्रयत्न केला होता. परंतु ही फसवणूक फार काळ चालू शकली नाही. आज मी आजूबाजूला पाहतो आणि मला रामराज्य कुठेही दिसत नाही.

आज जे तलवारींचे आणि बंदुकींचे राज्य दिसते ते तुमच्या सत्य आणि अहिंसेच्या ३२वर्षांच्या शिकवणुकीचे फळ नाही काय असे लोक मला विचारतात. मग याचा अर्थ असा आहे काय की ३२ वर्षे मी खोटेपणा आणि फसवणुकीच्या बळावर टिकून होतो? याचा अर्थ असा आहे काय की ज्या लोकांनी माझ्याकडून अहिंसेचा धडा आत्मसात केला होता ते बत्तीस वर्षांनंतर अचानक खोटारडे आणि खुनी झाले? मी कबूल केले आहे की आमची अहिंसा ही दुर्बलांची अहिंसा होती. परंतु वास्तवात दुर्बलता आणि अहिंसा हातात हात घालून चालूच शकत नाहीत. यामुळे आम्ही अनुसरत असलेल्या अहिंसेचे वर्णन अहिंसा म्हणून नाही तर शांततापूर्वक प्रतिकार असे केले पाहिजे. परंतु मी पुरस्कृत केलेली अहिंसा दुर्बलांची अहिंसा नव्हती. उलट शांततापूर्ण प्रतिकार हा केवळ दुर्बलांकरिता आहे. शांततापूर्ण प्रतिकार हा सक्रिय आणि सशस्त्र प्रतिकाराची तयारी असतो. परिणामी लोकांच्या अंतःकरणात जी हिंसा खदखदत होती तिचा एकाएकी उद्रेक झाला.

आपला शांततापूर्ण प्रतिकार पूर्णपणे अपयशी झाला नाही. त्याने आपण जवळपास स्वातंत्र्य मिळवले आहे. आज आपण जी हिंसा पाहत आहो ती भेकडांची हिंसा आहे. शूरांची हिंसा म्हणूनसुद्धा एक प्रकार आहे. चार अथवा माच माणसांचे भांडण झाले आणि ते तलवारीने मेले तर त्यात हिंसा आहे परंतु ती शूरांची हिसा आहे. परंतु जेव्हा १०,००० सशस्त्र लोक निशस्त्र लोकांच्या गावावर हल्ला करतात आणि बायकामुलांसह सर्वांची कत्तल करतात तेव्हा ती भेकडांची हिंसा असते. अमेरिकेने जपानवर आपला ॲटम बॉम्ब टाकला. ती हिसा भेकडांची हिंसा होती. शूरांची अहिंसा ही पाहण्यासारखी गोष्ट असते. मरण्यापूर्वी मला ती अहिंसा पाहायची आहे. याकरिता आपल्यामध्ये आंतरिक शक्ती असली पाहिजे. हे वेगळेच शस्त्र आहे. लोकांच्या लक्षात जर त्याचे सौंदर्य लक्षात आले असते तर आज जी जिवित आणि वित्तहानी झाली आहे ती झाली नसती.

गेली ३२ वर्षे मी लोकांना अहिंसेचा पाठ शिकवण्याचा प्रयत्न करतो आहे. तो पाठ जर ते शिकले असते तर आज अन्नधान्य आणि कापड यांच्या रेशनिंगची गरज पडली नसती. आपण जर अन्नधान्य आणि कपडेलत्ते यांचा विचारपूर्ण उपयोग केला तर हिंदुस्तानात यापैकी एकाचाही तुटवडा

निर्माण झाला नसता. लोक जर प्रामाणिकपणे राहणे आणि परस्परांना मदत करणे शिकले असते तर नागरी पोलिसांच्या तोंडाकडे पाहण्याची गरज पडली नसती. स्वर्गीय श्री. मॉनेग्यू यांनी नागरी सेवेचे वर्णन लाकडी ढाचा असे केले होते. नागरी सेवेतील लोक स्वतःला जनसेवक समजत नाहीत आणि त्यांना जनतेच्या सेवेकरिता नोकरीही दिली जात नसते. काहीही करून विदेशी सत्ता सुरू राहावी याकरिता ते इथे आहेत. आपल्या ऑफिसातील सुरक्षित ठिकाणी बसून ते चपराश्यामार्फत हुकूम सोडत असतात. आपण जर आपल्या पायावर उभे राहणे शिकू शकलो व नागरी सेवेवर अवलंबून राहणे थांबवले तर हिंदुस्तामध्ये रेशनिंगचीही गरज नसेल आणि आजच्या नागरी सेवेचीही गरज नसेल. प्रशासन चालवण्याकरिता काही विशेष प्रकारची नागरी सेवा लागेल यात काही संशय नाही. नागरी सेवेतील लोक काळानुसार बदलू शकले आणि जनसेवेच्या दृष्टीने प्रशासन चालवू लागले तर खरी लोकशाही व्यवस्था आणता येईल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २१७-२०

# ६०. प्रार्थना प्रवचन, जुलै ५, १९४७

नवी दिल्ली,

जुलै ५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज लेडी माऊंटबॅटन मला भेटण्याकरिता आल्या होत्या. त्यांना माझ्याशी विशेष असे कोणतेही काम नव्हते. तुम्ही मला येऊन भेटण्याचा त्रास घेण्याची आवश्यकता नाही असे मी त्यांना टेलिफोनवरसुद्धा सांगितले होते. परंतु त्यांचे म्हणणे होते की तुम्ही माझ्याकडे अनेकदा भेटण्याकरिता आलेला असल्यामुळे मीसुद्धा तुमच्याकडे येऊन तुमची भेट घेतली पाहिजे. मी केवळ कामाकरिता व्हाईसरायना येऊन भेटलो होतो हेही मी त्यांच्या निदर्शनास आणून दिले होते. परंतु त्यांचा निश्चय पक्का होता. त्यांनी माझे ऐकले नाही आणि त्या आल्या. त्या अतिशय साधेपणाने राहतात. त्या आल्या आणि आम्ही जसे इथे बसलो आहो तशा बसल्या आणि त्यांनी सर्व गोष्टींची माहिती करून घेतली. त्यांनी विचारले की इथे तुम्हाला कसे वाटते आणि आमचे म्हणणे त्यांनी लक्षपूर्वक ऐकून घेतले. मी त्यांना सांगितले की मी इथे भंग्यांमध्ये राहतो. मी त्यांना हेही सांगितले की मी एका मंदिरात राहतो आणि मंदिर जितके स्वच्छ असायला पाहिजे तितकेच हे ठिकाण स्वच्छ आहे. तुम्हाला जर भंगी कसे राहतात हे पाहायचे असेल तर तुम्ही त्यांच्या घरी जायला पाहिजे. त्यांची घरे अगदी जवळच आहेत. त्या भंग्याच्या घरी गेल्या आणि तेथील परिस्थिती लक्ष घालून पाहिली. मी त्यांच्याबरोबर गेलो नाही कारण मी गेलो असतो तर गर्दी गोळा झाली असती. त्यानंतर त्या हरिजन निवासात गेल्या. तिथे हरिजन मुलांना प्रशिक्षण दिले जात असल्याचे पाहून त्यांना फार आनंद झाला.

आज मला एक पत्र मिळाले आहे परंतु आज त्याची चर्चा मी इथे करू इच्छित नाही. (हे पत्र अकाली दैनिकाचे संपादक अजीत यांनी लिहिले होते.) परंतु आता मला वाटते की मी ते उद्यापर्यंत थांबवून ठेवू नये. फाळणीच्या प्रश्नावर पंजाबमधील शिखांमध्ये जे काही घडले ते निराशाजनक आहे. आधी शीख आणि हिंदूंमध्ये अंतर नव्हते. शिखांचा इतिहास लिहिणाऱ्या मेकॉलेंनी हे सर्व विष पसरवले आहे. मेकॉले हे प्रसिद्ध इतिहासकार असल्यामुळे ते जे काही म्हणले ते सर्वांना खरे वाटले. शिखांचा ग्रंथसाहेब हा धर्मग्रंथ खरे म्हणजे हिंदूंच्या धर्मग्रंथांवर आधारित आहे. शीख ही शूर जमात आहे. परंतु त्यांची संख्या कमी आहे. पंजाबचे जर विभाजन होत असेल तर शिखांचेही विभाजन होणे अपरिहार्य होईल. या पत्रात लिहिले आहे की जे शीख आता पूर्व पंजाबमध्ये आले आहेत ते सुरक्षित

आहेत. परंतु पश्चिम पंजाबमध्ये असलेल्या शिखांचे काय होईल असे ते विचारतात. ते जर संकटात सापडले तर कॉंग्रेस त्यांना मदत करील काय? मी म्हणेन की जे शूर असतात त्यांना दुसऱ्या कोणाच्या मदतीची आवश्यकता नसते. त्यांनी मदतीकरिता केवळ ईश्वराकडे याचना केली पाहिजे. आणि पश्चिम पंजाबमधील शिखांवर संकट येईल असे आपण का गृहीत धरावे? त्यांना काही झाले तर हिंदुस्तानातील इतका मोठा जनसमुदाय त्याकडे तटस्थपणे पाहत राहील असे तुम्हाला वाटते काय? यामुळे शिखांनी काळजी करू नये.

ब्रिटिश संसदेत जे विधेयक सादर करण्यात आले आहे त्याचे लवकरच कायद्यात रूपांतर होईल. त्यानंतर हिंदुस्तानचे दोन उपनिवेशात विभाजन होईल. याचा अर्थ ब्रिटिश राष्ट्रकुलात दोन नवीन सदस्य येतील. विधेयकात २० कलम आहेत आणि ते मी वाचले आहेत. त्यात काही संदिग्धता आहे वा इंग्रजांनी अशा काही भाषेचा उपयोग केला आहे की ज्यामुळे वेगळा अर्थही काढला जाऊ शकतो असे मी म्हणू शकत नाही.

आपल्याला फसवण्याची एकाही इंग्रजाची इच्छा नाही. परंतु हे विधेयक निश्चितच विषारी आहे. हे विष आपण प्यालो आहे आणि कॉंग्रेसनेही त्याचे प्राशन केले आहे. ब्रिटिशांनी हिंदुस्तानवर १५० वर्षे राज्य केले आणि राजकीय दृष्टीने हिंदुस्तान एक राष्ट्र आहे ही गोष्ट ब्रिटिशांनी मान्य केली होती. त्यांनी एक राष्ट्र म्हणून याला विकसित करण्याचासुद्धा प्रयत्न केला व काही प्रमाणात त्यांना त्यात यशही आले. त्यांच्यापूर्वी मोगलांनी असा प्रयत्न केला होता परंतु त्यात त्यांना कमी यश आले.

ज्या देशाला त्यांनी एक केले होते आता त्याचे विभाजन करण्याचा त्यांनी प्रयत्न करावा हे त्यांना शोभत नाही. तो त्यांचा हेतू होता असे मला म्हणायचे नाही. कॅबिनेट मिशननेसुद्धा हिंदुस्तान एक देश असल्याचे मान्य केले होते व या गृहीतकानुसारच त्यांनी आपला युक्तिवाद मांडला होता. आज तो सर्व युक्तिवाद निरर्थक झाला आहे. अशा प्रकारे दोन उपनिवेश निर्माण करणारे हे विधेयक विषारी आहे. हे खरे आहे की कॉंग्रेस आणि मुस्लिम लीग या दोघांनीही या विधेयकाला संमती दिली आहे. परंतु एखादी वाईट गोष्ट मान्य केली तर तेवढ्यामुळे ती गोष्ट चांगली होत नाही.

कायदे आझम जे म्हणत आले होते तेच आज मंजूर होणार आहे. त्यांचा संपूर्ण विजय झाला असे एक प्रकारे आपण म्हणू शकतो. माझ्या दृष्टिकोनातून या विधेयकामुळे ब्रिटिशांसहित तिन्ही पक्षांची परीक्षा होणार आहे. त्यामुळे आपण उपनिवेश होणार आहो परंतु ती तात्कालिक अवस्था असेल. घटनासमितीने तयार केलेल्या घटनेवर महाराज्यपालांना सही करावी लागणार आहे. त्या दस्तावेजातील स्वल्पविरामालाही ते धक्का लावू शकत नाहीत. हीच गोष्ट पाकिस्तानमध्येही घडेल. घटना अस्तित्वात आल्यानंतर दोन उपनिवेशांनी ब्रिटिश राष्ट्रकुलापासून जर स्वातंत्र्य घोषित केले तर

त्यापासून त्यांना कोणीही अडवू शकत नाही. ते हेच करतील असे मला वाटते. या सर्व गोष्टी अर्थातच भविष्यकालीन आहेत आणि यामुळे सध्या तरी त्याबद्दल निश्चित असे काहीही सांगता येत नाही. सध्या इतकेच स्पष्ट आहे की हिंदुस्तानचे दोन स्वायत्त उपनिवेशात विभाजन झाले आहे.

ब्रिटिशांनी दुसरीही अशी परिस्थिती निर्माण केली आहे की ज्यामुळे त्यांच्या प्रामाणिकपणाची परीक्षा होणार आहे. हिंदुस्तानातील विविध संस्थानांना भारतीय संघराज्यात आणले पाहिजे. आजची धोक्याची परिस्थिती कायम राहू देता येऊ शकत नाही.

पाकिस्तानची मागणी करणारांना जे हवे ते मिळाले आहे. जमिनीच्या क्षेत्रफळाच्या दृष्टीने ते फार जास्त नसेल परंतु असे समतेच्या तत्त्वावर करण्यात आले आहे. आताआता जेव्हा पाकिस्तानकरिता संघर्ष सुरू होता तेव्हा पाकिस्तानचा काय अर्थ आहे ते मला कळू शकत नव्हते. आजसुद्धा मला तो अर्थ कळू शकत नाही. पाकिस्तानची घटनासमिती पाकिस्तानच्या घटनेला कसा आकार देते हे कळल्यानंतरच पाकिस्तानचे चित्र स्पष्ट होईल. परंतु राष्ट्रवादी मुसलमान, ख्रिश्चन, शीख आणि हिंदू या सर्वांना पाकिस्तान कशी वागणूक देतो यावरूनच पाकिस्तानची खरी परीक्षा होईल. मुसलमानांमध्येसुद्धा विविध पंथ आहेत; शिया, सुन्नी आणि अजून किती तरी. या विविध पंथांच्या आणि धर्मांच्या लोकांना कशी वागणूक मिळते ते आता पाहावे लागेल. ते हिंदूंचे मित्र होतील की त्यांच्याविरुद्ध युद्ध पुकारतील? आपण मालक आहो आणि इतर सर्व गुलाम हे भूत तर त्यांच्या डोक्यात शिरणार नाही? त्यांना आपल्या घटनेत या सर्व प्रश्नांचे उत्तर द्यावे लागेल.

मुसलमानांना आपण मित्राप्रमाणे वागणूक देतो की शत्रूप्रमाणे हे भारतालासुद्धा दाखवून द्यावे लागेल. माझ्याकरिता सर्व धर्म एक आहेत. ते एकाच झाडाच्या फांद्या आहेत. सर्व धर्म एकाच ईश्वराची भक्ती करतात. आधी युरोपमध्येसुद्धा धर्मांच्या नावावर युद्ध होत असत. परंतु आता तिथे नवीन वातावरण तयार होत आहे. अशा संघर्षांना लोक इतके कंटाळलेले आहेत की ते आता ईश्वराचासुद्धा त्याग करत आहेत. जग जर या दिशेने जात असेल तर हिंदुस्तान त्यापासून किती दिवस वेगळा राहू शकेल?

जे लोक हिंदुस्तान एक देश आहे असे समजतात त्यांच्याकरिता अल्पसंख्य वा बहुसंख्य हा प्रश्न मुळीच उपस्थित होत नाही. एक प्रकारे हे विधेयक सर्व पक्षांची परीक्षा आहे. आपण जर कसोटीत उत्तीर्ण झालो तर ईश्वरी वरदान म्हणून आपण ही गोष्ट स्वीकारू शकतो. आणि तसे झाले नाही तर ही गोष्ट आपल्या गळ्यातील फास होईल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २२०-४

# ६१. प्रार्थना प्रवचन, जुलै ६, १९४७

नवी दिल्ली,

जुलै ६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

उद्यापासून वायव्य सरहद्द प्रांतातील सार्वमताला सुरुवात होईल असा माझा विश्वास आहे. बादशाह खान आणि त्यांच्या मंत्र्यांना कोणत्याही बाजूने मतदान न करण्याचा सल्ला मी दिला आहे. लीगलासुद्धा मी हाच सल्ला दिला आहे. तो ऐकायचा की नाही हे अर्थातच त्यांच्यावर अवलंबून आहे. परस्परातील हा संघर्ष थांबवा असा सल्ला मी खुदाई खिदमदगारांना देईन.

देशाच्या विभाजनाबरोबरच आपल्या सैन्याचेही विभाजन होणार आहे. याचा अर्थ असा होतो काय की सैन्याच्या या दोन विभागांनी परस्परांशी युद्ध करावे? सैनिकीकरणाला कॉंग्रेसचा दीर्घ काळापासून विरोध आहे. कॉंग्रेसची स्थापना झाली तेव्हापासून, भारताचे भिष्मपितामह दादाभाई नौरोजी, ह्यूम, फिरोजशाह मेहता आणि टिळक यांच्या काळापासून आपण शिक्षणावर अत्यल्प खर्च करत असल्याबद्दल आणि सैन्यावर प्रचंड खर्च करत असल्याबद्दल तक्रार करत होतो. खरे म्हणजे सैन्याची निर्मिती ४० कोटी लोकांना गुलामगिरीत ठेवण्याकरिता झाली होती. याशिवाय देशाच्या काही भागात फ्रेंच तर दुसऱ्या काही भागात पोर्तुगीज होते. फ्रेंच आणि पोर्तुगीज वस्त्यांकडून धोका असल्याचे क्लाईव्हला जाणवले आणि तो धोका टाळण्याकरिता क्लाईव्हने सैन्य निर्माण केले. याशिवाय अफगाणीस्तान हा अनेक टोळ्यांचा देश आहे व रशिया अफगाणीस्तानमार्गे हल्ला करू शकेल अशीही भीती होती.

इतके मोठे सैन्य असतानाही आपण इंग्रजांसमोर टिकून राहिलो. परंतु आपली अहिंसा सबळांची अहिंसा नव्हती, दुबळ्यांची होती. मी शांततामय प्रतिकाराचा मार्ग दाखवला आणि आपण सशस्त्र प्रतिकाराची तयारी केली नाही. परंतु अजूनही सैन्य आहे. का? ही लाजिरवाणी गोष्ट आहे. आज जी काही परिस्थिती आहे त्यावरून असे वाटते की दोन्ही देश आपल्या सैन्यशक्तीत वाढ करत आहेत. एक देश जर सैन्य वाढवेल तर दुसराही त्यात वाढ करील. पाकिस्तान म्हणेल की हिंदुस्तानशी प्रतिकार करण्याकरिता आम्हाला आमचे सैन्य वाढवणे भाग आहे. भारतही असाच युक्तिवाद करील. परिणाम युद्धात होईल. प्रश्न आहे आपण आपली संसाधने आपल्या मुलांच्या शिक्षणावर खर्च

करायची की बंदुका आणि दारूगोळा यांच्यावर खर्च करायची आणि आपल्या तरुणांना सैनिकी शिक्षण द्यायचे?

पाकिस्तानचा शांततेवर विश्वास नाही. त्यांचे म्हणणे आहे की कुराणात यासंबंधी काहीही सांगितलेले नाही. परंतु तुमची काय करायची इच्छा आहे असे मला त्यांना विचारायचे आहे.

आपण जरी स्वतंत्र झालो तरी आपण दोन देश राहणार आहो. परंतु आपण दोन देश आपसात युद्ध करण्याकरिता झालो आहो काय? ब्रिटिशांनी जे केले त्यामुळे मी समाधानीही नाही आणि मला त्याचा अभिमानही वाटत नाही. मला भविष्य अंधकारमय वाटते आहे. मी जेव्हा त्याबद्दल विचार करतो तेव्हा माझा थरकाप होतो. भारत आणि पाकिस्तानमध्ये जर युद्ध झाले आणि एकाने दुसऱ्याचा पराभव केला तर त्यामुळे कोणती चांगली गोष्ट होणार आहे? मी काळोखात आहे. ईश्वर आपल्याला प्रकाश दाखवो. तमसो मा ज्योतिर्गमयाः.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २२४-६

# ६२. प्रार्थना प्रवचन, जुलै ७, १९४७

नवी दिल्ली,

जुलै ७, १९४७

बंधूभगिनींनो,

येऊ घातलेले स्वातंत्र्य मला का आनंद देत नाही हे काल संध्याकाळी मी तुम्हाला सांगितले होते. वाईट गोष्टीचे चांगल्या गोष्टीत कसे रूपांतर करावे हे आज मी तुम्हाला सांगणार आहे. जे काही घडले ते घडले. त्यावर कुढत बसून वा इतरांना दोष देऊन काही उपयोग नाही. कायदेशीर भाषेत स्वातंत्र्य यायला आता काहीच दिवस राहिले आहेत. या कराराला सर्व पक्षांनी संमती दिली आहे आणि ते आता आपला शब्द फिरवू शकत नाहीत. माणसाने जे करायचे ठरवलेले असते ते केवळ ईश्वरच निरस्त करू शकतो.

व्हाईसरायच्या हस्तक्षेपाशिवाय कॉंग्रेस आणि लीगने तडजोड करणे हा सर्वात सोपा मार्ग आहे. याबाबतीत लीगने पहिले पाऊल टाकले पाहिजे. माझ्या म्हणण्याचा हेतू असा नाही की पाकिस्तानचा निर्णय रद्द करावा. तो अंतिम निर्णय आहे हे मान्य करावे, त्यावर आता अधिक चर्चा नको. परंतु प्रत्येक पक्षाचे १०-१० प्रतिनिधी एखाद्या मातीच्या झोपडीवजा घरात बसतील आणि जोपर्यंत तडजोड होत नाही तोपर्यंत या झोपडीतून उठायचे नाही असा निर्धार करतील तर ते ज्या निर्णयावर पोहोचतील तो निर्णय ब्रिटिश संसदेसमोर सध्या दोन उपनिवेश निर्माण करण्याकरिता जे विधेयक आहे त्यापेक्षा किती तरी चांगला असेल. मला भेटायला येणारे आणि मला लिहिणारे सर्व हिंदू आणि मुसलमान जर मला फसवत नसतील तर भारताच्या फाळणीमुळे कोणीही खुश नाही हे स्पष्ट आहे असे म्हणावे लागेल. त्या सर्वांनी आपल्या इच्छेविरुद्ध फाळणी मान्य केली.

अजून एक पद्धत आहे आणि ती कदाचित इतकीच कठीण असेल. ज्या सैन्याचे एकच उद्दिष्ट होते, मग ते उद्दिष्ट कोणतेही का असेना, त्या सैन्याचे विभाजन होत आहे. सैन्याच्या या विभाजनामुळे प्रत्येक देशभक्ताला दुःख होत आहे आणि त्यांच्या मनात भीती आणि गैरसमजही निर्माण होत आहेत. दोन सैन्य का निर्माण व्हावे? यांना परकीय आक्रमणाविरुद्ध देशाचे रक्षण करायचे आहे की परस्परांशी भाडून आम्ही एकमेकांना मारण्यातच आमची हुशारी आहे हे त्यांना जगाला दाखवून द्यायचे आहे?

तुम्हाला सावध करण्याकरिता हे भयावह चित्र मी तुमच्यासमोर जाणूनबुजून मांडले आहे. यातून सुटका करून घेण्याचा मार्ग माझ्या मते आकर्षक आहे. हिंदू समाज आणि भारतीय स्वातंत्र्य संघर्षात भाग घेणारे सर्व आज या कसोटीत उत्तीर्ण होणार आहेत काय? ते उठून सांगतील काय की आम्हाला या सैन्याची गरज नाही अथवा आम्ही या सैन्याचा उपयोग आमच्या मुसलमान भावंडांविरुद्ध करणार नाही, मग ते भारतात राहणारे असो की पाकिस्तानमध्ये. असे म्हणाल्यामुळे त्यांच्या तीस वर्षांच्या दुबळेपणाचे रूपांतर शक्तीत होईल. शक्य आहे की मी सुचवलेली पद्धत मूर्खपणाची समजली जाईल. ते काहीही असले तरी मूर्खपणाचे रूपांतर शहाणपणात करण्याची शक्ती ईश्वरात आहे. इतिहासात त्याने असे कितीदा तरी केले आहे. ज्यांनी सैन्यविभाजनाच्या भयावह मार्गावर पाऊल ठेवले आहे त्यांनी माझ्या बोलण्याचा थोडा विचार करावा.

(हिंदीवरून). प्रार्थना प्रवचन- पृष्ठ २२७-२८

# ६३. प्रार्थना प्रवचन, जुलै ८, १९४७

नवी दिल्ली,

जुलै ८, १९४७

बंधूभगिनींनो,

आज मी दहा मिनीट उशीर केला. याबद्दल मी तुमचा क्षमा मागतो. मला किती तरी कामे करायची होती आणि किती तरी लोक मला भेटायला आले होते. यामुळे मी लवकर मोकळा होऊ शकलो नाही. या दिवसात मी जे काही सांगतो ते अतिशय विचारपूर्वक सांगतो. मला काय सांगायचे आहे त्याची मी आधी टिपणे तयार करतो आणि त्यानंतरच मी बोलतो. आज मी बराच वेळ लिहत बसलो होतो आणि नंतर मी हातपाय धुवायला गेलो. वेळ झाली याची आठवण करून देण्याकरिता मुली आल्या होत्या परंतु मला त्यांचे बोलणे ऐकू आले नाही. याचा परिणाम हा उशीर आहे.

एका मित्राने मला आज इंग्रजीत पत्र लिहिले. तो म्हणतो - मला राष्ट्रभाषा येत नाही. माझी भाषा तमिळ आहे. तुम्हाला जरी थोडीबहुत तमिळ येत असली तरी मी जर तुम्हाला तमिळमध्ये पत्र लिहिले तर ते समजायला तुम्हाला त्रास होईल. यामुळे मी इंग्रजीत लिहीत आहे.

तुम्हाला माहीत असल्याप्रमाणे प्रत्येकाने मला आपल्या स्वतःच्या भाषेत लिहावे अशी माझी इच्छा असते. सर्वात चांगली गोष्ट म्हणजे प्रत्येकाने उत्तर भारताची भाषा म्हणजे हिंदुस्तानी शिकावी. ही भाषा हिंदी आणि उर्दू यांच्यामध्ये आहे. लेखकाने बर्नार्ड शॉच्या काही ओळी उद्धृत केल्या आहेत. बर्नार्ड शॉने इंग्रजीवर हल्ला केला होता. त्याचा विनोद अतिशय बोचरा असतो. तो म्हणतो इंग्रज कधीही चुकत नाहीत. ते प्रत्येक गोष्ट तत्त्वानुसार करतात. ते आम्हाला गुलाम करतात तेही तत्त्वानुसार. त्यांनी आपल्या राजाला ठार मारले ते लोकशाही कायम टिकवण्याकरिता. शॉ उद्धृत करत असताना पत्रलेखक माझी चेष्टा करत म्हणतो की स्वातंत्र्याचे कारण ब्रटिशांना या देशाची दोन भागात फाळणी करायची आहे. परंतु इतर कोणाहीपेक्षा मी ब्रिटिशांना अधिक चांगला ओळखतो. ते भारत सोडत आहेत कारण आपली सत्ता कायम ठेवून आपला आर्थिक लाभ होऊ शकत नाही हे त्यांना माहीत आहे आणि तसेच यापुढे आपल्याला राजकीय दृष्टीने गुलामगिरीत ठेवणे अशक्य आहे हेही त्यांच्या लक्षात आलेले आहे.

पहिल्या विश्वयुद्धात देशाच्या एका भागात सैनिकी शासन सुरू करण्यात आले होते. दुसऱ्या विश्वयुद्धात लॉर्ड वेव्हेल यांनी संपूर्ण भारतात सैनिक शासन लावले. परंतु आता इंग्रजांच्या लक्षात

आले आहे की हे फार दिवस सुरू राहू शकत नाही. भारताला सतत गुलामगिरीत ठेवले तर आर्थिक जबाबदारी वाढेल. यामुळे त्यांनी निघून जाण्याचा निर्णय घेतला. काल मी तुम्हाला स्पष्ट करून सांगितल्याप्रमाणे देशाला वाचवण्याचे अजून दोन मार्ग आहेत. इंग्रजांच्या हातात अजून सत्ता आहे. त्यांच्याजवळ प्रचंड सैन्य आहे आणि जोपर्यंत ते सैन्य निघून जात नाही तोपर्यंत ब्रिटिश खरोखरी गेले असे आपण म्हणू शकत नाही. ते अजूनही आपले अस्तित्व जाणवून देऊ शकतात. ब्रिटिशांना देशाची फाळणी करायची आहे. ते गेल्यामुळे हैद्राबाद, त्रावणकोर आणि इतर संस्थानांना स्वातंत्र्य घोषित करण्याचा परवाना मिळत नाही. मग भारताचे स्वातंत्र्य कुठे असेल? नुकताच घडलेल्या काही घटनांनी ब्रिटिशांच्या हेतूविषयी लोकांच्या मनात संशय निर्माण केला आहे हे मान्य केलेच पाहिजे. परंतु जोपर्यंत त्यांचा वाईट हेतू सिद्ध होत नाही तोपर्यंत मी त्यांच्याबद्दल निर्णय घेणार नाही. अर्थातच हे खरे आहे की भारतीय संस्थानांच्या संबंधात ब्रिटिश योग्य पाऊल उचलायला मागेपुढे पाहत आहेत. परंतु भारताचे विविध भाग वेगवेगळे होऊन परस्परांशी भांडतील अशा परिस्थितीत त्यांनी भारताला सोडले तर त्यांच्या इभ्रतीला याहून मोठा बट्टा लागू शकणार नाही.

(हिंदीवरून). (प्रार्थना प्रवचन, पृष्ठ २२९-३१)

# ६४. प्रार्थना प्रवचन, जुलै ९, १९४७

नवी दिल्ली,

जुलै ९, १९४७

(१०-७-१९४५च्या हिंदुस्तान टाईम्समध्ये बातमी होती की गांधीजींनी प्रेम ही जगातील सर्वोच्च गोष्ट आहे, लोकांना एकत्रित करणारी शक्ती आहे या भजनाने सुरुवात केली. युधिष्ठिराने यज्ञ केला कारण त्याला प्रेमाच्या म्हणजे अहिंसेच्या माध्यमातून जनतेचा सेवक व्हायची इच्छा होती. त्याने राजपदापेक्षा सेवेला महत्त्व दिले आणि म्हणून तो खरा राजा झाला.)

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी व्हाईसरायना (मुलाखतीसंबंधी व्हाईसरायच्या टिपणाकरिता पाहा परिशिष्ट "लॉर्ड मौऊंटबॅटन यांचे गांधीजींच्या ९-७-१९४७ला झालेल्या मुलाखतीसंबंधी टिपण") भेटायला का गेलो असा प्रश्न तुम्ही विचारू शकाल. अजून स्वातंत्र्य आपले झालेले नाही. केवळ शत्रुत्व आहे. इच्छा असेल तेव्हा लोक ट्राम थांबवतात, भोसकतात आणि लुटतात. स्वातंत्र्य हे सूर्याप्रमाणे असते परंतु त्याचे आगमन होत असलेले मला दिसत नाही. व्हाईसराय मला आपला मित्र म्हणतात. मी त्यांचा मित्र कसा काय असू शकतो? भंग्यांचा, गरिबांचा यांचा मी मित्र आहे.

मी काल ज्या पत्रलेखकासंबंधी (पाहा प्रार्थना प्रवचन, ८-७-१९४७) बोललो होतो त्यांनी मला आठवण करून देत विचारले की १९४० साली तुम्हाला हवेत हिंसा दिसत होती. जर तुम्हाला त्या वेळी हिंसा दिसली होती तर आता काय दिसते असेही त्यांनी मला विचारले. त्यांना प्रश्न विचारायचा हक्क आहे. भारतात चांगले घडत आहे असे म्हणता येऊ शकत नाही. लोक आगगाड्या थांबवत आहेत, जाळपोळ, लुटालूट आणि भोसकाभोसकी करत आहेत. हे अराजक आहे. पैसा कमावण्याकरिता लोक निधीत घोटाळे करतात आणि गैरमार्गाचा वापर करतात व तो पैसा गुपचूप इतरांजवळ ठेवतात. वातावरण असत्य, हिंसा, घृणा, आणि अविश्वास यांनी भरलेले आहे.

या पार्श्वभूमीवर ३ जूनची घोषणा आली. हिंदू, मुसलमान आणि शीख या सर्वांनी भारताची फाळणी मान्य केली. नंतर चोऱ्या, लूट आणि खूनाच्या बातम्या वृत्तपत्रातून येऊ लागल्या. वार्ताहर उपहासाने मला विचारतात की हीच तुमची प्रेमाची कल्पना आहे काय? ते म्हणतात की तुम्ही सत्याचे पुरस्कर्ते आहा परंतु आता सत्य कुठे आहे? कोण उंच आहे आणि कोण खाली आहे आता

हाच एकमेव प्रश्न आहे. ज्या सहनशीलतेबद्दल मी बोलत होतो ती आता कुठे आहे? जर ती येथे नसेल तर त्याकरिता जबाबदार कोण? त्याकरिता व्हाईसराय जबाबदार आहेत की अजून कोणी?

माझे उत्तर आहे की चोहोकडे दुर्गंधी येत आहे हे खरे आहे. मी त्याकरिता जबाबदार आहे. सत्य आणि अहिंसेच्या पालनाविषयी मी देशाला तीस वर्षांपासून सांगतो आहे. माझा सल्ला जर मानला गेला असता तर परिणाम वेगळा झाला असता. फळावरून आपण झाडाची परीक्षा करतो. जर इंग्रज गेले तर त्यांच्याबरोबर देशातील सुव्यवस्थाही जायला पाहिजे काय? इतकेच नाही तर जे लोक सत्याग्राहाची भाषा बोलत होते त्यांच्याही मनात हिंसेचे विचार होते आणि पहिली संधी मिळताच शस्त्र धारण करायचा त्यांचा हेतू होता. माझ्या स्वप्नातील स्वराज्य अजून किती तरी लांब आहे. दोन्ही पक्षांचा नाश करणाऱ्या या यादवीचा मी साक्षीदार होण्याची माझी इच्छा नाही. मुलतान, रावळपिंडी, गढमुक्तेश्वर, बिहार आणि बंगालवर माझी अश्रू ढाळण्याची इच्छा नाही. मला मरायचीही इच्छा नाही. हिंदू, मुसलमान, शीख ज्या वेडाला बळी पडत आहेत ते वेड त्यांना वाचवण्याची खात्री देऊ शकत नाही. तलवारीने पैसा मिळवता येऊ शकतो परंतु प्रतिष्ठा नाही. आतासुद्धा आपल्यासमोर एकमेव अहिंसेचाच मार्ग शिल्लक आहे. या मार्गावरच आपले आणि जगाचे कल्याण अवलंबून आहे. ब्रिटिशांनी या दोन पक्षात, दोन सैन्यात समेट घडवून आणावा ही मानवतेची मागणी आहे. हे साध्य करण्याकरिता उरलेले दिवससुद्धा पुरेसे आहेत अशी मला आशा आहे. यानंतर संस्थानांचा प्रश्न शिल्लक राहतो. १५ ऑगस्ट हा शेवटचा दिवस आहे. अजूनही वेळ आहे. या तारखेच्या आधी सलोखा घडवून आणता आला नाही तर मग फार उशीर होईल अशी मला भीती वाटते. आपल्यापेक्षा ब्रिटिश प्रबळ आहेत. त्यांच्याजवळ भरपूर सैनिकी शक्ती आहे. सैनिकी शक्ती म्हणून ब्रिटिश संपले असे ज्यांना वाटते ते चुकत आहेत.

(हिंदीवरून). (प्रार्थना प्रवचन-१, पृष्ठ२३१-३)

# ६५. प्रार्थना प्रवचन, जुलै १०, १९४७

नवी दिल्ली,

जुलै १०, १९४७

बंधू आणि भगिनींनो,

मला अनेकदा विचारण्यात येते की आता पाकिस्तान देण्यात आल्यामुळे जे लोक भारतीय संघराज्यात राहत आहेत त्यांचे कर्तव्य काय? या प्रश्नावर मी अनेकदा बोललो आहे आणि तरीही हा प्रश्न वारंवार विचारला जातो. भारत आणि पाकिस्तान हे शत्रू असतील अशी एक शक्यता आहे. हिंदू आणि विशेषतः सवर्ण हिंदू आमचे शत्रू आहेत असे मुस्लिम लीग म्हणत असते. असे असेल तर हिंदूंनीही मुसलमानांना आपले शत्रू समजायला पाहिजे काय? किमान मझा तरी हा मार्ग नाही. आणि माझ्या या वृद्धापकाळात मी माझा मार्ग सोडूही शकत नाही. माझी मानवता मला सांगते की सर्व मानवजात माझी मित्र आहे. परस्परांचे गळे कापून कोणाचेही भले होणार नाही. मैत्री म्हणजे लांगुलचालन नव्हे. एक मित्र दुसऱ्या मित्राचे लांगुलचालन करत नसतो. जर कठोर शब्द बोलावे लागणार असतील ते बोलायलाच पाहिजे. मी जर लांगुलचालनाच्या विरोधात आहे तर मी इतर काही काम का करत नाही असा प्रश्न मला विचारला जातो. १९४४ साली भर उन्हात १८ दिवस मी कायदेआझम यांच्या घराची वाट तुडवत जात असे तेव्हाही मी माझे कर्तव्य करत होतो. कायदे आझमना खुष करण्याचा मी प्रयत्न करत नव्हतो. मी त्यांना जे काही देऊ करत होतो ते त्यांनी स्वीकारले असते तर जे रक्त सांडले गेले ते आज सांडले नसते. आणि हे सर्व विषारी वातावरणही पसरले नसते. त्या अवस्थेत भारतात तिसरी शक्ती नसती आणि पाकिस्तानची निर्मिती होऊनही भारत एक राहिला असता. जिनाशी झालेली माझी बोलणी मैत्रीपूर्ण होती. खुशामत करणे ही गोष्ट आज वाईट अर्थाने घेतली जाते. जर्मनी आणि इंग्लंड यांच्यात जेव्हा वैर होते तेव्हा त्यावेळचे प्रधानमंत्री चेंबरलेन यांनी हिटलरला समजावण्याचा प्रयत्न केला होता. हे माझे मत नाही. चेंबरलेन यांनी खुषामतीचा मार्ग स्वीकारला नसता तर इतिहास काही वेगळाच झाला असता असे अनेक इंग्रजांचे मत होते. परंतु मी कोणालाही माझा शत्रू समजत नसल्यामुळे मी कुणाचीही खुषामत करण्याचा प्रयत्न का करीन?

पाकिस्तानमधील मंदिरे आणि गुरुद्वारा पाडण्यात येतील काय? तसे केले जाणार नाही असे मला वाटते. देवळात जाण्यापासून ते हिंदूंना अडवणार आहेत काय? पाकिस्तानचा असा अर्थ होतो

असे मला वाटत नाही. पाकिस्तानामधील हिंदू आणि शीख आपापल्या धर्माचे पालन करू शकणार नाहीत असे केवळ इस्लामचा शत्रूच म्हणू शकतो असे आजच दौलताना साहेब म्हणाले नव्हते काय? जर हिंदू आणि शीख यांना मुसलमानांप्रमाणेच न्याय मिळणार असेल तर इस्लामवर आधारित लोकशाही फार मोठी गोष्ट आहे असे सांगताना मला कोणताच संकोच वाटणार नाही. मानवजात ॲडमपासून निर्माण झाली आहे असे जर त्यांचे मत असेल तर विविध लोकांना आपापल्या देवाची वेगवेगळ्या मार्गाने भक्ती करण्यापासून ते कसे काय अडवू शकतात? मला वाटते की दौलताना साहेबांच्या म्हणण्याचा हाच अर्थ आहे. पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांतांतील हिंदूंनी घाबरून जाऊन आपापल्या घरातून पळून जाऊ नये असे मी त्यांना सांगेन. सुवर्ण मंदिर अमृतसरमध्ये आहे परंतु ज्या नानकाना साहेबकरिता (फेब्रुवारी २०, १९२१ला तिथे किती तरी शीख मरले गेले होते. पाहा सी. एफ. ॲन्ड्रूयूज यांना पत्र, फेब्रुवारी २२, १९२१) शिखांनी फार मोठे बलिदान केले ते पाकिस्तानमध्येच राहणार आहे. हैद्राबादमध्ये किती तरी हिंदू मंदीर आहेत. हैद्राबाद पाकिस्तानचा भाग होणार आहे असे मला म्हणायचे नाही. तेथील ९५ टक्के लोक हिंदू आहेत. या सर्व हिंदूंचा पाकिस्तानमध्ये समावेश करण्यात आला तर पाकिस्तानला अर्थच काय राहील? महान जामा मशीद संघराज्यात राहील. तिथे मुसलमानांना नमाझ पढण्यापासून आपण मनाई करणार आहोत काय? याशिवाय आग्र्यात ताजमहाल आहे. अलिगढमध्ये मुस्लिम विद्यापीठ आहे. मुसलमान विद्यार्थ्यांना तिथे शिकण्यापासून मनाई करण्यात येणार आहे काय? असे कोणते तरी ठिकाण आहे काय की जिथे मशीद वा देऊळ नाही? मी जिथे कुठे जातो तिथे तिथे मला या दोन्ही गोष्टी दिसतात. असे असताना पंजाब, सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांतातील हिदू भारतात का पळून येत आहेत? ते शूरवीर असले पाहिजे. घरांची जाळपोळ करणारे आणि निरागस मुलांचा खून करणारे शौर्य आम्हाला नको आहे. ते शौर्य नाही. तो दानवीपणा आहे.

परंतु सिंध आणि इतर ठिकाणची आपली घरे सोडून लोक जर भारतात येत असतील तर आपण त्यांना हाकलून दिले पाहिजे काय? आपण जर असे केले तर आपण स्वतःला भारतीय कसे म्हणू शकू? कोणत्या तोंडाने आपण जय-हिंदची घोषणा करू? नेताजींनी कशाकरिता युद्ध केले होते? आपण दिल्लीत राहत असो वा गुजरातमध्ये आपण सर्व भारतीय आहो. ते आपले पाहुणे असतील. पाकिस्तानप्रमाणेच भारतही तुमचा देश आहे असे म्हणून आपण इथे त्यांचे स्वागत करू. राष्ट्रवादी मुसलमानही पाकिस्तान सोडून भारतात येत असतील तर त्यांचेही आपण इथे स्वागत करू. भारतीय म्हणून आपला सर्वांचा समान दर्जा आहे.

१५ ऑगस्टला अजून पस्तीस दिवस आहेत. आपण पशुत्वाचा त्याग करू या आणि मानव बनू या. आपली सर्वांची परीक्षा होत आहे आणि यात ब्रिटिशांचाही समावेश आहे. आता पाकिस्तान अस्तित्वात आलेले असल्यांमुळे हिंदूंचा नोआखालीत जो छळ झाला आणि आर्थिक हानी झाली त्याची नुकसानभरपाई मिळू शकणार नाही अशी तार नोआखालीहून नुकताच मला मिळाली. त्यांना नुकसानभरपाई का मिळू नये? पाकिस्तान निर्माण झालेले असल्यामुळे हिंदूंचे रक्षण करण्याची अजूनच मोठी जबाबदारी त्या सरकारवर येऊन पडते. ज्या लोकांनी खून केले आणि जे आता तुरुंगात आहेत त्यांची सुटका होण्याची शक्यता आहे असेही तारेत सांगण्यात आले आहे. असे होणार नाही अशी मला आशा आहे. पाकिस्तानमध्ये राहणाऱ्या हिंदूंना कोणताच धोका नाही हे पाकिस्तानी लोकांनी दाखवून दिले पाहिजे. असे झाले तरच स्वातंत्र्यदिन म्हणून १५ ऑगस्ट साजरी करण्याकरिता आपल्याजवळ सबळ कारण असेल. परंतु असे घडले नाही तर माझ्याकरिता हे स्वातंत्र्य नाही. मला खात्री आहे की ते तुमच्याकरिता असेल येत्या ३५ दिवसात बरेच काही घडू शकते.

(हिंदीवरून इंग्रजीत). प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २३४-३७

# ६६. प्रार्थना प्रवचन, जुलै ११, १९४७

नवी दिल्ली,

जुलै ११, १९४७

बंधुभगिनींनो,

नोआखालीतील एक सहकारी लिहितात की तुम्ही जेव्हा नोआखालीला आला होता तेव्हा करा वा मराची भाषा बोलत होता. आता १५ ऑगस्टपूर्वी तुम्ही इथे आला नाही तर तुम्हाला पश्चात्ताप करावा लागेल.

मला मान्य आहे की नोआखालीला १५ ऑगस्टपूर्वी गेलो नाही तर मला पश्चात्ताप करावा लागेल. मी दिल्लीत का आहे? मी एक तर बिहारमध्ये असायला पाहिजे वा नोआखालीत. मी इथे अस्वस्थ आहे. नोआखालीत मी असा नव्हतो. तिथे मी दररोज मैलंमैल चालत असे, नवनवीन गावांना भेटी देत असे आणि अगणित हिंदू आणि मुसलमानांची भेट घेत असे. मी नोआखालीत काही काम केले आणि तसेच बिहारमध्येही काही काम केले आहे. माझ्या अंतःकरणात वणवा पेटलेला आहे. मी नोआखालीला गेल्यानंतर ही आग शमेल. ईश्वराने मला लवकरात लवकर नोआखालीत पाठवावे अशी तुम्ही प्रार्थना करा.

करा अथवा मराची शपथ मी विसरलेलो नाही. नोआखालीत जिथे काही शेकडा माणसे मेली होती तिथे बिहारमध्ये हजारो माणसे मेली असल्यामुळे नोआखालीहून मी बिहारला गेलो. माझ्याकरिता तर नोआखाली आणि बिहार सारखेच होते. जवाहरलालने तिथून मला बोलावून घेतले. मी इथे यावे म्हणून कृपलानींनीसुद्धा तार केली पण इथे येऊन मी काय साध्य करू शकलो? काही लोक अर्थातच टोमणा मारत मला विचारत असतात की नोआखालीत तरी तुम्ही काय साध्य करू शकला? संपूर्ण भारतात जर समझौता झाला तर नोआखालीसंबंधीही आपोआपच तडजोड होईल. परंतु मी वेगळ्या मार्गाने चालतो. लहानपणीच मी एक सुभाषित शिकलो होतो - पिंडी ते ब्रम्हांडी. माझ्या अडाणी आणि गावठी आईनेही जगाची फिकीर न करता स्वतःपासून सुरुवात करायला मला शिकवले होते. यामुळे नोआखालीत घेतलेली शपथ मी पाळायलाच पाहिजे.

मूळ हिंदीवरून,. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २३७-८

# ६७. प्रार्थना प्रवचन, जुलै १२, १९४७

नवी दिल्ली,

जुलै १२, १९४७

बंधुभगिनींनो,

आज माझ्या मित्राकडून मला एक पत्र मिळाले आहे. त्यात ते म्हणतात, "आज देशात जे काही घडते आहे ते फार वाईट आहे. सत्याग्रह आंदोलनात जे लोक तुरुंगात गेले त्यांना असे वाटते की आपण फार मोठे काम केले आहे व यामुळे आपल्याला प्रधानमंत्री, सांसदीय सचिव, एखाद्या प्रांताचे राज्यपाल असे पद प्राप्त व्हायला पाहिजे. आपल्याजवळ मोटरगाडी असावी असे त्यांना वाटते. मीसुद्धा दोनदा तुरुंगात गेलो होतो आणि एकदा तुमच्याबरोबर येरवडातही होतो. परंतु मी भिकारीच राहिलो आहे आणि कोणीही माझ्याबद्दल विचार करत नाही."

कोणी जर तुरुंगात गेला असेल तर त्याने भारतावर उपकार केले असे समजायचे काय? अशी मानसिकता जर राहिली तर कॉंग्रेसचा नाश होईल अशी मला भीती वाटते. जे लोक कॉंग्रेसमध्ये आहेत त्यांनी स्वप्नातही असा विचार करू नये. अशा प्रकारे युक्तिवाद करणारा कॉंग्रेसी कदाचित असेही म्हणेल की मी तुरुंगात गेलेलो असल्यामुळे माझ्या मुलाचे लग्न भारतातील सर्वात चांगल्या मुलीशी झाले पाहिजे वा माझ्या मुलीचे लग्न भारतातील सर्वात चांगल्या तरुणाशी झाले पाहिजे. जवाहरलाल तुरुंगात गेले म्हणून काही ते उपाध्यक्ष वा प्रधानमंत्री झालेले नाहीत. त्यांना जर त्यांचा पगार मिळाला नाही तरी ते उपाशी मरणार नाहीत. राजेंद्र बाबू पटणा येथील उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश झाले असते. परंतु त्यांनी स्वतः होऊन वकिली सोडली आणि फकिरीचे जीवन स्वीकारले. राजाजी तुरुंगात गेले म्हणून ते मंत्री झाले असे नाही. हे सर्व लोक देवदूत आहेत असे मला म्हणायचे नाही. हीही आपल्यासारखीच माणसे आहेत आणि प्रत्येक माणूस चुका करतच असतो. आणि आपल्यापैकी किती लोक सरकारी कार्यालयात सामावून घेतली जाऊ शकतील? हा विचारच मुळी चुकीचा आहे आणि आपण तो त्याज्य मानला पाहिजे. तुरुंगात गेलो म्हणून त्याचे आपल्याला काही पारितोषिक मिळाले पाहिजे असा विचारच आपण करायला नको. आपले स्वतःचे कर्तव्य पार पाडण्याचे पारितोषिक ते कर्तव्य पार पाडण्यातच असते.

लोक मला विचारत असतात की जिना पाकिस्तानचे महाराज्यपाल होऊ शकतात तर भारतात मात्र ब्रिटिश व्हाईसरायना भारताचे महाराज्यपाल का करण्यात येते? असे का? भारताचा

स्वातंत्र्यसंग्राम कॉंग्रेसतर्फे लढला गेला होता. त्यात मुस्लिम लीगचा कोणताही सहभाग नव्हता. जेव्हा केव्हा कॉ्ंग्रेसने सविनय कायदेभंगाचा वा सत्याग्रहाचा लढा सुरू केला तेव्हा तेव्हा लीगने सहकार्य करण्याचे नाकारले. असे असतानाही कॉंग्रेसला भारतीय महाराज्यपाल मिळू शकला नाही. हे न्याय्य नाही. ब्रिटिशांना शरण गेलो तरच आपण जिवंत राहू शकू नाही तर मरू असा याचा अर्थ होईल. १५ ऑगस्टला जी योजना अमलात येईल तिच्यात महाराज्यपाल इंग्रज, फ्रेंच वा डच असला वा तो करड्या रंगाचा भारतीय वा गोरा असला वा निग्रो असला तरी त्यामुळे काहीही फरक पडणार नाही. मी म्हणतो तसे होऊ शकले तर एखाद्या हरिजन मुलीला मी महाराज्यपाल करीन. अशा प्रकारे लॉर्ड मौउंटबॅटन जरी महाराज्यपाल झाले तरी ते भारताचे सेवक राहतील. तुम्ही म्हणाल की एखाद्या मुलाला समजावून सांगावे अशा प्रकारे तुम्ही आम्हाला समजावून सांगत आहात. माउंटबॅटन हे राजघराण्यातील सदस्य आहेत. ते कोणाचेही नोकर होऊ शकत नाहीत. परंतु मी तुम्हाला फसवू इच्छीत नाही. लॉर्ड मौऊंटबॅटनकडून मला कोणतेही पारितोषिक नको आहे. आतापर्यंत मी त्यांच्याशी झगडत होतो. तुम्ही कदाचित असे म्हणाल की कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना कदाचित त्यांनी फसवले असेल. तुम्हाला असे म्हणायचे आहे काय की जवाहरलाल आणि राजाजी इतक्या हलक्या डोक्याचे आहेत की त्यांना कोणीही फसवू शकतो? हे खरे आहे की मला जसे हवे होते तसे घडलेले नाही. परंतु माऊंटबटन महाराज्यपाल असतील तर ते आपल्याला हवे आहेत म्हणून. आपल्याला नको असेल तर ते त्या पदावर नसतील. परंतु मि. जिनांनी महाराज्यपाल होण्याचे ठरवले असेल तर त्यांना आपला मोठेपणा दाखवायचा होता म्हणून. त्याबद्दल आपल्याला हेवाही वाटायला नको आणि रागही यायला नको. इस्लाम काय आहे हे त्यांना जगाला दाखवून द्यायचे आहे. ते मालक होतात की सेवक हे आपण पाहू या. एकाही सिंधी माणसाला पाकिस्तानमधून पळून यावे लागेल तर त्याची जबाबदारी पाकिस्तानच्या महाराज्यपालांवर असेल. अबुबूकर अथवा उमर अथवा अली प्रमाणे त्यांना सर्वांशी न्यायाने वागावे लागेल. ते सर्व अहिंसक होते असे मी म्हणणार नाही. परंतु त्यांचे शौर्य आणि सौजन्य मला भावतात. वृत्तपत्रातून मला कळते की भारत आणि पाकिस्तानकरिता मुळात एकच महाराज्यपाल असावा. परंतु नंतर श्रीयुत जिनांनी आपला शब्द फिरवला. पाकिस्तानच्या महाराज्यपालपदावर जाण्यापासून त्यांना अडवू शकणारा त्या वेळी असा कोण होता? माझ्या मते त्यांनी योग्य केले नाही. एकदा कबूल केल्यानंतर त्यांनी लॉर्ड माऊंटबॅटन यांचे महाराज्यपद स्वीकारायला पाहिजे होते आणि नंतर माऊंटबॅटन यांनी काही चूक केली असती तर त्यांना ते पदमुक्त करू शकले असते. आता इस्लामची कसोटी जिनांच्या माध्यमातून लागणार आहे. संपूर्ण जगाच्या साक्षीने ते पाकिस्तानच्या महाराज्यपालपदी आरूढ होत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तान आपली कोणती खास वैशिष्ट्ये दाखवते याची जग वाट पाहत असेल.

कॉंग्रेस सतत ब्रिटिशांशी झगडत होती. जवाहरलाल साध्या मनाचे गृहस्थ आहेत. परंतु सरदार झुंजार आहेत. ब्रिटिशांवर मी विश्वास ठेवला म्हणून सरदार माझ्याशी भांडत असत. परंतु तेच जेव्हा ब्रिटिशांच्या जाळ्यात सापडले तेव्हा तुम्ही अथवा मी काय करण्याची अपेक्षा करू शकतो? त्यांनीच जेव्हा माऊंटबॅटन यांना भारताचे पहिले राज्यपाल होण्याला मान्यता दिली तर आपण आक्षेप घेण्याचे कारण काय? महाराज्यपाल म्हणून ते भारताची सेवा करतात की त्याचा विश्वासघात करतात ते आपण पाहू या. तो नवीन अनुभव असेल. यात चातुर्य आहे आणि आपण गमावण्यासारखे काहीही नाही. व्हाईसरायच्या सल्ल्यानुसार अखेरीस आपण उपनिवेशाच्या दर्जाला मान्यता दिली आहे. ते आरमारप्रमुख आणि महान योद्धा आहेत. आपण त्यांचा स्वीकार करू या आणि आपल्या अपेक्षेप्रमाणे त्यांनी काम केले नाही तर त्यांच्याशी संघर्ष करू या.

मी जेव्हा व्हाईसराय यांना भेटायला गेलो तेव्हा त्यांनी मला खाजगीत सांगितले की महाराणी एलिझाबेथ यांनी राज्यारोहणाकरिता नामित केलेले युवराज हे माझ्या मुलाप्रमाणे आहेत आणि तुम्ही त्यांना आशीर्वाद देणारे दोन शब्द लिहावे अशी त्यांनी अपेक्षा केली आहे. यामुळे व्हाईसराय यांची मुलगी (पामेला माऊंटबॅटन) दोन दिवसांपूर्वी मला भेटायला आली तेव्हा मी त्या जोडप्याचे अभिनंदन करणारे पत्र दिले. किती गोड मुलगी आहे ती! प्रार्थनेच्या वेळी मी तिला खुर्चीवर बसायला सांगितले परंतु तिने आमचे म्हणणे नाकारले व आमच्याप्रमाणेच तिने सतरंजीवर बसणे पसंत केले. आणि आज राजकुमारी अमृत कौरकडून मी ऐकले की या तरुण राजकुमारीचे लवकरच लग्न होणार असून इंग्लंडच्या राजाला मुलगा नसल्यामुळे लवकरच ती इंग्लंडची राणी होणार आहे. व्हाईसराय यांनासुद्धा मुलगा नाही. ते काहीही असले तरी व्हाईसराय जर वाईट गृहस्थ असते तर मी त्यांना इतक्या सहजपणे आशीर्वाद दिले नसते. ते वाईट गृहस्थ आहेत असे मी समजत नाही. त्यांच्या ठिकाणी जवाहरलाल वा सरदार पटेल जर महाराज्यपाल झाले असते तर ती धोक्याची गोष्ट झाली असती. याशिवाय महाराज्यपालाला काही विशेष अधिकारही नसतात. त्यांना जवाहरलाल आणि त्यांच्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्याप्रमाणे वागावे लागत असते. ते केवळ नाममात्र अधिकारी असतील.

लॉर्ड माऊंटबॅटन यांचे पद फार मोठे आहे आणि इंग्रज लोक केवळ दुष्टपणाच करू शकतात असा विचार करण्याची आपल्याला सवय लागलेली आहे. लॉर्ड माऊंटबॅटन यांना आपला प्रामाणिकपणा आणि न्यायप्रियता सिद्ध करावी लागेल आणि ते भारतात केवळ न्याय करण्याकरिताच आले आहेत याची मला खात्री आहे.

अनेक मुसलमान मला भेटायला येतात. तेसुद्धा पाकिस्तानमुळे दुःखी झालेले आहेत. ख्रिश्चन, पारसी आणि इतर मुसलमानेतर लोकांची भीती मी समजू शकतो परंतु मुसलमानांनी का घाबरावे?

आम्हाला फितुर समजण्यात येते असे त्यांचे म्हणणे आहे. पाकिस्तानमधील हिंदूंपेक्षाही आम्हाला अधिक वाईट वागणूक मिळेल की काय अशी भीती त्यांना वाटते आणि पाकिस्तानकडे संपूर्ण अधिकार हस्तांतरित झाल्यानंतर कॉंग्रेसशी असलेले आमचे संबंध शरियतच्या नियमाप्रमाणे अपराध गणले जातील असे त्यांना वाटते. इस्लामचा हा अर्थ आहे हे मला मान्य नाही. कॉंग्रेसमध्ये मुसलमान गेल्यामुळे त्यांनी कोणता अपराध केला असे म्हणता येईल? कॉंग्रेसशी जुळल्यामुळे मुसलमान गुन्हेगार होतात काय? ते कलमा म्हणत नसतात काय की नमाज पढत नसतात? अली बंधूंच्या काळापासून इस्लाममध्ये इतका बदल झाला आहे काय? राष्ट्रवादी मुसलमानांना फितुर कसे म्हणता येईल? मला आशा आहे की श्रीयुत जिना पाकिस्तानमधील मुसलमानेतरांचे संरक्षण करतील त्याचप्रमाणे या मुसलमानांचेही संरक्षण करतील

(हिंदीवरून). (प्रार्थना प्रवचन १ - पृष्ठ २३९-४३)

# ६८. प्रार्थना प्रवचन, जुलै १३, १९४७

नवी दिल्ली,

जुलै १३, १९४७

बंधूभगिनींनो,

प्रार्थना सभेला यायला आधीच दोनदा मी वेळ केला आहे. आज परत तसे घडले आहे. इथे सात वाजतापूर्वी पोहोचण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला होता, परंतु त्यात मला यश येऊ शकले नाही. मी व्हाईसराय यांना भेटायला गेलो होतो. इथे असाच वेळ घालवत असल्यामुळे मला काही तरी करावेसे वाटले. आणि इथे अनेक गोष्टी घडलेल्या आहेत व माझ्यासारख्या माणसाला त्यासंबंधी काही तरी बोलावे लागत असते. व्हाईसरायकडे गेलो असताना तिथून लवकरच सुटका होईल अशी माझी अपेक्षा होती.परंतु तिथे अनेक लोक होते आणि परिणामी मला तिथून निघायला वेळ झाला. ते काहीही असले तरी प्रार्थना वेळेवर सुरू झाली याचा मला आनंद वाटतो.

जिनांनी जी वार्ताहरपरिषद बोलावली होती. तिचा अहवाल मला मिळाला होता. पाकिस्तानमधील अल्पसंख्याकांना कोणताही त्रास होणार नाही असे आश्वासन तिथे त्यांनी दिले आहे. मुसलमानांसारखी समान वागणूक त्यांना दिली जाईल, हिंदूंना त्यांच्या देवळात जाण्याचे आणि शिखांना गुरुद्वारात जाण्याचे स्वातंत्र्य राहील असे आश्वासन त्यांनी दिले आहे.

अर्थातच कोणाच्याही शब्दाचा मी शब्दशः अर्थ घेऊ शकत नाही. आजसुद्धा पाकिस्तानमध्ये जाळपोळ आणि लूट सुरू आहे. असे भारतीय संघराज्यातही घडत आहे. असे कोण करते? ही गोष्ट केवळ मुसलमानच करतात की हिंदूसुद्धा त्यात सहभागी आहेत? सर्व प्रकारच्या पत्रांचा पूर माझ्याकडे येतो आहे. आम्ही शांततेत का राहू शकत नाही असे लोक विचारतात. तुमचे अभिवचन प्रत्यक्षात कधी येईल असे मी श्रीयुत जिनांना विचारू इच्छितो. १५ ऑगस्टनंतरच ते प्रत्यक्षात येणार आहे काय? सिंध पाकिस्तानचा भाग होणार आहे. मुस्लिम लीगचा तिथे सर्वाधिक प्रभाव आहे. श्री. जिना महाराज्यपाल झालेले आहेत. तरीही इंग्लंडमध्ये राजा आहे आणि जोपर्यंत तो आहे तोपर्यंत कोणत्या का प्रकाराने होईना महाराज्यपालाच्या माध्यमातून आपण त्यांच्याशी जुळलेलो आहोत व महाराज्यपालसुद्धा अजूनही महाराजांना जबाबदार आहेत. श्रीयुत जिना लीगचे अध्यक्षसुद्धा आहेत. यामुळे त्यांच्या शक्तीत व प्रभावात अजूनच वाढ झालेली आहे. त्यांनी न्यायाने वागले पाहिजे. सिंधमधून सिंधी लोकांनी पळ का काढावा? एक सिंधी जरी सिंधमधून पळून येत

असेल तर महाराज्यपाल म्हणून श्रीयुत जिनांकरिता ती गोष्ट लांछनास्पद असेल. माणसाच्या शब्दाचा पुरावा त्याची कृती असते.

उत्तर प्रदेशात काय घडले आणि काय घडले नाही ते मला माहीत नाही. परंतु उत्तर प्रदेशातील मुसलमान भीतीग्रस्त होऊन चालत आहेत. आपण तिथेच राहावे की नाही या संभ्रमात ते पडले आहेत. परंतु माझा प्रश्न आहे की त्यांनी तिथे का राहू नये? ज्याप्रमाणे मी उत्तर प्रदेश आणि बिहारला विचारतो त्याचप्रमाणे हाच प्रश्न मी श्रीयुत जिना यांना विचारतो - मुसलामान या प्रांतांमध्ये राहू शकतात की नाही?

अखेरीस आपण ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त झालो आहो. एक वेळ अशी होती की जेव्हा ते आपल्यामध्ये भांडणे लावत असत. आता ती वेळ निघून गेली आहे.

उत्तर प्रदेशातील सरकारी नोकरीतील प्रमाणाच्या संदर्भात मुसलमानांची तक्रार आहे. त्यांचे म्हणणे आहे की आतापर्यंत आम्हाला ६० आणि ७० टक्के सरकारी नोकऱ्या मिळत असत. आता त्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात केवळ १४ टक्के नोकऱ्या देण्यात याव्या असा प्रस्ताव आहे. मी या तक्रारीत सहभागी होऊ शकत नाही. इतके सर्व सांगून झाल्यानंतरही सरकारी नोकऱ्या किती लोकांना मिळू शकणार आहेत? त्यामुळे आपले कोणते कल्याण होणार आहे? शिवाय आपण सरकारी नोकरीत काम करतो ते जनसेवा करण्याकरिता, आपला स्वार्थ साधण्याकरिता नाही. आतापर्यंत जी पद्धत होती तीच पुढे सुरू ठेवणे उचित होणार नाही. डॉक्टर आणि वकील लोकांना लुबाडत असतील तर यापुढेही त्यांनी जनतेला लुबाडावे असे म्हणता येईल काय? समजा एखाद्याने मला विचारले की आतापर्यंत सरकारी नोकऱ्यांमध्ये आम्हाला जे प्रमाण होते तेच पुढे कायम राहील काय? तर त्यावर मी प्रतिप्रश्न विचारीन की ही टक्केवारी तुम्हाला कोणी दिली आणि कशी दिली? कॉंग्रेस सरकारच्या विरोधात झगडली आणि जे लोक कॉंग्रेसशी भांडू लागले त्यांना सरकारने लाच दिली. आता सरकार आपले असेल. मग हे सरकार कुणाला लाच का देईल? आता आपण अस्पृश्यता दूर करणे आवश्यक आहे. कायदा करून लोकांकरिता मंदिरे उघडण्याचे साहस सरकार करील काय? मद्रासमध्ये एकामागून एक देऊळ हरिजनांकरिता उघडले जात असताना मी पाहतो तेव्हा मला आनंद होतो. अशा प्रकारेच धर्माचे रक्षण करता येऊ शकते. हीच गोष्ट ख्रिश्चन आणि पारसी लोकांनाही लागू होते. जे लोक पददलित आहेत त्यांचा दर्जा उंचावण्याकरिता आपल्या सरकारने प्रयत्न केले पाहिजे. ते जर हरिजनांकरिता काही करील तर ब्राह्मणांनी तक्रार का करावी? हे खरे आहे की जर कोणी सुचवेल की ब्राह्मणांना मारझोड केली पाहिजे आणि त्यांना अपमानित केले पाहिजे तर मी म्हणेन, 'नाही, हे वाईट आहे'.

मुसलमानांच्या वतीने वा भारतीय संघराज्याच्या वतीने मी जर काही सांगू शकेन तर प्रत्येकाला न्याय मिळाला पाहिजे हेच सांगू शकेन. जर याची शाश्वती झाली तर अजून काही सांगायचे शिल्लक राहत नाही व फाळणीच्या वेदना विसरल्या जातील.

लोक म्हणतात की फाळणीचे काम संपले आहे, सैन्याची विभागणी झाली आहे, नौसेनेचे विभाजन झाले आहे. माझे म्हणणे आहे की आपण अजूनच दुबळे झालो आहो. भारताजवळ नौसेना नाही असे विदेशी लोक म्हणतील. ते स्वतःच्या स्वार्थाकरिता दोन उपनिवेशांपैकी एकाशी तडजोड करतील आणि अशा प्रकारे सैन्याच्या विभाजनामुळे गृहयुद्ध होईल. परंतु मला आशा आहे की भारत आणि पाकिस्तान मित्र असतील आणि आपल्या अल्पसंख्याकांशी ते न्यायाने वागतील.

आपण जरी अजून अहिंसेचा पाठ शिकलो नसलो तरी आपल्या तीस वर्षांच्या अनुभवावरून हिंसक वा अहिंसक पद्धतीने आपण परत कधीही गुलामगिरीत पडणार नाही हा पाठ नक्कीच शिकलो असू. असे आपण केवळ अहिंसक पद्धतीनेच केले पाहिजे असे माझे म्हणणे नाही. मी बिहारमध्ये होतो तेव्हापासून मी हे सांगतो आहे. लोक बंदुका आणि तलवारीची मागणी करतात. मी विचारतो आपल्याला शस्त्रं कशाला हवी आहेत? आम्ही कधीही शरण जाणार नाही असे घोषित करा. नोआखालीत मी हेच सांगितले होते. तीस वर्षांच्या अनुभवानंतर आपण जर काही धडा शिकलो आहोत हे आपण दाखवू शकलो तर लोक हिंसक आहेत की अहिंसक यामुळे काहीही फरक पडणार नाही. ते जर माझ्याकडे आले आणि त्यांनी विचारले तर मी अजूनही म्हणेन की त्यांनी अहिंसक मार्गच अवलंबिला पाहिजे. संपूर्ण जगाचा सामना एकाच व्यक्तीला करायचा असेल तर ती तसे केवळ अहिंसेच्या मार्गानेच करू शकतो. जिथे अहिंसा असते तिथे ईश्वर असतो. त्याच्यासमोर तलवारीचेसुद्धा तुकडे होतात.

(हिंदीवरून). (प्रार्थना प्रवचन -१ पृष्ठ २४३-४६)

# ६९. प्रार्थना प्रवचन, जुलै १४, १९४७

नवी दिल्ली,

जुलै १४, १९४७

बंधू आणि भगिनींनो,

असे म्हणतात की आजकालच्या माझ्या भाषणातून निराशावादाची भावना व्यक्त होते. यामुळे मी मुळीच बोलू नये अशा सल्ला काही लोकांनी मला दिला आहे. यावरून मला एका चित्रकाराची गोष्ट आठवली. त्याने आपले चित्र प्रदर्शनाकरिता ठेवले आणि त्या चित्रात कुठे दोष दिसेल तिथे दर्शकानी खूण करावी असे लिहिले. परिणामी ते चित्र विविध रंगांच्या खाणाखुणांनी पूर्णपणे भरले. प्रत्येकाला खुश करता येत नाही हे दाखवून देण्याची चित्रकाराची इच्छा होती आणि आपण एक सुंदर चित्र रेखाटले अशी त्याची भावना होती. मीसुद्धा अशाच परिस्थितीत आहे. मी केवळ बोलण्याकरिता कधीही बोलत नसतो. मी बोलतो कारण मला तुम्हाला काही संदेश द्यायचा आहे असे मला वाटते.

हे खरे आहे की आज माझ्यात आणि माझ्या जवळच्या सहकाऱ्यांत मतभेद आहेत. त्यांनी ज्या काही गोष्टी केल्या वा ते ज्या गोष्टी करत आहेत त्या मला पसंत नाही. परंतु दिल्लीत असूनही सद्यस्थितीवरील माझे मत व्यक्त न करणे मला शक्य नाही. या मतभेदांच्या मुळाशी काय आहे? तुम्ही जर त्याच्या मुळाशी गेलात तर तुम्हाला आढळून येईल की त्याच्या मुळाशी एकच गोष्ट आहे. माझ्याकरिता अहिंसा धर्म आहे तर कॉंग्रेसकरिता तो धर्म कधीही नव्हता. कॉंग्रेसने अहिसेचा स्वीकार केवळ धोरण म्हणून केला होता. धोरणानुसार जोपर्यंत आचरण केले जाते तोवरच धोरणाला धर्माची प्रतिष्ठा मिळते. कॉंग्रेसला ज्या क्षणी आपले धोरण अनुसरण्यायोग्य नाही असे वाटेल त्या क्षणी तिला ते धोरण बदलवण्याचा पूर्ण अधिकार असेल. परंतु धर्माची गोष्ट वेगळी असते. तो सदैव कायम असतो व त्यात बदल करता येत नाही.

कॉंग्रेसच्या घटनेत अहिंसा हे अजूनही धोरण आहे परंतु कॉंग्रेसच्या लोकांनी आचरणात बदल केला आहे. विधिज्ञ त्यावर भाष्य करू शकतील, तुम्ही आणि मी असे करू शकत नाही आणि करायलाही नको. कॉंग्रेसच्या लोकांनी त्यांचे धोरण का बदलू नये? याशिवाय कॉंग्रेसची घटना 'अहिंसा'ऐवजी 'शांततापूर्ण' म्हणते.

१९३४ साली मुंबई कॉंग्रेसच्या वेळी 'शांततापूर्ण'च्या ठिकाणी 'अहिंसा' हा शब्द टाकायला लावण्याचा माझ्याकडून मी भरपूर प्रयत्न केला. परंतु मला यश आले नाही. यामुळे 'शांततापूर्ण' 'अहिसेपेक्षा' काही तरी कमी आहे असे कोणीही म्हणू शकतो. माझ्या मते या दोन शब्दांत कोणताही फरक नाही. परंतु माझे मत ना इकडून आहे ना तिकडून. या बाबतीत तज्ज्ञांनी निर्णय घेतला पाहिजे. तुम्ही आणि मी केवळ इतकेच लक्षात घेतले पाहिजे की आज कॉंग्रेसचे वर्तन किमान अहिंसक आहे. कॉंग्रेसचा अहिंसा हा जर धर्म असता तर मग आज ती सैन्याला जसा पाठिंबा देत आहे तसा कसा देऊ शकली असती? सैन्याकडे आपला इतका कल असला तर ते लोकांना चिरडून टाकून सैनिकी शासन प्रस्थापित करील. लोक कधीतरी माझे ऐकतील ही आशा मी सोडून द्यायला पाहिजे काय? आणि जर ते माझे ऐकणार नसतील आणि तरीही मी बोललो तर त्यामुळे कोणती हानी होणार आहे? त्यांनी मला अडवण्याचा प्रयत्न का करावा?

मी वारंवार सांगितले आहे की गत ३० वर्षांपासून सुरू असलेला संघर्ष हा अहिंसक संघर्ष नव्हता. तो शांततामय प्रतिकार होता आणि अशा प्रकारचा प्रतिकार हा दुबळ्यांचा असतो. असे नाही की जे लोक हे शस्त्र वापरतात त्यांना अहिंसेचे शस्त्र वापरण्याची इच्छा नसते. एवढेच की हे शस्त्र कसे वापरावे याचे त्यांना ज्ञान नसते. आपल्यात जर अहिसंक लढ्याकरिता धैर्य असेल तर आपण जगासमोर स्वतंत्र भारताचे अगदी वेगळे चित्र मांडू. परंतु आज आपण भाऊभाऊ आपसात भांडत असलेला, एकमेकांवर विश्वास नसलेला खंडविखंडीत देशच दाखवू शकतो. आपल्यात लोकांना खाऊपिऊ घालण्याचे व वस्त्रप्रावरण देण्याचे सामर्थ्य नाही. ज्यांना ईश्वर केवळ भाकरीच्या स्वरूपातच दिसू शकतो आणि ज्यांना सतत सुरू असलेल्या हिंसेत काहीही रस नाही अशा गरीबीत रखडत असलेल्या कोट्यवधी लोकांना देण्यासारखे आपल्याजवळ काहीही नाही.

प्रार्थना प्रवचन- १ पृष्ठ २४६-४८

# ७०. प्रार्थना प्रवचन, जुलै १५, १९४७

नवी दिल्ली,

जुलै १५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

या आधी मी तामिळनाडू आणि मलबारमधील देवळांसंबंधी बोललो होतो. ती देवळे हरिजनांकरिता उघडी करण्यात आली आहेत व यात मी रामेश्वरम येथील मंदिराचाही उल्लेख करीन. ते प्रचंड देऊळ आहे व त्यासंबंधात अनेक अंधश्रद्धा आहेत. हरिजनांच्या प्रवेशामुळे मंदिर विटाळेल असे काहींना वाटत होते. आज मला एक पत्र मिळाले आणि त्यात आंध्र देशातील तिरुपती मंदिराचा, जे फार मोठे आणि प्राचिन मंदिर आहे, उल्लेख मी केला नाही म्हणून तक्रार करण्यात आली होती. मी ही चूक दुरुस्त करावी आणि आंध्र देशातील लोकांचे समाधान करावे असे पत्र लेखकाचे म्हणणे आहे. या देवळाचे महात्म्य मला माहीत आहे परंतु मी तामिळनाडू आणि आंध्रमध्ये अंतर करत नाही. आज असे काही वातावरण झाले आहे की प्रत्येकाला वेगळेपण हवे आहे.

बंगालमधील काही मित्र मला भेटणार आहेत. त्यांचे म्हणणे आहे की बंगालची फाळणी झाल्यामुळे पश्चिम बंगालमधील हिंदू आपल्याला विसरतील अशी पूर्व बंगालमधील हिंदूंना भिती वाटत आहे. असे जर घडले तर मला वेदना होतील. हिंदू जर हिंदूंना आणि मुसलमान मुसलमानांना विसरत असतील तर ती फार वाईट गोष्ट असेल. हिंदू, मुसलमान, पारसी, ख्रिश्चन हे सर्व भारतीय आहेत. धर्म ही खाजगी बाब आहे. मला जर ईश्वराची भक्ती करायची असेल तर जगातील कोणती शक्ती मला तसे करण्यापासून अडवू शकते? परंतु जर मुसलमान, पारसी, हिंदू आणि ख्रिश्चन हे सर्व स्वतःला वेगवेगळे समजत असतील तर भारताचे काय राहील? मला मान्य आहे की बंगालची फाळणी करणे क्वचितच आवश्यक होते. मी बंगाली मुसलमानांमध्ये राहिलो आहे. त्यांच्याबरोबर नोआखालीत मी चाललो आहे. त्यांच्या अंतःकरणात मला केवळ प्रेम आढळले. हिंदूंनी मुसलमानांची भीती का बाळगावी? ज्या वेडाने त्यांना घेरले आहे ते कायम राहणारे नाही. माझ्या मते पूर्व बंगालमधील हिंदूंना कोणतीही हानी सहन करावी लागणार नाही. परंतु अशा अनेक गोष्टी घडल्या आहेत की ज्या घडाव्या अशी आपली इच्छा नव्हती. बंगालची फाळणी झाली आहे आणि भारत व पाकिस्तान हे वेगवेगळे देश आहेत. परंतु जे काही घडले आहे त्यापासून आपण पुढे जायचे आहे आणि नंतर ते बरोबर करायचे आहे. पूर्व आणि पश्चिम बंगालचे हिंदू आणि मुसलमान हे

नेहमीच बरोबर राहिलेले आहेत आणि ते एकच भाषा बोलतात. पूर्व बंगालचे हिंदू जरी मुसलमानांशी मैत्रीभावाने वागले तरी मुसलमानांना त्यांना मारायची इच्छा होईल काय? जेव्हा हिंदू एकाही मुसलमानाला आपला शत्रू समजणार नाहीत तेव्हा सर्व मित्र होतील.

बंगाल कॉंग्रेस कमेटीचेही विभाजन झालेले असल्यामुळे तिचे विलिनीकरण करण्यात येईल काय असेही मला विचारतात. माझ्या मते बंगालच्या फाळणीचा परिणाम बंगाल प्रांतीय कॉंग्रेस समितीवर होत नाही. तिने सध्याच्या स्वरूपातच काम सुरू ठेवावे. ती सरकारी नियमा ा ंच्या बाहेर आहे. जर तिने स्वतःहोऊन स्वतःचे विभाजन केले तर पश्चिम बंगालने विश्वासघात केला असे मी म्हणेन. कॉंग्रेसची आजची घडण अशी आहे की तिच्या तळाशी ग्राम कॉंग्रेस समित्या आहेत, नंतर मंडळ कॉंग्रेस समित्या, जिल्हा कॉंग्रेस समित्या आणि नंतर प्रांतीय कॉंग्रेस समिती व सर्वांत वर अखिल भारतीय कॉंग्रेस समिती आहे. अशा प्रकारे पूर्व बंगाल आणि पश्चिम बंगालमध्ये कॉंग्रेस कमेटी असेल. या दोन्ही कमेट्या बंगाल प्रदेश क्ंग्रेस कमेटी म्हणून कांम करतील. मुसलमान, ख्रिश्चन, पारसी इत्यादी सर्वांची कॉंग्रेस आहे. येत्या काही दिवसात ती आपले स्वरूप बदलवणार नाही. पश्चिम बंगालमधून मंत्री आयात करावे लागावे इतका पूर्व बंगाल गरीब झाला आहे की काय याचे बंगाली मित्रांनासुद्धा आश्चर्य वाटते. परंतु त्यांनी याचे स्वागत केले पाहिजे. कारण यामुळे पूर्व बंगाल आणि पश्चिम बंगालमध्ये मिलाफ होऊ शकेल. यात काही संशय नाही की पूर्व बंगालमध्ये मुसलमानांचे भरपूर बहुमत आहे. परंतु सगळे मुसलमान वाईट असतात असे आपण का गृहीत धरावे? बिहारमध्ये किती तरी मुसलमानांची कत्तल झाली होती आणि तरीही बिहारमधील लक्षावधी हिंदू वाईट नाहीत असे मी म्हणू शकतो. काही थोड्याश्या लोकांच्या दोषाकरिता संपूर्ण समाजाला दोष देणे योग्य नाही. यावरूनच इतकेच दिसून येते आपण स्वतःच शुद्ध नाही, आपण भित्रे आहोत, आपल्यात अहिंसेचे साहस नाही कारण अहिंसेचे साहस म्हणजे मरण्याचे साहस, कधीही नाही इतके जगात प्रचंड सैन्य आहेत परंतु जगाची लोकसंख्या पाहता ते मोजकेच आहे. परंतु सरळ पाहताच येऊ नये अशा मार्गाने आपण चालू लागलो आहोत. जेव्हा केव्हा कुठे तरी काही तरी घडते तेव्हा लगेच सैन्य पाठवावे अशी आपण मागणी करतो. नोआखाली, बिहार, पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांत यांत जिथे कुठे दंगली झाल्या तिथे एकच मागणी होती व ती म्हणजे आमच्या रक्षणाकरिता सैन्य पाठवा ही. जे लोक शूर आहेत त्यांना सैन्याची गरज का वाटावी?

(हिंदीवरून). (प्रार्थना प्रवचन - २४९-५१)

# ७१. प्रार्थना प्रवचन, जुलै १६, १९४७

नवी दिल्ली,

जुलै १६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

जे भजन आज तुम्ही म्हणालात ते मी अगदी माध्यमिक शाळेत जाणारा मुलगा असल्यापासून मला माहीत होते. लहान मुलांकरिता बालमित्र नावाचे जे पुस्तक होते त्यात हे भजन होते. हे भजन चांगले आणि गोड आहे आणि आपण शरिराची फार फिकीर करू नये असे ते शिकवते. शरीर आज आहे आणि उद्या जाईल. एक तर ते जाळले जाईल आणि त्याची राख होईल नाही तर ते थडग्यात जाईल आणि मातीत मिसळेल. जर ते पाण्यात फेकण्यात आले तर जलचर प्राणी त्याला खातील. अखेरीस सर्व सारखे आहे. "महापूरानंतर" हे भजनामधील शब्द मात्र तितकेसे चांगले वाटत नाहीत. हे खरे आहे की हे भजन कबिरांनी लिहिले आहे परंतु म्हणून काय झाले? मला ते आवडले नाही. माझ्या नम्र मताप्रमाणे यातून स्वार्थीपणा दिसतो. मी मेल्यानंतर महापुराने जग का व्यापले जावे? पहिली गोष्ट म्हणजे आपण खरोखरी मरत नाही कारण आत्मा अमर आहे. जगाबद्दल बोलायचे तर ते सतत बदलत असते. तो ईश्वरी खेळ आहे. परंतु भजनात सांगितल्याप्रमाणे आपला संपूर्ण नाश होत नाही. तसे झाले असते तर घटना समितीची काय गरज होती? आपले नेते जे कायदे मंजूर करण्याकरिता सारखे प्रयत्न करत आहेत त्यांची काय गरज होती? त्या सर्वांनी माझ्यानंतर महापूर येवो अशी भूमिका घेतली असती तर कोणीही कोणाकरिता काहीही केले नसते. यामुळे ही अभिव्यक्ती पराकोटीच्या स्वार्थीपणाची आहे.

वृत्तपत्राचे काही लोक मला भेटायला येणार आहेत बोलण्याच्या ओघात द्रविडस्तानचा उल्लेख झाला. द्रविडस्तानात विंध्यच्या खालचा प्रदेश येतो. तिथे बोलल्या जाणाऱ्या भाषा तमील, तेलगू, मल्याळम आणि कन्नड आहेत. या प्रत्येक भाषेशी मी थोडाफार परिचित आहे आणि या सर्वांची मुळे संस्कृतमध्ये आहेत हे मी सांगू शकतो. तुम्ही जर तेलगू बोलत असताना ऐकलं तर तुम्हाला त्यात भरपूर संस्कृत शब्द आढळतील. तमिळमध्येही किती तरी संस्कृत शब्द आहेत. केवळ त्यांना द्रविडी रूप देण्यात आले आहे. मल्याळमचेसुद्धा संस्कृतशी साम्य आहे आणि हीच गोष्ट कन्नडलाही लागू होते. द्रविडस्तानला मी भारतापासून वेगळे मानत नाही. ब्रिटिशांनी आपल्या

सगळ्यांना एक केले. काश्मीर आणि कन्याकुमारीच्या मध्ये राहणारा प्रत्येकजण भारतीय आहे. आर्य वा अनार्य असा भेद करणे वा आर्यावर्त आणि द्रविडस्तान असा भेद करणे मुर्खपणाचे आहे.

माझी याबद्दल खात्री आहे. यातून भाषिक प्रश्न निर्माण होतात. आपल्याकडे इथे दोन भाषा आहेत - हिंदी आणि उर्दू. या भाषा भारतीयांनी भारतात विकसित केल्या. त्यांचे व्याकरण समान आहे. या दोन भाषा एकत्रित करून मी हिंदुस्तानी तयार केली. ही भाषा अनेक कोटी लोक बोलतात. हिंदू आणि मुसलमानांची ही संपर्क भाषा आहे. तुम्ही जर संस्कृतप्रचूर हिंदी बोललात वा प्रा. अब्दुल बारीप्रमाणे अरेबिक आणि फारसी प्रचूर उर्दू बोललात तर फार कमी लोकांना तुमचे बोलणे समजेल. याचा अर्थ असा आहे काय की आपण द्रविडस्तानच्या चार भाषांकडे दुर्लक्ष करावे? माझ्या मनात ही गोष्ट नाही. मला वाटते की प्रत्येक प्रांताने आपल्या अंतर्गत व्यवहाराकरिता स्वतःच्या भाषेचा उपयोग करावा परंतु राष्ट्रीय भाषा म्हणून हिंदुस्तानीचा अभ्यास केला पाहिजे. प्रत्येक प्रांताला त्याची स्वतःची भाषा आहे. ओरिया, बंगाली, सिंधी, पंजाबी, गुजराती, मराठी. या सर्व भाषा हिंदुस्तानीपासून वेगळ्या आहेत. आपण या सर्व भाषा शिकलो पाहिजे की इंग्रजी राष्ट्रभाषा म्हणून मान्य केली पाहिजे? मी जर तुमच्याशी इंग्रजीत बोलू लागलो तर तुमच्यापैकी फार कमी लोकांना मी काय बोलतो तो कळेल. आपण इंग्रजीचा ८ ते १० वर्षे जरी भरपूर अभ्यास केला तरी आपल्याला इंग्रजीचे अल्पज्ञान होईल.. यामुळे इंग्रजी आपली राष्ट्रभाषा होऊ शकत नाही. देशाला वेडाकडे ढकलण्याकरिता इतके पुरे आहे. इंग्रजी आंतरराष्ट्रीय संपर्काची भाषा होऊ शकते. ती व्यापाराचीही भाषा होऊ शकते परंतु त्याकरितासुद्धा तिला अजून तरी पुरेशी आंतरराष्ट्रीय मान्यता मिळालेली नाही. भारताची राष्ट्रभाषा हिंदुस्तानीशिवाय इतर कोणतीही होऊ शकत नाही. प्रांतीय भाषा राहिल्याच पाहिजे हे खरे असले तरी देशातील जास्तीत जास्त लोक हिंदुस्तानी बोलतात. मी हिंदी साहित्य संमेलनाशी जुळलेलो आहे. तिथे वापरली जाणारी भाषा जशी समजायला सोपी नाही तशीच शुद्ध उर्दूही सहजी समजू शकत नाही. बहुजन समाजाची भाषा हिदुस्तानी आहे. आपल्याला हवे तितके साहित्य आपण तिच्यात निर्माण करू शकतो. आपल्या स्वतःच्या भाषेबरोबरच द्रविडस्तानच्या लोकांनी हिंदुस्तानी शिकायला पाहिजे. ते त्यांचे कर्तव्य आहे. जर ते हिंदुस्तानी देवनागरी आणि फारसी लिपीत वाचू शकले तर अजूनच बरे होईल. अशा प्रकारे त्यांना दोन्ही भाषांचे ज्ञान होऊ शकेल. परंतु आपले म्हणणे इतरांना समजावे म्हणून जर त्यांना केवळ हिंदुस्तानी शिकायची असेल तर ते ती आपापल्या लिपीच्या माध्यमातूनही शिकू शकतात. हिंदुस्तानी प्रचार सभा मद्रासमध्ये लोकांना हिंदुस्तानी त्यांच्या लिपीतून शिकवायचे काम करते.

(पुढील परिच्छेद हिंदुस्तान टाईम्समधून घेतलेला आहे.)

*गांधीजींनी मोकळेपणाने मान्य केले की दक्षिणेकडील लोकांकरिता हिंदुस्तानी शिकणे चूक असेल तर उत्तरेकडील लोकांकरिताही उत्कृष्ट साहित्याने भरलेल्या दक्षिणेकडील भाषेतील अजून एक भाषा शिकणे चूक असेल. त्यांनी विनंती केली की भारतीय श्रोते जिथे आहेत तिथे इंग्रजी भाषणाकरिता आग्रह धरण्यात येऊ नये. ते म्हणाले की तुम्ही लवकरच हिंदुस्तानी शिकू शकता. पुढे जाऊन ते म्हणाले की भारत तेव्हाच स्वतंत्र राष्ट्र राहू शकेल जेव्हा तुमचे सरकार नैतिक सरकार असेल. गुलामगिरीच्या विरोधात संघर्ष करणारी कॉंग्रेसची यंत्रणा नैतिक शक्तीनेच बांधलेली होती. पाकिस्तानचा प्रश्न आपण नुकताच सोडवला आणि आपल्यासमोर द्रविडस्तानचा प्रश्न येऊन उभा राहिला हे दुर्दैव आहे. जर ही प्रवृत्ती कायम राहिली तर भारत कुठे असेल? गुलामगिरीत असताना आपण एक होतो आणि स्वातंत्र्य मिळताक्षणीच आपण देशाचे तुकडे करायला सुरुवात करतो आहोत हा दैवदुर्विलास नाही काय?*

(हिंदीवरून), (प्रार्थना प्रवचन-१, पृष्ठ २५१-४ आणि हिंदुस्तान टाईम्स, १७-७-१९४७

# ७२. प्रार्थना प्रवचन, जुलै १७, १९४७

नवी दिल्ली,

जुलै १७, १९४७

बंधूनो आणि भगिनींनो,

दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांशी गुंडगिरीचे वर्तन केले जाते असे आपण वृत्तपत्रातून (जुलै१८-१९४७च्या हिंदुस्तान टाईम्सप्रमाणे भारतीयांच्या विरोधात सुरू करण्यात आलेले आंदोन भारतीय व्यापाऱ्यांवर युरोपीय समाजाने टाकलेल्या बहिष्काराच्या स्वरूपाचे होते व ते हिंसेच्या धमक्या देत होते.) वाचतो. त्यांना मारून टाकले जाते. मी दक्षिण आफ्रिकेत २० वर्षे होतो आणि त्या देशात भारतीयांना कशी वागणूक मिळते ते मला माहीत आहे. तिथे भरपूर मुसलमान आहेत परंतु ते स्वतःला भारतीय म्हणवतात. आपण जेव्हा विदेशात असतो तेव्हा ईश्वर आपल्याला भारतीय म्हणवून घेण्याची सद्बुद्धी देतो.

दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांचे प्रकरण जागतीक संस्थेसमोर मांडण्याकरिता इतक्यातच न्यायमूर्ती छागला आणि इतरांबरोबर सरूप (विजयालक्ष्मी पंडित, ऑक्टोबर नोव्हेंबर १९४६मध्ये त्यांनी संयुक्त राष्टसंघात गेलेल्या प्रतिनिधीमंडळाचे नेतृत्व केले होते.) संयुक्त राष्ट्रसंघात गेली होती. तोपर्यंत दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या छळाने नवीन रूप घेतले होते. त्यांच्याविरोधात कायदे करून आता त्यांचा छळ करण्यात येत नाही तर गुंडगिरीने त्यांचा छळ केला जातो. असे जर सुरू राहिले तर तिथे असलेल्या थोड्याशा भारतीयांना तिथे कसे राहता येईल? एकदा मी ट्रान्सवालमध्ये दोन हजार लोकांना घेऊन कूच करत गेलो होतो. त्यावेळी एकाही बोअर माणसाने आम्हाला स्पर्शसुद्धा केला नाही. त्यांच्यापैकी काहींनी आम्हाला पिण्याकरिता पाणी दिले. आपल्याकडे इथे भरपूर पाणी आहे. परंतु तिथे ते भरपूर नाही. पाऊस पडतो तेव्हा लोक पाणी गोळा करतात आणि टाक्यात जमा करून ठेवतात. बोअरांचे वागणे मैत्रीपूर्ण होते आणि आमची इच्छा असेल तिथे आम्ही जाऊ शकत होतो. परंतु आज मला वेगळेच चित्र दिसते. आता आपल्याकरिता इथे दोन सरकार असल्यामुळे श्रीयुत जिना आणि जवाहरलाल या दोघांनी मिळून स्मट्स यांना तार पाठवायला मी सांगेन. श्रीयुत स्मट्स (जान ख्रिश्चन स्मट्स- १८७० ते १९५०, दक्षिण आफ्रिका संघराज्याचे पंतप्रधान १९१९ ते २४ आणि १९३८ ते ४८) मला आपला मित्र समजतात. गोऱ्यांनी एका भारतीयालासुद्धा शारीरिक इजा पोहचवू नये अशी एक मित्र म्हणून मी त्यांना विनंती करू शकतो.

आणि ते जर असे करू शकत नसतील तर त्यांनी राजीनामा दिला पाहिजे. लॉर्ड माऊंटबॅटन यांनीसुद्धा असहायपणे पाहत बसू नये. ते आरमाराचे अॅडमिरल आहेत आणि राजघराण्यातील आहेत. राजकुमारी एलिझाबेथ यांच्याशी ज्या फिलिप मौऊंटबॅटन यांचा विवाह होणार आहे ते यांच्या पुत्रासारखे आहेत. याशिवाय १५ ऑगस्टपर्यंत ते व्हाईसराय असतील आणि नंतर महाराज्यपाल असतील. यामुळे त्यांनी आपल्या पदाचा लाभ घेऊन स्मट्सला सांगायला पाहिजे की भारत आता दक्षिण आफ्रिकेप्रमाणेच उपनिवेश आहे. याचाय अर्थ तो एका महान कुटुंबाचा म्हणजे ब्रिटिश राष्ट्रकुटुंबाचा भाग आहे आणि यामुळे दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना देण्यात येणारी वाईट वागणूक ताबडतोब थांबवण्यात यावी.

असे म्हणतात की उपनिवेशाचा दर्जा हा संपूर्णस्वातंत्र्यापेक्षाही चांगला आहे. परंतु जोपर्यंत या फाळाची चव मी घेत नाही तोपर्यंत ते अमृत आहे की विष हे मी सांगू शकत नाही. शक्य आहे की ते अमृतही असेल. परंतु आधी आपण त्याची चव घेऊ या.

दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांनी उत्तम नागरिकाप्रमाणे राहावे असा माझा त्यांना सल्ला आहे. त्यांच्यातील जे श्रीमंत आहेत त्यांनी तिथे अस्पृश्याप्रमाणे असलेल्या आपल्या मुसलमान भावंडांकडे दुर्लक्ष करू नये.

तामिलनाड आणि आंध्रमधील देवळे हरिजनांकरिता उघडली गेली असल्यामुळे आता उत्तरप्रदेशातील परिस्थिती काय आहे? उदाहरणार्थ हरिद्वारमध्येही देवळे आहेत. हरिजन त्या मंदिरात जाऊ शकतात काय? त्रावणकोरमध्ये ही गोष्ट कधीचीच साध्य करण्यात आली. त्रावणकोर संस्थानाचे दिवाण सर सी. पी. रामस्वामी ऐय्यर हे आजकाल आपल्याशी थोडे नाराज आहेत. त्यांनीच महाराजांना समजावून संस्थानातील अस्पृश्यता कायद्याने रद्द करायला लावली. उत्तर प्रदेशात हरिद्वारशिवाय काशीही आहे. तेथील मंदिरात हरिजन जाऊ शकतात काय? हरजनानांना जर त्या मंदिरात प्रवेश नसेल तर ती मंदिरे अपवित्र आहेत असे मी समजेन. जगातील प्रत्येक धर्माला कठोर सत्त्वपरीक्षेतून जावे लागत आहे. हिंदू धर्म ९९ टक्के गुणांमध्ये नाही तर १०० टक्के गुणांमध्ये असायला पाहिजे.

(हिंदीवरून), प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २५५-७

# ७३. प्रार्थना प्रवचन, जुलै १८, १९४७

नवी दिल्ली,
जुलै १८, १९४७

(हा परिच्छेद हिंदुस्तान टाईम्समधला आहे.)

***त्या दिवशी जे भजन म्हणण्यात आले होते त्या भजनाकडे लक्ष वेधत गांधीजींनी आपले भाषण सुरू केले आणि म्हणाले की हे भजन मिराचे आहे की काय ते मला माहीत नाही. मिराच्या नेहमीच्या चालीपेक्षा या भजनाची चाल वेगळी आहे. यात व्यक्त झालेल्या भावना मात्र निःसंशय तिच्याच आहेत. केवळ ईश्वरच माणसाला अडचणीतून तारू शकतो असे त्यात म्हटलेले आहे. आज भारत अडचणीतून जात आहे. या अडचणीतून सुटका होण्याकरिता त्याने माणसाकडे पाहिले पाहिजे की ईश्वराकडे? तुमचा जर भजनावर विश्वास असेल तर तुम्ही देवाकडे पाहिले पाहिजे आणि इतर कुणाकडेही नाही आणि तुम्ही पूर्णपणे सुरक्षित राहाल.***

आताच आपण जे भजन म्हणालो ते अगदी मुद्द्यावर आहे कारण आपण आज फार मोठ्या अडचणीत आहो. आपल्याजवळ खाण्याकरिता धान्य नाही आणि अंगावर घालायला कपडे नाहीत. आपण कुणाकडे मदतीकरिता जायचे? जवाहरलाल नेहरूकडे? की सरदार पटेलकडे? कारण आज ते सत्ताधारी झाले आहेत म्हणून? व्हाईसरायनी सत्ता सोडली आहे वा इतक्यातच ते सत्तात्याग करणार आहेत. आता ते महाराज्यपाल असतील कारण या पदाकरिता आपण त्यांना निवडले आहे. आधी महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची निवड लंडनहून व्हायची. परंतु आता स्वातंत्र्याचा कायदा मंजूर झाला आहे आणि त्याकरिता राजाची सहमतीसुद्धा मिळवण्यात आली आहे.

(हा परिच्छेद हिंदुस्तान टाईम्समधला आहे.)

***या विधेयकाप्रमाणे यापुढे महाराज्यपालाची नियुक्ती तुम्ही म्हणजे भारतीय जनता करील व ते भारतावर लादले जाणार नाहीत. यामुळे लॉर्ड मौऊंटबॅटन भारताचे महाराज्यपाल असतील. तुम्ही एखाद्या चपराश्याची निवड करता तशीच त्यांचीही निवड कराल असे मी त्यांची अप्रतिष्ठा करण्याकरिता म्हणत नाही. भारतीयांनी भारतीय संघराज्याचा सेवक म्हणून लॉर्ड मौऊंटबॅटन यांची निवड करून एकप्रकारे मौऊंटबॅटन यांचा गौरवच केला आहे. हे सांगणे आवश्यक होते कारण अनेकांच्या मनामध्ये अजूनही संशय घोटाळतो आहे.***

आता सगळी सत्ता आपल्या लोकांच्या हातात आहे. परंतु हे भजन सांगते की जेव्हा आपण अतिशय निराश असतो तेव्हा आपण इतरत्र कुठेही न जाता ईश्वराकडे जातो. तो एकटाच आपल्याला मदत करू शकतो. आपण जर आपल्या हृदयात ईश्वराला ठेवून गेलो तर आपले काम फळफळेल, अन्यथा नाही. तो जगाचा शास्ता आहे आणि त्याला शरण जाण्यातच आपले कल्याण आहे.

दिल्लीहून प्रकाशित होणारे डॉन नावाचे एक वृत्तपत्र आहे. दररोज त्यात शिवीगाळ असते. मलासुद्धा त्यात शिवीगाळ करण्यात आलेली असते. सामान्यपणे मी ते हसण्यावारी नेतो. परंतु प्रकाशकाने मला उद्देशून एक जाहीर पत्र प्रकाशित केले. त्याची वाक्यरचना चांगली आहे. श्रीयुत जिना यांची लवकरच परीक्षा होणार आहे असे मी सारखा ओरडत असतो. ही आरडाओरड मी बंद केली पाहिजे असे त्यात लिहिले आहे.

जी कराची पाकीस्तानची राजधानी होणार आहे तिथून हिंदू घाबरून आणि निराश होऊन का पळत आहेत असे मी संपादकांना विचारू शकतो काय? हिंदू का घाबरलेले आहेत? सिंधी हिंदू पहिल्या प्रतीचे व्यापारी आहेत. ते मुंबई, मद्रास, आणि इतर ठिकाणी का पळत आहेत? यामुळे ते काही गमावतील असे नाही तर सिंधची हानी होईल. कारण ते जिथे कुठे जातील तिथे पैसा कमावतील. आपल्याला सिधी दक्षिण अमेरिकेतही आढळतात. जगात क्वचितच असा भाग असेल जिथे सिंधी आढळणार नाहीत. दक्षिण आफ्रिकेत ते भरपूर पैसा कमावत होते आणि गरिबांना ते उदारहस्ते मदत करत होते. त्यांच्यात एकच दोष आहे आणि तो म्हणजे मद्यपानाचा. त्यांच्याकडून ते सोडवत नाही असे दिसते.

मी केवळ जिना आणि लीगच्या इतर नेत्यांनाच का विचारतो असे डॉनचे म्हणणे आहे. उत्तर प्रदेशात, जो माझा प्रांत आहे, काय घडते आहे? परंतु सिंधसुद्धा माझा प्रांत आहे. पाकिस्तानसह संपूर्ण भारत माझा प्रांत आहे. मी स्वतःला पाकिस्तानचा नागरिक समजतो परंतु तसे मी नागरिकत्वाच्या हक्काचे लाभ मिळवण्याकरिता करत नाही. मला कोणतेही पद नको आहे. मला केवळ पोटभर खायला पाहिजे आणि ईश्वर ते मला देतो. मला उत्तर प्रदेशबद्दल काहीही माहीत नाही. याशिवाय मी कुणालाही दोष दिलेला नाही. डॉनचे संपादक मोठे माणूस आहेत. मी जे म्हणतो ते चूक आहे असे जर त्यांना वाटते तर ते त्याची ते कशाला फिकीर करतात? माझ्यासारखे किती तरी आहेत की जे मनात येईल ते बोलत असतात. परंतु उत्तर प्रदेशसंबंधी पंतजींशी माझे बोलणे झाले. ते म्हणाले की माझ्याकडून होईल तितका मी मुसलमानांना वाचवण्याचा प्रयत्न करत असतो. मुस्लीम लीगचे लोक हिंदूंना शिवीगाळ करत असतात व त्यांना डिवचत असतात. अशा अवस्थेत प्रत्येक ठिकाणी सरकार पोहोचू शकत नाही. काही वेळा हिंदूंचाही तोल सुटतो. पंतजींनी मान्य केले की गढमुक्तेश्वरला

जे झाले ते योग्य नव्हते. वृत्तपत्रांच्या अहवालाप्रमाणे उत्तर प्रदेशातील लीगच्या नेत्यांनीसुद्धा पंत मंत्रिमंडळाची वाखाणणी केली आहे.

डॉनच्या संपादकांना मी आठवण करून देऊ इच्छितो की ते जे म्हणतात ते कदाचित बरोबर असेल आणि पंतजी म्हणतात ते वेदवाक्य नसेल. तरी उत्तर प्रदेशात एका मुसलमानाचा गळा कापण्यात आला तर सिंध आणि पंजाबमध्ये दहा हिंदूंचे गळे कापण्याचे कारण काय? हे जातीय वेड ज्या दिवशी विसरले जाईल तो दिवस पाहण्याकरिता माझी जिवंत राहण्याची इच्छा आहे. आपला धर्म कोणताही असला तरी आपण कृतीत भारतीय असायला पाहिजे. असे करू तेव्हाच आपल्याला आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करता येईल.

डॉनच्या संपादकांना खरोखरच इस्लाम वाचवावयाचा असेल तर मी त्यांना सागेन की हा इस्लामचा मार्ग नाही. जिनांना काही गोष्टी सांगण्याबद्दल बोलायचे तर तर मला जे आवडते ते मी माऊंटबॅटन आणि जवाहरलाल नेहरू यांनाही सांगत असतो. जवाहरलालच्या शब्दांत आणि कृतीत अंतर असेल तर ते पंडित असूनही मी त्याच्यापासूनही दूर राहीन. परंतु डॉनच्या संपादकांना मी सल्ला देईन की त्यांनी आपल्या लेखणीतील विष काढून टाकावे. राष्ट्रीय वृत्तपत्रांमध्ये अनेक गोष्टी चांगल्या असतात आणि अनेक वाईट. परस्परात संघर्ष होईल अशा बातम्या छापायच्या नाही या मुद्द्यावर जर आपण सहमत झालो तर आपण काही तरी साध्य केले असे मी समजेन.

***गांधीजी म्हणाले की डॉन आणि इतर सर्व वृत्तपत्रांना माझी सूचना आहे की त्यांची कोणतीही रंगछटा असली तरी त्यांनी अतिशयोक्ती टाळावी. या सूचनेवर कार्यवाही करायची असेल तर त्यांनी एक संयुक्त मंडळ तयार करावे आणि सांप्रदायिक अशांततेविषयीचे सगळे वृत्तांत त्या मंडळाकडे पाठवावे आणि इतकेच नाही तर त्यांची जबाबदारी असलेल्या मंत्र्यांकडेही ते पाठवावे व आवश्यक्ता पडली तर ते प्रकाशित करावे.***

***संपादकांना जनतेविषयीच्या आपल्या कर्तव्याची जाणीव झाली आणि सर्व प्रकारच्या सांप्रदायिकतेवर निर्णायकपणे प्रतिबंध लावण्याची इच्छा झाली तरच गांधीजींच्या सूचनेवर अनुकुल विचार होऊ शकत होता. फाटाफूट ही वस्तुस्थिती आहे. उपाशी तापाशी असलेल्या आणि कपडेलत्ते नसलेल्या लक्षावधी लोकांना खाऊ घालणे व त्यांना कपडलत्ते पुरवण्याची खरे म्हणजे ही वेळ आहे. अशा वेळी गोंधळ निर्माण होईल असे काही करणे चागुलपणाचे म्हणता येणार नाही.***

(हिंदीवरून). (प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २५७-६० आणि हिंदुस्तान टाईम्स १९-७-१९४७)

# ७४. प्रार्थना प्रवचन, जुलै २०, १९४७

नवी दिल्ली,

जुलै २०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काही लोक मला सांगतात की - आणि त्यांना तसे सांगण्याचा अधिकार आहे - आजकाल मी जे काही बोलतो ते लोकांचा उत्साह वाढवा अशा हिशेबाने मी बोलत नाही. ते मला आठवण करून देतात की ज्या राजकीय स्वातंत्र्याकरिता आपण संघर्ष करत होतो ते मिळालेले आहे आणि क्रमशः आर्थिक स्वातंत्र्यसुद्धा येईल. हे सर्व खरे असेल. असे असले तरी १५ ऑगस्टचा मला आनंद होत नाही. माझी तुम्हाला फसवण्याची इच्छा नाही. परंतु त्याचबरोबर तुम्हीसुद्धा आनंद मानू नये असे मी म्हणणार नाही. अखेरीस प्रत्येक गोष्ट माझ्या इच्छेप्रमाणे व्हावी अशी मी अपेक्षा करू शकत नाही. भारताची फाळणी व्हावी अशी माझी इच्छा नव्हती परंतु ती झाली. आता त्यावर रडून काय फायदा होणार आहे? इतकेच नाही तर याहूनही काही वाईट घडले असते तर त्याच्याशी मला जुळवून घ्यावे लागले असते. भारताच्या फाळणीने मला जितके दुःख झाले आहे, तितके तुम्हाला झाले नाही. मी आयुष्यभर बंडखोर होतो. बंडखोर कसा काय रडू शकतो? मी जेव्हा नोआखालीला गेलो तेव्हा मी लोकांना रडताना आणि आपले अश्रू पुसताना पाहिले. मी त्यांना सांगितले की मृताकरिता रडण्यात काहीही अर्थ नाही. परंतु ज्या लोकांच्या हातात आपण सत्तेची सुत्रे दिली आहेत ते मोठे लोक आहेत. ते जर म्हणतात की आपण स्वातंत्र्यदिन साजरा केला पाहिजे तर तुम्ही तो करायला पाहिजे. तो साजरा करण्याकरिता कॉंग्रेस कुणावरही बळजबरी करत नाही. मी तो साजरा करणार नाही याचा अर्थ असा नाही की ब्रिटिश येथून जाणार नाहीत. १५ ऑगस्ट येईपर्यंत अनेक ब्रिटिश अधिकारी गेलेले असतील. जे राहतील ते सत्ताधाऱ्यांच्या अधिकाराखाली राहतील. त्यांची नेमणूक लंडनहून होणार नाही, तर ती आपण करू.

दुर्दैवाने आज ज्या स्वरूपाचे स्वातंत्र्य आपल्याला मिळाले आहे त्यात भारत पाकिस्तानमधील भविष्यातील संघर्षाची बिजे रुजलेली आहेत. असे असताना आपण दिव्यांची आरास कशी काय करू शकतो? हिंदू आणि मुसलमानांनी आपली अंतःकरणे ज्या दिवशी शुद्ध केलेली असतील त्या दिवशी स्वातंत्र्य मिळाले असे मी समजेन. अगदी अलीकडेच पंजाबमधील मुस्लिम लीगच्या मित्रांनी धमकी दिली की जर सीमा आयोगाने आमच्या बाजूने निकाल दिला नाही

तर तर आम्हाला जे हवे ते आम्ही लढून घेऊ. शीखसुद्धा अशाच धमक्या देत आहेत. परंतु आपण ज्याअर्थी लवादाचे तत्त्व मान्य करायचे ठरवले आहे त्याअर्थी आपण त्या निर्णयानुसार वागायला पाहिजे. आपण लढाईची भाषा बोलू नये. मला एकच लढाई माहीत आहे आणि ती आहे सत्याग्रहाची. ते आत्म्याला शुद्ध करते. तशा प्रकारचा संघर्ष जर जगात सतत सुरू राहिला तर ते जगाकरिता हितकारक होईल. मी माझ्या हिंदू, शीख आणि मुसलमान भावंडांना विनंती करीन की एकदा सीमा आयोगाचा लवाद स्वीकारल्यानंतर आपण त्या आयोगाने दिलेला निर्णय मान्य केला पाहिजे.

ब्रह्मदेश भारताप्रमाणे लवकरच स्वतंत्र होणार आहे. ब्रह्मदेशाचे नेते यू ऑंग सॅन यांनी ब्रह्मदेशाला स्वातंत्र्याच्या दारावर आणले आहे. ते सत्याग्रही नव्हते याला काय महत्त्व आहे? ते शूर योद्धा होते आणि बहुतांशी त्यांच्याच प्रयत्नाने ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य मिळायची शक्यता आहे. सशस्त्र टोळीने हल्ला करून त्यांना आणि त्यांच्या चार सहकाऱ्यांना ठार केले ही फार मोठी शोकांतिका आहे. (ऑंग सॅन आणि त्यांच्या सहा सहकाऱ्यांचा जुलै १९ला यू सॉ या त्यांच्या राजकीय प्रतिस्पर्ध्याच्या चिथावणीने खून करण्यात आला. याशिवाय पाहा प्रार्थनाप्रवचन, २१-७-१९४७) आपण त्यांच्यापासून कितीही दूर असलो तरी त्यांचा एकाकी मृत्यू ही आपल्याकरिता दुःखद गोष्ट आहे. अशाच गोष्टी घडत राहिल्या तर जगाची दुःखद अवस्था होईल. खून करणारे डाकू होते यावर मी विश्वास ठेवू शकत नाही. ब्रह्मदेशात मी बराच वेळ घालवला आहे. मला रंगून, मंडाले आणि इतर ठिकाणांचा परिचय आहे. ब्रह्मदेशातील इतर भागाप्रमाणेच तिथेही बुद्धधर्म आहे. ज्या देशात बुद्धधर्म आहे त्या देशात इतका रक्तपात का व्हावा? मला खात्री आहे की या खुनांच्या मागे फूटपाडू राजकारण आहे. ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य मिळणारच असताना असे घडले ही दुःखद गोष्ट आहे. या शोकांतिकेपासून भारत धडा घेईल अशी मी आशा करतो. या दुःखद प्रसंगी ब्रह्मदेशातील लोकांचे ईश्वर सांत्वन करो आणि मृतांच्या नातेवाईकांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो. आपल्याप्रमाणेच ते स्वातंत्र्याकरिता संघर्ष करत होते. खून करणारांचे हृदयपरिवर्तन होवो अशी आपण प्रार्थना करू या.

डॉनच्या संपादकांनी आपल्या वृत्तपत्रातून आजच्या अंकात माझ्या दोन सूचनांचा स्वीकार केला आहे. (पाहा प्रार्थना प्रवचन, १८-७-१९४७). यामुळे मला फार बरे वाटले. त्याचे म्हणणे आहे की पाकिस्तानमधील हिंदू आणि मुसलमान भावाभावाप्रमाणे राहतील. यापुढे जाऊन ते म्हणते की वार्ताहरांची एक समिती असावी आणि तिने सांप्रदायिक दंगलींच्या अहवालांचा अभ्यास करावा आणि काय प्रकाशित करावे ते ठरवावे. त्यांनी सुचवले की तुम्ही स्वतःसुद्धा वृत्तपत्रकार आहा आणि तुम्ही या समितीचे अध्यक्ष होऊ शकता. मी त्यांना माझी असमर्थता सांगितली. मला वेळ नाही.

याशिवाय अशा प्रकारच्या कामाकरिता मी पात्रही नाही. मग अशा प्रकारच्या संस्थेचा मी अध्यक्ष कसा असू शकतो? परंतु याबद्दल ते गंभीर असतील तर ते इतर संपादकांना भेटू शकतात आणि काही करू शकतात. परत मी अखेरचे सांगू इच्छितो की भारत आणि पाकिस्तानमधील अल्पसंख्याक आम्ही सुखी आहो असे जेव्हा म्हणतील तेव्हाच खरे स्वातंत्र्य मिळाले आणि मगच खराखुरा आनंद मानायचा वेळ आली असे म्हणता येईल.

(हिंदीवरून). (प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ २६३-६

# ७५. प्रार्थना प्रवचन, जुलै २१, १९४७

नवी दिल्ली,

जुलै २१, १९४७

पाकिस्तानमधील एक मित्र लिहितो (पाहा कृष्णदास यांना पत्र, २१-७-१९४७)- ***"भारतातील तुम्ही लोक १५ ऑगस्ट साजरा करत आहात. पाकिस्तानमधील आम्ही हिंदूंनी तो कसा साजरा करायचा याचा तुम्ही कधी विचार केला आहे काय? आज आमची अंत:करणे या दिवसाच्या भीतीनेच शहारतात. तुम्ही याबद्दल काही सांगाल काय? हा दिवस आमच्याकरिता संघर्ष आणि व्यथांनी भरलेला असेल, साजरा करण्याकरिता नाही. मुसलमानांनी आताच आम्हाला घाबरवायला सुरुवात केली आहे. भारतातील मुसलमान काय विचार करत आहेत ते आम्हाला माहीत नाही. तेसुद्धा घाबरलेले नसतील काय? आमचे मोठ्या प्रमाणात धर्मांतर करण्यात येईल या कल्पनेनेही आम्ही घाबरलेलो आहो. तुम्ही म्हणाल की आमच्या धर्माचे रक्षण आम्हीच केले पाहिजे. हे एखाद्या संन्यास्याकरिता शक्य असू शकेल. गृहस्थी लोकांकरिता हे शक्य नाही."***

श्रीयुत जिना आता पाकिस्तानचे महाराज्यपाल होत आहेत. मुसलमानेतरांना मुसलमानांप्रमाणेच वागणूक दिली जाईल असे ते म्हणाले आहेत. माझा सल्ला आहे की पाकिस्तानमधील मुसलमानेतरांशी गैरव्यवहार केला जाणार नाही असा आपण त्यांच्यावर विश्वास ठेवावा. याचबरोबर भारतातील मुसलमानांशीही गैरवर्तणूक केली जाणार नाही. आता दोन राज्ये झाल्यामुळे यासंबंधी भारत पाकिस्तानकडून अभिवचन मागू शकतो असे मला वाटते. (या वाक्याचा पहिला भाग हिंदुस्तान टाईम्समधून घेतला आहे.)

जोपर्यंत अल्पसंख्याकांना १५ ऑगस्ट हा दिवस जड अंत:करणाने घालवावा लागेल तोपर्यंत हा दिवस साजरा करण्याकरिता आहे असे मला कधीही वाटले नाही. तो दिवस प्रार्थनेचा आणि आत्मपरीक्षणाचा असेल. हे दोन देश जर स्वत:शी खरोखर प्रामाणिक असतील तर त्यांनी या क्षणापासून मैत्रीची सुरुवात केली पाहिजे. एक तर सर्वांनी भावंडांप्रमाणे १५ ऑगस्ट साजरा केला पाहिजे अथवा तो मुळीच साजरा करण्यात येऊ नये. स्वातंत्र्याबद्दल आनंद व्यक्त करण्याचा तो दिवस असेल परंतु हे माझे व्यक्तिगत मत आहे. परंतु कोणालाही ते पटत नाही असे दिसते.

पाकिस्तानमधील तोच मित्र नंतर मला विचारतो, ‘पाकिस्तानमधील सर्व वा फार मोठ्या प्रमाणात हिंदू भारतात आले तर त्यांना आश्रय दिला जाईल काय?’

मला वाटते की अशा लोकांना नक्कीच आश्रय दिला जावा. असे असले तरी त्यांच्यातील सुखवस्तू लोक जर पूर्वीच्याच शैलीने राहू इच्छित असतील तर मात्र ही गोष्ट कठीण होईल. कोणत्याही परिस्थितीत त्यांना राहण्याकरिता नक्कीच जागा दिली जाईल आणि त्यांच्या कामाचा मोबदला दिला जाईल. परंतु तरीही मी आशा करीन की एकाही मुसलमानेतराला पाकिस्तानमधून पळ काढावा लागणार नाही आणि एकाही भारतीय मुसलमानाला आपल्या मातृभूमीतून पळावे लागणार नाही.

पत्रलेखक पुढे विचारतो : “पाकिस्तानमध्ये मागे राहिलेली घरे आणि जमीनजुमला यांचे काय होईल?” मी आधीच सांगितले आहे की पाकिस्तान सरकारने बाजारभावाप्रमाणे घरांची आणि जमीनजुमल्याची किंमत द्यावी. अशा प्रकारच्या प्रकरणी दुसऱ्या देशालाही बोलण्याचा हक्क असतो. या प्रकरणी भारत सरकार. परंतु प्रकरण इथवर जाईल असे मी का गृहीत धरावे? जमीन आणि घरांची किंमत त्यांच्या मालकांना देणे पाकिस्तान सरकारचे कर्तव्य असेल. मी स्वतःला व्यावहारिक राजकारणी समजतो याची पत्रलेखकाने मला आठवण करून दिली आहे. परंतु देशात जे सुरू आहे ते अमानवीय आहे. गुन्हेगारांच्या बाबतीत अहिंसेचे पालन करता येते काय आणि येत असेल तर कशा प्रकारे? माझा सतत प्रयत्न असतो की माझ्या आदर्शांनुसार अशा प्रकारे वर्तन करावे की त्याचे परिणाम निघतील. शक्य आहे की असे करण्यात मला नेहमीच यश येत नसेल. मी गुन्हेगार कुणाला समजावे? मनूने ज्यांचे गुन्हेगार म्हणून वर्णन केले आहे त्या सर्वांना मृत्यूदंड देता येऊ शकत नाही. मृत्यूदंडाची शिक्षा रद्द करावी असा प्रयत्न होत आहे आणि सुधारक तर शारीरिक शिक्षाही रद्द करावी अशी मागणी करत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की गैरवर्तन करणारांना आजारी समजण्यात यावे आणि इतर रुग्णाकरिता ज्याप्रमाणे रुग्णालय उघडतो तसे त्यांच्याकरिताही रुग्णालये उघडण्यात यावी. माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे की धर्मग्रंथांच्या नावाने जाणारी प्रत्येक गोष्ट मान्य करण्यात येऊ नये. धर्मग्रंथातील ज्या गोष्टींमध्ये सतत होणाऱ्या बदलांचा विचार केला गेलेला असतो केवळ त्याच गोष्टी धर्म्य समजण्यात याव्या. युगायुगाप्रमाणे प्रवृत्ती बदलत असतात. केवळ काहीच असे नियम असतात की जे चिरंतन कायम असतात. आणि शिवाय गुन्हेगारांना शिक्षा करण्याचे क्षेत्र प्रत्येकाचे नाही. हा अधिकार शासनाकरिता निवडून आलेल्या लोकांना असतो. सरकार कायदा करते आणि त्याप्रमाणे न्याय देते. तसे नसते तर आपण सर्व गुन्हेगार होण्याचा धोका होता. ब्रह्मदेशात करण्यात आलेले खून क्रूर होते. आता आपल्याला कळते की ते राजकीय खून होते. (पाहा

प्रार्थनाप्रवचन, २०-७-१९४७) मला खात्री आहे की खून करणारे बळी पडलेल्या लोकांना गुन्हेगार समजत होते. यामुळेच मी म्हणत असतो की जो माणूस आपल्या हातात कायदा घेतो तो गुन्हा करतो. ते जनतेच्या विरोधात हिंसक वर्तन करतात. केवळ निवडून आलेली विधिसभाच अहिंसकरीतीने ही जबाबदारी पाड पाडू शकते. आज जगात जे घडते आहे तो पाशवीपणा आहे.

(हिंदीवरून). प्रार्थनाप्रवचन, - १, पृष्ठ २६६-८

# ७६. प्रार्थना प्रवचन, जुलै २२, १९४७

नवी दिल्ली,

जुलै २२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला आज एक पत्र मिळाले. ते म्हणते: 'तुम्ही माऊंटबॅटन यांना हळहळू फार जास्त दिले आहे. मौऊंटबॅटन काहीही चूक करू शकत नाहीत असे तुम्ही गृहीत धरल्यासारखे दिसते. परंतु तुम्हाला दुसरी गोलमेज परिषद (१९३१) आठवत असेल. त्या वेळी तुम्ही म्हणाला होता की जेव्हा स्वातंत्र्य येईल तेव्हा व्हाईसरायचे घर हरिजन मुलांकरिता वा रुग्णालयाकरिता वापरण्यात येईल. तुमची सध्याची वृत्ती याच्याशी सुसंगत दिसत नाही.'

मी कोणालाही कोणत्याही प्रकारे अधिक देत नाही. मला लॉर्ड माऊंटबॅटनकडून काहीही नको आणि त्यांनाही माझ्याकडून काहीही नको. मला कोणतीही पदवी नको आणि त्यांच्याजवळ देण्याकरिता दुसरे काहीही नाही. असे म्हणतात की मी नेहमी माझ्या लोकांची कानउघाडणी करत असतो आणि त्यांच्याबद्दल चांगले बोलण्यासारखे मला काहीही आढळत नाही. जोपर्यंत लॉर्ड मौटबॅटन यांचा संबंध आहे त्यांनी सध्या तरी व्हाईसरायच्या घरात राहायला पाहिजे. मी जर त्यांना त्यातून बाहेर काढले तर मी त्यांना  माझ्याबरोबर ठेवीन. परंतु तिथे त्यांना संस्थानिकांना भेटायचे असते आणि भूतकाळातील चुका दुरुस्त करायच्या असतात. त्या चुकांमुळे जी हानी झाली ती त्यांना भरून काढायची आहे. आणि थोडक्यात सांगायचे तर त्यांना महाराज्यपाल करण्यात आले कारण ते वेगात काम करू शकतील. त्यांना हे पद देण्यात कोणतीही खुषामत नाही. आणि तुम्हाला असे वाटते काय की जवाहरलाल आणि सरदार पटेल कुणाची खुशामत करणारी माणसं आहेत? परंतु व्हाईसरायच्या अंतःकरणात जर काही फसवणूक करायचा विचार असेल तर केवळ त्यांचीच हानी होणार आहे. माझा साठ वर्षांचा अनुभव मला सांगतो की जो दुसऱ्याची फसवणूक करण्याची इच्छा ठेवतो तो केवळ स्वतःचीच फसवणूक करतो. परंतु लॉर्ड मौऊंटबॅटन नेहमीकरिता त्या घरात राहतील की त्या घराचे रुग्णालय करण्यात येईल हे मला माहीत नाही. केवळ जवाहरलाल आणि सरदार यांनाच हे माहीत असेल.

दुसऱ्या एका पत्रलेखकाला जाणून घ्यायचे आहे की ब्रिटिश अधिकाऱ्यांना सैन्यात कायम ठेवण्यात येईल काय आणि सैन्याच्या विभाजनाला माझी मंजुरी आहे काय. खरे म्हणजे पत्रलेखकाने

मला विचारायला पाहिजे की सैन्य कायम ठेवायला माझी संमती आहे काय. सैन्य ठेवायला, मग त्याचा आकार कितीही असो, माझा पाठिंबा असू शकत नाही. परंतु काळ बदलला आहे. आम्ही सर्व वा जवळपास सर्व अहिंसक आहो अशी कल्पना मी गोंजारत होतो. परंतु आता माझे डोळे उघडले आहेत. जिला मी अहिंसा म्हणून गृहीत धरत होतो तो केवळ शांततामय प्रतिकार होता हे माझ्या आता लक्षात आले आहे. शांततामय प्रतीकाराचा आधार ती व्यक्ती घेते जिच्याजवळ शस्त्र नसतात. आपल्या अंतःकरणात हिंसा होती परंतु आपल्याला अहिंसक मार्गाचा स्वीकार करणे भाग पडले होते. आणि आता भारतातून ब्रिटिश माघार घेत असताना आपण त्या हिंसेचा उपयोग परस्परांविरुद्ध करत आहोत. मला खात्री आहे की माझ्या अंतःकरणात कधीही हिंसा नव्हती. परंतु मी इतरांबद्दल काय करू शकतो? त्यांचे म्हणणे आहे की ब्रिटिशांच्या विरोधात आम्ही अहिंसक होतो याचा अर्थ आताही आम्ही अहिंसक राहावे असा होत नाही. दोष माझा आहे. गत तीस वर्षातील माझी शिकवणूक सदोष होती. मला जर विचारले तर मी म्हणेन की सैन्य ठेवण्याच्या बाजूने मी नाही. भारत सैनिकी राज्य होणार आहे काय? बंगालपासून तर पंजाब आणि बिहारपर्यंत सर्वांची सैन्य पाठवा अशी मागणी आहे. एका ठिकाणी संरक्षणाची मागणी करणारे जर हिंदू असतील तर दुसऱ्या ठिकाणी मुसलमान आहेत. यामुळे सैन्याची वाटणी कशी केली जाईल हेही मला माहीत नाही आणि या विषयावर मी वेळ खर्च करावा इतका माझ्याजवळ वेळही नाही.

मध्ये चक्र असलेल्या तिरंगाचा भारताचा राष्ट्रध्वज म्हणून स्वीकार केल्या गेल्याबद्दल चार भगिनी माझे अभिनंदन करण्याकरिता आल्या होत्या. यात अभिनंदन करण्यासारखे मला काहीही वाटत नाही. ध्वजावर चरख्याऐवजी केवळ चक्र आहे असे मला सांगण्यात आले. परंतु ते चरखा ठेवो अथवा नाही माझ्याकरिता सगळे सारखे आहे. त्यांनी जरी तो फेकून दिला तरी तो माझ्या हातात आणि अंतःकरणात असेल.

एक मित्र सांगतो की अजूनही ध्वजावर चरखा आहे. दुसरा सांगतो की नाही, तो तिथे नाही. तुम्ही असतानाच निरुपयोगी म्हणून तो टाकून देण्यात आला आहे. मला माहीत नाही. मला केवळ इतकेच माहीत आहे की चरखा ध्वजावर दाखवण्यात आला परंतु तो जर लोकांच्या अंतःकरणात नसला तर ध्वज आणि चरखा हे दोन्हीही जाळून टाकायच्या लायकीचे होतील. परंतु लोकांच्या अंतःकरणात जर चरखाला जागा असेल तर तो ध्वजावर ठेवण्यात आला की नाही याला काहीही महत्त्व उरणार नाही. मला केवळ इतकेच वाटते की देशाला केवळ एक ध्वज असावा आणि प्रत्येकाने त्याला वंदन केले पाहिजे. घटना समितीत चौधरी खलिक-उझ-झमान आणि मोहम्मद सादुल्ला या

दोघांनीही ध्वजवंदन केले आणि आम्ही या ध्वजाशी एकनिष्ठ राहू असे घोषित केले याचा मला आनंद होतो. ते जर मनापासून हे म्हणत असतील तर ही चांगली गोष्ट आहे.

परंतु सिल्हट येथून आलेली तार अतिशय वेदनादायक आहे. तेथील सार्वमत घेण्याचे काम संपले आहे परंतु लोकांची छळणूक सुरूच आहे. तेथील मुसलमान इतके वेड लागल्यासारखे का झाले आहेत? राष्ट्रवादी मुसलमानांची हत्या करण्यात आली आहे आणि कुणाला तरी निरीक्षक म्हणून पाठवण्यात यावे अशी तारेतून विनंती करण्यात आली आहे. मी कोणाला पाठवू शकतो? कृपलानी अथवा जवाहरलालच कुणाला तरी शोधून पाठवू शकतात. मला असे वाटते की मी आता नोआखालीला गेलो पाहिजे. सिल्हट नोआखालीपासून जवळ आहे. परंतु मी कसा जाऊ? मी इथे कैद केल्या गेलो आहे. तारेत किंचितही असत्य नाही याबद्दल माझी खात्री पटली आहे. पाठवणाराने आपल्या नावाची सहीसुद्धा केली आहे. सार्वमतानंतर मुसलमानांनी हरिजनींची वस्ती जाळून टाकली असा वृत्तांत देण्यात आला आहे. ही लाजिरवाणी गोष्ट आहे. एकीकडे खलिक साहेब आणि सादुल्ला साहेब राष्ट्रध्वजाला वंदन करत आहेत तर दुसरीकडे पाकिस्तानमध्ये अशा घाणेरड्या गोष्टी सुरू आहेत.

कराचीहून एक पत्र आले आहे. ते श्रीमंत माणसाचे आहे. त्या पत्रात म्हटले आहे की पाकिस्तान सरकारने त्यांचे घर ताब्यात घेतले आहे. आता ते गृहस्थ पेचात सापडले आहेत कारण त्यांना राहायला कुठेही जागा नाही. यामुळे मला धक्का लागला हे मी श्रीयुत जिना आणि तेथील इतर नेत्यांना सांगायलाच पाहिजे. अशा वेळी आनंद मानण्याऐवजी या दलदलीतून आपली सुटका व्हावी आणि ज्या स्वातंत्र्याचे स्वप्न इतक्या दिवसांपासून आपण पाहत होतो त्या स्वातंत्र्याची फळे चाखण्याची आपल्याला संधी मिळावी म्हणून आपण प्रार्थना केली पाहिजे. ही खरोखर प्रार्थनेची वेळ आहे.

हिंदीवरून, प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २६९-७२

# ७७. प्रार्थना प्रवचन, जुलै २३, १९४७

नवी दिल्ली,

जुलै २३, १९४७

***प्रार्थना सुरू होण्यापूर्वीच कोणी तरी गांधीजींना चिठ्ठी दिली. तुम्हाला ईश्वराचे साक्षात दर्शन झाले आहे काय असे ती चिठ्ठी लिहिणाराने गांधीजींना विचारले होते. प्रार्थनेनंतर या प्रश्नाचे उत्तर देताना गांधीजींनी सांगितले की “मला ईश्वराचे साक्षात दर्शन झालेले नाही. मला जर दर्शन झाले असते तर मला तुमच्याशी बोलायची आवश्यकता राहिली नसती. माझ्या विचारातच इतकी शक्ती आली असती की भाषण आणि कृती माझ्याकरिता अनावश्यक झाल्या असत्या. परंतु माझ्यात ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल अढळ श्रद्धा आहे. या जगातील कोट्यवधी लोकांच्या मनातही तीच श्रद्धा आहे. अतिशय विद्वान लोकही कोट्यवधी अडाणी माणसाच्या श्रद्धेला धक्का लावू शकत नाहीत. प्रार्थनेत आपण जे भजन म्हणालो त्यातून ईश्वराच्या साक्षात दर्शनाचा मार्ग सांगितला आहे. ईश्वराचे साक्षात दर्शन घेऊ इच्छिणाराला कवी म्हणतो की तुला जर त्या दैवी स्थितीत पोहोचायचे असेल तर काम आणि क्रोध यांचा त्याग कर तसेच निंदास्तुती यांच्याबद्दल तटस्थ राहा.” गांधीजींनी निर्वाणची रामराज्याशी वा स्वर्गातील राज्याशी तुलना केली. रामराज्याचे स्वप्न वास्तवात येणे फार कठीण आहे. तुम्ही जेव्हा अहिंसेच्या नावाखाली तुमच्या हृदयात हिंसा जोपासत असता तेव्हा हे कसे शक्य आहे?*** (हा परिच्छेद हिंदुस्तान टाईम्स, २४-७-१९४७च्या अंकामधून घेतला आहे.)

आज मला तुम्हाला मिठासंबंधी काही सांगायचे आहे. लोक म्हणतात की एक वेळ होती की जेव्हा तुम्ही मिठाकरिता दांडीला कूच करून गेला होता, परंतु आज मीठ मिळत नाही आणि जर मिळालेच तर त्याकरिता वाजवीपेक्षा किती तरी अधिक किंमत मोजावी लागते. मी केवळ लाजेने माझी मान खाली घालू शकतो. लोक म्हणतात की मिठावर कर जरी रद्द करण्यात आलेला असला तरी त्याचा किंमतीवर काहीही परिणाम झालेला नाही. मिठावर भावनियंत्रण नाही परंतु तरीही त्यात काळाबाजार सुरू आहे. व्यापारी इतके हलकट आहेत की ते मिठापासूनही भरपूर नफा मिळवतात. परंतु आपण आळशी झालो आहो.

ग्रामीण भागात अशी किती तरी ठिकाणे आहेत की जिथे कोणतीही किंमत न देता लोक मीठ बनवू शकतात. ही सवलत लार्ड इर्विनशी जेव्हा माझा करार झाला होता तेव्हाच मिळाली होती.(पाहा तात्पुरती तडजोड, १२-३-१९३१) आपण जर आळशी नसू तर आपल्याला मीठ केवळ स्वस्तच मिळणार नाही, ते स्वच्छही मिळेल. बाजारात उपलब्ध असलेले मीठ अतिशय घाणेरडे असते. लोक त्रास घ्यायला तयार नसतात हे त्याचे कारण आहे. मला तुरुंगात दिले जाणारे मीठ मी स्वतः स्वच्छ करत असे. आज आपण इतके स्वार्थी झालो आहो की आपण लोकांना कमी किंमतीत मीठही मिळू देत नाही. ज्या शासनात लोकांना मीठही नाकारले जाते त्या शासनाला आपण रामराज्य कसे म्हणू शकतो? मीठ केवळ माणसांनाच लागत नाही तर जनावरांनाही लागते. मला भीती वाटते की आता फाळणीमुळे दोन्ही देशांना आपला महसूल वाढवावा लागेल आणि ते मिठावरही कर लावतील. परंतु जनतेला मिठापासूनही वंचित करण्याइतका संमंजसपणा त्यांनी गमावला आहे काय? जर तसे घडले तर स्वातंत्र्याकरिता फार मोठी किमत मोजावी लागली असे म्हणावे लागेल.

प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २७३-४

# ७८. प्रार्थना प्रवचन, जुलै २४, १९४७

नवी दिल्ली,जुलै २४, १९४७

बंधूनो आणि भगिनींनो,

मी वारंवार सांगितल्याप्रमाणे एखादा माणूस जेव्हा प्रार्थना करत असतो वा अशाच प्रकारची काही पवित्र गोष्ट करत असतो तेव्हा तो धुम्रपान करत नसतो. ख्रिश्चन भरपूर मद्यपान आणि धुम्रपान करतात परंतु चर्चमध्ये असताना ख्रिश्चन माणसाला मद्यपान वा धुम्रपान करताना मी कधीही पाहिले नाही. हाच नियम मशिदींना आणि गुरुद्वारांना लागू होतो. या जागेला अर्थातच देऊळ, चर्च वा मशीद म्हणता येऊ शकते कारण आपल्या प्रार्थनेतील पाठ सर्व धर्मातून घेतलेले असतात. तुम्ही जर धुम्रपान सोडले तर फारच चांगले. परंतु तरीही ज्या कोणाला धुम्रपान करायचेच असेल त्याने या धर्मसभेतून बाहेर पडून धुम्रपान करावे.

त्यानंतर प्रार्थना सुरूच असताना काही लोक उठले आणि निघून गेले. शक्य आहे की त्यांना प्रार्थनेत रस वाटला नसावा. परंतु रस असो वा नसो अखेरीस आपला हेतू देवाचे नाव घेणे आहे. नियम आहे प्रार्थना संपेपर्यंत - आणि प्रार्थनेचा शेवट मी करत असतो - कोणीही जाऊ नये. चरखासंघाजवळ जुन्या तिरंगा ध्वजांचा साठा आहे. त्यांची किंमत २ लाख आहे. चरखासंघ ही फार गरीब लोकांची संघटना आहे. मी तिचा अध्यक्ष आहे. या संघटनेत काम करणाऱ्या लोकांना फार कमी पगार आहे. आत या झेंड्यांचे काय करायचे असा प्रश्न त्यांना पडला आहे. जुन्या आणि नवीन झेंड्यात फार कमी अंतर आहे. जुना ध्वज अधिक सुंदर आहे. जुन्या झेंड्यात चरखा आहे. नवीन ध्वजात चक्र आहे परंतु चाती आणि माळ नाही. नवीन ध्वजामुळे जुना अनावश्यक होत नाही. एवढेच नाही तर राजा मेल्यानंरही राज्य कायम राहते आणि नवीन नाणी आल्यामुळे जुनी नाणी टाकून दिली जात नाहीत. नवीन नाणी आल्यानंतर जुन्या नाण्यांचे अवमूल्यन होत नाही. यामुळे गांधीआश्रमात जोपर्यंत एकसुद्धा झेंडा शिल्लक आहे तोपर्यंत दोन्ही ध्वजांची किंमत सारखी राहील. ज्या लोकांजवळ जुने झेंडे आहेत त्यांनी ते फाडू नये आणि जर त्यांना अधिक झेंडे विकत घ्यायचे असतील तर त्यांनी तसेच झेंडे गांधी आश्रमातून विकत घ्यावे. असे केल्यामुळे दोन लाखांचा माल वाया जाणार नाही. भविष्यात मात्र चरखा संघ निश्चितच नवीन रूपरेखेप्रमाणे ध्वज बनवील.

आज माझ्यासमोर दोन प्रश्न आहेत. १५ ऑगस्टनंतर कॉंग्रेसचे काय होईल आणि त्यानंतर तिचा कार्यक्रम काय असेल हे एका पत्रलेखकाला जाणून घ्यायचे आहे. त्याचे म्हणणे आहे की

आतापर्यंत कोणालाही कॉंग्रेसमध्ये सामील व्हायचे असेल तर त्याला मी स्वातंत्र्याकरिता सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने संघर्ष करीन अशी शपथ घ्यावी लागत असे. आता भारताने स्वातंत्र्य मिळवलेले असल्यामुळे तिची भूमिका काय असेल असे हा पत्रलेखक विचारतो.

कॉंग्रेसचा कार्यक्रम काय असेल हे ती स्वतःच सांगू शकेल. कॉंग्रेसचा एक नम्र सेवक म्हणून मी इतकेच सांगू शकतो की आतापर्यंत विदेशी शक्तीशी झगडणे हेच कॉंग्रेसचे कार्य होते. आम्ही बंडखोर झालो आणि त्या सत्तेला पदच्च्युत केले. बाह्यतः आम्ही सत्य आणि अहिंसेचे पालन केले. परंतु आमच्या आत हिंसा खदखदत होती. आम्ही ढोंगीपणाचे वर्तन केले आणि परिणामी आम्हाला परस्परातील संघर्षाच्या वेदना सहन कराव्या लागल्या. आजसुद्धा आपण अशा वृत्तीचे पोषण करत आहो की जिची परिणती युद्धात होईल. आणि हा लोंढा थांबवला नाही तर आपण स्वतःला अशा संघर्षात सापडलो असल्याचे पाहू की ज्यात १८५७पेक्षाही जास्त रक्तपात होईल. त्या वेळी भारत पुरेसा जागा झालेला नव्हता आणि ते बंड शिपायांपुरतेच मर्यादित होते. आपण काही केले असेल तर इंग्रजांचे गळे कापले. अखेरीस ब्रिटिश सैन्याने बंडखोरांवर विजय मिळवला. सध्याचा संघर्ष असे भयानक रूप धारण न करो हीच ईश्वराला प्रार्थना. यामुळे सत्य आणि अहिंसेबद्दलचा आदर म्हणूनच नाही तर देशहितास्तवही, ज्याकरिता शेकडो हजारो लोक तुरुंगात गेले आणि छळ सहन केला, मी तुम्हाला विनंती करीन की युद्धप्रवण होऊ नका. असे केल्यामुळे तुम्ही केवळ देशाचे स्वातंत्र्यच गमावणार नाही तर तुम्ही त्याला परत गुलामगिरीत पाठवाल. इंग्लंड, रशिया, अमेरिका अथवा चीन - यापैकी कोणताही देश हल्ला करून आपल्याला गुलाम करू शकतो. १५ ऑगस्टला हिंदू आणि मुसलमान आणि यांच्यात लढाई सुरू असल्याच्या आणि या दोन युद्धखोरांमध्ये शीख चिरडले जात असल्याच्या दृश्याचे तुम्ही साक्षी होऊ इच्छिता काय? यापेक्षा भूकंप होऊन त्यात चिरडून जाऊन आपला सगळ्यांचा मृत्यू झालेला मी पसंत करीन. आणि ज्याअर्थी कॉंग्रेस सर्व भारताची आहे त्याअर्थी तिने हिंदू, मुसलमान, पारसी, शीख इत्यादी सर्व समुदाय सुखासमाधानात कसे राहतील हे पाहिले पाहिजे. मुसलमानांचे तुम्ही तुष्टीकरण करण्याचा प्रयत्न करावा वा तुम्ही भेकड व्हावे असे मी तुम्हाला सुचवत नाही. मी कधीही भ्याडपणाचा पुरस्कार केला नाही. आपण शौर्याने लोकांना शांत केले पाहिजे. कॉंग्रेसचा हा मुख्य कार्यक्रम असेल.

मी जरी हिंदी साहित्य संमेलनाचा दोनदा अध्यक्ष झालो असलो तरी माझे निश्चित मत आहे की देवनागरी लिपीतील हिंदी कधीही भारताची राष्ट्रभाषा होऊ शकत नाही. आज अनेक पुढारी म्हणतात की गांधी मूर्खपणाचे बोलतो. तो नेहमी मुसलमानांचे तुष्टीकरण करायचा प्रयत्न करतो. परंतु दोन राष्ट्रांबद्दल बोलताना जिनासाहेब म्हणायचे की गांधी उर्दूला नष्ट करायला निघाला आहे. अशा

प्रकारे आज मला दोन्ही भाषांचा शत्रू समजण्यात येते. परंतु मला दोघांचाही मित्र राहायचे आहे. भारताचा जर कोणी खरा मित्र असेल तर गांधी आहे असा जो माझा दावा होता तो फोल ठरेल. आजसुद्धा मी असे अनेक हिंदू दाखवून देऊ शकतो की ज्यांना हिंदी भाषा आणि देवनागरी लिपी दोन्हीही येत नाहीत. जर हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारसी आणि शीख या सर्वांनी एकत्रित राहायचे असेल तर आपल्याला अशी भाषा राष्ट्रभाषा म्हणून स्वीकारावी लागेल की जी हिंदी आणि उर्दूचे मिश्रण असेल. तुम्ही जी भाषा बोलताहात ती महान भाषा बनू शकते याबद्दल मला कोणताही संशय नाही.

इंडोनेशियाचे पुढारी शहरियार हे इथे भेटीकरिता आले आहेत. ते जवाहरलाल नेहरू आणि श्रीयुत जिना यांना भेटणार आहेत. भारत त्यांना नैतिक पाठिंबा देऊ शकतो जो सैनिकी मदतीपेक्षाही अधिक प्रभावी असू शकतो.

एका इंग्रज गृहस्थाने एक पत्र पाठवले. त्यात ते म्हणतात की आता भारताची फाळणी झालेली असल्यामुळे त्याला महान राष्ट्राचा दर्जा मिळणार नाही. हे दोन भाग परस्परांशी मित्रत्वाच्या नात्याने राहिले तर या गोष्टीशी मी सहमत होणार नाही.

(हिंदीवरून)

प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ २७४-७

# ७९. प्रार्थना प्रवचन, जुलै २५, १९४७

नवी दिल्ली,

जुलै २५, १९४७

बंधूभगिनींनो,

राजेंद्रबाबूंनी मला सांगितले की गायींची कत्तल थांबवावी म्हणून त्यांना जवळपास ५०,००० पोस्टकार्ड, २५ ते ३० हजारच्या दरम्यान लिफापे आणि अनेक हजार तारा मिळाल्या आहेत. मी यासंबंधी याआधी तुमच्याशी बोललो आहे. पत्रे आणि तारांचा हा पूर कशाकरिता? त्यांचा काहीही परिणाम होणार नाही. मला अजून एक तार आली आहे. तिच्यात म्हटले आहे की गोहत्याबंदीच्या कारणाकरिता एका मित्राने उपोषणास सुरुवात केली आहे. भारतात गायींच्या कत्तलीच्या विरोधात कोणताही कायदा करता येऊ शकत नाही. हिंदूना गोहत्येची मनाई आहे यासंबंधी मला संशय नाही. किती तरी काळापूर्वीपासूनच मी गोसेवेचे व्रत घेतले आहे, परंतु माझा धर्म इतरांचा धर्म कसा होऊ शकतो? जे हिंदू नाहीत त्यांच्यावर बळजबरी असा याचा अर्थ होईल. धर्माच्या बाबतीत कोणतीही बळजबरी होणार नाही असे आम्ही डांगोरा पिटून घोषित करून सर्व जगाला सांगितले आहे. प्रार्थनेमध्ये आम्ही कुराणमधील आयती म्हणतो. परंतु जर कोणी या आयती म्हणण्याकरिता माझ्यावर बळजबरी केली तर मला ते आवडणार नाही. ज्याला स्वतःलाच गोहत्या करावीशी वाटत नाही अशा माणसाला सोडून इतरांवर गायीची कत्तल करू नका अशी बळजबरी मी कसा काय करू शकतो? असे काही नाही की भारतीय संघराज्यात केवळ हिंदूच आहेत. इथे मुसलमान, ख्रिश्चन, पारसी आणि इतर धर्मांचे गटही आहेत, भारत आता हिंदूंचा देश झाला आहे असे जे हिंदूंनी गृहीत धरले आहे ते चूक आहे. जे कोणी इथे राहतात त्यांचा भारत आहे. आपण जर इथे कायद्याने गोहत्या थांबवली आणि नेमके उलट पाकिस्तानमध्ये घडले तर त्याचे काय परिणाम होतील? समजा की हिंदूंना देवळात जाण्याचा अधिकार नाही कारण असे करणे शरियत वा मूर्तीपूजेच्या विरुद्ध आहे असे जर ते म्हणाले तर? मला दगडातही देव दिसतो परंतु या माझ्या श्रद्धेने मी इतरांना कसा काय इजा पोहोचवू शकतो? मला देवळात जाण्यापासून जरी अडवण्यात आले तरी मी तिथे जाईन. यामुळे या तारा आणि पत्रे पाठवणे थांबवण्यात यावे. यावर पैसे खर्च करण्यात अर्थ नाही.

याशिवाय काही श्रीमंत हिंदू स्वतःच गोहत्येला प्रोत्साहन देतात. ते ते काम स्वतःच्या हाताने करत नाहीत. परंतु ज्या ऑस्ट्रेलिया आणि इतर देशांमध्ये गायींची कत्तल होते आणि गायीच्या

चामड्यापासून जोडे बनवण्यात येऊन ते भारतात परत पाठवण्यात येतात तिथे या सर्व गायी कोण पाठवतो? मला एक सनातनी वैष्णव हिंदू माहीत आहे. ते त्यांच्या मुलाना गोमांसाचे सूप देत असत. मी त्यांना विचारले असता ते म्हणाले की औषध म्हणून गोमांसाचे सेवन करण्यात कोणतेही पाप नाही. खरा धर्म काय आहे याचा विचार न करता कायद्याने गोहत्या बंद करावी याकरिता आपण केवळ आरडाओरड करत असतो. खेड्यांमध्ये हिंदू बैलांना इतके मोठे ओझे वाहायला लावतात की त्या ओझ्याखाली ते जनावर जवळपास चिरडून जाते. हळूहळू करण्यात आलेली का असेना ती गोहत्या नाही काय? यामुळे या बाबीकरिता घटनासमितीवर दडपण आणण्यात येऊ नये असे मी तुम्हाला सुचवीन.

जिथे झाडे भरपूर आहेत, तिथे पाऊससुद्धा भरपूर पडत असतो. गायीच्या कासेतील दूध आपण जसे काढतो तसा जंगलातील झाडांचा पालापाचोळा पर्जन्ययुक्त ढगांना आपल्याकडे ओढतात. जिथे झाडे नाहीत तिथे पाऊस नाही आणि मग तेथील जमीन लवकरच वाळवंट बनते हा निसर्गनियम आहे. मी जोहानिसबर्गमध्ये अनेक वर्षे घालवली आहेत. तेथील हवामान अतिशय आरोग्यवर्धक आहे. त्यांनी तिथे झाडे लावल्यानंतर पाऊससुद्धा अनुकुल पडू लागला. यामुळे दिल्लीतील अधिकाऱ्यानी झाडे लावण्याचा जो कार्यक्रम सुरू केला आहे तो फार चांगला आहे. ज्यांच्याजवळ मोकळी जागा नाही तेसुद्धा मातीच्या कुंड्यात भाजीपाला उगवू शकतात.

मला विचारण्यात आले की 'मुसलमानांतर्फे अत्याचार करणे सतत सुरूच असल्यामुळे कोणत्या मुसलमानावर विश्वास ठेवावा, भारतीय संघराज्यातील मुसलमानांबद्दल आपली भूमिका काय असावी, पाकिस्तानमधील मुसलमानेतरांनी काय करावे?'

या प्रश्नाचे उत्तर मी आधीच दिलेले आहे. मी परत सांगतो की आज भारतातील सर्व धर्मांची परीक्षा सुरू आहे. शीख, हिंदू, मुसलमान आणि ख्रिश्चन इत्यादी विविध धार्मिक समूह कसे वागतात आणि भारतातील प्रश्नांची सोडवणूक कशी करतात हे पाहायचे आहे. पाकिस्तान मुसलमानांचा आहे असे जरी पाकिस्तान म्हणत असेल तरी भारतीय संघराज्य सर्वांचे आहे. तुम्ही जर भेकडपणा टाकून दिला आणि शूर झालात तर मुसलमानांशी कसा व्यवहार करावा हा प्रश्न तुम्हाला पडणार नाही. परंतु आज आपल्यात भेकडपणा भरलेला आहे. याचा दोष मी आधीच मान्य केलेला आहे. माझी ३० वर्षांची शिकवणूक इतकी प्रभावशून्य का राहिली याचा मी अजूनही विचार करतो आहे. पहिली गोष्ट म्हणजे अहिंसा हे भित्र्यांचे शस्त्र असू शकते असे मी का गृहीत धरले? जर आताही आपण खरोखर शूर होऊ शकलो आणि मुसलमानांवर प्रेम करू शकलो तर मुसलमानांना थांबावे लागेल आणि आपला विश्वासघात करून आपण काय मिळवू याचा विचार करावा लागेल. ते प्रेमाची परतफेड

प्रेमाने करतील. करोडो मुसलमानांना भारतीय संघराज्यात आपण गुलाम म्हणून ठेवू शकतो काय? जो इतरांना गुलाम करतो तो स्वतःही गुलाम होत असतो. आपण जर तलवारीला तलवारीने, लाठीला लाठीने आणि लाथेला लाथेने उत्तर दिले तर पाकिस्तानमध्ये वेगळे काही घडेल अशी अपेक्षा आपण करू शकत नाही. असे झाले तर ज्या सहजपणे आपण स्वातंत्र्य मिळवले त्याच सहजपणाने ते गमावू.

भारत आणि पाकिस्तानच्या भावी सरकारांनी जारी केलेले वक्तव्य मला आवडले. परंतु ते प्रत्यक्षात आणले गेलेले पाहण्याची माझी इच्छा आहे. ते काहीही असले तरी वक्तव्यात जे सांगितले आहे त्याची पाकिस्तानमध्ये अंमलबजावणी होणार नाही असे आपण गृहीत धरू शकत नाही. असे गृहीत धरणे म्हणजे युद्धाची तयारी करणे. दोन सैन्य परस्परांशी युद्ध करतील तर जिनांचा द्विराष्ट्र सिद्धांत खरा असल्याचे सिद्ध होईल. अशा परिस्थितीत आम्हाला ढकलू नये अशी मी ईश्वराला प्रार्थना करतो.

प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ २७७-८०

# ८०. प्रार्थना प्रवचन, जुलै २६, १९४७

नवी दिल्ली,

जुलै २६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला व्यक्तिशः वाटते की बॅरिस्टर आणि भंग्याला समान पगार मिळायला हवा. परंतु हे सांगणे सोपे आहे करणे कठीण. आणि ही गोष्ट अशी नाही की जी संप करून साध्य करता येऊ शकते. वेतन आयोगाने शिफारस केलेल्या पगारवाढीचे कारण समजून घेऊन सध्या वाढवलेले पगार आपण मान्य केले पाहिजे. (भारत सरकारने नेमलेल्या केंद्रीय वेतन आयोगाचा अहवाल मे १६, १९४७ला घोषित करण्यात आला होता त्यात किमान मूळ मासिक पगार ३० रुपये आणि अधिकाधिक पगार दर महा २,०००रुपये ठरवण्यात आला होते व त्यात काही निवडक पदांच्या बाबतीतच सूट दिली जाऊ शकणार होती. हे त्या घोषणेतील प्रमुख प्रस्ताव होते. आणि नंतर समान वेतनाच्या बाजूने जनमत तयार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.) संपांनासुद्धा एक तर्कशास्त्र लागू असते. अविचाराने केलेल्या संपातून काहीही साध्य होऊ शकत नाही. पण आज दुर्दैवाने संपांनी देश व्यापला गेला आहे. जिथे लोकांचे स्वतःचे सरकार आहे तिथेही संप आहेत. मला वाटते ब्रिटिश सरकार असताना इतके संप नव्हते. आज मला कलकत्त्याहून एक तार आली आणि वृत्तपत्रातूनही मी पाहिले की महालेखागाराच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी लेखणीबंद संप पुकारला आहे. या संपात डाक आणि तार विभागाचे कर्मचारी आहेत. हा विभाग एखाद्या व्यक्तीच्या हिताकरिता काम करत नसतो तर समाजाच्या हितार्थ काम करत असतो. हे खरे आहे की त्याच्या काही मोठ्या अधिकाऱ्यांना गलेलठ्ठ पगार मिळतो आणि खालच्या पदावरील कर्मचाऱ्यांना अतिशय कमी पगार मिळतो. हे अन्याय्य आहे. पागारांत इतके जे अंतर दिसते आहे ते का असावे? ही गोष्ट ब्रिटिशांनी सुरू केली आहे आणि ती सुरू ठेवण्यात आपल्याला आनंद वाटतो. परंतु लोकांनी आपली लेखणी जर बंद केली तर भारताचे काय होईल? संपांच्या माध्यामातून त्यांनी थोडीशी पगारवाढ मिळवली तरी ती काही महान गोष्ट होणार नाही. ही पद्धत चुकीची आहे आणि देशाकरिता हानिकारक आहे. भारताच्या सध्याच्या दुरावस्थेवरून मला सोन्याचे अंडे देणाऱ्या हंसाची गोष्ट आठवते. हंसीणीच्या मालकाला हंसीणीपासून मिळणारी सर्व अंडी एकदम हवी असल्यामुळे तो तिला मारून टाकतो. परिणामी त्याला अधिक अंडी तर मिळतच नाहीतच उलट तो हंसीणीलाही गमावतो. आपल्या हाती आलेले प्रशासन हे काही प्रमाणात त्या हंसीणीप्रमाणे आहे. आपण जर तिची सर्व अंडी एकदम घेण्याचा प्रयत्न केला

तर खात्रीपूर्वक ती हंसीणी आपण मारू. मी पूर्वीच सांगितल्याप्रमाणे संपामागे तर्कशास्त्र असते. संपाच्या शस्त्राचा पहिला प्रयोग मी दक्षिण आफ्रिकेत केला. तिथे भारतीयांना हमालाप्रमाणे वागवण्यात येत होते. तिथे संपाला अर्थ होता कारण त्यांचे म्हणणे ऐकले जाण्याकरिता अजून कोणताही मार्ग नव्हता. अशा प्रकारे संपांना तेव्हाच अर्थ असतो जेव्हा आपले म्हणणे एकवले जाण्याकरिता इतर कोणताही मार्ग नसतो. यामुळे ज्या कोणाला संपाबद्दल काही तरी माहिती असेल तो संप करणाऱ्या प्रत्येकाला इतकेच सांगेल की तुम्ही निवडलेला मार्ग चुकीचा आहे आणि त्यामुळे तुम्ही तुमचीच हानी कराल. भारताची आधीच फाळणी झाली आहे आणि जर संप सुरू राहिले तर भारताचे काय होईल हे केवळ ईश्वारालाच माहीत असेल. आपण जे काम करत होतो ते करत राहणे आपले कर्तव्य आहे. वेतन आयोगाच्या शिफारसीमुळे कमी पगार असलेल्या कर्मचाऱ्यांचा पगार बराच वाढला आहे. तुम्ही जर जास्त आणि जास्त पगाराची मागणी करत राहाल तर भारत दिवाळखोरीत जाईल. हे खरे आहे की सरकारला महसुलाद्वारे कोट्यवधी रुपये मिळतात परंतु तो पैसा काही निवडक लोकांच्या फायद्याकरिता खर्च करता येऊ शकत नाही. ज्या ग्रामीण लोकांकडून तो पैसा येतो त्यांच्यावर त्यातील फार मोठा भाग खर्च झाला पाहिजे.

नुकताच मुबईत कामगारांचा संप झाला होता. तेथील सरकारने कामगारांना आधीच एक दोन कोटी दिले आहेत. परंतु तेवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही आणि आपली शक्ती दाखवण्याकरिता त्यांनी संप केला. जे काही देण्यात आले ते त्यांनी स्वीकारायला पाहिजे होते आणि आपली शक्ती दाखवण्याकरिता प्रतिकात्मक संप करायला पाहिजे होता. त्यांना जे काही मिळाले होते त्याचा त्यांनी स्वीकार करायला पाहिजे होता आणि आपल्या बाजूने जनमत निर्माण करायचा प्रयत्न करायला पाहिजे होता. परंतु त्यांनी संपाचा मार्ग स्वीकारला. कॉंग्रेसची आधीच अनेक गटात विभागणी झाली आहे आणि मला असे सांगण्यात आले आहे की यांतील एक गटच या संपाच्या मागे आहे. या प्रतिकात्मक संपांमुळे जरी एकदोन तासच वाया जात असले तरीसुद्धा त्यातून एक विशेष प्रकारचा उद्धटपणा दृष्टीस पडतो. असे संप संघटित करणाऱ्या पक्षाला आपली कामगारांवर किती पकड आहे हे दाखवायचे असते. अशा संपातून याशिवाय दुसरा कोणता हेतू साध्य होऊ शकतो? अशा संपातून देशाचा कोणताही लाभ होऊ शकत नाही. यामुळे मुंबईच्या कामगारांनी जे केले ते मला चूक वाटते.

अशा संपांमधून आपण आपला विनाश करून घेतलाच पाहिजे काय? अशा संपांमागील हेतू देशसेवा नसतो तर सरळ आणि सुद्ध स्वार्थ असतो. ब्रिटिशांनी अजून देश सोडायचाच आहे. देशाचे लगाम अजून आपल्या हाती आलेलेच नाहीत आणि आपण पैशाकरिता भांडू लागलो आहोत. तत्त्वतः बॅरिस्टर आणि भंगी यांचा समान पगार असावा असे माझे मत आहे. परंतु बॅरिस्टरमध्ये

आपल्याकरिता अधिक पगार हिसकावून घेण्याची शक्ती असते आणि आपण ते आनंदाने मान्य करतो. मीसुद्धा एके काळी बॅरिस्टर होतो परंतु अशा प्रकारे पैसा कमावण्याची कल्पना मला घृणास्पद वाटू लागली आणि मी भंगी झालो. परंतु राज्यपाल, बॅरिस्टर, व्यापारी आणि अशाच प्रकारची कमे करण्याची क्षमता असलेले लोक आपण कुठे शोधायचे? आणि भंग्याला मिळणाऱ्या पगाराने कोणाचे समाधान होणार आहे? इतकेच नाही तर शिंपीसुद्धा ४-५ रुपये रोज कमावू शकतो. परंतु भंग्याला इतका पगार कोण देईल? आज माणसाने आपला स्वभाव बदलवण्याची गरज आहे, अंगी उदारपणा बाणवण्याची गरज आहे आणि आपल्या स्वार्थसिद्धीकरिता आपण इतरांचे गळे कापायला नको. ब्रह्मदेशातील हत्याकांडाने जर आपण काही शिकणार नसू तर भारत आणि जग यांची दुरावस्था कशी होईल?

प्रार्थनाप्रवचन - १, पृष्ठ २८१- ३.

# ८१. प्रार्थनाप्रवचन, जुलै २७, १९४७

नवी दिल्ली, जुलै २७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

भारतात ८००हून अधिक संस्थाने आहेत. त्यातील काही फार मोठी आणि काही फार लहान आहेत. इतक्यातच व्हाईसरायनी संस्थानिकांना दिल्लीला बोलावले. आतापर्यंत संस्थाने ब्रिटिश साम्राज्याच्या संरक्षक छत्राखाली काम करत होती परंतु आता ते संरक्षण काढून घेण्यात आले आहे. व्हाईसराय त्यांच्याशी अतिशय सौजन्यपूर्वक बोलले. त्यांचे भाषण मला आवडले. तुम्ही एक तर भारतात वा पाकिस्तानमध्ये सामील व्हावे असा सल्ला त्यांनी संस्थानिकांना दिला. त्यांचे भाषण थोडक्यात होते. त्यांनी आपल्या दीर्घ भाषणात संस्थानातील जनतेचा उल्लेखसुद्धा केला नाही या त्यांच्या भाषणातील गोष्टीने मी दुखावलो. ब्रिटिश सरकारचे संबंध संस्थानाच्या संस्थानिकांशी होते. संस्थानातील जनतेला त्या संबंधात कुठेही स्थान नव्हते. यामुळे ब्रिटिशांचे श्रेष्ठत्व जेव्हा संपले व ब्रिटिश सरकारचा हस्तक्षेपाचा अधिकार संपला तेव्हा संस्थाने कायदेशीरपणे स्वतंत्र झाली. परंतु असे असले तरी शासकांचे काही कर्तव्य आणि जबाबदाऱ्या असतात. संस्थानातील जनतेवर बंदूकीच्या धाकावर राज्य करता येऊ शकत नाही. आणि ब्रिटिशांकडून यापुढे त्यांना संरक्षण मिळू शकणार नाही. कोचीनसारख्या काही मोठ्या संस्थानांचे उदाहरण घेऊ या. त्याला फार मोठा समुद्रकिनारा मिळाला आहे. आपल्या संरक्षणाकरिता ते सर्व जगाशी करार करू शकत नाही आणि ही गोष्ट त्यांच्या निदर्शनास आणून देणे व्हाईसरायचे कर्तव्य होते. व्हाईसरायनी आपल्या भाषणात संस्थानातील लोकांचा उल्लेख केला असता तर मला आनंद झाला असता. माझा जन्म काठेवाड संस्थानात झालेला असल्यामुळे संस्थानाची प्रजा म्हणून या विषयावर मला काही बोलण्याचा अधिकार आहे. पूर्वी संस्थानिकाला दिवाण नेमण्याकरिता बराच पैसा द्यायचा असेल तर त्याला व्हाईसरायची परवानगी घ्यावी लागायची. त्यांना असे करणे अर्थातच आवडत नसे. यामुळे आता जर ते ब्रिटिशांच्या संरक्षणापासून वंचित झाले असतील तर ते आता ब्रिटिशांच्या दडपणापासूनही मुक्त झाले आहेत. परंतु आता त्यांच्यावर त्यांच्या जनतेचे दडपण आहे. यामुळे संस्थानिकाना शासक म्हणून राहायचे असेल तर ते जनतेचे सेवक म्हणूनच राहू शकतात. प्रशासनाच्या कामात त्यांनी आपल्या प्रजामंडळाचा सल्ला आणि सहकार्य घ्यायला पाहिजे. हे खरे आहे की प्रजामंडळाला प्रशासनाच्या कामाचा अनुभव नाही. परंतु केंद्रीय सरकारच्या नेत्यांनाही प्रशासनाचा पुर्वानुभव नाही. याचा अर्थ असा नाही की शासकांनी २०-२५ लोकांना नामित करून त्यांना प्रजामंडळ म्हणून

संबोधायचे. त्यांना जे काही करायचे आहे ते त्यांनी प्रामाणिकपणे करावे. पाकिस्तान वा भारतीय संघराज्यात त्यांच्या सामील होण्याबद्दल बोलायचे तर त्यांच्या भौगोलिक स्थानाला महत्त्व दिले पाहिजे. गुजराथ वा काठेवाडमधील संस्थान स्वतःचे सामिलीकरण बंगालमध्ये करू शकत नाही. अशा प्रकारे भौगोलिक मर्यादांकडे संस्थाने दुर्लक्ष करू शकत नाहीत.

ब्रिटिशांकडे इतक्या दीर्घ काळापासून जे आधिपत्य होते ते आता भारत वा पाकिस्तानकडे हस्तांतरित झाले नाही असे ब्रिटिश म्हणाले नाही ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. यामुळे भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांकरिता समस्या कठीण झाली आहे. संस्थांनिकांची आता परीक्षा आहे हे मी सांगायलाच पाहिजे. ते सत्ताधारी राहू शकतात परंतु वास्तवात त्यांनी जनसेवकच राहायला पाहिजे.

व्हाईसरायनी माझ्याकडे काही तक्रार केली म्हणून वा जवाहरलाल वा राजेंद्र बाबू यांनी काही सांगितले म्हणून मी असे म्हणत नाही. सत्य हे आहे की भारत सरकार वा पाकिस्तान सरकार पुढे काय करणार आहेत याकडे आता जनता पाहत आहे.

परंतु संस्थानातील लोकांची दुरावस्था का? येऊ घातलेल्या स्वातंत्र्यामुळे ते खुष आहेत काय? स्वातंत्रदिनाचा सोहळा ते साजरा करतील काय? माझ्याबद्दल बोलायचे तर मी त्या दिवशी उपास करीन आणि 'हे देवा आता भारत स्वतंत्र झाला आहे तर त्याचा आता विनाश करू नकोस' अशी प्रार्थना मी करीन.

देशाच्या एकचतुर्थांश क्षेत्रफळ संस्थानांचे आहे. संस्थानांमधील १५ कोटी प्रजा १५ ऑगस्ट हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा करील काय? यापुढे आम्ही जनतेचे सेवक राहू असे जर संस्थानिकांनी जाहीर केले तर सर्व काही ठीक होईल. तसे झाले तर ते जो महसूल गोळा करतील तो जनतेच्या उन्नतीकरिता असेल. ते तो महसूल १० पटीने परत करतील परंतु असे ते पैशाच्या स्वरूपात नाही तर शाळा, रुग्णालये, रस्ते, बागा आणि सार्वजनिक क्रिडांगणांच्या स्वरूपात करतील.

जवाहरलाल आणि सरदार यांनी व्हाईसरायच्या भाषणाबद्दल कोणतेही भाष्य केलेले नसले तरी मनातून ते त्याबद्दल फारसे खुष असू शकत नाहीत. परंतु आपण आपल्या अंतःकरणात विष का राहू द्यावे? तो असा खेळ आहे की ज्यात आपण आपली सर्व पाने टेबलवर पसरवून ठेवायची असतात. जेव्हा आपल्या अंतःकरणात कोणतीही विषारी भावना नसेल तेव्हाच खऱ्या अर्थाने आपण स्वातंत्र्यदिन म्हणून १५ ऑगस्ट साजरा करू शकू.

(हिंदीवरून). प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २८४-६

# ८२. प्रार्थना प्रवचन, जुलै २८, १९४७

नवी दिल्ली,

जुलै २८, १९४७

बंधूनो आणि भगिनींनो,

आज मी काही प्रश्नांची उत्तरे देईन.

***प्र. १५ ऑगस्टनंतर दोन देशात दोन कॉंग्रेस असतील की केवळ एक , की एकही कॉंग्रेस असणार नाही?***

उत्तर - मला असे वाटते की त्यावेळी कॉंग्रेस सारख्या संघटनेची अधिक गरज असेल. तिच्या कार्यक्रमात बदल केला जाईल यात काही संशय नाही. कॉंग्रेसने द्विराष्ट्र सिद्धांत काही मूर्खपणाने स्वीकारलेला नाही. संपूर्ण देशात एकच कॉंग्रेस असेल. भारताची फाळणी म्हणजे कॉंग्रेसची फाळणी असा अर्थ होत नाही. भारताची दोन सार्वभौम देशांमध्ये फाळणी झाली याचा अर्थ भारत दोन राष्ट्र आहे असा अर्थ होत नाही. समजा की एखाददुसरे संस्थान भारतीय संघराज्याबाहेर राहिले तर कॉंग्रेस तेथील प्रतिनिधींना कॉंग्रेसमधून बाहेर काढेल काय? आपल्या हिताकडे अधिक लक्ष दिले जावे अशी संस्थानातील लोकांची अपेक्षा राहणार नाही काय? यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या अर्थातच बऱ्याच मोठ्या असतील आणि त्यातील काही सोडवणे अधिक कठीण होते. परंतु तरीही कॉंग्रेसचे दोन भागात तुकडे करण्याचे काही कारण दिसत नाही. त्याकरिता अधिक चातुर्य, अधिक गंभीर विचार आणि किती तरी जास्त धैर्याने काम करण्याची व निर्णय घेण्याची गरज असेल.

***प्र. - आता कॉंग्रेस सांप्रदायिक संघटना होईल काय? ज्याअर्थी मुसलमान स्वतःला वेगळे राष्ट्र समजतात त्याअर्थी आपणही स्वतःला प्रांजळपणे हिंदू भारत म्हणायला पाहिजे व देशावर हिंदुत्वाचा खोलवर ठसा उमटवला पाहिजे अशी मागणी जोरात होत नाही काय?***

उ. - या प्रश्नातून अभावितपणे घोर अज्ञान दिसून पडत आहे. कॉंग्रेस हिंदूंची संघटना कधीही होऊ शकत नाही. जे तिला अशी करायचा प्रयत्न करतील ते भारताची आणि हिंदुत्वाची फार मोठी हानी करतील. भारत कोट्यवधी लोकांचा देश आहे परंतु त्यांचा आवाज ऐकला जात नाही. दोन राष्ट्रांसबंधी तावातावात बोलणारे लोक केवळ शहरात राहणारे आहेत. त्यांचा आवाज म्हणजे देशातील कोट्यवधींचा आवाज असे समजण्याची चूक आपण करू नये. याशिवाय भारतातील मुसलमानांनी आम्ही भारतीय नाही असे कधीही म्हटले नाही आणि हिंदू धर्मात कितीही दोष असले

तरी त्याने वेगळेपणाला कधीही प्रोत्साहन दिले नाही. विविध धर्मांचे अनुसरण करणाऱ्या लोकांच्या मिश्रणाने भारत हा देश बनला आहे आणि ते सर्व भारताचे नागरिक आहेत आणि कोणत्याही वर्गाला दुसऱ्यावर वर्गावर जुलूम करण्याचा अधिकार नाही. तलवार वा संख्येद्वारे मिळवण्यात आलेली शक्ती खरी शक्ती नसते. सत्य ही खरी शक्ती आहे.

***प्र. - पाकिस्तानच्या ध्वजाबद्दल मुसलमानेतरांनी कोणती भूमिका घ्यावी?***

उ. - पाकिस्तानचा ध्वज काही काळाकरिता तरी मुस्लीम लीगचा ध्वज असेल. मुस्लिम लीग जर इस्लामचे प्रतिनिधित्व करत असेल तर मग जगातील सगळ्या मुसलमानांचा एकच ध्वज असला पाहिजे आणि जे लोक इस्लामचे विरोधक नाहीत त्यांनी त्या ध्वजाचा आदर केला पाहिजे. इस्लाम, हिंदू धर्म, ख्रिश्चन धर्म यांचे ध्वज मला माहीत नाही. जर पाकिस्तानचा ध्वज पाकिस्तानमधील सगळ्या लोकांचे प्रतिनिधित्व करत असेल तर मग त्याचा कोणताही रंग असला तरी मी त्याला वंदन करीन आणि तसेच तुम्ही करायला पाहिजे. वेगळ्या शब्दांत हे दोन सार्वभौम राष्ट्र परस्परांचे शत्रू होऊ शकत नाहीत.

दक्षिण आफ्रिकेचे राज्य भारतासंबंधी कोणती भूमिका घेते याकडे मी बारकाईने आणि त्याहूनही अधिक भीतीने पाहत आहे. अजूनही दक्षिण आफ्रिकेतील गोरे एकाच डब्यात भारतीयांबरोबर प्रवास करण्याला नकार देतात काय?

(हिंदीवरून). प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २८६-८

# ८३. प्रार्थना प्रवचन, जुलै २९, १९४७

नवी दिल्ली,

जुलै २९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज मला तुमच्याशी अनेक महत्त्वाच्या गोष्टी बोलायच्या आहेत. मी काश्मीरला जावे असे मला सांगण्यात आले आहे. मला विशेषतः तिथे जाण्याची इच्छा नाही आणि असूही नये. हिमालयाच्या शिखरांनी घेरलेले ते सुंदर स्थळ आहे. परंतु जगात अनेक इतर सुंदर ठिकाणे आहेत आणि अनेक पवित्र सथ्ळे आहेत. एके काळी मला काश्मीरला जावेसे वाटत होते. काश्मीरच्या महाराजांनी मला आमंत्रण दिले होते (१९३८ साली) आणि सर गोपालस्वामी अय्यंगार त्यांचे प्रधानमंत्री होते. परंतु ईश्वराची इच्छा असेल तेव्हाच मी काश्मीरला जाऊ शकतो.

काही दिवसांपूर्वी पंडित जवाहरलाल नेहरू यांना काश्मीरमध्ये स्थानबद्ध करण्यात आले होते (जून १९४६मध्ये, पाहा “जवाहरलाल नेहरू यांना लिहिलेल्या उत्तराचा मसुदा”, जून २१, १९४६ आणि “प्रार्थना प्रवचन, जून २२, १९४६”) तेव्हा आपल्याला इथे त्यांची गरज होती. मौलाना आझाद कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. जवाहरलालनी काश्मीरमधून परत यावे अशी त्यांची इच्छा होती. लॉर्ड वेव्हेल यांनासुद्धा जवाहरलालची सल्लामसलतीकरिता गरज वाटत होती आणि वेव्हेल आणि मौलाना साहेब हे दोघेही चिंतित होते. त्यानंतर मौलानांनी जवाहरलालना निरोप पाठवून कळवले की तुम्ही हाती घेतलेले कार्य कॉंग्रेसचे कार्य आहे आणि कॉंग्रेसला तुमची गरज असताना शिस्त म्हणून तुम्ही परतणे तुमचे कर्तव्य आहे. जवाहरलालनी हे मान्य केले परंतु मी परत काश्मीरला जाईन असे ते म्हणाले. मौलाना म्हणाले की हे प्रकरण आपण नंतर घेऊ शकतो आणि आवश्यकता पडली तर ते मला पाठवू शकतात. मीसुद्धा जवाहरलालला सांगितले की नंतर तुला हे करण्यापासून कोणीही अडवू शकत नाही.

आता सरकार बदलले आहे, व्हाईसराय बदलले आहेत. मी म्हणालो की जवाहरलाल जे करत आहे त्यात अडथळा येऊ नये म्हणून मी काश्मीरला जाण्याकरिता तयार आहे. परंतु त्यात किती तरी गुंतागुंत आहे आणि मी म्हणालो की व्हाईसरायनी मला जाण्याचा सल्ला दिला तरच मी जाईन. व्हाईसरायनी (त्याच दिवशी आधी दिलेल्या मुलाखतीसंबंधी व्हाईसरायनी पाठवलेली चिठ्ठीकरिता पाहा परिशिष्ट “लॉर्ड मौऊंटबॅटन यांचे गांधीजींच्या मुलाखतीसंबंधी केलेले टिपण”, जुलै २९,

१९४७) मला सांगितले की ते स्वतःच काश्मीरला जाणार आहेत आणि यामुळे मी काश्मीरला जाण्याचा बेत स्थगित करू शकतो. यामुळे मी गेलो नाही. आणि आता परिस्थिती अशी आहे की एक तर मी अथवा जवाहरलालने काश्मीरला जायला पाहिजे. ते जाऊ शकत नाहीत. इथे त्यांच्याकरिता किती तरी काम आहे. काश्मीरचे वातावरण अर्थातच फार चांगले आहे आणि जर ते तिथे गेले तर त्यांची प्रकृती सुधारेल. परंतु तिथे अजून किती तरी समस्या आहेत. अंतर्गत सरकार जर काश्मीरची सहल करत असेल तर काश्मीरचे भारतात विलिनीकरण करण्याचा ते प्रयत्न करत आहे असा त्याचा अर्थ केला जाईल. यामुळे मी तिथे जाणे उचित होईल.

काश्मीरला महाराज आहेत आणि महाराजांची प्रजाही आहे. भारतात सामील व्हायचे की पाकिस्तानमध्ये यासंबंधी मी महाराजांना सल्ला देणार नाही. माझा हा हेतू नाही. संस्थानाचे खरे सार्वभौम अधिकारी संस्थानाची जनता असते. सत्ताधीश जर जनतेचा सेवक नसेल तर तो खरा सत्ताधीश नसतो. माझी ही श्रद्धा आहे आणि ब्रिटिशांनी भारताचे सत्ताधारी असल्याचा दावा केला होता परंतु मी त्यांना सत्ताधीश मानायला नकार दिला आणि म्हणूनच मी बंडखोर झालो.

आता ते भारत सोडायच्या बेतात आहेत. जे सत्तेवर आले आहेत त्यांनी जनतेचे सेवक होण्याचे मान्य केले आहे. आता त्यांना विचार, वाणी आणि वर्तन या सर्वांतून जनतेचे सेवक व्हायचे आहे. माऊंटबॅटनची नियुक्ती राजाने केली म्हणून ते आता महाराज्यपाल होणार नाहीत तर आपण म्हणजे आपल्या अंतरिम सरकारला त्यांना महाराज्यपाल करण्याची इच्छा आहे म्हणून ते महाराज्यपाल होणार आहेत. एखाद्या हरिजन मुलीला महाराज्यपाल करावे असा माझा विचार होता. आपल्याला संस्थानिकांशी वाटाघाटी करायच्या आहेत आणि इतर अनेक समस्यांकडे लक्ष द्यायचे असल्यामुळे सध्याच्या परिस्थितीत हे शक्य नाही हे मी समजू शकतो. होय, जेव्हा लोकशाही राज्याची दृढपणे स्थापना होईल तेव्हा असे करणे शक्य होईल. व्हाईसरायच्या संरक्षणाखाली आतापर्यंत काश्मीरचे महाराज हवे ते करू शकत होते. आता सत्ता जनतेच्या हाती आहे. महाराजांची गैरसोय करावी अशी माझी इच्छा नाही.काश्मीरमधील पंडित आणि मुल्ला मला कमीत कमी नावाने ओळखतात. मी काश्मीरींना भरपूर पैसा दिला आहे. काश्मीरमध्ये शाली तयार करणे, कशिदाकाम वगैरे हस्तोद्योग चांगलेच विकसित झालेले आहेत. चरख्यानेसुद्धा तिथे चांगले काम केले आहे. काश्मीरचे गरीब लोक मला ओळखतात.

तुम्हाला पाकिस्तानमध्ये सामील व्हायचे आहे की भारतात हे काश्मीरच्या लोकांना विचारले पाहिजे. त्यांना जे ठरवायचे असेल ते ठरवू द्या. सत्ताधीश काहीही नसतो. जनता सर्व काही असते. राजा एक ना एक दिवस मरतो परंतु जनता कायम असते. हे सर्व मी पत्रव्यवहाराद्वारे का सांगू शकत

नाही याचे काही लोकांना आश्चर्य वाटते. परंतु असे असेल तर नोआखालीचे कामही मला पत्रव्यवहाराद्वारे करता यायला पाहिजे. मी काश्मीरमध्ये असेन तेव्हा मला सार्वजनिक स्वरूपात काहीही करायचे नाही. एवढेच नाही तर प्रार्थना जरी माझ्या जीवनाचा भाग असला तरी मी सार्वजनिक प्रार्थनाही करणार नाही.

आता माझा सल्ला आहे की १५ ऑगस्टला आपण उपवास आणि प्रार्थना करावी, शोक करायचा माझा हेतू नाही असे मी म्हणू शकेन. परंतु आपल्याजवळ अन्नधान्य आणि कपडे नाहीत ही निश्चितच दुःखाची गोष्ट आहे. माणसे माणसांना मारत आहेत. मारले जाण्याच्या भीतीने लाहोरमध्ये लोक घराबाहेर पडत नाहीत. आज अशी कोणतीही परिस्थिती नाही की जिचा आपण आनंद मानावा आणि मेजवान्या झोडाव्या.

६ एप्रिल १९१९ला संपूर्ण देश जागा झाला होता. परंतु त्या दिवशी कोणताही समारंभ करण्यात आला नव्हता. त्यावेळी हिंदू, मुसलमान आणि सर्वांना मी उपवास, प्रार्थना आणि कताई करायला सांगितले होते. ६ एप्रिलला जी उत्तेजना पाहायला मिळाली होती ती कदाचित आपल्याला परत पाहायला मिळणार नाही. आज तर लोकांनी उपवास करणे अधिक आवश्यक आहे. लाखो लोकांची उपासमार होते आहे. एक वेळ अशी होती की टिळक स्वराज फंडकरिता १ कोटी रुपये गोळा करणे कठीण होते. आपल्या हातात सत्ता नव्हती. आज आपल्या हातात अनेक कोटी रुपये आहेत. आपल्यावर फार मोठी जबाबदारी आहे. अशा वेळी आपण नम्र नसलो तर काय होईल? १५ ऑगस्टला जर गोडधोड केले आणि आधाशीपणे खाऊ लागलो तर १६ ऑगस्टला राजेन्द्र बाबू काय करतील? ते लोकांना काय खाऊ घालतील? यामुळेच मी म्हणतो की आपण तो दिवस उपवास, प्रार्थना आणि कताई करूनच साजरा केला पाहिजे. होय, आपण शोक करायला नको.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २८९-९१

## ८४. प्रार्थनेत भर घालण्याविषयी, ऑगस्ट ५, १९४७

(हे नोंदी या शिर्षकाखाली प्रकाशित झाले होते.)

श्रीनगरमध्ये घालवलेल्या तीन दिवसात मला थांबवण्यात आलेल्या लाला किशोरीलाल यांच्या बंगल्याच्या कंपौन्डमध्ये जरी मी प्रार्थना केली तरी कोणतेही भाषण दिले नाही. असे मी दिल्लीहून निघण्यापूर्वीच मी जाहीर केले होते. परंतु श्रोत्यांमधील काहींनी मला प्रश्न पाठवले आहेत. एक होता -

काल संध्याकाळच्या तुमच्या प्रार्थनासभेत मी हजर होतो. तिच्यात तुम्ही दुसऱ्या समुदायाच्या दोन प्रार्थना म्हणाला. असे करण्यामागील तुमचा हेतू काय आणि धर्माचा तुमचा अर्थ काय हे मला कळू शकेल काय?

काही वर्षांपूर्वी रैहाना तैय्यबजी (अब्बास तैय्यबजींची मुलगी, भगवान कृष्णची भक्त) यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे मी कुराणातील काही आयतींचा प्रार्थनेत समावेश केला होता. त्या वेळी त्या सेवाग्राम आश्रमात राहत होत्या. तसेच डॉ. गिल्डर यांच्या आग्रहाखातर मी पारशी लोकांच्या प्रार्थनेच्या पाठाचा समावेश प्रार्थनेत केला. आगाखान पॅलेसमध्ये स्थानबद्ध असताना उपवास सोडल्यानंतर (मार्च ३, १९४३, पाहा २१ दिवसांचे उपोषण सोडल्यानंतरचे भाषण, मार्च ३, १९४३) ते ती प्रार्थना म्हणत असत. माझे मत आहे की ही जी भर घालण्यात आली आहे त्यामुळे प्रार्थनेची गुणवत्ता अजून वाढली आहे. पूर्वीपेक्षा जास्त मोठ्या समुदायाच्या अंतःकरणापर्यंत ती पोहोचू लागली आहे. त्यामुळे हिंदू धर्माच्या अधिक व्यापक सहनशील प्रवृत्तीचे दर्शन घडते. प्रार्थनेची सुरुवात जपानी भाषेतील बुद्ध धर्माच्या प्रार्थनेने का होते हा प्रश्नसुद्धा प्रश्न विचारणाराने विचारायला पाहिजे होता. प्रार्थनेकरिता जे कडवे निवडण्यात आले आहेत त्यामागे एक इतिहास आहे व तो प्रार्थनेच्या पवित्र वातावरणास साजेसा आहे. जपानी साधू ( रेव्हरंड जी. हाशो) जेव्हा सेवाग्राम आश्रमामध्ये राहत होते तेव्हा त्यांच्या शांततापूर्ण आणि गौरवास्पद आचरणाने ते आश्रमातील सर्व लोकांना प्रिय झाले होते. त्यावेळी ते म्हणत असलेल्या बुद्ध धर्माच्या प्रार्थनेचे प्रतिसाद संपूर्ण सेवाग्राममध्ये उठत असत.

जम्मू, ऑगस्ट ५, १९४७,

हरिजन ऑगस्ट १७, १९४७

## ८५. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट ५, १९४७

(हे काश्मीर आणि निर्वासित या शिर्षकाखाली प्रकाशित झाले होते.)

*वाह, ऑगस्ट ५, १९४७*

*गांधीजी म्हणाले की वाह येथील निर्वासितांच्या छावणीला भेट देता आली आणि छावणीतील रुग्णांना पाहता आले तसेच पुंजा साहेबलाही मला दुसऱ्यांदा भेट देता आली याचा मला आनंद होतो. छावणीतील प्रतिनीधींशीही गांधीजी बोलले.*

*निर्वासितांच्या प्रतिनिधींशी झालेल्या चर्चेतून उपस्थित झालेल्या मुद्द्यासंबंधी चर्चा करण्याआधी गांधीजी म्हणाले की मी दोन शब्द काश्मीरसंबंधी सांगेन. ते म्हणाले की मी तिथे कोणतीही जाहीर सभा न घेण्याचा वा जनतेला संबोधायचे नाही असा निर्णय घेतलेला होता. परंतु मला कार्यकर्त्यांना भेटता आले. ते काश्मीरात होते तेव्हा त्यांच्या तीन दिवसांच्या मुक्कामात त्यांना बेगम साहिबा* (शेख अब्दुल्ला यांची पत्नी, शेख अब्दुल्ला १९०५-८२, अध्यक्ष नॅशनल कॉन्फरस, अध्यक्ष अखिल भारतीय जनता परिषद, १९४८-५३, आणि १९७५ ते ८२) *महाराजा साहेब* (हरि सिंग) *आणि प्रधानमंत्री काक साहेब* (रामचंद्र काक) *यांचीही भेट घेणे शक्य झाले. शेख अब्दुल्लांची, जे निःसंशयपणे काश्मीरी लोकांचे पुढारी होते, भेट घेता येऊ शकली नाही याचा गांधीजींना खेद होत होता. पण ते तिथे शेख साहेबांना भेटायला गेलेही नव्हते. ते काहीही असले तरी त्यांना दोन दिवस काश्मीरमध्ये आणि एक दिवस जम्मूमध्ये जाहीर प्रार्थना घेता आली. त्या प्रार्थनांकरिता हजारो लोक उपस्थित होते. ते म्हणाले की सर्व काही ठीक राहिले तर १५ ऑगस्टला कायदेशीर रीतीने जम्मू आणि काश्मीर हे संस्थान स्वतंत्र होईल. ते म्हणाले की मला खात्री आहे की १५ ऑगस्टनंतर फार दिवस हे संस्थान त्याच अवस्थेत राहू शकणार नाही. त्याला एक तर संघराज्यात वा पाकिस्तानमध्ये सामील व्हावे लागेल. काश्मीरमध्ये प्रामुख्याने मुसलमान राहतात. परंतु शेख साहेबांनी काश्मिरी लोकांना स्थानिक देशभक्तीने भारून टाकले आहे. ब्रिटिशांचे सार्वभौमत्व या महिन्याच्या १५ तारखेला संपेल. त्यानंतर खरे सार्वभौमत्व सुरू होईल. त्यांचा संदर्भ काश्मिरी लोकांच्या सार्वभौमत्वाशी होता. काश्मिरी लोकांची भाषा एक होती, एक संस्कृती होती आणि त्यांना दिसत होते त्याप्रमाणे तेथील लोकांमध्ये ऐक्य होते. काश्मिरी हिंदू आणि काश्मिरी मुसलमान यांना ते सहजी वेगवेगळे ओळखू शकत नव्हते. भेटायला आलेल्या प्रतिनिधीमंडळातील फार मोठ्या लोकांना पाहून ते मुसलमान*

*आहेत की हिंदू हे ओळखणे त्यांना शक्य होत नव्हते. ते काहीही असले तरी जम्मू आणि काश्मीरमध्ये काश्मीरच्या लोकांच्याच इच्छेला महत्त्व आहे. महाराजा साहेब आणि महाराणी साहेब यांनी हे सत्य मान्य केले ही आनंदाची गोष्ट आहे. गोड शब्दांत ज्याला अमृतसरचा तह* (मार्च १६, १८४६चा, या तहानुसार जम्मू काश्मीरचे राज्य निर्माण करण्यात आले होते) *म्हणतात तो वाचण्याचे सौभाग्य मला मिळाले नाही परंतु खरे पाहता ते विक्रीखत होते. ते १५ ऑगस्टला मृत होईल असे मी समजतो. विक्रेता तत्कालीन ब्रिटिश महाराज्यपाल होते तर महाराज गुलाब सिंग खरेदीदार. तह संपल्यानंतर ते संस्थान परत ब्रिटिशांकडे म्हणजे इंग्लंडकडे जाईल काय? जर ते हिंदुस्तानकडे येणार असेल तर कोणत्या भागाकडे? त्यांचे म्हणणे होते की कायद्याच्या बारकाव्यात न शिरता, ज्यासंबंधी मला उहापोह करण्याचा अधिकार नाही, सामान्यज्ञान असे सांगते की काश्मीरी लोकांनी काश्मीर आणि जम्मूचे भवितव्य ठरवले पाहिजे. हे जितक्या लवकर केले जाईल तितके बरे. जनमत कसे ठरवले जाईल हा योग्य प्रश्न आहे. हा प्रश्न दोन राज्य, महाराजासाहेब आणि काश्मिरी लोकांनी मिळून सोडवायला पाहिजे. या चौघांचे जर एकमत झाले तर आणि तरच बराच त्रास टाळता येऊ शकेल. अखेरीस काश्मीर मोठे संस्थान आहे, त्याला फार मोठे कूटनीतीविषयक मूल्य आहे. कदाचित संपूर्ण भारतात इतके मूल्य कोणत्याही संस्थानाला नसेल. इतके काश्मीरकरिता पुरे.*

*आता ते निर्वासितांच्या प्रश्नाकडे वळले. वाहच्या छावणीत जवळपास ९,००० निर्वासित होते. ज्या हिंदू आणि शीख लोकांनी या प्रश्नासंबंधी त्यांच्याशी चर्चा केली ते म्हणाले की १५ ऑगस्ट येण्याची आम्हाला भीती वाटते. गांधीजी म्हणाले की मी तुमच्या भीतीत कोणत्याही प्रकारे सहभागी होऊ शकत नाही आणि मला ती पटतही नाही हे मी कबूल करतो. मुसलमानांना त्यांचा पाकिस्तान मिळाला आहे. आता त्यांचे पंजाबच्या हिंदूंशी वा शिखांशी भांडण असू शकत नाही. जिनासाहेबांनी आणि मुस्लिम लीगच्या इतर लोकांनी आश्वासन दिले आहे की पाकिस्तानमध्ये मुसलमानांइतकेच हिंदूही सुरक्षित असतील. हे अभिवचन स्वीकारण्याकरिता त्यांनी श्रोत्यांना आवाहन केले. समजा की त्यांचे आश्वासन खोटे असल्याचे सिद्ध झाले आणि निर्वासितांना वाटणारी भयानकहून भयानक भीती खरी ठरली तर ती इस्लामच्या विनाशाची सुरुवात असेल. मुसलमान नेते अशा प्रकारच्या आत्मघाती कृत्याकरिता तयार होतील यावर विश्वास ठेवायला त्यांनी नकार दिला. त्यांनी सर्व स्त्री-पुरुष निर्वासितांना भीतीचा त्याग करायचा सल्ला दिला. ते म्हणाले की मला जर नोआखालीचा दौरा लांबवता आला असता तर मी तो आनंदाने*

*लांबवला असता आणि वाह येथील निर्वासितांमध्ये १५ ऑगस्टला राहिलो असतो. असे होऊ शकत नसल्यामुळे तितकीच जरी चांगली नाही तरी त्यांनी एक दुसरी चांगली गोष्ट सुचवली. ते जे सांगत होते त्याची टिपणे घेतांना श्रोत्यांनी डॉ. सुशिला नाय्यर यांना पाहिले होते. त्या स्वत:ही पश्चिम पाकिस्तानमधील गुजरात जिल्ह्याच्या होत्या. प्रार्थना सभेला येण्याच्या आधी त्यांनी तिच्याशी चर्चा केली होती. त्या तशा जरी गांधीजींबरोबर नोआखालीला जाणार होत्या तरी निर्वासितांना १५ ऑगस्टसंबंधीची जी भीती वाटत होती ती दूर करण्याकरिता मदत व्हावी म्हणून गांधीजींच्या वतीने निर्वासितांबरोबर राहण्याचा गांधीजींचा सल्ला त्यांनी मान्य केला. सुशिला नाय्यरच्या मनात अशी कोणतीही भीती नव्हती हे त्यांना माहीत होते. त्या त्यांच्याबरोबर नोआखालीला होत्या तसेच त्यांचे भाऊही नोआखालीत होते. तिथे डॉ. सुशिला नाय्यरना गांधीजींनी सर्वाधिक धोका असलेल्या ठिकाणी ठेवले होते आणि आपल्या वैद्यकीय मदतीच्या बळावर त्या हिंदूमध्ये तर नि:संशयपणे लोकप्रिय होत्याच पण मुसलमानांध्येही त्या लोकप्रिय झाल्या होत्या. गांधीजींनी जिल्हा आयुक्तांकडून, जे मुसलमान होते, ऐकले होते की रावळपिंडीच्या आजूबाजूच्या निर्वासितांना भीती वाटावी असा कोणताही धोका नाही. तिथे राहणाऱ्या मुसलमानांइतकेच त्यांनी स्वत:ला सुरक्षित समजावे.*

हरिजन, ऑगस्ट २४, १९४७

# ८६. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट ८, १९४७

(ही सभा विद्यापीठाच्या कम्पौन्डमध्ये झाली होती.)

पटना,

ऑगस्ट ८, १९४७

*मी बिहारला लवकर येऊ शकलो नाही याचा मला खेद वाटतो असे म्हणून गांधीजींनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. परंतु दिल्लीत व इतर ठिकाणी असतानाही मी बिहार आणि नोआखालीकरिता काम करत होतो. करा अथवा मराचा निर्धार त्यांना सर्व क्षेत्रात मार्गदर्शन करत होता आणि त्या निर्धाराच्या परिपूर्तीकरिता ते नोआखालीला चालले हते.*

*त्यांना जरी माहीत होते की नोआखालीला काहीही होणार नाही तरी तेथील लोक अतिशय धास्तावलेले असल्यामुळे त्यांना नोआखलीला १५ ऑगस्टच्या दोनतीन दिवस आधी पोहोचणे आवश्यक होते. निराधार भीती कुणालाही मदत करू शकत नाही आणि लोक जर शूर आणि ईश्वराला भिणारे असतील तर त्यांना आपला जीव द्यावा लागला तरी त्याला फारसे महत्त्व नसते. नोआखालीच्या लोकांच्या मनातील भयग्रस्तता दूर करण्याकरिता ते तिथे चालले होते.*

*ईश्वराने काय योजिले आहे ते त्यांना माहीत नव्हते आणि सरकार काय करणार आहे हेही ते सांगू शकत नव्हते. त्यांच्याकरिता संपूर्ण हिंदुस्तान त्यांचा देश होता आणि दोन देशांत अगदीच संपर्क होऊ शकू नये ही कल्पनाच त्यांना असहनीय होती. त्यांना भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये राहण्याची इच्छा होती आणि दोन्ही देश त्यांची मातृभूमी होती. हीच गोष्ट जिनासाहेबांनाही लागू होत होती. मुसलमानांना पाकिस्तान मिळाला होता. आता भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमधील लोकांवर चांगली माणसे म्हणून राहण्याची व देशात शांतता प्रस्थापित करण्याची जबाबदारी होती.*

*बिहारमधील हिंदूंना साधगिरीची सूचना देत गांधीजी म्हणाले की तुम्ही तुमच्या मागील वर्षाच्या अपराधाची पुनरावृत्ती परत कधीही करायला नको आणि बंगालमधून जे शरणार्थी परतत आहेत त्या सर्वांचे तुम्ही पुनर्वसन केले पाहिजे. प्रेम हा सर्वात मोठा सद्गुण आहे आणि तुमच्या मनात सर्वांबद्दल हा गुण वृद्धिंगत झाला पाहिजे. हिंदू आणि मुसलमान*

*हे भूतकाळ विसरले आहेत आणि आता ते परस्परांशी भातृभावाने राहत आहेत असे मला नोआखालीला गेल्यानंतर घोषित करता येईल अशी मी आशा करतो.*

*१५ तारीख हा आपल्या परीक्षेचा दिवस आहे. त्या दिवशी उपवास करा. प्रत्येकाने आपले कर्तव्य केले पाहिजे. कोणीही दंगल घडवून आणण्याचा प्रयत्न करू नये. आपल्याला जे स्वातंत्र्य मिळणार आहे ते असे नाही की त्या दिवशी रोषणाई करून आपण तो दिवस साजरा करावा. आपल्याजवळ धान्य, कापड, तूप वा तेल नाही. मग समारंभ साजरा करण्याची गरज काय? त्या दिवशी आपण उपवास केला पाहिजे, चरखा चालवला पाहिजे आणि प्रार्थना केली पाहिजे. आपण ६ एप्रिलला रोषणाई केली नव्हती, केली होती काय? त्या दिवसाची घोषणा आपण ६ एप्रिल ते १३ एप्रिलपर्यंतच्या उपोषणाने साजरी केली नव्हती काय? याशिवाय आजच्या स्वातंत्र्यापेक्षा तो दिवस चांगला होता. भाऊभाऊ आज जसे आपसात भांडत आहेत तसे भांडत नसतात. प्रत्येकजण देवळात किंवा मंदिरात मुक्तपणे जाऊ शकतो. (हा परिच्छेद कलकत्तानो चमत्कार, पृष्ठ १८-९वरून अनुवादित केला आहे.)*

*तीन आठवडे नोआखालीत राहिल्यानंतर अंदाजे १५ दिवसांकरिता परत बिहारमध्ये येण्याची इच्छा महात्मा गांधींनी जाहीर केली.*

हिंदुस्तान स्टॅन्डर्ड, ९-८-१९४७

## ८७. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट १०, १९४७

सोदेपूर,

ऑगस्ट १०, १९४७

*गांधीजी म्हणाले की मला उद्या* (सोमवारी) *नोआखालीला जायला पाहिजे असे वाटत होते. मला भेटायला आलेल्या मुसलमान मित्रांच्या दडपणामुळे आणि भारताच्या एका प्रमुख शहराला* (पाहा मागील विषय) *समजूतदारपणा येऊ शकावा म्हणून मी काही हातभार लावू शकतो काय हे पाहण्याकरिता मी थांबायचे ठरवले. मुसलमान मित्रांचा युक्तिवाद मला पटला. याचबरोबर मी त्यांना सांगितले की मी नोआखालीला गेलो नाही आणि तिथे जर काही बरेवाईट झाले तर माझे प्राण जातील. बिहारमध्येही मी असेच सांगितले होते. गांधीजींनी त्या दिवशी मंत्र्यांची आणि इतरांचीही भेट घेतली. हिंदूंनी ज्या ठिकाणांचा विध्वंस केला ती ठिकाणे पाहण्याची त्यांची इच्छा होती. त्यांना असेही कळले की कलकत्त्यात असेही काही भाग आहेत की जिथे हिंदूंची घरे असूनही व ते तिथे राहत असूनही आता ते तिथे जाऊ शकत नव्हते. हीच गोष्ट हिंदूंच्या मोहल्ल्यांनाही लागू होत होती. माणसांच्या पाशवीपणाच्या या हकिगती ऐकून त्यांची मान लाजेने खाली गेली. सांगण्यात आलेल्या या हकिगतींमध्ये किती सत्य आहे हे पाहण्याकरिता त्यांची स्वतः त्या भागांत जाऊन पाहण्याची इच्छा होती. कलकत्त्यात २३% पेक्षा जास्त मुसलमान नाहीत. इतक्या कमी प्रमाणात असलेले लोक अधिकारात असलेल्या लोकांच्या उत्तेजनाशिवाय वा अपात्रतेशिवाय बहुसंख्याकांवर अत्याचार करू शकतात ही गोष्ट कल्पनातीत होती. त्याचप्रमाणे ज्या सरकारला प्रशासन कसे करावे हे माहीत असते त्या सरकारच्या डोळ्यासमोर बहुसंख्याक अल्पसंख्याकांवर अत्याचार करू शकतात या गोष्टीचीही कल्पना करता येणे कठीण होते. त्यांना असेही सांगण्यात आले होते की कॉंग्रेसचे मंत्रिमंडळ सत्तेवर आल्यानंतर हिंदू पोलीस आणि अधिकारी न्यायाच्या बाबतीत तसेच पक्षपाती झाले आहेत जसे पूर्वी मुसलमान पोलीस आणि अधिकारी असल्याचा आरोप होता. गांधीजी म्हणाले की पोलीस विभागातही ही दुर्दैवी भावना शिरली असेल तर भविष्य खरोखरच काळाखाने भरलेले आहे असे म्हणावे लागेल. पोलीस आपल्या व्यवसायाची प्रतिष्ठा लक्षात ठेवतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.*

हरिजन, ऑगस्ट २४, १९४७

# ८८. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट ११, १९४७

सोदेपूर,

ऑगस्ट ११, १९४७

मला विचारण्यात आलेल्या काही प्रश्नांची उत्तरे आज सायंकाळच्या प्रवचनात मी देणार आहे. एकाची तक्रार अशी आहे की प्रमुख लोकांना प्रवेश दिला जातो परंतु तुलनात्मक दृष्टीने कमी महत्त्वाच्या लोकांना अपमानित केले जाते. तो रविवार असल्यामुळे दिवसभर लोकांची खूप गर्दी होती. जेव्हा अशी गर्दी असते तेव्हा ओळखीच्या व अनोळखी लोकांमध्ये भेदभाव करण्यात येऊ नये हे मला मान्य आहे. परंतु काही लोकांना मी आधीच भेटायची वेळ दिलेली असल्यामुळे त्यांना प्रवेश द्यावा लागला. याशिवाय अनेक लोक असे होते की जे विशेषेकरून दिवसभर काम करत होते. यामुळे माझी विनंती आहे की ज्यांची अशा प्रसंगी निराशा झाली असेल तर त्यांनी संयम ठेवून सहनशीलता दाखवावी तसेच स्वयंसेवकांनाही मी विनंती करीन की त्यांनी सर्वांना समान वागणूक देऊन त्यांच्याशी सौजन्याने व नम्रतेने वागावे.

परवा कलकत्त्याला येत असताना मी चितगाव येथील पुरासंबंधी काही तरी वाचले. हा तिसरा दिवस आहे आणि क्रोधायमान पाण्याचा क्रोध अजून उरलेला नाही व त्यामुळे किती जिवित आणि वित्त हानी झाली याचा कोणीही नीट अंदाज करू शकत नाही. अशा संकटाच्या वेळी आपण पूर्व वा पश्चिम पाकिस्तानचा आणि भारताचा विचार करता कामा नये हे मी सांगण्याची क्वचितच आवश्यकता असावी. संकटप्रसंगी परकी माणसेही सोबती होत असतात. मग जे कालपर्यंत सोबती होते त्यांच्याशी कितीही राजकीय वा धार्मिक मतभेद असले तरी निदान अशा संकटप्रसंगी त्यांना टाकून देता येऊ शकत नाही. हे संकट असे आहे की जे केवळ पूर्व बंगालकरिता नाही तर संपूर्ण बंगालकरिता आहे, आणि केवळ बंगाल करिताच नाही तर संपूर्ण भारताकरिता आहे. या कामाकरिता निधी गोळा करण्यासाठी व त्या निधीचे वाटप करण्यकरिता प्रभावी आणि विश्वसनीय माणसांची समिती असली पाहिजे. स्थानिक माणसे आधी येतात. त्यांच्या मदतीकरिता अखिल बंगाल मदतनिधी समिती उभारता येईल. केवळ बंगालच परिस्थितीला तोंड देऊ शकत असेल तर संपूर्ण भारताला त्रास देण्याचे कारण नाही. चितगावच्या गंभीर संकटप्रसंगी माझे अंतःकरण त्यांच्याबरोबर आहे. यातून वाचलेल्या लोकांनी हे संकट धिराने सहन करावे.

मी जणू काय कॉंग्रेस कार्यकारिणीचा सदस्य आहे वा तिचे निर्णय प्रभावित करू शकतो अशा प्रकारे राज्यपाल, मंत्री आणि तत्सम पदावरील लोकांच्या नियुक्तीसंबंधी पत्रलेखकांनी अनेक प्रकारचे प्रश्न विचारले आहेत. मला माहीत आहे आणि मी कबूल करतो की सेवेमुळे कॉंग्रेसच्या लोकांच्या अंतःकरणात नेहमीच मला स्थान राहील. आणि मला हेही माहीत आहे की ज्या क्षणी मी माझ्या अधिकाराचे सीमोल्लंघन करीन त्या क्षणी मी तो अधिकार गमावून बसेन. मला कोणताही कायदेशीर अधिकार नाही. नैतिक अधिकार तोपर्यंतच राहतो जोपर्यंत आपण नैतिक भूमिका घट्टपणे पकडून ठेवलेली असते.

***आता आमच्यात भाडण्यासारखे कोणतेही मतभेद नाही हे दाखवण्याकरिता दोन्ही समुदायाच्या नेत्यांनी पूर्व आणि पश्चिम बंगालमध्ये मुक्तपणे जावे या मताशी तुम्ही सहमत आहा काय?***

नेते जर अंतःकरणापासून एक असतील तर माझे ठाम उत्तर होय आहे. परंतु शब्द जर विचारांना लपवत असतील तर जाणे हे केवळ वाईटच नसेल तर निरुपयोगीही असेल. पुढाऱ्यांचा परस्परांवर विश्वास आहे याची आपल्याला खात्री आहे काय? आपण वरपासून तर खालपर्यंत दांभिकपणापासून मुक्त झालो नसू अशी मला भीती वाटते. यामुळे आपण सर्व प्रकारचा आणि प्रमाणाचा बदला घेण्याच्या आपल्या सवयीचा आपल्याला विसर पडला पाहिजे हा माझा जुनाच युक्तिवाद मी इथे परत सांगेन. सुप्तपणे कुणाबद्दल वाईट भावना ठेवण्याच्या पद्धतीपेक्षा ठोशाला ठोसा ही पद्धत ओबडधोबड असली तरी बहुधा अधिक क्षम्य आहे. विचारात वाचा आणि वर्तनाचे मूळ असते. यापेक्षा अधिक समाधानकारक उत्तर मी देऊ शकत नाही याचा मला खेद होतो. मला असे काहीही माहीत नाही. हे आपल्याला धीर देण्याकरिता आहे, आपला धीर सुटावा म्हणून नाही. आपल्या रोगाचा खरा उपाय कळावा ही धीराची गोष्ट नाही काय? इतर कोणताही उपाय वरवरचा दुःखपरिहारक असेल परंतु अखेरीस त्यामुळे रोग वाढतोच.

हरिजन, ऑगस्ट २४, १९४७

# ८९. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट १२, १९४७

सोदेपूर, ऑगस्ट १२, १९४७

*गांधीजी म्हणाले की या महिन्याची १५ तारीख हा भारताच्या इतिहासात महत्त्वाचा मैलाचा टप्पा ठरणार आहे. या दिवशी भारत परकीय सत्तेच्या जोखडातन मुक्त होणार आहे. भारत स्वतंत्र राष्ट्र होणार आहे. हा दिवस कसा साजरा करायचा ते त्यांनी स्पष्ट करून सांगितले.* (पाहा प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट ८, १९४७) *परंतु बहुधा हा त्यांचा एकट्याचाच दृष्टिकोन होता. कलकत्त्यातील मुसलमान हा दिवस शोक दिवस म्हणून पाळणार असल्याचे आधीच घोषित झाले होते. हे खरे नसेल अशी आशा गांधीजींनी व्यक्त केली. एखादा विशिष्ट दिवस विशिष्ट पद्धतीनेच साजरा केला पाहिजे अशी सक्ती कोणत्याही माणसावर करता येऊ शकत नाही. ही गोष्ट पूर्णपणे स्वयंस्फूर्त असली पाहिजे. ते म्हणाले की स्वातंत्र्याबद्दल शोक करू नये असे मी माझ्या मुसलमान बांधवांना सांगेन. सध्याची मनोव्यथा जायला पाहिजे. पाकिस्तानमधील हिंदूंनी काय करायला पाहिजे? पाकिस्तानचा ध्वज जर स्वातंत्र्य, जात, धर्म वा रंगभेद न मानता सर्व बाबतीत समानता यांचे प्रतिनिधित्व करत असेल तर त्यांनी त्याला वंदन केले पाहिजे.*

*त्या दिवशी फ्रान्स आणि पोर्तुगीज वसाहतीतील भारतीयांनी स्वातंत्र्य घोषित करण्याचे ठरविले असल्याचे त्यांनी ऐकले होते. ते म्हणाले की ही कृती अविचाराने केल्याप्रमाणे होईल. कदाचित हे उद्धटपणाचेही चिन्ह होईल. ब्रिटिश निवृत्त होत आहेत, फ्रेंच आणि पोर्तुगीज नाही. या वसाहतीतील भारतीयांचे थोड्याच दिवसांत स्वतंत्र भारतात विलिनीकरण होणे अपरिहार्य असल्याबद्दल त्यांना किंचितही संशय वाटत नव्हता. त्या भागांतील भारतीयांनी कायदा हातात घेऊ नये इतकेच. त्यांना घटनात्मक मार्ग उपलब्ध आहेत आणि त्यांचा मुख्यमंत्रीसुद्धा असा आहे की ज्याने इंडोनेशियाच्या स्वातंत्र्याचे समर्थन केले. या वसाहतींमधील आपल्या मित्रांना आणि नातेवाईकांना ते निश्चिततच विसरणार नाहीत. या वसाहतीतील लोकांना जर माझ्या सल्ल्याच्या वैधतेबद्दल शंका असेल तर त्यांनी पंडितजींच्या सल्ल्यानुसार वागावे.*

*यानंतर ते दुसऱ्या महत्त्वाच्या विषयाकडे वळले. ते म्हणाले की मुसलमान मित्रांच्या आग्रहास्तव मी कलकत्त्यातील माझा मुक्काम वाढवला आहे. काल सांयंकाळी शहीद सुऱ्हावर्दी मला भेटायला आले होते. ते म्हणाले की कलकत्त्याला सांप्रदायिक दंगलीच्या*

*भयानक अनुभवातून जावे लागत असताना तुम्ही येथून निघून जाणे तुमच्या तत्त्वाच्या विरोधात आहे. गांधीजींनी शहरात खरोखरीची शांतता प्रस्थापित होण्याकरिता काम करावे व तसे होईपर्यंत शहरातील आपला मुक्काम लांबवावा असे शहीद साहेबांनी सुचवले. गांधीजींनी उत्तर दिले की सुऱ्हावर्दी साहेब आणि ते असे दोघेही दंगलग्रस्त भागात एकाच छपराखाली राहतील. पोलीस अथवा सैन्याच्या मदतीशिवाय राहणे हे सर्वात चांगले. भाऊ भावाकडे जातो अशा पद्धतीने आम्ही लोकांकडे जाऊ, त्यांना समजावू आणि त्यांना सांगू की परस्परांच्या सहमतीने आता फाळणी झालेली असल्यामुळे दोन्ही पक्षानी भांडण्याचे काहीही कारण नाही. सीमाआयोगाचा निर्णय एक दोन दिवसात घोषित होणार आहे आणि सर्व संबंधित पक्षांनी शोभेशा पद्धतीने तो निर्णय मान्य करावा हेच परिस्थितीला धरून राहील. अखेरीस या पक्षांनीच लवाद नेमला आहे. लवादाने जो काही निर्णय दिला असेल तो मान्य करणे यातच त्यांची प्रतिष्ठा आहे.*

*गांधीजींनी सुऱ्हावर्दी साहेबांना दिलेला प्रस्ताव इतका महत्त्वाचा होता की सुऱ्हावर्दी ताबडतोब त्याचे उत्तर देऊ शकत नव्हते. यामुळे गांधीजींनी सुऱ्हावर्दी साहेबांना सांगितले की निर्णय घेण्यापूर्वी तुम्ही तुमच्या वयोवृद्ध वडिलांचा आणि मुलीचा सल्ला घ्या*

*दुपारच्या वेळी शहिद सुऱ्हावर्दींचा निरोप घेऊन कलकत्त्याचे पूर्व महापौर श्री. उस्मान आले. त्यांनी सांगितले की सुऱ्हावर्दीनी मनात कोणताही किंतू न ठेवता तुमचा प्रस्ताव मान्य केला आहे. यामुळे या दोन मित्रांकरिता जो भाग सर्वात जास्त दंगलग्रस्त असेल त्या भागात राहण्याकरिता घर निवडायचे व मग संयुक्त प्रयत्नाने काय करता येईल ते पाहायचे होते.*

*गांधीजी म्हणाले की शहीद साहेबांवर विसंबून राहू शकता येत नाही अशी मला सूचीत करण्यात येत असते. माझ्याबद्दलही अशीच गोष्ट सांगण्यात येत असते.. मी इस्लामचा सर्वात मोठा शत्रू आहे, मला ढोंगीपणाची सवय आहे असे माझे वर्णन करण्यात येत असते. परंतु माणसाच्या मनात काय आहे हे केवळ एका ईश्वरालाच माहीत असते. गांधीजी ठामपणे म्हणाले की मी माझ्या विश्वासाप्रमाणे बोलत आणि वागत असतो. फरीदपूर परिषदेच्या* (बंगाल प्रांत परिषद. तिचे अध्यक्ष चित्तरंजन दास होते आणि ती परिषद मे २ ते, १९२५ला भरली होती.) *वेळेपासून मी सुऱ्हावर्दींना ओळखतो. तिथे स्वर्गीय देशबंधू मला घेऊन गेले होते. कोणालाही कोणाहीबद्दल पूर्वग्रह तयार करण्याचा अधिकार नसतो. त्यांच्यावर मी विश्वास ठेवावा अशी ते जी अपेक्षा करतात तसा मी त्यांच्यावर विश्वास*

*ठेवीन. आम्ही दोघेही एकाच छताखाली राहू आणि परस्परांबद्दल आमच्यात कोणतेच गुपित नसेल. भेटायला येणाऱ्या सर्वांना आम्ही सोबत भेटू. लोकांना कोणत्याही परिस्थितीत खरे बोलायचे धैर्य असले पाहिजे व ज्या माणसाच्या विरोधात लोकांना काही सांगायचे असेल ते त्या माणसासमोर सांगितले पाहिजे.*

*अखेरीस गांधीजींनी हे कार्य सिद्धीस नेण्याकरिता सर्वसामान्य माणूस काय करू शकतो ते सांगितले. ते म्हणाले की आम्ही जे कार्य करू पाहत आहो त्याकरिता तुम्ही तुमचे आशीर्वाद द्या.*

हरिजन, ऑगस्ट २४, १९४७

# ९०. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट १४, १९४७

(सुत्रानुसार गच्च भरलेल्या जमावाने गांधीजींचे भाषण टाचणीपडली तर तिचाही आवाज व्हावा इतक्या शांतपणे ऐकून घेतले.)

बेलीयाघाटा, कलकत्ता,

ऑगस्ट १४, १९४७

गांधीजी सुरुवातीलाच म्हणाले की उद्याचा दिवस हा परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त होण्याचा दिवस आहे. यामुळे हा दिवस महान दिवस आहे. तुम्ही तो साजरा करालच. माझ्या मते हा दिवस दोन्ही राष्ट्रांच्या खांद्यावर प्रचंड जबाबदारी येऊन पडण्याचा असेल. त्यांनी भारताच्या कल्याणाप्रित्यर्थ या दिवशी प्रत्येकाला २४ तासाचा उपवास आणि प्रार्थना करण्याकरिता सांगितले. हातकताई गरीब आणि श्रीमंत यांना जोडणारी असल्यामुळे व बेकार असलेल्या अगणित स्त्रीपुरुषांना ती काम देत असल्यामुळे शक्य तितकी कताई करण्याकरिता गांधीजींनी सांगितले.

यानंतर नोआखालीला जाण्याचे लांबवून इथेच म्हणजे कलकत्त्यातच मुक्काम करण्याच्या कारणाकडे ते वळले. ते म्हणाले की जळत असलेल्या कलकत्त्यात शांतता निर्माण करण्याकरिता शक्य असेल ते मी करावे अशी विनंती करण्याकरिता शहीद साहेब मला भेटायला आले. त्यांच्या विनवणीने मला प्रभावित केले. शहीद साहेब प्रभावित भागात माझ्याबरोबर यायला तयार असतील व दंगली थांबेपर्यंत व पूर्णपणे मैत्रीचे वातावरण निर्माण होईपर्यंत माझ्याबरोबर एकाच छपराखाली राहायला तयार असतील तर मला तुमचे म्हणणे मान्य आहे असे गांधीजी शहीद साहेबांना म्हणाले.

यामुळे त्या दोघांनी हातचे काहीही राखून न ठेवता आणि परस्परांपासून कोणतेही गुपीत न ठेवता एकत्रितपणे काम करायचे ठरवले होते. शहीद साहेबांनी आपल्या वयोवृद्ध वडिलांशी आणि मुलीशी सल्लामसलत करण्याकरिता एक रात्र घेतली आणि दुसऱ्या दिवशी आपला निर्णय कळवला (पाहा एच. एस. सुऱ्हावर्दी यांना मुलाखत, ऑगस्ट ११, १९४७) आणि त्यांनी पाठवलेल्या एका निरोपाने आम्हा दोघांना इथे एकत्रित आणले असे गांधीजी म्हणाले. गांधीजी म्हणाले की शहीद साहेबांविषयी सावधगिरी बाळगा अशा सूचना अनेकांनी दिल्या आहेत. परंतु त्या सूचनांचा माझ्यावर काहीही परिणाम झाला नाही. माझ्या शब्दांवर त्यांनी विश्वास ठेवावा असे जर मला वाटत होते तर मीसुद्धा त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवणे आवश्यक होते. तुम्ही असे समजू नका की कलकत्त्यातील ज्या भागातील हिंदूंना आपली घरे सोडून जावे लागले व त्यांच्या घरात मुसलमान राहू लागले त्या

भागांकडे आम्ही दुर्लक्ष करू. आम्ही संपूर्ण कलकत्त्याच्या शांततेकरिता काम करत आहो. श्रोत्यांना आवाहन करत गांधीजी म्हणाले की कलकत्ता जर समंजसपणा आणि मैत्रीच्या भावनेने परत प्रेरित झाला तर मग नोआखाली आणि उर्वरित भारत सुरक्षित होईल असे समजा. शहीद साहेबांचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की ते या इमारतीत आहेत परंतु या सभेला उत्तेजित होण्याकरिता कोणतेही कारण मिळू नये म्हणून त्यांच्या संमतीने मी त्यांना इथे आणलेले नाही. (महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड ३, पृष्ठ ४२३-२४ प्रमाणे सुऱ्हावर्दी हे प्रार्थासभेत नाहीत असे लक्षात आल्यानंतर काही तरुणांनी सुऱ्हावर्दीं ंना मारहाण करण्याकरिता घराकडे धाव घेतली व घरावर परत दगडफेक सुरू झाली. प्रार्थना संपल्यानंतर गांधीजी परतले. सुऱ्हावर्दीवर हल्ला करणारांची त्यांनी कानउघाडणी केली. ते म्हणाले की ते जर प्रामाणिक नसते तर ते माझ्याजवळ राहू शकले नसते. काही वेळाने ते तरुण सुऱ्हावर्दींचे बोलणे ऐकण्याच्या मनस्थितीत आल्यानंतर गांधीजींनी सुऱ्हावर्दींना हाताने खूण करून बोलावले. कलकत्त्यातील प्रचंड कत्तलीबद्दल सुऱ्हावर्दींनी निर्विवाद कबुली दिल्यानंतर त्याचा जमावावर फार मोठा परिणाम झाला. गांधीजी त्यासंबंधी नंतर म्हणाले की त्या क्षणी जो बदल व्हायला सुरवात झाली त्याचा शुद्धिकरणासारखा परिणाम झाला. मला ते जाणवू शकले.) परंतु श्रोत्यांमधील सहनशीलता वाढत असल्याचे दिसल्यामुळे गांधीजींना आनंद झाला व शहीद साहेबांना सभेत बोलावण्याचे त्यांना धैर्य झाले. त्यांच्या कठिण कार्यात यश यायचे असेल तर आम्ही दोघांनी उघड्यावर एकत्रित राहून संपूर्ण सहकार्याने काम करणे आवश्यक आहे असे गांधीजी म्हणाले.

हरिजन, ऑगस्ट २४, १९४७

# ९१. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट १५, १९४७

(ही सभा राश बगान मैदानात झाली होती)

कलकत्ता,

ऑगस्ट १५, १९४७

*हिंदू आणि मुसलमान अगदी परिपूर्ण मैत्रीच्या वातावरणात भेटत असल्याबद्दल गांधीजींनी कलकत्त्याचे अभिनंदन केले. मुसलमान आनंदाच्या त्याच घोषणा देत होते ज्या हिंदू देत होते. किंचितही संकोच न करता ते तिरंगा फडकावत होते. इतकेच काय मुसलमान हिंदूंना आपल्या मशिदीत प्रवेश देत होते आणि हिंदू मुसलमानांना आपल्या मंदिरात. या बातमीने त्यांना खिलापतीच्या दिवसांची आठवण आली. तेव्हाही हिंदू आणि मुसलमान भावाभावाप्रमाणे राहत होते. ते दोघेही दंगलीच्या विषाचा प्याला प्याले होते हे याचे साधे कारण आहे. यामुळे मैत्रीच्या या अमृताची चव आता पूर्वीपेक्षाही जास्त गोड लागेल. असे असले तरी एका विशेष वस्तीत गरीब मुसलमानाला त्रास दिला जात असल्याचे ऐकून त्यांना दुःख झाले. हावरासह कलकत्ता आता नेहमीकरिता सांप्रदायिक विषाणूंपासून मुक्त होईल अशी त्यांना आशा होती. असे झाले असते तर त्यांना खरोखरच पूर्व बंगाल आणि उर्वरित भारताची भीती वाटण्याचे कारण राहणार नव्हते. लाहोरमध्ये अजूनही हे वेड कायम असल्याचे ऐकूनही त्यांना दुःख होत होते. कलकत्त्याचे उदात्त उदाहरण जर खरोखर प्रामाणिकपणाचे असेल तर त्याचा परिणाम पंजाब आणि भारताच्या इतर भागावर होणे अपरिहार्य आहे अशी ते आशा करू शकत होते.*

*यानंतर त्यांनी चितगावचा उल्लेख केला. पाऊस माणूस पाहून येत नसतो. त्याने मुसलमान आणि हिंदू या दोघांनाही आपल्या विळख्यात घेतले होते. गांधीजी म्हणाले की चितगावच्या दुःखी लोकांंशी एकरूप होणे हे संपूर्ण बंगालचे कर्तव्य आहे. भारत आता स्वतंत्र झाला आहे हे पाहून लोकांनी राजभवनचा ताबा घेतला आणि त्यांनी प्रेमाने राज्यपाल राजाजींना वेढा घातला. जनतेच्या शक्तीचे हे प्रतिकात्मक चिन्ह असेल तर याचा त्यांना आनंदच होईल. परंतु लोकांना जर असे वाटत असेल की सरकारी आणि इतरांच्या मालमत्तेसंबंधी आपण काहीही करू शकतो तर मी अस्वस्थ आणि दुःखी होईन. असे करणे म्हणजे गुन्हेगारी स्वरुपाची बेबंदशाही. यामुळे लोक ज्याप्रमाणे राजभवनात घुसले त्याचप्रमाणे त्यांनी तो रिकामा करावा. लोकांना इशारा देत ते म्हणाले की आता तुम्ही स्वतंत्र आहा, परंतु तुम्ही तुमच्या स्वातंत्र्याचा उपयोग सुज्ञपणाने केला पाहिजे. जे युरोपीय लोक*

*भारतातच राहिले त्यांच्याशी तुम्ही त्याच सौजन्याने वागायला पाहिजे ज्या सौजन्याची तुम्ही त्यांच्याकडून अपेक्षा करता. तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे की तुम्ही स्वतःखेरीज इतर कुणाचेही मालक नाही. यामुळे तुम्ही कोणावरही त्याच्या इच्छेविरुद्ध काही करण्याची सक्ती करू शकत नाही.*

हरिजन, ऑगस्ट २४, १९४७

# ९२. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट १६, १९४७

कलकत्ता,

ऑगस्ट १६, १९४७

*चितगाव सेवासदन येथे प्रामाणिकपणे संस्थेची सेवा करणाऱ्या वयस्कर मेहतरणीकडून तिरंगा ध्वजाचे ध्वजावरोहण करण्यात आले याबद्दल गांधीजींनी प्रसन्नता व्यक्त केली. याचप्रमाणे जिल्हा कॉंग्रेस समितीतील (जिचे नाव क्षणभर गांधीजी विसरले होते) ध्वजावरोहणही एका हरिजन मुलीने केले. हे आपल्या धोरणानुसार आणि कलकत्त्यातील बंधुत्वाच्या भावनेनुसारच आहे. त्यांनी आशा व्यक्त केली की ही भावना अशीच कायम राहील आणि हिंदू धर्मात अस्पृश्यता आणि विषमता यांचे पूर्णपणे उन्मुलन झालेले असेल, तसेच मुसलमानसुद्धा एकाच ईश्वरापासून निर्माण झालेले असल्यामुळे आपण परस्परांशी कधीही भांडणार नाही. ही भावना जर कायम राहिली तर ती भारताच्या कानाकोपऱ्यात पसरेल. मग नोआखाली वा पंजाबमध्ये दंगलींची भीती राहणार नाही.*

*यानंतर जमावाने राजभवनचा ताबा घेतल्याच्या घटनेकडे ते वळले. प्राचीन भारतात दाराला कुलुप लावण्याची गरज नव्हती अशी इतिहासकारांची साक्ष आहे. रामराज्यात चोरी माहीत नव्हती. आपल्या प्रामाणिकपणाची आणि सत्यशीलतेची अशी परंपरा आहे. राजभवन रिकामे करण्याकरिता जमावाला प्रवृत्त करावे म्हणून सैन्य बोलावावे लागले ही शरमेची गोष्ट आहे. राजभवनातील काही प्लेटा चोरीला गेल्या याचेही त्यांना दुःख होत होते. ते म्हणाले की त्या प्लेटा राजभवनमध्ये परत करण्यात आल्या तर मला आनंद होईल. त्यानंतर त्यांनी एका अमेरिकी मित्राचा उल्लेख केला. तो म्हणाला होता की कायदे आझम जिनांनी मला सांगितले की आता हिंदुस्तान जगाला दाखवून देईल की आम्हा दोघांमध्ये कोणतेही भांडण नाही आणि अल्पसंख्याक आणि बहुसंख्याक समुदायही नाहीत. राजाजी, तुमचे राज्यपाल, यांनीसुद्धा या माहितीला दुजोरा दिला.*

हरिजन, ऑगस्ट २४, १९४७, आणि महात्मा गांधी - अखेरचं पर्व, खंड ३, पृष्ठ ४२९

# ९३. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट १७, १९४७

(हे भाषण व्हिक्टोरिया नर्सरी ग्राऊंड, नारकेलडांगा येथे झाले होते.)

कलकत्ता,

ऑगस्ट १७, १९४७

*गांधीजी म्हणाले की शहीद साहेबांकरिता गोड बोलणे शोभेसे आहे. ते समर्थनीय आहे. त्यांच्या भाषणात कोणतीही अतिशयोक्ती नाही. परंतु मला काही गोष्टींकडे तुमचे लक्ष वेधणे आवश्यक वाटते. या विविध गोष्टी क्षम्य आहेत असे म्हणून आपण त्याकडे दुर्लक्ष करतो आहोत. कलकत्त्यात अशी काही ठिकाणे आहेत की जिथे सर्व काही चांगले नाही. मी असे ऐकले आहे की एका ठिकाणी मुसलमान रहिवाशांना तिथे राहणारे हिंदू परत येऊ द्यायला तयार नाहीत. त्यांना आपल्या घरात परतायचा अधिकार आहे. हे सर्व अनुचित आहे. निरोगी शरिरात एखादा विषाक्त गळू असावा तसेच हे. वेळीच त्या गळूवर उपचार केला नाही तर विष संपूर्ण शरीरात पसरू शकते.*

*यानंतर त्यांनी मुस्लिम लीगचे सचिव महम्मद हबिबुल्ला बहार यांनी पाठवलेले पत्र उद्धृत केले. प्रभावशाली लोकांची एक संयुक्त समिती तयार करावी व तिने कलकत्त्यात जे चांगले काम करण्यात आले ते अधिक चिरस्थायी व्हावे म्हणून पूर्व आणि पश्चिम बंगालमध्ये त्या समितीने जावे अशी एक चांगली त्यांनी सूचना केली आहे. या सूचनेवर त्वरित कार्यवाही करण्यात येईल अशी गांधीजींनी अपेक्षा व्यक्त केली. गांधीजी म्हणाले की बहार यांनी केलेल्या दुसऱ्या सूचनेप्रमाणे पूर्व बंगालमध्ये पुरामुळे जो हाहाक्कार निर्माण झाला आहे त्याकरिता हिंदू आणि मुसलमानांची एक समिती बनवण्यात यावी. गांधीजी या सुचनांशी सहमत झाले आणि त्यांनी अशी आशा व्यक्त केली की हा विषय कार्यक्षम पद्धतीने हाताळण्याकरिता हिंदू आणि मुसलमानांची एक संस्था असावी. पैशापेक्षाही अन्नधान्य आणि स्वयंसेवकांची गरज जास्त आहे. कलकत्त्याच्या महापौरांनी मदत कार्याकरिता माझ्याकडे १५,००० रुपयांचा धनादेश पाठवला आहे. या धनादेशाकरिता गांधीजींनी त्यांचे आभार मानले. ही रक्कम योग्य प्रकारे उपयोजिली जाईल असे मी पाहीन असे गांधीजी म्हणाले.*

*यानंतर गांधीजी चंद्रनगरच्या बातमीकडे वळले. माझ्याकडे आलेले वृत्त खरे असेल तर तिथे स्वतःला सत्याग्रही म्हणवणाऱ्या पण वास्तवात दुराग्रही असणाऱ्या लोकांनी प्रशासकाच्या बंगल्याला घेराव घातला होता. असे सांगण्यात आले आहे की हे पाऊल उचलण्याकरिता माझी संमती आहे. हे साफ खोटे आहे हे मी सांगायलाच पाहिजे. काही लोक माझ्याकडे आले होते आणि माझ्याकडे सत्याग्रकरिता वेळ नाही असे मी त्यांना सांगितले होते. दुराग्रहाकरिता माझ्याजवळ कधीही वेळ असू शकत नाही. अशा गोष्टींकडे पाहण्याकरिता पंडित नेहरू आहेत. काहीही झाले तरी फ्रेंच महान लोक आहेत, ते स्वातंत्र्यप्रेमी आहेत. भारतातील फ्रेंच वसाहतीसंबंधी भारतीय लोक काही चुकीची कृती करत असतील तर त्यापासून त्या वसाहतीचे संरक्षण करणे भारताकरिता बंधनकारक असल्यामुळे सत्य काय आहे व त्यासंबंधी काय करता येऊ शकते ते पाहण्याकरिता मुख्यमंत्री चंद्रनगरले गेले हे पाहून मला आनंद झाला.*

*शहीद साहेबांच्या आणि त्यांच्या संरक्षणाकरिता ठेवलेल्या पोलिसांशी जनता जो व्यवहार करत होती त्यासंबंधी गांधीजी पुढे चर्चा करू लागले. ते म्हणाले की पोलिसांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणे अतिशय चूक आहे. ते अतिशय कठीण काम कमालीच्या शांततेने आणि सौजन्याने करत आहेत. जमावाने कायदा आपल्या हातात घेणे चूक आहे. यामुळे गुलामगिरी येईल, स्वातंत्र्य नाही. गांधीजी म्हणाले की आपल्या संरक्षणाकरिता पोलिसांचे सरक्षण काढून घ्यावे असे अधिकाऱ्याना सांगण्याचा माझा विचार आहे कारण सार्वजनिक कर्तव्य पार पाडत असताना पोलिसांचा अपमान व्हावा हे मला रास्त वाटत नाही. असे असल्यामुळे जमावाने पूर्णपणे नियमानुसार वागावे म्हणजे आपल्याला आवश्यक कृती करण्याची कदाचित गरज पडणार नाही. आज पोलीस आणि सैन्य हे सर्व अखेरीस आपले सेवक आहेत, मालक नाहीत.*

*अखेरीस गांधीजींनी येऊ घातलेल्या ईदचा सण सादरा करण्याबद्दल उल्लेख केला. ते म्हणाले की दक्षिण आफ्रिकेत वीस वर्षे मी मुसलमानांबरोबर मशिदीत ईदच्या सणात सहभागी होत असे. परंतु आता कलकत्ता शहरात सद्भावनेचा पूर आलेला असल्यामुळे प्रत्येकाने हे पाऊल उचलावे अशी माझी अपेक्षा आहे. असे केल्याने मैत्रीभावना चिरस्थायी होऊ शकेल. भावनांची लाट आली असताना तिच्यात सहभागी होणे सोपे असते. परंतु असे रचनात्मक कार्यकर्ते निर्माण करणे कठिण असते की जे दिवसेंदिवस सतत कष्ट करून ती भावना स्थिर करण्याकरिता प्रयत्न करतील. असे काम शहरात झालेले मला आवडेल*

***आणि असे झाले तर संपूर्ण देशात याचा प्रभाव जाणवेल याची मला खात्री आहे. तुम्ही जर असे करण्यात चुकला तर आजचे स्वातंत्र्य नऊ दिवसांची नवलाई ठरेल.***

हरिजन, ऑगस्ट ३१, १९४७

# ९४. प्रार्थना प्रवचन

(ही सभा मोहम्मेडन स्पोर्टिंग क्लबमध्ये भरली होती व तिच्यात पाचेक लाख लोक उपस्थित होते.)

बेलियाघाटा,

ऑगस्ट १८, १९४७

इथे हजर असलेल्या सर्व मुसलमानांना ईद मुबारक इच्छिणे हे माझे पहिले कर्तव्य आहे. एक वेळ अशी होती की जेव्हा हिंदू आणि मुसलमान हे दोघेही या दिवशी परस्परांना आलिंगन देत असत. मी कबूल केले पाहिजे की अनेक वर्षांनंतर मी हे दृश्य पाहत आहे. मुस्लिम लीग, नॅशनल गार्ड आणि कॉंग्रेसच्या सदस्यांना आणि स्वयंसेवकांना इथे पाहून मला फार आनंद होतो. असे आहे हे खरे आहे परंतु हे ऐक्य कायम टिकले पाहिजे. आपल्याला ब्रिटिशांची जागा घ्यायची आहे. आज पाहिलेले दृश्य मी कधीही विसरणार नाही.

गुजरातीवरून, कलकत्तानो चमत्कार

# ९५. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट १९, १९४७

कलकत्ता,

ऑगस्ट १९, १९४७

*सव्वा तास उशीर झाल्याबद्दल गांधीजींनी क्षमा मागितली. गांधीजी म्हणाले की याकरिता माझ्याबरोबरच्या लोकांचा दोष नव्हता. कांचनपाडा* (कलकत्त्यापासून २६ मैल अंतरावरील औद्योगिक प्रक्षेत्र. मशिदीसमोर वाद्य वाजवल्यामुळे पोलिसांना तिथे गोळीबार करावा लागला होता आणि त्यात अनेक लोक मृत्यूमुखी पडले होते.) *येथील बहुसंख्य हिंदूंच्या गैरवर्तनामुळे मुख्यमंत्री शहीद साहेबांना, मला आणि इतरांना कांचनपाडाला जावे लागले. यानंतर परतत असताना जयजयकार करून आपला आनंद व्यक्त करण्यकरिता काही लोकांनी आम्हाला थांबवले. अशा प्रकारच्या जयजयकाराच्या बाबतीत संयम ठेवला नाही तर तो तुमच्या नेत्यांना मारून टाकील आणि मग तुम्ही तुमच्या प्रेमालाच दोष द्याल. तुम्ही पाहत असलेल्या या बंधुभावामुळे तुम्हाला जो इतका आनंद होत आहे त्याबद्दल मी तुम्हाला सावध करू इच्छितो. त्यामागे असलेली बराकपूर* (बराकपूरचे लोक ही नोंद ऑगस्ट १८, १९४७ पाहा), *कांचनपाडा आणि इतर ठिकाणची उदाहरणे मी देऊ शकतो. याबद्दल कारणे देण्यात वा घटनेचे गांभिर्य कमी करण्यात काहीही अर्थ नाही. पाकिस्तानात म्हणा वा हिंदुस्तानस्तानात म्हणा बहुसंख्याकांकरिता कारण दाखवण्याची वा एखाद्या गोष्टीचे गांभिर्य कमी करण्याची काहीही सोय नसते. बहुसंख्याक हिंदूंना जर त्यांचा धर्म अमूल्य वाटत असेल तर त्यांनी तो कोणतेही मूल्य देऊन जपला पाहिजे. त्यांच्याकडे न्यायाकरिता पाहणाऱ्या अल्पसंख्याकांच्या सीमा वा चुकांकडे त्यांनी दुर्लक्ष करावे. एका मुसलमान मित्राने माझ्यासमोर केलेले वक्तव्य मला लाजेने खाली मान घालून ऐकावे लागले होते. सुस्कारा सोडत तो म्हणाला की बहुसंख्य हिंदूंच्या गुलामगिरीशिवाय आमच्याकरिता काहीही शिल्लक राहिले नाही आणि मशिदीमध्ये आम्ही प्रार्थना करत असताना वाद्य वाजले तरी आम्हाला ते गुपचुप सहन करावे लागेल. मुसलमानांकडून माझ्यावर नैराश्याची अशी वेळ येऊ शकली नसती. ज्या मित्राने वरील उद्गार काढले त्याच्या अनाहूतपणे हे लक्षात आले नाही की बहुसंख्य मुसलमान याचा बदला पाकिस्तानमध्ये घेतील. हिंदुस्तान वा पाकिस्तानमध्ये असे होणार नाही अशी मला आशा आहे. प्रत्येक बहुसंख्य समाजाने दुसरा बहुसंख्य समाज काय करतो याचा विचार न करता नम्रपणे आपले कर्तव्य पार पाडणे*

*ही योग्य गोष्ट आहे. यामुळे जोपर्यंत पाकिस्तान व संघराज्याच्या प्रधानमंत्र्यांमध्ये दुसऱ्या एखाद्या मार्गाबद्दल एकमत होत नाही तोपर्यंत ब्रिटिश शासनांतर्गत जे नियम बळजबरीने लादण्यात आले होते त्यांचे दोन्ही राज्यांमध्ये स्वयंस्फूर्तीने पालन करण्यात यावे. ज्यांना आपल्या अहंकारात असे वाटते की अल्पसंख्याकांवर आपण आपली इच्छा बळजबरीने लादू शकतो ते मूर्ख आहेत आणि भयानक चूक करत आहेत. यामुळे सध्या जे सदिच्छेचे वातावरण निर्माण झाले आहे ते टिकवण्याकरिता आपण कोणत्याही परिस्थितीत न्यायाने वागलो पाहिजे.*

हरिजन, ऑगस्ट ३१, १९४७

# ९६. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट २०, १९४७

(ही सभा खेंग्रापाती, बराकपूर येथे झाली होती व तिच्यात जवळपास ४ लाख श्रोते उपस्थित होते.)

कलकत्ता,

ऑगस्ट २०, १९४७

गांधीजींनी लोकांचे लक्ष चितगावकडे वेधले आणि ते म्हणाले की निधी गोळा करणे, अन्न, वस्त्र आणि आवश्यक औषधोपचार वितरित करणे तुमचे कर्तव्य आहे. मदतकार्याकरिता तुम्ही पुरसे स्वयंसेवक पाठवले पाहिजे. मारवाडी रिलीफ सोसायटी आणि श्रीयुत मुईरहेड यांच्या नेतृत्वाखालील फ्रेंडस सर्व्हिस युनिट यांनी आधीच तिथे कार्यकर्ते पाठवले हे पाहून मला आनंद होतो.

पंजाबचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की कलकत्त्यात आता शांतता प्रस्थापित झालेली असल्यामुळे मी पंजाबमध्ये जायला पाहिजे अशा आशयाची पत्रे मला मिळाली आहेत. ते म्हणाले की ईश्वर जेव्हा मला बोलावील तेव्हा मी निश्चितच तिथे जाईन. परंतु दोन्ही राष्ट्राच्या प्रधानमंत्र्यांनी घोषित केले आहे की पंजाबमध्ये संपूर्ण शांतता प्रस्थिपित करण्याच्या कामाला आमची प्राथमिकता आहे. शांतता प्रस्थापित करण्याकरिता आमच्याजवळ असलेल्या प्रत्येक साधनसामुग्रीचा आम्ही वापर करू आणि त्याकरिता आम्ही जनमत तयार करू. यामुळे कलकत्ताप्रमाणेच पंजाबमध्येही चांगले वातावारण निर्माण होईल अशी त्यांना आशा आहे. पंजाबचे दोन मुख्यमंत्री आणि मास्टर तारासिंग व ग्यानी करतार सिंग यांचेही असेच म्हणणे आहे.

केंद्रीय शांतता समितीचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की आतापर्यंत जे परिणाम झाले ते तिने मजबूत केले पाहिजे. हिंदूंचे ज्याप्रमाणे पुनर्वसन करण्यात येत आहे त्याचप्रमाणे ज्या गरीब मुसलमानांना ज्या भागातून आपले घर सोडावे लागले असेल त्या भागात त्यांचे पुनर्वसन करण्यात आले पाहिजे. प्रत्येक मोहल्ल्यात स्थानिक शांतता समितीची स्थापना करण्यात यावी आणि त्यांनी एकत्रित काम करण्याकरिता शुद्ध अंतःकरणाचा कमीतकमी एक हिंदू आणि आणि मुसलमान शोधला पाहिजे. या समित्यांनी त्यांच्या भागात दौरा केला पाहिजे. जिथे कुठे मैत्रीभावनेची उणीव असेल तिथे ती निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला पाहिजे. पुनर्वासाकरिता तुम्हाला सविस्तर विचार करावा लागेल. आपल्या घरी परतू इच्छिणाऱ्या निष्काषित लोकांकरिता अन्न, निवारा आणि वस्त्र याची व्यवस्था करावी लागेल. कलकत्त्यातील स्त्रीपुरुष आपल्या भावना वृद्धींगत करण्याकरिता अशाप्रकारे सहकार्य करतील तर कलकत्त्याकरिता तो महान दिवस ठरेल. हिंदुस्तानची फाळणी करून

दोन राष्ट्रे निर्माण करण्याबद्दल आता संबंधित  पक्षांचे एकमत झालेले असल्यामुळे भाडणाचे कोणतेही कारण आता उरलेले नाही व यामुळे शांततापूर्ण वातावरण निर्माण करण्याकरिता ते परस्परांशी सहकार्य करू शकतात.

यानंतर गांधीजींनी ध्वजाचा प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले की या दोन राज्यांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध असल्यामुळे या दोन्ही राष्ट्रांनी अमेरिका आणि इंग्लंडप्रमाणे एकाच वेळी दोन्ही राष्ट्रांच्या ध्वजांचे अवरोहण करायला हरकत नाही असे मला व्यक्तीशः वाटते.

यानंतर संघराज्यात कायद्याच्या मदतीने गोहत्या बंद करण्याच्या प्रयत्नाचा गांधीजींनी उल्लेख केला.  गोहत्येच्या प्रश्नाचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की संघराज्यात कायद्याच्या मदतीने गोहत्या बंद करण्याचा प्रयत्न करण्यात आला तर ती ती फार मोठी चूक होईल. जवळपास अर्धशतकापासून अधिक काळ मी गायीचा भक्त आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत तिला कायम स्थान आहे. मतभेदानंतरही आपल्या हिंदू मित्रांबद्दलच्या जबाबदारीची स्वतःहोऊन जाणीव व्हावी इतक्या प्रमाणात जर तुम्ही मुसलमानांची अंतःकरणे जिंकली तर गाय खरोखरच वाचवता येऊ शकते. खिलाफतीच्या काळात ही गोष्टी भरपूर मोठ्या प्रमाणात अनुभवाला आली होती. आता भारत स्वतंत्र झाला आहे. तुम्ही जर परस्परांशी योग्य पद्धतीने वागलात तर याच जुन्या संबंधांची पुनर्स्थापना करता येऊ शकते.

अखेरीस ते म्हणाले की अशा प्रकारणी बळजबरी करणाऱ्या कायद्याचा आधार घेण्यात आला तर हिंदू धर्माची आपण चुकीच्या पद्धतीने सेवा करू. कोणत्याही धर्माचा माणूस असला तरी आपण त्याचा जेव्हा शुद्ध न्याय करू तेव्हाच हिंदू धर्म वाचवता येईल.

हरिजन, ऑगस्ट ३१, १९४७

# ९७. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट २१, १९४७

(ही सभा पार्क सर्कस मैदानात झाली होती. या भागात प्रामुख्याने मुसलमान राहतात. सभेची सुरुवात इकबाल यांच्या सारे जहॉंसे अच्छा हिंदोस्तॉं हमारा या गाण्याने झाली होती.)

कलकत्ता,

ऑगस्ट २१, १९४७

श्रोत्यांमधील स्त्रिया प्रामुख्याने भारताचा आणि पाकिस्तानचा असे दोन ध्वज फडकवत होत्या. त्यांच्याकडे गांधीजींनी सभेचे लक्ष वेधले व ते म्हणाले की हे आनंददायी दृश्य भारतात सर्वत्र दिसेल अशी आशा आहे. शहीद साहेबांच्या सूचनेनुसार हिंदू-मुस्लीम जिंदाबाद ही घोषणा पुनर्जिवित केल्याबद्दलही त्यांना आनंद झाला कारण ही घोषणा खिलाफतीच्या भरभराटीच्या काळातील होती. त्या जुन्या दिवसाची आठवण करत ते म्हणाले की त्या काळात कैदेत असलेले मुसलमान बंधू इकबालचे 'सारे जहॉं से अच्छा' हे गाणे म्हणत असत. स्वर्गीय सरलादेवी चौधरानी यांच्याकडून मीही ते गाणे तितक्याच गोड आवाजात म्हणवून घेत असे. ही तिसरी वेळ की आहे की हे गाणे मी तितक्याच गोड आवाजात आणि जोमात म्हटलेले ऐकतो आहे. या कवितेचे शब्द जितके गोड आहेत तितकाच सूरही गोड आहे1. आणि धर्म कधीही परस्परांचा द्वेष करणे शिकवत नाही याहून अधिक गोड गोष्ट कोणती असू शकते? त्यांनी आशा व्यक्त केली की ही जी शुभ सुरुवात आपण केली आहे ती चिरस्थायी होईल आणि तुमच्या अडचणी सोडवण्याकरिता तुम्ही कधीही तलवारीचा आधार घेणार नाही. जर असे काही घडले तर कधीही अनुचित घटना घडण्याला तुम्ही परवानगी देणार नाही व मला आजसुद्धा आढळले त्याप्रमाणे क्षुल्लक गोष्टींची अतिशयोक्ती करून सांप्रदायिक दंगली होतील असे वातावरण तुम्ही निर्माण करणार नाही. गांधीजी विनवणी करत म्हणाले की तुम्ही अशी मजबूत पुनर्वसन समिती तयार करा की जी पुरेसा निधी गोळा करू शकेल व तो गरजूंना देऊ शकेल.

प्रत्येक निष्काषित माणसाला परत त्याच्या घरी आणण्याकरिता संपूर्ण निःपक्षपातीपणा हवा असतो. अशी तक्रार आहे की सरळ कार्यवाहीच्या दिवसात जे काही मुसलमान गाडीने माल इकडून तिकडे नेत होते त्यांना त्यांच्या कामावरून हुसकावून लावण्यात आले आणि आता त्यांना दुसरा कोणताही व्यवसाय मिळू शकलेला नाही. गांधीजी म्हणाले की हे वक्तव्य जर खरे असेल तर त्यांना त्यांच्या कामावर परत घेण्यात यावे. मग त्याच्या ठिकाणी इतर प्रांतातून काम करण्याकरिता

आणलेल्या लोकांचे काय करावे? ही थोडा क्लिष्ट प्रश्न आहे. परंतु व्यापारी आपल्या बुद्धिमत्तेने तो सोडवू शकणार नाही असा हा प्रश्न नाही. जिथे इच्छा असते तिथे मार्ग असतो. काळजीपूर्वक लक्ष घातले तर अशा गोष्टींमधूनच चिरस्थायी शांततेचा पाया घालता येतो. असे जमीदारही आहेत की जे परत येणाऱ्या निष्काषित लोकांचा गैरफायदा घेऊ पाहत आहेत. बस्तीमध्ये राहणारे लोक ज्या काळात तिथे राहत नव्हते त्या काळाचे भाडे त्यांनी घेऊ नये तसेच त्यांनी अधिक भाड्याचीही मागणीही करू नये. ते पुढे म्हणाले की दोन्ही संप्रदाय परस्परांशी व्यवहार करताना पूर्णपणे प्रामाणिक असतील व परस्परांशी सत्याचरण करतील तर मला खात्री आहे की हृदयाच्या या ऐक्याचा प्रभाव पंजाबवर पडल्याशिवाय राहणार नाही व त्याची दोन्ही राष्ट्रांच्या मंत्र्यांना मदत झाल्याशिवाय राहणार नाही.

यानंतर ते सीमा आयोगाच्या निर्णयाकडे वळले. विवादाशी संबंधित सर्व पक्षांच्या सहमतीने लवादाची निवड करण्यात आली होती. यामुळे लवादाच्या सदस्यांच्या हेतूबद्दल शंका घेणे अन्याय्य आणि अशोभनीय होईल. या फुकटच्या भाकरी भाजण्याकरिता मलाही विशेषेकरून बोलावण्यात आले होते. ज्या पक्षांचे आणि जनतेचे ते प्रतिनिधित्व करत होते त्यांनी दिलेला निर्णय निष्ठापूर्वक मान्य केला पाहिजे. मला माहीत असलेल्या कोणत्याही लवादाने दिलेला निर्णय - आणि मलाही अनेक बाबतीत लवादाशी काम करावे लागले होते - सर्व पक्षांचे पूर्ण समाधान कधीही करू शकला नाही. परंतु एकदा निवड केल्यानंतर तुम्ही निवाड्याच्या अटी मान्य केल्या पाहिजे. उत्तम मार्ग तर हा असतो की संबंधित पक्षांनी आपसात बसूनच तडजोड केली पाहिजे. ख्वाजा साहेब नझिमुद्दीन आणि डॉ. घोष यांनी सुज्ञपणाने सुचवले तेव्हा हा राजमार्ग तुम्हाला उपलब्ध होता.

त्यांना माहीत होते की मुशिराबाद आणि मालडा येथील मुसलमानांची तितकीच निराशा झाली आहे जितकी खुलना आणि गोपालगंज येथील हिंदूंची व चितगाव पहाडी क्षेत्रातील बौद्धधर्मीय लोकांची. बौद्ध धर्मीय लोक पूर्व बंगालमध्ये गेले आहेत. या सर्व लोकांना मी सांगेन की लवादाच्या निवाड्यावर भांडणे मूर्खपणाचेच नाही तर अशोभनीयही आहे. देशाच्या विभाजनाप्रमाणे १५ ऑगस्ट साजरा करण्यात आला होता याला काहीही महत्त्व नाही. माझा जर सल्ला घेण्यात आला तर अनिश्चिततेच्या परिस्थितीमुळे काहीही साजरे करू नये असा सल्ला मी दिला असता. परंतु संबंधित ठिकाणी एकदा चुकीचा ध्वज फडकवण्यात आलेला असला तरी आता ती चूक दुरुस्त करून त्या ध्वजाच्या ठिकाणी योग्य ध्वज फडकवण्याला काहीही हरकत नाही. परंतु मी आधीच सांगितल्याप्रमाणे या दोन राष्ट्रांमध्ये आता कोणताही ध्वज चुकीचा नाही कारण आता यांच्यात कोणतेही भांडण उरलेले नाही. दोन्ही राष्ट्रांनी प्रामाणिकपणे मैत्रीची भावना ठेवली होती व

परस्परांबद्दल आदर ठेवला होता. यामुळे माझा सल्ला आहे की या काळापुरता कोणताही ध्वज उभारलेला असला तरी दोन्ही पक्षांनी त्याचा समान आदर करावा व त्यांना वंदावे.

गांधीजी म्हणाले की मुर्शिदाबाद आणि मालडा हे भाग पश्चिम बंगालमध्ये गेल्यामुळे तेथील मुसलमानांचा जो गैरसमज झाला तो का व्हावा हे मला कळत नाही. तसेच खुलना आणि गोपालगंज येथील हिंदूंचा आणि चितगाव पहाडी क्षेत्रातील बौद्ध धर्मीयांचा जो गैरसमज झाला आहे तोही का व्हावा हे मला कळू शकत नाही. कारण सर्व पक्षांनी एकदा मैत्रीचे आचरण सुरू केल्यानंतर कोणाबद्दलही भीती बाळगण्याचे कोणतेही कारण शिल्लक राहत नाही. यामुळे कोणत्याही बंगालमध्ये अल्पसंख्याकांवर बळजबरी केली जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. अल्पसंख्याकांना बहुसंक्याकांइतकेच अधिकार मिळतील.

हरिजन, ऑगस्ट ३१, १९४७

# ९८. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट २२, १९४७

(ही सभा देशबंधू पार्कमध्ये भरली होती. तिला लाखो लोक उपस्थित होते, अस्वस्थ होऊन ते पांगू लागल्यामुळे गांधीजींनी आपले भाषण मध्येच थांबवले.)

कलकत्ता,

ऑगस्ट २२, १९४७

श्रोत्यांमधील काही लोकांनी प्रतिसाद दिला आणि वेळ पाळली परंतु स्त्रियांनी क्वचितच प्रतिसाद दिला याकडे गांधीजींनी श्रोत्यांचे लक्ष वेधले. ते म्हणाले की ज्यांना काही अनुभव आहे त्यांना माहीत आहे की रामधून म्हणजे ईश्वराच्या नावाचा अंतःकरणापासून जप. लाखो सैनिक आपल्या वाद्यवृंदाच्या तालावर एकामागून एक पाऊल टाकत शिस्तीत चालत असतात. सैनिकी शक्तीने जगात जे नैराश्य आणले त्याची कल्पना ज्याने त्याचा अनुभव घेतला त्यालाच कळू शकते. युद्ध संपले असे जरी म्हणतात तरी त्याचे नंतर झालेले दुष्परिणाम युद्धापेक्षाही भयंकर आहेत. सैनिकी शक्तीची दिवाळखोरी ही अशी आहे.

किंचितही शंका न बाळगता मी सांगू शकतो की लाखो लोकांनी अगदी तालासुरावर म्हटलेली रामधून ही सैनिकी शक्तीच्या प्रदर्शनापेक्षा प्रकाराने वेगळी व अनंत पटींनी श्रेष्ठ आहे. अंतःकरणापासून घेतलेले ईश्वराचे नाव तुम्ही अनुभवत असलेल्या आजच्या नैराश्याऐवजी चिरंतन शांतता व प्रसन्नता निर्माण करते. यातून ते पंजाबच्या विषयाकडे वळले. कलकत्त्यात जर टिकाऊ शांतता निर्माण होऊ शकली तर तिचा परिणाम पंजाबवरही व्हायला पाहिजे. परंतु अजून तसे झालेले नाही. हिंदू लाहोर सोडून चालले आहेत आणि मुसलमान अमृतसर सोडून हे ऐकून मला दुःखही होते आणि लाजही वाटते. मुसलमानांनी हिंदूंवर विश्वास टाकू नये ही गोष्ट शोचनीय आहे. मुसलमान, हिंदू आणि शीख पुढारी मोठ्या प्रमाणात निघून जात असलेल्या लोकांना थांबवतील अशी आशा आहे..

यानंतर खरगपूरहून भेटायला आलेल्या काही मुसलमानांचा विषय गांधीजींनी काढला. तिथे आज जरी तुलनात्मक शांतता असली तरी ती टिकेल अशी शाश्वती नाही. हिंदू अधिकारी पक्षपाती आहेत अशी तक्रार त्यांनी केली आहे. असे नसेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली. पोलीस विभागातील सर्व अधिकाऱ्यांना आणि त्यांच्या हाताखालील लोकांना त्यांनी स्पष्टपणे सांगितले की तुम्ही हिंदू, मुसलमान वा शीख नाही. तुम्ही भारतीय आहा आणि प्रत्येक भारतीयाच्या, मग त्याचा

धर्म कोणताही असो, संरक्षणाकरिता शपथबद्ध आहा. असे केल्याने तुम्ही मुसलमान, हिंदू वा शीख राहणार नाही असे नाही, उलट तुम्ही अधिक चांगले व्हाल.

धर्म ही खाजगी वैयक्तिक बाब आहे आणि जर त्याला आपण वैयक्तिक पातळीवर ठेवले तर आपल्या राजकीय जीवनात सर्व काही चांगले होईल. आज जी बंधुभावाची अभिव्यक्ती दिसते तिला जर आपण सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अनुरूप कृतीची जोड देऊन दृढ केले नाही तर ती क्षणिक बाब ठरेल. जर सरकारी अधिकारी आणि जनतेचे प्रतिनिधी ही जबाबदारी घेतील व धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण करण्याकरिता मन लावून प्रयत्न करतील तर आपण नवभारताची निर्मिती करू शकतो व अशा भारताचा जगाला अभिमान वाटेल.

हरिजन, ऑगस्ट ३१, १९४७

## ९९. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट २३, १९४७

(कुचबिहारचे महाराज यांच्या अलिपूर येथील वुडलॅन्ड्स या घरी ही सभा भरली होती.)

कलकत्ता,

ऑगस्ट २३, १९४७

*गांधीजींनी आधी अल्लाह - ओ- अकबर ही घोषणा केली . त्याला काही हिंदूंनी आक्षेप घेतला. गांधीजींचे म्हणणे होते की या घोषणेपेक्षा मोठी घोषणा जगात निर्माण झालेली नाही. ही घोषणा हृदय हेलावणारी आहे व तिचा अर्थ आहे केवळ ईश्वर महान आहे. या अर्थात नम्रता आहे. ही घोषणा अरबी भाषेत आहे म्हणून ती आक्षेपार्ह झाली काय? गांधीजींनी मान्य केले की या घोषणेशी भारतात संशयास्पद गोष्टींशी साहचर्य आहे. ही घोषणा करत हिंदूंना मारण्याकरिता मुसलमान काही वेळा मशिदीबाहेर आले असल्यामुळे या घोषणेने काही वेळा हिंदूंना भयभीत केले आहे. परंतु मूळ घोषणेचा याच्याशी काहीही संबंध नाही. यामुळे या दोघांमध्ये टिकाऊ मैत्री निर्माण करायची असेल तर मुसलमान मित्रांबरोबर ही घोषणा करायची की नाही याबद्दल हिंदूंच्या मनात मुळीच आशंका निर्माण व्हायला नको. ईश्वर अनेक नावांनी ओळखला जातो व त्याला अनेक विशेषणे लावली जातात. राम, रहीम, कृष्ण, करीम ही सर्व नावे एकाच ईश्वराची आहेत. सत श्री अकाल हीही तितकीच आशयघन घोषणा आहे. एकाही मुसलमानाने वा हिंदूने या घोषणेचा उच्चार करताना मागेपुढे पाहिले पाहिजे काय? याचा अर्थ आहे ईश्वर आहे आणि इतर काहीही नाही. रामधूनमध्येही हाच गुण आहे.*

*यानंतर ते वंदेमातरमकडे वळले. ही घोषणा धार्मिक नाही. ही शुद्ध राजकीय घोषणा आहे. कॉंग्रेसने ती तपासली पाहिजे. गुरुदेवांकडे यासंबंधी विचारणा करण्यात आली होती. आणि या गाण्याच्या सुरुवातीच्या दोन ओळींमध्ये आक्षेपार्ह काहीही नाही असे कार्यकारिणीच्या हिंदू आणि मुसलमान सदस्यांनी मान्य केले असल्यामुळे गांधीजी म्हणाले की योग्य प्रसंगी हे गीत म्हणायला काहीही हरकत नाही. मुसलमानांना चिथावणी देण्याकरिता वा अपमानित करण्याकरिता त्याचा उपयोग कधीही करण्यात येऊ नये. या घोषणेने राजकीय बंगालला पेटवले होते हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. वंदेमातरम हे शब्द उच्चारत स्वातंत्र्याकरिता अनेक बंगालींनी आपले प्राण अर्पिले आहेत. यामुळे भारतमातेला*

***वंदन करणारे वंदेमातरम हे गीत आहे व त्याबद्दल माझ्या मनात तीव्र भावना आहेत हे मला माहीत असल्यामुळे माझ्या लीगच्या मित्रांनी ही गोष्ट लीगच्या पक्षश्रेष्ठीकडे न्यावी असा मी त्यांना सल्ला देईन. हिंदू आणि मुसलमानांमधील वाढती मैत्री पाहता वंदेमातरमच्या ठरवण्यात आलेल्या ओळींवर लीगच्या सर्वोच्च नेतृत्वाने आक्षेप घेतला तर मला आश्चर्य वाटेल कारण वंदेमातरम हे राष्ट्रगीत तर आहेच शिवाय बंगालची ती अशी राष्ट्रीय उद्घोषणा आहे की जिने उर्वरित भारत झोपलेला असताना बंगालला टिकवून ठेवले आणि माझी जोपर्यंत माहिती आहे तोपर्यंत या गीताचे हिंदू आणि मुसलमान या दोघांनीही स्वागत केले होते. यात काही संशय नाही की काल सायंकाळी मी दाखवल्याप्रमाणे प्रत्येक गोष्ट दोन्ही भागीदारांकरिता पूर्णपणे स्वयंस्फूर्त असली पाहिजे. खऱ्या मैत्रीत कशाचीही बळजबरी करता येत नाही.***

***त्यांनी तिसऱ्या गोष्टीचा जो उल्लेख केला तो त्यांचे मित्र शहीद सुऱ्हावर्दी यांचा होता. शहीद सुऱ्हावर्दी हे विश्वसनीय नाहीत, ते मंत्री असताना हिंदूंना बरेच काही सहन करावे लागले होते अशा तक्रारी गांधीजींकडे तोंडी आणि पत्रांमधूनही सारख्या येत होत्या. ही तक्रार नवीन नव्हती. दोघांनी मिळून जे काम हाती घेतले होते व ज्याला अकल्पितपणे सुंदर फळ आले होते त्या कामाच्या आधीही गांधीजींना ही गोष्ट माहीत होती. गांधीजी म्हणाले की सावधगिरीची सूचना देणारांमुळे मी या प्रश्नाची चर्चा करत आहे. या प्रश्नाची माझ्या मित्राशी चर्चा करण्याकरितासुद्धा मला वेळ नव्हता. मला कोणतीही घाई नाही. स्वभावतःच मी विश्वास ठेवणारा आहे. सद्भावनेने विश्वास ठेवल्यामुळे मी काहीही गमावलेले नाही. ज्याप्रमाणे इतरांनी माझ्या शब्दांवर विश्वास ठेवावा असे मला वाटते त्याचप्रमाणे जोपर्यंत दुसरा माणूस खोटा बोलत आहे असे सिद्ध होत नाही तोपर्यंत मी त्याच्यावर विश्वास ठेवीन. माणसांमध्ये राहण्याचा हाच सन्माननीय मार्ग आहे असे माझे मत आहे. विश्वास ठेवल्यामुळे माणूस कधीही काहीही गमावत नाही उलट विश्वासघात करणाराच गमावतो. त्याला त्याच्या निर्मात्यासमोर उत्तर द्यावे लागेल. आम्ही जे काही थोडे दिवस बरोबर आहो त्यावरून मी म्हणू शकतो की या मैत्रीबद्दल पश्चात्ताप वाटण्यासारखे काहीही घडलेले नाही. आणि मी तुम्हाला सांगू शकतो की सुऱ्हावर्दी माझ्याबरोबर नसते तर मी काहीही करू शकलो नसतो.***

***यानंतर त्यांनी पंजाबी मित्राचे जे प्रतिनिधी मंडळ*** (निरंजन सिंग तालीब यांच्या नेतृत्वाखाली पंजाप हिंदू-शीख सभेचे प्रतिनिधीमंडळ गांधींना दुपारी भेटायला आले होते.) ***त्यांना***

*भेटायला आले होते त्याचा उल्लेख केला. त्यांना मिळालेल्या माहितीप्रमाणे पंजाबमध्ये जे काही घडत आहे ते किती भयावह आहे याचे चित्र त्यांनी माझ्यासमोर रेखाटले आणि त्यांनी मला ताबडतोब  पजाबमध्ये जाण्याची विनंती केली. त्यांनी मला सांगितले की पंजाबमध्ये जी कत्तल आणि जाळपोळ झाली आहे तिच्यासमोर बंगालमधील घटना काहीच नाहीत.*

*याशिवाय ते म्हणाले की लाहोरमधून हिंदू आणि शीख जवळपास निघून गेले आहेत तर अमृतसरमधून मुसलमान. मी असे समजतो की ही माहीती फुगवून सांगितलेली असवी. कलकत्त्यामधील पंजाबी लोकांना अमृतसरमधील खरी परिस्थिती कळू शकत नाही. कलकत्त्यामधील हिंदू, शीख आणि मुसलमान आपल्या मैत्रीच्या संबंधात खरोखर प्रांमाणिक असतील तर परस्परांची कत्तल करू नये असे त्या सर्वांनी पंजाबमधील आपल्या संबंधितांना लिहून कळवावे. असे केले नाही तर दोन्ही राष्ट्रप्रमुखांनी केलेल्या घोषणा निरर्थक ठरतील. पंजाबी पुढाऱ्यांना एकही मुसलमानेतर पाकिस्तानमध्ये असलेला आवडणार नाही तसेच भारतात हिंदू आणि शीख वगळता अन्य कोणी राहू नये असे वाटत असेल यावर माझा विश्वास बसू शकत नाही. यामुळे पश्चिम पंजाबमध्ये गुरुद्वारा आणि मंदिर राहणार नाहीत पूर्व पंजांबमध्ये मशिदी राहणार नाहीत ही याची तार्किक परिणती होईल. हे चित्र इतके भयावह आहे की की ते खरे असेल यावर विश्वास बसत नाही.*

*अखेरीस गांधीजींना भेटायला आलेल्या राष्ट्रवादी मुसलमानांच्या विषयाकडे ते वळले. मुस्लिम लीगला महत्त्व दिल्याबद्दल आणि जीवन दिल्याबद्दल आणि राष्ट्रावादी मुसलमानांकडे दुर्लक्ष केल्याबद्दल त्यांनी गांधीजींना हिणवले होते. गांधीजी म्हणाले की दोन्हीही आरोपांकरिता मला गुन्हेगार ठरवता येऊ शकत नाही. लीगला माझ्या वा कॉंग्रेसच्या मदतीशिवायच महत्त्व मिळाले होते. लीग मोठी झाली कारण बरोबर म्हणा की चूक तिच्याकडे मुसलमान आकर्षित झाले. कॉंग्रेसला आणि मला ही गोष्ट मान्य करावी लागली आणि तुम्हाला भेडसावत असलेल्या प्रश्नाबद्दल चर्चा करावी लागली. कायदे आझम जिनांना मुंबईत मी अठरा वेळा भेटायला गेलो याबद्दल मला खेद वाटत नाही. शहीद साहेब, उस्मान साहेब आणि लीगच्या इतर सदस्यांशिवाय मी काहीही करू शकलो नसतो.राष्ट्रवादी मुसलमानांकडे दुर्लक्ष करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. माणसाचा राष्ट्रवाद ही त्याची स्वतःची गुणवत्ता असते. तिच्याकरिता मान्यतेची गरज नसते. गांधीजींनी आपल्या मित्रांना विनंती करत सांगितले की तुम्ही जसे आहा तसेच राहा आणि*

*तुमच्या प्रत्येक कृतीतून धैर्य, स्वार्थत्याग, अभ्यासातून निर्माण झालेले खरे ज्ञान यांचे दर्शन होऊ द्या. असे झाले तर मग, तुम्ही थोडे असा की जास्त, तुमचा ठसा भारताच्या भवितव्यावर उमटल्याशिवाय राहणार नाही. यापुढे जाऊन त्यांनी त्यांना सल्ला दिला की तुम्ही लीगमध्ये सामील व्हा आणि जेव्हा केव्हा ती प्रतिगामी असल्याचे आढळेल तेव्हा तुम्ही तिला आतून विरोध करा. हे सर्व सांगत असतानाच त्यांनी लीगच्या मित्रांना सल्ला दिला की राष्ट्रवादी मुसलमान आत येवो वा बाहेर राहो तुम्ही त्यांच्याकडे मैत्रीच्या भावनेने जा. खरी मैत्री काही खास कारण असल्याशिवाय कुणालाही वगळत नाही.*

हरिजन, ऑगस्ट ३१, १९४७

# १००. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट २४, १९४७

कलकत्ता,

ऑगस्ट २४, १९४७

*मानपत्राकरिता महानगरपालिकेचे आभार मानत गांधीजी म्हणाले की डॉ. पी. सी. रॉय यांची मला आठवण झाल्याशिवाय राहत नाही. १९०१ साली मी त्यांच्या घरी एक महिना राहिलो होतो. ते जेव्हा स्वर्गीय देशबंधूंबरोबर होते तेव्हा ते काही मित्रांबरोबर त्यांना भेटायला जायचे व त्यावेळी पुरातत्त्व विभागाच्या इमारतीच्या सावलीत ते भेटत असत व तिथे त्यांच्या निरपवादपणे वैज्ञानिक विषयावर जिवंत चर्चा होत असत. तो त्यांचा विरंगुळा होता. तुमच्याजवळ काही पेय वा खाण्याचे काही साहित्य असायचे काय असे गांधीजींनी डॉ. राय यांना विचारले. डॉ. राय जोरात म्हणाले नाही. त्याचे खाणेपिणे त्यांच्या माहितीपर संभाषणात असायचे व ते वेळकाढू गप्पागोष्टीप्रमाणे नसायचे.*

*मानपत्राचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की महानगरपालिकेकडून मानपत्र मिळण्याची ही तिसरी वेळ आहे. पहिले मानपत्र देशबंधूंनी दिले जेव्हा ते महापौर होते.* (पाहा महानगरपालिकेच्या मानपत्राला उत्तर देताना दिलेले भाषण, नोव्हेंबर ६, १९२४) *त्यावेळची आठवण करत ते म्हणाले की मानपत्र ठेवलेल्या पेटीचा हरिजनांच्या कल्याणार्थ त्यावेळी लिलाव करण्यात आला होता. आशा व्यक्त करत ते म्हणाले की या पेटीचासुद्धा त्यावेळेप्रमाणे महापौर लिलाव करतील.*

*गांधीजी म्हणाले की स्वच्छतेच्या बाबतीत जोपर्यंत कलकत्ता जगातील पहिल्या क्रमांकाचे शहर बनत नाही तोपर्यंत माझे समाधान होणार नाही असे जे उत्तर मी पहिल्या मानपत्राच्या वेळी दिले होते त्याच उत्तराची मी आता पुनरावृत्ती करीन. यात त्यांनी कलकत्त्यातील गल्लीबोळांच्या स्वच्छतेचाही समावेश केला ज्यांचा तिथे आज अभाव होता. नागरिकांच्या निरोगी शरिरात निरोगी मन असले पाहिजे. तुमच्यात गुंड, उडाणटप्पू, मद्यपी असायला नको. कलकत्त्यातील मृत्यूदर कमी करायचा असेल तर कलकत्त्यात शुद्ध दुधाच्या नद्या वाहिल्या पाहिजे. आज ही गोष्ट मिळणे फार कठिण झाले आहे. शहीद साहेबांनी दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या सदस्यांनी हिंदू आणि मुसलमानांमध्ये*

*कायम स्वरूपी मैत्रीचा पाया घालण्याकरिता प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे.*

*गांधीजी म्हणाले की ब्रह्मदेशातून येत असलेल्या जहाजातून किमान ५०० टन तांदूळ मिळवून देण्याकरिता गांधीजींनी मदत करावी असा ख्वाजा साहेब नझिमुद्दीन* (पूर्व बंगालचे मुख्यमंत्री) *यांचा एक संदेश तुमच्याकरिता आहे. ही निकड इतकी तातडीची आहे की त्यांना ५०० टन तांदूळ वेळीच देता येण्याकरिता ते जहाज चितगावकडे वळवावे लागेल. गांधीजी या विनंतीशी आनंदाने सहमत झाले आणि आशा व्यक्त केली की शक्य असेल तर राजेंद्र प्रसाद चितगाव बंदरात ५०० टन तांदूळ देण्याकरिता चितगाव बंदराकडे जहाज वळवतील. ते म्हणाले की अन्नधान्य वाटपाची जबाबदारी असलेले लहानसहान अधिकारी पूरग्रस्त मुसलमानांनाच मदत करण्यापर्यंत आपली जबाबदारी आहे असे समजतात अशी माझ्याकडे जी तक्रार आली आहे तिचा उल्लेख केल्याशिवाय मी राहू शकत नाही. ही बातमी खरी नसेल अशी मला आशा आहे. दुर्दैवाने तसे असेल तर मंत्री आणि उच्च पदावरील अधिकारी ही चूक दुरुस्त करतील अशी आशा आहे. जर या दोन स्वसत्ताक राज्यांना प्रतिष्ठेने आणि मित्राप्रमाणे राहायचे असेल तर सांप्रदायिक भावना पूर्णपणे काढून टाकण्यात आली पाहिजे. हिंदू आणि मुसलमान भांडत असताना जे विषारी बी पेरले गेले होते ते ताबडतोब समूळ नष्ट करणे हे त्यांच्या पुढाऱ्यांचे काम आहे.*

*नंतर ते म्हणाले की सरकारी सेवेतील मुसलमानांना जेव्हा पर्याय देण्यात आला होता तेव्हा त्यांनी पाकिस्तानची निवड केली होती आणि हिंदूंनी संघराज्याची याचा मला अतिशय खेद होतो. मला काहीही संशय नाही की ही निवड घाईघाईत करण्यात आली असावी. सरकारी सेवाक्षेत्रातही सांप्रदायिक विष पसरले याचे मला दुःख होते. दोन प्रमुखांनी परस्परांशी सल्लामसलत करावी आणि हे जर खरोखरच शक्य असेल तर सेवाक्षेत्रातील लोकांना आपल्या पर्यायावर पुनर्विचार करण्याची परत संधी द्यावी. हिंदू अधिकाऱ्यांवर मुसलमान विश्वास ठेवू शकत नसतील वा याच्या उलट परिस्थिती असेल तर भारताकरिता ही शोचनीय परिस्थिती असेल. ही गोष्ट बरीचशी त्या नेत्यांवर अवलंबून असेल जे सेवाक्षेत्र आणि जनता या दोघांनाही प्रभावित करतात.*

*अखेरची गोष्ट सांगायची म्हणजे खुलनाचा पाकिस्तानमध्ये समावेश होत असल्याबद्दल तेथील लोक समारंभ साजरा करत आहेत असे मी ऐकले आहे. निवाडा झाल्यानंतर अशा प्रकारे समारंभ साजरा करण्याला काहीही अर्थ नाही. परंतु शहीद*

*साहेबांनी गांधीजींचे सांत्वन करत सांगितले की या समारंभात हिंदूसुद्धा सहभागी होणार असून दोन्ही समाज मिळून तो साजरा करणार आहेत. असे असले तरी या उदाहरणाने ते प्रसन्न झाले नव्हते. दुखावलेल्या समाजाला निवाडा मनापासून पूर्णपणे मान्य करायला थोडी उसंत मिळावी म्हणून हर्षोन्मादात मग्न असलेल्या लोकांनी थोडा संयम ठेवला पाहिजे. हा निवाडा अंतिम आहे असे समजायला पाहिजे. अपवाद केवळ इतकाच की दोन सार्वभौम राष्ट्रातील मंत्री संबंधित पक्षांच्या समाधानाकरिता यात बदल करू शकतात. याशिवाय इतर कोणताही योग्य आणि सभ्यपणाचा मार्ग नाही.*

हरिजन, सप्टेंबर, ७, १९४७

# १०१. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट २५, १९४७

(ही सभा हावरा मैदानात झाली होती. गांधीजींचा या दिवशी मौनवार असल्यामुळे त्यांनी आपले भाषण लिहून काढले आणि निर्मल कुमार बोस यांनी त्याचा बंगालीत अनुवाद केला. परंतु पावसामुळे त्यांना उशीर झाला व ते एक तास उशिरा पोहोचले. त्या वेळेपर्यंत मौन सोडण्याची गांधीजींची वेळ झाली होती. भाषणाचे पहिले दोन परिच्छेद लिहिलेले होते. उर्वरित भाग गांधीजी जे बोलले त्याचा वृत्तांत आहे.)

कलकत्ता,

ऑगस्ट २५, १९४७

आज माझा मौनवार असल्यामुळे मी तुमच्याशी बोलू शकत नाही याचा मला खेद होतो. यामुळे मला तुम्हाला जे काही सांगायचे आहे ते मी लिहून काढले आहे. पश्चिम बंगालमध्ये हिंदू बहुसंख्य असल्यामुळे त्यांचे आपल्या मुसलमान बांधवांप्रती मुख्य कर्तव्य कोणते आहे यासंबंधी मी दररोज तुमच्याशी बोलत असतो. तुम्ही जर भूतकाळ विसरू शकत असाल तरच तुम्ही हे कर्तव्य पार पाडू शकाल. शत्रूंचे मित्र कसे होतात याची उदाहरणे आपण जगभर पाहतो. उदाहरणार्थ ब्रिटिश आणि बोअर परस्परांशी अटीतटीने लढले होते परंतु आता ते मित्र झालेले आहेत हे आपणा सर्वांना माहीत आहे. हिंदू आणि मुसलमान का मित्र झाले पाहिजे याचे अजूनही महत्त्वाचे कारण आहे. आपण जर मनातील बदल्याची सर्व भावना काढून टाकली नाही तर आपण हे काम करू शकणार नाही.

आजची सायंकाळ सिल्हटला भेट देण्याची माझी इच्छा आहे. सिल्हटमध्ये जे जोरदार दंगे सुरू आहेत त्याबद्दल भयभीत झालेल्या लोकांच्या मला तारा येत आहेत. कारण माहीत नाही. आत्ताच मी सिल्हटला जाऊ शकत नाही याचा मला खेद होतो आणि माझ्या उपस्थितीमुळे ताबडतोब जमाव शांत होईल असे समजण्याइतका मी अहंकारीही नाही. मला माहीत आहे की काही तरी महत्त्वाचे कारण असल्याशिवाय माणसाने सध्याचे कर्तव्यस्थान सोडू नये, मग ते कर्तव्य नवीन कामाशिवाय कितीही लहान वाटत असो. साल्व्हेशन आर्मीच्या भाषेत बोलायचे तर वाईटपणाच्या विरोधात काटेकोरपणे सत्य आणि अहिंसेच्या साधनाने चांगुलपणाकडून लढा देणारे आपण सर्व ईश्वराचे सैनिक आहो. ईश्वराचे सैनिक म्हणून आपण प्रश्न विचारायचा नाही तर करायचे आणि मरायचे आहे. यामुळे सिल्हटच्या लोकांच्या व्यथांमध्ये मी जरी ताबडतोब धावून जाऊ शकत नाही तरी पूर्व

बंगालच्या अधिकाऱ्यांना सर्व सामान्यपणे आणि सिल्हटच्या अधिकाऱ्यांना विशेषेकरून मी विनवणी करू शकतो की त्यांनी संकटग्रस्त लोकांच्या बाजूने प्रयत्नांची पराकाष्ठा करून बेडर लोकांचा बंदोबस्त करावा. आता हिंदू आणि मुसलमानांमध्ये शातता निर्माण झालेली असल्यामुळे या घृणीत दंगली अधिकारीगण सहन करणार नाहीत अशी मला खात्री आहे. दंगलीचे हे काम गुंडांचे आहे असे म्हणणे चुकीचे आहे आणि असे म्हणून आपण त्यांचे गांभिर्य कमी करतो. ज्या राज्यात आपण राहतो त्या राज्यातील बहुसंख्याकांइतकेच आपणही महत्त्वाचे नागरिक आहो असे अल्पसंख्याकांना वाटले पाहिजे. बंगालच्या दोन भागाच्या प्रमुखांनी वारंवार भेटावे आणि दोन राज्यात शांतता कायम राखण्याचे मार्ग शोधावे तसेच तिथे राहणारांना पुरेसे अन्न आणि वस्त्रप्रावरण मिळेल व पूर्व व पश्चिम बंगालच्या जनतेला पुरेसे काम मिळेल हे पाहावे. आपले पुढारी प्रामाणिकपणे, निर्भयपणे आणि खंड न पडू देता एकत्रित होऊन काम करत आहेत हे जेव्हा जनता पाहील तेव्हा या दोन राज्यांत राहणाऱी जनता पुढाऱ्यांच्या या कामाची नोंद घेईल व त्याप्रमाणे वागेल. दंगलग्रस्त लोकांना मी सल्ला देईन की त्यांनी भवितव्याला शौर्याने तोंड द्यावे आणि भीतीला बळी पडू नये. लोकांच्या जीवनात दंगलीआदींचे असे प्रसंग येतच असतात. पुरुषत्वाची मागणी असते की अशा प्रसंगांना तोंड देत असताना आपण दुबळेपणा दाखवायला नको. दुबळेपणाने खोडसाळपणा वाढतो तर धैर्याने तो कमी होतो.

***ओल्या आणि चिखलाने भरलेल्या पटांगणात श्रोत्यांना उभे राहावे लागले वा बसावे लागले याकरिता गांधीजींनी आधी प्रचंड श्रोतृसमुदायाची माफी मागितली. मेजर जनरल शाह नवाझ यांच्या सत्काराप्रित्यर्थ हावडात जी सभा झाली होती तिच्यात शहीद साहेबांना जे अपमानित करण्यात आले त्याचा गांधीजींनी उल्लेख केला. या असभ्य वर्तनाकरिता जबाबदार असलेल्या लोकांची सेनापती महोदयांनी सौम्य शब्दांत कानउघाडणी केली.***

***गांधीजी म्हणाले की आपण भूतकाळ विसरायलाच पाहिजे आणि जेव्हा आम्ही दोघेजण कोणताही मानसिक आडपडदा न ठेवता काम करतो आहो तेव्हा एकाचा अपमान हा दुसऱ्याचाही अपमान असतो. आणि ज्याअर्थी आम्ही दोघेही हिंदू-मुसलमानांच्या ऐक्याचे प्रतिनिधित्व करण्याचा प्रत्न करत आहो त्याअर्थी हिंदू अथवा मुसलमानाचा अपमान करणे म्हणजे सोबत काम करणाऱ्या आम्हा दोघांचा अपमान करणे आहे.***

***यानंतर त्यांनी पंजाबहून आलेला एका मित्र शक्य तितक्या लवकर पंजाबमध्ये येण्याकरिता कशा प्रकारे आग्रह करत होता ते सांगितले. त्यांनी त्या मित्राला आश्वस्त करत***

*सांगितले की मी याबाबत सतत पंडितजींच्या संपर्कात आहे. मी संपूर्ण भारताचा सेवक असल्यामुळे अखेरीस पंजाब तितकाच माझा आहे जितका भारताचा दुसरा एखादा भाग. याशिवाय सैनिकी शासनाच्या दिवसांत पंजाबमध्ये मी सहा महिने राहिलेलो आहे. आवश्यकता पडली की शक्य तितक्या लवकर मी पंजाबमध्ये जाणार आहे. हे खरे आहे की सिल्हट, मालडा, मुर्शिदाबाद आणि इतर ठिकाणीही माझी आवश्यकता आहे. एकच माणूस आपल्या मर्यादित वेळेत सर्व ठिकाणी हजर राहू शकेल हे शक्य नाही. तसेच संकटाच्या वेळी एकाच माणसावर अवंलंबून राहणे हीसुद्धा निरोगी पद्धत नाही. संकटप्रसंगी मदतीकरिता संकटनिवारण व्हावे म्हणून ईश्वरावर अवलंबून राहणे हेच प्रतिष्ठितपणाचे आहे. तोच अचूकपणे मदतीकरिता धावून येणारा असतो, मार्गदर्शक असतो आणि मित्रही असतो.*

*त्यांनी निदर्शनास आणून दिले की पुनर्वसन सोपे होणार नाही. जमीनमालक याच्या विरोधात आहेत असे दिसते. निर्वासितांचे मनमोकळेपणाने स्वागत करणे हे त्यांचे कर्तव्य आहे. निर्वासितांवर बळजबरीने घर सोडण्याची वेळ आलेली असल्यामुळे त्या महिन्यांकरिता वा दिवसांकरिता घरमालकांनी त्यांना भाडे मागू नये अशी अपेक्षा आहे.*

*अखेरीस त्यांनी एका मुसलमानाकडून आलेल्या पत्राचा उल्लेख केला. तो स्वतःला सुफी म्हणवत असे. त्याने हे पत्र शहीद साहेबांद्वारे पाठवले होते.*

*त्याच्या पत्राचा आशय असा होता की हिंदू धर्म आणि इस्लाम यामध्ये कोणतेही साम्य नाही आणि यामुळे हे दोघे केव्हाही एक होऊ शकत नाही. त्याच्या म्हणण्याप्रमाणे याचे कारण हिंदू एका आणि केवळ एकाच देवावर विश्वास ठेवत नाहीत आणि गायी, बकरे यांना माणसापेक्षा श्रेष्ठ समजतात. तसेच ते उच्चनीच भाव मानतात. उलटपक्षी इस्लामचा भ्रातृभावावर विश्वास आहे. यामुळे त्यात श्रेष्ठकनिष्ठता नाही आणि ते एकाच ईश्वरावर विश्वास ठेवतात व तो म्हणजे अल्ला. हे हिंदू धर्माचे व्यंगचित्र आहे. असा एकही हिंदू नाही की जो गायीला वा बकऱ्याला माणसापेक्षा श्रेष्ठ मानतो. परंतु गांधीजींनी मान्य केले की जर माझ्यासारखा कोणी स्वतःला ईश्वराच्या निर्मितीतील सर्वात कमी प्रतीचा समजत असेल तर त्यात काहीही चूक नाही. हे खऱ्या नम्रतेचे चिन्ह आहे. गांधीजींचा विश्वास होता की प्रत्येक हिंदू एका आणि एकाच ईश्वरावर विश्वास ठेवतो. त्यांनी मान्य केले की हिंदू धर्माच्या सभोवती अनावश्यक वाढ झालेली आहे आणि त्याला अनुसरणारे नेहमीच अविकृत हिंदू धर्माचे पूजक असतातच असे नाही. यामुळे माझ्यासारखे हिंदू धर्माचा कसा अर्थ लावतात हे कळण्याकरिता तटस्थ माणूसच पाहिजे. त्याचप्रमाणे ईस्लामचा अर्थ लावण्याकरितासुद्धा*

***तटस्थ हिंदूच पाहिजे. कोणत्याही धर्माचा अर्थ लावण्याचा हा सर्वात सुरक्षित मार्ग आहे. असे झाले तर सर्व धर्मांचे मूलभूत तत्त्व एकच असल्याचे आढळून येईल.***

हरिजन, सप्टेंबर ७, १९४७

# १०२. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट २६, १९४७

(ही सभा लेक मैदानात झाली होती)

कलकत्ता,

ऑगस्ट २६, १९४७

*सभेला भरपूर गर्दी जमली होती आणि श्रोते आपसात बोलत असल्यामुळे जोराचा आवाज होत होता. गांधीजी म्हणाले की माझी इच्छा असूनही या गोंगाटामुळे मला बोलता येणे शक्य नाही. जमावातील बहुसंख्य लोक शांत असल्यामुळे मी दोन शब्द बोलेन असे ते म्हणाले. ते म्हणाले की माझी इच्छा असल्याप्रमाणे पुर्नवसनाचे काम वेगात होत नाही आहे. ही प्रक्रिया लवकर पूर्ण झाली नाही व निर्वासित आपल्या घरात परतू शकले नाही तर दररोज इतक्या मोठमोठ्या सभा होऊनही शांतता तत्कालिक राहील. मुद्द्यावर बोट ठेवत ते म्हणाले की तलावाच्या भागात  श्रीमंत लोक राहतात. त्यांनी जर कर्तव्यपूर्ती करायचे ठरवले तर ते पुनर्वसनाच्या योजनेला हातभार लावू शकतात. पोलिसांनी भीती वा पक्षपाताचा विचार न करता काम केले तर अर्धे काम पूर्ण होईल.*

*त्यानंतर त्यांनी जे आंग्ल-भारतीय बंधूभगिनी भेटायला आले होते त्यांचा विषय काढला. ते म्हणाले की मी जरी सभेत त्यांना बोलावू शकलो नाही तरी माझ्या एखाद्या प्रार्थना प्रवचनात मी त्यांच्याबद्दल आनंदाने बोलायचे ठरवले आहे. परकीय सत्तेच्या काळात त्यांच्या समाजाबद्दल सरकारला जवळीक वाटत असे. स्वातंत्र्याच्या काळात अशी कोणतीही विशेष वागणूक तुम्हाला मिळू शकणे सुरू राहू शकेल अशी कोणतीही अपेक्षा तुम्ही तुमच्या मनात बाळगू नये असे गांधीजींनी त्यांना सांगितले. परंतु प्रत्येक सेवकाचा ज्याप्रमाणे न्यायवर अधिकार असतो त्याचप्रमाणे तुम्हालाही पूर्ण न्याय मिळेल. आंग्ल-भारतीय हे देशातील इतर कोणत्याही समुदायाप्रमाणे देशाचे नागरिक आहेत. आंग्ल-भारतीयांना पूर्णपणे आपल्या भावाबहिणीप्रमाणे समजणे हे हिंदू आणि मुसलमान या दोघांचेही कर्तव्य आहे.*

*त्यानंतर त्यांनी लोकांना ग्रासत असलेल्या प्रांतवादाचा उल्लेख केला. काही आसामी आसाम हा केवळ त्यांचाच आहे असा विचार करत असल्याचे वृत्तपत्रांवरून त्यांना आढळून आले होते. ही भावना जर प्रत्येक प्रांतात चेतवली गेली तर मग भारत*

*कोणाचा असेल? ते म्हणाले की प्रत्येक प्रांतातील लोक भारताचे आहेत अशी माझी भावना आहे आणि भारत सगळ्यांचा. अट इतकीच की कोणीही दुसऱ्या प्रांताचे शोषण करण्याकरिता वा त्या प्रांतावर सत्ता गाजवण्याकरिता वा त्याच्या हितसंबंधांना कोणत्याही प्रकारे धक्का लावण्याकरिता तिथे जाऊन वास्तव्य करू शकत नाही. सर्व भारताचे सेवक आहेत आणि आपण सर्व सेवेच्या भावनेने इथे राहत आहोत. अशीच प्रांतीय भावना बिहारमध्ये बंगाली लोकांच्या विरोधात आढळते. दार्जीलिंगमध्ये याचे अतिरेकी रूप आढळते. असे म्हणतात की तिथे गुरखा राहतात आणि सपाटीच्या प्रदेशातून येणाऱ्या लोकांना तिथे राहण्यापासून विरोध करणे इतकेच त्यांचे काम आहे. आपला हेतू साध्य व्हावा म्हणून ते बळाचाही वापर करतात असे वृत्त आहे. गांधीजींनी आशा व्यक्त केली हे विष भारताबद्दलचे प्रेम आणि कल्पनाशक्ती नसलेल्या आणि काही मोजक्याच तरुणांपर्यंत मर्यादित राहील. गांधीजी म्हणाले की स्वतःला भारताचा भाग समजणाऱ्या काही गुरखा अधिकाऱ्यांना भेटल्यामुळे मला आनंद झाला. त्यांनी वर्तनाचा सुवर्णनियम सांगितला. दुसऱ्या प्रांताला इजा पोहचवण्याच्या दृष्टीने आणि आपल्या उद्दिष्टपूर्तीकरिता बळाचा आधार घेऊन कोणीही दुसऱ्या प्रांतात जाऊ शकत नाही.*

हरिजन, सप्टेंबर ७, १९४७

## १०३. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट २७, १९४७

(क्लाईव्ह ज्यूट मिलच्या पटांगणात ही सभा झाली होती.)

कलकत्ता,

ऑगस्ट २७, १९४७

*गांधीजी म्हणाले की मोतियाबुर्झला ही माझी दुसरी भेट आहे. अनेक वर्षांपूर्वी हिंदू आणि मुसलमान कामगारात जेव्हा झगडा झाला तेव्हा मौलाना साहेब अबुल कलाम आझाद यांच्याबरोबर मी इथे आलो होतो. ती माझी पहिली भेट. सुदैवाने मी दंगलीच्या ठिकाणी पोहोचलो तेव्हा दंगल जवळपास शमली होती आणि मला अकारण त्याचे श्रेय मिळाले होते. आजचा प्रसंग आनंदाचा आहे. हिंदू आणि मुसलमानांनी त्यांचे मतभेद मिटवले आहेत आणि ते मित्र झाले आहेत. ही मैत्री टिकाऊ राहील अशी माझी अपेक्षा आहे. कामगारांच्या या वस्तीत मी कामगारांना दोन शब्द सांगू इच्छितो. मजुरांमध्ये हिंदू आणि मुसलमान असा भेद नसेल अशी मी आशा करतो. तुम्ही सर्व कामगार आहा. मजुरवर्गात सांप्रदायिक रोग शिरला तर त्यामुळे स्वतः मजूर वर्ग आणि देशही दुर्बल होईल. सर्व प्रकारचे भेदभाव नष्ट करून मजूर समता निर्माण करत असतो. तुम्ही जर हे सत्य लक्षात घ्याल तर तुम्ही अजून एक पाऊल पुढे टाकावे अशी माझी इच्छा आहे. मालकाच्या तंत्राने चालल्यामुळे म्हणा की उन्मत्तपणामुळे म्हणा मजुराने अडाणी राहण्याचा मार्ग निवडला व त्यामुळे त्याचा भांडवलदाराचा माल आणि त्याची यंत्रसामुग्री यांचा नाश करण्याच्याच तर काय भांडवलदाराला मारण्याच्या मार्गावरही विश्वास बसला. मी स्वतःला मजूर आणि भंगी मानतो. यामुळे माझे हितसंबंध मजुरांशी जुळलेले आहेत आणि हिंसेने तुम्ही कधीही वाचू शकणार नाही हे मी तुम्हाला सांगू इच्छितो. सोन्याची अंडी देणारा हंस तुम्ही माराल. श्रम हे भाडवलापेक्षा किती तरी श्रेष्ठ आहे हे मी किती तरी वर्षांपासून सांगत आलो आहे. श्रमाशिवाय सोने, चांदी आणि तांबे हे सर्व निरर्थक ओझे असतील. तो मजूरच आहे की ज्याने पृथ्वीच्या पोटातून मूल्यवान खनिज बाहेर काढले. धातूशिवाय मजुराचे अस्तित्व मी सहज कल्पू शकतो. श्रम अमूल्य आहे, सोने नाही. भाडवल आणि श्रम यांचा विवाह व्हावा असे मला वाटते. परस्परांच्या सहकार्याने ते आश्चर्य निर्माण करू शकतात. परंतु हे तेव्हाच घडू शकते जेव्हा श्रम आपल्या चातुर्याने आपसात सहकार्य करू शकेल आणि नंतर सन्मानीय समतेच्या आधारावर भांडवलाला सहकार्य करायची तयारी दाखवू शकेल.*

*भांडवलाने श्रमावर नियंत्रण ठेवले कारण त्याच्यात एकीकरणाचे कौशल्य आहे. वेगवेगळे असलेले थेंब वाळून जातात आणि सहकार्य करणाऱ्या थेंबांचा असा महासागर तयार होतो की जो आपल्या रुंद छातीवर मोठमोठे जहाज वाहून नेऊ शकतो. याचप्रमाणे जगातील कोणत्याही एका भागातील मजूर एकत्र झाले तर त्यांना जास्त पगारानेही मोहवता येऊ शकणार नाही व असहायतेमुळे फार कमी मजुरीवरही त्यांना काम करायला लावता येणार नाही. खरे आणि अहिंसक मजूर एकत्रित आले तर ते एखाद्या लोहचुंबकाप्रमाणे काम करतील व आवश्यक त्या भांडवलाला ते स्वतःकडे आकर्षित करतील. अशा परिस्थितीत भांडवलदारांचे अस्तित्व केवळ विश्वस्त म्हणून राहू शकेल. जेव्हा असा आनंददायी दिवस उगवेल तेव्हा भांडवल आणि श्रम यांच्यात कोणतेही अंतर राहणार नाही. मजुराजवळ पुरेसे अन्नधान्य असेल, राहण्याकरिता चांगले आणि आरोग्यदायी घर असेल, त्याच्या मुलांना सर्व आवश्यक शिक्षण मिळेल व त्यांच्या स्वतःच्या शिक्षणाकरिताही त्याला पुरेसा वेळ मिळेल व त्याला योग्य वैद्यकीय मदत मिळेल.*

*यानंतर गांधीजी राष्ट्रवादी मुसलमानांच्या प्रश्नाकडे वळले. त्यांनी गांधीजींना पुढील चिठ्ठी पाठवली होती. राष्ट्रवादी मुसलमानांनी लीगमध्ये सामील व्हावे असे मत तुम्ही व्यक्त केले आहे. याचा अर्थ कॉंग्रेस आता सांप्रदायिक संघटना झाली आहे असा होतो काय?*

*गांधीजी म्हणाले की तुम्ही राष्ट्रवादाचा त्याग करा वा कॉंग्रेसने दुसरी हिंदू सभा व्हावे असे असे सांगण्याचा अपराध मी करणार नाही. सांप्रदायिकतेचा स्वीकार करून कॉंग्रेस आत्महत्या करणार नाही अशी मला आशा आहे. जेव्हा कॉंग्रेस सर्वांचे प्रतिनिधित्व करणे थांबवेल, मग ते गरीब भिकारी असोत की श्रीमंत राजेमहाराजे असोत, की हिंदू असो वा मुसलमान असो की अजून कोणी असो, तेव्हा ती स्वतःचाच नाश करून घेईल. यामुळे लीगच्या सदस्यत्वाची अट जर कॉंग्रेसच्या सदस्यत्वाचा त्याग करणे वा ते दडवून ठेवणे असेल तर कॉंग्रेसच्या मुसलमानांना लीगमध्ये सामील होण्याचे मी म्हणू शकत नाही. लींगच्या त्या ठरावांना ते पाठिंबा देतील जे राष्ट्रहिताचे आहेत व जे ठराव राष्ट्रहिताचे नाहीत त्यांना विरोध करतील. माझ्या मनात इस्लामबद्दल श्रद्धा असलेले असे अनेक मुसलमान होते की जे कॉंग्रेसमध्येही नव्हते आणि लीगमध्येही. मुसलमान मित्रांना जर मुसलमान समुदायाला प्रभावित करण्याची इच्छा असेल तर त्यांनी लीगमध्ये जावे असे मी म्हणालो होतो. खऱ्या राष्ट्रवादाला माझ्या अथवा अन्य कोणाच्या प्रोत्साहनाची गरज नसते. सद्गुणाप्रमाणेच राष्ट्रवादाचे पारितोषिकही राष्ट्रवादच असते. एका वा दसऱ्या संघटनेत*

*सामील होऊन भौतिक समृद्धीचा विचार त्यांनी कधीही करू नये. राष्ट्रवादी कधीही नोकरीचा, सत्तेचा वा संपत्तीचा विचार करणार नाही.कॉंग्रेसचे वा लीगचे अध्यक्षपद सेवेच्या बळावर मिळण्याचा एक पायंडा पाडला जाऊ शकतो. लीग जशी होती तशीच आहे, ती तशी काही माझ्या वा कॉंग्रेसच्या खुशामतीमुळे झालेली नाही. कायदे आझम कार्यक्षम अध्यक्ष होते. पैसा वा पद त्यांना विकत घेऊ शकत नव्हते. ते पहिल्या पंक्तीतील बॅरिस्टर आणि श्रीमंत गृहस्थ होते. व्यापाऱ्याचे पुत्र आणि हुशार वकील असल्यामुळे पैशाची गुंतवणूक करून तो द्विगुणित कसा करावा हे त्यांना माहीत होते. याचा अर्थ असा नाही की मला त्यांचे सर्व मार्ग पसंत होते वा मुसलमानांना त्यांनी योग्य मार्गाने नेले असे मला वाटते. कायदे आझम आणि लीगशी माझे मतभेद आहेत. परंतु त्यांचे जे गुण आहेत ते मी नाकारू शकत नाही. राष्ट्रवादी मुसलमानांना लीगमध्ये सामील होण्याकरिता मी कोणत्या अटीवर सांगितले ते यावरून स्पष्ट होईल.*

*यानंतर गांधीजी आझाद हिंद फौजेच्या लोकांनी विचारलेल्या प्रश्नाकडे वळले.* (यानंतर पाऊस सुरू झाल्यामुळे सभा थांबवावी लागली. आझाद हिंद फौजेच्या लोकांना गांधीजींनी दिलेल्या उत्तराकरिता पाहा प्रार्थना प्रवचन ऑगस्ट २८, १९४७)

हरिजन, सप्टेंबर ७, १९४७

# १०४. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट २८, १९४७

(विद्यापीठ विज्ञान महाविद्यालयात हे भाषण झाले)

कलकत्ता,

ऑगस्ट २८, १९४७

*प्रार्थनेनंतर कलकत्त्याच्या विद्यार्थ्यांना उद्देशून गांधीजी बोलले. ते म्हणाले की मी अगदी तरुणपणापासून माझ्या पद्धतीने शिकवण्याचे काम केले आहे आणि १९१५ साली भारतात आल्यानंतर बहुधा मी संबोधिलेली पहिली सभा विद्यार्थ्यांचीच असावी. यानंतर भारतभ्रमणात मी किती तरी विद्यार्थ्यांच्या सभा घेतल्या आहेत. तुम्ही माझ्याकरिता नवीन नाही आणि मी तुमच्याकरिता. परंतु एवढ्यात मी पुर्वीप्रमाणे सभा घेत नाही यामुळे आज या सभेत मला तुमच्याशी बोलता येते याचा आनंद होतो. संध्याकाळच्या कामकाजाच्या वेळी तुमच्या कुलगुरूंशी माझी सुखद भेट झाली होती. शहीद साहेबांशी विद्यार्थ्यांनी केलेल्या दुर्व्यवहाराबद्दल ते दु:खी होते. गांधीजी म्हणाले की मी केवळ प्रार्थना व त्यानंतरचे प्रार्थना प्रवचन करणार होतो. परंतु असे व्हायचे नव्हते. विद्यार्थी जगतात चोहोकडे मला अराजक आढळते. तुम्ही तुमच्या शिक्षकांच्या आणि कुलगुरूंच्या आज्ञा पाळत नाही. उलटपक्षी तुमच्या शिक्षकांनी तुमच्या आज्ञा पाळाव्या असे तुम्ही अपेक्षिता. उद्याच्या भारताचे नेतृत्व ज्यांच्याकडे असणार आहे त्यांच्या वर्तनाचे हे दु:खद चित्र आहे. त्या दिवशी तुम्ही तुमच्या बेशिस्त वागणुकीचा परिचय करून दिला होता. विदेशी भाषेतील घोषणाफलकातून तुम्ही शहीद साहेबांची अशोभनीय हेटाळणी केली होती. तुम्ही जितका शहीद साहेबांचा अपमान केला तितकाच माझाही केला आहे हे लक्षात ठेवा. शहीद साहेबांच्या विरोधात वापरण्यात आलेल्या भाषेद्वारे त्यांचा अपमान होऊ शकत नाही. परंतु मी ही वृत्ती मान्य करू शकत नाही. काहीही झाले तरी विद्यार्थ्यांनी नम्र आणि सुमार्गावर राहिले पाहिजे. तुमच्यासमोर तुमच्या कुलगुरूंचा आदर्श आहे. मुख्यमंत्री, शहीद साहेब आणि मी असे आम्ही सर्व लोक आमच्याकरिता तयार केलेल्या व्यासपीठावर बसलो होतो परंतु तुमचे कुलगुरू इतर निमंत्रितांमध्ये बसले होते. त्यांच्या नम्रतेने मला कृष्णाची आठवण करून दिली. राजा युधिष्ठिराने जेव्हा यज्ञ केला तेव्हा कृष्णाने आलेल्या पाहुण्याचे पाय धुण्याचे शारीरिक श्रमाचे काम आपल्याकडे घेतले होते. यातून त्याच्या अंत:करणातील नम्रतेचे दर्शन होते. सर्वात मोठा तेव्हाच महान राहतो जेव्हा तो सर्वात कमी प्रतीच्या कामाची निवड करतो. हिंदू*

*धर्मश्रद्धेची मला जी काही माहिती आहे त्यावरून जर मी काही सांगू शकत असेन तर जोपर्यंत तुमची विद्यार्थीदशा संपत नाही तोपर्यंत तुम्ही संन्यासी राहिले पाहिजे. तुम्ही कठोर आत्मशिस्त पाळली पाहिजे. तुम्ही विवाह करू शकत नाही तसेच तुम्ही कालापव्यय करू शकत नाही. तुम्ही मद्यपान वा तत्सम व्यसन करू शकत नाही. तुमचे वर्तन आत्मसंयमाचे झळझळीत उदाहरण असले पाहिजे. तुम्ही जर या सर्व परंपरेप्रमाणे राहिला असता तर शहीद साहेबांच्या बाबतीत तुम्ही जे केले ते तुम्ही केले नसते.* (यानंतर गांधीजींनी आपल्या भाषणाचा अनुवाद करण्याकरिता निर्मल कुमार बोस यांना बोलावले परंतु श्रोत्यांच्या आग्रहामुळे त्यांनी आपले भाषण सुरू ठेवले.)

*गांधीजी म्हणाले की आझाद हिंद फौजेसंबंधी मी माझे मत व्यक्त करावे अशी आझाद हिंद सैन्याच्या काही सदस्यांकडून मला परवा सायंकाळी एक चिठ्ठी मिळाली होती.* (पाहा प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट २७, १९७) *आझाद हिंद फौजेच्या काही पुढाऱ्यांशी माझा निकटचा संपर्क होता. आझाद हिंद फौजेसंबंधी बोलताना गांधीजी म्हणाले की मला नेताजीसंबंधी बोलणे भाग आहे. ते शरीराने मृत आहेत परंतु भारताची सेवा करणारांमध्ये ते जिवंत आहेत. भरघोस फायदेशीर कारकिर्दीची संधी समोर दिसत असतानाही तिचा त्याग करण्याच्या निर्धाराने सुभाषबाबू जेव्हा नुकताच इंग्लंडमधून परतले होते तेव्हा मला त्यांना भेटण्याचा योग आला होता. त्यांनी स्वार्थी आकांक्षेऐवजी निस्वार्थ सेवा निवडून देशबंधूंच्या हाताखाली काम करण्याचा निर्णय घेतला होता. यामुळे आम्ही जवळच्या संपर्कात येऊ शकलो. जरी सुभाषबाबू अहिंसक असहकारक झाले होते तरी त्यांना माझा शुद्ध अहिंसेचा मार्ग पटला नव्हता. त्यांना धोकादायक साहसाची आणि अद्भुतरम्य जीवनाची ओढ होती. त्यांचे साहस अतुलनीय होते. त्यांनी भारताच्या सर्व प्रांतांतील आणि सर्व धर्माच्या लोकांचे सैन्य तयार केले व आपल्या स्वतःच्या देदिप्यमान उदाहरणाने त्यांच्यात स्वतःहोऊन शिस्तपालनाचे व आज्ञाधारकतेचे वातावरण निर्माण केले होते. आधुनिक काळातील सर्वात शक्तिशाली सत्तेशी लढा देण्याकरिता तयार असलेले सैन्य त्यांनी आपल्या प्रतिभेने उभारले ही काही लहान गोष्ट नव्हती. आझाद हिंद फौजेच्या अधिकाऱ्यांनी गांधीजींना सांगितले की नेताजींनी आम्हाला सांगितले आहे की गांधीजी भारताचे भवितव्य घडवण्याकरिता देशांतर्गत जो कोणता लढा सुरू करतील त्यात सामील व्हा आणि देशाबाहेरील लढ्याचा प्रणेता मी असल्यामुळे मी सरू केलेल्या लढ्यात सामील व्हा. आझाद हिंद सैन्याच्या सदस्यांनी गांधीजींना विचारण्यात आलेल्या प्रश्नाचे उत्तर देत गांधीजी म्हणाले की भारताच्या वा पाकिस्तानच्या सध्याच्या सैन्यात तुम्हाला सामावून*

*घेतले जाईल वा सैन्यात तुमचे वेगळे पथक तयार केले जाईल असे तुम्ही गृहीत धरू नये. येत्या काही काळात तरी हे अव्यवहार्य आहे. तुम्ही एकत्र होऊन भारताचे सेवक म्हणून काम करावे हा तुमच्याकरिता सर्वोत्तम मार्ग आहे. तुम्ही सर्वांनी मिळून एखादा जमिनीचा तुकडा घ्यावा व तुमच्या तलवारीचे नांगर बनवून कोट्यवधी उपाशी लोकांकरिता अधिक धान्य पिकवावे. तुम्हाला माझी सूचना जर पटत नसेल तर तुम्हाला नागरी जीवनात सामावून घेतले जाईल आणि तुम्ही देशाची सेवा करा. स्वतंत्र भारतात 'एकदा सैनिक, कायमचा सैनिक' हा विचार चुकीचा आहे. मी दक्षिण आफ्रिकेत वीस वर्षे राहिलो आहे. जेव्हा सैनिक म्हणून काम करणे आवश्यक असायचे तेव्हा प्रत्येक बोअर प्रथम श्रेणीचा सैनिक म्हणून काम करायचा. एरव्ही तो आश्चर्य वाटावे असा शेतकरी असायचा. सेनापती बोथा* (लुईस बोथा १९६२-१९१९, दक्षिण आफ्रिका संघराज्याचे प्रधानमंत्री १९१०-१९) ***असे होते. फिल्ड मार्शल स्मट्स*** (जान क्रिश्न स्मट्स, १८७० - १९५०, दक्षिण आफ्रिकेचे प्रधानमंत्री १९१९ ते १९२४ आणि १९३८ - ४८) *असेच होते. ते महान वकील, महान शेतकरी होते. त्यांच्याजवळ उत्तम प्रकारची शेती होती आणि प्रत्येक जण त्यांना नावलौकिक मिळवलेला सैनिक म्हणून ओळखायचा. नेताजी स्वतः काय होते? ते फिल्ड मार्शल स्मट्सपेक्षा कमी होते काय? सैनिकी हा त्यांचा व्यवसाय कधीही नव्हता. सांप्रदायिकतेच्या यादवीमुळे होणाऱ्या दंगलींमुळे आज भारताला हादरे बसत असताना ज्या नेताजींबद्दल तुम्हाला इतका जिव्हाळा वाटतो, आणि ज्यांच्या अधिकाऱ्यांच्या डोळ्यात त्यांची आठवण होताच पाणी आल्याचे मी पाहतो त्यांच्या हाताखाली तुम्ही कसे होता हे दाखवून देण्याकरिता फौजेच्या सदस्यांनी एक आदर्श उदाहरण घालून द्या. तुमच्या मनातील त्या प्रेमाचे कृतीत रूपांतर होऊ द्या.*

*अशा नेतांजींबद्दल माझ्या मनात प्रेम आणि आदर होता हे खरे असले तरी आमच्यात मतभेद होते. परंतु त्या मतभेदांना महत्त्व नव्हते. अशा प्रकारचे अंतर उत्तम मित्रांमध्येही असते. विद्यार्थ्यांनीसुद्धा, मग त्यांचा विश्वास अहिंसेवर असो वा नसो, विद्यार्थी जीवनाकरिता आणि सैनिकांकरिता आवश्यक असलेली ती कठोर शिस्त समजून घेतली पाहिजे.*

हरिजन, सप्टेंबर ७, १९४७

## १०५. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट २९, १९४७

(ही सभा टोली गंज पोलिस पटांगणात झाली होती. वंदे मातरम जेव्हा म्हणण्यात आले तेव्हा सुऱ्हावर्दींसह इतर सर्व मुसलमानही त्या वेळी उभे राहिले.)

कलकत्ता,

ऑगस्ट २९, १९४७

*शहीद साहेब आणि इतर उभे असताना गांधीजींनी त्यांचे अभिनंदन केले व मग आपल्या भाषणाला सुरुवात केली. गांधीजी मुद्दाम उभे राहिले नव्हते कारण एखादे राष्ट्रगीत वा भजन सुरू असताना त्याबद्दल आदर व्यक्त करण्याकरिता उभे राहण्याची परंपरा त्यांच्या संस्कृतीत नव्हती. ही गोष्ट करणे म्हणजे पश्चिमेची विनाकारण नक्कल असे झाले असते. गांधीजी म्हणाले की अशा प्रसंगी आदर व्यक्त होईल अशा प्रकारे बसण्याची ढब पुरेशी होते. अखेरीस मनोवृत्तीला खरे महत्त्व असते, वरवरच्या देखाव्याला नाही. राष्ट्रगीत वंदेमातरमकरिता एकच धून सर्वत्र असावी असे मला वाटते. जर त्याने करोडो लोकांचे हृदय हेलावले पाहिजे असे वाटत असेल तर करोडो लोकांना सारख्या तालासुरावर ते म्हणता आले पाहिजे. अखेरीस राष्ट्रगीत दोनतीनच असू शकतात. परंतु त्या सर्वांची एकच स्वरलिपी असली पाहिजे. सर्वांना मान्य होईल अशी स्वरलिपी तयार करण्याचे हे काम शांतिनिकेतनचे वा तिच्यासारख्या एखाद्या संस्थेचे आहे.*

*यानंतर गांधीजी ख्रिश्चन लोकांना संबोधून बोलू लागले. गांधीजी म्हणाले की परवाच्या दिवशी मला त्यांचे स्वागत करण्याची संधी मिळाली. ख्रिश्चन लोक म्हणाले की बहुसंख्याक समाज स्वत:ची काळजी घेऊ शकतो परंतु भारतीय ख्रिश्चनांचे काय होईल? आम्हाला शासनात वा विधिमंडळात काहीच जागा मिळणार नाहीत काय? गांधीजी त्या मित्रांना म्हणाले की विदेशी सत्तेच्या काळातील पक्षपाताचे दिवस आता मृतप्राय झाले आणि गेले. आता पात्रता ही एकमेव कसोटी असली पाहिजे. सुसंगठित समाजात कोणीही अल्पसंख्याक नसतो. तुम्ही चाळीस कोटीमधील आहा असे तुम्हाला का वाटू नये? तुमचा धर्म कोणताही असला तरी तुमचा जन्म भारतात झालेला आहे व इथे जन्म झाल्याबद्दल व कायद्याच्या दृष्टीने तुम्ही सर्व लोकांच्या बरोबरीचे असल्याबद्दल तुम्हाला अभिमान वाटला पाहिजे. पात्रतेच्या बळावर उदाहरणार्थ बौद्धिक क्षमता, स्वार्थत्याग, धैर्य आणि सचोटी हे*

*गुण असलेला ख्रिश्चन मुख्यमत्रीही होऊ शकतो आणि त्याकरिता हिंदू अथवा मुसलमानापेक्षा अधिक पात्रता दाखवण्याचीही गरज नाही. धर्म ही शुद्ध वैयक्तिक बाब आहे. आणि जे संघराज्याबद्दल खरे आहे ते पाकिस्तानबद्दलही खरे आहे असे मला वाटते. गांधीजीं आपल्या ख्रिश्चन भावंडांना उद्देशून म्हणाले की ख्रिश्चन धर्माचा पश्चिमेकडे जो अर्थ लावला जातो तोच अर्थ तुम्ही घेण्याची गरज नाही. तुम्हाला माहीतच आहे की कधीही नाही तसे ते भांडले होते. अखेरीस येशू आशीयायी दिसतो व त्याचा लांब अरबी झगा हे त्याचे निदर्शक आहे. येशू नम्रपणाचे सार होता. गांधीजींनी आशा व्यक्त केली की भारतातील ख्रिश्चन आपल्या जीवनातून बायबलमधील सुळावर चढणाऱ्या येशूचे अनुसरण करतील, पश्चिमेकडे अर्थ लावण्यात येतो तशा रक्ताळलेलेले हात असलेल्या येशूचे नाही. पश्चिमेवर टीका करण्याची माझी इच्छा नाही. मला पश्चिमेचे अनेक गुण माहीत आहेत आणि त्यांचे मूल्यही मला कळते. परंतु पश्चिमेत आशियाच्या येशूचा काही व्यक्तींचा अपवाद वगळता चुकीचा अर्थ लावण्यात आला हे मी निदर्शनास आणून दिलेच पाहिजे.*

*यानंतर धार्मिक अल्पसंख्याकांना जसे आरक्षण दिले तसे आरक्षण इतर अल्पसंख्याकांना म्हणजे बिहारमध्ये बंगाली अल्पसंख्याक असल्यामुळे त्यांनाही दिले जाईल का असा प्रश्न गांधीजींना विचारण्यात आला होता. त्या प्रश्नाचे उत्तर देत गांधीजी म्हणाले की हा अवघड प्रश्न आहे. भारतीय हा भारताच्या सर्व भागात भारतीय असतो आणि त्याला प्रत्येक भागात समान हक्क असतात. यामुळे बंगाली माणसाला बिहारमध्ये बिहारीप्रमाणेच सर्व अधिकार असतील. परंतु बंगाली लोकांनी बिहारींमध्ये मिसळून गेले पाहिजे हे मी आपल्याला या ठिकाणी ठासून सांगेन. त्याने बिहारींचे शोषण करण्याचा अपराध करू नये वा बिहारमध्ये त्याला नवखेपण जाणवू नये तसेच बिहारींना तो नवखा वाटू नये. जर मी माझ्या गुजराती सवयी बंगालमध्ये आणल्या व मला स्वतःला त्या प्रांतावर लादले तर बंगाली लोक मला काढून टाकतील अशी अपेक्षा मी केली पाहिजे. असे झाले तर मी बंगाली लोकांच्या विरोधात भारतीयत्वाचा अधिकार सांगू शकणार नाही. योग्य प्रकारे केलेल्या कर्तव्यपालनापासून सर्व हक्क निर्माण होत असतात. एक गोष्ट मी ठासून सांगितलीच पाहिजे की हिंदुस्तानच्या दोन्ही सार्वभौम भागांना प्रगती करायची असेल तर हक्कांच्या मागणीकरिता शक्तीचा वापर पूर्णपणे टाळला गेलाच पाहिजे. अशा प्रकारे बंगाली वा बिहारी तलवारीच्या बळावर अरेरावी करू शकत नाही तसेच सीमा आयोगाचा निर्णयही बदलता येऊ शकत नाही. स्वतंत्र भारताने लोकशाहीचा हा पहिला पाठ शिकायलाच पाहिजे. आपले स्वातंत्र्य अजून केवळ एका पंधरवाड्याचे झाले आहे.*

*स्वातंत्र्य म्हणजे मनात येईल ते करण्याचा परवाना नव्हे. स्वातंत्र्य म्हणजे स्वयंस्फूर्तीने संयम आणि शिस्त यांचे पालन. संपूर्ण भारताने आपल्या प्रतिनिधींद्वारे ज्या कायद्यांंना मान्यता दिलेली आहे त्यांचे स्वत:होऊन पालन करणे म्हणजे स्वातंत्र्य. लोकशाहीत लोकमत हीच अशी शक्ती असते की जी जनतेच्या हाती असते. सत्याग्रह, सविनय कायदेभंग आणि उपोषण यांच्यात व शक्तिप्रदर्शनात, मग ती उघड असो की पडद्याआडून, काहीही साम्य नाही. परंतु यांच्या मर्यादित उपयोगालासुद्धा लोकशाहीत स्थान आहे. सरकार स्थिरावत असताना आणि सांप्रदायिक विसंवाद एका प्रांतातून दुसऱ्या प्रांतात दहशत निर्माण करत असताना तुम्ही यांचा विचारही करू शकत नाही.*

हरिजन, सप्टेंबर ७, १९४७

## १०६. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट ३०, १९४७

कलकत्ता,

ऑगस्ट ३०, १९४७

*गांधीजी म्हणाले की हा शहीद साहेबांचा मतदारसंघ आहे. यामुळे ते बारासातला भेट देतील असे अपेक्षित होते व तशी भेट देता येत असल्याबद्दल त्यांना आनंदही होत होता. त्यांना तिथे पाकिस्तानचा वा मुस्लिम लीगचा ध्वज आढळला नाही. बारासातच्या हिंदूंनी दोन पावले पुढे टाकून आपल्या मुसलमान भावंडांना पाकिस्तानच्या ध्वजाच्या बाजूला तिरंगा फडकवण्याकरिता का सांगू नये? मुसलमानांनी पाकिस्तानचा वा लीगचा ध्वज हिंदूंवर लादावा असा कधीही अर्थ नव्हता. जिथे मुसलमान बहुमतात आहेत तिथेही त्यांनी हाच नियम लावला असता. जर तुमच्यामध्ये हिंदू मुलगी असेल तर त्यांनी त्या एकट्या मुलीला तिरंगा झेंडा फडकवण्याकरिता सांगून रामधून म्हणायला पाहिजे. ही हिंदू-मुसलमान मैत्रीची खरी खूण आहे. असे झाले तर तर कितीही तणावाची परिस्तथिती निर्माण झाली तरी त्यातून मार्ग काढणे शक्य होईल. यात काही संशय नाही की पंजाबमधील कौटुंबिक संघर्षाच्या हकिगती दररोज तुम्ही ऐकत आहा. यामुळे मुसलमानांना पूर्वेकडे राहणे कठीण झाले आहे आणि हिंदू आणि शिखांना पश्चिमेकडे. करोडो लोकाची अदलाबदल करायला पाहिजे काय? या पशुत्वाच्या आणि अमानवीय वर्तनाच्या लाटेला अडवण्याचा मार्ग बंगालच्या दोन्ही भागांतील हिंदू आणि मुसलमान यांच्या हातात आहे. ते मनाची शांतता कायम ठेवून आपल्या अतूट मैत्रीचे दर्शन घडवून सर्व समुदायांनी एकत्र कसे राहावे ते दाखवून देऊ शकतात. परस्परातील भांडण आणि वेगळेपणाचा मार्ग विनाशाचा आणि गुलामगिरीचा मार्ग आहे. जर अंत:करणापासूनची मैत्री असेल तर बहुमतात असूनही त्यांचा समावेश पश्चिम बंगालमधील मुशिराबाद वा मालडामध्ये होत असेल तर त्यांनी आक्षेप का घ्यावा आणि हिंदू बहुसंख्या असलेल्या भागाचा समावेश पाकिस्तानमध्ये झालेला असल्यास हिंदूंनी आक्षेप का घ्यावा हे मला कळत नाही. हे चिन्ह मैत्रीचे नाही तर परस्परांवरील अशोभनीय अविश्वासाचे आहे.*

*यानंतर गांधीजींनी त्यांना गुरखा लीगकडून मिळालेल्या पत्राचा उल्लेख केला व म्हणाले की गुरखा लीगचे म्हणणे आहे की त्या पत्रलेखकाने मला चुकीची माहिती दिली व त्या माहितीच्या आधारावर मी दार्जीलिंगच्या गुरखांना सल्ला दिला* (पाहा प्रार्थना प्रवचन,

ऑगस्ट २६, १९४७) *त्यांचे म्हणणे आहे की आम्ही इतरांइतकेच भारतीय आहो. दार्जीलिंगमध्ये वास्तव्य करत असलेल्या बंगाली वा मारवाडी लोकांबद्दल आमचा कोणताही आक्षेप नाही. परंतु येथील बंगाली वा मारवाडी जर आमच्यावर कुरघोडी करणार असतील तर गांधीजींनी आम्हाला वाटणारी भीती समजून घेतली पाहिजे. गुरखा लोकांचा जन्म केवळ त्यांची ओझी वाहण्याकरिताच झाला आहे असे त्यांनी आपल्या शिक्षणाच्या वा संपत्तीच्या गर्वात समजू नये. गुरखांमध्ये पूर्ण समतेची मी अपेक्षा करू शकत नाही काय आणि बंगाली लोकांनी त्यांना अक्षरज्ञान देऊन व मारवाड्यांनी प्रामाणिकपणाचा व्यापार करून नफा कसा मिळवावा हे त्यांना शिकवायला नको काय? गुरखांनी घेतलेली भूमिका मान्य करायला मला कोणताही संकोच वाटत नाही तसेच बंगाली, मारवाडी आणि जे इतर लोक या सुंदर पर्वतीय प्रदेशात कायम वास्तव्य करू लागले आहेत त्यांनी त्यांच्यामध्ये जे काही सर्वोत्तम आहे त्यात आपल्या गुरखा भावंडांना सहभागी करून घ्यावे आणि आम्ही तुमचे मित्र व सेवक आहो, पिळवणूक करणारे नाही हे गुरखांना दाखवून द्यावे.*

*भेटायला आलेल्या लोकांशी चर्चा करून प्राध्यापक निर्मल कुमार बोसनी गांधीजींकरिता जो प्रश्न तयार केला होता त्याकडे यानंतर गांधीजी वळले. भाकरीकरिता श्रमाचा तुमचा अर्थ काय आणि सध्याच्या परिस्थितीत त्याचे काय परिणाम होतील? भाकरीकरिता श्रम यामागील अर्थशास्त्र जगण्याचा जीवंत मार्ग आहे. याचा अर्थ प्रत्येक माणसाने आपल्या अन्नवस्त्राकरिता शारीरिक श्रम केले पाहिजे. जर मी लोकांना भाकरीकरिता श्रमाचे मूल्य आणि आवश्यकता पटवून देऊ शकलो तर अन्नवस्त्राची ददात कधीही भासणार नाही. तुम्ही जर जमिनीवर श्रम करणार नाही आणि कताईविणाई करणार नाही तर तुम्ही उपाशी राहा आणि उघडेनागडे फिरा असे लोकांना नि:शंकपणे सांगायला मी मुळीच कचरणार नाही. संपूर्ण भारत उपासमार आणि नग्नतेच्या काठावर उभा असल्याचे तुम्ही वृत्तपत्रांमधून वाचलेच असेल. माझी योजना जर स्वीकारण्यात आली तर तुम्हाला लवकरच आढळून येईल की भारतात भरपूर अन्न आहे आणि जनतेने स्वत:करिता तयार केलेली भरपूर खादी आहे. यात काही संशय नाही की जमिनीचा योग्य उपयोग कसा करावा हे त्यांना शिकवावे लागेल आणि त्यांना कताईविणाईचे साहित्य पुरवावे लागेल.*

*गांधीजी पुढे म्हणाले की बंगालच्या पाणीपुरवठा योजनेत जवळून रस घेणारे श्रीयुत कॅसी* (बंगालचे राज्यपाल) *यांच्याशी मी माझ्या पद्धतीबद्दल नि:संकोचपणे चर्चा करीन. यात*

***काही संशय नाही की कॅसींची योजना भव्य आहे. तिच्याकरिता अनेक वर्ष टनाने पैसा लागेल. उलट माझा कार्यक्रम कार्यक्षम परंतु फार मोठा नाही. तो कमी खर्चाचा आहे.***

हरिजन, सप्टेंबर ७, १९४७

## १०७. प्रार्थना प्रवचन, ऑगस्ट ३१, १९४७

कलकत्ता,

ऑगस्ट ३१, १९४७

*प्रार्थनेनंतर गांधीजी म्हणाले की श्रीमंत लोकांची सभा घेतलेली असल्यामुळे मला श्रोत्यांना फार काही सांगायचे नाही. आता दोन समुदायांमध्ये परिपूर्ण मैत्री आहे व घर सोडून निघून गेलेले लोक परतायला तयार आहेत असे तुमचे आमदार कमल बाबू यांनी मला सांगितल्यामुळे मला आनंद झाला. परंतु ज्या कारख्यान्यात ते अर्थार्जनाकरिता काम करत होते ते अजून सुरू झाले नाहीत हा सर्वात मोठा अडथळा आहे. मुसलमान शेजाऱ्यांनी रिकामे झालेल्या घरांची दुरुस्ती करण्याचे काम सुरू केले आहे. ही सर्व माहिती शंभर टक्के खरी असेल तर हे सत्य कलकत्त्यातील सर्व प्रभावित भागामध्ये काम करील. श्रोत्यांना गांधीजींनी सांगितले की माझा नोआखालीला मंगळवारी जाण्याचा विचार आहे. याच वेळी शहीद साहेब जर माझ्याबरोबर येऊ शकत असतील तर मी त्यांना घेऊन जाईन. नोआखालीत माझी जास्त दिवस थांबण्याची इच्छा नाही आणि मला आशा आहे की सुखद सुयोगावर सुरू झालेल्या कामाची चांगल्या प्रकारे सांगता करता येईल. मध्यंतरीच्या काळात दुप्पट वेगाने पुनर्वसनाचे काम सुरू राहील अशी आहे. टिकाऊ शांतता हवी असेल तर या कामात उशीर करण्याची सोय नाही.*

हरिजन, सप्टेंबर २१, १९४७

# १०८. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर ६, १९४७

कलकत्ता,

सप्टेंबर ६, १९४७

उपमहापौरांच्या भाषणाचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की निरोपसमारंभ हा शब्द चुकीच्या पद्धतीने वापरला जातो. मी कलकत्त्यात बेलियाघाटातील मुसलमान मित्रांमध्ये माझे घर केले आहे, माझ्या पुर्वीच्या घरात म्हणजे सोदेपूर येथील खादी प्रतिष्ठानमध्ये नाही. मी हेमप्रभादेवी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना माझी काळजी घेण्याकरिता इथे माझ्या नवीन घरी येण्याची परवानगी देखील देणार नाही. सेवेच्या स्वरूपात माझे मुसलमान मित्र मला जे काही देतील त्यावर माझे समाधान असेल. हे ठरवण्यात मी कोणतीही चूक केली नाही. दक्षिण आफ्रिकेत मुसलमानांच्या घरात आरामशीरपणे राहण्याची मला सवय होती.

यानंतर गांधीजींनी सचिन मित्रा (पाहा आंगशू राणी मित्रा यांना चिठ्ठी, सप्टेंबर ३, १९४७) आणि स्मृतीश बॅनर्जी यांच्या हौतात्म्याबद्दल उल्लेख केला. ते म्हणाले की मला दुःख होते. दोन समुदांना एक ठेवण्याकरिता अशा प्रकारच्या निष्पाप लोकांचे मरण आवश्यक असते. अशा प्रकराचे हुतात्मे केवळ हिंदूंमध्येच आढळतात असा गैरसमज करून घेऊ नका. हिंदूंना वाचवण्याच्या प्रयत्नात आपले प्राण गमावणाऱ्या किती तरी मुसलमानांची उदाहरणे मी देऊ शकेन. मला माझ्या व्यक्तिगत जीवनात असे अनुभव आलेले आहेत. प्रत्येक समाजात आणि वातावरणात चांगले आणि वाईट आढळत असते. याच गोष्टीने मला शहीद साहेबांजवळ आणले. शहीद साहेबांना या कामात भागीदार करण्याच्या विरोधात माझ्याकडे अनेक हिंदूची आणि अनेक पत्रे आली होती व असे करत असल्याबद्दल ते मला मूर्ख ठरवत होते. मी हे सांगायलाच हवे की मूर्ख नाही. मी काय करत आहे ते मला माहीत होते. शहीद साहेबांनी भूतकाळात काय केले होते याच्याशी मला काहीही कर्तव्य नाही. परंतु शहीद साहेब आणि मी एकत्र होतो त्या मूल्यवान दिवसात त्यांनी मला पूर्ण सहकार्य दिले होते याचा मी साक्षीदार आहे. त्यांच्या अमूल्य सहकार्याशिवाय तुमच्यात काम करणे मला शक्य झाले नसते हे मी मनमोकळेपणाने कबूल करतो. या कामात तनमनाने पूर्णपणे झोकून देण्यात त्यांच्या काही वाईट हेतूचा शोध घेण्याचा प्रयत्न करणे म्हणजे आपल्या बुद्धीचा अपमान करणे होईल. त्यांच्याजवळ राजवाड्यासारखा बंगला आहे आणि त्यांना असा भाऊ आहे की ज्याला ते स्वतःपेक्षाही अधिक कुशाग्र बुद्धीचा समजतात. त्यांना एक दुसरा भाऊ आहे ज्याला लंडन येथील गोलमेज परिषदेत भटण्याचे मला सौभाग्य प्राप्त झाले होते आणि जे ढाका विद्यापीठाचे कुलगुरू होते.

त्यांच्या काकांनी, सर अब्दुल्लांनी 'सेईंग्ज ऑफ प्रॉफेट' हे पुस्तक लिहिले आहे. आपण जर हेतूबद्दल शंका घेऊ तर आपण फार मोठी चूक करू. तुम्हाला वा अन्य कोणाला माणसाच्या हेतूबद्दल शंका घेण्याचा अधिकार नसतो. माझ्या कृतीवरून कोणी माझ्या हेतूबद्दल शंका घेत असेल तर मला ते आवडणार नाही. लोकांशी व्यवहार करण्याचा हाच एकमेव मार्ग आहे. तुम्हाला माहीत असले पाहिजे की मला इस्लामचा पहिल्या नंबरचा शत्रू घोषित करण्यात आले होते आणि असे संपूर्ण देशातून विरोध होत असताना करण्यात आले होते. मुसलमानांनी माझ्या वर्तनाचा अशाच प्रकारे निषेध केलेला तुम्हा श्रोत्यांना आवडेल काय?

अखेरीस अशा प्रकारच्या अविश्वाचा काय परिणाम झाला असता याचा तुम्ही विचार करा. असे करून कदाचित मी सध्याचे ऐक्य नष्ट केले असते आणि पंजाबमध्ये जी यादवी सुरू आहे तिच्यापासून पंजाबला वाचवण्याची जी संधी आहे तीही मी गमावली असती.

यानंतर गांधीजींनी शांतिरक्षणाकरिता शांतिसेनेचा व ती करत असलेल्या अतिशय कठीण कामाचा उल्लेख केला. स्त्रियासुद्धा आपल्या परीने जे शक्य होईल ते करण्याकरिता पुढे आल्या. सांप्रदायिक ऐक्याकरिता विद्यार्थ्यांनीसुद्धा आपल्या शक्तीपलीकडे काम केले. काही तरुणांनी परवाने नसलेली स्टेनगन, हॅन्डग्रेनेडसारखी विध्वंसक शस्त्रे आणून दिली. ती आणून देण्याइतके धैर्य दाखवल्याबद्दल मी त्यांचे आभार मानले. परवाने नसलेली शस्त्रे परत करण्यासंबंधीच्या चांगल्या उदाहरणाचे अनुसरण सर्व हिंदू आणि मुसलमान करतील अशी मला आशा आहे. परस्परांवरील व ईश्वरावरील विश्वासाचे हे उदाहरण आहे. मुख्यमंत्र्यांनी मला आश्वासित केले आहे की जे लोक अशा प्रकारची शस्त्रे दिलेल्या तारखेच्या आत परत करतील त्यांचे शांतता रक्षणाच्या कामात उघडपणे मदत केल्याबद्दल शासन आभार मानेल व अशा प्रकारची शस्त्रे ठेवण्याच्या अपराधाबद्दल आतापर्यंत जी शिक्षा होती वा पुढे असेल ती त्यांना केली जाणार नाही. यामुळे अशी शस्त्रे ज्यांच्याकडे असतील त्यांनी ती एक तर स्वतः अधिकाऱ्यांना नेऊन द्यावी वा अधिकाऱ्यांना देण्याकरिता ती आपल्या मित्रांना द्यावी.

उपमहापौरांनी मला सांगितले की या सभेची तयारी करण्याकरिता महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी पाऊस असूनही रात्रंदिवस काम करून हे मैदान तयार केले. याकरिता मी या कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करतो.

अखेरचे सांगायचे म्हणजे केवळ एक दिवस दंगली झाल्या नाही म्हणून कलकत्त्यातील आणि बाहेरच्या सर्व समुदायांमधील मित्रांच्या दडपणामुळे मी उपास सोडला याचा अर्थ आपले प्राण देऊनही त्यांनी शांततरक्षण करावे असा होतो. (पाहा नागरिकांच्या प्रतिनिधींशी चर्चा, सप्टेंबर, ४,

१९४७) मी एकाएकी संपवलेल्या उपवासाचा लाभ घेऊन मला मरण पत्करावे लागेल असा अहेतुकपणे का होईना तुम्ही अपराध करू नका. परिस्थितीचे आकलन करण्याकरिता मी स्वतः काही दिवस थांबू शकलो असतो परंतु एन. सी. चटर्जी, अध्यक्ष हिंदू महा सभा, शहीद साहेब आणि इतर अनेक प्रामाणिक लोकांच्या, ज्यांचा नामोल्लेखही करणे शक्य नाही, आणि कलकत्त्यात राहणाऱ्या सर्व लोकांच्या खांद्यावर मी हे ओझे टाकले आहे. गांधीजी म्हणाले की मला सरकारी शक्तीने लादलेली शांतता नको आहे तर तुम्ही प्रस्थापित केलेली शांतता हवी आहे. जर दुर्दैवाने या शांततेचा भंग झाला तर माझ्यासमोर मरणांत उपोषण करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय राहणार नाही. तुम्ही सुज्ञपणा धारण केलेला असल्यामुळे मी आता माझा संप मागे घेतो असे मी मुलांच्या खेळाप्रमाणे दर वेळी म्हणू शकत नाही. ही गंभीर घोषणा मी आधी बिहारमध्ये, नंतर नोआखालीत केली होती आणि आता कलकत्त्यात करतआहे. माझे जीवन ज्या प्रकारे घडलेले त्या प्रकारामुळे माझ्यासमोर कोणताही पर्याय नाही. ईश्वराची इच्छा असेल की मी अजूनही सेवा करावी तर तुम्हा तो सर्वांना सद्बुद्धी देईल. कलकत्त्याने समजूतदारपणा दाखवल्यामुळे झालेल्या परिणामांचा विचार करा. याचा अर्थ पूर्व आणि पश्चिम बंगालमध्ये आपोआपच समजूतदारपणा येईल असा होतो. याचा अर्थ बिहार आणि परिणामी पंजाबमध्ये, जिथे ईश्वर मला पाठवत आहे, समजूतदारपणा आला तर संपूर्ण भारतात त्याचे अनुसरण झाल्याशिवाय राहणार नाही. तर ईश्वर तुम्हा सर्वांना मदत करो.

हरिजन, सप्टेंबर २१, १९४७

# १०९. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर ७, १९४७

(ही सभा गांधीजींच्या बेलियाघाटातील निवासस्थानावर झाली होती. या भाषणाचा बंगाली अनुवाद एच. एस. सुऱ्हावर्दी यांनी केला होता.)

कलकत्ता,

सप्टेंबर ७, १९४७

गांधीजी म्हणाले की गत काही दिवसात शांतिसेनेने स्पृहणीय काम केले आहे आणि कलकत्त्यात तिची गरज आहे असे दिसते. मी येथून जात आहे परंतु परिस्थितीवर माझी नजर असेल. तुम्ही लोक शांतिसेनेचे असाल तर तुम्ही शांततेकरिता स्वतःचे बलिदान करण्याची तयारी ठेवली पाहिजे. तुम्ही जर स्वतःला खरोखरच शांतिसेनेचे सैनिक समजत असाल तर भांडणाऱ्या गटांमध्ये तुम्ही जाल व ते भांडण थांबवाल आणि असे करताना तुमचा जीव जाण्याची शक्यता असली तर त्याकरिताही तुम्ही तयार राहाल. तुम्ही तलवारीने नाही तर प्रेमाच्या शस्त्राने लढत असाल.

गांधीजी आपले भाषण पुढे सुरू ठेवत म्हणाले, जे सैनिक युद्धावर जातात ते मरतात आणि जे जिवंत राहतात त्यांचा वीर म्हणून गौरव होतो. महात्मा गांधी पुढे म्हणाले की वास्तवात जे मरतात ते इतरांना जिवंत ठेवतात आणि ते खरे वीरपुरुष असतात. शांतिसेनेच्या काही लोकांना शांततेकरिता प्राण अर्पावे लागले. ते खरे शूरवीर आहेत व त्यांच्या बलिदानाने शांतता प्रस्थापित झाली आहे. ही शांतता कायम टिकणारी आहे काय, ती खऱ्या मैत्रीवर आणि प्रेमावर आधारित आहे काय हे पाहण्याची माझी इच्छा आहे.

तुमच्यासमोर अजून एक काम आहे, ज्यांची घरे लुटली गेल्यामुळे वा ज्यांच्या घरांची मोडतोड करण्यात आल्यामुळे ज्यांना आपल्या घरातून परागंदा व्हावे लागले त्यांना परत त्यांच्या घरात आणायचे. ते आपल्या पायावर उभे राहू शकत नाहीत तोपर्यंत तुम्ही त्यांना निवारा दिला पाहिजे तसेच अन्नपाणीही. केंद्रिय शांतता समितीने या कामाची जबाबदारी घेतली आहे आणि या कामाकरिता निधी गोळा करण्याकरिता एक अर्थसमिती तयार केली आहे. हे काम शक्य असेल तितक्या लवकर केले पाहिजे. बाकीचे लोक हे काम करतात की नाही याकडे तुम्ही लक्ष देऊ नये. गांधीजी म्हणाले की मुसलमान लोक हिंदूंच्या पुनर्वसनाचे काम करतात की नाही हे आम्ही आधी पाहू आणि नंतर या कामाला लागू असे तुम्ही म्हणावे अशी माझी इच्छा नाही. हीच गोष्ट मुसलमानांनाही लागू आहे.

समारोप करत अखेरीस महात्मा गांधी म्हणाले की प्रत्येकाने चांगले होण्याचा प्रयत्न केला पाहिजे, इतर काय करतात ते पाहू नये. आणि एकाच्या चांगुलपणाने दुसरा प्रभावित होईल.

अमृत बझार पत्रिका, सप्टेंबर ८, १९४७

# ११०. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर १०, १९४७

(गांधीजी हिंदुस्तानीत ३५ मिनिट बोलले व हे भाषण ध्वनिमुद्रित करून रात्री १० वाजता आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात आले.)

नवी दिल्ली,

सप्टेंबर १०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी जेव्हा शहादराला पोहोचलो तेव्हा सरदार पटेल, राजकुमारी अमृत कौर आणि इतर लोक तिथे माझे स्वागत करण्याकरिता होते. परंतु सरदारांच्या ओठांवर मला नेहमीचे स्मित दिसले नाही. त्यांचा विनोदी स्वभाव हरवला होता. गाडीतून उतरल्यानंतर मला काही पोलीस दलातील लोक आणि इतर लोकही तसेच दुःखी दिसले. नेहमी हर्षोल्हासात असलेल्या दिल्ली शहराचे रूपांतर एकदम मृतांच्या शहरात कसे झाले? दुसरेही आश्चर्य माझी वाट पाहत होते. मी नेहमी ज्या हरिजन कॉलनीत राहत असतो व जिथे राहण्यात मला आनंद होत असतो तिथे मला न नेता प्रासादतुल्य बिर्ला भवनात नेण्यात आले. याचे कारण ऐकून मला फार दुःख झाले. असे असले तरी ज्या घरात मी आधी अनेकदा राहिलो होतो तिथे राहणार असल्याबद्दल मला आनंदच झाला. हरिजन कॉलनीतील वाल्मिकी मित्रांबरोबर मी राहो की बिर्ला भवनात राहो मी बिर्ला बंधूंचा पाहुणा असतो. मी जरी हरिजन कॉलनीत असलो तरी त्यांचे लोक भक्तिभावाने माझी परिपूर्ण काळजी घेतात. हे काम सरदारांकडे नसते. भंगी कॉलनीत माझी काळजी घ्यावी लागावी इतके दुर्बल ते कधीही नव्हते. नवी दिल्ली कमेटीच्या दुर्लक्षामुळे एखाद्या टोपलीत मासे भरावे तसे भंग्यांना त्यांच्या घरात कोंबण्यात आले आहे. अशा घरांमध्ये भंगी राहतात. त्या घरांमध्ये मी राहू शकत नसलो तरी हरिजनांमध्ये राहत असताना मी नेहमी खुश असतो.

मला बिर्ला भवनात आणण्यात आले कारण भंगी कॉलनीत निर्वासितांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यांची गरज माझ्यापेक्षा किती तरी मोठी आहे. परंतु या देशात निर्वासितांची समस्या निर्माण व्हावी ही गोष्ट एक राष्ट्र म्हणून आपल्याकरिता लाजिरवाणी नाही काय? पंडित नेहरू आणि सरदार पटेल यांच्यासह कायदे आझम जिना आणि इतर पाकिस्तानी पुढारी या सर्वांनी घोषित केले होते की भारतीय संघराज्यात तसेच पाकिस्तानमध्ये अल्पसंख्याक समुदायांना तीच वागणूक मिळेल जी बहुसंख्याकांना मिळते. या सार्वभौम राष्ट्रांमधील पुढाऱ्यांनी केलेली घोषणा जागतिक लोकमत

खुष करण्याकरिता होती की त्यांच्या शब्दांत आणि वर्तनात कोणतेही अंतर नाही व आपल्या वचनाची परिपूर्ती करण्याकरिता प्रसंगी आपल्या प्राणांचीही आहुती देण्याची तयारी असण्याचा त्यांचा हेतू होता? असे असेल तर मी विचारेन की हिंदू, शीख आणि स्वाभिमानी अमिल व त्यांच्या मित्रांना पाकिस्तान सोडणे का भाग पडले असते? क्वेट्टा, नबाब शाह आणि कराचीत काय झाले? पश्चिम पंजाबमधून शोककारक घटनांचे आलेले वृत्तांत हृदयविदारक आहेत. भारतीय संघराज्य आणि पाकिस्तानचे पुढारी निराशेने मान हालवून हे सर्व गुंडांचे काम आहे असे म्हणू शकत नाहीत. आपल्या देशातील लोकांच्या प्रत्येक कृत्याची जबाबदारी स्वीकारणे हे सार्वभौम राष्ट्रांचे कर्तव्य आहे - त्यांचे कर्तव्य कारण सांगत बसणे नाही तर करणे अथवा मरणे आहे. साम्राज्यशाहीचे चिरडणारे ओझे निघून गेलेले असल्यामुळे आता त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर कोणीही कशाचीही बळजबरी करू शकत नाही. आज ते हवे तसे करू शकतात. परंतु त्यांना प्रामाणिकपणे जगाला तोंड द्यायचे असेल तर स्वातंत्र्य म्हणजे कायद्याचे राज्य नाही असे या दोन्ही सार्वभौम राष्ट्रांमध्ये समजले जाऊ नये. संघराज्याचे मंत्री आपली दिवाळखोरी घोषित करून निर्लज्जपणे असे म्हणतील काय की दिल्लीच्या लोकांची आणि इथे राहणाऱ्या निर्वासितांची स्वच्छेने या देशाच्या कायद्याचे पालन करण्याची इच्छा नाही? माझ्याबद्दल बोलायचे तर मंत्र्यांनी या वेडासमोर शरणागती पत्करण्यापेक्षा त्याच्याशी लढण्यात आपले प्राण पणाला लावले पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे.

इतकेच नाही तर ज्या घरात मी राहत आहे तिथे फळे आणि भाज्या उपलब्ध नाहीत. काही मुसलमानांनी काही गोळ्या झाडल्या म्हणून भाजी बाजारात भाज्यांचा पुरवठा होणे बंद झाले ही लाजरवाणी गोष्ट नाही काय? शहराचा मी दौरा करत असताना निर्वासितांना त्यांचे रेशन मिळत नसल्याची तक्रार मी ऐकली. आणि जे काही त्यांना पुरवण्यात येते ते माणसाने खाण्यासारखे नाही. याची जबाबदारी जर सरकारवर असेल तर ती तितकीच निर्वासितांवरही आहे कारण त्यांनी आवश्यक सेवासुद्धा बंद पाडल्या आहेत. अशा प्रकारचे वर्तन करून ते स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेत आहेत हे त्यांच्या का लक्षात येत नाही? आपल्या सर्व समस्या सरकार सोडवील अशा विश्वास जर त्यांनी सरकारवर ठेवला असता व कायद्याचे पालन करणाऱ्या नागरिकांप्रमाणे ते वागले असते तर मला माहीत आहे आणि त्यांना माहीत असायला हवे की त्यांच्या बहुतेक समस्या सुटल्या असत्या.

मी हुमायून कबरीजवळील मिओच्या छावणीला भेट दिली होती. मला सांगण्यात आले की त्यांना अलवर आणि भरतपूर या संस्थांमधून बाहेर काढण्यात आले. ते म्हणाले की मुसलमान मित्रांनी आमच्याकरिता जे पाठवले ते वगळता आमच्याजवळ काहीही खाण्याकरिता नाही. मला

माहीत आहे की मिओ हे सहज भडकणारे लोक आहेत व ते भरपूर उपद्रव करू शकतात. परंतु त्यांना त्यांच्या मनाविरुद्ध पाकिस्तानमध्ये हाकलणे हा त्यावरील उपाय नाही. खरा उपाय त्यांना माणूस म्हणून वागणूक देणे आहे व त्यांच्यातील दोषांवर इतर कोणत्याही विकारांवर आपण उपाययोजना करतो त्याप्रमाणे उपाययोजना केली पाहिजे.

नंतर मी जामिया मिलियात गेलो. ती संस्था उभारण्याकरिता मी भरपूर हातभार लावला होता. डॉ. झाकीर हुसेन हे माझे प्रिय मित्र आहेत. त्यांनी अतिशय दुःखित अंतःकरणाने आपले अनुभव सांगितले. परंतु त्यांच्या अंतःकरणात कटुता नाही. नुकताच त्यांना जालंदरला भेट द्यावी लागली होती. शीख कॅप्टन आणि हिंदू रेल्वे अधिकारी हे त्यांच्या मदतीला वेळीच धावून गेले नसते तर ते मुसलमान असल्यामुळे शिखांनी रागाच्या भरात त्यांना मारून टाकले असते. आपले अनुभव मला सांगत असताना डॉ. झाकीर हुसेन यांनी त्या लोकांचे आभार मानले. कल्पना करा की ज्या राष्ट्रीय संस्थेत अनेक हिंदू शिकले त्या संस्थेवर हल्ला होण्याची आज त्यांना भीती वाटते. जामिया मिलीयाच्या कंपौंडमध्ये कसा तरी आश्रय मिळालेल्या निर्वासितांना मी भेटलो. त्यानंतर मी दिवाण हॉल, वेव्हेल कॅन्टीन आणि किंग्ज वे येथे गेलो. तिथे मी शीख आणि हिंदू निर्वासितांना भेटलो. पंजाबची मी मागे सेवा केली होती ते ती विसरलेले नव्हते. परंतु या सर्व छावण्यांमध्ये मला काही संतप्त चेहरे दिसत होते. त्या लोकांना क्षमा करता येऊ शकते. हिंदूंशी कठोरपणे वागल्याबद्दल ते माझ्याशी चिडून धारदार आवाजात बोलत होते. ते म्हणाले की त्यांना जशा प्रकारच्या हालअपेष्टांना तोंड द्यावे लागले तसे मला लागलेले नाही आणि मला माझ्या जवळच्या नातेवाईकांना गमावावे लागले नाही. ते म्हणाले की मला दारोदारी भीक मागावी लागली नाही. देशातील राजधानीत शांतता प्रस्थापित करण्याकरिता मी थांबलो आहे असे म्हणून तुम्ही समाधानात कसे बसू शकता असा प्रश्न त्यांनी मला विचारला. हे खरे आहे की मरण पावलेल्यांना मी परत आणू शकत नाही. परंतु मृत्यू ही सर्व जिवंत प्राणिमात्रांना - माणसे आणि पशूपक्षी - ईश्वराने दिलेली देणगी आहे. अंतर केवळ वेळ आणि पद्धतीत आहे. यामुळे ज्या मार्गामुळे जीवन सुंदर आणि जगण्यालायक होईल अशा योग्य वर्तनाच्या मार्गाचे अनुसरण करणे हाच खरा मार्ग आहे. आज एक शीख मित्र मला म्हणाला की मी जन्माने शीख आहे खरा परंतु गुरूग्रंथसाहेबाच्या दृष्टिकोनातून खरा शीख असल्याचा दावा मी करू शकत नाही. तुम्हाला खरा शीख माहीत आहे काय असे मी त्यांना विचारले. त्यांना तसा एकही दाखवता आला नाही. त्यानंतर नम्रपणाने मी त्यांना म्हणालो की खरा शीख असल्याचा माझा दावा आहे. ग्रथसाहेबमध्ये सांगितलेले असल्याप्रमाणे मी जगण्याचा प्रयत्न करतो आहे. एक वेळ अशी होती की नानकाना साहेबमध्ये माझे वर्णन शिखांचा खरा मित्र असे करण्यात आले होते. गुरू नानक यांनी हिंदू आणि मुसलमान यांच्यात भेद केला नव्हता. त्यांच्याकरिता संपूर्ण विश्व एक होते. माझा

सनातन धर्महीं असाच आहे. खरा हिंदू असल्यामुळे मी खरा मुसलमान असल्याचाही माझा दावा आहे. मी नेहमीच मुसलमानांची महान प्रार्थना म्हणत असतो जिच्यात ईश्वर एक आहे आणि तो रात्रंदिवस या संपूर्ण विश्वाचे रक्षण करतो असे म्हटलेले आहे.

मला निर्वासितांना सांगायचे आहे की तुम्ही सत्याचरण करा आणि निर्भय होऊन राहा. तुम्ही बदल्याच्या वा तिरस्काराच्या भावनेला थारा देऊ नका. तुम्ही रागाच्या भरात अविचाराने, आवेगाने कृती करून अतिशय कष्टाने मिळवलेल्या स्वातंत्र्याचे सोन्याचे सफरचंद फेकून देऊ नका.

प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २९४-९८

# १११. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर १२, १९४७

नवी दिल्ली,

सप्टेंबर १२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज सरहद्द प्रांतातून मला फार दुःखद बातमी (मला आणि माझ्या बायकोला संतप्त मुसलमानांपासून वाचवा अशी तार माजी मंत्री गिरधारी लाल पुरी यांच्याकडून आली होती.) कळली आहे.ही बातमी ऐकून अर्थातच मला फार वेदना झाल्या. सरहद्द प्रांतात मी भरपूर वेळ घालवलेला आहे. बादशाह खान माझ्याबरोबर होते. तिथे मी डॉ. खानसाहेबांबरोबर राहिलो होतो. मुस्लिम लीगच्या पुढाऱ्यांबरोबर माझ्या मैत्रीपूर्ण भेटीगाठी झाल्या होत्या. आणि आता हिंदू आणि शीख तिथे शांततापूर्वक राहू शकत नाहीत हे पाहून मला आश्चर्य होते. तिथे हिंदू आणि शिखांची भरपूर वस्ती आहे परंतु मुसलमानांच्या तुलनेत त्यांची संख्या कमी आहे. ते काहीही असले तरी संख्येला महत्त्व नसते. एखाद्या निरागस मुलालासुद्धा तिथे सुरक्षितपणे राहता आले पाहिजे.

मला स्वतःला जे वाटते ते मी तुम्हाला सांगत असतो म्हणजे आपण संतापू नये. आपल्याला अर्थातच वेदना होतील. संकटात असलेल्या आपल्या भावंडाबद्दल आपल्याला सहानुभूती वाटली पाहिजे आणि काळजीही वाटली पाहिजे. 'माझी भावंडे मारली गेली म्हणून मीही मुसलमानांना का मारू नये' असे वाटणे स्वाभाविक आहे.परंतु माझ्याबद्दल म्हणाल तर माझ्या भावाचा खून करणाराचासुद्धा मी खून करणार नाही. असे असताना मी इतर निष्पाप लोकांचा खून केला पाहिजे काय? वाईटाशी वाईट या तत्त्वज्ञानावर माझा विश्वास नाही. जो कोणी वाईट शब्दांचा आणि वर्तनाचा उपयोग करतो तो पशू होतो, तो भानावर राहत नाही. माझ्या लहानपणाचा एक प्रसंग मी तुम्हाला सांगेन. मला वाटते की मी त्या वेळी दहा वर्षांचा असेन. माझा मोठा भाऊ आजारी पडला होता. तो जवळपास वेड लागल्यासारखा झाला होता. प्रत्येकाला त्याची कीव वाटत होती. आम्ही अनेक डॉक्टरांना बोलावले परंतु तुरुंगाधिकाऱ्याला नाही आणि आम्ही त्याला तुरुंगातही पाठवले नाही. त्याला वेड लागल्यासारखे झालेले असल्यामुळे आम्ही सैनिकांनाही बोलावले नाही. माझे वडील अशा पदावर होते की त्यांची इच्छा असती तर त्याप्रमाणे ते करू शकत होते. परंतु त्यांनी असे काही करण्याचे का टाळले? अखेरीस तो त्यांचा मुलगा होता. आणि माझे वडील स्वतःच्या मुलालाच कसे मारू शकत होते? तर हे सर्व लोक माझ्या मुलाप्रमाणे आहेत, माझ्या स्वतःच्या भावाप्रमाणे आहेत.

माझी तुम्हाला विनंती आहे की तुम्ही मुसमानांना शत्रू समजू नका. माझे मित्र असलेले किती तरी मुसलमान मी तुम्हाला दाखवून देऊ शकेन. आपला देश भारत आणि पाकिस्तानमध्ये विभागला गेला केवळ इतक्याकरिता मागे राहिलेल्या मुसलमानांची कत्तल करून आपल्याला काहीही मिळणार नाही. पाकिस्तान सरकार आपले कर्तव्य विसरले आहे. पाकिस्तानचे महाराज्यपाल कायदे आझम जिनांनी अशा धोरणापासून दूर राहावे अशी मी त्यांना विनंती करीन. वृत्तपत्रांमधील वृत्तांत जर खरा असेल तर मी त्यांना सांगेन की हिंदू आणि शीख तुमची सेवा करण्याकरिता पाकिस्तानमध्ये राहिलेले आहेत. आता हिंदू आणि शिखांनी घाबरण्याचे काय कारण? ते घाबरलेले आहेत कारण त्यांना आणि त्यांच्या बायकांना मारले जाईल वा त्यांच्या बायकांचे अपहरण केले जाईल अशी त्यांना भीती वाटते. आपल्याला धोका आहे अशी भीती त्यांना वाटते म्हणून ते पळत आहेत. त्या सरकारमध्ये असे का व्हावे? लोकांना मला सांगावेसे वाटते की तुम्ही असे दानव होऊ नका. हिंदू आणि मुसलमान म्हणत असतील की पाकिस्तानमधील हिंदू आणि शीख संकटात असल्यामुळे, त्यांचा तिथे विनाश करण्यात आलेला असल्यामुळे व लक्षावधी रुपयांची मालमत्ता तिथे ठेवून त्यांना पळून यावे लागले म्हणून आम्ही स्थानिक मुसलमानांवर बदला घेऊ तर असे म्हणणे शुद्ध पशुत्वाचे होईल. पाकिस्तानच्या हिंदूंची आणि शिखाची भयानक अवस्था मी पाहिली आहे. मी लाहोरमध्ये राहिलो आहे. तुम्हाला असे वाटते काय की मला वेदना झाल्या नाहीत? पंजाबी लोकांना झालेल्या वेदनांपेक्षा माझ्या वेदना कमी नाहीत असा माझा दावा आहे. पंजाबमधील कोणी हिंदू वा शीख आला आणि मला म्हणाला की तुमच्यापेक्षा मला होणाऱ्या वेदना अधिक तीव्र आहेत कारण मी माझा भाऊ वा मुलगी वा वडील गमावले आहे तर मी म्हणेन की तुझा भाऊ माझा भाऊ आहे, तुझी आई माझी आई आहे आणि तुझ्या अंतःकरणात जशा वेदना आहेत तशाच माझ्याही अंतःकरणात आहेत. मीसुद्धा माणूस आहे व माझा संताप होत असतो. परंतु मी माझा राग गिळतो. ते मला शक्ती देते. त्या शक्तीने मी कोणता बदला घेऊ शकतो? मी कशा प्रकारे बदला घेतला तर त्यांना आपल्या अपराधाबद्दल पश्चात्ताप होईल व आपण भयानक अपराध केल्याची ते कबुली देतील? मुसलमानांनी पश्चिम पंजाबमध्ये काय केले ते तुम्हा सर्वांना माहीत. आहे. मुसलमान जर त्यांच्या धर्माचा विनाश करत असतील तर आपण काय करू शकतो? आपण त्यासंबंधी काय करणार आहो? मुसलमानांनी रानटीपणाचे वर्तन केले आहे म्हणून दिल्लीतील हिंदूंनी शिखांनी आणि जे बाहेरून आले आहेत त्या सर्वांनी मुसलमानांशी रानटीपणाचे वर्तन केले पाहिजे काय?

आज मी जामा मशिदीत गेलो होतो. त्या भागात राहणारांना मी भेटलो. त्या भागातील स्त्रियांनाही मी भेटलो. तेथील काही बाया रडल्या आणि काहींनी आपली दुरावस्था दाखवण्याकरिता आपल्या मुलांनाही बाहेर आणले. मी त्यांनी पश्चिम पंजाबमधील आणि सरहद्द प्रांतांतील हिंदू आणि

शिखांच्या व्यथा सांगितल्या पाहिजे काय? असे केल्यामुळे पंजाबच्या हिंदूंचे आणि शिखांचे दुःख किंचितही दूर होईल काय? पाकिस्तानमधील लोकांनी दानवीपणाचा मार्ग स्वीकारला म्हणून हिंदू आणि शिखांनीही तसेच केले. यामुळे एक दानव दुसऱ्या दानवातील दोष कसे काय पाहू शकतो? यामुळेच तुम्हा सर्वांना मला विनवणी करायची आहे की भारत आणि पाकिस्तानला वाचवा आणि अशा प्रकारे संपूर्ण देशाला वाचवा. आपण जर अखेरपर्यंत चांगले राहिलो तर पाकिस्तानमधील मुसलमानांनाही चांगले व्हावे लागेल? हाच जगाचा नियम आहे. तो कोणीही बदलू शकत नाही. ज्या म्हाताऱ्याने धर्माचा भरपूर अभ्यास केला आहे आणि प्रत्येकाची सेवा करण्याचा प्रयत्न केला आहे तो तुम्हाला हे सांगत आहे. माझ्या ७८-७९ वर्षांच्या आयुष्यात मला भरपूर अनुभव आला आहे. मी भारताबाहेर २० वर्षे राहिलो आहे. मी निग्रोंच्या भूमीत म्हणजे दक्षिण आफ्रिकेत राहिलो आहे परंतु रामायणचा त्याग कधीही केला नाही. माझ्या स्वतःच्या अनुभवाच्या प्रकाशात मी सांगतो की कोणाच्याही अपराधाची शिक्षा देण्याचे काम आपले नाही. जो आपले हित करतो त्याचे आपण हित करणे ही केवळ बनियागिरी आहे आणि असे करणारा नकली बनिया असतो. मी म्हणतो की मी स्वतःही बनिया आहे आणि मी खरा बनिया आहे. तुम्ही नकली बनिया होऊ नका. खरा माणूस तो असतो जो इतरांच्या वाईटपणाला चांगुलपणाने उत्तर देतो. हे मी माझ्या बालपणी शिकलो. मी वाईटपणाला चांगुलपणाने उत्तर देईन.

ते लोक मशिदीत अतिशय दयनीय अवस्थेत पडलेले होते. शुक्रवारी मोठ्या संख्येत मजा करण्याकरिता ते जसे गोळा होत असतात तसे ते गोळा झाले नव्हते. कलकत्ता आणि बिहार येथील मुसलमानांकरिता आणि नोआखालीतील हिंदूंकरिता मी काही तरी केले असल्याचे त्यांनी ऐकले होते. मी त्यांना भेटायला गेलो हे पाहून त्यांना बरे वाटले. स्वतःला सनातनी हिंदू म्हणवणारा आणि त्यामुळे मुसलमान, शीख, पारसी, ख्रिश्चन असण्याचाही दावा करणारा मी त्यांच्याकरिता काय करू शकेन असा विचार त्यांना पडला होता. एक आई म्हणाली की माझे मूल मरण पावले आहे आणि आता काय करावे ते मला कळत नाही. मी तिला सांगितले, "बाई ग, मी तुला काय सांगू? शक्यतो ईश्वराचे स्मरण कर. तो तुझ्यावर कृपा करील. तुझे मूल मेले म्हणून काय? प्रत्येक जण मेला तरी काय? चाकूने जरी नाही तरी शक्य आहे की कॉलराने तूसुद्धा त्याच मार्गाने जाशील. तू कायम जगण्याकरिता आलेली नाहीस, आलेली आहेस काय? यामुळे ईश्वराचे स्मरण कर. यावर रडून तू काय मिळवणार आहेस?'

आपण आपला स्वतःचा धर्म समजून घेऊ या. आपल्या स्वतःच्या धर्माच्या प्रकाशात मी लोकांना सांगेन की हिंदूंनी उन्मादात काही करू नये हे पाहणे आहे आणि शिखांनी वेडाच्या भरात

काही करू नये हे पाहणे आपले सगळ्यात मोठे कर्तव्य आहे. मला तुम्हाला सांगायचे आहे की ज्या सर्व मुसलमानांनी आपली घरे सोडलेली आहेत त्यांना त्यांच्या घरी परत पाठवण्यात यावे. त्यांना आताच्या आता परत पाठवण्याचे धैर्य माझ्यात नाही. परंतु या लोकांना परत त्यांच्या घरी पाठवायचे आहे हे आपल्या मनात असले पाहिजे. मुसलमानांना ज्या घरातून पळून यावे लागले तिथे त्यांना परत पाठवले जात नाही तोपर्यंत आपल्याला मनःशांती मिळू शकत नाही. एक मुद्दा मात्र विचार करण्यासारखा आहे. आज मला लोक सांगत होते की मुसलमान त्यांच्या घरात शस्त्र ठेवतात, दारुगोळा ठेवतात, आणि मी कधीही न पाहिलेल्या मशीनगन आणि स्टेनगन ठेवतात. उदाहरणार्थ हे प्रकरण सब्जीमंडीतील आहे. प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवण्याची माझी तयारी आहे. परंतु या गोष्टीला आपण का घाबरावे? मी मुसलमानांना सांगेन आणि दिल्लीतील प्रत्येकाला सांगेन की ईश्वरसाक्षीने तुम्ही घोषित करा की पाकिस्तानमधील अपराधांकरिता इथे आम्ही कोणालाही मारण्याचे काहीही कारण नाही. आम्ही तुमचे मित्र आहो आहो आणि आम्ही भारताचे आहो आणि अखेरपर्यंत भारताचे राहू. दिल्ली काही लहान ठिकाण नाही. ही देशाची राजधानी आहे. इथे आमची फार मोठी जामा मशीद आहे तसेच किल्लाही आहेत. हे तुम्हीही बांधले नाही आणि आम्हीही बांधले नाही. आमच्यावर राज्य करणाऱ्या मोगलांनी ते बांधले. हे भारताचे भाग झाले आहेत. आज मुसलमानांना देश सोडून निघून जाण्याकरिता सांगण्याचा अर्थ हा आहे काय की तुम्ही जामा मशिदीचा ताबा घ्याल? आणि तुमचा हेतू जर तो असेल तर त्याच्या परिणामांची तुम्हाला कल्पना आहे काय? त्याचा थोडा विचार करा. आपण जामा मशिदीत राहणार आहो काय? अशा कोणत्याही प्रस्तावाशी मी सहमत होऊ शकत नाही. मुसलमानांना त्या ठिकाणाला भेट देण्याचा अधिकार असलाच पाहिजे. ती त्यांची आहे. आपल्यालासुद्धा तिचा अभिमान वाटतो. ती कलाकौशल्याने परिपूर्ण आहे. आपण ती जमीनदोस्त करणार आहो काय? असे कधीही करता येणार नाही. माझे मुसलमानांना आवाहन आहे की आम्ही भारताचे आहो व भारतीय संघराज्याशी आम्ही प्रामाणिक राहू असे मोकळेपणाने त्यांनी घोषित करावे. ते जर ईश्वरनिष्ठ असतील व भारतीय संघराज्यात राहण्याची त्यांची इच्छा असेल तर त्यांना हिंदूंशी वैर करता येणार नाही. आणि माझी इच्छा आहे की इथल्या मुसलमानांनी हिंदूंचे शत्रू झालेल्या पाकिस्तानमधील मुसलमानांना वेडेपणाचा मार्ग धरू नका असे सांगावे. 'तुम्ही जर अशा वेडेपणाच्या मार्गाने जाल तर आम्ही तुमच्याशी सहकार्य करू शकणार नाही, आम्ही संघराज्याशी निष्ठेने राहू व तिरंग्याला वंदन करू, आम्हाला सरकारच्या आदेशाचे पालन करवे लागेल' असे सांगावे. या मुसलमानांनी इतर सर्व मुसलमानांना आपली शस्त्रे परत करण्याकरिता सांगावे. शस्त्र ठेवल्याबद्दल कोणालाही शिक्षा न करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. कलकत्त्यात मी नेमके हेच केले. तिथे लोकांनी शस्त्रास्त्रांचा भरपूर साठा माझ्या स्वाधीन केला. त्यातील बहुतेक लोक हिंदू होते. इथे

जर मुसलमानांजवळ शस्त्रे असतील तर मग हिंदू काही शस्त्रे ठेवणार नाहीत काय? हिंदूंना मी सांगत आहे की तुम्ही मुळीच शस्त्र ठेवू नका. तुम्हाला जर शस्त्र ठेवायचे असेल तर तुम्ही परवाना घ्या. असे सांगतात की पंजाबमध्ये प्रत्येकाला शस्त्र ठेवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. यामुळे पंजाबचे काही भले होणार नाही. प्रत्येकाला शस्त्रे ठेवण्याचा जर अधिकार देण्यात आला तर लोक एकमेकाशी भांडून परस्परांना मारतील. सरकारला शस्त्रांची गरज असते, नागरिकांना त्यांचा काय उपयोग? शहरातील कोणीही शस्त्र ठेवू नये. मुसलमानांनी आपल्याजवळची सर्व शस्त्रे सरकारच्या सुपूर्द करावी अशी माझी इच्छा आहे. परस्परांबददलची भीती नसावी. आपण त्यांना सांगितले पाहिजे की बाहेर काहीही झाले तरी दिल्लीतील आपण लोक भावाभावाप्रमाणे राहू. हीच गोष्ट कलकत्त्यात घडली होती आणि हिंदू-मुसलमानांनी भावाभावाप्रमाणे राहण्याकरिता सुरुवात केली होती. बिहारमधील हिंदूंनी हीच वृत्ती धारण केली होती. दिल्लीत तुम्ही अशीच परिस्थिती लगेच निर्माण केली पाहिजे. तसे झाले तर मला लगेच पंजाबमध्ये जाता येईल व दिल्लीतील मुसलमान शांततापूर्वक राहत आहेत असे तेथील लोकांना सांगता येईल. तिथे मी याचे बक्षीस मागेन. ममदोतच्या नबाबांकडून मी याचे बक्षीस मागेन. मी पूर्व पंजाबलाही जाईन. मी सर्व भागांचा असल्यामुळे मी सर्वांना सांगेन की तुम्ही वेडेपणाला शरण जायला नको.

मुसलमानांना पाकिस्तान पाहिजे होता आणि तो त्यांना मिळाला. आता ते का भांडत आहेत आणि कोणाशी भांडत आहेत? त्यांना पाकिस्तान मिळाल्यामुळे आता त्यांना संपूर्ण भारतसुद्धा हवा आहे काय? असे कधीही घडणार नाही. दुर्बल हिंदूंना आणि शिखांना ते का मारत आहेत? मला त्यांना या सर्व गोष्टी सांगायच्या आहेत. मी एकटा आहे. तुम्हाला संपूर्ण सरकार मिळाले आहे. आपापल्या देशात अल्पसंख्याकांचे आम्ही संरक्षण करू असा करार दोन्ही सरकारांनी करावा. आपल्याला आपल्या देशातील अल्पसंख्याकांचे संरक्षण करावे लागेल. नाही तर आम्ही अल्पसंख्याकांचे संरक्षण करत आहो आणि इथे लहानशा मुसलमान मुलालासुद्धा कोणी इजा करू शकणार नाही वा आपल्या रक्ताळलेल्या डोळ्यांनी त्याला घाबरवू शकणार नाही असे जवाहरलाल आणि सरदार पटेल कसे सांगू शकतील? जर एखादा मुसलमान असा असेल की ज्याने आपल्या घरात चोरून मशिनगन ठेवली असेल तर त्याला आम्ही शिक्षा करू. परंतु देशाबद्दल निष्ठा ठेवणाऱ्या मुसलमानांना कोणीही स्पर्श करू शकत नाही. तुम्ही अशा प्रकारची परिस्थिती निर्माण केली पाहिजे की जवाहरलाल आणि सरदार पटेल यांना अभिमानाने म्हणता यावे की दिल्लीने काही दिवसांकरिता जरी आपले भान हरवलेले होते तरी आता ती भानावर आली आहे. माझ्या सर्व मुसलमान बांधवांना मी सांगू इच्छितो की त्यांनी योग्य वक्तव्य दिले पाहिजे. त्यांनी आपली अंतःकरणे अगदी आतून स्वच्छ केली पाहिजे. शिखांनी काही वक्तव्ये प्रसिद्ध केली आहेत. तसेच हिंदूंनीही. जर मन आणि

अंतःकरण शुद्ध झालेले असेल तर आपण मैत्रीपूर्ण वातावरणात एकत्र राहू शकतो. अखेरीस दिल्लीतील किती तरी व्यापार, इतक्या सुंदर इमारती, येथील संस्कृती हे सर्व हिंदू आणि मुसलमानांचे आहे, कोणा एकाचे नाही.

(यानंतरचा मजकूर सप्टेंबर २१, १९४७च्या हरिजनमधून घेतला आहे.) *थोडक्यात सांगायचे तर गांधीजी आणि डॉ. दिनशा मेहता यांच्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गुरूजींशी (मा. स. गोवळलकर) झालेल्या संभाषणाचा गांधीजींनी उल्लेख केला. गांधीजींनी त्यांना सांगितले की या संघटनेचे हात रक्ताने भिजलेले आहेत. गांधीजींना आश्वस्त करत गुरुजी म्हणाले की हे खरे नाही. आमची संघटना कोणाचीही शत्रू नाही. मुसलमानांना मारण्याकरिता ती उभारलेली नाही. हिंदुस्तानचे आपल्या सर्वशक्तिनिशी रक्षण करणे इतकीच तिची इच्छा आहे. ती शांततेकरिता उभी आहे आणि तुम्ही हे प्रकाशित करा.* (पाहा आर. एस. एसच्या मेळाव्यातील भाषण, सप्टेंबर १६, १९४७.)

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ २९८-३०५

# ११२. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर १३, १९४७

नवी दिल्ली,

सप्टेंबर १३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

खूप दिवसांपूर्वी, बहुधा १९१५मध्ये मी जेव्हा दिल्लीत आलो होतो तेव्हा वडीलधारे म्हणून मी हकीम साहेब (अजमल खान) आणि डॉ. अन्सारी यांना भेटलो होतो. दिल्लीवर इंग्रजांची सत्ता नाही तर हकीम साहेबांची सत्ता आहे असे तेव्हा मला सांगण्यात आले होते. डॉ. अन्सारी हे वडीलधारे गृहस्थ होते तसेच ते फार चांगले शल्यचिकित्सक आणि डॉक्टर होते. ते हकीम साहेबांनाही ओळखत होते व त्यांच्याबद्दल त्यांना फार आदर वाटत होता. हकीम साहेबसुद्धा मुसलमान होते आणि मोठे विद्वान व हकीम होते. ते युनानी हकीम होते परंतु त्यांनी आयुर्वेदाचाही चांगला अभ्यास केला होता. हजारो मुसलमान आणि हजारो गरीब हिंदू त्यांच्याकडे औषधोपचाराकरिता जात असत. हकीम साहेबांशी माझी जी काही ओळख होती त्यावरून मी सांगू शकतो की ते पैशाची फिकीर करत नव्हते. ज्या कोणाला गरज असेल त्याची सेवा करण्यात त्यांना रस होता. आणि ते एखाद्या राजाप्रमाणे होते. त्यांचे पूर्वज चीनमध्ये राहत होते. ते चीनमधील मुसलमान होते आणि अंतर्बाह्य सद्गृहस्थ होते. शहरात तुमचा नेता कोण आहे असे मी माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक हिंदूला विचारले. ते श्रद्धानंदजी (महात्मा मुन्शीराम. ते या नावाने ओळखले जात असत.) होते काय? श्रद्धानंदजी त्यांच्यात भरपूर काम करत असत. परंतु नाही, त्यांचे नेते हकीम साहेब होते. का? कारण ते हिंदू आणि मुसलमान या दोघांचीही सेवा करत होते. असो, १९१५ साली जशी परिस्थिती होती तशी मी सांगितली आहे. परंतु नंतर आमच्या संबंधात जवळीक निर्माण झाली व मी त्यांना अधिक जवळून ओळखू लागलो. अन्सारींनासुद्धा मी अधिक चांगला ओळखू लागलो. अन्सारींबरोबर मी बरेचदा राहिलो आहे. मी त्यांची मुलगी झोअरा आणि जावई शौकत खान (डॉ. शौकतउल्ला खान) या दोघांनाही ओळखतो. ते सर्व फार चांगले लोक आहेत आणि ते इथे दिल्लीतच राहतात. परंतु काही हिंदू आपल्याला मारून टाकतील की काय अशी भीती त्यांना वाटते. ते स्वतःच्या घरात राहत नाहीत. ते हॉटेलमध्ये राहायला गेले आहेत. ते वाचले हा केवळ योगायोग आहे. त्यांचा पहारेकरी हिंदू होता. त्याने दंगलखोरांना हाकलले. हिंदू आणि शिखांमध्ये इतका उन्मत्तपणा का यावा की मुसलमानांनी त्यांना घाबरावे? मागे वळून तुम्ही म्हणू शकता की, आणि माझ्यावर लालभडक डोळे वटारत अनेक हिंदू संतप्त होऊन मला म्हणत असतात की 'तुम्ही बंगाल

आणि बिहारमध्ये दूर होता. एकदा पंजाबमध्ये या आणि हिंदूंची आणि शिखांची झालेली दुरावस्था पाहा आणि तेथील मुलींची अवस्था पाहा.' परंतु या दोन्ही गोष्टी मी एकाच पातळीवर ठेवू इच्छितो. काहीही झाले तरी तिथे अत्याचार घडलेले आहेत. परंतु एक भाऊ जर वेडाच्या भरात लोकांना मारू लागला तर त्याच्याप्रमाणे मीही लोकांना मारायला पाहिजे काय? ते कसे शक्य आहे? मी खरा हिंदू आणि सनातनी हिंदू असल्याचा माझा दावा आहे. नेमके याच कारणामुळे मी मुसलमानही आहे, पारसी आहे, ख्रिश्चन आहे आणि ज्यूसुद्धा आहे. माझ्याकरिता या सर्व एकाच झाडाच्या शाखा आहेत. या शाखांमधील कोणत्या शाखा मी राहू द्याव्या आणि कोणत्या तोडून टाकाव्या? मी कोणत्या फांदीची पाने तोडावी आणि कोणत्या फांदीकडे दुर्लक्ष करावे? माझ्याकरिता सर्व समान आहेत. मी हा असा घडलो आहे. याबद्दल मी काय करू शकतो? प्रत्येकजण जर माझ्यासारखा विचार करू लागला तर जगात पूर्णपणे शांतता नांदेल.

आज मी पुराना किल्ल्यात गेलो होतो. तिथे मी हजारो मुसलमानांना पाहिले. मुसलमानांनी भरलेले दुसरे काही ट्रक किल्ल्याकडे येत होते. ते सर्व मुसलमान शरणार्थी होते. त्यांना किल्ल्यात आश्रय का घ्यावा लागला? ते कोणाला घाबरलेले होते? ते तुम्हाला घाबरलेले होते की मला? मला माहीत आहे की मी कोणालाही घाबरवत नाही. परंतु माझे भाऊ, जे स्वतःला हिंदू आणि शीख म्हणवतात, त्यांना घाबरवत आहेत. परंतु त्यांनी त्यांना घाबरवले याचा अर्थ मी त्यांना घाबरवले, तुम्ही त्यांना घाबरवले. अशा प्रकारे घाबरून पाकिस्तानमध्ये त्यांना पळून जावे लागावे हे मी पाहू शकत नाही. पाकिस्तानमध्ये स्वर्ग आहे आणि इथे नरक असे काही नाही. आपण अशा नरकात का साप़डलो आहो? मला माहीत आहे की ना तर पाकिस्तान नरक आहे आणि ना भारत. आपली इच्छा असली तर आपण त्यांचे स्वर्गात रूपांतर करू शकतो वा आपल्या कृत्यामुळे ते नरकही होऊ शकतात. आणि दोन्ही देश जर नरक झाले तर स्वतंत्र माणसाला तिथे कोणतेही स्थान नसेल. यानंतर आपल्या नशिबी केवळ गुलामगिरी असेल. हा विचार माझ्या अंतःकरणाला व्यथित करत आहे. माझे हृदय थरथरत आहे आणि एखाद्या हिंदूला वा मुसलमानाला वा शिखाला मी हे सर्व कसे समजून सांगू असा प्रश्न मला पडतो. किल्ल्यातील फार थोडे मुसलमान संतापलेले होते परंतु इतरांनी त्यांना थांबवले. त्यांच्या अंतःकरणात प्रेम होते. आपल्या संतप्त भावांना ते सांगत होते, 'हा म्हातारा आपली सेवा करण्याकरिता आला आहे, आपले अश्रू पुसण्याकरिता आला आहे. आपण उपाशी आहो आणि आपल्याकरिता कुठे भाकरी मिळते काय हे पाहण्याकरिता हा आला आहे. आपण पाण्याशिवाय आहो आणि आपल्याकरिता कुठून पाणी मिळू शकते काय हे पाहण्याकरिता हा आला आहे.' तिथे त्यांना अन्नपाणी मिळेल की नाही हे मला माहीत नाही. काहींनी मला सांगतले की आमच्याकरिता इथे अन्नपाणी काहीही नाही. मी ते शोधण्याकरिता तिथे गेलो. तिथे काही लोक

माझ्याशी अतिशय प्रेमाने बोलले. मला बरे वाटले. कोणालाही आपले घर वा संपत्ती माघारी टाकून देऊन जावेसे वाटत नसते. हिंदू निर्वासितांचीही अशीच अवस्था आहे. तेही आपले घर आणि संपत्ती माघारी टाकून आले आहेत. काही मरण पावले, ही काही सुखद परिस्थिती नाही. प्रत्येकाकरिता ही लाजिरवाणी परिस्थिती आहे. मी त्यांचीही समजून घालण्याचा प्रयत्न करत होतो. तुमच्या माध्यमातून सर्वांशी बोलण्याची माझी इच्छा असली तरी माझे ऐकतो कोण? असे म्हणतात की महाभारत काळात पांडवांना पुराना किल्ल्यात राहावे लागले होते. याला तुम्ही इंद्रप्रस्थ म्हणा की दिल्ली म्हणा इथेच हिंदू आणि मुसलमान सोबत सोबत वाढले आहेत. ही मोगलांची राजधानी होती. आता ही भारताची राजधानी आहे. मोगल राजघराण्याचा आता कोणीही वारस शिल्लक नाही. मोगल बाहेरून आले होते. परंतु दिल्लीचे रीतीरिवाज आणि परंपरा यांच्याशी ते एकरूप झाले होते. त्यांच्यातीलच काही अन्सारी साहेब झाले, काही हकीम साहेब झाले आणि काही हिंदूही झाले. हिंदूसुद्धा त्यांच्याकडे नोकरी करू लागले. अशा या तुमच्या दिल्लीत हिंदूमुसलमान शांततपूर्वक राहत होते. अधूनमधून ते भांडतही होते. परंतु ते थोड्या दिवसांकरिता भांडायचे आणि नंतर परत एक व्हायचे. एका प्रसंगी कोणा माथेफिरूने श्रद्धानंदजीवर प्राणघातक हल्ला केला. परंतु त्याआधी मुसलमानांनी अतिशय प्रेमाने श्रद्धानंदजींना जुम्मा मशिदीत नेले होते व तिथे मुसलमानांना त्यांनी संबोधित केले होते. तुमची दिल्ली ही अशी आहे.

परंतु आज काय सुरू आहे? सरदार नेहमी ताठ मानेने चालत असत परंतु मी तुम्हाला सांगतो की आता त्यांना खाली मान घालून चालावे लागते. आणि जवाहरलाल, तो शूर आणि धाडसी जवाहरलाल हवेतून उडत होता तो आज असहाय होऊन बसला आहे. एक व्यक्ती वेड लागल्याप्रमाणे वागत असेल तर तिला दुरुस्त करता येऊ शकते. परंतु सर्वच जेव्हा अशा प्रकारे वागू लागतात तेव्हा त्यांना कोण दुरुस्त करू शकेल? अखेरीस जवाहरलाल काही देव नाही. आणि सरदारसुद्धा कोणताही देव नाही. आणि त्यांच्या इतर मंत्र्यांमध्येही दैवी शक्ती नाही. त्यांना बाहेरून कुठून मदतही मिळत नाही.

मी हीच गोष्ट प्रत्येकाला सांगत असतो. अनेक हिंदू आणि मुसलमान माझ्याकडे येतात. माझी त्यांच्याशी बरीच चर्चा झाली आहे. परंतु अखेरीस माझा आवाज ईश्वराला शरण जातो. त्याने मला या जगातून घेऊन जावे वा दिल्लीतील लोकांना समंजसपणा द्यावा म्हणून मी त्याला प्रार्थत असतो. एकाही हिंदूच्या वा शिखाच्या मनात मुसलमानांबद्दल रागाचे विचार नसावे. लोक मला सांगतात की मुसलमान पंचमस्तंभीयासारखे म्हणजे देशद्रोही आहेत, सध्याच्या सरकारविषयी त्यांच्या मनात निष्ठा नाही. भारतात साडेचार कोटी मुसलमान आहेत. जर साडेचार कोटी देशद्रोही असतील तर कोणाची

हानी होणार आहे? त्यांची स्वतःचीच हानी होईल. अशा प्रकारे वागून ते इस्लामचे दफन करतील. परंतु हिंदू आणि शिखांचे ते नुकसान करू शकणार नाहीत. परंतु त्या साडेचार कोटी मुसलमानांना तुम्ही त्रास देऊ नये. एक तर तुम्ही मरण्याकरिता तयार व्हा वा पाकिस्तानमध्ये जा असे तुम्ही त्यांना सांगणे योग्य नाही. त्यांनी का जावे? आणि कोणाच्या संरक्षणाखाली? मी तुम्हाला सांगतो की ते तुमच्या आणि माझ्या संरक्षणाखाली आहेत. किमान माझी तरी ते दृश्य पाहण्याची तयारी नाही. मी ईश्वराला प्रार्थना करीन की तसे होण्यापूर्वी त्याने मला घेऊन जावे. त्याने मला भरपूर दिवस जिवंत ठेवले आहे. ७८-७९ वर्षाचे जीवन काही लहान नाही. मी पूर्ण समाधानी आहे. माझ्या सर्व क्षमतेनुसार मी सेवा केली आहे. ईश्वराला जर मला जिवंत ठेवायचे असेल तर त्याने माझ्याकडून मला आवडेल तसे काम करून घ्यावे. दोन्ही संप्रदायांचा मी मित्र आहे असे मला त्यांनी सागायला पाहिजे. यामुळेच ते माझे ऐकतात व पुढेही ऐकत राहतील. मी फार कमी मुसलमानांना भेटलेलो आहे. मग सर्व मुसलमान देशद्रोही आहेत व ते माझा विश्वासघात करत आहेत असे मी कसे म्हणू शकतो? मी तुम्हाला सांगतो की ते जरी माझा विश्वासघात करत असतील तरी त्यामुळे त्यांना काहीही मदत होणार नाही. मला मान्य आहे की मुसलमानांजवळ भरपूर शस्त्रे आहेत. त्यांच्याजवळील काही शस्त्रे मी परत घेतली आहेत आणि काही अजूनही त्यांच्याजवळ आहेत. परंतु त्यांच्याजवळील शस्त्राने ते काय करतील? ते मला मारणार आहेत काय? ते तुम्हाला मारणार आहेत काय? जर ते तसे करतील तर ते पाहण्याकरिता सरकार आहे. मी तुम्हाला सांगून ठेवतो की आपण जर चांगले झालो व आपण चांगले वर्तन केले तर सरकार आपल्याला न्याय मिळेल हे निश्चितच पाहील. सरकारांना परस्परांशी भांडू द्या. आपण मित्र राहू या. ते आपल्याला मारून टाकतील अशी भीती आपण बाळगू नये. माणूस कितीही शक्तिशाली असला तरी ईश्वर जर आपल्याला वाचवणार असेल तर तो आपल्याला मारू शकणार नाही. यामुळेच हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही मला सांगायचे आहे की तुम्ही भीती टाकून द्या. कायदे आझमनी केलेले विधान मला आवडले नाही. ते म्हणाले की मुसलमानांना पाकिस्तानमध्ये आश्रय देण्यात आला कारण संघ राज्यात त्यांचा छळ होत होता. त्यांचे म्हणणे आहे की तिथे त्यांच्याकरिता अन्न आणि राहण्याकरिता जमीन असली पाहिजे. ते म्हणतात की पाकिस्तान गरीब देश आहे व यामुळे ज्यांच्याजवळ पैसा असेल त्यांनी तो तिथे पाठवावा. (या अधिकृत मुलाखतीकरिता पाहा पुरवणी "मौऊंटबॅटन यांना मुलाखत, सप्टेंबर १४ आणि १६, १९४७") मला त्याबद्दल मुळीच तक्रार करायची नाही. परंतु त्याचबरोबर पश्चिम पंजाबमध्ये हिंदूंचे काय झाले हे ते का सांगत नाहीत? बिहारने काही वाईट काम केले आहे हे खरे असले तरी त्याने त्याबद्दल पश्चात्तापही व्यक्त केला आहे. कलकत्त्यात हिंदू माझ्याकडे आले आणि त्यांनी पश्चात्ताप व्यक्त केला. मुसलमानांनीही जर असेच केले व आम्ही चुकलो अशी ते कबुली देत असतील तर ते फार चांगले

होईल. मी माझ्या डोळ्यांनी सर्व काही पाहिले आहे आणि त्याच्याकडे मी डोळेझाक कसा काय करू शकतो? आणि हिंदूंनी केलेले अपराधही मी झाकू शकत नाही. मला सर्व धर्मांशी प्रामाणिक राहायचे आहे. मी ना तर ईश्वराचा विश्वासघात करू शकतो ना माणसाचा. मी सर्वांशी निष्ठावंत राहू इच्छितो.

आमच्यातील सर्व माणसे इतके वाईट नाहीत असे घोषित करणे हे मुसलमानांच्या पुढाऱ्यांचे कर्तव्य आहे असे मी काल म्हणालो होतो. (पाहा प्रार्थना प्रवचन सप्टेंबर १, १९४७) आम्ही भारताशी एकनिष्ठ राहू आणि भारताकरिता सर्व जगाशी लढण्याची आमची तयारी असेल असे त्यांनी म्हणायला पाहिजे. तसे केले तरच ते खरे मुसलमान ठरतील. भारतात असे वाईट मुसलमान नाहीत अशी मी आशा करतो. आणि जर असे काही असतील तर त्यांना चांगले करण्याकरिता आपल्याला चांगले व्हावे लागेल, वाईट नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३०५-१०

# ११३. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर १४, १९४७

नवी दिल्ली,

सप्टेंबर १४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

कालप्रमाणेच आजही मी आपल्या मुसलमान शरणार्थी बांधवांना भेटायला गेलो होतो. मी शिबिरात पाहिली तशा प्रकारची घाण कुठेही पाहिली नाही. मी हिंदूंच्या (निर्वासित) छावण्यात गेलो आहे आणि मुसलमानांच्याही छावण्यात गेलो आहे. हिंदूंची छावणी वेगळ्या ठिकाणी आहे. मुसलमानांच्या छावणीत इतका घाणेरडा वास येत होता की ते ते ठिकाण स्वच्छ का करत नाहीत याचे मला आश्चर्य वाटू लागले. माझ्याकडे जर या शिबिराची जबाबदारी असती तर मी हे सहन केले नसते. मी छावण्यांमध्ये राहिलेलो आहे आणि अनेक छावण्या वा शिबिरे मी पाहिलेली आहेत. आपल्या छावण्या इतक्या घाणेरड्या ठेवू नये. मला अतिशय दुःख झाले. तिथे पोलिसांची आणि सैन्याची किती तरी व्यवस्था आहे आणि ते इतकी घाण आणि वास का सहन करतात? ते म्हणतील की हे ठिकाण स्वच्छ करण्याची आमची जबाबदारी नाही, आवश्यकता पडली तर शिबिरात शांतता राखण्याकरिता आणि सुव्यवस्था ठेवण्याकरिता आम्हाला केवळ गोळीबार करण्याचा आदेश आहे. ते म्हणतात की निर्वासित आपसात भांडले तर आम्ही आमच्या बंदुकांच्या मदतीने त्यांना येथून काढून टाकू. त्यांना इतकाच आदेश होता आणि आदेशात जे सांगितले होते त्याच्या पलीकडे ते जाऊ शकत नव्हते. हे सर्व ठीक आहे. परंतु ते आता आपले सैनिक आणि आपले पोलीस आहेत. माझ्या दृष्टिकोनातून त्यांच्याजवळ कुदळ आणि फावडेही असले पाहिजे. जिथे कुठे घाण आढळेल तिथली घाण त्यांनी दूर केली पाहिजे. त्यांचे मुख्य काम ठिकाणे स्वच्छ ठेवण्याचे असले पाहिजे. छावण्या चांगल्या अवस्थेत ठेवण्याकरिता हिंदू आणि मुसलमान मित्रांनी त्या स्वतःच स्वच्छ केल्या पाहिजे. हे जर आपण त्यांना सांगितले नाही तर आपण त्यांचे शत्रू ठरू. आपण जर त्यांचे मित्र आणि सेवक असू तर आपण त्यांना स्पष्टपणे सांगितले पाहिजे की तुम्ही इथे आला आहात म्हणून तुम्ही असहाय माणसाप्रमाणे वागला पाहिजे असे नाही. पाकिस्तानमधून हिंदू निर्वासित आले तर आपण काय त्यांना विहिरीत ढकलणार आहो? आपण त्यांना इथे ठेवून त्यांची काळजी घ्यायला नको काय? आपण त्यांना सांगितले पाहिजे की आम्ही तुम्हाला अन्नपाणी देऊ परंतु भंगी देणार नाही. मी फार कठोरहृदयी माणूस आहे.

हरिद्वारच्या कुंभमेळ्यात कुदळफावडे घेऊन मी काम केले आहे. आमच्याकडे छावणीतील स्वच्छतेसह सर्व कामे होती. तशा कामाकरिता सर्व प्रशिक्षित होते.यामुळे मी म्हणेन की या छावण्यांचा कोणी जर व्यवस्थापक असला, मग तो हिंदू आहे की मुसलमान याची मला फिकीर नाही, तर त्याचे पहिले काम आणि सर्वात महत्त्वाचे काम त्यांने ही छावणी एकदम स्वच्छ ठेवली पाहिजे. याकरिता पैसा लागत नाही. छावणीत फावडे नसतील तर सरकारने ते पुरवणे हे सरकारचे कर्तव्य आहे. सरकार जर फावडे पुरवत नसेल, सरकारला जर फावडे पुरवण्याइतका वेळ नसेल तर छावणीप्रमुखाने ते पुरवले पाहिजे. ज्याप्रमाणे छावणीतील लोकांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था करणे सरकारचे कर्तव्य आहे त्याचप्रमाणे छावणीतील साफसफाईकडे लक्ष देणे व पिण्याचे पाणी, धुणी धुण्याकरिता पाणी पुरवणेही सरकारचे काम आहे. तिथे सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था नसल्यामुळे कॉलरा पसरतो. छावणीतील साफसफाईत कधीही कमतरता असता कामा नये. ही गोष्ट मी ब्रिटिशांकडून शिकलो हे मी कबूल केलेच पाहिजे. छावणीतील साफसफाईकडे कसे लक्ष द्यावे हे मला माहीत नव्हते. हजारो लोक एकत्रित राहतात व त्यांच्यावर कशा प्रकारे कामाची जबाबदारी सोपण्यात येते की ते एकत्रितपणे साफसफाईचे वा सांगितलेले इतर कोणतेही काम करू शकतात हे मला माहीत नव्हते. सैनिक हे सर्व करू शकतात. काही मिनिटात संपूर्ण शहर उभे राहते आणि राहुट्या उभ्या राहतात. सर्वात आधी जे येतात त्यांचे पहिले काम पाणी कुठे मिळेल त्याचा उपयोगाची व्यवस्था कशी करायची हे पाहायचे असते. लघ्वी व संडासातील घाण पाणी बाहेर वाहू नये म्हणून येणाऱ्या दुसऱ्या तुकडीकडे खंदक खणण्याचे काम असते. अशा व्यवस्थेमुळे तिथे कॉलरा वा आमांशाची भीती नसते. सर्व लोक आरामात राहू शकतात. मी इतर गोष्टींकडे वळणार नाही.

इथे लोक संपूर्ण गोंधळाच्या परिस्थितीत राहतात. ते सर्व इकडेतिकडे पडलेले असतात. छावणी स्वच्छ ठेवण्याची कोणालाही फिकीर नसते. मी कोणाला दोष देऊ शकतो? मुसलमानांच्या छावणीप्रमुख मुसलमान आहे. तो त्यांच्या लोकांना सांगू शकतो आणि त्यांच्याकडून कोणते काम अपेक्षित आहे हे त्यांना समजावून सांगू शकतो. त्याला लोकांना समजून सांगता आले पाहिजे. त्यांना सांगितले पाहिजे की तुम्ही जर घाणीत राहाल तर तुम्ही मराल. तुमची मुलेही घाणेरडी राहू शकत नाहीत. यामुळे छावणी स्वच्छ ठेवणे ही किती तरी चांगली गोष्ट आहे. या लोकांना स्वच्छतेविषयक प्रशिक्षण दिले तर आपण किती तरी करू शकतो. तुम्ही जर हिंदूंची छावणी पाहाल तर तिथेही तुम्हाला घाण दिसेल. परंतु तरीही तिथे थोडे अंतर आहे. तिथे मी अनवाणी फिरू शकत नाही. तलावात तिथे अगदीच पाणी नव्हते. ते पूर्णपणे कोरडे होते. तिथे गटारांची व्यवस्था नव्हती. अखेरीस ना तर मुसलमान ना हिंदू पशू आहेत. परंतु आज आपले पशूत रूपांतर झाले आहे. हिंदू आणि शीख पाकिस्तानमधून घाबरून का पळत आहेत? हिंदूनी जरी इथे अतिशय वाईट वर्तन केले

असले तरी तिथे त्यांनी काहीही केले नाही. जर तिथे कोणी अपराध केला असेल तर त्याला शिक्षा करा. ही सरकारची जबाबदारी आहे. याचबरोबर मी विचारेन की येथून कुणाला पळून जाणे का भाग पडावे? ते जर मुसलमान असतील तर मुसलमान असल्यामुळे त्यांना दोष दिला पाहिजे काय? मुसलमानसुद्धा आपले आहेत आणि ते आपल्या सरकारच्या अंतर्गत आहेत. जर ते निर्वासित असतील तर दिल्लीकरता ही गोष्ट अतिशय लाजिरवाणी आहे हे स्पष्ट आहे. इथे असलेले मुसलमान बाहेरून आलेले नाहीत. त्यांच्यातील जवळपास दिल्लीमधील विविध वस्त्यांमधून आलेले आहेत. त्यांच्यातील फारच थोडे बाहेरून आले असतील. आम्ही त्यांना दिल्लीबाहेर घालवले आहे. काल मी सांगितले होते त्याप्रमाणे मी तुम्हाला आजही सांगेन की ही गोष्ट अतिशय लज्जास्पद आहे. पाकिस्तानमधून अल्पसंख्याकांना पळून यावे लागावे हे पाकिस्तान सरकारचे अपयश आहे. तुम्ही पाकिस्तानमध्येच राहिले पाहिजे असे तिथल्या सरकारने त्यांना सांगितले पाहिजे. परंतु पाकिस्तानमधील आज परिस्थिती अशी आहे की चांगल्या लोकांनाही तिथून पळून यावे लागते. लाहोर जवळपास रिकामे झाले आहे. हिंदूंनी हे शहर बांधले आहे आणि हिंदूंनी बाधलेल्या किती तरी हवेल्या तिथे आहेत. तिथे किती तरी शैक्षणिक संस्था आहेत. इतकी महाविद्यालये अजून कुठे आढळतील? मला नेहमीच प्रत्येक चांगल्या गोष्टीचे कौतुक वाटत असते. आज ही महाविद्यालये कोणाच्या ताब्यात आहेत? या सर्व गोष्टींचे मला दुःख होते. आणि पाकिस्तान सरकार इतक्या खालच्या पाळीवर गेले याची मला लाज वाटते. आणि जेव्हा मी येथील परस्थिती पाहतो तेव्हा मला अजूनच लाजिरवाणे होऊ लागते. आपले सरकार असूनही दिल्लीतील परिस्थिती इतकी का चिघळवी. सिंहासारखे जवाहरलाल आणि गृहमंत्री सरदार पटेलसारखे लोक असूही परिस्थिती इतकी चिघळावी? त्यांचा अधिकार मान्य का करण्यात येऊ नये? त्यानी जर एखाद्या मुलाला वाचवण्याचा आदेश दिला असेल तर ते मूल वाचवले गेलेच पाहिजे. असे झाले तरच आपण आपले सरकार चालवू शकतो. परंतु आता त्यांच्याजवळ पोलीस आणि सैन्य आहे व यांच्या मदतीने ते शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहेत.परंतु अखेरीस हे सरकार कोणाचे आहे? हे तुमचे सरकार आहे. तुम्ही ते घडवले आहे.

जर प्रत्येकजण आपल्या सरकारच्या आदेशाचे पालन करील तर प्रत्येक गोष्ट करता येऊ शकते. असे झाले नाही तर सध्याच्या अवस्थेकरिता जग दिल्लीची चेष्टा करील. आणि मग युरोपीय सत्ता, मग ती रशिया असो, फ्रान्स असो की ब्रिटन असो वा अमेरिकी असो आपल्याला हसतील आणि आपण आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याकरिता असमर्थ आहो असे म्हणतील. आपण केवळ गुलाम म्हणूनच जगू शकतो. असे व्हायला नको. यामुळेच मुसलमानांना मला सांगायचे आहे की तुम्ही तुमच्याजवळील सर्व शस्त्रे भीतीमुळे नाही तर स्वतः होऊन सुपूर्द करावी. तुम्हाला जर

भावाभावाप्रमाणे राहायचे असेल तर तुम्ही असे करावे. असे केले तरच भारताबद्दलची तुमची निष्ठा सिद्ध होईल व तुम्ही भारताचा कधीही विश्वासघात करणार नाही हे दाखवून द्याल. हिंदू असो की मुसलमान आपण सर्व भारताचे आहो. मला मुसलमानांनासुद्धा सांगायचे आहे की पश्चिम पंजाब, सरहद्द प्रांत, बलुचिस्तान आणि सिंध येथील मुसलमानांना जर वेड लागले व हिंदू आणि शीख यांना तिथे शांततेत राहणे शक्य झाले नाही तर आमच्याकरिता इथे परिस्थिती कठीण होणार आहे. अखेरीस आपण सर्व माणूस आहो. यामुळे तुम्ही मानवता समजून घ्या. आपण किती काळ समजूत घालू शकू? माणसाला वेड लागू शकते आणि तो चांगलाही असू शकतो. तो जर नीट वागत असेल तर त्याला शांत राहू द्या. एखाद्या माणसाला वेड लागल्यामुळे तो जर श्वापद होत असेल तर मी दिल्लीच्या हिंदूंना सांगेन की तुम्ही काळजीपूर्वक राहा आणि शूर व्हा, भ्याड होऊ नका. मुसलमानांजवळ काही शस्त्रे जरी असतील तरी त्यांना घाबरणे हा भ्याडपणा आहे. कुठे तरी काही मुसलमान शस्त्र बाळगत असतील तरी आपण त्याची काळजी का करायची? त्यांना निःशस्त्र करणे सरकारचे काम आहे. त्यांच्याकडील शस्त्र काढून घेणे हे सैन्याचे काम आहे. त्यांना जर हिंदूबरोबर एकोप्याने भारतात राहायचे असेल तर त्यांनी आपल्याजवळील शस्त्रे सुपूर्द केली पाहिजे. आणि मुसलमानांनी आपली चूक कबूल केली पाहिजे. त्यांनी म्हणायला पाहिजे की आमची इच्छा दिल्लीला जिंकून संपूर्ण भारताचा पाकिस्तान करण्याची होती परंतु भारताचा पाकिस्तान करणे शक्य नाही हे आता आमच्या लक्षात आले आहे. त्यांना आधीच पाकिस्तान मिळालेला आहे व यावर त्यांनी समाधान मानायला पाहिजे. आम्ही पाकिस्तानमधील हिंदूंना वाचवू व त्यांना समाधानात ठेवू असे त्यांनी म्हणायला पाहिजे. असे झाले तर भारत आणि पाकिस्तानमध्ये चांगुलपणाकरिता स्पर्धा सुरू होईल व अधिक प्रामाणिकपणाने मानवतेला अनुसरण्याचा ते प्रयत्न करतील. आपण मक्केकडे पाहो की पूर्वेकडे सत्य आपल्या स्वतःच्या अंतःकरणातच वसत असते आणि आपले अंतःकरण निष्पाप असणे याला खरे महत्त्व आहे. आपण जर परस्परांशी चांगुलपणात स्पर्धा केली तर आपण सर्व प्रगती करून एकत्रित काम करू शकतो.

मी तुम्हाला सांगू इच्छितो आता मी इथे आलेलो असल्यामुळे इथेच मरण्याची माझी इच्छा आहे. आपण जर वेड लागल्याप्रमाणे वागू लागलो आणि रागाच्या भरात मुसलमानांना मारू लागलो तर मला तुमच्याशी काहीही घेणेदेणे नसेल. मला अशा गोष्टींचा साक्षी व्हायचे नाही. मुसलमानांना जर असे वाटत असेल की हिंदू आणि शीख दोषी आहेत आणि हिंदू आणि शिखांना वाटत असेल की मुसलमानांचा दोष आहे तर या दोघांचाही दोष आहे. माझ्याकरिता हे सर्व समान आहेत. माझ्या दृष्टीने हिंदू आणि मुसलमान एकच आहेत. तुमच्यातील जे खरे असतील त्यांनाच ईश्वर ओळखेल. दुष्टांच्या दुर्वर्तनाकरिता शिक्षा करणारे तुम्ही कोण? ते स्वतःलाच शिक्षा करतील. मला याबद्दल

काहीही संशय नाही. सर्व धर्माचा मला कळलेला सार हाच आहे. यामुळेच मी म्हणेन की मुसमानांनी कितीही चुकीचे वर्तन केले तरी तुम्ही चांगुलपणाने वागला पाहिजे. कमीतकमी तुम्ही असे केलेले पाहण्याची मला इच्छा आहे. आपण इतके जर केले तर आपण आपल्या सरकारला चांगल्या स्वरूपात ठेवू शकतो. आणि असे झाले नाही तर आपण सर्व काही गमावू.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३११-१६

# ११४. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर १५, १९४७

(गांधीजींचा आज मौनवार असल्यामुळे हे भाषण सभेत वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

सप्टेंबर १५, १९४७

रात्री मी जसजसा मनाला शांत करणाऱ्या आणि जीवनदायी वाटणाऱ्या पावसाचा आवाज ऐकत जात होतो तसतसा माझ्या मनात दिल्लीतील उघड्या छावण्यामध्ये पडून असलेल्या हजारो शरणार्थ्यांचे विचार येत होते. चोहोकडून पावसापासून रक्षण होईल अशा ओसरीत मी झोपलो होतो. परंतु माणसाचे क्रूर हात त्याच्याच भावाविरुद्ध उठले नसते तर या हजारो माणसांना - पुरुष, स्त्रिया आणि मुलांना निवाऱ्याशिवाय उघड्यावर पडून राहावे लागले नसते आणि अनेकांना तर उपाशीपोटीही राहावे लागले नसते. काही ठिकाणी तर गुडघाभर पाणी साचले होते. त्यांना दुसरा कोणताही पर्याय नव्हता. (ही वाक्ये प्रार्थना प्रवचन - १ पृष्ठ ३१५वरून भाषांतरित केली आहेत.) हे सर्व अपरिहार्य होते काय? आतून जोरात आलेलं उत्तर होतं 'नाही'. अगदी एक महिन्याचे नवजात मूल असलेल्या स्वातंत्र्याचे हेच पहिले फळ आहे काय? या विचारांनी गत वीस तासात मला झपाटून टाकले होते. माझे मौन हे मला मिळालेल्या वरदानासारखे आहे. त्यामुळे मला माझ्या अंतर्मनाचा शोध घेता आला. दिल्लीच्या नागरिकांना वेड लागले आहे काय? त्यांच्यात काहीच माणुसकी उरलेली नाही काय? देशप्रेम आणि देशाचे स्वातंत्र्य यांना त्यांच्या हृदयात काहीच स्थान उरलेले नाही काय? आधी हिंदूंवर आणि नंतर शिखावर दोषारोप केल्याबद्दल मला क्षमा करण्यात यावी. द्वेषाच्या लोंढ्याला बांध घालण्याचे पुरसे सामर्थ्य इथल्या पुरुषांमध्ये नाही काय? मी इथल्या मुसलमानंना विनंती करीन की त्यांनी भीतीचा पूर्णपणे त्याग करावा आणि ईश्वरावर विश्वास ठेवावा व त्यांच्याजवळील ज्या शस्त्रांची हिंदूंना आणि शिखांना भीती वाटते ती सर्व शस्त्रे त्यांनी जाहीर करावी. याचा अर्थ असा नाही की हिंदू आणि शिखांजवळ शस्त्रे नाहीत. अंतर केवळ प्रमाणाचे आहे. काहींजवळ जास्त आहेत काहींजवळ कमी. (गांधीजींचे मौन सुरू झाल्यामुळे हे वाचून दाखवण्यात आले.) अल्पसंख्याकांनी एक तर ईश्वरावर व त्याने निर्माण केलेला माणूस योग्य वर्तन करील यावर भरवसा ठेवावा आणि नाहीतर ज्यांच्यावर तुमचा विश्वास नाही त्यांच्यापासून संरक्षण व्हावे म्हणून तुम्ही शस्त्रांवर विश्वास ठेवा.

माझा तुम्हाला लहानसा परंतु खंबीरपणाचा सल्ला आहे. त्याची अचूकता स्पष्ट आहे. तुमचे सरकार प्रत्येक नागरिकाचे गुन्हेगारापासून, मग ते कितीही शस्त्रसिद्ध असो, रक्षण करील यावर विश्वास ठेवा. यापुढे जाऊन मी म्हणेन की घरादारांला आणि संपत्तीला मुकावे लागल्यामुळे अल्पसंख्याकांचे जे नकसान झाले असेल त्या प्रत्येक प्रकरणी अल्पसंख्याकांना नुकसानभरपाई मागण्याचा अधिकार आहे. दोनपैकी एकही सरकार हे सर्व करू शकत नाही असे म्हणणे म्हणजे मृताला जिवंत करण्यासारखे होईल. दिल्लीच्या लोकांनी कायदा हातात घेतला तर पाकिस्तान सरकारकडून न्यायाची मागणी करणे कठीण होईल. न्याय मागणाराने न्याय केला पाहिजे. त्याचे हात स्वच्छ असले पाहिजे. ज्या मुसलमानांना आपले घर सोडण्याकरिता बाध्य करण्यात आले आहे त्यांना हिंदू आणि शिखांनी परत त्यांच्या घरात राहण्याकरिता बोलावले पाहिजे. तुम्ही जर हे साहसी पाऊल उचलले तर त्यामुळे निर्वासितांच्या समस्येची तीव्रता आणि जटिलता कमी होईल. आणि मग त्या गोष्टीची दखल पाकिस्तानलाच नाही तर संपूर्ण जगाला घ्यावी लागेल. तुम्ही दिल्ली आणि भारताला अपमानित होण्यापासून आणि विनाशापासून वाचवाल. करोडो हिंदू, शीख आणि मुसलमानांची अदलाबदल करण्याची कल्पनाही करवत नाही. ते चूक आहे. अदलाबदल करण्याचे खंबिरपणाने नाकारून आपण पाकिस्तानने केलेली चूक दुरुस्त करू शकतो. या बाबतीत माझा आवाज एकटा जरी पडला तरी हे बोलण्याचे धैर्य माझ्यात राहील अशी आशा आहे.

हरिजन, सप्टेंबर २८, १९४७

# ११५. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर १७, १९४७

नवी दिल्ली,

सप्टेंबर १७, १९४७

काल संध्याकाळच्या माझ्या अनुभवानंतर मी ठरवले होते की तोपर्यंत प्रार्थना सभा घ्यायच्या नाही जोपर्यंत श्रोत्यांमधील उपस्थित प्रत्येक माणूस त्याकरिता तय़्यार होत नाही. (१६ सप्टेंबरच्या प्रार्थना सभेत कुराणमधील आयती म्हणायला सुरुवात झाल्याबरोबर जमावातील कोणी तरी ओरडले, या आयती म्हणता म्हणताच आमच्या आयाबहिणींवर अत्याचार करण्यात आले, आमचे प्रिय स्वजन मारले गेले. इथे आम्ही तुम्हाला या आयती म्हणू देणार नाही. काही लोक घोषणा देऊ लागले, गांधी मुर्दाबाद. सभेतील गोंधळ थांबण्यात अपयश आल्यानंतर प्रार्थना थांबवण्यात आली.) मी कधीही कोणावरही काहीही लादले नाही मग प्रार्थनेसारखी अतिशय आध्यात्मिक गोष्ट मी कोणावर कसा काय लादू शकतो. प्रार्थना करायची की नाही याची सूचना आतून यायला पाहिजे. मला खुश करण्याचा हा प्रश्नच नाही.

माझ्या प्रार्थनासभा खरोखरच लोकप्रिय झाल्या आहेत. या सभांमुळे लक्षावधी लोक लाभान्वित झाले आहेत असे दिसते. परंतु लोकांना सहन कराव्या लागलेल्या आपदांमुळे त्यांना राग येणे स्वाभाविक आहे व दोन्ही समुदाय तणावाच्या मनस्थितीत आहेत हे मी चांगल्या प्रकारे समजू शकतो. प्रार्थना घेत असताना प्रार्थनेतील काही भाग वगळावा अशी जी अपेक्षा करण्यात येत आहे ती करण्यात येऊ नये इतकीच सभा घेण्याविषयीची माझी अट आहे. एक तर संपूर्ण प्रार्थना मनःपूर्वक मान्य केली पाहिजे वा ती फेटाळली पाहिजे. कुराणमधील जो भाग मी प्रार्थनेत म्हणतो तो मी म्हणणे मी थांबवू शकत नाही.

मी तुमची चीड आणि त्यातून निर्माण होणारा अधीरपणा समजू शकतो. परंतु तुम्हाला मिळालेल्या स्वातंत्र्याकरिता तुम्हाला पात्र ठरण्याची इच्छा असेल तर तुम्हाला तुमच्या रागावर नियंत्रण मिळवावे लागेल आणि न्याय मिळवण्याकरिता तुम्हाला तुमच्या सरकारवर अवलंबून राहावे लागेल. मला जरी माझी अहिंसक पद्धती आवडत असली तरी मी तुम्हाला ती सुचवत नाही कारण मला माहीत आहे की अहिंसेसंबंधीचे माझे बोलणे आज कोणीही ऐकणार नाही. यामुळे मी तुम्हाला लोकशाहीवादी राष्ट्रे जो मार्ग अवलंबत असतात तोच सुचवत आहे. लोकशाहीत प्रत्येक माणसाला प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणे म्हणजे सरकारच्या आदेशाप्रमाणे वागावे लागत असते व आपल्या स्वतःच्या इच्छांना त्याप्रमाणे वळण लावावे लागत असते. प्रत्येक माणूस जर आपल्या हातात

कायदा घेईल तर सरकार काम करू शकणार नाही. त्याचा अर्थ होईल अराजक. म्हणजे सामाजिक व्यवस्थेचा अंत. म्हणजे राज्य अस्तित्वात राहणार नाही. स्वातंत्र्य गमावण्याचा हाच मार्ग आहे. तुम्ही जर सरकारला आपले काम करू दिले तर प्रत्येक हिंदू आणि शीख निर्वासित आपापल्या घरी सन्मान आणि आदरानिशी परतेल. परंतु तुम्ही जर तुमच्या मुसलमान देशबांधवांना भारतातून घालवून देऊ पाहाल तर असे घडण्याची शक्यता नाही. अशी कोणतीही गोष्ट मला भयानक वाटते. मुसलमानांवर अन्याय करून तुम्ही न्याय मिळवू शकत नाही. ही गोष्ट सोडली तरी अल्पसंख्याक म्हणजे हिंदू आणि शीख यांना पाकिस्तानमध्ये फार वाईट वागणूक मिळते हे खरे असेल तर हेही खरे आहे की पूर्व पंजाबमध्ये अल्पसंख्याकांना म्हणजे मुसलमानांना फार वाईट वर्तणूक दिली जात आहे. दोन्ही देशांमध्ये करार होण्याचा योग्य मार्ग हा आहे की त्यांनी शुद्ध अंतःकरणाने आपापल्या चुका कबूल करून सामंजस्य करार करावा. जर अशी एकवाक्यता होणे शक्य नसेल तर त्यांनी लवाद कबूल करावा व लवादाचा निवाडा मान्य करावा. दुसरा मार्ग आहे युद्धाचा असंस्कृत मार्ग. मला युद्धाच्या कल्पनेचीसुद्धा घृणा आहे. परंतु परस्परात एकमत होऊन करार होत नसेल आणि लवादही मान्य होत नसेल तर युद्धाशिवाय पर्याय राहणार नाही. यामुळे मी आशा करतो की अशा परिस्थितीत लोक आपला वेडेपणा टाकून देतील व भानावर येतील व पाकिस्तानमध्ये जायचे नाही असे ठरवलेले आपले मुसलमान शेजारी आपल्या संसारात परतत असतील तर त्यांना सुरक्षिततेचे आश्वासन देतील. ही गोष्ट सैन्याच्या मदतीने साध्य करता येऊ शकत नाही. लोक जेव्हा भानावर येतील तेव्हाच ही साध्य करता येईल. यादवीमुळे देशाचा विध्वंस झालेला पाहण्याकरिता जगायचे नाही असे मी ठरवले आहे. आपल्या या पवित्र आणि सुंदर भूमीवर काही आपत्ती येण्यापूर्वी त्याने मला घेऊन जावे. माझ्या या प्रार्थनेत तुम्ही सर्वांनी सहभागी व्हावे अशी माझी इच्छा आहे.

हिंदू आणि मुसलमान कामगारांनी (दिल्ली कापड गिरणीतील कामगारांच्या प्रचंड सभेत याआधी गांधीजी हजर राहिले होते.) एकोप्याने काम केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तुम्ही जर संपूर्ण एकोप्याने काम कराल तर तुम्ही देशासमोर चांगला आदर्श ठेवाल. कामगारवर्गाने आपल्या जवळपासही सांप्रदायिकतेला भटकू देऊ नये. तुम्हाला जर तुमची शक्ती माहीत असेल व तुम्ही समजून घेऊन रचनात्मक कार्य करत राहाल तर तुम्ही खरे मालक व सत्ताधारी व्हाल व तुम्हाला कामावर लावणारे तुमच्या अडीअडचणीत मदत करणारे तुमचे विश्वस्त व मित्र होतील हे मी तुम्हाला सांगितले नव्हते काय? कामगार हे सोने आणि चांदीपेक्षा मुल्यवान आहेत कारण जमिनीच्या पोटातून केवळ कामगारच ते सोनेचांदी वर काढू शकतात हे जेव्हा त्यांना कळेल तेव्हाच खरे आनंदाचे दिवस येतील.

प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३१८-२०

# ११६. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर १८, १९४७

नवी दिल्ली,

सप्टेंबर १८, १९४७

आज आपण आपला सर्व शहाणपणा गमावला आहे, आपण मूर्ख झालो आहो. केवळ शिखांनाच वेड लागले आहे वा हिंदू आणि मुसलमानच झपाटले गेले आहेत असे नाही. सर्व गोष्टींची सुरुवात मुसलमानांकडून झाली असे मला सांगण्यात आले. हे खरे आहे. त्यांच्या बाजूने दंगलीना सुरुवात झाली याबद्दल काही संशय नाही असे मला वाटते. परंतु याबद्दल सतत गदारोळ करत राहण्यात काय फायदा? आज काय करणे गरजेचे आहे हे मी पाहिले पाहिजे. गजेंद्राप्रमाणे आज भारताची अवस्था झाली आहे. (गांधीजी इथे गजेंद्राच्या पुराणकथेचे उदाहरण देत आहेत) मला शक्य असेल तर मी त्याला वाचवण्याचा प्रयत्न करीन. मी काय केले पाहिजे? मी ईश्वराचीच मदत मागितली पाहिजे. माझ्या प्रयत्नाचे काही फळ मिळाले तर मला आनंद होईल. परंतु मी तर केवळ हाडबंडल आहे. असा माणूस काय करू शकतो? परंतु ईश्वर सर्व काही करू शकतो. मी त्याच्याकडे वळतो आणि म्हणतो, “हे देवा ये,गजराज बुडत आहे, भारत बुडत आहे, त्याला वाचव.”

इथे केवळ हिंदूंनी राहिले पाहिजे आणि मुसलमानांना इथे राहायचे असेल तर त्यांनी गुलामाप्रमाणेच राहिले पाहिजे हे शक्य नाही. जवाहरलाल काय म्हणतात ते जरा ऐका - “आम्ही फार मोठ्या संकटात आहो. आम्हाला इतर कामाकडे लक्ष देता येत नाही. केवळ याच समस्येत आम्ही गुंतलेलो आहो.” पाकिस्तानमधील प्रत्येकजण भ्रष्ट झालेला असेल तर त्याचे काय? इतर लोक वाईट गोष्टी करतात म्हणून आपणही तसेच करू शकत नाही आज मी दर्यागंजमध्ये गेलो होतो. काही मुसलमान मित्रसुद्धा माझ्याकडे आले होते. मी त्यांच्याशी चर्चा केली, त्यांना प्रेम दिले आणि तुम्ही घाबरू नका असे मी त्यांना सांगितले. तुम्ही मजबूत असला पाहिजे. मी त्यांना सांगितले की तुम्ही तुमच्या घराला चिकटून राहा. तुम्हाला इथे कोणताही खोडसाळपणा करता येणार नाही. यामुळे सर्व हिंदूंनी सुज्ञपणा धारण करावा, सर्व शीख चांगले व्हावे असे मी म्हणत असतो. हिंदू आणि शिखांनी पाकिस्तानमध्ये जाण्याची इच्छा नसलेल्या मुसलमानांना ‘तुम्ही तुमच्या घराला चिकटून राहा’ असे सांगावे. आपल्याला जामा मशीद मिळाली आहे जी जगातील सर्वात मोठी मशीद आहे. बहुतांश मुलमानांना आपण मारून टाकले वा ते पाकिस्तानमध्ये निघून गेले तर त्या मशिदीचे काय होईल? तुम्ही पाकिस्तानमध्ये मशीद स्थलांतरित करणार आहात काय? वा ती मशीद तोडून तिथे शिवमंदिर बांधणार आहा? कल्पना करा की काही हिंदूंना अहंकारात तिथे शिवमंदिर बांधायचे आहे वा

शिखांना तिचे रूपांतर गुरुद्वारात करायचे आहे तर असे करणे हे हिंदू आणि शीख धर्माला मूठमाती दिल्याप्रमाणे होईल. कोणत्याही धर्माची अशा प्रकारे उभारणी करता येऊ शकत नाही.

ज्यांना पाकिस्तानात जायचे असेल ते तिथे जाऊ शकतात. परंतु हिंदूंच्या भीतीमुळे त्यांनी पुराना किल्ल्यात वा हुमायूनच्या कबरीत का लपावे? मी त्यांना सांगितले आहे की जे मुसलमान अजूनही आपल्या घरात आहेत त्यांनी आपल्या घरांना चिकटून राहावे. त्यांच्याकरिता मीसुद्धा मरण पत्करेन. त्यांना थोडासा धीर आला आणि आम्ही परतू, आमचे घर सोडून आम्ही पळून जाणार नाही असे ते म्हणाले. तिथे ते किती तरी काळापासून राहत आहेत. आज आपण त्यांना बाहेर काढून टाकले पाहिजे काय? परंतु असे करता येऊ शकत नाही. जे आधीच निघून गेले आहेत त्यांच्यासंबंधी काय करावे? मी सांगितले आपण त्यांना लगेच परत आणू शकत नाही. पोलिसांच्या आणि सैन्याच्या मदतीने आपण त्यांना नक्कीच परत आणणार नाही. आपण त्यांना तेव्हाच परत आणू जेव्हा तुम्ही आमचे मित्र आहा व तुम्ही तुमच्या घरात परत या असे हिंदू आणि शीख त्यांना आश्वासन देतील. तुम्ही त्या मुसलमानांना असेही सांगितले पाहिजे की तुमच्या संरक्षणाकरिता पोलिसांची वा सैन्याची व्यवस्था करण्याची आवश्यकता नाही, उलट आम्हीच तुमचे पोलीस, तुमचे सैन्य आहो आणि आपण भावाभावाप्रमाणे राहू. आपण जर दिल्लीत असे केले तर तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की पाकिस्तानमधील मार्ग आपल्याकरिता मोकळा असेल. आणि ती नवजीवनाची सुरुवात असेल. मी जेव्हा पाकिस्तानमध्ये जाईन तेव्हा मी त्यांना सोडणार नाही. मी तिथे हिंदू आणि शिखांकरिता मरण पत्करीन. तिथे मरावे लागण्यात मला खरोखर आनंद होईल. इथेही मरण्यात मला आनंद होईल. मला जे इथे करायचे आहे ते मला करता आले नाही तर मला मरावेच लागेल. माझा संतापसुद्धा होतो. मी असे ऐकले आहे की ज्या अनेक स्त्रियांना आपली अब्रू वाचवायची होती त्यांनी मरण पत्करले. अनेक पुरुषांनी त्यांच्या बायकांना मारून टाकले. मला वाटते की ही महान गोष्ट आहे कारण अशाच गोष्टींमुळे भारत शूर ठरतो. अखेरीस जीवन आणि मृत्यू हा क्षणभंगूर खेळ आहे. जे कोणी मेले ते मेले आणि गेले, परंतु निदान ते धैर्याने तरी गेले. त्यांनी आपली अब्रू विकली नाही. असे नाही की त्यांचे त्यांच्या जीवावर प्रेम नव्हते. परंतु त्यांना वाटले की मुसलमानांच्या बळजबरीमुळे धर्मपरिवर्तन करून ईस्लाममध्ये जाण्यापेक्षा आणि त्यांना आपल्या शरिरावर प्राणघातक हल्ला करू देण्याऐवजी धीराने मरण पत्करणे बरे. आणि हीच गोष्ट त्या स्त्रियांचीही आहे. त्या केवळ हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या नव्हत्या, परंतु फार थोड्या होत्या. मी जेव्हा या सर्व गोष्टी ऐकतो तेव्हा भारतात इतक्या शूर स्त्रिया ऐकल्याचे पाहून मी आनंदाने नाचू लागतो. परंतु जे लोक आधीच पळून गेले आहेत त्यांच्याकरिताही जागा आहे. त्यांनी परतायला पाहिजे आणि अब्रूनिशी परतायला पाहिजे. निदान आपल्या बाजूने तरी न्याय व्हायला पाहिजे. आपण आपली अंतःकरणे आणि हात स्वच्छ ठेवू

या. मग आपण सर्व जगासमोर न्यायाची मागणी करू शकतो. मी आधीच सांगितले आहे की ज्या मुसलमानांजवळ शस्त्रे असतील त्यांनी ती सुपूर्द करावी. मी परवाच सांगितल्याप्रमाणे प्रत्येकाने आपली शस्त्रे समर्पित केली पाहिजे  मला वाटते की या प्रक्रियेला थोडा वेळ लागेल, परंतु आता ती सुरू झालेली असल्यामुळे शस्त्रास्त्रे समर्पित केली पाहिजे. आपण आपले संरक्षण शस्त्रांनी करू शकत नाही.

आपल्या पोलीसदलात आणि सैन्यात हिंदू, शीख शिवाय ख्रिश्चन व गुरखा आहेत. ते आपले संरक्षक आहेत असे गृहीत धरले जाते परंतु तेच विध्वंसक झाले आहेत ही माझ्याकडे येणारी दुसरी मोठी तक्रार आहे. हे कितपत खरे आहे हे मला माहीत नाही. परंतु मला स्वतःला पोलिसांना विनंती करायची आहे की त्यांनी योग्य प्रकारे वर्तन करावे. मी असे ऐकले आहे की कॅनॉट प्लेसमध्ये आज काही दंगल झाली. पोलिसांनी लूटपाटीला सुरुवात केली. शक्य आहे की हे वृत्त खोटे असेल. परंतु यात किंचित जरी सत्य असेल तर मी पोलिसांना आणि सैनिकांना सांगेन की ब्रिटिशकालीन दिवस आता संपले. त्या काळात त्यांना हवे तसे ते करू शकत होते. परंतु आता ते भारताचे आहेत. मुसलमानांचे शत्रू असल्याप्रमाणे त्यांनी आता वागू नये. मुसलमानांच्या संरक्षणाचा जेव्हा त्यांना आदेश देण्यात येतो तेव्हा त्यांनी त्यांचे संरक्षण केलेच पाहिजे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३२१-३.

# ११७. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर, १९, १९४७

नवी दिल्ली, सप्टेंबर १९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो.

मला एक चिठ्ठी मिळाली. मी आधी सरदारांकडे गेलो. त्या चिठ्ठीत लिहिण्यात आले होते की हिंदूंना मुसलमानांबरोबर राहावे लागणार असेल तर ते गप्प बसणार नाहीत. हिंदूंना पाकिस्तानमधून पळून यावे लागले. कूचा तारा चांदमध्ये त्यांच्या आजूबाजूला सर्व मुसलमान आहेत आणि हिंदूंना त्यांच्या गोळीबाराने मारले जाण्याची भीती वाटते. यामुळे तेथून सर्व मुसलमान निघून गेले तर बरे होईल असे त्यांना वाटते. त्यांच्यातील अनेक आधीच गेलेले आहेत, परंतु काही थोडेसे लोक मागे राहिलेले आहेत. मी तुम्हाला सांगितले की मी काल जेव्हा त्यांना भेटायला गेलो होतो तेव्हा मी त्यांना याविरुद्ध सांगितले होते. यामुळे जे इथे आहेत त्यांच्या स्थलांतराचा प्रश्नच उपस्थित होत नाही. जे लोक गेलेले आहेत त्यांना परतण्याकरिता मी सांगेन. परतण्याकरिता त्यांच्यांवर ही बळजबरी नाही. आज आपण ज्या पंचायत राजमध्ये राहतो त्यात बळजबरीला कोणतेच स्थान नाही. आपण लोकांची समजूत घातली पाहिजे. आपण मुसलमानांना इतके का घाबरावे? ज्या मुसलमानांबरोबर आपण इतक्या वर्षांपासून राहत होतो ते आता एकाएकी इतके वाईट झाले आहेत काय की त्यांच्याबरोबर आपल्याला इथे एकत्र राहता येणे कठीण व्हावे? ते वाईट होऊ शकत नाहीत असे मला म्हणायचे नाही. परंतु चांगले असणे पुरेसे नसते. आपण शूरसुद्धा असायला पाहिजे आणि आपल्यात सुज्ञपणाही असायला हवा. असे झाले तर आपल्या सहवासाने वाईट लोकही चांगले होतील. हा माझा नियम नाही, जगाचा नियम आहे. काल मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे हे मी माझ्या बालपणापासून शिकलो आहे. आता कोणताही नवीन धडा शिकण्याची माझ्यात क्षमता नाही.आणि अजून मी किती काळ जगणार आहे? तुम्ही मला हे सर्व सांगत आहा परंतु हे मला सहन होत नाही हे मी तुम्हाला सांगेन. असे काही नाही की मी कोणाला तरी मारून टाकेन. हं, हे शक्य आहे की मी स्वतःच मरून जाईन.

मला दुसरी एक चिठ्ठी मिळाली. रस्त्यात कोणी तरी मला ती दिली. ज्या कोणत्या चिठ्ठ्या मला रस्त्यात मिळतात त्या मी गाडीतच वाचायचा प्रयत्न करतो. पश्चिम पंजाबमध्ये इतके अत्याचार होऊनही तुम्ही अजूनसुद्धा भानावर कसे येत नाही असे मला त्या चिठ्ठीत विचारण्यात आले आहे. अजून एक चिठ्ठी आहे. तिच्यावर नाव वा सही नाही. ती मुस्लिम लीगच्या सदस्यांना अनुलक्षून आहे. तिच्यात अनेक घाणेरडे आरोप करण्यात आले आहेत. मुस्लिम लीगचे सदस्य अशा प्रकारचेच वर्तन

करत राहतील तर पाकिस्तान आणि भारताचे काय होईल हे सांगता येणे कठीण आहे. आपणसुद्धा अशा घाणेरड्या साधनांचा उपयोग केला पाहिजे काय? माझ्या मते हे बरोबर नाही.

इथे मुसलमान आजूबाजूला राहतात. काही मुसलमान कार्यकर्त्यांनी इथे राहण्याचे ठरवले आहे. त्यांना मुसलमानांची सेवा करायची आहे. ते म्हणतात की कोणाची इच्छा असेल तर त्याने येऊन आम्हाला मारून टाकावे. ते इथे राहत आहोत कारण ते शूर आहेत. ते माझ्याकडे आले होते. असे मुसलमान फार कमी आहेत. त्यांचे म्हणणे आहे की मोठ्या संख्येत मुसलमान आपले घर सोडून निघून गेले आहेत. असे असले तरी तिथे भरपूर संख्येत मुसलमान असल्याचे मी पाहिले आहे. तिथे फार कमी हिंदू होते. तिथे वाचलेल्या हिंदूंना मी सांगितले की मी माझ्या लहानपणापासून एक गोष्ट शिकलो आहे. राजकारणात शिरण्याआधीच हिंदू आणि मुसलमानांनी एकोप्याने राहिले पाहिजे यावर माझा विश्वास बसला होता. भारताची घडण ही अशी झाली आहे आणि भारताने असेच राहायला पाहिजे. जो माणूस वयाच्या १२व्या वर्षापासून हेच काम करत आहे तो आज कोणतीही वेगळी गोष्ट सांगू शकत नाही. प्रत्येक माणसाने आपल्या ठिकाणी ठामपणे उभे राहावे आणि तिथेच मेलेले मला आवडेल. हीच गोष्ट मी मुसलमानांना आणि हिंदूनाही सांगत असतो.

हिंदू सांगतात की मुसलमानांजवळ शस्त्र आहेत. त्यांनी जर ती समर्पित केली नाही तर नंतर ते मागून कशावरून हल्ला करणार नाहीत? मी हिंदूंना म्हणेन की तुम्ही याची काळजी करायला नको. हे सरकारचे काम आहे. त्याच्याजवळ जर परवाने नसतील ते आत्मरक्षणाकरितासुद्धा शस्त्र ठेवू शकत नाहीत. परंतु ते शस्त्रांनी स्वतःचे रक्षण कसे काय करणारा आहेत? जर तिथे पाच मुसलमान असतील तर हिंदू आणि शीख मिळून पाचशे असतील. तुलना कुठे आहे? हिंदू आणि शीख जरी त्यांची कत्तल करणार असतील तरी त्यांनी इथे राहिले पाहिजे. हे पाच, जर स्वतःला मारू देण्याकरिता तयार होतील आणि शस्त्र न उचलता ईश्वराचे नाव ओठावर असताना या जगातून ते जातील तर ते खरोखरच शूर असतील. हिंदू आणि शीख आमचे भाऊ आहेत आणि त्यांना हवे असेल तर ते आम्हाला मारू शकतात असेच त्यांनी म्हणायला हवे. हाच सल्ला मी सर्वांना देत असतो. आज पाकिस्तानमधून आलेले हिंदू मोठ्या संख्येत मला भेटायला आले होते व त्यांनी त्यांच्या दुःखद कहाण्या मला सांगितल्या. काहींनी आपली हकिगत हसतहसत सांगितली तर काही स्त्रिया रडू लागल्या. मी त्यांना सांगितले आणि तुमच्या माध्यमातून सर्वांना सांगू इच्छितो की आपण भ्याड असू नये. पाकिस्तानमधील मुसलमानांनी अत्याचार केले म्हणून इथल्या मुसलमानांना आपण घाबरण्याचे कारण नाही. आणि आपण त्यांनासुद्धा भीती दाखवू नये. असेही काही मुसलमान आहेत की जे पाकिस्तानमध्ये राहू शकत नाहीत.

असो, मला मिळालेली चिठ्ठी म्हणते की मुसलमानेतर जर पाकिस्तानमध्ये राहणार नाहीत तर मग मुसलमानांनी भारतात का राहावे? परंतु मी म्हणेन की एक माणूस जर काही चुकीचे काम करत असेल तर आपण त्याची नक्कल करू नये व स्वतःही तसे काम करू नये. पाकिस्तान वा इस्लाम याचा अर्थ असा नाही की मुसलमानेतर तिथे राहू शकत नाहीत. मुसलमानी साम्राज्य फार मोठ्या क्षेत्रात पसरले होते. परंतु असे कुठेही म्हटलेले नव्हते की मुसलमानेतर तिथे राहू शकत नाहीत. मुसलमानेतर तिथे राहत होते आणि शांततापूर्वक राहत होते. त्यांच्याजवळ पैसाही होता. आता इस्लाम नवीनच काही गुण घेऊन येत आहे काय? इस्लाम गत तेराशे वर्षांपासून अस्तित्वात आहे. त्याच्याकरिता लोकांनी फार मोठा त्याग आणि बलिदान केला आहे. जर अजून कोणत्या प्रकारच्या इस्लामचा उदय होत असेल तर तो खरा इस्लाम नसेल आणि सर्व मुसलमानांना तो मान्यही नसेल. यावर विचार करा. याचा अर्थ असा आहे की खरा भारत तो असू शकणार नाही ज्यात हिंदूंशिवाय दुसरा कोणीही राहू शकणार नाही. खरा ख्रिश्चन धर्म तो नसेल जो ख्रिश्चनेतरांना आपल्या कवेत घेणार नाही. तो धर्म नसतो तर अधर्म असतो. जग या मार्गाचे अनुसरण करत नसते, सध्याही करत नाही आणि भविष्यातही करणार नाही. मग आपण नवीन इतिहास लिहिण्याचा प्रयत्न का करायचा? आपण भारताचा विनाश करू नये आणि पाकिस्तानचा विनाश होऊ देऊ नये. भारतात साडेचार कोटी मुसलमान आहेत. ते सर्व कुठे जाणार आहेत? आणि त्यांनी स्वतःबरोबर जामा मशीद, अलिगढ विद्यापीठ आणि मुसलमानांच्या त्या सर्व कबरी पाकिस्तानमध्ये न्याव्या काय? आणि पश्चिम पंजाबमधील सर्व गुरुद्वारा पूर्व पंजाबमध्ये आणावे काय? याचा अर्थ होईल प्रत्येकाने स्वतःचा विनाश करावा आणि धर्माचा विध्वंस करावा. याचा साक्षीदार होण्याची माझी इच्छा नाही. यापूर्वीच ईश्वराने मला घेऊन जावे. आणि मी म्हणेक की सर्व तरुणांनी आपले कर्तव्य करत मरण पत्करावे. जोपर्यंत तुम्ही जिवंत आहा तोपर्यंत भारताचा विनाश होऊ देऊ नका. मला देशाचा विनाश झालेला पाहण्याची इच्छा नाही. असे होणार नसेल तर देशातील वाईटपण घालवण्याच्या प्रयत्नात आपण मरण पावलो पाहिजे अशी माझी इच्छा आहे.

प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३२४-७

# ११८. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर २०, १९४७

नवी दिल्ली,

सप्टेंबर २०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

तुम्ही ईश्वराची प्रार्थना केली पाहिजे व त्याच्यावर श्रद्धा ठेवली पाहिजे. याबद्दल प्रत्येकाला विश्वास नाही. लोक विचारतात - 'देव कुठे आहे? देव जर आहे तर जगात इतके दुःख का असावे?' मुसलमान जर संकटात असले तर ते अल्ला आणि कुराणच्या सत्याबद्दल प्रश्न करतात. अनेक लोक या शब्दांत बोलतात, परंतु ते सर्व चूक आहेत. ही वेळ खुदा, अल्ला, ईश्वर आणि राम यांना स्मरण करण्याची आहे. न चुकता तो आपल्याला मदत करतो. आपण त्याला ओळखतो की नाही हे तो आपल्याला नक्कीच विचारत नसतो. आपण त्याला हातात धरू शकत नाही आणि डोळयांनी पाहू शकत नाही वा कानांनी ऐकू शकत नाही. यामुळेच म्हणतात की तो आपल्या भौतिक इंद्रियांच्या पलीकडे आहे. तो सत्य आहे बाकी सगळे मिथ्या. आपण सर्व मिथ्या आहो. आपण जिवंत असताना आपण मिथ्या कसे असे आपण विचारू शकतो. आज मी जिवंत आहे. परंतु उद्या मी जिवंत राहीन की नाही हे मला कोणीही सांगू शकत नाही. अशा प्रकारे मी ७८ वर्षे जगलो आहे आणि उद्याकडे आश्चर्याने पाहतो आहे. मी अजून कदाचित काही दिवस जगेन वा मी अजून एखाद वर्ष जगेन. परंतु आपल्याला हे कसे कळेल, परंतु जो माणूस आता जिवंत आहे तो पुढील मिनिटातही जिवंत राहील हे आपण कसे सांगू शकतो? हे कोणीही सांगू शकत नाही म्हणूनच मी म्हणतो की आपण सर्व असत्य आहो आणि येत्या क्षणात आपले काय होणार आहे याबद्दल आपण खात्रीपूर्वक काहीही सांगू शकत नाही. आपण अमर होऊ शकत नाही. तोच केवळ सत्य आहे. हस्ती हा शब्द अस्तीपासून व्युत्पन्न झाला आहे. अस्तीचा अर्थ आहे 'असणे'. ते होते, ते आहे आणि ते चिरंतन असेल. जे चिरंतन असते ते हे सत्य (ईश्वर), त्याने आपल्याला निर्मिले आहे आणि तो आपल्याला नष्टही करू शकतो म्हणजे या जगापासून आपल्याला दूर नेऊ शकतो. माझ्या दृष्टिकोनातून तो आपल्याला कधीही नष्ट करत नाही, तो केवळ आपल्याला मदत करतो. त्याचा साक्षात्कार होऊ शकत नाही असा जर आज आपल्याला संशय आला व म्हणून आपला संताप झाला तर तो मुर्खपणा असेल. परंतु तो आहे आणि सर्व काही करण्याची त्याच्यात क्षमता आहे. तो रहीम (दयाळू) आहे व त्याच्या नजरेत सर्व समान आहेत. तो कोणालाही दुखवू शकत नाही. ना तो मारू शकतो ना शाप देऊ शकतो. हा त्याचा नियम आहे.

मुसलमानही माझ्याकडे येतात. ते मला आपल्या दुरावस्था सांगतात. ते म्हणतात की आम्ही दिल्लीत राहतो परंतु आता तसे करणे शक्य होईल असे वाटत नाही. मी त्यांना सांगत असतो की मी जिवंत असेपर्यंत तरी तुम्ही राहा. खिलाफतीच्या दिवसात हिंदू, मुसलमान, शीख हे सर्व एकत्र राहायचे. मुसलमानांना सोबत घेऊन मी गुरुद्वारांमध्ये गेलो आहे. त्या नानकाना प्रकरणाच्या प्रसंगी (पाहा श्री येथील शीख परिषदेतील भाषण, फेब्रुवारी २, १९२१ आणि नानकाना साहेब येथे भाषण, मार्च ३, १९२१) मौलाना साहेब आणि अलीबंधू माझ्याबरोबर होते. हिंदू, मुसलमान, शीख असे कोणीही असो सर्वांमध्ये बंधुत्वाची भावना होती. जालियनवाला बागमध्ये काय घडले? घसा फोडूनफोडून लोक सांगत होते की इथे सर्व समुदायांचे रक्त एक झाले आहे. त्यांना कोण वेगळे करील? मग आज ते कसे वेगळे झाले? मी खरोखरच गोंधळलो आहे. या तिन्ही समुदायांचे रक्त एक आहे असा विश्वास असल्यामुळेच मी आज इथे अजून जिवंत आहे. हे सिद्ध करण्याकरिता शक्य ते सर्व करण्याचा मी प्रयत्न करीन. हे व्हावे म्हणून मी ईश्वरासमोर आक्रंदन करीन व त्याच्यासमोर अश्रू ढाळेन. मी माणसासमोर अश्रू ढाळत नसतो परंतु ईश्वरासमोर मी असे करू शकतो. मी त्याला विनवू शकतो कारण मी त्याचा गुलाम आहे. असे झाले की माणसाला इतर कोणाचाही गुलाम होण्याची गरज राहत नाही. मला जर हे करता येणार असेल तरच मला जिवंत राहण्याची इच्छा आहे. असे नसेल तर ईश्वराने मला घेऊन जावे.

हिंदू, शीख, आणि मुसलमान जे आताआतापर्यंत परस्परांकडे भाऊभाऊ म्हणून पाहत होते. ते आता शत्रू झाले यामुळे माझी मान लाजेने खाली होते, मला लाज वाटते. निदान काही लोकांनी पुढे यावे आणि सांगावे की आम्ही शत्रू असू शकत नाही. माझ्याकडे आलेल्या चार की पाच लोकांनी मला सांगितले की वेळ आली की साडेचार कोटी मुसलमान देशद्रोही होतील कारण काहीही झाले तरी ते मुसलमान आहेत आणि पाकिस्तानमध्येही मुसलमान आहेत. कल्पना करा की भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्ध झाले व अशीच काही परिस्थिती निर्माण झाली तर अशा परिस्थितीत ते पाकिस्तानला मदत करणार नाहीत काय? मी या लोकांना सांगितले की काही मुसलमान पाकिस्तानला निश्चितच मदत करू शकतात परंतु सर्व असे करणार नाहीत. मी या लोकांना सांगितले की तुम्ही जर चांगले राहिलात तर तेही चांगले राहतील. इथे उपस्थित असलेले मोठ्या संख्येतील सर्व हिंदू आणि सर्व शीख चांगले राहिले व एकाही मुसलमानाला तुम्ही शत्रू मानले नाही तर मी मोठ्या आवाजात ठणकावून सांगेन की या साडेचार कोटी मुसलमानांमधील कोणीही विश्वासघात करणार नाही. आपण शूर असलो पाहिजे. बहुसंख्य असताना आपण भ्याड असू नये. भारतात साडेचार कोटी मुसलमान आहेत परंतु देशाची एकूण लोकसंख्या ४० कोटी आहे. आपण इतके भ्याड असायला पाहिजे काय की साडेचार कोटी मुसलमानांना आपण घाबरावे? मी म्हणेन की ते साडेचार कोटी

मुसलमान देशाचा विश्वासघात करतील तर ते इस्लामचा विश्वासघात करतील व इस्लामचा विनाश करतील. परंतु आपणही तसेच वर्तन करू लागलो आणि भित्रे व विश्वासघातकी झालो व त्यांच्यावर मुळीच विश्वास ठेवला नाही आणि एकाही मुसलमानाला इथे राहू दिले नाही तर एकट्या हिंदू समाजाला इथे एक घासही खाता येणार नाही हे मी तुम्हाला सांगून ठेवतो. अन्न विषमय होऊन जाईल.

भारतावर जर भारताबाहेरील मुसलमानांनी वा एखाद्या सत्तेने वा पाकिस्तानने आक्रमण केले तर मी म्हणेन की भारतातील या साडेचार कोटी मुसलमानांना भारताशी निष्ठा ठेवावीच लागेल. कायदा सांगतो की त्यांच्यात जर राष्ट्रनिष्ठा नसेल तर त्यांना फासावर चढवले जाईल. असे असले तरी माझा कायदा मात्र वेगळा आहे. मी तुम्हाला स्पष्ट करून सांगितले आहे. परंतु तो कोण मान्य करणार आहे? जगाच्या नियमाप्रमाणे देशद्रोही, पंचमस्तंभी, देशातील अधिकृत शासन उलथून पाडण्याचा प्रयत्न करणारे यांच्याकरिता मृत्यूदंडाचीच शिक्षा आहे. आपल्या देशासारख्या विशाल देशात सर्व साडेचार कोटी मुसलमान देशद्रोही असू शकत नाहीत. या सर्वच्या सर्व साडेचार कोटी मुसलमानांना कोणी पाहिले आहे? ते आपल्या ७ लाख खेड्यात आहेत. फार थोडे शहरात आहेत. ते उत्तर प्रदेश, बिहारमधील खेड्यांमध्ये विखुरलेले आहेत. मी खेड्यात राहिलेलो आहे आणि मी त्या सर्वांना ओळखतो. ते कधीही देशद्रोही असू शकत नाहीत. सेवाग्राममध्येसुद्धा मुसलमान आहेत. ते तिथे काम करतात. ते सेवाग्रामशी निष्ठावंत असतील. त्याच्याकरिता ते आपला जीव देतील. इतर ठिकाणचे मुसलमान काय करताहेत हे त्यांना कसे कळणार आहे? आणि देशद्रोह्यांना आपण का घाबरावे? मला त्यांची भीती वाटत नाही. भारतात राहूनही ते जर देशद्रोही होणार असतील तर मी म्हणेन की त्यांना मरण्याची आणि इस्लामचा नाश करण्याची उत्कंठा लागली आहे.

खरे काफिर ते असतात जे आपली भाकरी खातात, आपल्या घरात काम करतात परंतु शत्रूप्रमाणे वागून आपलेच गळे कापतात. असे हिंदूसुद्धा आहेत आणि शीख व मुसलमानसुद्धा आहेत. या जगात सर्व प्रकारचे लोक असतात. परंतु इथे राहणारे सर्व साडेचार कोटी मुसलमान देशद्रोही होतील असे मानणे हा भ्याडपणा आहे. यावरून असे दिसते की आपण खरे हिंदूही नाही आणि खरे शीखही नाही. मुसलमानांना जाऊ नये असे सांगण्यात आपला चांगुलपणा, आपल्या सर्व अधिकाऱ्यांचा चांगुलपणा, हिंदू आणि शिखांचा चांगुलपणा आणि साहस आहे. तुमच्या केसालासुद्धा कोणी धक्का लावणार नाही असे आपण त्यांना समजावू सांगून त्यांची खात्री पटवली पाहिजे. आमचे गैरवर्तन विसरा आणि यापुढे अशा गैरवर्तनाची पुनरवृत्ती होणार नाही असे आपण त्यांना सांगितले पाहिजे. तुम्ही का जाऊ इच्छिता आणि पाकिस्तानमध्ये काय होईल हे आपल्याला

माहीत आहे काय असे आपण त्यांना विचारले पाहिजे. तुमचे घर आणि सर्व काही इथे आहे याची आपण त्यांना आठण करून दिली पाहिजे. अशा प्रकारच्या जिव्हाळयाने आपण जर त्यांना इथे ठेवून घेऊ शकलो तर सरहद्द प्रांतातील आणि डेरा इस्माईल खान येथील आफ्रिदी मुसलमान आपल्या लोकांना सांगतील की तुम्ही येथून पळून जाऊ नका. चांगुलपणाच्या वर्तनाचा हा असा परिणाम असतो. तुम्ही जर दिल्लीत शांतता टिकवली, आणि असे तुम्ही भीतीमुळे नाही वा गांधी म्हणतो म्हणून नाही तर तुम्हाला असे अंतःकरणापासून करावेसे वाटले तर मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो की एकही मुसलमान तुम्हाला इजा पोहोचवणार नाही. आणि जर तो असे करील तर आपणा सर्वांवर ईश्वर आहे. तो सर्व शक्तिमान आहे व प्रत्येकजण त्याला उत्तरदायी आहे. तो आपले रक्षण करील आणि याबद्दल माझ्या मनात मुळीच संशय नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन -१, पृष्ठ ३२७-३१

# ११९. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर २१, १९४७

नवी दिल्ली,

सप्टेंबर २१, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

हिंदू, शीख आणि मुसलमान ज्या पद्धतीने सध्या राहत आहेत त्या पद्धतीने राहू शकत नाहीत. या गोष्टीमुळे मला अतिशय वेदना होतात आणि ही परिस्थिती बदलवण्याकरिता मानवी प्रयत्नांनी जे काही शक्य असेल ते मी करीन. मला अंतःकरणापासून जे करावेसे वाटते ते मी जर करू शकलो नाही तर मला जिवंत राहण्यात कोणताही आनंद वाटणार नाही. (एका माणसाने प्रार्थनेत अल फतेहा म्हणण्यावर आक्षेप घेतल्यामुळे बिर्लाभवनच्या हिरवळीवर प्रार्थना करता आली नाही. असे असले तरी गांधीजी श्रोत्यांना संबोधत म्हणाले की आक्षेप घेणाराशी मी चर्चा करणार आहे. सप्टेंबर २२, १९४७च्या हिंदुस्तान टाईम्सप्रमाणे सभेनंतर गांधीजींनी आपल्या खोलीत प्रार्थना केली.) ईश्वराने माझ्या हातून हे काम काढून घेतले तर फारच चांगले होईल. परंतु जर असे घडणार नसेल तर माझे काम संपले असे मी समजेन. याचा अर्थ असा नाही की मी आत्महत्या करून मरणार आहे. हे खरे आहे की जे इतरांची सेवा करण्यात आपले जीवन व्यतीत करू इच्छितात त्यांच्याकरिता इतर कोणतीही कसोटी नसते. आपल्या प्रयत्नांना फळ येत नसेल तर आपण अस्वस्थ होऊ नये. परंतु आपल्या प्रयत्नांना फळ येत नसतील तर एखाद्या वृक्षाला फळ येणे बंद झाले की ते जसे वाळून जाते तसे माणसाने वाळून जायला पाहिजे. हा निसर्गनियम आहे. हिंदू तत्त्वज्ञानाप्रमाणे आत्मा अमर असतो. तो मरत नाही. ज्या शरिराचे कार्य संपलेले असते त्याचा काही उपयोग नसतो आणि त्याने नष्ट झाले पाहिजे. त्याची जागा नवीन देह घेतो. परंतु आत्मा अमर असतो आणि सेवेद्वारा मुक्ती मिळवण्याकरिता तो सतत जड रूप धारण करत असतो.

आज मी अशा ठिकाणी गेलो होतो की जिथे एका बाजूला मोठ्या संख्यत हिंदू राहत होते आणि दुसऱ्या बाजूला मोठ्या संख्येत मुसलमान. त्यांनी "महात्मा गांधी जिंदाबाद" अशा घोषणा दिल्या. त्याचा काय अर्थ आहे? हिंदू आणि मुसलमान मनाने एक नसतील व शांततेत एकत्र राहू शकत नसतील तर त्याचा काय उपयोग आहे? यामुळे मला त्या घोषणा काहीशा कठोर वाटल्या. तुम्ही इतके घाबरण्याचे कारण काय असे मी त्या मुसलमानांना विचारले. अखेरीस आपल्याला मरायचे आहे आणि आपण मरणारही आहो. आपल्याला जर मारून टाकण्यात आले तर तसे इतर

कोणी केलेले नसेल, आपल्या स्वतःच्याच भावाने केलेले असेल. तुम्ही हिंदूंबद्दल मनात राग ठेवू नये आणि त्यांना मारण्याचा प्रयत्न करू नये असे मी मुसलमानांना आवाहन केले. मी म्हणालो की तुम्ही कदाचित मराल परंतु घाबरून तुम्ही तुमच्या ठिकाणावरून पळून जाऊ नये. परंतु महात्मा वाईट माणूस आहे आणि ज्या घरांमधून मुसलमानांना घालवण्यात आले होते त्या घरात ते त्यांना परत आणू पाहतात असेही ते म्हणत होते. हे खरे आहे की मी त्यांना परत आणू इच्छितो. परंतु मी त्यांना कशा प्रकारे परत आणू इच्छितो? ज्यांना स्वतःहोऊन पाकिस्तानमध्ये जायचे असेल त्यांना कोणत्याही प्रकारे अडवण्यात येऊ नये. परंतु ते जर घाबरल्यामुळे जाणार असतील, सरकार आपले संरक्षण करू शकत नाही असे वाटल्यामुळे जाणार असतील वा हिंदू आणि शीख आपल्याला काहीही झाले तरी वाचवणार नाहीत असे वाटल्यामुळे ते गेले तर मला वेदना होतील. जे लोक पाकिस्तानमध्ये जाऊ इच्छित नाहीत व ज्याना इथेच राहायचे आहे त्यांना मी म्हणेन की त्यांनी येथून जाऊ नये. मी त्यांना सांगितले की जे लोक येथून गेलेले आहेत त्यांनी तेव्हाच परत यावे जेव्हा हिंदू आणि शीख त्यांना तसे करण्याकरिता आनंदाने परवानगी देतील. पोलीस आणि सैन्य यांच्या मदतीने त्यांना परत आणण्याची कल्पना मला सहन होत नाही. मी त्यांना सांगतो की पोलीस आणि सैन्याच्या मदतीची कल्पना मनातून कढून टाका. आपल्याला जे करावेसे वाटते ते आपण स्वतः करू. आपल्या नशिबी मरण असेल तर आपण मरू. परंतु एखाद्या माणसाने समंजसपणा टाकून दिला आणि लोकांना मारण्याच्या तो हट्टाला पेटला तर मीसुद्धा माझी शुद्धबुद्ध का हरवावी? मी त्याच्या हाताने मरणे पसंत करेन. मी सरकारतर्फे बोलत नाही आहे. सरकार माझ्या हातात नाही. माझी घडण कशा प्रकारे झाली हे तुम्हाला माहीत आहे. जर कोणी वेडाच्या भरात अपकृत्यातून आनंद मिळवू लागला तरी मी तसे करू शकत नाही. चांगले कसे व्हावे हे नंतर तो माणूस माझ्याकडून शिकेल. भारतात हिंदू आणि मुसलमान मिळून ४० कोटी लोक आहेत. काही लाख मुसलमान पाकिस्तानमध्ये गेले आहेत. परंतु अजूनही भारतात साडेचार कोटी मुसलमान आहेत. बाकीचे सर्व हिंदू आहेत. पारसी, ख्रिश्चन आणि ज्यू तुरळक संख्येत आहेत. परंतु त्यांची संख्या मुश्किलीने लक्षात घेण्याइतकी आहे. अशा प्रकारे आपसात भाडून त्यांना नष्ट व्हायचे असेल तर होऊ द्या. परंतु पोलीस आणि सैन्याच्या मदतीने जर कुणाला जगावे लागणार असेल तर ते जीवन जगण्यायोग्य नक्कीच नसते. हिंदू आणि मुसलमान अशा प्रकारे आपसात भांडणार असतील तर सरकार काय करू शकेल? आम्ही अशाच प्रकारे शासन करू शकतो वा ते नको असेल तर आमची राजीनामा देण्याची तयारी आहे असे सरकारला घोषित करू द्या. पाकिस्तानमध्ये केवळ मुसलमान आहेत म्हणून भारतात केवळ हिंदू राहावे असे ज्यांना वाटते त्यांना सरकार स्थापित करू द्या. पाकिस्तानमधील लोक वेडाच्या भरात काम करत आहेत म्हणून आपणही तसेच व्हावे काय? आपली इच्छा असेल तर आपण असे करू शकतो. समजा की

एक मित्र आहे आणि त्याला मी शिव्या देतो. प्रत्युत्तर म्हणून तो मला त्याहून जास्त शिव्या देतो. हे ठीक आहे. परंतु मी त्याच्या शिव्या शांतपणे ऐकून घेतल्या तर तो किती वेळ मला शिव्या देत राहील? त्याने मला जर मारले तर तेही मी सहन करीन. त्याने उगारलेल्या हाताच्या विरोधात मी हात उगारणार नाही. अशा परिस्थितीत काय होईल हे तुम्हाला माहीत आहे काय? मी पाहिले आहे की माणसाने हवेत आपला हात उगारला तर त्याच्या स्वतःच्याच हाताला इजा होते. इतकेच नाही तर मुष्टियोद्धासुद्धा चोथा भरलेल्या मोठ्या उशीवर प्रहार करून आपला सराव करतो. परंतु तो मुष्टियोद्धा आपल्यासमोर एखादी मूर्त गोष्ट ठेवणार नसेल तर तो असहाय होतो व काहीही करू शकत नाही. मी जे तुम्हाला सांगितले ते त्रिवार सत्य आहे. परंतु मीच एकटा खंबीरपणे त्याला चिकटून आहे. आजकाल लोक या मार्गाचे अनुसरण करत नाहीत. या सत्यावर खंबीरपणे उभे राहण्याची माझ्यात क्षमता असेल की नाही हे केवळ ईश्वरालाच माहीत. आज मी अगदी साधा मुद्दा मांडत आहे. जे मुसलमान घर सोडून गेले आहेत ते आता जिथे असतील तिथेच त्यांनी राहावे, परंतु त्यांना खाऊ घालावे लागेल. त्यांची उपासमार करून आता तुम्ही पाकिस्तानमध्ये जा असे आपण त्यांना म्हणू शकत नाही. असे करून आपण युद्धाकरिता पार्श्वभूमी तयार करतो. कॉंग्रेस सरकार खरोखरी देशाच्या सेवेकरिता आहे, पैशाकरिता नाही आणि सत्तेकरिताही नाही. ते एका वा दोन समुदायांकरिता नाही तर सर्व समुदायांकरिता आहे. लोक जर संतापलेले असतील व या सरकारच्या सेवेने त्यांचे समाधान नसल्यामुळे या सरकारला आपली सेवा करू देत नसतील तर त्यांनी राजीनामा दिला पाहिजे आणि मग ज्यांना भारतात केवळ हिंदूच पाहिजे त्यांचे सरकार स्थापन होऊ दिले पाहिजे. परंतु यामुळे हिंदू धर्म आणि हिंदुस्तान या दोघांचाही विनाश होईल. आपण पाकिस्तानला विसरू या. त्याला जे करायचे असेल ते करू द्या. भारताबद्दल आपण विचार करू या. असे झाले तर संपूर्ण जग आपले कौतुक करील व आपली साथ देईल. असे झाले नाही तर आजपर्यंत जे जग आपल्याकडे आशेने पाहत होते ते दुर्लक्ष करू लागेल. जगातील देश भारताला असा महान देश समजत होते की जिथे भ्रष्टाचार न करणारे सुसंकृत लोक राहतात. ती श्रद्धा आता नाहीशी होईल. तुम्हाला हवे तसे तुम्ही वागू शकता. परंतु अशा वर्तनामुळे कोणाचेही भले होणार नाही असे मी जिवंत असेपर्यंत तुम्हाला सांगत राहीन आणि तुम्हाला सावध करत राहीन.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन -१, पृष्ठ ३३१-४

# १२०. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर २२, १९४७

(गांधीजींचा मौनवार असल्यामुळे त्यांचे हिंदुस्तानीतील लेखी भाषण सभेत वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

सप्टेंबर २२, १९४७

एका माणसाच्या आक्षेपासमोर शरणागती पत्करून सार्वजनिक प्रार्थना करणे मी थांबवले हे मी योग्यच केले असे मला वाटत होते. (मागील दिवशी घडलेल्या घटनेविषयी गांधीजी बोलत होते. पाहा प्रार्थाना प्रवचन, सप्टेंबर २१, १९४७ ची पहिली टीप - एका माणसाने प्रार्थनेत अल फतेहा म्हणण्यावर आक्षेप घेतल्यामुळे  बिर्लाभवनच्या हिरवळीवर प्रार्थना करता आली नाही. असे असले तरी गांधीजी श्रोत्यांना संबोधत म्हणाले की आक्षेप घेणाराशी मी बोलणार आहे. सप्टेंबर २२, १९४७च्या हिंदुस्तान टाईम्सप्रमाणे सभेनंतर गांधीजींनी आपल्या खोलीत प्रार्थना केली.) या प्रसंगाचे या ठिकाणी थोडे अधिक विश्लेषण करणे चूक ठरणार नाही. ही प्रार्थना सार्वजनिक होती याचा अर्थ या प्रार्थनेत येण्याकरिता कोणालाही मनाई नव्हती. ती खाजगी जागेत होती. त्या प्रार्थनेला त्याच लोकांनी येणे उचित होते ज्यांचा कुराणमधील आयतींसह केल्या जाणाऱ्या प्रार्थनेवर अंतःकरणापासून विश्वास होता. खरे म्हणजे सार्वजनिक ठिकाणी घेतलेल्या प्रार्थनेला उपस्थित राहणारांकरितासुद्धा हा नियम लागू होतो. प्रार्थना सभा म्हणजे काही वादविवाद मंडळ नाही. एकाच जागेवर विविध धर्माचे लोक प्रार्थना करत आहेत अशी कल्पना करता येऊ शकते.ज्याला एखादी प्रार्थना पसंत नसेल त्याने तेथून निघून जावे यात सौजन्य आहे. असे केले नाही तर कोणतीही सभा व्यत्ययाशिवाय घेणे कठीण होऊन जाईल. व्यत्यय ही दैनंदिन बाब झाली तर आराधनास्वातंत्र्य, इतकेच नाही तर जाहीर भाषण या गोष्टी थट्टेचा विषय होऊन जातील. सुसंस्कृत समाजात मुलभूत अधिकाराच्या रक्षणाकरिता बंदुकीच्या संरक्षणाची गरज पडू नये. ही गोष्ट सर्वांनी मान्य केली पाहिजे.

कॉंग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात प्रदर्शनाकरिता जे मैदान तयार करण्यात येत असते तिथे विविध धर्माचे आणि राजकीय पक्षांचे लोक आपापल्या सभा घेत असतात व त्यांत वेगवेगळी आणि काही वेळा तर विरोधी मते व्यक्त करत असतात. परंतु असे होत असतानाही कोणत्याही प्रकारचा उपद्रव न होता व पोलिसांच्या संरक्षणाची आवश्यकता न पडता त्या सभा होत असताना पाहून मी अतिशय आनंदित होत असे. ती निरोगी सहनशीलता आता कुठे गेली?  की आपल्याला राजकीय

स्वातंत्र्य मिळाल्यामुळे आपण त्याची परीक्षा शिवीगाळ करून पाहतो आहोत. त्यांनी मूलभूत नियम तोडले आहेत व लोकांना निषेध करण्याकरिता उत्तेजित केले आहे. राष्ट्राच्या जीवनात ही तात्कालिक अवस्था आहे अशी आशा आपण करू या. हे सर्व मुस्लिम लीगच्या गैरवर्तनामुळे आहे असे जे मला अनेकदा सांगितले जाते तसे सांगू नका.

हे म्हणणे खरे आहे असे गृहीत धरले तरी आपली सहनशीलता इतक्या कच्च्या पायावर उभी आहे काय की तिला थोडीशीही वेगळी गोष्ट सहन होऊ नये? शालीनता आणि सहनशीलता यांना जर काही किंमत असेल तर त्यांना कठिणात कठीण कसोटीतून पार पडता आले पाहिजे. असे जर शक्य नसेल तर भारताकरिता तो दुर्दैवी दिवस असेल. आपण स्वातंत्र्याकरिता पात्र नाही असे आपल्या टीकाकारांना, आणि ते कमी नाहीत, म्हणण्याची संधी देऊ नका. अशा प्रकारच्या टीकारांना उत्तर देण्याकरिता माझ्या मनात अनेक युक्तिवाद आले. परंतु त्यामुळे माझे क्वचितच समाधान झाले असेल. त्यामुळे भारतावर प्रेम करणारा म्हणून माझ्या अहंकाराला धक्का लागला, आमच्या लक्षावधी सहनशील लोकांच्या एकीकृत संस्कृतीला धक्का लागला हे आपोआपच सिद्ध होते.

जर भारताला अपयश आले तर आशिया मरेल. विविध संस्कृतीच्या संमिश्रणाची तो रोपवाटिका आहे असे जे त्याला अनुलक्षून म्हणतात ते सार्थच आहे. जगातील पिळवणूक होणाऱ्या सर्व राष्ट्रांच्या आशेचे, मग ते आशिया, आफ्रिका वा जगातील कोणत्याही भागातील असो, भारत केंद्रस्थान असायला पाहिजे.

याच गोष्टीमुळे लपवलेल्या विनापरवाना हत्यारांची समस्या मला भेडसावू लागते. काहींचा निश्चितपणे शोध लागला आहे. काही थेंबाथंबासारखे मला सोपवली जात आहेत. सर्व प्रकारच्या साधनांनी आपण ती शोधून काढू या. जोपर्यंत मला माहीत आहे आतापर्यंत बाहेर आलेली शस्त्रे दिल्लीच्या मानाने काहीही नाहीत. ब्रिटिशांच्या राज्यात लोक लपवलेली शस्त्रे ठेवत होते. तेव्हा त्यांची कोणीही काळजी करत नव्हता. एखाद्या विशेष ठिकाणी शस्त्रसाठा वा दारुगोळा लपवलेला आहे अशी तुमची खात्री झालेली असेल तर त्याचा सर्व साधनांनिशी शोध घेण्यात यावा. अशा वेळी कोणी कितीही आरडाओरड केली तर त्याची काळजी करण्याचे कारण नाही. आपण जर राजकीय दृष्टीने स्वतंत्र असू तर आपण ब्रिटिशांकरिता एक नियम आणि आपल्याकरिता वेगळा नियम लावू नये. कुत्र्याला मारायचे आहे म्हणून त्याला वेड लागले असे म्हणू नये. हे सर्व सांगितल्यानंतर मी म्हणेन की साठ वर्षांच्या मेहनतीनंतर आपण जे स्वातंत्र्य मिळवले त्याला पात्र होण्याकरिता आपण आपल्यासमोर कितीही कठीण अडचणी असल्या तरी त्यांना शौर्याने तोंड देऊ या. त्यांना धैर्याने तोंड दिल्यामुळे आपण अधिक पात्र आणि उदात्त ठरू. अल्पसंख्याक देशद्रोही होतील या भीतीने

बहुसंख्याकांनी अल्पसंख्याकांना मारणे वा त्यांना नष्ट करणे हा भ्याडपणा आहे. अल्पसंख्याकांच्या हक्काबद्दल बहुसंख्याकांनी काटेकोरपणे लक्ष ठेवणे हे त्यांना शोभते. आणि त्याकडे दुर्लक्ष केले तर बहुसंख्य समाज हास्यास्पद होतो. स्वतःबद्दल कणखर श्रद्धा व विरोधकावर शौर्याने तथाकथित वा खरा विश्वास टाकणे हे सर्वोत्तम संरक्षण आहे. यामुळे मी विनंती करतो की दिल्लीतील सर्व हिंदू, शीख, आणि मुसलमानांनी एकत्र येऊन मैत्रीपूर्ण वातावरणात भेटावे आणि असे करून त्यांनी उर्वरित भारतासमोर वा जगासमोर एक आदर्श ठेवावा असे मी म्हणू शकेन काय? भारतातील इतर भागांनी काय केले वा ते काय करताहेत हे दिल्लीने विसरावे. असे झाले तरच खाजगी बदला आणि सूड यांचे दुष्टचक्र तोडण्याचा दावा दिल्ली अभिमानाने करू शकेल. जर त्यांचा कुणाशी संबंध असेल तर तो राज्याशी आहे, एक व्यक्ती म्हणून त्यांचा नागरीकांशी संबंध नाही.

हरिजन, ऑक्टोबर ५, १९४७

# १२१. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर २३, १९४७

नवी दिल्ली,

सप्टेंबर २३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

असे म्हणतात की प्रार्थना ही काही साधी गोष्ट नाही. ती काही तरी उदात्त गोष्ट आहे. आपल्या आयुष्यात आपण किती तरी गोष्टी बोलत असतो, २४ तासात आपण बरेच काही बोलत असतो. आपण अपराध करतो व वेड्याप्रमाणे पैशामागे धावत असतो. यामुळे आपण काही तरी प्रार्थना करू या. आपण सर्व जर एकत्रितपणे प्रार्थना करू शकलो तर ती महान गोष्ट होईल. ईश्वर एक आहे या भावनेने ४० कोटी लोकांनी त्यांच्या स्वतःच्या भाषेत जर प्रार्थना केली तर ती फार मोठी गोष्ट होईल. आणि मग त्या प्रार्थनेत काही कडवे कुराणातील आहेत की काय याची आपण फिकीर करणार नाही. जे लोक कुराणमधील आयती म्हणण्यावर आक्षेप घेतात ते तसे रागात करतात. (सप्टेंबर २४, १९४७च्या हिंदुस्तान टाईम्सप्रमाणे प्रार्थना सुरू करण्यापूर्वी कुणाला कुराणातील आयती म्हणण्यावर आक्षेप आहे काय असे गांधीजींनी श्रोत्यांना विचारले. कोणाचाही आक्षेप नव्हता.) परंतु मुसलमान हिंदूंना आणि शिखांना त्रास देत असल्यामुळे व त्यांची हत्या करत असल्यामुळे आपण कुराणवर राग काढावा काय? मुसलमानांनी जे केले ते चांगले नाही परंतु कुराणने आपले काय बिघडवले? ईश्वराचा एक भक्त पाप करत असेल तर आपण त्याचा जप करणे बंद करावे काय? ईश्वर एक आहे. हिंदू वाईट आहेत असे जर जर ईश्वरभक्त म्हणत असतील तर त्याचा अर्थ गीता वाईट आहे असा होतो काय? शिखांनी जर काही वाईट गोष्ट केली असेल तर आपण ग्रंथ साहेब वाचणे बंद करणार काय? शिखांना जर वेड लागले तर हिंदू, मुसलमान आणि पारसीही वेड्याप्रमाणे करणार काय? धर्म व धर्माच्या नावावर केलेले सर्व प्रकारचे बलिदान हे चिरंतन राहतील. रावळपिंडीहून माझ्याकडे आलेले काही लोक मजबूत, धडधाकट आणि शूर होते व ते फार मोठे व्यावसायिक होते. रावळपिंडीची उभारणी शीख आणि हिंदू यांनी केली आहे. हीच गोष्ट लाहोरसंबंधीही आहे. आणि संपूर्ण पाकिस्तान मुसलमानांनी उभारले आहे काय? आज जो काही पाकिस्तान आहे तो सर्वांनी मिळून उभारला आहे, कोणा एका समुदायाने नाही. भारत हिंदूंनी उभारला आहे कारण इथे इतक्या मोठ्यासंख्येत हिंदू राहतात असे म्हणणे योग्य होणार नाही. त्याची उभारणी हिंदू, मुसलमान, शीख, पारसी आणि ख्रिश्चन या सर्वांनी केली आहे. आज जो भारत आहे त्याच्या उभारणीत या सर्वांचा हातभार लागला आहे. मी या मित्रांना सांगितले की तुम्ही शांत राहा आणि अखेरीस प्रत्येक गोष्टीची काळजी घेण्याकरिता ईश्वर

आहेच. असे एकही ठिकाण नाही की जिथे ईश्वर नाही. ईश्वराची प्रार्थना करा, त्याच्या नावाचा जप करा आणि मग सर्व काही ठीक होईल. पाकिस्तानमध्ये जे आहेत त्यांचे आम्ही काय करावे असे ते मला विचारतात. उलट मी त्यांना विचारतो की तिथे जिव देण्याऐवजी तुम्ही इथे का आला. कितीही अत्याचार झाले तरी आपण जिथे आहो तिथेच राहिलो पाहिजे आणि मेलो पाहिजे. लोक जर आपल्याला मारण्याकरिता येत असतील तर आपण मरू या. परंतु आपण धैर्याने ईश्वराचे नाव घेत मरू. हीच गोष्ट मी मुलींना शिकवली आहे. ईश्वराचे नाव ओठांवर ठेवून मरण्याची कला तुम्ही शिका. एखादा असा दुष्ट माणूस असू शकेल की ज्याला वास्तव काय आहे हे जाणून घेण्याची इच्छा नसेल. तो हिंदू , शीख, वा अजूनही कोणी असू शकेल - परंतु कमीत कमी तुम्ही त्याला घाबरण्याचे नाकारू शकता. त्याने जर पैसे देऊ केले तर तुम्ही त्याला म्हणू शकता की पाच मिनिटांनी मारण्याऐवजी तू आम्हाला आताच मारून टाक परंतु आम्ही तुला शरण जाणार नाही. तुम्ही त्याला पैशाकरिता आत घेता कामा नये. जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत मी मुलींना हाच सल्ला देत राहीन. मी त्यांना इतर कोणताही सल्ला देऊच शकत नाही. मी ईश्वराला विसरू इच्छीत नाही. यामुळेच मरण्याच्या कलेतच सर्वात मोठे धैर्य असते असे मी म्हणत असतो. तुम्ही जर मरण्याची कला शिकणार नसाल तर तुम्ही मरणाच्या आधीच मराल. कोणीही आपल्या वेळेच्या आधी मरावे अशी माझी इच्छा नाही. मुसलमानांनासुद्धा मी सांगत असतो की तुम्ही तुमची घरे सोडू नका. यापेक्षा जिथे तुम्ही आहा तिथे मरण पत्करा. रावळपिंडीच्या लोकांना मी हीच गोष्ट सांगितली. तुम्हाला शक्य असेल ते सर्व तुम्ही करा अशी विनंती मी सरकारला करीन. मी  त्यांना सांगितले की तुम्ही आता इथे आलेले आहात तर तुम्ही शिबिरात जा आणि तिथे काम करा. मी त्यांना म्हणालो की तुम्ही धडधाकट माणसे आहा आणि तुम्ही धीर सोडायला नको. तुम्ही स्वतःला असहाय समजू नये व राहण्याकरिता जागा नाही म्हणून दुःख करू नये. मी त्यांना सांगितले की तुम्हाला राहण्याकरिता आधीच जागा मिळालेली आहे. धरतीमाता आपले घर आहे आणि डोक्यावरील आकाश आपले छप्पर. जे मुसलमान घाबरून गेलेले आहेत त्यांनी त्यांची घरे आणि जमीन माघारी सोडली आहे. तुम्ही मुसलमानांच्या घरात राहा असे मी त्या निर्वासितांना सांगायला पाहिजे काय? अशा प्रकारचे मी काहीही सांगू शकत नाही. पूर्वीप्रमाणेच आजही ती घरे मुसलमान घरमालकांचीच आहेत. ते घाबरून पळाले आहेत. ते जर स्वतःहून गेले असते व आम्ही पाकिस्तानमध्ये सुखासमाधानात राहू असे त्यांना वाटत असेल तर त्यांना तिथे सुखात राहू द्या. त्यांना दुखवू नका. त्यांना शांततेत जाऊ द्या. त्यांनी त्यांची संपत्ती आणि दागदागिने सोबत न्यावे. त्यांनी सोडलेली घरे सरकारच्या ताब्यात असतील तर सरकारला त्यांचे जे काही करायचे असेल ते ते करील. आपले शरणार्थी तिथे जाऊन त्या घरात राहू लागतील तर ते उचित होणार नाही. एक गोष्ट मला स्पष्टपणे माहीत आहे. मला जर तुम्हाला इथून जाऊ द्यायचे असेल

तर तुम्ही मजबूत आणि धैर्यशाली असायला पाहिजे आणि मी सांगतो तसे करायला पाहिजे. मला पंजाबला जायचे आहे. मला लाहोरला जायचे आहे. मला पोलिसांच्या वा सैनिकांच्या संरक्षणाखाली जायचे नाही. केवळ ईश्वरावर विसंबून मला एकट्याला जायचे आहे. तेथील मुलमानांवरील विश्वास आणि श्रद्धेच्या भावनेने मला तिथे जायचे आहे. त्यांची इच्छा असेल तर त्यांना मला मारू द्या. ईश्वराने त्यांच्यावर कृपा करावी अशी शांतपणे प्रार्थना करत मी हसतहसत मरेन. आणि ईश्वर त्यांच्यावर कृपा कसा करील? त्यांना चांगले करून. त्यांना चांगले करण्याचा ईश्वराजवळ एकमेव उपाय आहे त्यांची अंतःकरणे शुद्ध करण्याचा. मला शत्रू समजणाऱ्या एकाही माणसाबद्दल माझ्यात जर शत्रुत्वाची भावना नसेल तर आणि तरच ईश्वर माझे ऐकेल. असे झाले की तो माणूसच विचारेल की या माणसाला मारून मी काय मिळवणार आहे. मी त्याचे काय नुकसान केले हा विचार तो करू लागेल. त्यांना जर मारायचे असेल तर तसे करण्याचा त्यांना अधिकार आहे. म्हणूच मला लाहोरला जायचे आहे, रावळपिंडीला जायचे आहे. सरकारला मला थांबवायचे असेल तर थांबवू द्या. परंतु सरकार मला कसे थांबवील? त्यांना जर मला थांबवायचे असेल तर त्यांना मला मारावे लागेल. त्यांनी जर मला मारले तर माझा मृत्यू तुमच्याकरिता एक उदाहरण होईल. त्यामुळे मला फार आनंद मिळेल. कोणता धडा तुम्हाला मिळेल? तो धडा असेल मी मरेन परंतु मी कोणाचेही अनहित चिंतणार नाही.

ध्रुव केवळ मुलगा होता. त्याने ईश्वराची प्रार्थना केली. प्रह्लादचे काय? तो कवळ बारा वर्षांचा मुलगा होता. त्यानेसुद्धा तेच केले. आणि आपण सर्व त्यांचे वंशज आहोत. ज्यांना ग्रंथ साहेब माहीत असेल त्यांना माहीत असेलच की आपल्यामध्ये कुणाबद्दलही दुर्भावना असू नये, कोणाच्याही विरोधात आपण तलवार उपसू नये असे गुरू नानक साहेबांनी शिकवले आहे. सर्वात मोठे शौर्य धैर्याने मरण पत्करण्यात आहे. आपले लोक जर या पद्धतीने मरण पत्करतील तर आपण कुणावरही रागावू नये. मरणाबद्दल त्या लोकांचे आपण गुणगान केले पाहिजे व ईश्वराने आपणा सर्वांना अशी संधी द्यावी अशी प्रार्थना केली पाहिजे. आपली ही प्रार्थना अंतःकरणापासून असली पाहिजे. रावळपिंडीच्या लोकांना मी जे सांगितले होते तेच मी तुम्हाला सांगतो आहे. मी त्यांना सांगितले की तुम्ही शिबिरात जा आणि हिंदू आणि शीख शरणार्थ्यांना भेटा. तुम्ही स्वतःहोऊन परत जायला पाहिजे, पोलिसांच्या वा सैन्याच्या संरक्षणाखाली नाही. दिल्लीत तुम्ही भांडण थांबवले तर मी समजेन की ईश्वराने माझी प्रार्थना ऐकली. मग परमेश्वराच्या कृपेने मी पंजाबमध्ये जाईन. एकदा का दिल्लीत शांतता प्रस्थापित झाली की मग मी इथे एक दिवसही थांबणार नाही. मी इथे मौजमजेकरिता थाबलेलो नाही. मी इथे थांबलो आहे सेवा करण्याकरिता. इथे पेटलेली आग विझवण्याकरिता माणूस जे काही करू शकतो ते सर्व करण्याकरिता मी इथे थांबलेलो आहे. यामुळे तुम्ही कसे जगावे व काय

करावे म्हणजे तुमच्या जीवनाचा सुगंध संपूर्ण भारतात व जगात पसरेल हे मी तुम्हाला आणि रावळपिंडीहून आलेल्या मित्रांना सांगू इच्छितो.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३३७-४०

# १२२. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर २४, १९४७

नवी दिल्ली,

सप्टेंबर २४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज तुम्ही जे भजन ऐकले ते आजच्या परिस्थितीला लागू आहे. आज आपण सर्व आपले वर्णन 'फुटलेली नाव' असे करू शकतो. आणि मग आपण ईश्वराला प्रार्थना करतो की हे देवा आम्हाला किनाऱ्यावर पोहोचव. म्हणजे त्याच्या कृपेशिवाय आपण किनाऱ्यापर्यंत पोहोचू शकत नाही. आपल्या देशाची आज हीच परिस्थिती आहे आणि मला तर ती रोजच असल्यासारखी दिसते. कसा का होईना आपल्या समाजामध्ये कमालीचा द्वेषभाव रुजला आहे. हिंदू आणि मुसलमान यांच्या अंतःकरणात इतका काही क्रोध भरलेला आहे की दिल्लीत मुसलमानांना राहू देण्याकरिता आमची तयारी नाही. पाकिस्तानमधून हिंदू आणि शीख यांना बाहेर काढण्यात आले. इतकेच नाही तर लहान मुलांच्या मनांतही विष भरवण्यात आले असल्याचे मी ऐकतो. हा सर्व मुस्लिम लीगच्या प्रचाराचा परिणाम आहे हे खरे आहे. आम्ही मुसलमान बळाच्या जोरावर पाकिस्तान घेऊ, त्याकरिता आम्ही वाटाघाटी करणार नाही, हिंदूंना आणि इतर मुसलमानेतरांना आम्ही आमची बाजू पटवून देण्याचा प्रयत्न करणार नाही असा सर्व प्रचार करताना मी स्वतः पाहिले आहे. आम्ही बळजबरीने पाकिस्तान घेऊ अशी त्यांची आरडाओरड दुर्दैवाने वर्षांपासून सुरू आहे. परंतु असे घडणार नाही. ते बळजबरीने मिळवण्याला काय अर्थ आहे? एका अर्थाने आपण म्हणू शकतो की त्यांनी शक्तीच्या जोरावर पाकिस्तान घेतलेला नाही. उलटपक्षी आपण म्हणू शकतो की आम्ही त्यांना पाकिस्तान दिला, कॉंग्रेसने त्यांना पाकिस्तान दिला. ब्रिटिशांनी मान्य केले नसते तर पाकिस्तान होऊ शकला नसता. कॉंग्रेसने कितीही कबूल केले असते तरी अंतिम अधिकार ब्रिटिशाच्या हातात होते. त्यांना सत्ता सोडायची होती. का? कारण ते इथे यापुढे राज्य करू शकत नव्हते. आम्ही त्यांच्याविरुद्ध तलवारीने भांडलो नाही. आमचे युद्ध शस्त्राशिवाय होते. आमचा संघर्ष अहिंसक संघर्ष होता असे आम्ही म्हणतो. अशा प्रकारे भारताने स्वातंत्र्य मिळवले. भारताची फाळणी झाली. कॉंग्रेसने फाळणीला मान्यता दिली. भावाभावांनी भांडत राहणे योग्य नाही असे कॉंग्रेसला वाटले. त्यांना जे हवे ते त्यांना देऊन टाकावे असे कॉंग्रेसला वाटले. परंतु त्यांच्यातील काहींना वाटते की आम्हाला पूर्ण पाकिस्तान मिळाला नाही. परंतु त्यांना जे काही देऊ करण्यात आले ते त्यांनी मान्य केले व राहिलेल्या पाकिस्तानकरिता भविष्यावर अवलंबून राहिले. अशा प्रकारे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले खरे परंतु

त्यात सर्वत्र पसरलेल्या विषामुळे आपण ते पचवू शकलो नाही. आणि आपल्यातील वाद संपला नाही. मुस्लिम लीगच्या पाठीराख्यांनी विषारी भाषणे दिली. पाकिस्तानमध्ये राहणारे सर्व मुसलमान आहेत काय? पाकिस्तानमध्येसुद्धा हिंदू, पारसी, शीख, ख्रिश्चन राहतात. त्या देशात राहणाऱ्या या सर्वांना त्याने सुखी करावे. या सर्वांना समान हक्क आहेत हे त्याने सिद्ध करावे. सरकार त्यांचे राहील यात काही संशय नाही कारण तिथे त्यांचे बहुमत आहे. ते ठीक आहे परंतु सरकारने न्ययभावनेने काम करायचे असते. ते असे म्हणतात परंतु त्यावर कार्यवाही होऊ शकली नाही. तसे का होऊ शकले नाही याच्या खोलात मी का जावे? तिथे काय झाले हे सर्व मला माहीत आहे. मुसलमानांचा अनावर संताप झालेला होता. त्यांना वाटले की आता आपण स्वतंत्र असल्यामुळे कोणालाही मारू शकतो आणि कोणाचीही कत्तल करू शकतो. येथून सर्व सुरुवात झाली. आणि एकदा ही सुरुवात झाल्यानंतर तिथे शीखही राहत होते आणि तेसुद्धा लढवैय्ये होते. ते हे सर्व चुपचाप कसे सहन करू शकत होते? त्यांनीसुद्धा मारण्याला आणि कत्तलीला सुरुवात केली. हीच ती गोष्ट आहे की जी अजून संपलेली नाही.

हजारो लोक माझ्याकडे आले आणि त्यांनी मला सांगितले की यापुढे आम्ही तिथे राहू शकत नाही. ते म्हणतात की आमच्यावर इस्लामचा स्वीकार करण्याकरिता बळजबरी करण्यात येत आहे आणि आम्ही तसे केले नाही तर आम्हाला गुलामाप्रमाणे ठेवण्यात येईल अशी आम्हाला धमकी देण्यात येत आहे. अशा प्रकारच्या अटी आम्ही कशा प्रकारे ऐकू शकतो? आम्ही इथे नाईलाजाने आलो आहोत. इस्लामचा स्वीकार आमची इच्छा असेल तर आम्ही करू. परंतु दडपणामुळे इस्लामचा स्वीकार करणे ही वेगळी गोष्ट आहे. आपली आजिविका मिळवण्याकरिता माणूस आपला धर्म सोडू शकत नाही. दडपणामुळे धर्म सोडणे हा धर्म नसून अधर्म आहे. ज्या माणसाने वा स्त्रीने आपला स्वाभीमान गमावला आहे त्या माणसाच्या वा स्त्रीच्या केवळ जगण्याला काय अर्थ आहे? आणि धर्मात स्वाभिमानाचाही सहभाग असतो. जे लोक पैसे, दागदागिने, वा नोकरी यांच्याकरिता आपला धर्म सोडतात ते धर्माचे अनुसरण करू शकत नाही. हिंदू म्हणवण्याला ते पात्र नाहीत आणि दडपणाखाली कलमा म्हणाल्यामळे ते चांगले मुसलमानही होऊ शकत नाहीत. मी इथे कलमा म्हणत नसतो तर फतेहा म्हणत असतो. ईश्वर एक आहे व हजरत मोहम्मद त्याचे दूत आहेत असे कलमा घेताना सांगितले जाते. ते पूर्वी झालेल्या दूतांची गणना करायला तयार नाहीत. परंतु फतेहामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की ईश्वर आपला मालक आहे. तो प्रत्येकाचे रक्षण करू शकतो. आपण त्याला आपलेही रक्षण करू देऊ या. परंतु फतेहा फार सुंदर असला तरी तो म्हणण्याची कुणावर बळजबरी कशी करता येऊ शकते? आपण जर तो म्हणू तर तसे आपण केवळ आपल्या इच्छेने करू. परंतु कोणी मला जर बंदुकीच्या धाकावर ते म्हणायला लावणार असेल तर तसे करणे मला मुळीच

आवडणार नाही. माझ्या शरिरात केवळ मूठभर हाडे आहेत.परंतु माझे हृदय माझे स्वतःचे आहे. तर तुमचे हृदय तुमचे आहे काय आणि या मुलींचे हृदय त्यांचे आहे काय? या मुली घोषित करू शकतात की आम्ही कधीही आमचा धर्म सोडणार नाही. परंतु आज आपणा सर्वांना आव्हानाला तोंड द्यावे लागत आहे. अशा परिस्थितीत भारताने काय करावे? आपण कसे वागावे ही फार मोठी समस्या आपल्यासमोर आहे. आजकाल पाकिस्तानमधून येणाऱ्या गाड्यांमध्ये मुसलमान येत नाहीत. त्या गाड्या केवळ हिंदू आणि शिखांना आणतात. काही गाड्यांमध्येच मारले जातात. आणि येथून जाणारे लोक मुसलमान असतात आणि रस्त्यात ते मारले जातात. मला गणना करण्याकरिता सांगण्यात येते. मी कशाची गणना करू? माझ्याजवळ कोणतेही आकडे नाहीत. आणि आकडे जाणून आपण काय करणार आहो? मी म्हणेन की एक माणूस एक बाटली दारू पिऊ शकतो व त्यामुळे त्याला नशा येऊ शकतो. दुसरा कोणी दोन बाटल्या प्यालानंतर त्याला नशा येईल. दोघेही नशा करतात. परंतु दुसरा एक काही तरी पितो आणि प्याल्यानंतरही त्याला नशा चढत नाही. जणू काय तो नदीचे स्वच्छ पाणी प्याला. तुम्ही त्याला दारू म्हणू शकाल परंतु त्याच्यामुळे कोणालाही नशा चढत नाही. त्या पाण्याला दारू कोण म्हणेल? कारण दारू ही अशी गोष्ट आहे जिच्यामुळे माणूस भानावर राहत नाही, वेड लागल्याप्रमाणे त्याची अवस्था होते. सांगायची गोष्ट ही की या वेळी आपणापैकी कोणीही भानावर नाही. आता कल्पना करा की मुस्लिम लीग झपाटल्याप्रमाणे काही तरी करते कारण तिच्या डोक्यात काही तरी शिरले आहे. आणि मग आपल्याला वाटू लागते की आपणही असेच वागायला पाहिजे. तुम्हाला संपूर्ण भारतावर राज्य करण्याची आणि पाकिस्तानचा नाश करण्याची इच्छा होऊ शकेल. परंतु मी तुम्हाला सांगतो की पाकिस्तान होण्याला आपण मंजुरी दिली आहे. मग त्याला नष्ट करण्याचा प्रश्न कुठे येतो? आपण त्याचा विध्वंस करू शकत नाही. शारीरिक शक्तीने वा तलवारीच्या मदतीने आपण त्याचा विध्वंस करू शकत नाही. आपण जर पाकिस्तानचा विध्वंस करण्याचा प्रयत्न करू तर दोन्ही देश बुडणार आहेत. आपली बोट फुटलेली आहे. आपण आज बुडत आहो. आपण लढू आणि जिंकू अशी जर तुम्ही कल्पना करत असाल तर मी तुम्हाला सांगतो की तुम्ही जिंकण्यापूर्वीच कोणती ना कोणती जागतिक शक्ती तुम्हाला गिळल्याशिवाय राहणार नाही. ती दोन्ही देशांना गिळून टाकील. जर माझे सगळे मित्र, जे सुज्ञ लोक आहेत, आणि ज्यांनी अशा कामात अनेक वर्षे घालवली आहेत त्यांना आपण सुरक्षित आहो हे कळू शकेल. परंतु जर दोघेही दारूच्या बाटल्यांच्या बाटल्या रिचवत असतील व तसे करताना त्यांना मजा वाटत असेल तर असे कसे होऊ शकेल? मी त्यांना विनंती करीन की दारूच्या बाटल्यांचा त्याग करा आणि त्या समुद्रात फेकून द्या कारण त्यांच्यात विष भरलेले आहे. आपण मुसलमानांना यापुढे दुखापत करणार नाही. त्यांना जर स्वतःहोऊन जाण्याची इच्छा असेल तर आपण त्यांना जाऊ देऊ. परंतु जाण्याकरिता आपण त्यांना

भाग पाडणार नाही. ते त्यांच्या घरांत राहतात. ते बहुसंख्य नाहीत. आपण भ्याड बनून त्यांचा छळ का करावा? आपण स्वतंत्र आहो. संपूर्ण देश स्वतंत्र आहे. आपण संपूर्ण देश फस्त करून टाकू अशा संभ्रमात त्यांनी का राहावे? मुसलमान असे प्राणी आहेत काय की हिंदूंच्या मनात आल्याबरोबर ते त्यांना फस्त करून टाकण्याकरिता उपलब्ध असतील? कॉंग्रेसने किती तरी बलिदान केले आहे. वर्षानुवर्षे ती सर्वोच्च बलिदान करते आहे व त्यात मोठ्या संख्येत हिंदू आणि मुसलमान दोन्ही आहेत. आता स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते कशाने तरी झपाटून गेले आहेत काय? किती तरी बलिदान करून मिळालेले स्वातंत्र्य या वेडाच्या भरात आपण फेकून द्यावे काय? ही किती लाजिरवाणी गोष्ट होईल ! वृत्तपत्रांमधील बातम्या वाचल्यानंतर तुम्ही जर उद्दिपत झाला असाल व ते आपले असे कधीच होणार नाहीत असा विचार तुम्ही करत असाल तर या गोष्टी मी तुम्हाला सांगणार नाही. मी काल तुम्हाला सांगितले की संपूर्ण दंगली थांबवता येऊ शकतात. हे कसे करता येईल? आपण स्वतःला शुद्ध केले पाहिजे. स्वतःला शुद्ध करणे म्हणजे निर्भय होणे. जो माणूस निर्भय असतो तो अशा प्रकारचे घाणेरडे कृत्य करणार नाही. तुम्हाला तुमच्या सरकारचा पाठिंबा आहे. सरकार देशाचे प्रशासन पाहते. ब्रिटिश सरकारचे ते दिवस आता गेले जेव्हा आपल्या समस्या आपण त्यांना सांगू शकत नव्हतो. आज तुमचे स्वतःचे सरकार आहे. सर्व गोष्टी सुरळीत कशा कराव्या हे आपण सरकारला सांगू शकतो. अखेरीस देशात केवळ साडेचार कोटी मुसलमान आहे. आपण त्यांना का घाबरावे? कल्पना करा की तुम्ही साडेचार कोटी मुसलमान मारले. त्यानंतर तुम्ही काय कराल? आणि पाकिस्तानमध्ये किती तरी मुसलमान आहेत.तिथे तुम्ही कोणाला माराल? इथे जे साडेचार कोटी मुसलमान आहेत त्यांचा हिशेब चुकता करण्याची पाकिस्तानची इच्छा असेल. ते आव्हान स्वीकारण्याची तुमची क्षमता नसेल कारण त्यांना संपूर्ण जगाचा पाठिंबा असेल. यामुळेच मी म्हणतो की आपण शुद्ध राहिलो पाहिजे. आपण आपला हिशेब स्वच्छ ठेवू या. आपण ऋणकोच्या परिस्थितीत येऊ नये. आपण जर धनकोच्या परिस्थितीत असू तर सरकार पाकिस्तानला निर्वाणीचा इशारा देऊ शकेल हे मी तुम्हाला सांगून ठेवतो. तेथून जे हिंदू आणि मुसलमान आले आहेत त्यांनी परत जायला पाहिजे आणि पाकिस्तानने त्यांची काळजी घेतली पाहिजे. पाकिस्तानमधील सर्व अल्पसंख्य समुदायांना तेच अधिकार असतील जे तेथील मुसलमानांना आहेत इथपर्यंत पाकिस्तानने म्हटलेले आहे. त्यांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि पूजाअर्चा करण्याचे स्वातंत्र्य म्हणजे मंदिरात वा गुरुद्वारात जाण्याचे स्वातंत्र्य असेल, त्यांना अर्थातच राजकीय अधिकार नसतील. आपला परस्परांवरील विश्वासाला धक्का बसला आहे ही गोष्ट मी समजू शकतो. परंतु याचा उपाय इथे घरेदारे, मुलेबाळे आणि संपत्ती असलेल्या मुसलमानांना घालवून लावणे हा आहे काय? असे व्हायला नको. तो फार मोठा भ्याडपणा होईल. मला तुम्हाला केवळ इतकेच सांगायचे आहे की मुसलमानांवर बदला

घेण्याची कल्पना आपण सोडून दिली पाहिजे. आणि आपण आपली हृदये इतकी मजबूत केली पाहिजे की संपूर्ण हिंदूस्तानची जरी खात्री पटली तरी दिल्लीमध्ये काहीही व्हायला नको. मुसलमानांना घालवण्यात आले आहे. जे गेले आहेत त्यांना परत आणायला पाहिजे असे मला म्हणायचे नाही. परंतु जे मागे राहिले त्यांना शांततेत राहू दिले पाहिजे. जे लोक गेले त्यांचा विचार आपण नंतर करू. मुसलमान जर गैरवर्तन करतील तर सरकारकडे तक्रार करा. त्या मुसलमानांनी सरकारचा अधिकार मान्य केलाच पाहिजे. आमच्याजवळ सैन्य नाही म्हणून तुम्ही त्यांना मारा अशी जर सरकार परवानगी देत असेल तर त्या सरकारचा अंत झालाच पाहिजे. याचा अर्थ गुंडगिरीचे राज्य असा होईल.सरकारचे हे काम नाही. मी तुम्हाला सांगतो की तुम्हाला हवे तितके तुम्ही सरकारला प्रभावित करू शकता परंतु कायदा आपल्या हातात घेऊ नका, बंदुकांचा उपयोग करू नका आणि कोणालाही मारू नका. तुम्ही जर इतके केले तर विजय आपला आहे आणि आपले जे जहाज बुडू लागले आहे ते वाचेल. ईश्वर नेहमी सत्याच्या बाजूने असतो. तो आपल्याला कधीही टाकून देत नाही परंतु आपण जर ईश्वराला टाकून दिले, आपण जर त्याला विसरलो व सुमार्ग टाकून दिला तर ईश्वर काय करू शकतो?

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३४०-४५

## १२३. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर २५, १९४७

नवी दिल्ली, सप्टेंबर २५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आपण एकाएकी संकटात सापडलो आहो. आपले स्वातंत्र्य अजून दीड महिन्याचेसुद्धा झाले नाही. एक महिना दहा दिवसांचे मूल काय करू शकते? परंतु आपण शक्तिमान आहो आणि आजपर्यंत ब्रिटिश साम्राज्यवादाविरुद्ध आपण संघर्ष करत होतो. अडचणींसमोर आपण शरण जाणार आहो काय? आपण केवळ स्वातंत्र्योत्तर काळाविषयी बोलू या. असे नाही की आपण त्याकरिता तयार नाही. आपण स्वतंत्र झालो आहो. परंतु आपल्या लोकांना वाटते की आपल्याला हवे ते करता येणे म्हणजे स्वातंत्र्य. या वृत्तीमुळे आपण सरकारचे काम अवघड केले आहे. माणूस जर आपले हात स्वच्छ ठेवू शकत नसेल तर तो स्वच्छ गोष्टी कसा पाहू शकेल? आपल्यामध्येच जेव्हा बदमाश माणसे असतील तर बदमाशीकरिता कोण कुणाला कसा दोष देईल? प्रत्येकावर जर बदमाशीचा ठप्पा लागलेला असेल तर  प्रश्न अजूनच क्लिष्ट होतो. हे खरे स्वातंत्र्य नाही. आणि ते मिळवण्याचाही हा मार्ग नाही. यामुळेच मी म्हणतो की आपण हे सरकारला सांगावे आणि आपल्याला शक्य असेल ती मदत सरकारला करावी. कल्पना करा की सरकारला अशी मदत मिळत नाही तर मग पाकिस्तानने जसे केले व तिथे जसे करणे सुरू आहे तसे आपण करावे काय? यामुळे ते धडा शिकतील काय? मी तुम्हाला सांगतो की त्यांना धडा शिकवण्याचा हा मार्ग नाही. जगात या मार्गाने गोष्टी होत नाहीत. लोक जर आपसात भांडत असतील तर सरकार त्यांना भांडण थांबवण्याकरिता सांगेल. त्यांना पालिसांची मदत घेण्याकरिता सांगण्यात येईल. पोलीस जर त्यांचे ऐकणार नसेल तर ते न्यायाधीशाच्या घरी जाऊ शकतात व तिथे आपले प्रकरण मांडू शकतात. जे काही करणे शक्य असेल ते तिथे केले जाईल. भांडणाची काही तुरळक प्रकरणे असतील तर न्यायाधीश ती सोडवू शकेल. परंतु या प्रकरणी दोन मोठ्या समुदायांमध्ये झगडा आहे. सरकार काय करू शकते? हे काही ब्रिटिश सरकार नाही की ज्याला इंग्लंडमधून आदेश मिळतात. आता तुमचे सरकार आहे. याचा अर्थ एखादी विशिष्ट गोष्ट न करण्याचा तुम्ही सरकारला आदेश देऊ शकता. तुम्ही सरकारला फेकून देऊ शकता. तुमची ताकद ही अशी आहे. तुम्ही जर त्या शक्तीचा योग्य प्रकारे उपयोग करणार नाही तर तुम्ही स्वतः फार मोठ्या अडचणीत सापडला असल्याचे तुम्हाला आढळेल. आणि मी तुम्हाला सांगून ठेवतो की आपण आज फार मोठ्या संकटात आहो. पाकिस्तानही संकटात आहे यात काही संशय नाही. परंतु आपणही तशाच परिस्थितीत आहो.

याचे (प्रार्थना सुरू होण्यापूर्वी कोणी तरी गांधींना एक चिठ्ठी दिली होती. पाकिस्तान सरकार हिंदू आणि शीखांना बाहेर काढत आहे आणि भारत सरकार मुसलमानांना समान नागरिक म्हणून संघराज्यात ठेवत आहे. अशा प्रकारे संघराज्य दोघांचेही ओझे कसे सहन करू शकेल?) उत्तर देताना गांधीजी म्हणाले की मी इतकेच सांगेन की ते आपले सरकार आहे आणि जे करणे आवश्यक आहे ते ते करत आहे. जर काही करायचे राहिले असेल तेसुद्धा केले जाईल. तुमचे कर्तव्य कुठे आहे हे मी तुम्हाला सांगितले आहे. मी अजून काही तुम्हाला सांगू इच्छित नाही. तुमचे कर्तव्य काय आहे? एकोप्याने राहणे आणि मुसलमानांना शत्रू न समजणे हे तुमचे कर्तव्य आहे. गैरवर्तन करणारांचा आपोआपच शेवट होईल. परंतु आपण कोणा एका व्यक्तीला आपला शत्रू समजत असू व त्याला मारहाण करू, त्याला मारून टाकू तर तो आपला भित्रेपणा होईल व त्यामुळे आपल्यामध्ये दुबळेपणा येईल. ज्यांच्यात धैर्य आणि शक्ती असते त्यांनी इतरांशी भांडू नये. कारण ज्यांच्यावर आपला विश्वास नसतो त्यांच्याशीच आपण भांडत असतो. हे सर्व व्यर्थ आहे. भांडण्यात काय अर्थ आहे? त्यांच्यातील आणि आपल्यामधील ईश्वर एकच आहे. मी तुम्हाला सांगितले आहे की आपण आपल्या नियतीचे न्यायाधीश नाही. ईश्वराच्या हातातील आपण केवळ प्राणी आहो. ईश्वराने आपल्याला मदत केली तरच आपण आपली अब्रू वाचवू शकतो. नाही तर नाही. त्याला विनवणी करा, माणसाला नाही. त्याला विनवणी करा जो पतिताला पावन करतो. तो अगदी आपल्यामध्ये आहे. तो जेव्हा आपले रक्षण करण्याकरिता असतो तेव्हा आपण कोणावर रागावण्याचे वा कोणाला भिण्याचे काय कारण? मुसलमानांना जे करायचे असेल ते करू द्या. त्यांना कितीही शस्त्रे ठेवू द्या. एखाद्या बदमाष माणसाप्रमाणे त्यांना वागू द्या वा त्यांना विश्वासघातकी होऊ द्या. जर ते देशद्रोही असतील तर सरकार त्यांना पाहून घेईल. नियम म्हणून जगात सर्वत्र देशद्रोह्यांना घोळी घालून मारून टाकले जाते. जर कोणी देशद्रोही होत असेल तर तो शासनाच्या विरोधात फार मोठा अपराध करतो. हा अपराध खुनापेक्षाही मोठा आहे. म्हणूनच देशद्रोह्यांना घोळी घातली जाते. ते देशद्रोही होऊ शकतात हे मी समजू शकतो. परंतु देशद्रोहाच्या संशयावरून त्यांना मारणे हा पुरुषार्थ नाही. हे भ्याडाचे काम आहे.

काल तुम्हाला मी सांगितले की (पाहा प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर २४, १९४७) आणि आजही तुम्हाला सांगतो की आपली बोट फुटलेली आहे. केवळ ईश्वरच तिला काठावर आणू शकतो हे अगदी खरे आहे. परंतु आपणही प्रयत्न केले पाहिजे. बोटीला जर कुठे छिद्र असेल तर जी काही साधने आपल्याजवळ असतील त्यांनी पाणी आत येण्यापासून आपण अडवले पाहिजे. परंतु जर बोटीत वेगात पाणी येत असेल तर ते तितक्याच वेगाने बाहेर फेकण्याचा प्रयत्न करत असताना मी पाहिले आहे. असे केले तर पाणी आत येत असूनही बोट पुढे जात राहते. परंतु ईश्वराने मदत केली

तरच हे घडू शकते. ईश्वर कृपेने ती पुढे जाते आणि किनाऱ्यावर पोहोचते. परंतु ईश्वराने मदत केली नाही तर ती बुडते. म्हणूनच मी म्हणतो की माणसाने प्रयत्न केला पाहिजे व ईश्वराची मदत मागितली पाहिजे. दिल्लीत आग लागलेली आहे. इतर ठिकाणीही आग लागलेली आहे. प्रत्येक ठिकाण पेटलेले आहे. ती आग विझवणे आपले कर्तव्य आहे.तिच्यावर पाणी टाका. त्याशिवाय ती विझू शकत नाही. आपले पहिले काम (परिस्थिती कशी आहे ते) लोकांना समजावून सांगणे आहे. मी त्यांना तसेच तुम्हालाही एकाच पद्धतीने समजून सांगण्याचा प्रयत्न करत आहे. माझ्या शेवटच्या श्वासापर्यंत मी या गोष्टीचा पुनरुच्चार करत राहीन. भारत, जो वैभवशाली होता, तो आज स्मशानभूमी झाला आहे. तो दानवी झाला आहे.

माझ्या अनुभवाने मी सांगतो आहे की आपल्या पोलिसांनी आणि सैन्याने जनतेच्या सेवकाप्रमाणे वर्तन केले पाहिजे, मालकाप्रमाणे नाही. अधिकार गाजवण्याचे दिवस गेले. प्रेमाने काम करून घेण्याचा माझा मार्ग आहे. आमच्याजवळ हिंदू सैन्य, पंजाबी सैन्य आणि हिंदू पोलीस मुसलमानांना छाटून टाकतील असे ऐकताना मला वेदना होतात. मला गंमतसुद्धा वाटते. असे झाले तर पोलीस आणि सैन्य मिळून भारताला चिरडून टाकतील व भारताचे जहाज बुडून जाईल असे मला वाटते. आज आपल्याजवळ आपले सैन्य आहे. सर्व ब्रिटिश निरर्थक आहेत असे मला वाटत नाही. ते काहीही असले तरी बहुतांश ब्रिटिश सोडून गेलेले आहेत. केवळ काही अधिकारी मागे राहिलेले आहेत. ते सर्व निरर्थक आहेत हे मान्य केले तरी यावर माझा विश्वास नाही. आणि जरी ते निरर्थक असले तरी त्यांना जावे लागेल. कल्पना करा की पाकिस्तानमधील सैन्य काही चुकीचे करते तर भारतातील सैन्यानेही तसेच केले पाहिजे काय? पाकिस्तानमधील पोलिसांनी काही चुकीची गोष्ट केली तर आपल्या पोलिसांनीही तसेच करावे काय? मला तुम्हाला हे सांगायचे आहे आणि त्याचे काय परिणाम होतील हे दाखवायचे आहे. सर्वांनी जर अशा प्रकारे वागायला सुरुवात केली तर भारताचा विनाश होईल आणि आपले स्वातंत्र्य, जे केवळ एक महिना दहा दिवसांचे आहे, ते दोन महिनेही पूर्ण करणार नाही. अशी परिस्थिती आपण निर्माण करू नये. हे टाळण्याकरिता आपण काय केले पाहिजे? आपल्यात धैर्य असले पाहिजे. आपल्याला कोणाचीही भीती वाटायला नको. आपण केवळ ईश्वराला भ्यालो पाहिजे. आपली नाव त्याने किनाऱ्यावर पोहोचवावी म्हणून आपण त्याची प्रार्थना करू या. याकरिता आपल्याला पुढील अटीचे पालन करावे लागेल - पाकिस्तानमध्ये काहीही घडले तरी आपण आपली अंतःकरणे स्वच्छ ठेवू या. आपण जर असे केले नाही तर आपण राक्षस होऊ हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. आपल्याला आपला भारत शुद्ध आणि स्वच्छ ठेवायचा आहे व आपण सहनशील असलो पाहिजे. मुसमानांना भारताबद्दल निष्ठा ठेवावीच लागेल. त्यांनी जर निष्ठा ठेवली नाही तर त्यांना फासावर चढवले पाहिजे. हे आपण स्वतः करू शकतो काय? हे आपले काम

नाही. मुसलमान आपले बांधव आहेत. त्यांची घरे आणि सर्व काही इथे आहे. यामुळे आपण लक्षात ठेवले पाहिजे की जे इथे राहत आहेत त्यांनी इथे सर्वार्थाने राहावे. परस्परांबद्दल भीती वाटायला नको. माझी तुम्हाला विनवणी आहे की तुमच्यात विश्वास असायला पाहिजे कारण विश्वासाने विश्वास निर्माण होतो व संशयाने संशय बळावतो. तुमचा विश्वास दृढ होऊ द्या.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३४५-९

# १२४. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर २६, १९४७

नवी दिल्ली,

सप्टेंबर २६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

जे काही सुरू आहे ते ना तर शीखधर्मानुसार आहे, ना इस्लामप्रमाणे आहे ना हिंदू धर्माप्रमाणे आहे. आपल्याला या सर्वांची थोडीबहूत माहिती आहे. जर एखादा धर्म अशोभनीय गोष्टी करत असेल तर तो टिकू शकेल काय? शीख धर्माची सुरुवात गुरू नानक पासून झाली. गुरू नानकांनी काय शिकवले? ते म्हणाले की अल्ला, रहीम, खुदा अशा अनेक नावांनी ईश्वर ओळखला जातो. एकूण हे असे सर्व धर्मात आहे. नानक साहेबांनी सर्व धर्मांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. कबीर साहेबांनी हेच केले. असे म्हणतात की तो काळ आता गेला.

आज एक गृहस्थ - गुरू दत्त (लाहोरचे पंडित ठाकुर दत्त)- माझ्याकडे आले. ते फार मोठे वैद्य आहेत. आपली कहाणी सांगत असताना त्यांच्या डोळ्यातून अश्रू आले. त्यांनी कबूल केले की तुमच्याकडून मिळालेल्या प्रशिक्षणाच्या प्रकाशानुसार मी वागलो असतो तर मी तिथे प्राण द्यायला पाहिजे होते. परंतु त्यांच्यात असे धैर्य नसल्याचे त्यांनी कबूल केले. ते मला म्हणाले की त्यांना माझ्याबद्दल नेहमीच आदर वाटत आला आहे व मी जे काही म्हणतो तीच अगदी योग्य गोष्ट आहे. परंतु सत्याचरण करणे ही वेगळी गोष्ट आहे. मी म्हणालो तर त्यांची परत जाण्याची तयारी होती. मी त्यांना म्हणालो की पाकिस्तान सरकारकडून न्याय मिळण्याची कधीही अपेक्षा करता येणार नसेल व ते आपली चूक कबूल करणार नसेल तर आपले स्वतःचे मंत्रिमंडळ आहे व त्यात जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल आणि अजून किती तरी चांगली माणसे आहेत. अशी माणसेसुद्धा पाकिस्तान सरकारला अशा कृत्यांपासून अडवू शकत नसतील तर अखेरीस त्यांना युद्धाचा आधार घ्यावा लागेल. आपण परस्परांत मैत्रीपूर्ण तडजोड करू या. आपण असे का करू शकत नाही? आपण परस्परांवर विश्वास ठेवू शकत नाही काय? आपण हिंदू आणि मुसलमान कालपर्यंत मित्र होतो. आज आपण असे शत्रू झालो आहो काय की आपण परस्परांवर विश्वासही ठेवू शकत नाही? तुम्ही जर म्हणाल की आम्ही त्यांच्यावर कधीही विश्वास ठेवणार नाही तर मग दोन पक्षांना युद्ध करावे लागेल. तार्किक भाषेत बोलायचे तर लोकांजवळ जेव्हा सैन्य आणि पोलिस असतात व त्यावर विसंबून राहणे त्यांना भाग पडते तेव्हा दुसरे काय घडू शकते? पाकिस्तानमध्ये मारल्या गेलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या बदल्यात दोन

माणसे मारायचे तुम्ही ठरवले तर कोण कोणाची फिकीर करील? आपल्याला जर न्याय हवा असेल तर हे प्रकरण तुमच्या वा माझ्यापर्यंत थांबत नाही. हे सरकारचे काम आहे. सरकारला सांगा. आपल्याला मदत करण्याकरिता ते आहे. आपण आक्षेपार्ह वर्तन करू नये. परंतु आपण लढायला तयार असलो पाहिजे कारण जेव्हा युद्ध येते तेव्हा ते पूर्वसूचना देऊन येत नाही. युद्धाकरिता आपण पुढाकार घेऊ नये, परंतु समोरची बाजू पुढाकार घेत असेल तर मग कोणताही पर्याय शिल्लक राहत नाही. अशा प्रसंगी जर सर्व हिंदूंना लढत लढत मरावे लागले तर मला दुःख होणार नाही. परंतु आपण न्यायाचा मार्ग निवडला पाहिजे. तो मार्ग अनुसरत असताना सर्व हिंदू आणि सर्व मुसलमान जरी मरण पावले तरी मी चिंता करणार नाही.आणि नंतर जर असे सिद्ध झाले की ते साडेचार कोटी मुसलमान पंचमस्तंभी आहेत तर त्यांना गोळ्या घालाव्या लागतील वा फासावर चढवावे लागेल याबद्दल मला काहीही शंका नाही. आणि या मुसलमानांप्रमाणेच पाकिस्तानमध्ये राहणाऱ्या हिंदू, शीख यांनी जर त्या देशाशी विश्वासघात केला तर त्यांनाही अशीच वागणूक देण्यात यावी. आपण त्यांच्याबाबतीतही पक्षपात करू शकत नाही. आपण जर प्रत्येक मुसलमानाला पंचमस्तंभी समजत असू तर पाकिस्तानमधील सर्व हिंदू आणि शिखांना पंचमस्तंभी समजण्यात येणार नाही काय? असे चालणार नाही. पाकिस्तानमध्ये राहणाऱ्या हिंदू आणि शिखांना तिथे राहायचे नसेल तर ते सर्वार्थाने येऊ शकतात, अशा वेळी भारत सरकारचे कर्तव्य त्यांना काम देणे आणि त्यांचे जीवन सुखावह होईल हे पाहणे असेल. परंतु ते तिथे राहतील व हेरगिरीचे क्षुद्र आपल्याकरिता काम करतील, पाकिस्तानकरिता नाही तर हे चालू शकणार नाही व आपण त्यात सहभागी होऊ नये. माझ्याजवळ काही जादूचा ताईत नाही. आणि मी तलवारही बाळगत नाही. माझ्याजवळ केवळ एक गोष्ट आहे आणि ती म्हणजे देवाच्या नावाचा जप करणे आणि त्याच्या नावाने काम करणे. त्याचे अनुसरण केल्याने सर्व काही प्राप्त होते. असे काही नाही की त्या मार्गाचे अनुसरण करणारा मी एकटाच आहे. तुम्ही सर्व, आणि त्या तिकडे उभी असलेली लहान मुलगी  त्यांनाही तो उपलब्ध आहे.चमत्कार करण्याचे सामर्थ्य केवळ ईश्वरामध्ये आहे. ईश्वराच्या कृपेशिवाय मी काय करू शकेन असे तुम्हाला वाटते? परंतु इतके मात्र मला कळले आहे. मी अनेक वर्षांपासून. ६०पेक्षा अधिक वर्षांपासून संघर्षशील माणूस आहे. परंतु मी तलवारीने झगडत नसतो तर सत्य आणि अहिंसेच्या शस्त्राने झगडत असतो. ही शस्त्रे अजूनही आपल्याजवळ आहेत. परंतु त्यांचा उपयोग करणे माझ्या एकट्याच्या आवाक्यात नाही. तुमच्या पाठिंब्याशिवाय मी काहीही करू शकत नाही.

ज्या शक्तीने आपण स्वातंत्र्य मिळवले त्याच शक्तीने आपण त्याचे जतन करणार आहो. त्या शक्तीने आपण ब्रिटिशांना पराभूत केले. आपण त्यांना शस्त्रांनी पराभूत केले नाही. आपली निःशस्त्र शक्ती होती व तिने आपण त्यांना पराभूत केले. ज्या कोणाला भारतात राहायचे असेल, मग तो हिंदू,

शीख, पारसी, ख्रिश्चन कोणीही असो त्याला भारताकरिता लढावे लागेल आणि मरावे लागेल. जर सर्व भारतीयांनी देशाकरिता प्राणोत्क्रमण केले तर आपल्याजवळ शस्त्र असो वा नसो कोणतीही सत्ता आपल्याला पराभूत करू शकत नाही वा माघार घ्यायला लावू शकत नाही. मुसलमानांनी सांगितले आहे की आम्ही भारताशी निष्ठावंत राहू. आपण त्यांच्यावर अंतःकरणापासून विश्वास टाकू या. अखेरला सत्याचाच विजय होतो असत्याचा नाही हे आपण लक्षात ठेवू या - सत्यमेव जयते.नारितम. (मुंडकोपनिषद ।॥. । ६) हा फार मोठा वाक्प्रचार आहे. यात आपल्या धर्माचे सार आलेले आहे. आपण त्याचा अंतःकरणापासून अभ्यास करू या व त्याची आठवण ठेवू या. आणि मग मी माझ्या सर्व शक्तिनिशी म्हणेन की सर्व जग जरी आपल्या विरोधात गेले तरी आपण आपल्या जागेवर ठामपणे उभे राहू. आपल्याला कोणीही मारू शकत नाही. कोणीही हिंदू धर्माचा विनाश करू शकत नाही. त्याचा जर विनाश होणार असेल तर तो आपल्याच हाताने होईल. याचप्रमाणे भारतात जर इस्लामचा नाश होणार असेल तर तर मुसलमानांच्या हातूनच होणार आहे. हिंदू त्याचा विनाश घडवून आणू शकत नाहीत.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३४९-५२

# १२५. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर २७, १९४७

नवी दिल्ली,
सप्टेंबर २७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

माझा खास वैद्य कोण आहे सांगू? तो माझ्याकरिताही चांगला आहे आणि तुमच्याकरिताही. माझा वैद्य मन, वचन आणि कर्मात राम आहे, ईश्वर आहे, रहीम आहे. तो आपला वैद्य कसा होऊ शकतो? तुम्ही एक भजन ऐकले आहे. ते रामाला उद्देशून आहे. तो शारीरिक, मानसिक आणि आणि आध्यात्मिक दुःखांचे हरण करतो - 'दिनन दुखहरन नाथ'. दुःखात सर्व दुःख येतात, शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक. एक माणूस जितके दुःख भोगू शकतो तितके सर्व. जितके काही शारीरिक दुःख आहेत ते दूर करणारा राम आहे. तोच रामबाण उपाय आहे. माझ्याकडे येणाऱ्या लोकांना मी अजून कोणताही उपचार सांगू शकत नाही. याशिवाय माती आणि पाण्याचे काही उपचार करा. मला माहीत आहे की ज्याच्या अंतःकरणात रामनाम कोरलेले आहे त्याला माती आणि पाण्याच्या उपचाराचीसुद्धा गरज नसते. जगणे आपल्या नशिबात असेल तर आपण जगू. आपण जर मरणार असू तर मरू या. एकाच वेळी कोणीही दोन घोड्यांवर बसू शकत नाही. माझी जर रामावर श्रद्धा असेल तर मी तिच्यावर दृढ राहिलो पाहिजे. जो असे करत नाही त्याचा नाश होईल. राम हाच वाचवणारा आहे. ज्या माणसाने आपल्या अंतःकरणात रामाला अधिष्ठित केले आहे तो कधी तरी मरू शकतो काय? हे शरीर क्षणिक आहे. या क्षणी ते जिवंत असू शकेल आणि पुढील क्षणी मृत. मग मी त्याचा अभिमान कसा बाळगू शकतो? मृत्यूचा क्षण आला असताना शरीराला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न व्यर्थ आहे. गुरू नानक फार मोठे धर्मोपदेशक होते. त्यांच्यानंतर आलेल्या गुरूंनी भक्तीभावाचे भजन लिहिले परंतु अखेरीस त्यांनी त्याला गुरू नानकचे नाव दिले. ही भारताची संस्कृती आहे. बहुधा अशीच गोष्ट इतरही अनेक देशांमध्ये घडत असेल. ते काहीही असले तरी मी केवळ भारतीय संस्कृतीबद्दल बोलू शकतो. मिराबाई फार मोठी भक्त होती. अगणित भजनांच्या शेवटी मिराचे नाव सापडते. तिने आपले नाव वापरले नव्हते. परंतु मिराच्या अनुयायांना आपल्या निर्मितीला मिराचे नाव देण्यात फार मोठे समाधान मिळत होते. ही फार चांगली गोष्ट आहे. असे म्हणतात की अर्जुन देव (शिखांचे पाचवे गुरू) महान गुरू होते आणि महान कवीही होते. ते म्हणाले - "कोणी रामनाम म्हणतो, कोणी खुदाई, कोई सेवे गोसाईया कोणी अल्ला.". ग्रंथसाहेबमध्ये ही गोष्ट आहे. ही स्पृहणीय गोष्ट आहे. शिखांच्या विरोधात आज आरोप करण्यात येतो की ते ग्रंथसाहेबातील शिकवणुकीप्रमाणे वागत नाहीत. हा आरोप खरा आहे की नाही हे माहीत नाही. आणि असे केल्यामुळे ग्रंथसाहेबांची महत्ताही वाढू शकत

नाही. असे करून शिखांची प्रगतीही होऊ शकत नाही. काही शिख मित्रांशी माझी स्पष्ट चर्चा झाली. त्यांनी मला सांगितले की गुरू अर्जुन देव यांना राम आणि रहीममध्ये वा कृष्ण आणि करीममध्ये अंतर वाटत नव्हते. त्यानंतर ते म्हणाले की माणूस हजला गेला की तीर्थयात्रेला गेला तरी ती एकच गोष्ट आहे. माणूस पूजा करतो की आपली मान वाकवतो, कोणी देवळात पूजा करू शकतो आणि कोणी देवाच्या नावावर नतमस्तक होऊ शकतो, कोणी वेद वाचू शकतो आणि कोणी ग्रंथ. ग्रंथ म्हणजे कुराण. कोणी निळे कपडे घालू शकतो आणि कोणी पांढरे. मुसलमान निळे कपडे घालतात आणि सनातनी हिंदू पांढरे. एखाद्याला आपण हिंदू म्हणतो तर दुसऱ्याला तुर्क. तुर्क म्हणजे मुसलमान. (नानक) म्हणतात की जो माणूस खरोखर ईश्वरी मार्गाचे अनुसरण करतो त्यालाच ईश्वराचे रहस्य माहीत असते.

मला जर वेळ असता तर हिंदूंच्या भजनातील आणि किर्तनातील किती तरी गोष्टी सांगितल्या असत्या. त्या ऐकून या गोष्टी हिंदू धर्मातील आहेत की शीख धर्मातील असा प्रश्न पडून तुम्ही आश्चर्यचकित झाला असता. मुसलमानांनी हा देश सोडला पाहिजे असे आपण का म्हणतो? मुसलमानांना हिंदूबरोबर राहण्याची योजना हीच मुळात कॉंग्रेसची चौथी मोठी चूक होती असे का म्हणतात? कॉंग्रेस या योजनेची अंमलबजावणी करते की नाही हा प्रश्न वेगळा आहे परंतु ही माझी योजना आहे आणि जर ही चूक असेल तर ही माझी चूक आहे. इतर काही लोक माझ्याकडे आले आणि माझ्या महात्मेपणाला आव्हान देऊ लागले व हिंदू धर्माच्या विनाशाकरिता मला दूषण देऊ लागले. परंतु मी त्यांना सांगितले की तुम्ही जी माझी चूक आहे असे समजता ती चूक नाही. खरी गोष्ट ही आहे की आपणा सर्वांची आज वेड लागल्यागत अवस्था झाली आहे आणि आपण काहीबाही बडबडू लागलो आहो. आपले वेड जेव्हा दूर होईल तेव्हा आपण जे योग्य असेल ते बोलू लागू. यामुळेच मी म्हणतो की तुम्ही जिला चूक समजता ती चूक असू शकत नाही. ज्या लोकांना मी चुकतो आहे असे वाटते तेच चुकताहेत. तुम्ही जर साडेचार कोटी मुसलमानांना बाहेर काढले तर सगळे जग तुम्हाला दोष देईल. तेव्हा पाकिस्तानमध्ये काय सुरू आहे ते तुम्ही दाखवाल काय? पाकिस्तान आपला धर्म पाळत नाही म्हणून तुम्हीसुद्धा तुमचा धर्म टाकून द्यावा असे मी हिंदूंना शिकवू काय? अशी गोष्ट मी कधीही शिकलो नाही. आपण जर आपल्या मुसलमान भावांचे रक्षण केले व आपण पवित्र राहिलो तर त्याचाच पाकिस्तानवर परिणाम होईल. त्यांना माझे हे उत्तर आहे. ख्रिश्चन भगिनी राजकुमारी अमृत कौर, ज्यांना तुम्ही ओळखता, काय म्हणतात याचा तुम्ही विचार करा. त्या आरोग्यमंत्री आहेत. निर्वासितांच्या छावणीतील प्रत्येकाला, मग ते हिंदू असो की मुसलमान, मदत करण्याची त्यांची इच्छा आहे. परंतु इतरांचा पाठिंबा मिळाल्याशिवाय त्या काय करू शकतात. त्या पक्षपात करू शकत नाहीत. आपल्याकडून जे जास्तीत जास्त शक्य होईल ते करण्याची त्यांची इच्छा

आहे. त्या काही अंशी ख्रिश्चन, काही अंशी मुसलमान आणि काही अंशी हिंदू आहेत. यामुळे त्यांच्याकरिता सर्व धर्म समान आहेत. त्या तिथे काही मुलींबरोबर गेल्या. त्या सर्व तिथे सेवा करण्याच्या उद्देशाने गेल्या. त्या जर सेवा करण्याकरिता तिथे गेल्या असतील तर त्यांना घाबरण्याचे कारण काय? परंतु त्यांनी मला सांगितले की तिथे जे हिंदू- शीख आहेत त्यांनी मला मुसलमानांची सेवा करण्याच्या विरोधात खबरदारीची सूचना दिली व सांगितले की तुमचा हेतू जर मुसलमानांची सेवा करण्याचा असेल तर येथून परत जा. मी जेव्हा हे ऐकले तेव्हा मी हसलो. खरोखरी ते काहीही करणार नव्हते. अखेरीस ते मुसलमान आणि थोडेसे ख्रिश्चन हाणामारी करणार होते काय? ते तसे कसे करणार होते? त्यांच्याजवळ काय होते? आज तेच तर दुर्दशेत आहेत. त्यांना धमकावण्यात काय अर्थ आहे. यामुळे अशा प्रकारची वायफळ बडबड आपण करू नये आणि सावधगिरी बाळगावी म्हणून या गोष्टीचा तुमच्याजवळ उल्लेख करावा असे मला वाटले.

अखेरीस मी तुम्हाला सांगतो की मी हेतुपुरस्सर युद्धाचा उल्लेख केला आहे. परंतु आपल्या पत्रकारांना नेहमी अतिशयोक्ती करणे आवडते. मला युद्ध हवे आहे असे शिर्षकात त्यांनी छापले होते. गांधीसुद्धा युद्धाबद्दल बोलतात अशा तारा कलकत्त्याहून आल्या आहेत. मग युद्ध होणार आहे काय? स्वप्नातसुद्धा मी युद्धाची कल्पना करू शकत नाही असे मी म्हणालो होतो. अशा अडचणीच्या वेळी मी माझ्या धर्माचा त्याग करीन काय? माझा धर्म अहिंसा आहे. मी कधीही युद्ध पुकारले नाही आणि इतर कोणीही तसे करू नये. आपल्याला जे काम करायचे आहे ते लढाई करून कसे होणार आहे? भारत आणि पाकिस्तानचे स्वतंत्र सरकार असताना पाकिस्तान जर चुका करत असेल वा भारत चुका करत असेल तेव्हा एका देशाच्या सरकारला दुसऱ्या देशाच्या सरकारकडून न्याय मिळवण्याचा कोणता मार्ग आहे? जर हे दोन सरकार सहकार्याने काम करत असतील तर गोष्ट वेगळी आहे. ते जर एक होऊन काम करू शकत नसतील तर त्यांनी लवाद नेमावा. जर तेही शक्य नसेल तर निरुपायाने आपण युद्धाकडे ढकलले जाऊ. याचा अर्थ मी युद्धाचा पुरस्कार केला असा होतो काय? भारत आणि पाकिस्तान या दोघांनाही मला सांगायचे आहे की एक तर त्यांनी परस्परात तडजोड केली पाहिजे वा लवाद मान्य केला पाहिजे. परंतु पाकिस्तान भारताला शक्तीच्या बळावर घेऊ पाहील तर मी काल म्हणालो होतो त्याप्रमाणे भारतासमोर लढण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नसेल. मला जर सरकारची जबाबदारी देण्यात आली तर ना तर माझ्या हाताखाली ना सैन्य आहे ना पोलीस आहेत. माझा तर मार्ग वेगळा आहे. मला कोण पाठिंबा देईल? वेळ आली की जे करायला पाहिजे ते तुमचे सरकार करील. मी तर एकच गोष्ट सांगत राहीन. लोकांना जर अहिंसा कळू शकत नसेल तर मी कोणासमोर तिचे वर्णन करू?

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३५२-६

# १२६. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर, २८, १९४७

नवी दिल्ली,

सप्टेंबर २८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

कुराणमधील पाठ म्हणायला विरोध आहे असा कोणी या सभेत आहे काय? (दोन लोकांनी आपले हात वर केले.)

प्रार्थना झाली नाही तर बाकीच्या लोकांची निराशा होईल हे मला माहीत असूनही मी तुमच्या भावनांचा आदर करीन. (सप्टेंबर २९, १९४७च्या हिंदुस्तान टाईम्सचे वृत्त आहे की भाषणानंतर गांधीजींच्या खोलीत त्यांच्या सहकाऱ्यांसोबत प्रार्थना घेण्यात आली.) अहिंसेवरील माझ्या अढळ श्रद्धेमुळे मी दुसरे काहीही करू शकत नाही. असे असले तरीही मी म्हणेन की तुमच्या मताच्या विरोधात असलेल्या इतक्या मोठ्या लोकांच्या मताचा तुम्ही अनादर करायला नको. या दृष्टिकोनातून तुमचे वागणे योग्य नाही. मी नंतर जे काही सांगणार आहे त्यावरून तुमच्या लक्षात येईल की कुणाच्या तरी चिथावणीमुळे तुम्ही दाखवत असलेली असहिष्णुता ही देशातील चिडचिड आणि क्रोध यांनी भरलेल्या वातावरणाचा पुरावा आहे. आणि यामुळेच श्रीयुत चर्चिलना देशाबद्दल अनेक कटू गोष्टी बोलण्याची संधी मिळाली. चर्चिलच्या भाषणाचा रुटरने पाठवलेला सारांश आजच्या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झाला आहे तो मी तुम्हाला हिंदुस्तानीत समजावून सांगेन. (चर्चिलच्या २७ सप्टेंबरच्या भाषणातील परिच्छेद महात्मामधून घेतला आहे.)

*भारतामध्ये ज्या भयावह कत्तली सुरू आहेत त्याचे मला आश्चर्य वाटत नाही. सुरू असलेल्या परस्परांच्या या क्रूर आणि भयावह कत्तली ही तर केवळ सुरूवात आहे. नरमांसभक्षकांच्या क्रूरपणाने या कत्तली व रक्तपात त्या जमाती करत आहेत ज्यांच्यामध्ये सर्वोच्च संस्कृतीला जन्म देण्याची क्षमता आहे आणि ब्रिटिश राजमुकुट आणि संसद यांच्या सहिष्णू आणि निपक्षपाती राज्यात ज्या जमाती पिढ्यांपिढ्या जवळजवळ संपूर्ण शांततेत राहत होत्या. जगाचा हा भाग गत साठ वा सत्तर वर्षांपासून सर्वाधिक शांत होता परंतु मला भीती आहे की भविष्यात त्याची लोकसंख्या सर्व ठिकाणी कमी होणार आहे. आणि लोकसंख्या कमी होण्याबरोबरच या विशाल देशाच्या संस्कृतीचा जो ऱ्हास होईल ती आशीयातील सर्वात दुःखद आणि नैराश्यपूर्ण घटना होईल.*

तुम्हा सर्वांना माहीतच आहे की चर्चिल हे महापुरुष आहेत. ते इंग्लंडच्या राजघराण्याच्या रक्ताचे आहेत. ब्रिटिशांच्या इतिहासात मार्लबरो कुटुंब फार प्रसिद्ध आहे. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर ब्रिटिश साम्राज्य जेव्हा संकटात सापडले होते तेव्हा त्यांनी सत्तेची धुरा सांभाळली होती. त्या वेळी ब्रिटिश साम्राज्यावर आलेल्या संकटातून चर्चिलनीच त्याला वाचवले होते यात काही संशय नाही. संयुक्त राज्य अमेरिका आणि मित्र राष्ट्रांच्या मदतीशिवाय इंग्लड जिंकू शकला नसता असे म्हणणे चूक आहे. चर्चिलच्या तीक्ष्ण राजकीय मुत्सद्देगिरीशिवाय या सर्व राष्ट्रांना एकत्रित कोणी आणले असते? त्या काळात ब्रिटनची प्रतिष्ठा जपणाऱ्या चर्चिलच्या सेवेचा ग्रेट ब्रिटनने गौरव केला. परंतु युद्धाच्या दरम्यान इंग्लंडमध्ये जी प्रचंड जिवित आणि वित्तहानी झाली होती तिच्यातून बाहेर पडण्याकरिता इंग्लंडने मजूर पक्षाला निसंकोचपणे सत्ता सोपवली. ब्रिटिशांनी काळाची पावले ओळखली आणि स्वतःहोऊन साम्राज्य तोडण्याचा व बाहेरून न दिसणारी मनोमिलनाची अभेद्य शासन व्यवस्था निर्माण करण्याचा निर्णय घेतला. भारताचे विभाजन झाले आणि दोन्ही देशांनी स्वतःहोऊन ब्रिटिश राष्ट्रकुलात सामील होण्याचा निर्णय घेतला. हिंदुस्तानला स्वतंत्र करण्याचा निर्णय ब्रिटनमधील सर्व पक्षांनी मिळून घेतला आणि या कामात चर्चिल आणि त्यांच्या पक्षाचे लोकही सहभागी होते. ब्रिटिशांनी उचललेले हे पाऊल भविष्यात योग्य ठरते की नाही ही गोष्ट वेगळी. श्रीयुत चर्चिल हे सत्तेच्या हस्तांतरणाच्या कामात सहभागी असल्यामुळे या सत्तांतराच्या मूल्याला धक्का लागेल असे काहीही न करणे श्रीयुत चर्चिलकडून अपेक्षित आहे असा जो सल्ला मी दिला होता त्याच्याशी याचे काहीही देणेघेणे नाही. ब्रिटिशांनी केलेल्या सत्तेच्या हस्तांतरणाशी तुलना करता येईल असे आधुनिक इतिहासात एकही उदाहरण नाही यात काहीही संशय नाही. प्रियदर्शी अशोकने केलेल्या त्यागाची अशा वेळी मला आठवण येते. परंतु अशोकाची कृती अतुल्य आहेत आणि हे उदाहरणही आधुनिक इतिहासातील नाही. यामुळेच चर्चिलच्या भाषणाचा रुटरने पाठवलेला सार वाचून मी दुखावलो. रुटर ही ख्यातनाम वृत्तसंस्था चर्चिलच्या भाषणाचा चुकीचा वत्तांत देणार नाही असे मी गृहीत धरले आहे. चर्चिलनी आपल्या देशाची महान सेवा केली होती परंतु या भाषणाने त्यांनी आपल्या देशाची हानी केली आहे. चर्चिलना जर माहीत होते की ब्रिटिश राज्यातून भारताला स्वतंत्र केल्यानंतर भारताची अशी भयानक दुर्दशा होईल तर याची संपूर्ण जबाबदारी ब्रिटिश साम्राज्याची बांधणी करणारांची आहे व त्या “जमातींची” नाही ज्यांच्यात “महानतम संस्कृतीला जन्म देण्याची क्षमता आहे” हे चर्चिलना माहीत नव्हते काय? माझ्या मते सरसकट विधान करण्यात चर्चिलनी फार घाई केली आहे. भारताची लोकसंख्या किती तरी करोड आहे. त्यांतील काही लाख लोकांनी पाशवी मार्ग अवलंबिला आहे. ही संख्या नगण्य आहे. मी चर्चिलना भारतात येण्याचे आणि येथील परिस्थितीचा अभ्यास करण्याचे खात्रीपूर्वक निमंत्रण देतो. परंतु त्यांनी काही खास पूर्वग्रह

बाळगून आणि आपल्या पक्षाचे प्रतिनिधी म्हणून इथे यायला नको तर असे निपक्षपाती इंग्रज गृहस्थ म्हणून यायला पाहिजे की ज्याच्याकरिता देशाची प्रतिष्ठा पक्षप्रतिष्ठेपेक्षा अधिक मोलाची असेल आणि ब्रिटिश सरकारला त्यांच्या या कामात देदिप्यमान यश मिळवून देण्याकरिता मदत करण्याची इच्छा असेल. ग्रेटब्रिटनच्या या विशेष पावलाची परीक्षा त्याच्या परिणामावरून होईल. हिंदुस्तानच्या विभाजनाने या दोन भागांना परस्परांशी भाडण्याकरिता अपरिहार्यपणे निमंत्रिले आहे. दोन भागांना स्वतंत्रपणे स्वराज्य देणे  ही गोष्ट स्वातंत्र्याच्या उदात्त देणगीला लागलेल्या कलंकासारखी वाटते. दोनपैकी कोणताही भाग राष्ट्रकुलातून बाहेर पडण्याला स्वतंत्र आहे या म्हणण्याला काहीही अर्थ नाही. हे म्हणणे सोपे परंतु करणे कठीण आहे. या विषयावर मी अधिक बोलणार नाही. श्रीयुत चर्चिलनी या विषयावर बोलताना आपली वक्तव्ये अधिक काळजीपूर्वक केली पाहिजे हे मी जे काही म्हणालो त्यावरून स्पष्ट झालेच असेल. परिस्थिती काय आहे याची चौकशी करण्याआधीच त्यांनी आपल्या सहकाऱ्यांची निंदा केली आहे.

चर्चिलनी असे वक्तव्य देण्याकरिता तुमच्यापैकी अनेकांनी संधी दिली आहे. श्रीयुत चर्चिल यांचे भविष्यकथन खोटे ठरवण्याकरिता आपल्या मार्गात सुधारणा करण्याकरिता तुमच्याजवळ अजूनही भरपूर वेळ आहे. मला माहीत आहे की आजकाल माझे कोणीही ऐकत नाही. असे नसते आणि स्वातंत्र्याकरिता वाटाघाटी सुरू होण्यापूर्वी लोक माझे जसे ऐकत होते तसे ऐकत राहिले असते तर ज्या पाशवीपणाचे रस घेऊन श्रीयुत चर्चिलनी अतिरंजित वर्णन केले तो पाशवीपणा कधीही घडला नसता. आणि तुम्हीसुद्धा आर्थिक आणि घरगुती समस्या सोडवण्याच्या मार्गाला लागला असता.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३५६-९

# १२७. प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर ३०, १९४७

नवी दिल्ली,

सप्टेंबर ३०, १९४७

मला वाटते की आपण सर्व दानव झालो आहो. आज हिंदू आणि मुसलमान दोघेही दानव झाले आहेत. कोणी कमी केले आणि कोणी जास्त असे कोणी कोणाला म्हणावे? कोणी कमी मारले आणि कोणी जास्त. यात आम्ही जाऊ शकत नाही. सरकारने पाकिस्तानमधून निर्वासितांना आणले पाहिजे आणि असे ते दुसऱ्या सरकारशी वाटाघाटी करूनच करू शकते. या सर्व अडचणी आहेत. परंतु सरकार बनले आहे तेच मुळी अडचणी सोडवण्याकरिता. शासनांतर्गत जे लोक राहतात त्यांचे रक्षण करणे शासनाचा धर्म असतो आणि सरकार असे करू शकत नसेल तर त्याने राजीनामा दिला पाहिजे. याबाबत मला किंचितही शंका नाही. आज आपले सरकार असे आहे की ज्याला आपण मजबूत करू शकतो वा पदच्यूत करू शकतो. यालाच लोकशाही म्हणतात. जनतेने स्वतःच संयमाने वागायला पाहिजे आणि नियंत्रणात राहायला पाहिजे. त्यांना शिस्तीचा अर्थ कळला पाहिजे व तिचे पालन केले पाहिजे. ते जर असे करणार नाही तर त्यांना काहीही किंमत राहणार नाही. आपल्याला आपले कर्तव्य पार पाडायचे असेल तर आपण हे शिकलो पाहिजे. मुलांना थोडेफार समजू लागल्यापासूनच आपण ही गोष्ट आपल्या मुलांमध्येही रुजवली पाहिजे. तुम्ही तुमच्या मुलांना सांगितले पाहिजे की धर्माचे स्थान तुमच्या हृदयात आहे व मी त्याचे रक्षण करू शकत नाही. तुम्ही त्यांना सांगितले पाहिजे की मी तुमचा वडील आहे आणि आपल्या मुलांना, मुलींना प्रशिक्षण देणे वडिलांचे काम असते. तुमच्या धर्माचे रक्षण तुम्ही स्वतःच केले पाहिजे असे मी माझ्या मुलांना शिकवले होते. माझा एक मुलगा दक्षिण आफ्रिकेत आहे (मणिलाल गांधी). दुसरा दूर कुठे तरी पीत असेल. तो कुठे आहे हेसुद्धा मला माहीत नाही. एक मुलगा नागपूरला आहे (रामदास गांधी) . तो बिचारा मोठ्या मुश्किलीने आपले पोट भरतो. एक मुलगा इथे आहे (देवदास गांधी). तो मुश्किलीने आजिविका कमावतो आहे असे मी म्हणू शकत नाही. त्या प्रत्येकाच्या धर्माची मी काळजी करत बसलो पाहिजे काय? मी काळजी करत नाही. आणि मी काळजी का करावी? ते सर्व मोठे झालेले आहेत. ते जर लहान असते तर त्यांच्या धर्माचे रक्षण मी करू शकलो असतो. आणि तेसुद्धा कोणत्या पद्धतीने? मी त्यांना सांगितले असते की तुम्ही जर खरे हिंदू असाल तर तुमच्या धर्माकरिता मरण्याचे साहस तुमच्यात असले पाहिजे, तुम्ही हत्या करून त्याचे रक्षण करू शकत नाही. आता कल्पना करा की एका मुलाजवळ लाठी आहे आणि दुसऱ्याजवळ बंदूक. बंदूक असलेला मुलगा लाठी असलेल्या

मुलाला मारू शकेल.  परंतु धर्माचे रक्षण करण्याचा हा मार्ग नाही. का? लाठीवाला मुलगा मारला गेल्याबरोबर त्याचे नातलग येतात. रिव्हॉल्व्हरवाला मुलगा एकटा असल्यामुळे तो ब्रेनगन वा स्टेनगन आणतो. आणि विरुद्ध पक्षाचे लोक दहा स्टेनगन आणतील. ते त्याला इस्लामचा वा ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करण्याकरिता बळजबरी करतील आणि आपल्या संख्येच्याबळावर त्याला धाक दाखवतील व म्हणतील की तुझी रिव्हाल्व्हर तुला वाचवू शकणार नाही. आणि त्यानंतर तो घाबरलेला मुलगा रडत रडत म्हणेल की तुम्ही जरी माझ्यावर बळजबरी करत आहा तरी माझ्या जिवापेक्षाही मला माझा धर्म प्रिय आहे. एखाद्या धर्माचे अनुसरण करणे म्हणजे आपण ईश्वराचे होणे. हीच गोष्ट प्रह्लादच्या बाबतीत घडली होती. तो रामनामाचा जप करत होता. त्याचे वडील तो थांबण्याकरिता सांगत होते. परंतु प्रह्लाद म्हणाला की मी दुसरे कोणतेही नाव घेऊ शकत नाही. याबद्दल एक भजन आहे, किती सुंदर आहे ते! - प्रह्लादला त्याचे गुरू पाटीवर दुसरे नाव लिहायला सांगत असताना प्रह्लाद मात्र रामनामच लिहितो. तो म्हणतो की मी दुसरे कोणतेही नाव लिहू शकत नाही. माझ्या लेखणीला दुसरे नाव लिहिताच येत नाही. आणि मला दुसरे नाव येत नाही. असे म्हणतात की प्रह्लाद त्या वेळी केवळ बारा वर्षांचा होता. तर त्या बारा वर्षाच्या मुलाने आपला धर्म वाचवला आणि आपल्या वडिलांना विरोध केला. त्याने आपल्या धर्माचे कसे रक्षण केले हे वर्णन करून सांगण्याची आवश्यकता नाही. सर्व हिंदूंना ही गोष्ट माहीत आहे. परंतु महत्त्वाची गोष्ट ही आहे की प्रह्लादने आपल्या धर्माचे रक्षण स्वतःच्या बळावर केले. अशा प्रकारची अगणित उदाहरणे प्रत्येक धर्मात सापडू शकतात. आता आमच्या मुलामुलींना घ्या. काही म्हणतात की स्त्रिया अबला आहेत. पण माझे म्हणणे की जगात कोणीही अबला नाही, सर्व सबला आहेत. ज्यांच्या अंतःकरणात आपल्या धर्माविषयी दृढ निष्ठा असेल ते सर्व सबळ आहेत, ते दुर्बल नाहीत. यामुळे आपल्या मुलामुलींना आपण तुम्ही दुर्बल नाही, सबळ आहा हे सर्वात आधी शिकवले पाहिजे. मुलांचा धर्म मुलांजवळ आहे. लोक जेव्हा माझ्याकडे येतात तेव्हा मी त्यांना सांगतो की सरकार जर काही करणार नाही तर सर्वच्या सर्व इस्लाममध्ये जातील असे म्हणणे चूक आहे. आज भारतात करोडो मुसलमान राहत आहेत. ते कोण आहेत याचा आपण सूक्ष्म अभ्यास केला पाहिजे. त्यांच्यातील अनेक अरबस्तानमधून आलेले नाहीत. जे अरबस्तानमधून आले त्यांची संख्या काही लाखातच असेल. बाकी जे करोडो मुसलमान आहेत ते सर्व हिंदू होते. वा असे म्हणा की ते बौद्ध धर्मीय होते. बौद्ध धर्मीय आणि हिंदू यांच्यात काय फरक आहे? माझ्या दृष्टिकोनातून कोणतेही अंतर नाही. अफगाणीस्तानमध्ये याची तर सगळ्याना कल्पना असायला पाहिजे की नाही? बादशाह खाननी मला सांगितले की आम्ही तर आधी बौद्ध होतो. नंतर इस्लाममध्ये आलो. यामुळे आमची जी जुनी संस्कृती होती तिचा आम्हाला थोडाच विसर पडू शकतो. त्यांनी मला सांगितले की त्यांच्या गावांची नावांचे मूळसुद्धा संस्कृमधील आहे. त्यांनी त्यांची

नावे, त्यांचा पोषाख आणि इतर सर्व काही बदलले परंतु आत जे खोलवर रुजलेले आहे ते ते बदलवू शकले नाही. ते  ते कसे विसरू शकतात? आणि मद्रास म्हणा की बंगाल म्हणा वा इतरत्र कुठेही म्हणा ते सर्व हिंदू होते. मी जसा मला स्वतःला विचारतो तसे तुम्ही त्यांना विचारा की तुम्ही इस्लामचा स्वीकार का केला. त्यांनी धर्मांतर करून इस्लामचा स्वीकार केला याकरिता मी स्वतःलाच दोष दिला पाहिजे. याकरिता मला स्वतःला प्रायश्चित्त करावे लागेल, तुम्हालासुद्धा करावे लागेल. त्यांनी जर योग्य ते केले असेल आणि हिंदू धर्मापेक्षा उदात्त धर्म स्वीकारला असेल तर आपणही त्यांच्या पावलावर पाऊल टाकायला पाहिजे होते, कलमा म्हणायला पाहिजे होता, इस्लामच्या नावाने शपथ घेतली पाहिजे होती आणि इस्लामचा जयघोष करायला पाहिजे होता! परंतु असे काहीही घडले नाही. यामुळे मी कोणाला मारपीट केली पाहिजे आणि कोणाला काढून टाकले पाहिजे? ते आपलेच लोक आहेत. आपल्या आजोबांच्या पणजोबांच्या काळात ते हिंदू होते. असे समजा की चार पिढ्यांपूर्वी त्यांनी इस्लाम धर्मात प्रवेश केला होता. सर्वत्र फिरून हिंदू धर्माच्या लोकांना मी सांगितले आहे की लक्षात ठेवा अस्पृश्यतेला धर्माचा भाग समजणे हा तुमचा फार मोठा अधमपणा आहे. त्याचा काय परिणाम झाला? समाजाचा एक भाग पंचम वर्ण झाला. मुळात चार वर्ण होते. आपण त्याचे पाच वर्ण केले व पाचव्या वर्णाला अतिशुद्र नाव दिले. पाचवा वर्णाला आपण आपल्यापासून वेगळे ठेवले. त्यांचे अन्न आपण वेगळे ठेवले व तुम्ही आमच्यामध्ये राहू शकत नाही असे घोषित केले. त्यांना गुलामाप्रमाणे वागवण्याचा आपण निर्णय घेतला. नंतर ते इस्लामकडे वळले. अशा प्रकारे त्यांच्यापैकी सर्व मूळचे मुसलमान नव्हते. त्यानंतर काही ब्राह्मणांनीही इस्लाम स्वीकारला. वैश्य आणि शुद्रांमधून फार कमी लोकांनी इस्लामचा स्वीकार केला. सध्याच्या करोडो मुसलमानांनी इस्लाम धर्माचा कसा स्वीकार केला हे मी तुम्हाला दाखवले आहे.अस्पृश्यतेने त्यांना इस्लामकडे ढकलले. मुसलमानांना मारहाण करून आणि सर्व प्रकारे त्रास देऊन त्यांना भारतातून घालवले पाहिजे असा आज आपण आक्रोश करत आहो. त्यांना कुठे हाकलले पाहिजे आणि कुठे ढकलले पहिजे याचा विचार करण्याची कोणाचीही तयार नाही. आपण लक्षात ठेवले पाहिजे की कोणावर तरी जेव्हा हल्ला होतो व इस्लाम स्वीकारण्याकरिता त्याला भाग पाडण्यात येते तेव्हा त्याचा कोणताही दोष नसताना त्याचा सर्वनाश होतो. परंतु मी मुसलमानांमध्ये हिंडलोफिरलो आहे आणि माझे मुसलमान मित्र मला सांगतात की इस्लाम बळजबरीच्या धर्मांतराचा कधीही पुरस्कार करत नाही. लोकांना स्वतःहोऊन इस्लामचा स्वीकार करायचा असेल तर ते करू शकतात. इस्लामच्या महत्तेविषयी त्यांना जाणीव करून देण्यात आलेली असू शकेल. धोका देऊन वा फसवणूक करून वा पैसे देऊन लोकांना इस्लाममध्ये आणता येऊ शकत नाही. या देशातील सर्व मुसलमान आपले रक्ताचे भाऊबंद आहेत. म्हणूनच माझे म्हणणे आहे की आपण विचार करून कृती

केली पाहिजे. ते लोक इस्लामकडे का ओढले गेले होते याचा आपण विचार केला पाहिजे. त्यांनी पैशाकरिता इस्लाम कबूल केला काय? तुम्हाला जर पैसा मिळवायचा असेल वा इतर काही करायचे असेल तर जगात इतरत्र कुठेही जा आणि तुमच्यासोबत तुमचा धर्म न्या. जर तुम्ही तो धर्म सोडला तर तुम्ही सर्व काही सोडले. मला तुम्हाला एकच गोष्ट सांगायची आहे आणि ती म्हणजे तुम्ही एकाही मुसलमानाला मारण्याचा प्रयत्न करू नये. त्यांना जर मारायचे असेल तर मारू द्या. ते जर मारतील तर ती वाईट गोष्ट असेल. आपण ते वाईट आहेत असे म्हणू. परंतु ते जर वाईट असतील तर त्याचे उत्तर म्हणून आपणही का वाईट झालो पाहिजे. आपण त्यांच्या अधमपणाचे उत्तर चांगुलपणाने दिले पाहिजे. ते दारू पीत असतील तर आपणही दारू प्यावी? ते बाहेरख्याली असेल तर आपणही बाहेरख्याली व्हावे? ते जुगार खेळत असतील तर आपणही जुगारी व्हावे? एक माणूस तलवार काढत असेल तर आपणही तलवार काढावी? आणि तो मुलांना मारत असेल तर आपणही मुलांना मारावे? तो मुलींना पळवत असेल तर आपणही त्याच्या मुलींना पळवावे? असे झाले तर त्यांच्यात आणि आपल्यात अंतर काय राहिले? मला तर काही अंतर दिसत नाही. मी तर म्हणतो की "अरे मुसलमानांनो, हिंदूंनो आणि शिखांनो धर्म काय शिकवतो ते काही तर समजून घ्या." इकबाल म्हणाले आहेत की "मजहब नही सिखाता आपस में बैर करना" धर्म आपसात वैर करणे शिकवत नाही. इकबाल असे म्हणाले होते तेव्हा मी लंडनमध्ये राहत होतो. ते फार मोठे कवी होते. त्या वेळी ते गोलमेज परिषदेत आलेले होते. तिथे त्यांच्याकरिता मेजवानी ठेवण्यात आली होती व त्यात मलाही बोलावण्यात आले होते. ते म्हणाले की मी ब्राह्मण आहे. ते ब्राह्मण का होते? कारण त्यांचे पूर्वज ब्राह्मण होते. ते कुठे राहत होते? काश्मीरमध्ये. ते म्हणाले की मी काश्मीरी आहे आणि ब्राह्मण आहे व त्यांनी इस्लाममध्ये धर्मांतर होते. त्या सर्वांनी धर्मांतर केले होते पण ते इतक्यातच नाही तर किती तरी वर्षांपूर्वी. परंतु त्यांच्यात ब्राह्मण रक्त आणि इस्लामी संस्कृती आहे. यामुळे इकबाल म्हणाले की धर्म आपल्याला शत्रुत्व करणे शिकवत नाही. त्यानंतर त्यांनी किती तरी गोष्टी लिहिल्या. परंतु ती वेगळी गोष्ट आहे. आता इकबाल नाहीत. परंतु आपला धर्म शत्रुत्व करणे शिकवत नाही कमीतकमी आपण इतके शिकू या. म्हणूनच म्हणतो की आपण माणूस झालो पाहिजे. आपण माणूस झालो तर भारताला उंच नेऊ. आज तर आम्ही हिंदुस्तानचे अधःपतन करत आहो. हिंदुस्तानचा आमच्या हातून कधीही अधःपात होऊ नये अशी ईश्वराने कृपा करावी.

प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३६०-६५

# १२८. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर १, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एका भगिनीने मला काल पत्र लिहिले की मी काही सेवा करू इच्छिते आणि माझ्या पतीचीसुद्धा काही सेवा करण्याची इच्छा आहे. परंतु काय सेवा करावी हे कोणीही सांगत नाही. असे अनेक लोक आहेत की जे असे प्रश्न विचारतात. मी सर्वांना एकच उत्तर देत असतो आणि ते म्हणजे सरकारी नोकऱ्या फार मर्यादित आहेत आणि जनसेवेच्या कामाचा व्याप विशाल आहे. यामुळे काय पाहिजे हे कोणालाही विचारण्याची गरज नाही. ज्या कोणाची सेवा करण्याची इच्छा असेल तो सेवा करू शकतो. परंतु आपण इतके परावलंबी झालो आहो की या बाबतीतही आपल्याला इतरांना विचारावे लागते. असे असल्यामुळे काय केले पाहिजे हे मी त्यांना सांगितले पाहिजे काय? एक स्वच्छ शहर म्हणून दिल्लीला अखेरीस कितपत प्रतिष्ठा आहे? इथे किती तरी छावण्या आहेत आणि त्या किती स्वच्छ आहेत हे मला माहीत आहे. तिथे असताना लोक आजारी पडतात. रक्तपात आणि संपत्तीची नासधूस करण्यात आलेल्या ठिकाणीसुद्धा तशीच घाण आहे. स्वच्छतेकरिता दिल्ली नगरपालिका कधीही प्रसिद्ध नव्हती. दिल्ली जर स्वच्छ शहर असते तर दिल्लीच्या लोकांची मनेसुद्धा स्वच्छ असती. आपण कुठेही असलो तरी आपण आपले ठिकाण स्वच्छ ठेवले तर त्याचा प्रभाव संपूर्ण शहरावर पडल्याशिवाय राहणार नाही. प्रत्येक माणसाने आपले स्वतःचे घर, स्वतःचे अंतःकरण स्वच्छ ठेवले पाहिजे. मी त्या बाईंना म्हणेन की केवळ नावाकरिता नाही तर खरोखरच भक्तिभावाने तुम्ही सेवा करण्याकरिता उत्सुक असाल तर दिल्लीत सेवा करण्याकरिता भरपूर संधी आहे. आणि तुम्हाला तुमच्या कामाबद्दल मला कळवण्याचीसुद्धा आवश्यकता नाही. त्या जर दिल्लीतील लोकांची अंतःकरणे शुद्ध करण्याकरिता काम करू शकल्या, इथल्या निर्वासितांची अतःकरणे शुद्ध करू शकल्या तर त्यांनी फार मोठे काम केले असे म्हणावे लागेल. आणि असे झाले तर त्यांची आणि त्यांच्या नवऱ्याची जोडी आदर्श होईल. इतर लोक त्यांचे उदाहरण गिरवू लागतील.

मला नुकताच दोन तारा मिळाल्या. त्यातील एक तार मुसलमान मित्राची आहे. ते म्हणतात की असे वाटते की हिंदुस्तानातील हिंदू-मुसलमान अतिशय समंजस लोक आहेत आणि हिंदू आणि मुसलमान गुण्यागोविंदाप्रमाणे राहतात. परंतु आता असे काय घडले आहे की हिंदू मुसलमान सोबत

बसू शकत नाहीत व ते परस्परांशी भांडत आहेत, परस्परांची हत्त्या करत आहेत व रानटीपणाचे वर्तन करत आहेत? आपण दिल्लीचेच उदाहरण घेऊ या. मुसलमानांनी भारतीय संघराज्याशी निष्ठा जाहीर केली तर दिल्लीतील हिंदू आणि शीख मुसलमानांना जवळ करण्याकरिता तयार आहेत. ज्यांची संघराज्यात राहण्याची तयारी आहे, मग तो मी असो वा तुम्ही असो वा अजून कोणी असो त्याने या गोष्टीचे पालन केलेच पाहिजे. ही अट केवळ मुसलमानांनाच लागू होत नाही तर सर्वांना लागू होते. शिवाय मुसलमानांजवळ भरपूर शस्त्र आहेत. त्यातील बराच साठा हस्तगत करण्यात आला आहे. परंतु सर्व शस्त्रे सुपूर्द करण्यात आलेली नाहीत पोलिसांच्या मदतीने शोध सुरू आहे. तर ते जर अंतःकरणापासून प्रामाणिक असतील व भारताविरुद्ध लढण्याची त्यांची इच्छा नसेल तर त्यांनी संघराज्याशी निष्ठावंत असले पाहिजे. इतकेच नाही तर एखादी मुसलमान सत्ता भारतावर हल्ला करत असेल तर त्यांनी तिच्याविरुद्ध लढण्याचीसुद्धा तयारी ठेवली पाहिजे. आणि जर त्यांची भारताविरुद्ध लढण्याची इच्छा नसेल तर त्यांना शस्त्रांची गरज काय? इथे काही थोडे ख्रिश्चनही राहतात. जर्मनी वा दुसऱ्या कोणत्याही ख्रिश्चन देशाशी युद्ध झाले तर त्यांनासुद्धा संघराज्याच्या बाजूने लढावे लागेल आणि देशाला निष्ठा वाहावी लागेल. मुसलमानांनी जर देशाला निष्ठा वाहिलेली असेल तर त्यांना शस्त्रांची गरज काय? त्यांनी स्वतःहोऊन आपल्याजवळची शस्त्रे सरकारला दिली पाहिजे. हे सर्व ठीक आहे. परंतु हे ज्या प्रकारे म्हणण्यात येते ते विषारी आहे. आज छावण्यामध्ये जवळपास ५०,००० मुसलमान आहेत. त्यांना आपण दिल्लीमधून घालवले आहे. काहींची हत्या झाली आहे. माणूस कितीही शूर असला तरी तो मृत्यूचे स्वागत करत नसतो. काहींना व्यवसाय वा अजून काही करण्याची इच्छा असू शकेल. निदान आपण जिवंत राहू यातच तो समाधान मानत असतो. इथून पळून गेल्यानंतर ते कुठे जातील? यामुळे त्यांनी पुराना किल्ल्यात आणि हुमायूनच्या थडग्याजवळील मैदानात आश्रय घेतला आहे. त्यांना पावसात भिजत राहावे लागते आणि इतर अनेक अडचणी सहन कराव्या लागतात. त्यांना योग्य औषधोपचारसुद्धा मिळू शकत नाही. डॉ. सुशिला नाय्यर मला त्यांच्या अवस्थेचा अहवाल देत असतात. त्या त्यांना दररोज ४ तास देतात. निर्वासितांमध्ये अनेक गरोदर स्त्रिया आहेत. त्या स्त्रियांचे बाळंतपण करावे लागते. याकरिता काही दायांची गरज आहे. याशिवाय काही औषध व इतर अनेक गोष्टींची आवश्यकता आहे. या सर्व गोष्टींची व्यवस्था करायला वेळ लागतो. या लोकांना अशा परिस्थितीत का राहावे लागते? हिंदू म्हणतात की आम्ही त्यांना बाहेर हाकलले आणि असे करण्यात आम्ही कोणतीही चूक केलेली नाही. ते जर देशाला निष्ठा वाहणार असतील तर त्यांना परत आणता येईल. मी म्हणतो की जेव्हा त्यांची अंतःकरणे शुद्ध होतील तेव्हाच त्यांना देशात आणता येईल. मान्य करू की मुसलमानांना देशाबद्दल निष्ठा वाटत नाही व ते शस्त्र सुपूर्द करण्याकरिता तयार नाहीत. याचा अर्थ असा आहे काय त्यांची कत्तल केली जावी? भारतात चार ते

साडे चार कोटी मुसलमान आहेत. यापैकी कल्पना करा की एक लाख वा एक कोटी मुसलमानांनी आपली शस्त्रे लपवून ठेवलेली आहेत. त्यांच्या घरात लपवलेल्या शस्त्रांचा शोध घेता येईल इतकी शक्ती तुमच्या पोलिसांमध्ये, सैन्यामध्ये नाही काय? आता पोलिसांची ब्रिटिशांशी बांधिलकी नाही. मुसलमानांची कत्तल करण्याचा, त्यांच्या बायकामुलांना मारण्याचा काय परिणाम होईल हे तुम्हाला कळले पाहिजे. मी तुम्हाला आधीच सांगितले आहे की आपला अधःपात होत आहे. १५ ऑगस्ट १९४७ला आपण जेव्हा स्वातंत्र्यदिन साजरा केला तेव्हा आपण स्वतंत्र राष्ट्र झालो. त्यानंतर काही दिवस आपण भावाभावांप्रमाणे राहिलो. त्या वेळी सर्व काही चांगले वाटत होते. परंतु आपण भाऊभाऊ आहो हे आता आपण विसरलो. ते जर आपली हत्या करत असतील तर तो मुस्लीम लीगचा दोष असेल. मनात राग भरलेला होता. परंतु स्वातंत्र्याच्या झळाळीत ते आपले शत्रू आहेत हे आपण विसरलो. मला कलकत्त्यात हे दिसून आले. हीच परिस्थिती संपूर्ण देशात होती. परंतु ती भावना लवकरच विरून गेली आणि मुसलमान शीख आणि हिंदूंची कत्तल करण्याच्या व त्यांना हाकलून देण्याच्या मनस्थितीत आले.

मी आधीच सांगितले आहे की त्या दोन अटीत आपण अजून एका अटीची भर घातली तर आपण आपले काम शांततापूर्वक करू शकू. आपण कायदा हातात घेऊ नये ही ती अट आहे. त्यांना शिक्षा करण्याचे आपले काम नव्हते. आपण भानावर नव्हतो हे आपण मान्य केले पाहिजे. मुस्लीम लीगने आधी मूर्खपणा केला. परंतु एक स्वार काही कारणाने घोड्यावरून पडला तर दुसऱ्या स्वारानेही घोड्यावरून पडायला पाहिजे काय? असे केले तर दोघांचाही नाश होईल. अशा प्रकारे आपण त्यांच्याशी लढायला पाहिजे काय? कोणत्या बाबतीत आपण त्यांच्याशी स्पर्धा केली पाहिजे? मी आधीच म्हणालो त्याप्रमाणे त्यांच्यात जितका चांगुलपणा आहे त्यापेक्षा जास्त चांगुलपणा आपण आपल्यामध्ये बाणवला पाहिजे. परंतु जितका वाईटपणा त्यांच्यात आहे तितकेच वाईट आपण होऊ आणि वाईटपणाच्या बाबतीत आपण त्यांच्याशी स्पर्धा करू तर त्यामुळे त्यांच्याबरोबर आपलाही अधःपात होईल. जर ते चुकीच्या गोष्टी करत असतील तर आपले सरकार ते ठीक करील. आपले सरकार पाहील की आपला कोणी माणूस पाकिस्तानमध्ये पडला आहे, मग तो हिंदू, शीख, ख्रिश्चन वा अजून कोणी असो, तो तिथे अल्पसंख्य आहे व त्यांचे तिथे संपूर्ण संरक्षण मिळत नसेल, त्यांना तिथे कापून टाकले जात असेल, त्यांच्या मुलींना पळवून नेले जात असेल, त्यांचा जमीनजुमला आणि संपत्ती हिरावून घेतली जात असेल आणि बळजबरीने त्यांच्यावर इस्लाम लादला जात असेल तर त्याचे उत्तर आपले सरकार देईल. उत्तर द्यायला सरकारला सांगा. ते तर आमच्या मदतीकरिता आहे. उत्तर देणारे आपण कोण? उत्तर देण्याचा प्रयत्न करून आपण स्वतःच दुष्ट होतो. आपण कधीही दुष्ट होणार नाही. स्वातंत्र्याची ही फार मोठी खूण आहे. त्यात आपण

पूर्णपणे अनुत्तीर्ण झालो आहो. त्याचा काय परिणाम झाला? माझ्या मनात येते की आपल्यापैकी काही खरोखरच खुनी झाले आहेत, ते कोण आहेत हे तर मला माहीत नाही, परंतु ते तसे आहेत हे निश्चित, आणि ते योजनाबद्ध पद्धतीने ते खून करत आहेत, जाळपोळ करत आहेत व बळजबरीने इमारतीमध्ये घुसून त्या ताब्यात घेत आहेत. ते कुठे आहेत हे मला माहीत नाही परंतु ते हे काम करत आहेत. यामुळे आपला अधःपात होतो आहे. यामुळे आपल्याला कबूल करावे लागते की अशा प्रकारे (बदला घेण्याचा) प्रयत्न करणे हा मूर्खपणा आहे. या अविवेकीपणातून आपण मुक्त होऊ या व तिथे जे लोक राहिले आहेत त्यांना परत आणू या. सरकारने असा प्रयत्न केला पाहिजे की पाकिस्तानमध्ये ज्यांचा छळ झाला व ज्यांचा तिथे विनाश झाला त्यांना परतण्याकरिता पाकिस्तान विनंती करील. आणि ज्या कोणाची लाहोरमध्ये संपत्ती आहे ती त्यांना परत मिळाली पाहिजे. जी घरे सरकारने ताब्यात घेतली आहेत ती त्यांना परत केली पाहिजे. तिथे किती सुंदर इमारती मी पाहिल्या होत्या? आणि मुलींकरिता काढलेल्या शिक्षणसंस्थांचे काय? लाहोरपेक्षा जास्त चांगल्या शैक्षणिक सुविधा भारतात अजून कुठेही नाहीत. शिक्षणक्षेत्रात लाहोर सर्वात पुढे होते. ते लाहोर आज कुठे आहे? या सर्व शैक्षणिक संस्था घडवण्याकरिता सरकारची कोणतीही भूमिका नव्हती आणि त्या संस्थाना सराकरने कोणतीही आर्थिक मदत केली नव्हती. पंजाबचे लोक मजबूत आहेत. ते व्यावसायिक मनोवृत्तीचे आहेत आणि ते लक्ष्मी निर्माण करतात. तिथे मोठमोठे बॅन्कवाले आहेत. पैसा कसा खर्च करायचा आणि कसा मिळवायचा हे त्यांना माहीत आहे. हे सर्व मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे. स्त्री-पुरुषांकरिता त्यांनी ती सर्व माहाविद्यालये बांधली आहेत. आणि ती मोठमोठी रुग्णालयेही बांधली आहेत. ती त्यांना परत केली पाहिजे. पन्नास मैल लांब जथ्था येत आहे. त्या लोकांची फार वाईट अवस्था आहे. यावरील उपाययोजना करण्याची जबाबदारी जर आपण शासनावर सोडली तर आपण रानटी होणार नाही. हे मी तुम्हाला आधीच सांगितले आहे. विदेशात राहणाऱ्या मुसलमानांकडून मला तारा आल्या आहेत. (अम्मान आणि मध्यपूर्वेतील इतर देशांमधून.) ते विचारतात की लोकांनी विवेक का सोडला. ते म्हणतात की आपण सर्वांनी भावाभावाप्रमाणे राहिलो पाहिजे. ते म्हणतात की आम्ही जरी मुसलमान असलो तरी आपसात भांडावे असे आम्हाला वाटत नाही. इस्लाम असे शिकवत नाही. मी आधीच सांगितले आहे की तुम्ही जागे व्हा. तुम्ही मान्य करा वा करू नका परंतु मी तुम्हाला सांगेन की अशा गोष्टींचा साक्षीदार राहण्याची माझी इच्छा नाही. असा अधःपात पाहण्याची माझी इच्छा नाही. असे काही घडण्यापूर्वी ईश्वराने मला न्यावे अशी मी ईश्वराजवळ प्रार्थना करीन. परिस्थितीत जर सुधारणा होत नाही तर माझ्या अंतःकरणात भडकत असलेला ज्वालामुखी माझा बळी घेतल्याशिवाय राहणार नाही. माझे अंतःकरण मला सांगते की अशा गोष्टी पाहून तुझा कोणताही लाभ होणार नाही. भारताच्या स्वातंत्र्याकरिता तू तुझ्या जीवाचा

बळी द्यायचा प्रयत्न केला. तुझा बळी तर गेला नाही पण स्वातंत्र्य मिळाले. परंतु स्वातंत्र्याच्या प्रभातीच हे सर्व घडलेले पाहण्यात काय अर्थ आहे? यामुळे माला घेऊन जा अशी मी ईश्वराजवळ रात्रंदिवस प्रार्थना करत असतो. आणि मला न्यायचे नसेल तर ईश्वराने हा आगडोंब विझवण्याची मला शक्ती तरी द्यावी.

दिल्लीमधील एका रुग्णालयात मोठ्या संख्येत जखमी मुसलमानांना ठेवण्यात आले आहे. रुग्णालयात सर्व मुसलमानच आहेत असे नाही. तिथे काही हिंदूही आहेत काहींनी त्या मुसलमानांना जखमी करून त्यांना मारण्याचा प्रयत्न केला. खेड्यातून आलेला असा कोणता तरी घोळका आहे. त्या घोळक्यातील लोकांनी दारातून हल्ला करण्याचा प्रयत्न केला नाही तर लहान खिडक्यातून हल्ला केला आणि चारपाच रुग्णाना मारून ते पळून गेले. याहून जास्त पशुत्वाचे कृत्य मला माहीत नाही. युद्धातसुद्धा अशा घटना घडत नाहीत. युद्धात अनेकदा रुगणालयांवर बॉम्बवर्षाव होतो परंतु अशी गोष्ट कधीही घडली नाही. आणि मी तुम्हाला अजून एक गोष्ट सांगेन. जेव्हा गाडी आली तेव्हा एखाद्या सामानाप्रमाणे पाच लोकांनी एका माणसाला गाडीच्या खिडकीतून फेकून दिले. तो मरणे अपरिहार्य होते. ही आजची गोष्ट आहे परंतु रुग्णालयासंबंधी मी जे म्हणालो ती कालची गोष्ट आहे. याकरिता कोणाची मान लाजेने खाली झुकली पाहिजे? मला मान्य आहे की मुसलमानांवरसुद्धा अशाच प्रकारच्या अपराधाचा आरोप आहे. पश्चिम पंजाबमध्ये जे काही घडत आहे त्याचे स्पष्टिकरण सरकारने मागायला पाहिजे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३६५-७०

# १२९. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर २, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एक शीख गृहस्थ आज मला पाहण्याकरिता आले होते. मी गुरू अर्जुन देव यांचे शब्द सांगितले हे योग्य केले असे मला कोणीतरी सांगितले असे ते म्हणाले. परंतु त्यांनी मला विचारले की गरू गोविंद सिंह यांनी त्या शब्दांत जो बदल केला त्यासंबंधी तुम्हाला काय म्हणायचे आहे? इतिहास सांगतो की गुरू गोविंद सिंह मुसलमानांचे जन्मजात शत्रू होते. परंतु अशा गोष्टीवर विश्वास ठेवण्याचे काहीही कारण नाही. दहाव्या गुरूंनी गुरू अर्जुन देव यांचे शब्द जवळपास जसेच्या तसे वापरले आहेत. आणि गुरू नानकबद्दल बोलायचे तर ते हिंदू, मुसलमान आणि शीख यांच्यात कोणतेही अंतर मानत नव्हते. कोणी देवळात देवाची भक्ती करो की नमाझ पढो सर्व एकच आहे. ब्राह्मण जर पूजा करत असेल तर याचा अर्थ असा होत नाही की दुसऱ्या धर्माचा माणूस ईश्वराला शिव्या देतो. खरे म्हणजे मुसलमान पूजेऐवजी नमाझ पढत असतात. पूजा आणि नमाझ एक आणि एकसारख्या आहेत. लोकांच्या भाषा वेगवेगळ्या असल्या तरी सर्व माणसे सारखी आहेत. गुरू गोविंद सिंह म्हणाले की सर्व माणसे मूलतः सारखी आहेत, केवळ त्यांची अभिव्यक्ती वेगवेगळी आहे. जर असे असेल तर आपण सर्व एक आहो आणि वेगवेगळेही आहो. करोडो माणसे आहेत परंतु मानवस्वभाव सारखा आहे. गुरू गोविंद सिंह म्हणाले, "एकै कान, एकै देह, एकै बैन". पुढे ते म्हणतात की ईश्वर म्हणा की राक्षस, यक्ष म्हणा की गंधर्व की तुर्क हे सर्व वेगवेगळे आहेत. गुरू गोविंद सिंहजी म्हणतात देखतको अनेक भेष है. त्यांचा प्रभाव एक है. त्यांचे नेमके शब्द आहेत - "आपल्याला विविध गोष्टी दिसत असतात परंतु त्यांचे मूळ स्वरूप एकच आहे." बैन म्हणजे वाणी. वाणी तर एक आहे. भाषा एक आहे. शब्द म्हणजे भाषा. आणि भाषा एकच असते. आणि सूर्य एक आहे. तुम्ही असे म्हणू शकता काय की मुसलमानांकरिता एक सूर्य आहे आणि दुसरा आमच्याकरिता? आपणा सर्वांकरिता एकच सूर्य आहे. ते म्हणतात की प्रत्येकारिता हवा आणि पाणीसुद्धा एकच आहे. गंगा वाहत असताना माझे पाणी घेऊ नको असे तुर्काला म्हणत नाही. आणि पाऊस घेऊन येणारे ढग आम्ही मुसलमान पारशी लोकांकरिता पाऊस आणत नाही, केवळ हिंदूंकरिताच आणतो असे म्हणत नाहीत. संघराज्य केवळ हिंदूंकरिता आहे असे नाही. असे कधीही होऊ शकत नाही. तुम्ही कुराणाचा वा गीतेचा वा पुराणाचा उल्लेख केला तरी ते एकच आहे. केवळ त्यांचे स्वरूप वेगवेगळे आहेत. तुम्ही

अरबी भाषेत लिहिले तर तुम्ही त्याला कुराण म्हणाल. आणि मग तुम्ही ते संस्कृत भाषेत वा देवनागरी लिपीत लिहिले व त्याचा अर्थ तुम्हाला कळला तर तुम्हाला दोन्ही एकच असल्याचे आढळेल. तर अशा प्रकारे आपण सर्व एक आहो असे म्हणून ते बोलणे संपवतात. गुरू गोविंद सिंह यांनी हे शिकवले आहे. मी त्या सज्जन गृहस्थाला सांगितले की गुरू गोविंद सिंह जरी मुसलमानांचे शत्रू असतील तरी ती चुकीची गोष्ट आहे. युद्ध झाले तेव्हा हिंदू आणि मुसलमान मेले होते व जखमी झाले होते. परंतु गुरू साहेबांचा एक समंजस शिष्य पाणी देण्याचे काम करत होता. त्याने मुसलमानांना पाणी दिले, हिंदूंना पाणी दिले आणि शिखांनाही पाणी दिले. तो म्हणाला की गुरू महाराजांनी मला असेच शिकवले आहे. ते म्हणाले की तुझ्याकरिता ना कोणी मुसलमान आहे, ना कोणी हिंदू आणि ना कोणी शीख, सर्व माणसे आहेत आणि ज्याला पाण्याची गरज आहे त्याला तू पाणी द्यायचे आहे. कोणी हिंदू जखमी होऊन पडला आहे तर त्याचा प्रथमोपचार कर आणि मुसलमान जखमी होऊन पडला असेल तर त्याला तसाच पडू दे असे ते थोडेच म्हणत होते. त्यांनी विचारले परंतु गुरुजी तर मुसलमानांच्या विरोधात लढले होते? हो लढले होते, परंतु ते त्या मुसलमानांविरुद्ध लढले होते ज्यांनी न्यायाचा मार्ग सोडला होता व ज्यांनी आपल्या धर्माचा त्याग केला होता. ते दानी पुरुष होते, अनासक्त पुरुष होते, ईश्वरी अवतार होते. त्यांच्याकरिता माझेतुझे हा प्रश्न नव्हता. परंतु होय, ते आपले रक्षण करत होते, लढाई करत होते यात काही संशय नाही. शिखांचा दावा असो की नसो परंतु आपण तर अहिंसक आहो. ते किरपाण ठेवतात. परंतु गुरुजींची शिकवण होती की निष्पाप, निरागस लोकांच्या रक्षणाकरिता किरपाण असते. लोकांचा छळ करणाऱ्या जुलमी लोकांशी लढण्याकरिता ती आहे. म्हाताऱ्या बायांची हत्या करण्याकरिता किरपाण नाही. स्त्रिया, मुले आणि निरागस लोक यांना मारण्याकरिता ती नाही.किरपाणचे हे काम नाही. अपराध्याच्या पोटात खुपसण्याकरिता किरपाण आहे, मग तो अपराधी मुसलमान असो की अजून कोणी. शीख जरी असला तरी जर त्याचा अपराध सिद्ध झाला असेल तर त्याच्याही पोटात ती किरपाण खुपसली जाऊ शकेल. आजकाल लोक ज्या प्रकारे किरपाण काढतात तो रानटीपणाचा मार्ग आहे.अशा लोकांना किरपाण वापरायला बंदी करण्यात आली तर ती चूक होणार नाही कारण त्यांनी त्यांच्या धर्माचा त्याग केलेला आहे. शिखांनी किरपाणला बदनाम केले आहे.

आज माझा जन्मदिवस आहे. (पाहा परिशिष्ट गांधीजींच्या अठ्ठयाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त टिपण, सप्टेंबर २५, १९४७नंतर) मी माझा वाढदिवस पारंपरिक पद्धतीने साजरा करत नसतो. मी म्हणेन की आजच्या दिवशी आपण उपवास केला पाहिजे, सूतकताई केली पाहिजे आणि प्रार्थना केली पाहिजे. आपला वाढदिवस साजरा करण्याची माझ्या मते ही सर्वात जास्त योग्य पद्धत आहे. माझ्याकरिता आजचा दिवस शोकदिवस आहे. मी अजूनही जिवंत आहे याचे मला आश्चर्य वाटते

आणि लाजही वाटते. मी तोच माणूस आहे की ज्याच्या शब्दाचा मान देशातील करोडो लोक ठेवत होते. परंतु आज माझे कोणीही ऐकत नाही. तुम्ही म्हणता की भारतात केवळ हिंदू राहिले पाहिजे आणि दुसरा कोणी राहता कामा नये. आज तुम्ही मुसलमानांना माराल, परंतु उद्या तुम्ही काय कराल? पारसी, ख्रिश्चन आणि इथे राहिलेल्या ब्रिटिशांचेही मग काय होईल? अखेरीस तेसुद्धा ख्रिश्चन आहेत. त्यांची ख्रिस्तावर श्रद्धा आहे आणि ते थोडेच हिंदू आहेत. आज तर आमच्याकडे असे मुसलमान आहेत की जे आपलेच आहेत. आपण जर आज त्यांनासुद्धा मारायला तयार झालो तर मी म्हणेन की माझी तर अशी घडण झालेली नाही. जेव्हापासून मी हिंदुस्तानात आलो तेव्हापासून हिंदू-मुसलमान ऐक्य हाच माझा पेशा राहिला आहे. धर्माने जरी एक नसलो तरी आपण सर्वांनी भावाभावासारखे राहिलो पाहिजे. परंतु आज आपण परस्परांना शत्रूच्या नजरेने पाहू लागलो आहो. मुसलमान कितीही सज्जन असला तरी मुसलमान हा सज्जन असूच शकत नाही असा समज आपण करून घेतो. मुसलमन तर नेहमी नालायकच असतात असे आपण समजतो. अशा परिस्थितीत भारतात माझे कोणते स्थान आहे आणि मी जिवंत राहून काय फायदा? आता मी १२५ वर्षे जगण्याचा विचार सोडून दिला आहे. आता शंभर वा नव्वद वर्षांचाही विचार करणे थांबवले आहे. आज मी एकोणऐंशीव्या वर्षात प्रवेश करतो आहे, परंतु त्याच्यासुद्धा मला वेदना होतात. जे मला समजू शकतात, आणि असे फार कमी लोक आहेत की जे मला समजू शकतात, त्यांना मी म्हणेन की आपण या पशुत्वाचा त्याग केला पाहिजे. पाकिस्तानमध्ये मुसलमान काय करत आहेत याची मला पर्वा नाही. तेथील हिंदूंना ते ते मारून टाकतील तर तेच त्यामुळे पशू होतील.परंतु त्याचा अर्थ असा आहे काय की मीही पशू झालो पाहिजे, रानटी झालो पाहिजे, संवेदनशून्य होऊ? अशी कोणतीही गोष्ट करण्याकरिता मी खंबीरपणे नकार देईन आणि तुम्ही असे करू नये असे मी म्हणेन. तुम्हाला जर माझ वाढदिवस खरोखरच साजरा करायचा असेल तर आतापासून कोणालाही वेडाच्या भरात अपकृत्ये न करू देणे तुमचा धर्म होतो व तुमच्या अंतःकरणात काही राग साठलेला असेल तर तो तुम्ही बाहेर काढला पाहिजे. मी तर लोकांना म्हणेन की बाबांनो कायदा हातात घेऊ नका, सरकारला याचा निर्णय घेऊ द्या. इतके जर तुम्ही केले तर तुम्ही योग्य काम केले असे मी म्हणेन. मला तुम्हाला इतकेच सांगायचे आहे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३७१-७४

# १३०. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर ३, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

देशात अनेक ठिकाणी सत्याग्रह सुरू असल्याचे मला दिसते. लोक ज्याला सत्याग्रह असे म्हणतात तो सत्याग्रह आहे की दुराग्रह आहे हेच मला खरोखरी कळत नाही. या देशात लोक बोलतात एक आणि करतात त्याविरुद्ध असे सुरू आहे. आज प्रत्येक कर्मचारी, मग तो डाक विभागात असो की तार विभागात वा रेल्वेत वा भारतीय संस्थानात, जेव्हा सत्याग्रह करतो तेव्हा आपण हा सत्याग्रह सत्याकरिता आहे की असत्याकरिता याचा विचार केला पाहिजे. असत्याकरिता सत्याग्रह करण्याची काहीही आवश्यकता नाही आणि जर तो सत्याकरिता असेल तर कोणत्याही परिस्थितीत सत्याग्रह केलाच पाहिजे. स्वार्थी हेतूने जे केले जाते त्याला सत्याग्रह कधीही म्हणता येऊ शकत नाही. तसे करणे म्हणजे असत्याचा आग्रह धरणे. सत्याग्राहाकरिता मी फार कमी अटी सांगितल्या आहेत. सत्याग्रहाकरिता दोन गोष्टी आवश्यक आहेत असे मी म्हणालो होतो. पहिली गोष्ट ही की ज्या मुद्द्याकरिता आपण सत्याग्रह करतो तो सत्य असला पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे सत्याचा आपला आग्रह निरपवादपणे अहिंसक असला पाहिजे.

आज जे लोक सत्याग्रह करत आहेत त्यांनी तसे पूर्ण विचारांती केले पाहिजे. मूळ गोष्ट जर सत्य नसेल आणि मागण्या मान्य करून घेण्याकरिता बळजबरी असेल तर तो सत्याग्रह मागे घेणेच योग्य. जर मूळ गोष्ट विषाक्त असेल तर तो दुराग्रह होईल आणि असत्य होईल आणि जी गोष्ट आपल्याला मिळू शकत नाही तिची मागणी आपण रेटू लागलो तर अशी मागणी करत असताना आपण अहिंसक राहू शकत नाही हे मी तुम्हाला सांगून ठेवतो. तो अहिंसक होऊ शकत नाही, तिथे केवळ हिंसा असेल. हे शक्य आहे की एखादा अन्याय्य मागणी करत असेल आणि त्याच वेळी तो अहिंसक राहत असेल.

मी जर निर्वासित शिबिराचा प्रभावी असतो तर तुम्ही तुमच्या जागा स्वच्छ केल्याच पाहिजे असे मी त्या शिबिरार्थींना सागितले असते. त्यांनी केवळ पत्ते, फासे, जुगार खेळायला पाहिजे काय की केवळ आळसात पडून राहिले पाहिजे? मला माहीत आहे की तिथे त्यांच्याकरिता पुरेसे अन्न आणि पाणी नाही. परंतु या कारणाकरिता ते काम करण्याकरिता नकार देत असतील तर ते व्यसनांना

बळी पडतील. आणि या शिबिरांमध्ये काही आठदहा लोकच नाहीत. या छावण्यांमध्ये हजारो लोक राहत आहेत. त्यांना आपल्या घरी कधी परतता येईल हे कोणीही सांगू शकत नाही.आपण त्यांना खचितच अन्न पुरवू परंतु त्यांनीही ते मिळवण्याकरिता काही तरी काम केले पाहिजे. आपली छावणी स्वच्छ करण्याच्या कामापासून ते कामाची सुरुवात करू शकतात आणि मग कताई, विणाई, सुतारकाम, लोहारकाम, शिवणकाम यासारखे इतर काम करण्याचीही ते तयारी दाखवू शकतात. भारतात माणसाला करता येण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. काल हे लोक करोडपती असू शकतील, परंतु आज त्यांनी आपले करोड रुपये गमावले आहेत. जगात अशा गोष्टी अनेकदा घडत असतात. असे झाल्यानंतर परत नव्याने कामाला सुरुवात करावी लागत असते. जर कोणी म्हणत असेल की मी करोडपती होतो आणि मला कोणतेही काम येत नाही तर आपल्या सर्व योजना फसतील. असे म्हणालो तर आपण कधीही यशस्वी होणार नाही. मी अतिशय नम्रपणे सांगतो की अशा प्रकारे आपले काम चालू शकत नाही. जे काही काम आपण करतो ते सर्व दृष्टींनी आदर्श असले पाहिजे. ते स्वच्छ असले पाहिजे आणि त्यात मुळीच घाण नसावी. इथे जे लोक पडले आहेत त्यांनी स्वतःचे काम स्वतः केले तर मी म्हणेन की आज आम्हाला जो त्रास सहन करावा लागत आहे तो सहन करावा लागणार नाही. आणि ते जर कामात गुंतले तर आपला क्रोधसुद्धा शमेल. आपल्या अंतःकरणातील बदल्याची भावनासुद्धा मरेल. वाईटाला वाईट म्हणून ओळखण्यात आणि त्याला चांगुलपणाने उत्तर देण्यात माणसाचा चांगुलपणा असतो. यातच देशाचे कल्याण आहे. आपण कोणाला दुःखी करणार नाही, उलट स्वतः दुःख सहन करून इतरांना सुखी करण्याचा प्रयत्न करू. आपण जर असे केले तर केवळ भारताचेच हित होणार नाही तर जगाचेही हित होईल. भारत कसा वागतो याकडे आज जगाचे लक्ष लागलले आहे. आता आपल्या परीक्षेची खरी वेळ आहे. आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आहे. आता आपण काय करणार आहो?

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३७४-६

# १३१. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर ४, १८४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आपण जर वेड लागल्यासारखे वागलो नसतो तर आज हे जे काही घडत आहे ते घडले नसते याची मी तुम्हाला कसा खात्री पटवून देऊ? याबद्दल मला काहीही शंका नाही. मुसलमान वेड लागल्याप्रमाणे वागले म्हणून हे निर्वासित पाकिस्तानमधून पळून येत आहेत. हिंदू जर तिथे सुखासमाधानात असते तर ते पळून का आले असते? त्यांनी पश्चिम पंजाबमधून का पळून यावे? पाकिस्तानच्या इतर भागातूनही लोक पळून येत आहेत ही खरोखरच दुःखद गोष्ट आहे. हिंदू का पळून येत आहेत याचा आपण विचार केला पाहिजे. कल्पना करा की तेथील मुसलमान जुलमी झाले आहेत तर त्यामुळे आपणही जुलमी झालो पाहिजे काय? तरुण आणि म्हातारे, स्त्रिया आणि मुले यांना मुसलमान मारत आहेत म्हणून कायदा हातात घेऊन आपणही त्यांना मारले पाहिजे काय? मी वारंवार सांगत आलो आहे की हा जंगलाचा कायदा आहे. जर असा कायदा टिकणार असेल तर मी जिवंत राहू शकत नाही. देशाची अजून सेवा करता यावी म्हणून हे देवा मला १२५ वर्ष जिवंत ठेव अशी मी आतापर्यंत ईश्वराला प्रार्थना करत होतो. आणि मी तेव्हाच विश्रांती घेऊ शकतो जेव्हा देशात ईश्वराचे राज्य म्हणजे रामराज्य प्रस्थापित होईल. असे होईल तेव्हा खरोखर भारत स्वतंत्र झाला असे म्हणता येऊ शकेल. परंतु आज तर हे केवळ स्वप्न राहिले आहे. रामराज्य तर सोडाच परंतु आज देशात केणतेही शासन शिल्लक राहिलेले नाही. अशा परिस्थितीत माझ्यासारखा माणूस काय करू शकतो? या परिस्थितीत जर सुधारणा होऊ शकत नसेल तर माझे हृदय आक्रंदन करत हे देवा मला ताबडतोब घेऊन जा अशी ईश्वराची प्रार्थना करील. अशा गोष्टींचा साक्षीदार बनून मी का राहू? आणि त्याची इच्छा मी जिवंत राहावे अशीच असेल तर एके काळी माझ्यात जी शक्ती होती ती त्याने मला द्यावी अशी माझी त्याला विनंती आहे. लोकांची मी समजूत घालू शकतो असा मला अभिमान होता. पूर्वी मी जेव्हा लोकांकडे जात असे व काही करण्याविरुद्ध मी त्यांना सावधगिरीची सूचना देत असे तेव्हा ते माझे ऐकायचे. माझ्यावर त्यांचे असे प्रेम होते. माझे असे म्हणणे नाही की आज माझ्यावरील लोकांचे प्रेम कमी झाले आहे. परंतु ते कमी असो वा अधिक त्यामागे कृतीची जोड पाहिजे. आणि आज या कृतीचीच उणीव भासते. यामुळे मी म्हणतो की माझा प्रभाव कमी होत चालला आहे. आपण जेव्हा गुलामगिरीत होतो तेव्हा माझे काम चांगले सुरू होते. परंतु आज स्वतंत्र झाल्यानंतर

माझ्यात काहीही करण्याची क्षमता उरलेली नाही. त्या वेळी लोकांना मी जे शिकवत होतो तेच मी आजही शिकवत आहे. तुम्ही जर तो माझा सल्ला ऐकाल तर आपण किती तरी पुढे जाऊ.

तुम्हाला मला सांगायचे आहे की आता थंडीचे दिवस येऊ लागले आहेत. मला थंडी वाजू नये म्हणून या मुलींनी ही शाल आणली आहे ती तुम्हाला दिसतेच आहे. मला थोडासा खोकलाही झाला आहे. परंतु आता बरील सुधारणा झाली आहे आणि ही सुती चादर सध्या तरी माझ्याकरिता पुरेशी आहे. परंतु छावण्यांमधील आणि पुराना किल्ल्यामधील लोकांचे काय? मुसलमानांकरिता आम्ही ब्लॅन्केट का द्यावे असे तुम्ही विचारू शकाल. परंतु मी तसा विचार करू शकत नाही. माझ्याकरिता मुसलमान, शीख, पारसी, ख्रिश्चन हे सर्व सारखे आहेत. मी कोणताही भेदभाव करू शकत नाही. त्या सर्व लोकांचे हिवाळ्यात काय होईल? त्यांना ब्लॅन्केट देणे सराकरचे काम आहे असे जर तुम्ही म्हणाल तर मी म्हणेन की सरकार ते करू शकत नाही. सरकार सर्व प्रयत्न करील परंतु साठा कुठे आहे? सरकार ब्लॅन्केट कुठून निर्माण करील? जादू करून तर ते निर्माण करता येत नाहीत. इतक्या सहजपणे ते ब्लॅन्केट निर्माण करू शकत नाही. आज युरोपमध्येसुद्धा या गोष्टी उपलब्ध नाहीत. तेथून कोणीही काहीही पाठवू शकत नाही. कोणी जरी १०-२० हजार ब्लॅन्केट पाठवले तरी त्याने काय होणार आहे? आपल्याला लाखो लोकांना ब्लॅन्केट पुरवायचे आहेत. प्रत्येकाला ब्लॅन्केट कसे मिळतील? या सर्व लोकांना थंडीचा मारा सहन करावा लागणे योग्य नाही हे इथे हजर असलेल्या सर्व लोकांना मला सांगायचे आहे. परंतु मला माहीत आहे की अनेक लोकांकडे आवश्यकतेपेक्षा अधिक ब्लॅन्केट आहेत. दिल्लीत मोठ्या संख्येत असे लोक आहेत की ज्यांना ब्लॅन्केट घेणे परवडत नाही. देता येऊ शकतील असे जितके ब्लॅन्केट तुमच्याजवळ असतील तितके द्या. आजपासून अशा गोष्टी तुम्ही द्यायला तुम्ही सुरूवात करू शकता. सरकार सर्व काही करत आहे म्हणून आपण काहीही करण्याची गरज नाही असा विचार करून तुम्ही वाट पाहू नका. आता जरी थंडी सहन करण्यासारखी असली तरी ती पडायला सुरुवात झाली आहे. परंतु मी जेव्हा व्हाईसराय भवनात १७ तारखेला (सप्टेंबर) गेलो होतो तेव्हा तिथे शेकोटी पेटवण्यात आलेली मला दिसली होती. कारण थंडीची सुरुवात झालेली आहे आणि दिल्लीचा हिवाळा इतका कडक असतो की तो सहन करणे कठीण असते. ऑक्टोबरनंतर वेगात थंडी वाढू लागते आणि नंतर ती भयानक रूप धारण करू लागते. नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी आणि फेब्रुवारी हे सर्व थंडीचे सुंदर महिने आहेत. ज्यांच्याजवळ खाण्याचे आहे, कपडे आहेत, व भरपूर कपडे घालून जे फिरू शकतात, बूट आणि मोजे घालू शकतात त्यांच्याकरिता हिवाळा प्रसन्न ऋतू आहे असे म्हणणे परवडू शकते. परंतु ज्यांच्याजवळ या गोष्टी नाहीत त्यांचे काय होते याचा मी साक्षीदार आहे. तुम्हीसुद्धा ते पाहिले असेल. यामुळे अशा जितक्या लोकांना आपल्याला वाचवता येईल तितक्या लोकांना आपण वाचवले पाहिजे. हे शक्य

आहे की ज्यांच्याजवळ कपडे आहेत त्यांच्याजवळ लोकरीचे ब्लॅन्केट नसतील. परंतु त्यांच्याजवळ जरी लोकरीचे कांबळी नसतील तरी दुलया असू शकतील. चांगल्या जाड चादरी असू शकतील. त्यांनीसुद्धा काम भागू शकते. जुन्या काळात त्यांनीच काम भागवले जात असे. त्या जर चांगल्या अवस्थेत असतील त्यासुद्धा आणू शकता. लोकरी कांबळी, रजणी, सुती चादर जे काही तुम्ही सहजपणे देऊ शकता ते मला हवे आहे. तुम्ही या गोष्टी स्वतःहोऊन दिल्या पाहिजे. तुम्ही जर या गोष्टी पाठवायला सुरुवात केली तर कोणाकडे तरी त्या गोळा करण्याची जबाबदारी सोपवता येईल. याची जबाबदारी मी स्वतः घेणार नाही. आणि या गोष्टी गोदामात सडत पडू दिल्या जाणार नाहीत व अयोग्य व्यक्तीच्या ताब्यात दिल्या जाणार नाहीत. तुम्ही जे काही पांघरूण वा कपडे द्याल ते गरजू माणसाकडेच जातील असे मी तुम्हाला आश्वासन देतो. या गोष्टी आम्ही तुम्हाला हिंदू वा शिखांकरिता देत आहो असे तुम्ही सांगू नका. मानव प्राणी एक आहे.या गोष्टी मुसलमानांना देऊ नका असे नंतर कोणी येऊन मला सांगू नका. इथे मोठ्या संख्येत मुसलमान मारले गेले आहेत आणि अनेक पळून गेले आहेत. आम्ही त्यांना हाकलून लावले आहे. जे मागे राहिले त्यांच्याजवळ किती संपत्ती पडली आहे ते मला माहीत नाही. भारतात राहिलेले मुसलमान जर माझ्याकडे ब्लॅन्केट पाठवतील आणि ती मुसलमानांनाच द्यावी असा आग्रह करतील तर मी ते मुसलमानांना देईन. परंतु जे लोक माझे शब्द ऐकत आहेत व जे रेडिओवर ऐकतील त्यांनी मला संकोच वाटेल असे काही करू नये आणि म्हणावे की आम्ही या गोष्टी कृष्णार्पण केल्या आहेत आणि जो पात्र असेल त्याला त्या मिळतील असे समजावे. मला आशा आहे आणि विश्वास आहे की तुम्ही इतके निश्चितच कराल. तुम्ही जर इतके केले तर तुम्ही फार मोठी गोष्ट केली असे मी म्हणेन. परंतु घाणेरड्या आणि फाटक्या गोष्टी पाठवू नका. मला त्या धुण्याची आणि रफू करण्याची आवश्यकात पडायला नको. इतका त्रास घ्या. ते धोब्याकडे पाठवण्याची गरज नसावी. तुम्ही ते साध्या पाण्यात धऊ शकता आणि व्यवस्थित घडी करून ते माझ्याकडे आणू शकता. तुम्ही असे केले तर मला फार आनंद होईल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३७६-८०

# १३२. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर ५, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

सर्वात आधी मी माझ्या प्रकृतीबद्दल तुम्हाला सांगेन कारण आज वृत्तपत्रांत माझ्या आजाराबद्दल लिहून आले आहे. ही माहिती कोणी पाठवली हे मला माहीत नाही. माझ्या सभोवती नेहमी असणाऱ्या डॉक्टरांकडून ही माहिती पाठवली जाऊ शकत नाही. मला भेटण्याकरिता असंख्य लोक येत असतात व ते माझा खोकला व अधूनमधून मला येणारा ताप पाहत असतात. त्यांनीच हा राईचा पर्वत केला असावा. का? ते माझ्या प्रकृतीबद्दल लिहितात कारण मी महात्मा असल्यामुळे ही बातमी जगभर पसरते. गांधी मेला तर काय होणार आहे? प्रत्येकाला जर मरायचे आहे तर तर गांधीलासुद्धा मरावे लागेल. या जगात अमरपट्ट्याची देणगी घेऊन कोणीही आलेला नाही. मला थोडा खोकला आणि अशक्तपणा आहे. परंतु या गोष्टीला वृत्तपत्रांमधून प्रसिद्धी देण्याला काय अर्थ आहे? मी म्हणेन की ही माहिती देणारांनी ना तर माझे भले केले आहे ना अजून कोणाचे. तुम्ही पाहतच आहा की मी इथे आलो आहे आणि बोलतही आहे. माझ्या कामात कोणताही अडथळा आला नाही. लोकांनी अशा गोष्टी करू नये अशी माझी इच्छा आहे.

दुसरी गोष्ट म्हणजे हिवाळा वेगात जवळ येत असल्यामुळे हिवाळ्यात उपयोगी पडतील अशी कांबळी, दुलया, चादरी वा इतर काही तुमच्याजवळ देता येण्यासारखे असेल तर ते द्यावे अशी मी तुम्हाला विनंती केली होती (पाहा प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर ४, १९४७). तीन लोकांनी आज ब्लॅन्केट पाठवले. त्यातील दोन जवळपासच्या भागातच राहणारे आहेत. परंतु मी त्यांचे नाव विसरलो. त्यांनी पाठवलेले ब्लॅन्केट बरेच चांगले आहेत. अजून एका माणसाने ब्लॅन्केट दिले आहे परंतु त्यांचेही नाव मी वसरलो. त्यांनी दहा ब्लॅन्केट दिले आहेत व ते सर्व नवीन असले पाहिजे. मी काल सांगितल्याप्रमाणे हे सर्व ब्लॅन्केट सुरक्षित ठेवले आहेत. ते पात्र स्त्री-पुरुषांना देण्यात येतील. मी आज तुम्हाला जे सांगितले त्याबद्दल जर तुमची खात्री पटली असेल तर तुम्हाला जे काही देता येऊ शकत असेल ते तुम्ही मला द्याल अशी आशा आहे.

मला नुकताच अनेक लोकांनी मिळून पाठवलेली तार मिळाली. ती तार इथे माझ्यासमोर पडली आहे. त्या तारेत जे लिहिले आहे ते मला आवडले नाही. अशी तार पाठवण्याचा अर्थातच

त्यांना अधिकार आहे. तार पाठवणारांचे म्हणणे आहे की ज्या प्रकारे हिंदू वागले त्या प्रकारे वागले नसते तर मीसुद्धा जिवंत राहिलो नसतो. ही फार गंभीर बाब आहे. मला जिवंत ठेवणारी ईश्वरी सत्ता सोडली तर इतर कोणतीही सत्ता मी मानत नाही. त्याची इच्छा असेल तोपर्यंत मी जिवंत राहीन व त्या क्षणापर्यंत कोणीही मला मारू शकत नाही. जे माझ्याकरिता खरे आहे ते प्रत्येकाकरिता खरे आहे. मग त्यांनी अशा प्रकारच्या गोष्टी का लिहाव्या? मला मान्य आहे त्यांनी जे काही लिहिले ते माझ्याबद्दलच्या प्रेमापोटी लिहिले आहे. परंतु ईश्वरच मला वा अजून कोणाला जिवंत ठेवत असतो अशी माझी खात्री आहे.

ते लोक पुढे लिहितात की (त्यांनी काही नावे लिहिली आहेत परंतु मी ती नावे वगळू इच्छितो.) मी अतिशय साधाभोळा आहे म्हणून मी मुसलमानांवर विश्वास ठेवतो. मुसलमान अखेरीस धोका दिल्याशिवाय राहणार नाहीत असे एकच माणूस नाही तर मोठ्या संख्येतील लोक मला सांगत आहेत. त्यांचे म्हणणे आहे की ते पाकिस्तानची बाजू घेतील व पाकिस्तानला मदत करण्याकरिता भारताविरुद्ध लढतील. त्यांचे म्हणणे आहे की १०० पैकी ९८ मुसलमान विश्वासघातकी आहेत. माझे हे मत नाही हे मी तुम्हाला सांगितले पाहिजे. या साडेचार कोटी मुसलमानांपैकी बहुतेक लोक खेड्यापाड्यात राहतात आणि फार कमी शहरात राहतात व आपल्यामधील लोकच मुसलमान झाले आहेत आणि ते सर्व देशद्रोही होऊ शकत नाहीत. प्रत्येक मुसलमान देशद्रोही आहे असे गृहीत धरून आपण त्यांच्या घरात घुसून त्यांच्याजवळील शस्त्र हस्तगत केली पाहिजे काय? मुसलमानांना एक तर मारून टाकले पाहिजे वा त्यांना येथून बाहेर हुसकावून लावले पाहिजे अशी त्यांची सूचना आहे. या मित्रांना मी सांगेन की हा भ्याडपणा आहे. ते जर खरोखरी तसे असतील तर सरकारजवळ तसे सिद्ध करा व सरकारला प्रकरण निपटवण्याकरिता सांगा असे मी त्यांना आग्रपूर्वक सांगेन. या मित्रांच्या सूचनेप्रमाणे आपण वागलो तर हे दोन समुदाय शत्रू होतील व त्याचा परिणाम युद्धात होईल. जर दोन्ही बाजू युद्धाचा आग्रह धरत असतील तर दोघांचाही विनाश होईल व आपण मिळवलेले स्वातंत्र्य आपण गमावू. दुसऱ्याचे लांगुलचालन करून कोणताही हिंदू आपल्या हिंदू धर्माचे रक्षण करू शकत नाही. इंग्रज होते तेव्हा तेव्हा त्यांच्या गुलामीमुळे आपला हिंदू धर्म टिकलेला आहे असे आपण समजत होतो. परंतु ती चूक होती.

मी जेव्हा मूल होतो तेव्हा मी फार मोठ्या कवीची एक कविता वाचली होती. तो कवी आंधळा होता. त्याने लिहिले होते, “ठीक आहे, आता वैर संपले, आता आपण आरामात राहू या. इंग्रज आले आहेत.“ एक काळ असा होता की जेव्हा इंग्रजांनी आपण मोहीत झालो होतो व त्यांच्या संरक्षणाखाली आपण सुरक्षित आहो असे आपल्याला वाटत होते. आपण ती चूक दुरुस्त करू या.

घाबरून साडेचार कोटी मुसलमानांना पळवून लावले पाहिजे असे आपल्याला वाटू लागत असेल तर आपण दुर्बलमनस्क असल्याचे सिद्ध होईल. अशा पद्धतीने आपण आपल्या धर्माचे रक्षण करू शकणार नाही. हिंदू आणि मुसलमान यांच्यात मूलतःच वैरभावना असते यावर माझा विश्वास नाही. आपण जर शत्रू होऊ तर भारत कसा टिकून राहील? हिंदू आणि मुसलमान दोघेही परत गुलामगिरी पत्करणार आहेत काय व ते आपला धर्म विसरणार आहेत काय? हे कसे शक्य आहे? सरकारला सर्व संबंधित माहिती पुरवणे आपले कर्तव्य आहे.

माझ्या मंत्र्यांशी भेटीगाठी होत असतात व मी जवळपास दररोज त्यांच्या संपर्कात असतो हे मी तुम्हाला सागितले पाहिजे. पंडितजी मला दररोज भेटतात. पंडितजींइतके वारंवार जरी नाही तरी सरदारसुद्धा जवळपास मला दररोज भेटतात. परंतु ते दोघेही येतात. ते दोघेही माझे मित्र आहेत व माझ्याबरोबर आहेत. दोघांचेही माझ्याशी प्रामाणिक मतभेद होत असतात. मी त्यांना काही गोष्टी सांगू शकत नाही असे मला म्हणायचे नाही. सरकारने सर्वांचे रक्षण केले पाहिजे - हिंदू, मुसलमान, पारसी, ख्रिश्चन इत्यादी सर्व. असे झाले तरच ते स्वतःला खरे कॉंग्रेसी म्हणवून घेऊ शकतील. हिंदूमहासभेचे काम हिंदूंचे संरक्षण करणे आहे. शिखांच्या आणि हिंदूच्या धर्माचे रक्षण करणे आणि वाईटाच्या शक्तीला पराभूत करणे त्यांचे काम आहे. हे काम दुसरा कोण करणार आहे? कोणाच्या कृपेने धर्माचे रक्षण करता येऊ शकते काय? आपण जेव्हा माझ्या धर्माच्या रक्षणाकरिता मदत करा असे म्हणतो तेव्हा तो खरे तर सौदा असतो.आपण हे सर्व म्हणतो कारण आपल्याला स्वतःला वाचवायचे असते. आपण एक पोषाख आज घालू शकतो आणि दुसरा उद्या. याचा अर्थ आपण कोणत्या तरी धर्माचे पालन करतो असा होतो काय? यामुळे मी म्हणतो की या मित्रांनी तार पाठवून योग्य काम केले नाही.

यानंतर मला तुमच्याशी दुसऱ्या विषयावर बोलायचे आहे. श्रीयुत चर्चिल यांनी जुनाच दृष्टिकोन (पाहा प्रार्थना प्रवचन, सप्टेंबर २८, १९४७) अतिशयोक्त स्वरूपात परत मांडला आहे. यामुळे मला दुःख होते. मी ब्रिटिशांचा मित्र आहे म्हणून असे होते. कोणाहीबद्दल माझ्या मनात शत्रुत्वाची भावना नाही. ब्रिटिशांमधील अनेक लोक फार चांगले आहेत आणि भारताला स्वातंत्र्य देत असताना ते फार धैर्याने वागले. नंतर याचे काय परिणाम होतात याची मला फिकीर नाही. चर्चिल या कृत्याची निंदा करतात आणि आपल्या आधीच्या भाषणामध्ये म्हणाले होते त्याप्रमाणे म्हणतात की भारतीय हे जसे आहेत तसेच आहेत. त्यांना जर हे आधीपासून माहीत होते तर या दृष्टिकोनाचे वारंवार चर्वितचर्वण करण्याचे कारण काय?

परंतु असे दिसते की केवळ आपल्या पक्षाच्या हिताकरिता ते मजूर पक्षावर टीका करण्याकरिताच हे बोलत आहेत. मजूर पक्षाचा पराभव व्हावा आणि आपल्या पक्ष परत सत्तेवर यावा म्हणूनच ते असे बोलत आहेत. आज ब्रिटनमध्ये मजूरवर्ग सत्तेवर आहे. ब्रिटन हे लहानसे बेट आहे. परंतु ब्रिटनची जी इतकी प्रगती झाली आहे ती त्याच्या मजूर वर्गाच्या बळावर व त्याच्या जगप्रसिद्ध उद्योगाच्या आधारावर. देशातील सध्याच्या सरकारला घालवण्याची चर्चिलची आकांक्षा आहे. या सरकारला पदच्यूत करण्याकरिता मजूर सरकारने मूर्खपणा केला आहे व हा गोंधळ घालून साम्राज्याची हानी केली असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांचे म्हणणे आहे की ब्रिटनने भारत सोडला ही चूक केली आणि आता हीच गोष्ट ते ब्रह्मदेशात (म्यांमार) करू पाहत आहे. त्यांनी ब्रह्मदेशावर स्वामित्व कसे मिळवले व भारतात आपल्या सत्तेचे बस्तान कसे बसवले या ब्रिटनच्या इतिहासाशी आम्ही चांगले परिचित आहो.अशा इतिहासाचा कोणाला अभिमान वाटू शकेल असे मला वाटत नाही.

आज आपण जे काही करत आहो तो शुद्ध रानटीपणा आहे. आपण मिळवलेल्या स्वातंत्र्याचा आपण विध्वंस करू पाहत आहो. तुमच्या नजरेत मी निरुपयोगी आहे हे मला कबूल आहे. तुमच्यावर माझा कोणताही प्रभाव नाही. याचबरोबर मी तुम्हाला सांगेन की ब्रिटिश जर चर्चिलचे ऐकतील आणि कंझर्व्हेटिव पक्ष मजूर पक्षाला पराभूत करील तर ती फार मोठी दुर्दैवी घटना ठरेल. संपूर्ण जग म्हणते की आपण कोणत्या तरी शक्तीच्या बळावर स्वातंत्र्य मिळवले. ही कोणती शक्ती आहे? ती कामगार शक्ती होती. त्या वेळी कामगारांचा समाजवादी पक्ष सत्तेवर होता आणि त्या सरकारने आपल्याला स्वातंत्र्य दिले. समाजवाद कोण नाहीसा करू शकतो? ना तर चर्चिल असे करू शकतात ना अजून कोणी. त्यांचे सरकार इतर कोणत्याही प्रकारे काम करू शकत नाही. कल्पना करा की ब्रिटिश राष्ट्राने आपला गुणधर्म गमावला आणि मजूर पक्षाचा पराभव झाला व श्रीयुत चर्चिल परत सत्तेवर आले तर आम्ही तुम्हाला परत गुलाम करणार आहो अशी धमकी ते देणार आहेत काय व आपल्यावर हल्ला करणार आहेत काय? ते असे कसे करतात हे मला कळू शकत नाही. आम्ही कसेही असलो, वाईट असलो, चांगले असलो, बदमाश होऊ, मूर्ख होऊ, कसेही झालो वा असलो तरी स्वातंत्र्य ही सर्वात मोठी गोष्ट आहे ही गोष्ट याच लोकांनी मला शिकवली आहे. अशा महान स्वातंत्र्याकरिता जर काही चुका होणार असतील त्या करण्याचा तुम्हाला अधिकार आहे. असे नाही की आपण चांगले असू तेव्हा आपल्याला स्वातंत्र्य देण्यात येईल आणि तसे नसू तेव्हा ते काढून घेण्यात येईल. कोणी असे कसे बोलू शकतो.ब्रिटिशांचा हा तर कायदा नाही. जगातील दुसऱ्या कोणत्याही देशाचा असा कायदा नाही. केवळ चांगल्या लोकांकरिता स्वातंत्र्य असेल तर, आणि जगात जे काही घडते आहे त्याकडे पाहिले तर जगात कुठेही आपल्याला स्वातंत्र्य कसे दिसेल?

गुलामगिरीपेक्षा स्वातंत्र्य केव्हाही चांगले हे ब्रिटिशांनीच आम्हाला शिकवले आहे. एक ब्रिटिश लेखक म्हणतो की आम्ही दारू पिऊन झिंगून पडून राहिलो तरी आम्ही स्वतंत्र राहणे पसंत करू, गुलाम होऊन सुधरणे आम्हाला मान्य नाही. परंतु भारतात आपण त्यांचे दोष घेतो गुण नाही.

भारतात सात लाख खेडी आहेत. सात लाख खेड्यातील या लोकांना वेड लागलेले नाही. या सात लाख खेड्यातील लोक वेडे झाले तर भारताचा नकाशा पूर्णपणे बदलून जाईल. त्यांना जरी वेड लागले तरी ते जर स्वतंत्र राहिले तर मला खुषीच होईल. परंतु त्यांना वेड लागले आहे असे समजून भारतावर जर कोणी वाईट दृष्टी टाकली व त्याला गुलाम करण्याची इच्छा धरली तर ते चालणार नाही.

मी हे तुम्हाला आधीच सांगितले आहे आणि आता परत सांगतो की आपल्याला जरी वेड लागले तरी इंग्रज तर काही परत इथे येणार नाहीत. ते आता इथे येऊ शकत नाहीत. एकदा त्यांनी एखादी गोष्ट थुंकून टाकली तर ते काय ती परत तोंडात घालणार आहेत? परंतु इथे काय घडते आहे त्याच्याकडे जगाची नजर आहे. इथे जे काही सुरू आहे ते पाहून जगाची काय प्रतिक्रिया होईल? भारतासंबंधी असे काही घडण्याला जग परवानगी देणार नाही. आणि भारतसुद्धा असे घडू देणार नाही. परंतु संयुक्त राष्ट्र परिषद जर इथे चौकशीकरिता आली तर आपण त्यांना अडवू शकणार नाही. त्यावेळी आपले वेड कायम राहिले आणि आपल्याला आपलेच भान राहिले नाही तर आपण आपले स्वातंत्र्य त्यांना देऊन टाकू.

मी जरी एकटा शिल्लक राहिलो तरी मी म्हणेन की खबरदार, सगळे जग जरी आले तरी आणि ते आमचे सर्व काही नष्ट करू पाहल तर करू शकेल परंतु ते आम्हाला परत गुलामगिरीत टाकू शकणार नाही. परत कधीही गुलामगिरी पत्करायची नाही अशी मी शपथ घेतली आहे. ती शपथ खरी ठरण्याकरिता तुम्ही सर्वांनी ती पाळली पाहिजे. मी एकटा तर भारत वाचवू शकत नाही. माझे काय खरे आहे. मी किती दिवस जिवंत राहीन हे कोणाला माहीत? ईश्वराने जरी मला नेले तरी भारतावर त्याचा काय परिणाम होणार आहे?

मी एकटा भारताला कसा वाचवणार? ते सर्व ईश्वरावर अवलंबून आहे.तो जर माझ्या बाजूने असेल व त्याची माझ्यावर कृपा असेल तर भारताला वाचवता येईल. मला वाटते की जोपर्यंत मी जिवंत आहे तोप्रंयत भारतातील अनागोंदीच्या परिस्थितीचा कोणीही फायदा घेऊ शकणार नाही व आपण भारताला गुलाम करून ताब्यात घेऊ या असे म्हणू शकणार नाही. तुमच्या माध्यामतून ईश्वराने माझी ही इच्छा पूर्ण करावी अशी माझी इच्छा आहे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३८०-८५

## १३३. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर ६, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ६, १९४७

ज्या लोकांना आपल्या अन्नधान्याच्या गंभीर समस्येबद्दल माहिती असली पाहिजे ते डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या निमंत्रणावरून अन्नधान्यविषयक माहिती देण्याकरिता इथे आले आहेत. या आवश्यक गोष्टीत जर काही चूक झाली तर तिचा अर्थ होईल टाळता येण्यासारखी उपासमार आणि करोडो लोकांचा मृत्यू. मानवी वा नैसर्गिक दुष्काळामुळे करोडो जरी नाही तरी लाखो लोकांचा मृत्यू होणे ही गोष्ट भारताकरिता काही नवीन नाही. माझा दावा आहे की कोणत्याही सुसंघटित समाजात पाऊस आला नाही अथवा पीक गेले तर अडचणीच्या काळात त्याला यशस्वीपणे तोंड देता यावे म्हणून आधीच योजना आखलेली असते. परंतु सुसंघटित समाज कसा असतो आणि अशा वेळी त्याने काय केले असते याचे वर्णन करण्याची ही वेळ नाही. आज तर अन्नधान्याच्या या बिकट समस्येला आपण शक्य तितक्या यशस्वीपणे तोंड देऊ शकतो की नाही हेच आपल्याला पाहायचे आहे.

मला वाटते की आपण हे करू शकतो. पहिला पाठ आपल्याला जो शिकायचा आहे तो स्वतः स्वतःची मदत करण्याचा आणि स्वावलंबनाचा. आपण जर हा धडा पचवला तर लवकरच आपण विदेशी मदतीवर विसंबून राहणे व त्यामुळे अखेरीस येणारी दिवाळखोरीची वेळ यापासून आपण वाचू शकू. हे मी अहंकाराच्या भरात म्हणत नाही आहे तर वस्तुस्थिती म्हणून सांगतो आहे. आपला देश इतका काही लहान नाही की आपल्याला अन्नधान्याकरिता इतरांच्या मदतीवर अवंलंबून राहावे लागावे. आपण उपखंड आहो. ४० कोटी लोकांचा आपला देश आहे. आपल्या देशात मोठमोठ्या नद्या वाहतात आणि विविध प्रकारची सुपीक जमीन आपल्या देशात आहे. तसेच आपल्याकडे असंख्य पाळीव पशू आहेत. आपले पशू फार कमी दूध देतात हा आपला दोष आहे. आपल्याला जितके दूध लागते तितके देण्याची क्षमता आपल्या गायीम्हशींमध्ये आहे. गत काही शतकात आपल्या देशाने याकडे दुर्लक्ष केले नसते तर त्याने केवळ स्वतःपुरतेच अन्नधान्य निर्माण केले नसते तर दुसऱ्या महायुद्धानंतर जी अन्नधान्य समस्या संपूर्ण जगात निर्माण झाली ती दूर करण्यातही आपल्या देशाने महत्त्वाची भूमिका बजावली असती. भारतातसुद्धा हीच समस्या आहे. यामुळे निर्माण होणारे क्लेष कमी होण्याऐवजी वाढतच आहेत. माझ्या सूचनेचा असा अर्थ नाही की विदेशातून कोणी स्वतःहोऊन काही मदत करत असेल तर ती आपण कृतघ्नपणे ठोकरून लावावी.

मला केवळ इतकेच म्हणायचे आहे की आपण भीक मागत फिरू नये. यामुळे आपले मनोधैर्य खचते. यात अन्नधान्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्याकरिता येत असलेल्या अडचणीची भर पडते. धान्याची जलद वाहतूक करता येईल अशा सोयी आपल्याजवळ नाहीत. विदेशातून येणारे धान्य खाण्यासारखे असेल की नाही याचीही या समस्येत भर पडते. मानवी स्वभाव लक्षात ठेवून आपल्याला काम करायचे आहे  ही गोष्ट आपण विसरू शकत नाही. जगातील कोणत्याही भागात माणूस ना तर परिपूर्ण झाला आहे ना परिपूर्णतेच्या जवळपास पोहोचला आहे.

आता आपल्याला कोणती परकीय मदत मिळण्याची शक्यता आहे हे आपण पाहू या. मला असे सांगण्यात आले आहे की आपल्या सध्याच्या गरजेच्या ३ टक्केपेक्षा जास्त अशी मदत मिळू शकत नाही. ही माहिती जर बरोबर असेल, आणि ती बरोबर आहे की नाही हे मी अनेक तज्ज्ञांकडून तपासून घेतली आहे, तर विदेशी मदतीवर विसंबून राहण्यात काहीही अर्थ राहत नाही. किंचितशा बाह्य मदतीवर अवलंबून राहणे याचा अर्थ होईल आपल्या असीम अंतर्गत क्षमतांकडे दुर्लक्ष करणे. यामुळे पीक काढण्यायोग्य ज्या एकएक इंच भूमीकडे आपण जितके लक्ष दिले पाहिजे तितके देणार नाही. त्या जमीनीतून रोखीचे पीक काढण्याऐवजी आपण धान्य पिकवू शकतो. ज्या पडित जमिनीतून पीक घेणे शक्य असेल ती आपण वहितीत आणली पाहिजे.

धान्याचे केंद्रिकरण विनाशक होईल अशी मला आशंका आहे. विकेंद्रिकरणामुळे सहजपणे काळ्याबाजाराला तोंड देता येऊ शकते. यामुळे धान्य नेण्याआणण्याकरिता लागणारा वेळ आणि पैसा वाचतो. याशिवाय जो ग्रामीण भारतात धान्य आणि डाळी पिकवतो त्याला उंदरांपासून आपल्या पीकाचे कसे संरक्षण करावे हे माहीत असते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी धान्य नेत असताना त्याची नासाडी करण्याची उंदरांना संधी मिळते. यामुळे देशाचे अनेक कोटी रुपयांचे नुकसान होते व टनांनी धान्य वाया जाते. आणि तेही अशा वेळी की जेव्हा देशाला एकेक अंस धान्याची नितांत गरज आहे. जिथे कुठे धान्य पिकवता येईल तिथे ते पिकवले पाहिजे याची जाणीव जर प्रत्येक भारतीयाला झाली तर देशात अन्नधान्याचा तुटवडा आहे हे आपण विसरून जाऊ. अधिक धान्य पिकवण्याच्या सुंदर आणि आकर्षक विषयाचे पूर्ण विवेचन मी केलेले नसले तरी जे काही मी सांगितले त्यावरून प्रत्येक माणूस या शुभकार्यात कशा प्रकारे मदत करू शकेल याकडे विद्वान लोक लक्ष देतील.

जे तीन टक्के धान्य आपण कदाचित विदेशातून मिळवू शकतो त्याची तूट आपल्याच देशातून कशी भरून काढता येईल हे मी आता दाखवेन. हिंदू दर एकादशीला उपवास वा अर्ध-उपवास करत असतात. जेव्हा करोडो लोकांवर उपासमारीची वेळ आलेली असते तेव्हा मुसलमान आणि इतरांनीही जर अधूनमधून जेवण वर्ज्य केले तर त्याला मनाई नाही. या सुंदर अर्ध-उपोषणाची

महती संपूर्ण राष्ट्राला कळली तर स्वतःहोऊन विदेशी धान्य नाकारल्यामुळे जी तूट निर्माण होऊ शकेल ती भारत आवश्यकतेपेक्षा जास्त भरून काढू शकेल.

माझे वैयक्तिक मत आहे की रेशनिंगचा जरी काही लाभ होतही असेल तरी तो फार कमी असेल. शेतकऱ्यांना जर त्यांच्या मर्जीवर सोडले तर त्यांनी निर्माण केलेले पीक ते स्वतः बाजारात नेतील व प्रत्येकाला खाण्यालायक चांगले धान्य मिळेल.

अन्नधान्य समस्येचा घाईघाईत घेतलेल्या या आढाव्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष ट्रुमन यांनी अमेरिकी जनतेला दिलेला सल्ला सांगून मी माझे हे भाषण संपवीन. ते म्हणाले की उपासमारीच्या संकटात सापडलेल्या युरोपमधील धान्याची तूट भरून काढण्याकरिता अमेरिकी जनतेने ब्रेड कमी खावी. ते पुढे म्हणाले की अशा प्रकारे स्वतःहोऊन थोडे अन्न वर्जित केल्यामुळे अमेरिकी लोकांच्या प्रकृतीवर विपरीत परिणाम होणार नाही. अध्यक्ष ट्रुमन यांच्या या परोपकारी वक्तव्याकरिता मी त्यांचे अभिनंदन करतो. या परोपकारी वृत्तीमागे अमेरिकेचा काही आर्थिक लाभ मिळवण्याचा हेतू असावा असे जे सूचित करण्यात येते ते मला मान्य नाही. माणसाचे मूल्यन त्याच्या कृतीवरून करावे लागत असते, त्याच्या कृतीमागील हेतूवरून नाही. माणसाच्या अंतःकरणात काय आहे ते एका ईश्वरालाच माहीत असते. उपाशी युरोपकरिता अमेरिका जर काही त्याग करत असेल तर आपण आपल्या स्वतःच्या लोकांकरिता हा लहानसा स्वार्थत्याग का करू नये? अनेक लोक जर उपासमारीने मरणारच असतील तर आमच्याकडून जितके करता येणे शक्य होते तितके केल्याचे श्रेय तरी आम्ही घेतले पाहिजे.

आपण आशा करू या की डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी तयार केलेली समिती देशाला भेडसावणाऱ्या अन्नधान्य समस्येवर जोपर्यंत काही निर्णायक उपाय सुचवत नाही तोपर्यंत ती आपले काम संपवणार नाही.

हरिजन, ऑक्टोबर १९, १९४७

# १३४. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर ७, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

कालच्या माझ्या भाषणात हिंदू आणि मुसलमान यांच्यात आजकाल काय सुरू आहे याचा काहीही उल्लेख नव्हता. परंतु आज काही तरी घडले आहे आणि मी त्याबद्दल मौन पाळू शकत नाही. ते इथे घडले नाही तर डेहराडून येथे घडले आहे. एका मुसलमान सद्गृस्थाचा खून झाला. जोपर्यंत माझी माहिती आहे त्यांनी कोणताही गुन्हा केला नव्हता. तसेच त्यांनी कायदासुद्धा आपल्या हातात घेतला नव्हता. परंतु तरीही त्यांचा खून झाला कारण ते मुसलमान होते. हे पाहून मला वेदनाही झाल्या आणि हे असेच सुरू राहिले तर कुठे थांबेल असा प्रश्नही मला पडला. माझ्याजवळ अनेक मुसलमान बंधूभगिनी असल्याचे मला आढळते. त्यांना इथून निघून जा असे सांगायचा मला संकोच होतो. ते कसे जाऊ शकतात? आजकाल आगगाड्यासुद्धा मुसलमानांकरिता सुरक्षित नसल्याचे मला दिसून आले आहे. ज्या कोणाच्या मनात येते तो त्यांना डब्याबाहेर फेकून देतो वा त्यांची कत्तल करतो. असेच पाकिस्तानमध्येही घडते आहे हे मला माहीत आहे. परंतु अशा प्रकारे वागून आपण काय साध्य करणार आहो? निदान आपण स्वतःची ओळख ठेवू या. निदान आपण आपल्या धर्माची जाणीव ठेवू या. प्रत्येकजण आपला धर्म पाळत असतो. आपला धर्म काय शिकवतो? वा आपल्या धर्माचा मुळीच विचार न करता आपण वागत असतो? कॉंग्रेसने काय आपली बुद्धी गहाण ठेवली आहे? अखेरीस कॉंग्रेसने गेली साठ वर्षे काय केले? कॉंग्रेस जर आतापर्यंत चूक करत असेल तर मी म्हणेन की ती देशाची शत्रू आहे आणि तिला हटवले पाहिजे. आज जे कॉंग्रेसी आहेत त्यांनीसुद्धा सांगून टाकावे की आम्ही कॉंग्रेस सोडतो आहो आणि वेगळा पक्ष तयार करतो आहो. त्याबद्दल कोणतीही तक्रार असू शकत नाही. तुम्हाला हवे ते करा परंतु संपूर्ण जगासमोर आणि आपल्या लोकांसमोर स्पष्ट शब्दांत मी सांगतो की आपण कायदा हातात घेऊ नये. आपण जर असे केले तर आपण स्वतःलाच विनाशाकडे नेऊ आणि आपले स्वातंत्र्य गमावू आणि नंतर दुसरी कोणती सत्ता आली व तिने आपल्याला गुलामगिरीत टाकले तर मग आपण किती मोठी घोडचूक केली हे आपल्या लक्षात येईल. ही चांगली गोष्ट नाही. एक मुंगूस होता. त्याने मुलाला वाचवण्याकरिता साप मारला. सापाला चावल्यामुळे त्याचे तोंड रक्ताने माखलेले होते. मुलाची आई पाणी आणण्याकरिता विहिरीवर गेलेली होती. ती आली तेव्हा आपण मुलाला वाचवले हे सांगण्याकरिता जणू काय मुंगूस

उड्या मारत तिच्याकडे गेले. परंतु तिला वाटले की मुंगसाने आपल्या मुलाला मारले आणि त्यामुळे तिने पाण्याने भरलेली ती घागर मुंगसावर आदळली. पाणी सांडले, भांडे फुटले आणि मुंगूस मेला. ती बाई जेव्हा घरात शिरली तेव्हा तिने पाळण्यात मुलाला खेळताना पाहिले आणि मेलेला साप त्याच्या जवळच पडलेला होता. तेव्हा कुठे लक्षात आले की तो मुंगूस तिचा मित्र होता. तिला वाईट वाटले आणि पश्चात्ताप होऊ लागला. तर आपण असे काही करू नये. त्या स्त्रीप्रमाणे सरकारला सहकार्य न केल्याबद्दल आपल्याला पश्चात्ताप होईल. आपण आपले सरकार स्थापन केले आहे. आपण ते नष्ट करणार आहो काय?

आज आपल्या हातात सत्ता आली आहे. आपल्याला आपले मंत्री मिळाले आहेत. जवाहरलाल नेहरू आपले प्रधानमंत्री आहेत. ते खऱ्या हिऱ्यासारखे आहेत आणि त्यांनी आपल्या लोकांची चांगली सेवा केली आहे. याशिवाय सरदार आहेत आणि इतरही अनेक आहेत. आपल्याला ते आवडत नाहीत असे काही आहे काय? आज असे म्हणतात की जवाहरलाल चांगले नाहीत. असे म्हणतात की जवाहरलाल चांगले हिंदू नाहीत. लोकांना आपण म्हणू तसे वागणारा माणूस पाहिजे. त्यांना असा माणूस पाहिजे की जो मुसलमानांना पाठिंबा देणार नाही आणि व त्यांना बाहेर काढेल. जवाहरलाल तसे करू शकत नाही हे मी मान्य केलेच पाहिजे. आणि मीसुद्धा तसे करू शकत नाही. मी स्वतःला सनातनी हिंदू समजतो. परंतु मी असा सनातनी नाही की जो भारतात हिंदूशिवाय इतर कोणालाही राहू देणार नाही. माणूस कोणताही धर्म पाळत असला तरी तो जर आपल्या देशाशी प्रामाणिक असेल तर तो त्या देशाचा असतो, आणि मला जितका या देशात राहण्याचा अधिकार आहे तितकाच त्यालाही या देशात राहण्याचा अधिकार असेल. एखादा माणूस अल्पसंख्याक गटाचा असेल तर त्यामुळे काही फरक पडत नाही. मला धर्म हेच शिकवतो. अगदी लहानपणापासून मला शिकवण्यात आले होते की रामराज्यात म्हणजे देवाच्या राज्यात एखादा माणूस जर वेगळ्या धर्माचा असेल तर तेवढ्या कारणाकरिता तो कमअस्सल ठरत नसतो. मी हा असा हिंदू आहे हे तुम्ही लक्षात ठेवले पाहिजे. माझ्या हातात कोणतीही सत्ता नाही आणि मी मंत्रीही नाही. जवाहरलाल मंत्री आहेत आणि तुम्हाला हवे असेल तर तुम्ही त्यांना काढून टाकू शकता. त्यानंतर सरदार आहेत. तुम्हाला माहीत आहे ते कोण आहेत? ते बार्डोलीचे सरदार आहेत. तुम्ही त्यांचे ऐकत असता? त्यांचेसुद्धा अनेक मुसलमान मित्र आहेत. त्यांचे मित्र इमाम साहेब हे गुजरातमध्ये कॉंग्रेसचे पुढारी होते. ते वारलेले आहेत. त्यांचे जावाई (गुलाम रसूल कुरेशी) अहमदाबादला राहतात आणि ते जिल्हा कॉंग्रेसचे प्रमुख आहेत असे मला वाटते. ते फार चांगल्या अंतःकरणाचे गृहस्थ आहेत. मी त्यांना चांगला ओळखतो. त्यांनी इमाम साहेबांच्या मुलीशी (अमिना) लग्न केले. हे तेच इमाम साहेब आहेत की जे दक्षिण आफ्रिकेतील आपला व्यवसाय सोडून

आपल्या पत्नीबरोबर इथे आले होते व माझ्याबरोबर राहिले होते. ते आता वारले आहेत आणि त्यांची मोठी झालेली मुलगी मागे आहे. तू मुसलमान आहे म्हणून माझे तुझ्याशी काहीही देणेघेणे नाही असे म्हणून मी तिला टाकून दिले पाहिजे काय? ती मुसलमान आहे यात काही संशय नाही परंतु ती अंतःकरणाने फार चांगली मुलगी आहे हे मी तुम्हाला सांगू शकतो. आपल्याला जावे लागेल याची तिला कल्पनाही नाही. सरदार जर तिला जाऊ देतील तर ती कुठे राहील? आपण कायदा हातात घेऊ नये. कायदा सरदार तयार करो वा जवाहरलाल, परंतु आधी अध्यादेश काढायचा आणि मग जनतेच्या हाती सर्व काही सोडून द्यायचे असे ते करू शकत नाहीत. आज आपले मंत्री असे असू शकत नाहीत. मान्य की ब्रिटिशांच्या काळात असे केले जात होते. परंतु आताही आपण असेच करावे असा त्याचा अर्थ होतो काय? ब्रिटिशांची आपण ज्याकरिता टीका करत होतो तेच आपण आताही केले पाहिजे काय? आपण हे सहन करणार नाही. मला हेच सांगायचे होते.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३८९-९१

# १३५. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर ८, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ८, १९४७

एक सद्गृहस्थ मला नेहमी भेटण्याकरिता येत असतात. ते चांगले गृहस्थ आहेत. ते डेहराडून येथून प्रवास करत आले. गाडीत खूप गर्दी होती. एका स्टेशनवर (मी नाव विसरलो) एक माणूस आमच्या डब्यात शिरला. त्या डब्यात इतर सर्व हिंदू आणि शीख होते. काहींजवळ तलवारी होत्या आणि काहींजवळ चाकूसुरे. त्यांनी त्या नवागताकडे बारकाईने पाहिले. त्यांनी त्याला तू कोण म्हणून विचारले. तो गरीब माणूस एकटा होता. तो म्हणाला की मी चांभार आहे. परंतु त्या लोकांना संशय आला. त्यांनी जेव्हा त्याचा हात पाहिला तेव्हा त्याच्या हातावर त्याचे नाव गोंदलेले असल्याचे त्यांना आढळले. काही वेळा लोक आपल्या हातावर आपले नाव गोंदून घेत असतात.आणि अशा प्रकारे तो मुसलमान असल्याचे सिद्ध झाले. कोणी तरी त्याच्या शरिरात सुरा खुपसला आणि यमुनेजवळ जशी गाडी पोहोचली तसे त्याने त्यांना उचलले आणि नदीत फेकून दिले. हे सर्व एका माणसाने केले होते परंतु तिथे असलेले सर्व लोक ते पाहत होते. ते सद्गृहस्थ हे सर्व पाहत होते. परंतु अखेरीस त्यांच्याकडून हे पाहवले गेले नाही व त्यांनी आपले तोंड दुसऱ्या बाजूला केले. मी त्यांना विचारले की तुमच्या अंतःकरणात इतकी करुणा होती आणि तो माणूस मारला गेलेला तुम्हाला जर आवडला नाही तर तया माणसाला हे पाशवी कृत्य करण्यापासून तुम्ही का अडवले नाही? त्या डब्यात जवळपास ५०-६० हिंदू आणि शीख होते व त्यांच्यात तो एकटा बिचारा मुसलमान होता. अशा प्रकारच्या एकट्या माणसाच्या शरीरात सुरा भोसकून त्याला मारून टाकायचे आणि यमुनेत फेकून द्यायचे यात कोणती माणूसकी आहे? तो माणूस पूर्णपणे मेलेलासुद्धा नव्हता. त्याला भोसकण्यात आले, जखमी करण्यात आले आणि नदीत फेकून दण्यात आले. माझ्याकडे आलेल्या सद्गृहस्थांमध्ये इतकी करुणा होती तर त्यांनी हस्तक्षेप का केला नाही आणि त्याला मृत्यूपासून का वाचवले नाही? ते म्हणाले की मला जरी वाईट वाटत होते तरी मी माझे कर्तव्य करू शकलो नाही. ते म्हणाले की दुसरे काही करण्याचा मी विचारच करू शकलो नाही. मी त्यांना सांगितले की ही काही चांगली गोष्ट नाही, ही काही माणूसकी नाही. आपण इतके लोक असू आणि एखादा मुसलमान आपल्यामध्ये येत असेल तर आपण त्याला मारून टाकतो आणि आणि त्याचा देह नदीत फेकून देतो. कोणीही जर असे करत असेल तर आपण त्याला अडवले पाहिजे आणि दया दाखवण्याकरिता प्रेमाने समजावले पाहिजे. त्याला त्याने सांगायला पाहिजे - ‘हे तू काय करतो आहेस? तू कोणाला

मारतो आहेस? त्याला मारू नकोस. त्याने काहीही केलेले नाही.’ आणि याचा काहीही परिणाम होत नसेल आणि त्या मुसलमानाला वाचवण्यात त्याचा जीव जरी गेला असता तरी मला आनंद झाला असता. पन्नाससाठ लोकांनी एकट्या माणसाला मारण्यात कोणता मोठेपणा आहे? परंतु तिथे किती तरी लोक होते आणि एका माणसाने त्या माणसाला मारून टाकायचे ठरवले व अक्षरशहा तसे केलेसुद्धा आणि त्या वेळी त्याच्याकडे इतर माणसे पाहत होती व बहुधा त्यांनाही त्याची ती कृती मान्य असावी. मी तुम्हाला सांगायलाच पाहिजे की जे लोक अशा प्रकारच्या विचारसरणीला शरण जातात ते चूक करतात. ज्या लोकांनी हत्या केली त्यांच्यामध्ये असेही काही लोक असतील की ज्यांच्या अंतःकरणात दयाभाव असेल व त्यांना ती हत्या पसंतही नसेल. परंतु त्यांना त्यांच्या स्वतःच्या जीवाची भीती वाटत असल्यामुळे ते गप्प बसले आणि अशा प्रसंगी आपले काय कर्तव्य असते हे ते विसरले. पण माणूस कसा काय विसरू शकतो? कोणी जर पाशवी वर्तन करत असेल तर तुम्ही त्याला थांबवलेच पाहिजे. असे पाशवी कृत्य पसंत नसणारेसुद्धा केवळ त्या गोष्टीकडे पाहत राहिले ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे? मी तुम्हाला हे सांगतो आहे कारण ज्या लोकांना हे पाशवी कृत्य आवडत नव्हते त्यांच्यातसुद्धा त्याला विरोध करून हस्तक्षेप करण्याचे साहस नव्हते. अशा प्रकारचे कृत्य होत असताना एक माणूस जरी उभा राहिला आणि त्याने हल्ला करू पाहणाऱ्या अपराध्याचा हात धरून हल्ला करण्यापासून त्याला अडवण्याचा प्रयत्न केला व म्हणाला की मी याला मारू देणार नाही व तरीही त्याने ऐकले नाही तर स्वतःचा जीव द्यायलाही त्याने मागेपुढे पाहिले नाही तर मला आनंद होईल. तो जर माझ्यासारखा माणूस असेल तर तो अहिंसेवर अढळ राहील. त्याला जरी मरावे लागले तरी तो मारणार नाही. उलट तो स्वतःचा जीव देऊन मरणाऱ्या व्यक्तीचा जीव वाचवील. असे धैर्य जर कोणी दाखवले असते तर तो माणूस वाचला असता याबद्दल मला किंचितही संशय नाही. आणि वाचवण्याच्या प्रयत्नात तो माणूस जर मरण पावला तर तो खरोखरी शूर असल्याचे सिद्ध होईल. ही खरी अहिंसा आहे. सबळांसमोर गप्प राहणे आणि दुबळयांच्या विरोधात जोर दाखवणे म्हणजे खरी अहिंसा नाही.

आपण ब्रिटिशांच्या विरोधात अहिंसक होतो परंतु आता मात्र हिंसेचा वापर करतो आहोत. आपण कोणाच्या विरोधात हिंसेचा वापर करतो आहो? आपल्याच देशबांधवांच्या विरोधात. ब्रिटिशांच्या विरोधात आपण जो अहिंसेचा वापर केला ती शुरांची अहिंसा नव्हती. त्याचे परिणाम आज देशाला भोगावे लागत आहेत. मी त्याचे परिणाम भोगतो आहे. तीच अवस्था तुमचीही आहे. मी तुम्हाला खरी अहिंसा शिकवू शकलो नाही हे मी मान्य करतो. शुरांची अहिसा कशी असते ते मी तुम्हाला दाखवतो आहे. आज इथे मुसलमान राहत आहेत. आणि तिथे पाकिस्तानमध्ये मुसलमान हिंदूंशी दुर्वर्तन करत आहेत. परंतु त्याचा बदला म्हणून आपणही मुसलमानांशी गैरवर्तणूक केली

पाहिजे काय? ते काय शूरपणाचे काम करत आहेत? मी तुम्हाला सांगतो की पाकिस्तानमध्ये जे काही घडते आहे ते निंदनीय आहे आणि आपल्या संघराज्याने जर त्याचेच अनुकरण केले तर ते तितकेच निंदनीय असेल. आणि कोणत्या बाजूने पहिल्यांदा आक्षेपार्ह वर्तन केले आणि कोणी जास्त अतिरेक केला असे म्हणणे हा काही मैत्री करण्याचा खरा मार्ग नाही. मैत्रीचा खरा मार्ग आपण नेहमी न्यायाच्या बाजूने असणे व चांगले वागणे हा आहे. आपण जर हा मार्ग अनुसरला तर रानटी माणूस आणि विवेकाचे भान सुटलेल्या लोकांची विवेकबुद्धीसुद्धा जागृत होऊ शकते. कोणाचा अपराध मोठा आणि कोणाचा लहान वा कोणी सुरुवात केली यात पडण्याची आपल्याला गरज नाही. असे करणे शुद्ध अडाणीपणा आहे असे मला वाटते. मैत्री करण्याचा हा मार्ग नाही. कालकालपर्यंत जे शत्रू होते आणि आज जर त्यांना मित्र व्हायचे असेल तर त्यांनी भूतकाळातील शत्रुत्व विसरून मित्राप्रमाणे वागायला सुरुवात केली पाहिजे. वैरभावनेची आठवण ठेवून काय लाभ? जमत असेल तर मैत्री करू आणि आवश्यकता पडली तर भांडण्याचीही आमची तयारी आहे असे म्हणणारे मित्र होऊ शकत नाहीत. मैत्रीची वाढ अशी होत नसते.

आता मी थोडासा वेगळ्या मुद्द्यावर बोलेन. आज वृत्तपत्रे जगातील फार प्रभावी माध्यम झाले आहेत. देश जेव्हा स्वतंत्र होतो तेव्हा तर वृत्तपत्रांची शक्ती अजूनच वाढते. जेव्हा स्वातंत्र्य असते तेव्हा वर्तमानपत्रांच्या बातम्या आणि वृत्तांत छापण्याच्या अधिकारावर कोणतेही बंधन नसते. हे छापू शकता आणि ते नाही असे स्वातंत्र्यात म्हणता येऊ शकत नाही. अशा वेळी लोकमताला फार महत्त्व येत असते. वृत्तपत्रे जेव्हा घाणेरडा प्रचार करतात वा निराधार वृत्त प्रकाशित करतात वा लोकांना चिथावणी देतात तेव्हा अशा गोष्टींना आळा घालण्याकरिता सरकार त्यांच्याविरुद्ध कठोर पाऊल उचलून कायदेशीर कारवाई करण्याकरिता न्यायालयात जाऊ शकते. परंतु असे केल्यामुळे दंगलीची परिस्थिती अजूनच चिघळते व गोंधळ वाढतो. सरकार असेही करू शकत नाही. इंग्रजांचा काळ वेगळा होता. त्यांना कशाची फिकीर? उचलले टिळक महाराजांना आणि टाकले तुरुंगात. (बाळ गंगाधर टिळक, त्यांना केसरीतील दोन लेखांबद्दल मंडाले येथील तुरुंगात टाकण्यात आले होते. पाहा महान टिळकांना शिक्षा, ऑगस्ट १, १९४७) वृत्तपत्रात त्यांनी लिहिले होते. असे काही खूपही लिहिले नव्हते. तरीही त्यांना सहा वर्षांकरिता हद्दपार करण्यात आले होते व तुरुंगात त्यांना शिक्षेचा संपूर्ण काळ राहावे लागले होते. त्यांच्याप्रमाणेच अनेकांना तुरुगांत जावे लागले. मलासुद्धा सहा वर्षांकरिता तुरुंगात पाठवण्यात आले होते. (गांधीजींना मार्च १८, १९२२ला सहा वर्षांची तुरुंगवासाची शिक्षा झाली होती, परंतु प्रकृतीच्या कारणाकरिता त्यांना फेब्रुवारी ५, १९२४ला सोडण्यात आले.) ही वेगळी गोष्ट आहे की मी सहा वर्षे तुरंगात राहिलो नाही. परंतु यंग इंडियात मी लिहिलेल्या लेखाकरिता मला सहा वर्षांकरिता तुरुंगात पाठवण्यात आले होते. मी वाईट काहीही

लिहिले नव्हते परंतु मला शिक्षा झाली. आता आपण स्वतंत्र झालेलो असल्यामुळे असे काहीही घडू शकत नाही. आज जे वार्ताहर आहेत, संपादक आहेत, वर्तमानपत्रांचे मालक आहेत, त्या सर्वांनी सत्याचा मार्ग धरला पाहिजे व लोकांची सेवा केली पाहिजे. वृत्तपत्रांमध्ये कोणतीही खोटी माहिती प्रकाशित होऊ नये तसेच लोकांना भडकवण्यात येईल असे काहीही वर्तमानपत्रातून प्रकाशित करण्यात येऊ नये. आज आपण स्वतंत्र झालेलो असल्यामुळे घाणेरडी वृत्तपत्रे न वाचता पेकून देणे आपले कर्तव्य आहे. जर अशी वृत्तपत्रे कोणीही विकत घेतली नाही तर ते आपोआपच सरळ मार्गावर येतील. लोकांना घाणेरड्या आणि नको त्या गोष्टी वाचण्याचे व्यसन लागले आहे याची मला लाज वाटते. अशा वर्तमानपत्रांचा चांगला खप होतो. मी रेवाडी येथील एका प्रसंगाबद्दल वाचले. एका वृत्तपत्राने बातमी प्रकाशित केली की मिओ समुदायाच्या लोकांनी तिथे सर्व हिंदूंना मारून टाकले, त्यांच्या घरांना आगी लावल्या व त्यांची संपत्ती आणि पशुधन लुटून नेले. मिओंनी अशा प्रकारचे भयानक जंगलीपणाचे कृत्य केले हे वाचून मला धक्काच बसला. दुसऱ्या दिवशी रेवाडीबद्दलची बातमी वर्तमानपत्रांमधून आली. ती सर्व बनावट हकिगत होती. रेवाडीसंबंधीची ती बातमी वर्तमानपत्रांमधून प्रकाशितच कशी होऊ शकली याचे मला आश्चर्य वाटले. ज्या माणसाने रेवाडीसंबंधीचा वृत्तांत लिहिला होता त्याने स्पष्टिकरण दिले पाहिजे. चुकीच्या माहितीमुळे ते वृत्त लिहिण्यात आले होते की जाणीवपूर्वक करण्यात आलेला तो खोडसाळपणा होता हे त्याने स्पष्ट केले पाहिजे. त्याने ईश्वरासमोर फार मोठा अपराध केला आहे. असे काही घडायला नको होते. कोणी जर अशा प्रकारचे वर्तन करील तर आपल्या देशाची कधीही प्रगती होणार नाही. सरकार आज वृत्तपत्रांवर नजर ठेवू शकत नाही. तुम्ही आम्ही वृत्तपत्रांवर नजर ठेवली पाहिजे. आपण आपले अंतःकरण शुद्ध करू या आणि घाणेरड्या गोष्टींचा स्वीकार करण्याकडे आपला कधीही कल असू नये. घाणेरड्या गोष्टी वाचणे आपण वर्ज्य समजू या. आपण जर असे केले तर वृत्तपत्रे आपले कर्तव्य योग्य पद्धतीने बजावतील. अजून एका मुद्द्याची चर्चा केल्यानंतर मी संपवीन.

वृत्तपत्रांसारखीच आपल्या सैन्याची आणि पोलीसांची स्थिती आहे. फाळणीच्या वेळी सैन्य आणि पोलीस यांचेही विभाजन झाले होते. मला मान्य आहे की असे त्यांच्यामुळे झाले नाही, परंतु झाले. इथल्या सैन्यात हिंदू आणि शीख आहेत. मुसलमान सैनिक पाकिस्तानमध्ये गेले. हिंदू आणि शीख शिपाई जर असा विचार करू लागतील की आम्ही स्वतः हिंदू आणि शीख असल्यामुळे आमच्यावर केवळ हिंदूंना आणि शिखांना वाचवण्याची जबाबदारी आहे आणि त्यांनी केलेल्या अपराधाकडे आम्ही दुर्लक्ष केले पाहिजे आणि मुसमानांचे रक्षण करण्याची जबाबदारी आमच्यावर नाही असे म्हणतील तर आपण कुठलेच राहणार नाही. तसेच तुम्हाला वाचवणे आमचे काम नाही असे मुसलमान सैन्य आणि पोलीस हिंदूंना म्हणू लागले व त्यांना मारू लागले तर तेसुद्धा योग्य होणार

नाही. सरकारजवळ सैन्य आणि पोलीस आहेत. परंतु मला ना तर सैन्याची गरज आहे ना पोलिसांची. तुम्हीच आपले पोलीस आणि सैनिक व्हा असे मी लोकांना सांगेन. इथे हिंदू जर मुसलमानांना मारत असतील तर त्यांना वाचवले पाहिजे. आपण त्यांना तसेच सोडून देऊ नये. मला जरी माझा जीव द्यावा लागला तरी मी एक पाऊलही बाजूला सरकणार नाही. माझे सरकार असे असेल. मी हवेत बोलत नाही आहे. काय बरोबर आहे ते मी तुम्हाला सांगत आहे. सरकारच्या सैन्याला आणि पोलिसांनाही मी असेच सांगेन. इथे राहणाऱ्या थोड्याशा मुसलमानांचे रक्षण करणे त्यांचे काम आहे. वेळप्रसंगी आपले प्राण देऊनही त्यांनी त्यांचे रक्षण केले पाहिजे. असे झाले तरच ते स्वतःला खरे पोलीस आणि सैनिक म्हणवू शकतील. भारताने मिळवलेले स्वातंत्र्य खरोखरच वेगळेच आहे. सर्व जग असे म्हणते आणि माझेही म्हणणे आहे की कोणत्याही सरकारने कधीही दुसऱ्या देशातील जनतेच्या अशा प्रकारे सत्ता सोपवली नाही. कोणत्याही प्रकारे भांडणतंटा न करता आणि रक्त न सांडवता आपण स्वातंत्र्य मिळवले आहे. यामुळे आपले खिसे भरण्याकरिता सैन्याने आणि पोलिसांनी तिथे असू नये. जे मिळते त्यावर त्यांनी समाधान मानले पाहिजे. गोडधोड पदार्थांनी पुरेपूर महागड्या जेवणाचा त्यांनी विचार करू नये. जे कोणते जाडेभरडे अन्न मिळते त्यावर समाधान मानून सैनिकाने आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. लोकांच्या मुलांना शाळाकॉलेजमध्ये जाताना पाहून, त्यांच्या मोटारगाड्या आणि सायकली पाहून अशाच गोष्टी मिळाव्या म्हणून तो जर भ्रष्टाचाराकडे वळत असेल तर तो खरा सेवक राहणार नाही. म्हणूनच मी म्हणतो की खरा सैनिक आणि खरा पोलीस तोच असतो जो जे काही खायला मिळते त्यावर समाधान मानेल व धार्मिक पक्षपात न करता आपले कर्तव्य पार पाडेल. तो जर हिंदू असेल तर मुसलमानांना हानी पोहोचवण्याचा विचार त्याने करायला नको. मुसलमानाने जर गुन्हा केला असेल तर त्याला पकडून शिक्षा करणे ही वेगळी गोष्ट आहे. परंतु इतर ठिकाणच्या मुसलमानांनी जघन्य अपराध केले आहेत म्हणून इथल्या निष्पाप मुसलमानाला शिक्षा केली पाहिजे काय? हिंदू जर मुसलमानाला इजा पोहोचवत असेल तर हिंदूला पकडणे पोलिसांचे कर्तव्य असेल. आपल्या दैशाचे सैन्य आणि पोलीस जर असे वागत नसतील तर ते आपल्या देशाच्या मिठाला जागले नाहीत असे म्हणावे लागेल.

पाकिस्तानमधील सैन्य आणि पोलीस यांच्याकरिताही मी हेच सांगेन. परंतु तेथील परिस्थितीबद्दल मी काहीही करू शकत नाही. मी कोणाला उद्देशून हे बोलू? परंतु मी सांगतो त्याप्रमाणे इथे घडले तर तिथेसुद्धा असेच घडल्याशिवाय राहणार नाही याबद्दल मला शंका नाही. आज लोकांचा तोल गेलेला आहे. ते म्हणतात की आमच्याच भाऊबंदांशी पाकिस्तानमध्ये दुर्व्यवहार केला जात असताना इथे आम्ही त्याचा बदला का घेऊ नये? परंतु असे बोलणे हे माणुसकीचे नाही. यामुळे जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत मी शक्य तितक्या जोरात म्हणत राहीन की आपण स्वतःला

शुद्ध ठेवले पाहिजे, आपण चांगले राहिलो पाहिजे, आपली वृत्तपत्रे, आपले सैन्य, आपले पोलीस या सर्वांनी चांगले राहिले पाहिजे. याशिवाय आपले सरकार काम करू शकणार नाही आणि आपला विनाश होईल. पाकिस्तानमध्ये काहीही घडले तरी आपण सुसंस्कृत राहिलो पाहिजे. कमीतकमी इतके तरी करा. तुम्ही जर माझे ऐकणार नाही तर आपल्या सर्वांचा विनाश होईल हे मी तुम्हाला सांगून ठेवतो.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३९१-९८

# १३६. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर ९, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

दररोज मी एकाच गोष्टीसंबंधी या वा त्या स्वरूपात बोलत असतो. लाचार झालो आहे. याच कामाकरिता तर इथे पडलो आहे. तुम्ही चांगले आहा, सज्जन आहा म्हणून तर शांतपणे माझे म्हणणे ऐकून घेता. याकरिता मी तुमचा आभारी आहे. आभारच मानू शकतो. परंतु मी सांगितले आणि लोकांनी शांतपणे ऐकले. आता माझे काम आटोपले असे समजणारा माणूस मी नाही. एवढ्याने माझे पोट भरत नाही. आपले इतके सगळे लोक त्रस्त होऊन पडले आहेत. भारतात भरपूर जागा पडली आहे. त्यांच्याकरिता काय केले पाहिजे? त्यांचे काय कर्तव्य आहे? सरकारचे कर्तव्य काय आहे? जे लोक एक प्रकारचे वाईट वातावरण निर्माण करतात त्यांना समजून घ्यायचे आहे, त्यांची समजूत घालायची आहे. असे होईल तेव्हाच तर जे लोक इतर ठिकाणी पडले आहेत त्यांच्यापर्यंत माझा आवाज पोहोचेल.

माझ्याकडे काही असे लोक आले की जे त्रस्त आहेत. ते सर्व चांगले लोक आहेत. ते पश्चिम पाकिस्तानमधील आहेत. ते माझ्याकडे दहाबारा दिवसांपूर्वी आले होते. सर्वात आधी मी त्यांना जे काही घडले ते सर्व लिहून देण्याकरिता सांगितले. त्यांच्या समस्येसंबंधी मला काही करता यावे म्हणून त्यांनी मला लेखी वक्तव्य दिले. त्यांचे म्हणणे आहे की पाकिस्तानमधील हिंदूंना इकडे येता येईल अशी काही व्यवस्था केली नाही तर त्यांना इकडे येता येणार नाही. ते म्हणतात की मार्गात धोका आहे. त्यांच्याजवळ धान्य आहे परंतु धान्याचा तो साठा ते आपल्याबरोबर कसे आणू शकतील? धान्य घेऊन येण्याची त्यांना कोण परवानगी देईल? सध्या तरी त्यांना विमानाने वा मोटारीनेच आणता येऊ शकते. आजकाल रेल्वेचा प्रवास फार कठीण झाला आहे. आधी जशा आगगाड्या सुरू राहायच्या तशा आता राहत नाहीत. ज्या लोकांना येणे शक्य झालेले नसेल त्यांचे तिथे काय झाले असेल हे कोणालाही सांगता येऊ शकत नाही. अशा परिस्थितीत ते येऊ शकले तर बरे होईल. माझ्याबद्दल सांगायचे तर आम्ही कुठे आहो आणि कुठे चाललो आहो याचा विचार मला पडतो.

आता मी बंगालकडे वळतो. तिथेसुद्धा मी भरपूर काम केले आहे. मी पूर्व बंघालमध्ये काम केले आहे तसेच पश्चिम बंगालमध्येही. मी पूर्व बंगालमध्ये, नोआखालीला गेलो आहे. (नोव्हेंबर ६, १९४६ला) ते आता पाकिस्तानमध्ये गेले आहे. मी तिथे दूरदूर पायी फिरलो आहे. दररोज मी तिथे वेगवेगळ्या ठिकाणी जात असे. मी तिथल्या स्थानिक लोकांशी बोलत असे. हिंदू स्त्री-पुरुषांच्या मनातील भीती दूर करण्याचा मी प्रयत्न केला. केवळ रामनामाच्या मदतीने मी असे करू शकलो. रामनाम घेत असताना कोणी आपल्याला मारले तर आपल्याला मारू द्या. जीवनाची इतकी जास्त आसक्ती आपल्याला का वाटली पाहिजे? जिवंत राहण्याकरिता आपण रामनाम टाकून दिले पाहिजे काय? घाबरून आपण ईश्वराचे नाव टाकून दिले पाहिजे काय? ज्या स्त्रियांना कुंकू लावण्याची सवय आहे त्यांनी ती टाकून द्यावी काय? त्या भागातील विधवा नसलेल्या स्त्रिया शंखाच्या बांगड्या घालतात. त्यांच्या विवाहित असण्याचे ते प्रतीक आहे. विधवा बांगड्या घालत नाहीत. विधवा नसतानाही भीतीमुळे त्यांनी बांगड्या घालणे बंद केले पाहिजे काय? सौभाग्य चिन्ह म्हणून शंखाच्या बांगड्या घालण्यात त्या स्त्रिया मागेपुढे पाहत असल्याचे मला जेव्हा आढळले तेव्हा बांगड्या घालणे बंद न करण्याकरिता मी त्यांना समजावले. त्यांची समजूत पटली आणि यापुढे आम्ही परत बांगड्या घालणे सुरू करू असे आश्वासन त्यांनी मला दिले. परंतु आता मी ऐकतो की लोक हळूहळू निघून येत आहेत. मला त्याबद्दल माहिती नाही. तिथे तर माझे लोकही आहेत. बहुधा मी तुम्हाला सांगितलेच असेल की माझे सर्व चांगले कार्यकर्ते तिथे आहेत. प्यारेलाल, खादी प्रतिष्ठानमधील लोक, कनू गांधी - सर्व तिथे आहेत. सतीश चंद्र दास गुप्तांसह अनेक कार्यक्षम लोक तिथे आहेत. ते सर्व त्या लोकांचे मनोधैर्य वाढवण्याचा प्रयत्न करत आहेत. असे असूनही लोक तिथून पळत आहेत. त्यांना तिथे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असेल यात काही संशय नाही. परंतु तिथून पळ काढण्यात काय अर्थ आहे? ते पळून कुठे जातील आणि काय कतील? त्यांनी या गोष्टीचा विचार केला पाहिजे. इथे कुरुक्षेत्रात आपल्याकडे २५,००० स्त्री-पुरुष निर्वासित आहेत. काही स्त्रिया गरोदर आहेत. त्यांना औषधोपचार करण्याकरिता आणि देखभाल करण्याकरिता कोण आहे? यामुळे त्यातील काही मेल्या तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. तिथे राहण्याकरिता जागा नाही आणि पंजाबमधून पळून येणे भाग पडल्यामुळे लोक निराश झाले आहेत. या लोकांना कोणता सल्ला द्यावा याचा यामुळे मी विचार करतो आहे. इथे जितके निर्वासित आले आहेत त्यापेक्षा तिथे राहिलेले निर्वासित किती तरी जास्त आहेत. दहावीस लोक असतील, इतकेच नाही तर काही लाख जरी असले तरी आपण त्यांची समजूत घालू शकू. परंतु ते करोडोच्या संख्येत आहेत आणि ते या विशाल देशात सर्वत्र पसरलेले आहेत. या सगळ्या लोकांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेणे ही काही लहान गोष्ट नाही. यांत त्यांना इतका काही त्रास सहन करावा लागतो की त्यांना मरायची वेळ येण्यापूर्वीच मरावे लागते वा

उपासमारीने मरावे लागते. सरकारने कितीही प्रयत्न केला तरी ते प्रत्येकाला प्रत्येक गोष्ट पुरवू शकत नाही. सरकारजवळ त्याचे सैन्य आणि पोलीस आहेत. परंतु ब्रिटिशांच्या काळात यांचा जसा उपयोग केला जायचा तसा आता करता येऊ शकत नाही. आणि तसा उपयोग करण्यात येऊसुद्धा नये. सैन्य जनतेच्या मदतीनेच आपले काम करू शकते. लोकांची इच्छा असेल तर ते सरकारचे हातपाय होऊ शकतात. लोकांचे सहकार्य असल्याशिवाय सरकार काहीही करू शकत नाही. मी हे मंत्र्यांनासुद्धा सांगतो आहे. सरकारला आपली जबाबदारी पार पाडू इच्छित नाही असे नाही. जवळपास दररोज माझी मंत्र्यांशी भेट होत असते. मी तुम्हाला सांगतो की तेसुद्धा अस्वस्थ आहेत. परंतु ते काय करू शकतात? अखेरीस सरकार चावण्याचा त्यांना अनुभव तर नाही. त्यांनी कॉंग्रेसची संघटना चालवली आहे. परंतु ती संघटना काही मोजक्या लोकांची होती. कॉंग्रेसच्या रजिस्टरवर नाव असलेले सर्व लोक कधीच एकत्र आले नव्हते. आणि कार्यालयात काम करणारांची संख्या फार कमी होती. त्यांना फार कमी संसाधनांसह काम करावे लागत आहे. आज त्यांना करोडो लोकांकरिता काम करावे लागत आहे. करोडो रुपये तिथे पडलेले आहेत आणि थोड्याशा अधिकाऱ्यांना हजारो लोकांकडे पाहावे लागते.

हे काम कसे होऊ शकते? २५,००० लोकांना वेळेवर अन्न कसे मिळावे याचा विचार केला पाहिजे. देशात दररोज हजारो लोक येत आहेत व ते उपाशी राहतात. त्यांच्याजवळ घालायला पुरेसे कपडे नाहीत आणि हिवाळा उंबरठ्यावर उभा आहे. पाकिस्तामधील परिस्थितीही इथल्यासारखीच आहे. असे काही नाही की पाकिस्तानमधील लोकांकरिता स्वर्ग आहे आणि इथल्या लोकांकरिता नरक. वा असेही म्हणता येईल की इथे जणू काही स्वर्ग नाही. हे सर्व मी माझ्या डोळ्यांनी पाहतो आहे. आणि पाकिस्तानमध्ये केवळ नरक आहे असेही म्हणता येऊ शकत नाही. अखेरीस दोन्ही देशांमध्ये माणसेच राहतात. त्यातील काही चांगले असतात आणि काही वाईट. परंतु इथे आणि तिथे किती चांगुलपणा आहे आणि किती वाईटपणा आहे हे कोण ठरवू शकतो? आणि असे मोजून आपण काय मिळवणार आहो? जे लोक इथे आलेले आहेत त्यांना व जे येऊ इच्छितात त्यांना संरक्षण कसे द्यावे हा माझ्यासमोर सर्वात मोठा प्रश्न आहे व तसा तो तुमच्यासमोरही असला पाहिजे. परंतु जे आलेले आहेत त्यांना परत आपल्या घरी कसे जाता येईल हे आपण पाहिले पाहिजे. मी तुम्हाला सांगतो की त्यांनी आपल्या घरी परत जायलाच पाहिजे. मला माहीत आहे की जे लोक खेड्यांमध्ये राहत होते त्यांना आपले ठिकाण सोडावेसे वाटणार नाही. खेड्यातील माणसाजवळ एक एकर जरी शेती असली तर ती राखून ठेवण्याकरिता तो वाटेल तो त्याग करील. जर लोक हजारो, लाखोंच्या संख्येने स्थलांतर करत असतील तर त्यांना कुठे सामावून घेता येईल आणि ते कसे राहू शकतील? ते रस्त्यातच मरत आहेत. यामुळेच मी म्हणतो की आपल्याला जरी मरावे लागले तरी आपण जिथे

आहो तिथेच राहिलो पाहिजे. नंतर काय घडते ते आपण पाहू या. आपण पाकिस्तानमध्ये राहिलो तर ईश्वर आपले रक्षण करणार नाही असे काही नाही. आपली काळजी घेण्याकरिता तिथेही ईश्वर सदैव राहतोच. आणि शिवाय अजून कोणी नाही तर आपली काळजी घेण्याकरिता तिथे सरकारही आहे.

मी आताच सांगितले होते की माझे सर्व सहकारी बंगालमध्ये आहेत. तर पश्चिम बंगालमधील सरकारने पूर्व बंगालच्या सरकारला तेथिल परिस्थिती काय आहे हे ते लिहावे. परंतु तिथेसुद्धा खरे म्हणजे लोक आपल्या सरकारच्या सूचनांचे पालन करत नाहीत. इतकेच नाही तर अधिकारीसुद्धा आपल्या सरकारच्या सूचना पाळत नाहीत. ते इतके उद्धट झाले आहेत की स्वातंत्र्य मिळाल्यामुळे आपल्याला कोणीही विचारणारे नाही असे त्यांना वाटू लागले आहे. ज्या ब्रिटिशांच्या साध्या भृकुटीभंगाला ते घाबरायचे ते निघून गेलेले आहेत. आता काय झाले? ब्रिटिशांना ते कसे घाबरायचे याचा मी साक्षीदार आहे. परंतु आता प्रत्येकाला असे वाटते की आपल्याला विचारणारा कोणीही नाही, मीच स्वतःचा सैनापती आणि पोलीस आहे, आता मी स्वतंत्र झालो आहे आणि आता मी हवे ते करू शकतो. मी इतकेच सांगू इच्छितो की असे चालू शकत नाही.

दोन्ही सरकार जर न्याय करण्याकरिता उत्सुक असतील तर (लोकांनासुद्धा) काही तरी करण्याकरिता प्रोत्साहन मिळेल. परंतु सरकारचीच न्याय करण्याची इच्छा नसेल तर काय होईल? अखेरीस त्याचा काय परिणाम होईल? भांडण्याची हौस असलेला मी माणूस नाही. मी भांडणापासून दूर पळणारा माणूस आहे. परंतु ज्यांच्याजवळ शस्त्रे आहेत, पोलीस आहेत आणि सैन्य आहे त्यांना स्वाभाविकपणे लढाई करणे आवडेल. ते दुसरे काय करू शकतात? मी काहीही करू शकत नाही. परंतु जे काही तरी करू शकतात त्यांची जे करण्याची इच्छा असेल ते ते करतीलच. तेव्हा युद्ध होणे अपरिहार्य होईल. माझ्या धर्माचे जे लोक आहेत ते तसेच निराशेच्या अवस्थेत पडून राहू शकत नाहीत. आपण काही तरी केलेच पाहिजे. हे मी दोन्ही सरकारांकरिता सांगत आहे. दोन्ही सरकारांनी काही तरी करावे म्हणून हे आहे. जो माणूस स्वतः जुलमी असतो त्याला दुसऱ्या माणसाला शिक्षा करण्याचा अधिकार नसतो.जे सरकार आपल्या लोकांचे रक्षण करू शकत नाही ते दुसऱ्या सरकारला त्याच कारणाकरिता बोल कसा लावू शकते? कोणी असे कसे करू शकतो? न्यायाकरिता संघर्ष करताना आपण मेलो व तसे करताना आपले सरकारही गेले तर ती गोष्ट मी समजू शकतो. परंतु घाबरून तिथून पळणे आणि पळतापळता मरणे असेच आपण केले पाहिजे काय? अर्धे लोक वाटेतच मरतात आणि उरलेले इथे पोहोचतात. परंतु त्यांना कुठे ठेवायचे? आपण त्यांना कसे खाऊ घालणार आहो? त्यांनी इथे काहीही काम न करता राहिले पाहिजे काय? तसे नसेल तर त्यांना काम द्यावे लागेल. जेव्हा आपल्याच देशातील करोडो लोकांची उपासमार होते आहे आणि करोडो लोक बेकार

आहेत आणि त्यांच्याकरिता काहीही करणे आपल्याला शक्य झालेले नाही तेव्हा या बाहेरून येणाऱ्या लोकांकरिता, बाहेरून म्हणजे दुसऱ्या देशातून नाही तर वेगळ्या प्रांतातून, आपण कुठून काम पाहणार आहो? ते इथे स्वतःचा काही कामधंदा कसा सुरू करतील? ते काय करतील आणि कसे? ही मोठीच समस्या आहे आणि तिच्यामुळे दुर्भावना निर्माण होत आहे. माझी सूचना मान्य करण्यात आली तर ही दुर्भावना निर्माण होणार नाही. लोकांमध्ये धैर्य येईल. ते मरण्याची कला शिकतील. ते जर मरण्याची कला शिकले तर ते आपले आणि जगाचे कल्याण करतील. मी सुचवलेल्या मार्गाबद्दल भारताची आपण खात्री पटवून देऊ शकलो तर ते सर्वांकरिता हितकारक होईल. आपण जर शूर झालो तर संपूर्ण जग आपले कौतुक करील.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ३९८-४०२

# १३७. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर १०, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १०, १९४७

आजसुद्धा मला बरीच कांबळी मिळाली. काही लोकांनी पैसेसुद्धा दिले. आम्ही काही कांबळी पाठवतो असे सांगणारी बडोद्याहूनसुद्धा तार आली आहे. काही ८०० कांबळी तयार आहेत असे ते म्हणाले असे मला वाटते. परंतु त्यांचे म्हणणे आहे की रेल्वेचे लोक इतक्या मोठ्या गठ्ठ्याचे पार्सल घेण्याच्या परिस्थितीत नाहीत. हे खरे आहे की आज रेल्वेवर कामाचा फार मोठा ताण आहे आणि ते प्रत्येक गोष्ट घेऊ शकत नाहीत. ती कांबळी आणता यावी म्हणून शक्य असेल तर सरकारकडून मी सूचना द्यायला लावीन. असे झाले की गरम पांघरुणांचा आपल्याजवळ भरपूर साठा असेल. आता आपल्याजवळ लोकरीचे पुरेसे कपडे नाहीत. परंतु मला आशा आहे की ईश्वराची इच्छा असली तर कसे तरी करून काम भागवता येईल इतके कपडे आपल्याला मिळतील व कोणालाही थंडीत कुडकुडावे लागणार नाही.

थोड्या वेळेपूर्वी एका स्त्रीने सोन्याची आंगठी पाठवली. सध्या तरी दुलया आणि कांबळी विकत घेण्याकरिताच मी त्या आंगठीचा उपयोग करू शकतो.

आता आपल्यासमोर गंभीर समस्या आहे आणि मी तिच्याबद्दल भरपूर बोललो आहे. आपल्याला अन्नधान्याच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे व त्यामुळे आपल्याला भरपूर त्रास सहन करावा लागतो. आपण आपले स्वातंत्र्य मिळवले आहे यात काही संशय नाही. परंतु या स्वातंत्र्याच्या आगमनाबरोबरच आपल्या समस्या किती तरी पटीने वाढत असलेल्या दिसत आहेत. मला असे वाटते की आपण जर खरे स्वातंत्र्य पचवू शकलो तर आपल्याला असा त्रास सहन करावा लागणार नाही. स्वतंत्र लोकांनी खरोखरी कसे वागायला पाहिजे? आपले स्वातंत्र्य असे काही आगळेवेगळे स्वातंत्र्य आहे की त्याच्या रक्षणाकरिता सैनिकाप्रमाणे लढावे लागत नाही. आपल्याला लढावे लागले होते परंतु ती लढाई वेगळ्या प्रकारची होती आणि सर्व जगाला तिचे कौतुक वाटले होते. अशा प्रकारच्या संघर्षाने आपण जर स्वातंत्र्य मिळवले आहे तर त्याचे आपल्याला विशेष महत्त्व वाटले पाहिजे. परंतु आपल्याला त्याची फारशी किंमत वाटत नाही. हा आपला दुबळेपणा आहे. धान्याची आयात करू नये म्हणून मी अतिशय साधी आणि व्यावहारिक सूचना केली होती (पाहा प्रार्थना प्रवचन ऑक्टोबर ६, १९४७). परंतु या व्यावहारिक सूचनेनेही लोकांना धक्का

बसल्याचे मला आढळले. का? ते म्हणाले की धान्याच्या आयातीची आम्हाला सवय आहे. परंतु ही काही पुरातन काळापासूनची सवय नाही. कोणी आम्हाला खाऊ घालेल तेव्हा खाण्याची आम्हाला सवय आहे असे म्हणणे योग्य नाही. जितके काही अन्नधान्य पुरवता येईल तितक्याचे परवाने देत जाणे योग्य नाही. परंतु माझी सूचना अगदी व्यावहारिक आहे. आणि तिच्यामुळे इतके अस्वस्थ होण्याचे काय कारण? भारत हा विशाल देश आहे आणि त्यात करोडो लोक राहतात. आपल्याजवळ पुरेशी जमीन आहे आणि ईश्वर कृपेने पाणीही पुरेसे आहे. मला माहीत आहे की देशात काही वाळवंटी भाग असा आहे की जिथे पाणी उपलब्ध नाही. परंतु भारतात कुठेही पाणी उपलब्ध नाही असे म्हणता येऊ शकत नाही. आपल्याजवळ जर इतके पाणी, जमीन आणि करोडो लोक आहेत तर घाबरण्याचा आपल्याकरिता कोणतेही कारण नाही.

आपली भूक भागवण्याकरिता आपण आपल्या श्रमाने अन्नधान्य पिकवले पाहिजे याची लोकांना जाणीव झाली पाहिजे इतकेच मला सांगायचे आहे. त्यामुळे वातावरणात विद्युतसंचार होईल व लोकांच्या उत्साहामुळेच निम्मे समस्या सुटेल. असे म्हणतात की खऱ्या मृत्यूने मरण्यापेक्षा मराणाच्या भीतीने लोक जास्त मरतात आणि ते खरेच आहे. एक माणूस होतो की ज्याला मी लवकरच मरणार आहे असे वाटत होते. दुसऱ्याबद्दलच का बोलायचे - माझेच उदाहरण घ्या. मला खोकला आहे म्हणून मी लवकर मरणार आहे असा मी विचार केला तर काय होईल? मी तेव्हाच मरेल जेव्हा माझी वेळ येईल. ती ईश्वराच्या हातात आहे. परंतु मी त्याबद्दल आतापासून काळजी करू लागलो व मी मृत्यूपंथाला लागलो आहे असा मी विचार करू लागलो तर तसे करणे हे प्रत्यक्ष मरण्यापेक्षाही मरणे होईल. आणि अशा प्रकारे मृत्यूच्या भीतीत वावरत असल्यामुळे माझ्या आजूबाजूच्या लोकांकरिता आणि माझ्या स्वतःकरिताही मी त्रासदायक परिस्थिती निर्माण करीन. येऊ घातलेल्या मृत्यूबद्दल मी सदैव शोक करत राहीन. चांगली गोष्ट ही आहे की मृत्यू येईपर्यंत निश्चल राहणे आणि ईश्वराशिवाय आपल्याला कोणीही मारू शकत नाही याबद्दल आपल्या मनाची खात्री पटवणे. मरणाची भीती जर आपण सोडली तर काळज्याही आपल्याला सोडून जातात आणि आपण आपल्या काळज्यांमधून मुक्त होतो. कोणीही असा विचार करू नये की इतर कोणाच्या कृपेने आपल्याला अन्न मिळावे, उलट आपल्या मेहनतीन ते आपण निर्माण केले पाहिजे. म्हणूनच माझे म्हणणे आहे की मरण आल्याशिवाय आपण मरू नये. आज ज्या वस्तू मिळतात, छीटचे कापड मिळते ते त्या रेशनच्या दुकानातून मिळत असतात आणि अशा प्रकारच्या ज्या गोष्टी आपला अपमृत्यू घडवून आणतात त्या सर्वांचा आपण त्याग केला पाहिजे. अन्नधान्यसमस्येविषयी इतके पुरे.

अशीच गोष्ट कपड्यांची आहे. मी तर सांगितलेच आहे की सध्या जितके कापड उपलब्ध आहे त्याच्या चौपट कापड मिळू शकते. आपल्या देशात कापडाची कमतरता का असावी? भारतात एखाद्या वेळी अन्नधान्याची तूट निर्माण होऊ शकते परंतु कापडाची तूट कधीही निर्माण होऊ शकत नाही याबद्दल माझी खात्री आहे. का? कारण भारतात स्वतःच्या गरजेपेक्षा जास्त कापड निर्माण होते. देशात असे किती तरी लोक आहेत की जे स्वतःकरिता सूत कातून त्यापासून कापड तयार करू शकतात व स्वतः तयार केलेले कपडे सहजपणे वापरू शकतात. आणि अशा प्रकारे अन्नवस्त्राच्या बाबतीत खऱ्या अर्थाने स्वतंत्र होऊ शकतो व आपल्याला गिरण्यांवरही अवलंबून राहावे लागणार नाही. आज या अर्थाने आपण स्वतंत्र नाही, आणि जर असे होत असेल तर ते आपल्या अज्ञानामुळे होते. अशा प्रकारे आपण आत्मनिर्भर होऊ अशी मला आशा होती. देशभर फिरत मी जेव्हा खादीचा प्रचार करत होतो ते दिवस आता गेले. स्त्रियांना जास्तीत जास्त सूतकताई करण्याकरिता मी सांगत असे. आणि त्या कताई करायच्या, परंतु त्याचे परिणाम न समजून घेता त्या तसे करायच्या. त्यांना मजुरीची पर्वा नव्हती. त्या कातत आणि कापड तयार करत. परंतु आता चित्र वेगळे झाले आहे. आज तुमच्याजवळ कापड नाही. माझे म्हणणे आहे की आपल्या कपड्यांकरिता आपण कापड तयार पाहिजे, त्याकरिता कताई केली पाहिजे व ते विणून घेतले पाहिजे. आपल्या स्वतःच्या गरजेकरिता कापड विणण्यात फार काही त्रास होत नाही. परंतु लोक इतकेसुद्धा करू शकत नसतील तर ते दुकानातून कापड विकत घेऊ शकतात. सरकार गिरण्यापासून कापड विकत घेऊ शकते व नंतर ते लोकांना वाटू शकते. याशिवाय ज्या लोकांना शक्य असेल त्यांनी एक दोन महिने कपडे विकत घ्यायचे नाही अशी शपथ घ्यावी. त्यांनी आपल्या उपयोगाकरिता खादी विकत घ्यावी आणि छीट वा इतर तलम कपडे घेण्याचे टाळावे. काही काळाकरिता आपण जर कापड विकत घेणार नाही तर त्यामुळे आपल्याला नागडे फिरावे लागेल असा अर्थ होत नाही. मध्यंतरीच्या काळात आपण भरपूर खादी तयार केली तर हिवाळ्याच्या थंडीपासून वाचण्याची समस्या आपण सोडवू शकू. इथे प्रश्न कांबळी आणि इतर गोष्टी तयार करण्याचा नाही. आपल्या स्वतःच्या उपयोगाकरिता खादीचे कापड तयार करणे व बाजारातून कापड विकत न घेणे इतकाच प्रश्न आहे. आपण जर इतके केले तर किंमती आपोआप उतरतील. आज कापडाच्या किंमतीसुद्धा वाढलेल्या आहेत. वस्तूंचे भाव वाढत आहेत. परंतु आपल्याला सदरा, कुर्ता, आणि इतर कपडे तयार करण्याकरिता केवळ काही यार्ड कापड हवे असते. त्याकरिता खादी घ्या. आणि मी आधीच सांगितल्याप्रमाणे आपण वागलो तर आपण स्वतः तितके कापड तयार करू शकतो. दुकानात जायचे नाही असे आपण ठरवू या. केवळ काही महिने आपण कापड विकत घेतले नाही तर मी तुम्हाला सांगतो की हा त्रास संपेल आणि अन्नवस्त्राच्याबाबतीत आपण आत्मनिर्भर होऊ. यामुळे लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल व ते

स्वावलंबी होतील व कपड्याच्या चणचणीची ते काळजी करणार नाहीत हा माझ्या दृष्टीने याचा दुसरा लाभ असेल. आपल्या गरजेचे कापड आणि धान्य आपण निर्माण करू शकतो असा आत्मविश्वास त्यांच्यात निर्माण होईल. आपण जर हे सर्व केले तर त्याचे फार चांगले परिणाम होतील. आपण स्वतंत्र झालो आहो परंतु केवळ राजकीय दृष्टीने. आपल्या करोडो लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारलेली नाही. परंतु आपल्याला त्याची जाणीव नाही. आपल्याला हे तेव्हा कळेल जेव्हा आपले अन्न आपण पिकवू आणि आपल्याला योग्य वाटेल त्या किंमतीची त्याकरिता आपण मागणी करू. याची आपल्याला तेव्हा जाणीव होईल जेव्हा आपण आपल्या गरज पूर्ण करण्याकरिता भरपूर कापड निर्माण करू. आपल्याजवळ भरपूर कापूस आहे. आपण ते गिरण्याकडूनही घेऊ शकतो. आपल्याला कळले पाहिजे की आपल्याला हवे असलेले सर्व कापड गिरण्या निर्माण करू शकत नाहीत. परंतु निदान आपल्याला इतके तरी कळले पाहिजे की आपल्याला कोणत्याही कठीण प्रसंगाला तोंड द्यावे लागणार नाही. मग आपण आर्थिक दृष्टीने स्वतंत्र होऊ. आपण इतके करू या आणि त्याचे परिणाम आपल्याला आपोआप दिसून पडतील.

आज आपण आपसातील भांडणांत गुतलेलो आहो. परंतु आपल्याला वेळ असेल तरच आपण भांडू शकू. परंतु जेव्हा आपण कामात गुंतलेलो असू, आणि आपण सर्व कामगार होतो, तेव्हा भांडण आणि झगड्यांकरिता आपल्याजवळ वेळच नसेल. अन्न आपल्याजवळ आहे, कपड्यांचीही आपण सोय केली आहे. आपण जुगार आणि मद्यपानाची सवयही सोडू या. अशा प्रकारे योग्य दिशेने एकेक पाऊल आपण पुढे टाकू तर आपल्यामध्ये कोणताही दोष राहणार नाही. मग आम्हाला स्वतःलाच भांडण करण्याची गरज वाटणार नाही.मग हिंदू आणि मुसलमान हा प्रश्नच निर्माण होणार नाही. कोणी जर गोंधळ निर्माण करत असेल तर त्याला आपण धैर्याने तोंड देऊ. आपल्याला वाटेल तर आपण त्याच्याशी लढू. परंतु अनैसर्गिक परिस्थितीत आपण आजच का मरावे?

यामुळेच मी म्हणेन की जी गोष्ट मी तुम्हाला शिकवली आहे आणि सांगण्याचा प्रयत्न केला आहे ती जर तुमच्या मनात चांगल्याप्रकारे ठसली असेल व त्यानुसार वागण्याचा तुम्ही प्रयत्न केला तर आपण फार उंचावर पोहोचू. मग आपल्याला मदतीकरिता कोणाच्या तोंडाकडे पाहत बसावे लागणार नाही. आपल्याला मदत कोणाची पाहिजे? आपल्याला मदत करणारा तर ईश्वर आहे. आणि ईश्वर कोणाला मदत करतो? जो माणूस स्वतः स्वतःला मदत करण्याला तयार असतो त्यालाच ईश्वर मदत करत असतो.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४०२-७

# १३८. प्रार्थना प्रवचन,ऑक्टोबर ११, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर ११, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज भाद्रपद महिन्याच्या दुसऱ्या पक्षाची द्वादशी आहे. गुजरातमध्ये म्हणजे काठेवाड आणि कछमध्ये हा दिवस चरखाबारस म्हणून ओळखला जातो. या प्रसंगी लोकांचे लक्ष चरखा आणि त्याच्याशी संबंधित गोष्टींकडे वेधले जाते. लोक जेव्हा एखादी गोष्ट सुरू करतात तेव्हा ती गोष्ट एकाकी सोडत नाहीत. परंतु आज चरखा बारस हा दिवस साजरा करण्याचा उत्साह लोकांमध्ये नाही असे मला वाटते. मी चरख्याला व्यापक अर्थ दिला होता व भारताने तो अहिंसेचे प्रतीक म्हणून मान्य केला होता. आज प्रतिकात्मक अर्थ आपण गमावला आहे. तो अर्थ जर कायम टिकला असता तर आज आपण जे पाहतो आहे ते आपण पाहिले नसते. असे असेल तर मी तो अर्थ मी तुम्हाला परत सांगू इच्छितो. माझा वाढदिवस २ ऑक्टोबरला साजरा केला जात असे इतके पुरेसे होते. परंतु गत अनेक वर्षांपासून माझा वाढदिवस हिंदू पंचांगाप्रमाणेसुद्धा साजरा केला जाऊ लागला आहे व या दोन दिवसांमधील दिवसांत चरखा फिरवण्याचे काम मोठ्या उत्साहात केले जाते. परंतु आज मला त्याकरिता वातावरण दिसत नाही. असे असले तरी ईश्वरकृपेने त्यांना चरखा अहिंसेचे प्रतीक वाटते. ही गोष्ट निश्चितपणे चांगली आहे. जर पाच लोक जरी अशा प्रकारे चरख्याकडे पाहून काम करतील तर ती गोष्ट समाधानकारक होईल आणि करोडो लोकांनी केली तर ती अजूनच समाधानकारक होईल. यामुळे मी तुमचे लक्ष चरख्याकडे वेधतो आहे.

कराचीत एक मंडल साहेब आहेत. ते पाकिस्तानच्या मंत्रिमंडळात आहेत. असे म्हणतात की ते बंगालमधील हरिजन आहेत आणि तरीही कायदेआझमनी त्यांना आपल्या मंत्रिमंडळात स्थान दिले आहे. त्यांच्या सूचनेनुसार कोणती तरी एक गोष्ट मान्य करण्यात आली आहे. इतरही दोनतीन लोक, त्यांची नावे मी विसरलो, त्यांच्या दृष्टिकोनाचे समर्थन करतात. सर्वच्या सर्व लोकांना बरोबर घेणे तर शक्य होत नसते. परंतु एक दोन लोक जरी त्यांना पाठिंबा देतात तरी त्याने काय फरक पडतो? सिंधमधील हरिजनांना कोणीही त्रास देऊ नये व त्याला काढून टाकू नये म्हणून प्रत्येक हरिजनाने आपल्या दंडावर एक पट्टी बांधली पाहिजे व तिच्यावर तो हरिजन असल्याचा, अस्पृश्य असल्याचा उल्लेख असला पाहिजे असे एक परिपत्रक निघाले आहे. हा केवळ माझा संशय असेल तर फार

चांगले परंतु अशी शंका आल्याशिवाय राहू शकत नाही की सध्याच्या सर्व हरिजननांना आज तर नोकरी मिळेल आणि असेही समजू या की हे हरिजन तिथेच राहिले तरी सर्वच्या सर्व तर राहणार नाहीत, काही आधीच निघून गेलेले आहेत आणि काही निघून जाणार आहेत असे मी ऐकतो. आणि जे तिथे राहतील त्यांना अखेरीस इस्लाम कबूल करावा लागेल. जर हा परिणाम होणार असेल तर तो भयानक परिणाम असेल. कोणत्याही माणसाला जर आपला धर्म सोडण्याची इच्छा असेल आणि दुसरा कोणता धर्म स्वीकारण्याची इच्छा असेल आणि आपण योग्य करतो आहो असे त्याला वाटत असेल तर त्याला तसे करण्याचा अधिकार आहे. आज मी स्वतःला सनातनी हिंदू समजतो. उद्या जर मला सनातन धर्म चांगला वाटला नाही तर मला तो सोडण्याचा अधिकार आहे. परंतु ही फार गंभीर गोष्ट आहे. माझा धर्म मी मान्य करत नसेन तर मला कोण अडवू शकतो? माझी आर्थिक परिस्थिती सुधारण्याकरिता वा इतर कोणता लाभ होण्याकरिता मला कोणी ख्रिश्चन धर्माचा मोह दाखवला नाही. मी ईश्वराजवळ माझा हिशेब चुकता करीन आणि सर्व जगाने जरी विरोध केला तरी मी माझ्या विवेकबुद्धीप्रमाणे वागेन. माझा विश्वास आहे की आज एकाही हरिजनाची अशी परिस्थिती नाही. मी असे अधिकारवाणीने सांगू शकतो कारण मी स्वतः हरिजन झालो आहे, अस्पृश्य झालो आहे व मी त्यांच्या धर्माचा स्वीकार केला आहे. पाकिस्तानमधील हरिजन आणि इतरांचा जोपर्यंत संबंध आहे ते सुरक्षित आहेत असे घोषित केले जावे अशी माझी अपेक्षा आहे. असे झाले तर कोणालाही आपल्या दंडावर पट्टी बांधावी लागणार नाही. आज कोणी मी माझ्या इच्छेने धर्म बदलला असे जरी म्हणत असेल तरी ते वैध आहे अले मान्य केले जाणार नाही अशी घोषणा सर्वांकरिता आज करण्यात यावी. धर्माचा संबंध हृदयाशी असतो. तो माणूस आणि ईश्वराशी संबंधित असतो. परंतु पाकिस्तानच्या सध्याच्या शासनांतर्गत कोणीही आपला धर्म स्वेच्छेने सोडला असे म्हणता येऊ शकत नाही. ज्याने कोणी असे केले असेल त्याने ते भीतीमुळे व बळजबरीमुळे केले असेल. यामुळे इथे धर्मांतर करता येणार नाही असे पाकिस्तान सरकारने घोषित केले पाहिजे.

याशिवाय अजून एक गोष्ट आहे. या महिन्यात दोन सण येणार आहेत. एक दसरा. फार मोठा सण आहे तो. भारतातील सर्व हिंदू तो साजरा करतात व त्याला फार महत्त्व देतात. परंतु बंगालमध्ये त्याला फारच महत्त्व आहे. मी बंगालमध्ये राहिलो होतो तेव्हापासून मला हे माहीत आहे. यांनंतर दोनच दिवसांनी बकरी-ईद येते. पूर्वी हिंदू आणि मुसलमानांमध्ये इतकी दुर्भावना नव्हती. अधूनमधून जरी त्यांच्या कटकटी व्हायच्या तरी आजप्रमाणे ते भांडत नव्हते. या दिवशी हिंदू-मुसलमानांमध्ये काही विपरीत घडू नये म्हणून ब्रिटिश सरकारलासुद्धा तयारी ठेवावी लागत असे. गोहत्या, वा हिंदूंना डिवचण्याकरिता गायीला सजवून तिची मिरवणूक काढणे अशी कोणतीही चिथावणी पुरेशी असायची. दसऱ्याच्या दिवशी प्रत्येक गोष्ट सुशोभित केलेली असते, संगीत सुरू असते आणि

स्त्रीपुरुष सजून काही बैलगाडीत जातील तर काही घोड्यावर बसून जातील. परंतु यामुळे मुसलमान डिवचले जाऊ शकतात व दंगलीकरिता निमित्त पुरवू शकतात. तसेच बकरी ईदच्या दिवशी हिंदू डिवचले जाऊ शकतात. ज्या हिंदू-मुसलमानांना मित्राप्रमाणे एकत्र राहण्याची इच्छा आहे त्यांनी हे सण साजरे करताना संयमाने वागले वागले पाहजे. ते त्यांचे कर्तव्य आहे. त्यांनी असे काहीही करू नये की ज्यामुळे दुसरा डिवचला जाईल. आणि असे नसतानासुद्धा सध्या आपल्या अंतःकरणात क्रोध भरलेला आहे व आपल्या प्रतिक्रिया अतिरंजित होतात. अशा परिस्थितीत आपण कोणतीही डिवचणारी गोष्ट करू नये.

जात असताना ब्रिटिश सरकारने एक गोष्ट चुकीची केली आहे. त्यांनी देशाची वाटणी केली आणि आता दोन सरकार आहेत. आज ते शत्रूप्रमाणे आहेत. शक्य आहे की त्यांच्यात कधीही युद्ध होणार नाही. परंतु घटनाक्रम असा काही घडतो आहे की भविष्याबद्दल कोणीही काहीही सांगू शकत नाही. परंतु दोन्ही पक्ष समंजसपणा धारण करतील अशी आपण आशा करू या. परंतु जर असे घडले नाही तर आपण आपले स्वातंत्र्य गमावू. आपल्या देशाला गुलामगिरीत जाऊ देणे म्हणजे आपल्या स्वतःच्या धर्माशी प्रतारणा. आपण आपले स्वातंत्र्य गमावले तर ती फार मोठी चूक होईल. ईश्वराने आपल्या सगळ्यांना सद्बुद्धी द्यावी व आपण सर्वांनी शुद्ध व्हावे असी ईश्वराकडे माझी प्रार्थना आहे. हीच चांगली गोष्ट असेल. अजून एक गोष्ट मला सांगायची आहे ती ही की दक्षिण आफ्रिकेतील आपल्या देशबांधवांनी आपल्या योजनेप्रमाणे काम करत करत असताना काळजीपूर्वक वागावे. (१३ ऑक्टोबरपासून परत सत्याग्रह सुरू करावा असा प्रस्ताव असल्याचे वृत्त ऑक्टोबर, १९, १९४७च्या हरिजनमध्ये होते.) तिथे जे लोक आहेत त्यांना या दोन सरकारांनी पाठिंबा द्यावा व त्यांच्या संघर्षात त्यांना प्रोत्साहन द्यावे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४०७-१०

# १३९. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर १२ १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आजसुद्धा बरीच कांबळी आली. दुलयाही आल्या. दुलयांबद्दल मी सांगू इच्छितो की त्या गिरण्यांमध्येसुद्धा तयार होत आहेत. त्या दुलयासुद्धा येत आहेत. ज्या गतीने दुलया आणि कांबळी येत आहेत त्यावरून माझ्या मनात विश्वास निर्माण झाला आहे की दिल्लीत आणि आजूबाजूला जे निर्वासित वेगात गोळा होत आहेत त्यांना त्रास होणार नाही. दुलया, कांबळी आणि गरम कपडे इत्यादी येत आहेत ते सर्व केवळ गरजवंतांनाच मिळावे असाही प्रयत्नही करण्यात येत आहे. एका गोष्टीची मात्र आठवण ठेवली पाहिजे की ही जी पांघरुणे येत आहेत ती अखेरीस फाटतील, परंतु सध्या तरी ते पाऊस आणि दव यांच्यापासून आपले रक्षण करू शकतील. ईश्वराची इच्छा असेल तर हिवाळ्यात पाऊस येणार नाही, परंतु दव अपरिहार्य आहे. प्रत्येकाला कांबळे मिळू शकत नाही. सर्व सामावू शकतील इतके तंबू मिळू शकतील की नाही याबद्दलही मला शंका आहे. काही लोकांशी बोलताना मी एका गोष्टीचा उल्लेख केला होता आणि त्याच गोष्टीचा मी इथेही उल्लेख करू इच्छितो. ज्यांना दुलया मिळतील त्यांनी जर आपल्या दुलईवर वर्तमानपत्र टाकले तर दुलईतून दव खाली झिरपणार नाही. दुलयांबद्दलची दुसरी गोष्ट ही आहे त्या तयार करण्याकरिता वापरलेल्या कापसाच्या प्रमाणामुळे पुरेशी ऊब मिळते. परंतु कापसाचे जेव्हा वेगवेगळे गोळे तयार होतात तेव्हा दुलई परत उघडता येते, तिची खोळ धुवायची व धुनाई करून तिच्यातील कापूस परत वापरता येतो. असे केल्याने ती दुलई परत नवीन होते. जे लोक ती काळजीपूर्वक वापरतील त्यांच्याकरिता ही फार उपयोगी गोष्ट आहे.

आपल्यावर फार मोठे संकट आले आहे. परंतु जे लोक ईश्वराचा विचार करतात आणि ईश्वराच्या नावावर काम करतात त्यांना अशा संकटातसुद्धा काही तरी शिकायला मिळते. दोन गोष्टींची शक्यता आहे. संकट आले की एक तर माणूस घाबरतो वा संतापतो व स्वतःची परिस्थिती अधिकच दयनीय करून घेतो. परंतु आपत्तीत असतानाही तो जर विचार करील की माझा कोणताही दोष नसताना मला या आपत्तीला तोंड द्यावे लागत आहे आणि तरीही जो ईश्वराला सोडत नाही व सतत तो त्याच्या मदतीकरिता काकुळती करत असतो तो माणूस त्या आपत्तीतही स्वतःकरिता आनंद

निर्माण करू शकतो. इथे आलेले अनेक निर्वासित सुखवस्तू लोक होते. त्यांच्याजवळ भरपूर पैसा आणि मालमत्ता होती. त्यांच्याजवळ मोठे इमले होते. आता त्यांनी सर्व गमावले आहे. मी आधीच सांगितले आहे की जोपर्यंत लोक परत आपापल्या घरी परत जात नाहीत आणि सुरक्षितपणे राहू शकत नाहीत तोपर्यंत ते दोन्ही सरकारांवर फार मोठे ओझे असतील. आपल्याला जर जिवंत राहायचे असेल, आपल्याला जर स्वतंत्र राहायचे असेल तर आपल्याला लोकसंख्येच्या या अदलाबदलीच्या पापाचे प्रायश्चित्त घ्यावे लागेल. प्रायश्चित्त म्हणजे आपल्या चुकांची दुरुस्ती. मगच ते खरे प्रायश्चित्त होईल. दुसऱ्या कोणत्याही मार्गाने ते होऊ शकत नाही. जेव्हा कोणी खरोखरच आपली चूक दुरुस्त करतो तेव्हा त्याने पुरेसे प्रायश्चित्त घेतलेले असते. आपली चूक दुरुस्त करण्याचा जर आपला हेतू असेल तर जे लोक आपला जीव वाचवण्याकरिता इथे आले आहेत त्यांना परत आपल्या ठिकाणी जाण्यासारखी परिस्थिती असली पाहिजे. वेळ येईल तेव्हा हे होईलही, परंतु मधल्या काळात आपण काय करायचे? मी असे सुचवू इच्छितो की जर चांगले डॉक्टर उपलब्ध असतील - निर्वासितांमध्ये डॉक्टर, वकील आणि इतर अनेक आहेत - तर त्यांनी मध्यंतरीच्या काळात आपली वैद्यकीय सेवा द्यावी आणि असे करून या दुःखद परिस्थितीतही आपण नवीन धडा शिकू शकतो.

मी जेव्हा निर्वासितांना भेटण्याकरिता गेलो तेव्हा त्यांच्यातील पंचाहत्तर टक्के लोक व्यवसायी असल्याचे मला सांगण्यात आले. तो माझ्याकरिता धक्का होता आणि इतके सगळे लोक इथे व्यवसाय कसा करू शकतील असा प्रश्न मला पडला. इथे लाखो लोक आले आहेत आणि एकाच वेळी ते सर्व व्यवसाय करू लागले तर सर्वत्र गोंधळ होईल. ते जर काही प्रयत्न करील, काही नवीन शिकतील तर काही तरी चांगले होईल. जे व्यापारी व्यवसायात गुंतलेले होते त्यांनी आपला भूतकाळ विसरावा. जेव्हा आपल्याला एखादी विशेष गोष्ट मिळू शकत नाही तेव्हा आपण दुसऱ्या गोष्टीचा शोध घ्यावा हा जगाचा नियमच आहे. आपण आळसात बसू नये. तसेच जुगार आणि दारूत वेळ वाया घालवू नये. आपण काही तरी काम केलेच पाहिजे. आपण कठोर परिश्रम करू या. जे व्यापारी आहेत परंतु ज्यांचे शरीर मजबूत आहे व जे आपल्या हातापायाचा उपयोग करू शकतात त्यांनी काही तरी काम करावे. फार थोडे काम असे आहे की ज्याकरिता प्रशिक्षणाची मुळीच आवश्यकता नाही. त्यांनी अशा प्रकारच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे व परस्परांशी सहकार्य करावे. याचबरोबर त्यांनी एकत्रित काम करण्याची वृत्ती विकसित करावी. असे झाले तरच आपल्याकरिता जी नरकासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे तिच्यातून स्वर्ग निर्माण होईल.

या सर्वा गोष्टींबद्दल आज तुम्हाला सांगायचे असे मी ठरवले होते आणि तुमच्या माध्यमातून ही गोष्ट प्रत्येकाला सविस्तर कळावी म्हणून मी दिवसभर विचार करत होतो. यामुळे निर्वासितांचा

आणि देशाचाही फार मोठा लाभ होईल. आणि आज आपण आपल्यावर जी आपत्ती आली आहे ती दूर करून आपण आनंद निर्माण करू.

विविध ठिकाणाहून ज्या दुलया अजून आलेल्या नाहीत परंतु यायच्या आहेत त्यांचे काय करायचे या संबंधात मला तुम्हाला काही सांगायचे आहे. आपण त्यांचे काय करायचे? दुलयांचे कापड घाणरडे झालेले असेल तर ते वेगळे करून धुवावे. दुलईमधील कापूस राखून ठेवता येऊ शकतो. कापूस मुळीच खराब होत नसतो. तो वाळवून हाताने स्वच्छ करता येतो. त्याकरिता धनुकलीचीसुद्धा गरज नसते. तो कापूस कताईकरिता उपयोगात आणण्याची आपली इच्छा असेल तर मात्र गोष्ट वेगळी. नवीन सतरंज्या, तडव, दुलया इत्यादी तयार करण्याकरिता त्या कापसाचा सहज उपयोग करता येतो. मला वाटते की या गोष्टी जर आपण स्वतः तयार केल्या तर त्या स्वस्त आणि लवकर तयार होतील. गिरण्यांजवळ भरपूर कापड पडलेले आहे. या वेळी खाण्यापिण्याच्या गोष्टीची चर्चा करण्याची माझी इच्छा नाही. आपल्याजवळ भरपूर कापूस आहे आणि फार कमी वेळात आपण त्यांच्यापासून रजया बनवू शकतो. या दुलया जर आपण दिल्या तर त्यांच्यामुळे लोकांचे हिवाळ्यात संरक्षण होऊ शकेल. यामुळे या गोष्टी कशा तयार कराव्या हे आपण या लोकांना शिकवले पाहिजे आणि त्यांच्या सभोवती निराशेचे जे वातावरण पसरले आहे ते दूर करून त्यात आनंद आणला पाहिजे. एका भजनात असे सांगितले आहे की घोर अंधारातून आशेचा किरण दिसत असतो. हे खरे आहे. ही काव्यात्मक अभिव्यक्ती आहे. कोलवर रुजलेल्या निराशेतूनही आपल्याला आशेचा किरण दिसावा अशी आपली इच्छा असते. तो किरण दिसण्याकरिता आपण काय केले पाहिजे? जे लोक रस्त्यावर फेकले गेले आहेत त्यांनी सर्वप्रथम हे लक्षात ठेवले पाहिजे की ते भारताचे आहेत, पंजाब, वायव्य सरहद्द प्रांत वा सिंधचे नाहीत. हे सर्व प्रांत भारतात आहेत. यामुळे या भागात राहणारे लोकसुद्धा भारताचे आहेत. इतरावर भार न होण्याच्या अटीवरच ते भारतीय राहू शकतात आणि भारताचे होऊ शकतात. ज्याप्रमाणे दुधात साखर घोळली की ते गोड होते आणि नंतर दूध आणि साखर वेगळी करता येत नाही व दूध जसेच्या तसेच राहते त्याचप्रमाणे ते जिथे कुठे जातील तिथे त्यांनी तेथील लोकांमध्ये दुधात साखर मिसळते त्याप्रमाणे भांडणतंटा न करता व एकमेकांबद्दल द्वेषभावना न ठेवता मिसळायला पाहिजे. त्यांनी परस्परांना मदत केली पाहिजे, सहकार्य केले पाहिजे आणि कठोर परिश्रम केले पाहिजे. असे केले तर ज्या प्रांतात ते जातील त्या प्रांतात ते सुधारणा घडवून आणतील आणि असे कितीही निर्वासित आले तरी त्यांना सामावून घेण्याची आमची तयारी आहे असे तेथील लोक म्हणतील.

निर्वासितांमधील जे लोक काम करू शकतात आणि ज्यांच्यापर्यंत माझा आवाज पोहोचू शकतो ते इतरांनाही चांगले होण्याकरिता प्रेरित करतील अशी मला आहे. त्यांनी कुठेही ओझ्याप्रमाणे होऊ नये तर मी सांगितल्याप्रमाणे एकोप्याने एकमेकांशी जुळवून घेऊन राहावे. त्यांनी कोणाचीही फसवणूक करू नये. आपण आपला वेळ वाया घालवू नये. आपल्या वेळेचा क्षण न क्षण आपण ईश्वराला, कामाला आणि सेवेला वाहू या. आपला जन्म सेवेकरिता झाला आहे. आपण जर असे राहिलो तर एके काही काळी आपण दुःख आणि शोकसागरात बुडालेलो होतो हे आपण विसरून जाऊ. आपल्याजवळ आजूबाजूला करोडो लोक आहेत. त्यांनी स्वतःला सेवेत बुडवून घ्यावे. आपल्या देशाचे नाव आपण उंच करू, खाली पाहायला लावणार नाही असा आपण निर्धार करू या. असे जेव्हा होईल तो भाग्याचा क्षण असेल व मग आपल्याकरिता काळजी करण्यासारखे काहीही राहणार नाही असे मला वाटते. चूक करणे मानवी स्वभाव आहे परंतु चूक दुरुस्त करणे हासुद्धा माणसाचा गुण आहे. आपण जेव्हा आपली चूक दुरुस्त करतो तेव्हा आपण खरे माणूस होतो.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, ४११-४

# १४०. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर १३, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १३, १९४७

काल मी निर्वासित शिबिरांबद्दल काही उद्गार काढले होते ते इंग्रजीत संक्षेप करताना सुटले होते. मी त्यांना फार महत्त्व देत असल्यामुळे मी त्याबद्दल थोडे विस्ताराने सांगेन. आपल्याकडे जरी आपल्या धार्मिक वा इतर यात्रा भरत असल्या आणि कॉंग्रेसचे अधिवेशन व परिषदा होत असल्या तरीही एक राष्ट्र म्हणून आपल्याला छावणीतील जीवन जगण्याची सवय नाही. कॉंग्रेसची अधिवेशने, परिषदा आणि इतर मेळाव्यांमध्ये मी हजर राहिलो आहे. १९१५ सालच्या हरिद्वार येथील कुंभमेळ्यातही मी गेलो होतो. दक्षिण आफ्रिकेतून परतलेल्या माझ्या सहकाऱ्यांसह मला तिथे भारत सेवक समाजाच्या छावण्यांमध्ये सेवा करण्याचे सौभाग्य प्राप्त झाले होते. तिथे माझी आणि माझ्या सहकाऱ्यांची अतिशय प्रेमाने काळजी घेण्यात आली याशिवाय त्याबद्दल अधिक काहीही माझ्याजवळ सांगण्यासारखे नाही. आमच्या लोकांच्या शिबिरात राहण्याची पद्धती पाहून कोणताही आनंद होऊ शकत नाही. आपल्यामध्ये सामाजिक आरोग्याची भावना नाही. परिणामी छावण्यांमध्ये घाण आणि कचरा गोळा होतो. त्यामुळे संसर्गजन्य व साथीचे रोग पसरण्याची भीती असते. आपले संडास वर्णन करण्याच्या लायकीचे नसतात. लोकांना वाटते की आपण कुठेही लघ्वी-परसाकड करू शकतो. इथपर्यंत की ते पवित्र नद्यांच्या काठांचीही पर्वा करत नाहीत. शेजाऱ्यापाजाऱ्यांची किंचितही फिकीर न करता कुठेही थुकण्याचा आपला हक्क जवळपास मान्य करण्यात आला आहे. आपली स्वयंपाकाची व्यवस्थासुद्धा याहून फारशी चांगली नाही. कुठेही गेलो तरी माशा आपले स्वागत करण्याकरिता सज्ज असतात. क्षणापूर्वी त्या कोणत्याही प्रकारच्या घाणीवर बसलेल्या असू शकतात व यामुळे त्या सांसर्गिक रोगजंतूंच्या चांगल्या वाहक असतात ही गोष्ट आपण विसरतो. राहण्याच्या व्यवस्थेची नीट योजना आखण्यात आलेली नसते. हे अतिशयोक्त चित्र नाही. आणि या छावण्यांमध्ये जो गोंगाट सहन करावा लागतो तोही दुर्लक्षिण्यासारखा नसतो.

व्यवस्था, योजना आणि संपूर्ण स्वच्छता याबाबतीत मी सैनिकी छावण्यांना आदर्श मानतो. मला सैन्याची आवश्यकता कधीही वाटली नाही. परंतु माझ्या म्हणण्याचा अर्थ असा नाही की त्यातून काहीही चांगले बाहेर पडत नाही. त्यातून आपल्याला अनुशासन, सामूहिक जीवन, साफसफाई आणि प्रत्येक उपयोगी कामाला स्थान असेल अशा प्रकारे वेळेचे नियोजन करण्यात आलेले असते. अशा छावण्यांमध्ये मुळीच आवाज नसतो. ताडपत्र्यांखाली ते शहर वसवलेले असते

व काही तासात ते उभारण्यात आलेले असते. आपल्या निर्वासित छावण्या त्या आदर्शापर्यंत पोहोचाव्या असे मला वाटते. मग पाऊस येवो अथवा न येवो तिथे गैरसोय होणार नाही.

जर या छावण्यांमध्ये तंबू लावण्यापासून सर्व काम सर्व लोकांनी स्वतः केली, त्यांनी जर स्वतः संडास साफ केले, झाडझूड केली, रस्ते तयार केले, नाल्या खोदल्या, स्वयंपाक केला, कपडे धुतले तर छावण्यांचा खर्च अगदी कमी होऊन जाईल. तिथे राहणारांनी कोणतेही काम कमी प्रतीचे समजू नये. छावणीशी संबंधित कोणतेही काम सारख्याच प्रतिष्ठेचे असते. हे काम कंटाळवाणेपणाने नाही तर जबाबदारीचे भान ठेवून सुज्ञ मार्गदर्शनाखाली व देखरेखीखाली त्वरित कृती करून केले जाते.

कांबळी आणि दुलया येणे सुरू आहे. येत्या हिवाळ्यात थंडीपासून संरक्षण करण्याकरिता आमच्याजवळ पुरेसे साहित्य आहे असे थोड्याच दिवसात म्हणता येईल अशी माला आशा आहे.

हरिजन, ऑक्टोबर २६, १९४७

# १४१. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर १४, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर, १४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आजसुद्धा अनेक कांबळी आली. इथे आर्य कन्या विद्यालय नावाची एक संस्था आहे. त्या संस्थेतून दोन शिक्षक आणि काही विद्यार्थी आले होते. कांबळे विकत घेण्याकरिता त्यांनी पैसा गोळा केला होता. त्यांनी बिचाऱ्यांनी किती पैसा गोळा केला असेल? थोडी कांबळी आणली होती. परंतु त्यांनी मला एक मोठी गोष्ट मला सुचवली. मली ती चांगली वाटली. आणि जेव्हा त्या उपवासाचे व्रत घेण्यासंबंधी बोलू लागल्या तेव्हा मला आनंद झाला. मी त्यांना सांगितले की प्रत्येक चांद्रमासात दोन पक्ष असतात. शुक्ल पक्ष आणि वद्य पक्ष. जर तुम्ही प्रत्येक पंधरवाड्यात एक दिवस ठरवला व त्या दिवशी उपवास केला तर बाहेरून आपल्याला जे अन्न मागवावे लागते तितके सर्व अन्न आपण वाचवू. बाहेरून अन्न आणण्याकरिता पैसा खर्च करणे ही मला फार मोठी चूक वाटते. अशा प्रकारचे उपवास करून आपण अशी चूक करण्यापासून वाचतो. माझी सूचना ऐकल्यानंतर विद्यालयाच्या शिक्षकांनी मुलींशी विचारविनिमय केला. त्यांनी कोणावरही बळजबरी केली नाही. त्यांनी दर गुरुवारी उपवास करायचा ठरवले व त्यापासून जो काही पैसा वाचेल तो दान देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. जे काही त्या वाचवू शकणार होत्या त्याचे पैसे देण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. आमच्याजवळ जी थोडीशी जमीन आहे तिच्यावर आम्ही काही धान्य पिकवण्याचा प्रयत्न करू असेही त्या म्हणाल्या. त्यांनी स्वतःवर दोन जबाबदाऱ्या घेतल्या - कमी खायचे आणि अधिक पिकवायचे. त्यांनी आणलेल्या कांबळ्यांपेक्षाही ही गोष्ट मला जास्त आवडली. त्यांच्यानंतर इराणचे राजदूत आणि त्यांची पत्नी हे दोघे आले. ते थोडा वेळ बसले परंतु त्यांनी कांबळ्यांचा मोठा गठ्ठा ठेवला. शक्य असल्यास मी ती कांबळी वाटावी अशी त्यांची इच्छा होती. मी त्यांना सांगितले की मी भिकारी आहे आणि जे काही मिळते ते मी स्वीकारतो आणि ते गरजूंना देतो.

अनेक शीख सद्गृहस्थ माझ्याकडे आले. ते दोन वा तीन गटात आले. मी त्यांच्याशी अनेक गोष्टींबद्दल चर्चा केली. त्यांच्याशी कशाबद्दल चर्चा झाली हे तुम्हाला सांगत बसण्यात काहीही अर्थ नाही. त्यात लपवण्यासारखे काहीही नाही. चर्चेचा जो सार मी काढला तो असा होता की अशा प्रकारे परस्परातील भांडणांनी आपण काहीही साध्य करू शकणार नाही हे त्यांनी आणि इतर सर्वांनी

समजून घ्यावे. न्याय देणे, शिक्षा देणे, बदला घेणे इत्यादी कामे करायची असतील तर सरकारने करावी.आपल्याला जे काही करायचे असेल ते सरकारच्या माध्यमातून करावे. मला वाटते त्या सर्वांना माझा हा युक्तिवाद पटला. बाकीची चर्चा मी सोडून देईन.

त्यानंतर मी दुसरी गोष्ट ऐकली. काही लोकांना अटक झाली होती. आपले स्वतःचे सरकार आहे आणि त्याला जर काही लोकांना अटक करायची असेल तर ते तसे करण्याकरिता स्वतंत्र आहे. अनेकदा निरपराध लोकांना अटक होते. आपल्या सरकारने जाणूनबुजून निरपराध लोकांना अटक करण्याची चूक करू नये. तसेच वाटेल त्याला अटक करण्याची चूकही सरकारने करायला नको. परंतु आपण जे काही करत असलो तरी अखेरीस माणूस हा माणूस असतो. त्याच्याकडून चकू होतच असते. तो देवदूत नाही. आणि तो ईश्वर तर नाहीच नाही. यामुळे त्याच्याकडून चूक होणे अपरिहार्य आहे. जर चुकून काही निरपराध लोकांना अटक झाली तर तेवढ्याकरिता आंदोलन छेडण्याची काय आवश्यकता? परंतु मी असे ऐकले आहे की काही निरपराध लोकांना अटक केली जाण्याच्या विरोधात आंदोलन सुरू आहे. हे लोक अपराधी आहेत की नाही हे ठरवणे सरकारचे काम आहे. अटक करण्यात आलेल्या एखाद्या व्यक्तीच्या निरपराधित्वाबद्दलचे काही पुरावे सरकारसमोर ठेवले तर ती गोष्ट मी समजू शकतो. परंतु सरकारला अशा प्रकारे त्रास देणे, आंदोलन करून एखाद्या व्यक्तीची सुटका करून घेणे हे काही योग्य वर्तन असू शकत नाही. आपण जेव्हा ब्रिटिश साम्राज्यशाहीशी झगडलो व तुरुंगात गेलो तेव्हा काही कैदी निरपराध आहेत व त्यांना सोडा अशी मागणी आम्ही करत होतो. ते अगदी खरे होते. परंतु सरकारच्या नजरेत ते अपराधी होते, आमच्या नाही. आपच्या पुढाऱ्यांना अटक केली म्हणून त्या दिवसात आम्ही ब्रिटिशांविरुद्ध आंदोलन करत होतो. परंतु आता आपण कोणाच्या विरोधात आंदोलन करायचे? आपले सरकार अखेरीस पंचायत राज आहे. पुढारी पंचायतीचे प्रतिनिधित्व करतात. आपणच त्यांना पुढारी केले आहे. यामुळेच मी सांगतो की आंदोलनकरून सरकारच्या कामात अडथळा आणण्याची ही वेळ नाही. पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे आपले सरकार आहे. या सरकारच्या मागे सैनिकी शक्ती नाही जी ब्रिटिश भारतात असताना वापरत होते. ब्रिटिशांच्या आदेशानुसार वागणारे संपूर्ण नौदल होते. या नौदलाबद्दल सांगण्यात येत असे की ते अजेय आहे, अतुलनीय आहे. आज त्या नौदलाबद्दल असा दावा करता येऊ शकत नाही ही गोष्ट वेगळी. ते काहीही असले तरी त्यांच्याजवळ सर्व काही होते. त्याच्या बळावर ते आपल्यावर राज्य करत होते. आता आपणच आपले शासक आहो. आपल्यावर इतर कोणीही राज्य करत नाही आणि जे आपल्यावर राज्य करत आहेत त्यांना आपणच निवडून दिलेले आहे व त्यांना आपण काढून टाकू शकतो. यामुळे माझे म्हणणे आहे की आपण हे आंदोलनाचे धोरण अवलंबू नये.

एक चौथी गोष्ट तुम्हाला मला सांगण्याची इच्छा आहे. भारतात कशी संपूर्ण शांतता प्रस्थापित करता येऊ शकते हे तर मी तुम्हाला किती तरीदा मी सांगितले आहे. हा कठीण प्रश्न आहे. आज दिल्लीत काहीही गडबड सुरू नाही हे पाहूनही मी खुष होत नाही. कुठे एखाद्या माणसाला मारून टाकले असे चालतही असेल परंतु आधी ज्याप्रमाणे सतत सुरू असायचे तसे आता नाही. ही चांगली गोष्ट आहे. यामुळे सरकार खुष होऊ शकते परंतु मी होऊ शकत नाही. कारण मी सरकार चालवण्याकरिता आलेलो नाही. योगायोगाने इथे राहिलो आहे. दोघांच्या मनांत जी फूट पडली आहे ती सांधायची आहे व या कामात मदत होऊ शकेल या आशेने मी तर राहिलो होतो. हे समुदाय मागेही भाडत होते. परंतु एकदा भांडण मिटले की ते एकत्र यायचे. परंतु जणू काय शेकडो वर्षांचे शत्रू असल्याप्रमाणे आज आपल्या अंतःकरणात विष भरलेले आहे. हे अकल्पनीय आहे. आपण भेकड होऊ नये, मुसलमानांनी होऊ नये, शिखांनी होऊ नये आणि हिंदूनीही होऊ नये. मग आपण कोणालाही घाबरणार नाही. मुसलमानांनी शिखांना घाबरणे थांबवावे व घाबरून पळू नये. आपल्याला जर महान सैनिकी सत्ता व्हायचे असेल तर हिंदू आणि शिखांनी मुसलमानांची भीती टाकून द्यावी. यापुढे हिंदू, शीख आणि मुसलमान यांनी परस्परांना घाबरू नये. आणि आमची इच्छा असेल तर भारताला आपण अजिंक्य अशी अहिंसक सैन्यशक्ती बनवू शकतो. आपल्यासमोर दोन विकल्प आहेत आणि तिसरा कोणताही पर्याय नाही. जो मार्ग आपण अनुसरत आहो तो मुळात मार्गच नाही. तो रानटीपणाचा मार्ग आहे. या मार्गात पुढे जाण्यासारखे काहीही नाही. एकमेकांच्या आपण कसे जवळ येऊ शकू हे तुम्हाला दाखवण्याची माझी इच्छा आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट ही आहे की आज ज्याप्रमाणे हिंदू, मुसलमान आणि शीख एकमेकांना दोष देत आहेत तसा दोष देणे त्यांनी बंद करावे. त्यांनी आपापले दोष पाहावे आणि दुर्बिणीतून लहानशी गोष्ट जशी पर्वतासारखी दिसते तसे त्या दोषांना पाहावे. आम्ही जरी आधी चुका केलेल्या असल्या तरी हिंदू आणि शीख ज्या चुका करत आहेत त्यासमोर आमच्या चुका काहीच नाहीत असे मुसलमानांनी म्हणू नये. त्याचप्रमाणे आम्ही जरी चुका केल्या असल्या तरी मुसलमानांनी केलेल्या चुकांच्या तुलनेत आमच्या चुका काहीच नाहीत असे हिंदूंनीही म्हणू नये. चुकीला चुकीने उत्तर देण्यात इतका कोणता मोठेपणा आहे? जगात नेहमी असेच घडत राहिले आहे असे म्हणून आपण हिंदू आणि शीख जर आपले समाधान करून घेणार असू तर मी म्हणेन की हा योग्य मार्ग नाही. या मार्गाने शुद्ध विवेकबुद्धी कायम ठेवून कधीही सोबत बसू शकणार नाही. आज गोष्टी या थरावर गेल्या आहेत की पाकिस्तान सरकार इतक्या मोठ्या संख्येत मुसलमानांना आत घेण्याकरिता तयार नाही. आणि मग यातही कुठे दगाफटका तर नाही ना अशी आपल्याला शंका येते. यात कोणता दगाफटका असू शकतो? परंतु त्यात दगाफटका असेल वा आपल्याला कल्पना नसलेला त्यांचा काही वाईट उद्देश असेल तरी त्यामुळे आपल्याला

काय फरक पडतो? केवळ शंकेच्या आधारावर कीहीही न करण्याइतके जर आपण शूरवीर नसू तर आपला विनाश होईल. परंतु ही गोष्ट आपण सोडून देऊ या. मुसलमान, हिंदू आणि शीख या सर्वांना मला इतकेच सांगायचे आहे की तुम्ही इतरांच्या दोषांच्या सूचकतेनेसुद्धा उल्लेख करू नका. त्यांनी केवळ स्वतःचे दोष कबूल करावे. आपण चूक केली आहे हे जर आपल्याला माहीत असेल तर आपण आपली चूक कबूल केली पाहिजे. काल मी म्हणालो होतो की एखादा हिंदू असेल तर तो आमचा शत्रूच असला पाहिजे असे मुसलमानांनी मानणे हा विषारी विचार आहे. आपण जर असे शत्रू होऊ तर परिणाम केवळ दुर्दैवीच होईल. पाकिस्तान तर अस्तित्वात आला, आता त्याचे काय? आपण वेडेपणाला वाट करून देऊ नये. कालपर्यंत आपण शत्रू होतो. आता यापुढे आपण मित्र होऊ या. जेव्हा आपण मित्र होऊ तेव्हा आपण म्हणू या की एके काळी आम्ही शत्रू होतो परंतु आता आम्ही मित्र झालो आहो आणि आमचे शत्रुत्व विसरलो आहो. सरकारनेसुद्धा हिंदू, शीख आणि देशात राहणाऱ्या इतर सर्वांना सांगितले पाहिजे की आमच्याकडून इतकी चूक तर झालीआहे आणि तुमच्या चुकीचा तुम्ही विचार करा. परंतु आपण एखादी चूक करावीच का? नाही करणार आम्ही चूक. अशी जर आपण दोघांनी स्पर्धा केली - एक स्पर्धा तर ती आहे की कोणी येऊन आपल्याला एक बुक्की मारली तर आपण त्याला दोन बुक्क्या मारायच्या - परंतु त्याऐवजी आपण अशी स्पर्धा केली पाहिजे की त्याने काहीही केले तरी आम्ही चांगलेच राहू आणि निरपराध राहू. स्पर्धा करू चांगुलपणात, चांगले होण्यात. तेव्हा मी म्हणेन की आमच्याकरिता सर्व ठीकठाक आहे. मग मी आरामात दिल्ली सोडू शकतो. माझ्या नशिबात दिल्लीत इथेच पडून राहणे असेल आणि इथेच मरणे असेल तर मरेनही. ते कसे करावे हे मला माहीत आहे. दुसरे काही मी शिकलोच नाही. नाही तरी एक ना एक दिवस आपल्याला मरायचेच आहे. आपण जर इतर काही करू शकत नसू तर निदान मरू तरी. परंतु आपण कोणाला मारणार नाही. मी तर सर्वांना हेच सांगत असतो की अरे इतके तर शिका. आपण करू अथवा मरू. तिसरा पर्याय नाही. आता पळ काढण्यात अर्थ नाही. आपण नशीब बदलवू शकत नाही. आमच्या मनात कोणाबद्दलही वैरभावना नाही. मनात वैरभाव बाळगणे हा काही भारतात शांतता निर्माण करण्याचा मार्ग नाही. आपण जेव्हा कोणाशीही भांडणार नाही व सर्व प्रकारची भीती टाकून देऊ तेव्हाच भारत शांततेकडे पाऊल टाकू शकेल. मुसलमान इथे राहणार असतील तर राहू द्या. ते काय आपल्याला मारून टाकतील? का मारतील? त्या सर्वांनी येथून निघून जायला पाहिजे काय? त्यांनी का जायला पाहिजे आणि कुठे जायला पाहिजे? पाकिस्तानचे लोक म्हणतात की इतक्या सगळ्या मुसलमानांना सामावून घेणे आम्हाला शक्य नाही. भारतात सर्वत्र मुसलमान पसरलेले आहेत. पाकिस्तान लहानसा देश आहे. त्यात हे सर्व मुसलमान कसे मावतील? पाकिस्तान जर म्हणत असेल की याहून जास्त मुसलमानांना आम्ही सामावून घेऊ शकत नाही तर

आपण ऐकले पाहिजे. त्यात कोणता दुटप्पीपमा असू शकतो? आणि ते काहीही असले तरी त्याचा आपल्यावर कसा प्रभाव पडतो? परंतु आपण इतके तर समजून घेऊ या की आपल्याजवळ आपली भावंडेही राहत आहेत. मुसलमान जर बदमाश असतील तर त्यांना समज द्या, कायद्याप्रमाणे शिक्षा करा. कोणी जर देशद्रोह करत आहे, भारताशी प्रामाणिक नाही असे आढळत असेल तर त्याला गोळी घाला वा तुम्हाला हवे ते करा. पाच, पन्नास वा पाच करोड लोकांना गोळ्या घाला. मला त्याची पिकीर नाही. निदान मी ते समजू शकतो. परंतु जेव्हा एक माणूस येतो आणि काहीही कारण नसताना दुसऱ्याला मारतो तर आपण ते कसे सहन करू शकतो? आपण ते सहन करू नये. आणि आपण स्वतःही असे वेड लागल्यासारखे का वागावे? आपण इतके भित्रे का झालो पाहिजे? यामुळे मी म्हणतो की दोन्ही सरकारांना जर शांतपणे आपले काम करायचे असेल तर आपण परस्परांशी चांगुलपणात स्पर्धा केली पाहिजे. त्यांच्या चुका मोठ्या आहेत असे केवळ म्हणाल्याने आपला विजय होणार नाही. परंतु आपण जर चुका केल्या असतील तर त्यावरील उपाययोजनाही आपण केली पाहिजे. जेव्हा आपण सर्व काही धुवून काढू. तेव्हा सर्व ठीक होईल. मी अजूनही बरेच बोलू शकतो परंतु आज मी जे म्हणालो तितके तुम्ही पचवले तरी पुरे आहे.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४१६-२१

# १४२. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर १५, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

दररोज मला भेटायला अनेक लोक येत असतात. त्यातील काही निर्वासितांकरिता कांबळी आणि पैसे माझ्याजवळ सोडून जातात. एका बाईने मला आज दोन हजार रुपयांचा चेक दिला. मुसलमानांच्या वतीनेही दोन लोक मला भेटण्याकरिता आले. त्यांनी कांबळी आणि काही पैसे गोळा केले होते. ते त्यांनी मला दिले. ते कारागीर होते. त्यांनी आपली नावेसुद्धा दिली नाही. मी त्यांना म्हणालो की तुम्ही तुमच्याच पीडीत धर्मबांधवांमध्ये या गोष्टी वाटा. परंतु त्यांचे म्हणणे होते की या गोष्टी आम्हाला गांधीच्या हातीच द्यायच्या आहेत कारण पंश्चिम पंजाबमध्ये ज्या हिंदूंना आणि शिखांना दुःख आणि यातना सहन कराव्या लागल्या त्यांना देण्याकरिता या वस्तू आहेत. त्यांच्या या वृत्तीने मी भारावून गेलो. सध्याच्या वातावरणात जर थोडेसे मुसलमान वा हिंदू वा शीख असे असे काम करतील तर त्यांच्या या कामाची नोंद सुवर्णाक्षरात केली पाहिजे. ते म्हणाले की एके काळी ते मला मुसलमानांचा शत्रू समजत होते, परंतु मी सर्वांचा मित्र असल्याची आता त्यांची खात्री पटली आहे. आणि मी असाच आहे वा माझा असाच दावाही आहे. याकरिता मला कोणाच्या दाखल्याची गरज नाही. या भावनेने मी केवळ पाचसात वर्षे जगलो असे नसून गत साठ वर्षे मी हेच करतो आहे.

सामान्यपणे असे म्हणतात की प्रत्येक शीख हा मुसलमानांना शत्रू समजतो आणि मुसलमान प्रत्येक शिखाला. परंतु हे पूर्णपणे चूक आहे. हे खरे आहे की ज्याप्रमाणे मोठ्या संख्येत हिंदू आणि मुसलमान अनिर्बंध झाले होते तसेच बरेच शीख अनीर्बंध झाले होते. परंतु तेवढ्याकरिता संपूर्ण शीख समुदाय तसा होता वा सर्व मुसलमान तसेच असतात असे म्हणणे हे पूर्णपणे अन्याय्य असते. मला अशी अगणित उदाहरणे माहीत आहेत की ज्यात शीख आणि हिंदूंनी मुसलमानांना वाचवलेले आहे आणि मुसलमानांनी शिखांना व हिंदूंना आपल्या स्वतःच्या घरात ठेवून वाचवले आहे. केवळ पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांतातूनच नाही तर प्रत्येक ठिकाणाहून अशा घटनांची माहिती आलेली आहे. वृत्तपत्रांनी अशा गोष्टींना योग्य प्रसिद्धी दिली पाहिजे. हिंदू आणि मुसलमान परस्परांना मारत असल्याच्या बातम्या प्रकाशित करणे त्यांनी बंद करावे. यामुळे काहीही फायदा न होता हानीच होते.

आजच्या जगात वृत्तपत्र ही महान शक्ती झाली आहे. त्यांनी जर अशा प्रकारे निवड केली तर ती फार मोठी सेवा होईल.

मुसलमानांच्या एकूण लोकसंख्येपैकी संयुक्त प्रांतात एकचतुर्थांश मुसलमान राहतात. ते उर्दू बोलतात. त्यांनी तिथे राहावे असे आपल्याला वाटत असेल तर देवनागरी लिपी त्यांच्यावर लादण्यात येऊ नये. मालवीयजींनीसुद्धा हिंदीच्या हिताकरिता भरपूर काम केले होते. परंतु उर्दू भाषा संपवली पाहिजे असे ते म्हणत असल्याचे मी कधीच ऐकले नाही. आज संयुक्त प्रांतात जे सत्तेवर आहेत ते मोठे लोक आहेत आणि चांगले कार्यकर्ते आहेत. मुसलमानांना ते सोबत ठेवतात. परंतु एकीकडे मुसलमानांनी येथून जाऊ नये असे जर आपण म्हणत असू आणि दुसरीकडे जर आपण त्यांना अपमानित करू व त्यांना गुलामाप्रमाणे वागवू तर त्यांना स्वतःहोऊन येथून जाणे भाग पडेल. आपल्याला इतरांची उपस्थितीही सहन होऊ नये इतके आपण आपल्या बहुसंख्यत्वामुळे उद्धट झालो पाहिजे काय? आपण असे वर्तन कधीही करू नये. प्रत्येकाने हिंदी आणि उर्दू लिपी शिकायला पाहिजे. मुसलमानांना जर स्वतःहोऊन पाकिस्तानमध्ये जायचे असेल तर त्यांना तसे करू द्यावे. परंतु आपण आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे. अखेरीस मुसलमानांचा संपूर्ण संयुक्त प्रांतावर ठसा उपटलेला आहे आणि आग्रा, लखनौ, देवबंद, आझमगढ आणि इतर ठिकाणी मुसलमानांचे त्यांनी उभारलेली सुंदर स्थापत्ये आहेत. त्या ठिकाणी अनेक राष्ट्रावादी मुसलमान आहेत. याशिवाय तिथे अनेक असे हिंदू आहेत की ज्यांना केवळ उर्दू येते. तेज बहादूर सप्रू उर्दू भाषेचे विद्वान आहेत. त्यांनी देवनागरी लिपीत लिहावे अशी बळजबरी केली पाहिजे काय? त्यांना उर्दू विसरा असे सांगितले पाहिजे काय? आपण स्वतःच आपले हात कापणार आहो काय? आपण जर असे काही करू तर आपल्या अत्याचाराची परिसीमा होईल. अशा प्रकारे हिंदू धर्माचे आपण रक्षण करू शकत नाही याबद्दल मला किंचितही शंका नाही. आपण पाकिस्तानच्या उदाहरणाचे अनुकरण करू नये. यामुळे संयुक्त प्रांताच्या सरकारला, जरी ते माझ्या हातात नसले तरी अतिशय प्रेमपूर्वक आवाहन आहे की त्यांनी आपले परिपत्रक परत घ्यावे. (संयुक्त प्रांताची अधिकृत भाषा देवनागरी लिपीतील हिंदी असावी असे ठरवले असल्याचे वृत्त वर्तमानपत्रांमध्ये आले होते.)

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४२२-२४

# १४३. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर १६, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

म्हैसूरबद्दल बोलण्याचे आतापर्यंत मी विसरूनच जात होतो. तिथे काय घडले याची तुम्हाला कल्पना असेलच. सर रामस्वामी मुदलीयार हे म्हैसूरचे दिवाण आहेत. म्हैसूर भारतीय संघराज्यात दाखल झाला आहे. त्या संस्थानातील लोक चांगले शिकलेले आहेत. त्यांनी अनेकदा सत्याग्रहात भाग घेतला होता. या वेळीसुद्धा लोक सत्याग्रह करणार होते. त्यांना प्रशासनात पुरेसा सहभाग हवा होता. राजा राहील आणि लोक राजाशी निष्ठावंत राहतील. परंतु त्याला प्रशासनापासून वेगळे राहावे लागेल. असे आधीच घडायला पाहिजे होते, परंतु घडले नव्हते. यामुळे सत्याग्रह. काळजी करण्याचे काहीही कारण नाही असे त्यांनी मला कळवले होते. त्यांनी मला सांगितले की भरपूर विचार केल्यानंतर आम्ही सत्याग्रहाचा निर्णय घेतला आहे आणि आम्ही सत्याग्रहाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करू. आपल्या उद्दिष्टाच्या सिद्धीकरिता कितीही हालअपेष्टा सहन करण्याची त्यांची तयारी होती. परंतु दिवाण, सर रामस्वामी मुदलीयार, फार मोठे माणूस आहेत. त्यांनी जगभर प्रवास केलेला आहे. लोकांशी फार दिवस दुर्व्यवहार करता येत नाही हे त्यांच्या लक्षात आले. अशा प्रकारे किती दिवस चालणार होते? परिणाम हा झाला की ज्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते त्या सर्वांना मुक्त करण्यात आले आणि म्हैसूर संस्थान आणि तेथील जनता यांनी हा प्रश्न सोडवला. जनतेच्या सर्व न्याय्य मागण्या संस्थानाने मान्य केल्या. संस्थानिक, दिवाण आणि जनता या सर्वांचे या तडजोडीकरिता अभिनंदन केले पाहिजे. संस्थानिकाने जनतेच्या संमतीने राज्य करण्याचे मान्य केले आहे. असे अनेक इतरही स्संथानिक आहेत. त्यांनीसुद्धा हे उदाहरण गिरवावे आणि इंग्लंडच्या राजाप्रमाणे जनतेच्या संमतीने राज्य चालवावे. त्यांनी जर जनतेची इच्छा शिरोधार्य मानली आणि कधीही सीमोल्लंघन केले नाही तर किती चांगले होईल!

मला तुम्हाला दुसरी गोष्ट सागायची आहे. मी जिथे राहतो ती जागा बिर्ला बंधूंची आहे. ते प्रत्येकाला आत येऊ देतात. आपण त्यांच्या या सौजन्यपूर्ण वागणुकीचे कौतुक केले पाहिजे. अनेकदा लाखो लोक प्रार्थना सभेला येत असतात. परंतु इथे सभा लहान होत असतात. खरे म्हणजे इतक्या लोकांचीसुद्धा मी अपेक्षा करत नसतो. या प्रार्थना सभांना उपस्थित राहणारांमध्ये पंजाबमधून

आलेल्या लोकांचासुद्धा सहभाग आहे. आजूबाजूच्या झाडाची काही लोकांनी फळे तोडली हे ऐकून मला फार दुःख झाले. झाडाच्या एकाही फळाला कोणीसुद्धा स्पर्श करू नये. केवळ फळाबद्दल काय बोलायचे, पानालासुद्धा स्पर्श करू नये. अशा प्रकारे फळे तोडलेली माळ्याला मुळीच आवडणार नाही. फळे केव्हा तोडायची याचीसुद्धा वेळ असते. त्या वेळेआधी फळे तोडू नये. इथे जे लोक येतात ते भक्तीकरिता येतात. निदान प्रार्थना सभेच्या वेळी तरी आपली अंतःकरणे शुद्ध असली पाहिजे. त्या काळात आपण ईश्वराशिवाय अजून कशाचाही विचार करायला नको. मग आपण चोरी कशी करू शकतो? शक्य आहे की आपण सर्व कठीण काळातून जात असू. परंतु आपण आपल्या चांगल्या सवयी टाकून देऊ नये.

मला अजून एक तक्रार मिळाली आहे. मला पाहण्याकरिता दिवसभर लोक येत असतात. त्यांच्यापैकी काही लोक म्हणतात की सरकारी अधिकारी, पोलीस आणि सैन्य यांची स्तुती करून मी त्यांना कार्यक्षमतेचे प्रशस्तीपत्र दिले आहे. मी असे काहीही म्हणालो नाही. आणि मी जरी असे काही म्हणालो असेन तर ती माझी चूक असेल वा त्यावेळी मी पुरेसा सावध नसेन. परंतु मी तसे मुळीच म्हणालो नाही. त्यांनी कसे असावे इतकेच मी सांगितले होते. ते तसे आहेत असे मी म्हणालो नव्हतो. माणसात असे आणि असे गुण असले पाहिजे असे म्हणणे वेगळे आणि त्याच्यात असे गुण आहेत असे म्हणणे वेगळे. ते काहीही असले तरी मी त्यांच्यातील कोणालाही ओळखत नसल्यामुळे मी त्यांना असे प्रशस्तीपत्र कसे देऊ शकतो? ते सर्व कायद्याप्रमाणे वागत आहेत हे मला कसे कळू शकेल? पोलीस आणि सैन्याला काही अधिकार देण्यात आलेले असल्यामुळे त्यांच्या सूचनांचे पालन करणे आपले कर्तव्य आहे.

आपल्यला जर पंचायत राज पाहिजे असे वाटत असेल तर आपण त्याच्या आदेशाचे पालन केले पाहिजे. पंचायत राजचे अजून सर्व लाभ आपल्याला मिळायचे आहेत. आपण जर खरोखर अहिंसक असतो तर असे काही घडले नसते. असे असूनही ब्रिटिशांचे राज्य संपले. महाराज्यपाल, जरी ते ब्रिटिश असले आणि नौदलात उच्चाधिकारी असले व ते राजघराण्याशी संबंधित असले तरी ते इथे आपले नोकर म्हणून राहिलेले आहेत. त्यांना आपल्या मंत्रिमंडळाच्या सल्ल्याप्रमाणे वागावे लागेल. ते आपले मालक नाहीत. उलट आपणच त्यांचे मालक आहो. अशा प्रकारे आपले लोकशाही सरकार आहे आणि त्याने केलेल्या कायद्यांचे आपण पालन केले पाहिजे. कोणाची जर सरकारी अधिकाऱ्याच्या विरोधात तक्रार असेल तर सरकारकडे जाणे वा वृत्तपत्रांमधून आपली तक्रार प्रकाशित करणे हा त्यावरील उपाय आहे. जर एखाद्या अधिकाऱ्याने लाच घेतली असेल वा तो अकार्यक्षम असेल तर त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली पाहिजे. जर एखादा अधिकारी लाच घेत असेल

तर तो स्वतःविरुद्ध आणि देशाविरुद्धही अपराध करतो. काही सैनिकी अधिकारी रेल्वे स्टेशनवर लोकांना फटके मारत असताना इतक्यातच आढळले होते. कोणत्याही अधिकाऱ्याला कोणालाही फटके मारण्याचा अधिकार नाही. परंतु त्याचा बदला म्हणून आपणसुद्धा फटके मारू लागलो तर आपण तोच अपराध करतो. स्वातंत्र्याच्याआधी सरकारी अधिकारी आपल्या मालकाप्रमाणे वागत होते, सेवकाप्रमाणे नाही. त्यांची निष्ठा ब्रिटिश सरकारकडे होती, आणि त्या काळात जर त्यांनी लाच घेतली तर तो ब्रिटिश सरकारच्या विरोधातील अपराध होत असे. परंतु आता जर अधिकारी लाच घेत असतील तर ते भारताविरुद्ध अपराध करतात. यात किती तरी अंतर आहे.

नोआखालीचे काही लोकसुद्धा माझ्याकडे आले. अखेरीस पूर्व पाकिस्तान काही लहान देश नाही. पूर्व पाकिस्तानमध्ये ढाका आणि त्रिपुरासारखी ठिकाणे आहेत. ते लोक सांगत होते की पूर्व पाकिस्तानमधील हिंदू पळ काढत आहेत. त्यांना तिथे काही अत्याचार होण्याची भीती वाटते. त्या बंगाली मित्रांनी मला काही तरी सांगण्याची विनंती केली. मी आतापर्यंत जे सांगत आलो तेच मी सांगू शकतो. अशा पद्धतीने कोणीही आपला देश वा घर सोडू नये. शूर माणसाकरिता भिण्यासारखे काहीही नसते. ते जर कुणाला घाबरतच असतील तर केवळ ईश्वराला. घाबरगुंडी उडून त्यांनी पळू नये. त्यांच्यात मरण्याचे धैर्य असले पाहिजे. त्यांनी पाकिस्तान सरकारला सांगितले पाहिजे की आम्ही पाकिस्तानशी प्रामाणिक राहू आणि तिथेच राहिले पाहिजे. आम्ही प्रतारणा करणार नाही आणि पाकिस्तानच्या मुळांना धक्का लावणार नाही अशा प्रकारे त्यांनी आश्वस्त करायला पाहिजे. त्यांनी सांगायला पाहिजे की सरकार आम्हाला मारू शकते परंतु आम्ही आमच्या मुलींचे अपहरण होऊ देणार नाही. सरकार जर त्यांना रामनाम घेण्याकरिता बंदी करत असेल तर त्यांनी ते नाव घेण्याचा आग्रह धरला पाहिजे. दसऱ्याच्या दिवशी वाद्य वाजवू नये असे ते सरकार सांगत असेल तर त्यांनी त्याकरिता आग्रह धरला पाहिजे आणि हा आमच्या धर्माचा भाग आहे असे समजावून सांगितले पाहिजे. परंतु आपला जीव वाचवण्याकरिता प्रभावी लोकांनी तेथून पळून जावे, असहाय लोकांनी तिथेच राहावे हे अगदी चूक आहे. तिथे शुद्र लोक मोठ्या संख्येत राहतात. आवश्यक शौर्य दाखवण्याची त्यांच्याकडून कशी अपेक्षा करता येईल? भरपूर पैसा असलेला मी व्यापारी असेन तर मी काय पळून जायला पाहिजे? माझा धर्म हा नाही. जर वकील, डॉक्टर, व्यापारी इत्यादी यांना जर आपली जागा सोडावी असे वाटत असेल तर गरिबांनाही सुरक्षित ठिकाणी पोहोचवण्याची त्यांनी आधी काळजी घेतली पाहिजे. गरिबांना मागे ठेवून पळून जाणे यात माणुसकी नाही. अशा वर्तनाने हिंदूधर्म, ख्रिश्चनधर्म वा इस्लाम या कोणाचेही नाव मोठे होणार नाही. तुम्ही जिथे कुठे जाल तिथे गरिबांना तुमच्याबरोबर ठेवले पाहिजे. दुर्दैवाने आज मी पूर्व पाकिस्तानमध्ये नाही. ईश्वराने मला सर्वत्र

हजर राहण्याची शक्ती दिलेली नाही. मी केवळ एक साधा मानव प्राणी आहे व असहाय आहे. परंतु मी माझा आवाज त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करू शकतो आणि तोच मी करतो आहे.

ते बंगाली मित्र मला म्हणाले की याबाबतीत काही करण्याकरिता तुम्ही डॉ. आंबेडकरांना सांगा. त्यांनी दलित समाजामध्ये भरपूर काम केले आहे. या प्रसंगी त्यांनीसुद्धा तेथील लोकांना काही सांगितले पाहिजे. माणसाने आपल्या धर्माचे मूल्य देऊन जिवंत राहणे हे पाप आहे हे त्यांनी सांगितले पाहिजे. अशा शब्दांनी त्यांच्यात काही मनोबल निर्माण होईल.

सुऱ्हावर्दीसाहेबांना तिथे पाठवा अशीसुद्धा मला विनंती करण्यात आली आहे. ते तिथे गेले तर योग्यच होईल. परंतु सुऱ्हावर्दीसाहेब इथे नाहीत. ते इथे एकदोन दिवसात येतील. परंतु ख्वाजा नझिमुद्दीन आधीच इथे आहेत. पाकिस्तानमध्ये एकही हिंदू अथवा मुसलमान मारला जाऊ नये असे तेसुद्धा म्हणतात. सुऱ्हावर्दीसाहेबसुद्धा त्यांना मदत करण्याकरिता तिथे जातील. ते तिथे जाणे कसे टाळू शकतील? हिंदू, मुलमान आणि शीख यांनी एकोप्याने राहावे हे प्रत्येकाच्या हिताचे आहे. जर असे होणार नाही तर हिंदुस्तान आणि पाकिस्तान या दोघांचाही विनाश होईल.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४२४-८

# १४४. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर १७, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

अजून माझा खोकला का दुरुस्त झाला नाही असे मला लोक लिहून वा प्रत्यक्ष भेटून विचारत असतात. प्रार्थनेनंतर मी थोडा जरी बोललो तरी मला खोकला सुरू होतो. मी डॉक्टर किंवा वैद्याकडून उपचार करवून घेत नाही. डॉक्टर मला सांगतात की पेनिसिलीन घेऊन जिथे खोकला तीन दिवसांत बरा होऊ शकतो तिथे मी तो तीन आठवडे राहू दिला आहे. परंतु माझ्या मताप्रमाणे रामनाम सर्वात मोठे औषध आहे. ते अचूक आहे. रामाचा बाण ज्याप्रमाणे लक्ष्याचा वेध घेतल्याशिवाय राहत नाही त्याचप्रमाणे हे औषधसुद्धा कधीही अपयशी होत नाही. परंतु माणसाने धीर धरला पाहिजे. सध्याच्या परिस्थितीत मला याच्या दुसऱ्या कोणत्याही पर्यायाची कल्पना करता येत नाही आणि दिल्लीत व संपूर्ण देशात जे काही घडत आहे त्याच्या संदर्भात ईश्वर सोडून इतर कोणाचीही मदत होऊ शकत नाही. एक मानव प्राणी म्हणून मी जे काही प्रयत्न करू शकलो त्यांना अपयशच आले आहे. एक काळ असा होता की जेव्हा माझ्या शब्दांना बरेच वजन होते. आज त्यांचा काहीच प्रभाव पडत नाही. मी काही चूक केली आहे काय? की पूर्वी माझे शब्द जसे अगदी अंतःकरणातून बाहेर पडायचे तसे आता पडत नाहीत? परंतु मी तर अगदी अंतःकरणपूर्वकच बोलतो आणि तुम्ही ऐकतासुद्धा. परंतु काळ बदलला आहे. प्रत्येत युगाचे एक वैशिष्ट्य असते. ते तसेच असायला पाहिजे आणि तसेच आहेसुद्धा. परंतु त्याचा माझ्यावर कोणताही परिणाम होणार नाही. मी तसे घडू देणार नाही. मी तसाच आहे जसा मी नेहमी होतो. मला माहीत आहे की आता मी जे सांगतो आहे तेच मी आधीपासून सांगत आलो आहे. सत्य आणि अहिंसेवर जशी माझी श्रद्धा होती तशीच आताही आहे. शक्य आहे की माझी श्रद्धा अजून सखोल झाली असेल. काळ बदलला आहे परंतु मी बदलेलो नाही. प्रार्थनेचा त्यांच्यावर परिणाम होतो जे सश्रद्ध होऊन ती ऐकतात. माणूस केवळ आपल्या स्वभावाप्रमाणे वागू शकतो. यात ढोंगीपणाला कोणतेही स्थान नाही.

आज मी जे काही करतो आहे ते ईश्वराच्या नावावर करतो आहे. माझी त्याच्यावर श्रद्धा आहे. किरकोळ आजाराकरिता मी त्याचे नाव का टाकून द्यावे? एक तर हा आजार गेला पाहिजे आणि नाही तर या आजारावर मी विजय मिळवला पाहिजे. माणूस मेला तर ती काय मोठी गोष्ट आहे?

जन्मापासूनच प्रत्येकाचा मृत्यूही ठरलेला असतो. ईश्वराला माझ्याकडून काही करवून घ्यायचे असेल तर तो मला जिवंत ठेवील, आणि नाही तर तो मला खोकल्यानेही मला मारून टाकील. या मुलीने थोड्या वेळेपूर्वी गायीलेल्या भजनात म्हटलेले आहे की तू कामना विसर, तू क्रोध विसर, तू मोह विसर, लोभ विसर परंतु रामनामाला विसरू नकोस. तोच तुझा आधार आहे. भजन म्हणणे आणि चिंतन करणे तुझे काम आहे. परंतु अशा वेळी खोकला येतो तेव्हा डॉक्टर आणि वैद्य सांगतात की तू पेनिसिलीन घे. इथे रामनाम कुठून आले? माझी जर या लहानसहान बाबतीतही रामनामावर श्रद्धा नसेल तर मोठ्या कामात त्याच्या आधारावर मी कसा यशस्वी होईन? यात जर मी जर स्वतःच्या प्रयत्नाने यशस्वी झालो नाही तर माझे स्खलन होईल व मी कुचकामाचा होईन. हा साधा खोकला दूर व्हावा म्हणून मी रामनाम का विसरू?

नेहमीप्रमाणे आजही काही कांबळी आली आहेत. काही धनादेशसुद्धा आले आहेत. एक मुसलमान सद्गृहस्थ मोठ्या उत्साहात आले आणि अडीच शेर कापूस भरलेली दुलई सोडून गेले. कोणतेही पांघरूण नसलेल्या माणसाला ती द्यावी अशी त्यांची इच्छा होती. हे करण्याकरिता व्यवस्था करण्यात येत आहे. असे म्हणतात की ज्या वेगात लोक देतील अशी अपेक्षा होती त्या वेगात लोक देत नाहीत. माझ्याबद्दल सांगायचे तर लोक इतक्या जलद आणि उत्साहाने कांबळी व पैसा पाठवत असल्याबद्दल मी तर त्यांना धन्यवादच देईन. काही लोक पैसा पाठवत आहेत कारण त्यांना इतकी स्वस्त कांबळी मिळू शकली नाही. त्यांच्यातर्फे आपण ती कांबळी स्वस्त दराने विकत घ्यावी अशी त्यांची इच्छा आहे.

अन्नसमस्येचा विचार करण्याकरिता राजेंद्र बाबूंनी समितीची सभा बोलावली आहे. समितीने कपड्यांच्या चणचणीबद्दल चर्चा केली नाही. अन्नधान्य आणि कापड यांच्यासंबंधी गत काही महिन्यांपासून जो दृष्टिकोन होता तोच आताही आहे. मी मान्य करतो की गरीब लोकांना जास्त त्रास होतो आणि त्यांना अधिकच त्रास होणार आहे. काही लोक मला लिहितात आणि जे लोक शेतकऱ्यांमध्ये काम करतात ते मला सांगतात की मी जे काही म्हणालो त्यामुळे शेतकरी फार खुष आहेत. यामुळे त्यांच्यावर लादण्यात आलेल्या कंट्रोलपासून त्यांची सुटका होईल असे त्यांना वाटते. त्यांना निदान काही संधी मिळेल. त्यांचे धान्याचे कोठार भरलेले आहेत. तेच ते संपूर्ण धान्य खाणार आहेत काय? त्यांना पैसाही मिळवायचा आहे, ते काय काळ्याबाजारात आपले धान्य विकतील? शेतकरी साधेभोळे लोक असतात. त्यांनी काळ्याबाजारात का जावे? थोडे दहावीस रुपये मिळाले तर तेवढ्यावरच ते खुष होतात. त्यांना काळ्या बाजाराच्या कारभाराशी काय करायचे आहे? यामुळे मी परत सांगतो आणि तुमच्या माध्यमातून शासनालाही सांगू इच्छितो की किमान इतका विश्वास तरी

लोकांवर ठेवा. रेशनपद्धती बंद करण्याचे साहस ते का करू शकत नाहीत? त्याचे परिणाम कधीही वाईट होऊ शकत नाहीत. लोक बदमाष झाले आहेत आणि धान्य लपवून ठेवत आहेत असे आपण का गृहीत धरावे? अखेर तुम्ही स्वतःच तर सरकार आहा. परिस्थिती जास्त बिघडली तर तुम्ही परत कंट्रोल सुरू करू शकता. तुमच्यात पुरेसे धैर्य नसल्यामुळे लोकांना त्रास सहन करावा लागत असेल तर ते न्याय्य नाही.पंचायत राजच्या परंपरेप्रमाणे गोष्टी झाल्या पाहिजे.

गिरणी मालक म्हणतात की त्यांच्याजवळ कापडाच्या गाठी पडलेल्या आहेत. परंतु त्यांच्यावर नियंत्रण असल्यामुळे ते त्या कसे विकू शकतील? ते स्वतःच्या नफ्याबद्दल बोलत नाहीत असा माझा विश्वास आहे. ते केवळ जनतेच्या हिताच्या दृष्टीने बोलत आहेत. त्यांना जर मोकळीक दिली गेली तर ते आपला साठा बाहेर काढू शकतील व कापड लोकांपर्यंत पोहोचू शकेल. लोकांजवळ धान्याचा भरपूर साठा असूनही तो ज्या गरजू लोकांपर्यंत पोहोचायला पाहिजे त्यांच्यापर्यंत पोहोचू शकत नाही हे किती नवल आहे? असे दिसते की या बाबतीत मुळातूनच कुठे तरी चुकत आहे. आपल्या नोकरशाहीची इच्छा आपल्या खुर्चीवर बसून काम करण्याची असते. त्यांच्यासमोर त्यांचा टेबल, लाल फीत आणि मेण या गोष्टी असतात. ते लाल फीत लावतात आणि नस्ती (फाईल) तयार करतात. ते कधी शेतकऱ्यांमध्ये राहिले आहेत काय? त्यांनी कधी शेतकऱ्याशी ओळख करून घेतली आहे काय? अतिशय आदरपूर्वक मी त्यांना सांगू इच्छितो की लोक मरून जातील असे तुम्ही का समजता. तुमच्या नियंत्रणामुळे लोक मरत आहेत हे तर आम्हाला उघड्या डोळ्यांनी दिसत आहे. जे लोक बदमाशी आणि वेडेपणाची कृत्य करणारे आहेत ते तसे आताही करत आहेत, परंतु त्यांच्या चांगल्या गोष्टी लपतात. मी तर म्हणेन की शक्य असेल तितक्या लवकर हे दोन्ही कंट्रोल दूर करण्यात आले पाहिजे. जरी काही साठा शिल्लक असेल तरी लोक जागृत होतील. कापड, खाद्यपदार्थ आणि इतर गोष्टींच्या वाढत्या किंमती त्यामुळे कमी होतील.आता युद्ध सुरू नाही आणि आपल्या देशाबाहेर काहीही जात नाही, आणि तरीही किमती वाढतच आहेत. ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. आपली मान खाली होते. माझे मत आहे की सरकारने जनतेवर विश्वास ठेवला पाहिजे आणि धीर ठेवला पाहिजे. धीर धरून शक्य तितक्या लवकर कट्रोल बंद केले पाहिजे आणि याबाबतीत दिवसेंदिवस माझी खात्री वाढत चालली आहे.

आज आपण अस्वस्थ आहो. मुसलमान वा हिंदू वा शिख यांच्या हातून आपण मारले जाऊ अशी आपल्याला भीती वाटत असते. आपल्याला हेच काम असते आणि दुसरे कोणतेही काम आपल्याला सुचत नाही. शत्रुत्व तर आहेच परंतु त्याचाच विचार करत बसल्याने आपण ते विसरणार नाही. जो ज्याचा विचार करतो तो तसाच होतो असे आपले शास्त्रसुद्धा सांगते. त्याचे विष आपल्या

प्रकृतीत भिनते. त्याची झिंग आपल्या डोक्यात चढते आणि हिंदूंना वाटते मुसलमानांना कापावे आणि मुसलमानांना वाटू लागते की हिंदूंना आणि शिखांना कापावे. आपण जर अशा प्रकारे विचार करत राहू तर हाच आपला स्वभाव बनून जाईल. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपली अशी अवस्था झाली पाहिजे काय? याला मी पंचायत राज कधीही म्हणू शकत नाही.

मला दक्षिण आफ्रिकेतून तार आली आहे. तारेत त्यांनी लिहिले आहे की तुम्ही आमच्यावर फार उपकार केले आहेत. मी कोणते उपकार केले? मला जे चांगले वाटले ते मी केले. मला काय योग्य वाटते इतकेच मी सांगितले होते (पाहा प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर ११, १९४७). सत्याग्राहाचे हे फार मोठे वैशिष्ट्य आहे. पंजाब जेव्हा सैनिकी शासनाखाली होता तेव्हा तिथे अत्याचाराचे राज्य सुरू झाले होते. शेकडो, हजारो लोकांना आपल्या पोटावर रांगावे लागले होते. ते पोटावर रांगले कारण त्यांना आपला जीव प्रिय होता. अमृतसरमधीर त्या अरुंद गल्लीचे नाव मी विसरलो आहे. केवळ जिवंत राहण्याकरिता ते पोटावर रांगले होते. तुम्ही रांगला नाही तर तुम्हाला मारून टाकू अशी धमकी त्यांना देण्यात आली होती. परंतु केवळ जगण्याकरिता कोणी असे का करावे? न रांगता उभे राहून "बंधू जीव गेला तरी बेहत्तर पण कधीही पराभव पत्करणार नाही" असे ते म्हणू शकले असते. (पजाबमधील सैनिक शासनाच्या वेळी पंडित रामभुज चौधरी यांनी रचलेल्या कवितेच्या पहिल्या ओळीचा मथितार्थ.) आम्हाला मरावे लागले आणि सर्व काही गमावावे लागले तरी आम्ही कधीही पराभव पत्करणार नाही ही गोष्ट सत्याग्रहाच्या सुराशी अगदी जुळणारी आहे. यात सत्याचा समावेश आहे.चुकीचे काम केले तर त्यात असत्य येते. दक्षिण आफ्रिकेत जरी मूठभर लोक असले तरी त्यामुळे काय होते - असे करणारे करोडो लोक होऊ शकतात. ते काहीही असले तरी तिथे लाखांच्या संख्येतच लोक आहेत. जरी केवळ काही शेकड्यातच नाही तर काही दशकांच्या संख्येतही लोक पुढे आले तर भारताच्या प्रतिष्ठेत भर घालतील. ते मला विचारतात की तुम्ही इथल्या लोकांना पैसा पाठवण्याकरिता का सांगत नाही. यामुळे मला वेदना होतात. ते गरीब लोक नाहीत. ते तिथे आम्हाला उपकृत करण्याकरिता गेलेले नाहीत. जे लोक तिथे संघर्षाची धुरा वाहत आहेत त्यांच्याजवळ जास्त पैसा नाही आणि पैसेवाले लोक त्यांना काहीही देत नाहीत. ज्यांच्याजवळ पैसा आहे ते केवळ पैशावर प्रेम करत आहेत. त्यांना त्यांची प्रतिष्ठा आणि मानसन्मान केवळ पैशातच दिसतो. दक्षिण आफ्रिकेतील आपले लोक म्हणतात की आम्ही लढणारे लोक आहो, परंतु आमच्याजवळ पैसा नाही. परंतु पैसा नाही तर आतापर्यंत कसे चालत होते?

पूर्व आफ्रिकेल फार मोठ्या संख्येत लोक आहेत. संपूर्ण पूर्व किनारा आपल्या लोकांनी भरलेला आहे. त्यांनी पैसा पाठवावा असे मी म्हणेन. आपला भारत देश आज अतिशय गरीब झाला

आहे. इथे मी कोणाला आणि कोणत्या तोंडाने पैसे पाठवण्याकरिता म्हणू? आपल्या देशात करोडपती लोक आहेत आणि ते करोडो कमावतातही. परंतु त्यांच्यावरील कराच्या ओझ्यामुळे त्यांच्याजवळसुद्धा पैसा कमी राहिला आहे. आणि आपल्या दुर्दैवाने लोक आपसात भांडत आहेत व त्यामुळेसुद्धा करोडो रुपयांचे नुकसान होत आहे. या लोकांना दक्षिण आफ्रिकेकरिता पैसा पाठवा असे मी कसे म्हणू? मी जेव्हा दक्षिण आफ्रिकेत होतो तेव्हा इथले लोक पैसा पाठवत असत, गोखले (गोपाळ कृष्ण गोखले) पैसे पाठवत असत. पंजाब आणि संपूर्ण भारताने मला काही पाच ते सात लाख रुपये पाठवले होते. आज असे काही करण्याकरिता मी लोकांना सांगू शकत नाही. मॉरिशसमध्ये अनेक भारतीय आहेत.ते तिथे कुली आहेत. तिथे हिंदू-मुसलमान समस्या नाही. मोंबासामध्येसुद्धा मोठ्या संख्येत भारतीय आहेत. ते चांगलेच श्रीमंत आहेत. ते मद्यपान वा वेश्यागमनही करत नाहीत. त्यांना केवळ आपल्या खाण्यापिण्याकरिता पैसा हवा असतो. केवळ अन्नाकरिता माणसाला किती पैसा पाहिजे? दक्षिण आफ्रिकेतील आपले लोक म्हणू शकतात की आम्ही स्वतःकरिता नाही तर भारताकरिता लढत आहो. लोकांना अर्थातच पैसा पाठवण्यापासून मी अडवू शकत नाही, परंतु मी त्यांना तसे करण्याकरिताही सांगू शकत नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४२८-३३

# १४५. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर १८, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

अजूनही कांबळी आणि चेक येत आहेत परंतु समाधानकारक वेगाने नाही.

मी सरदार पटेल यांनी काढलेले एक वक्तव्यही पाहिले आहे. त्यात त्यांनीही लोकांसमोर हात पसरले आहेत. याचा अर्थ आपण जर सरकारवर विसंबून बसून राहिलो तर कोणतेही काम होणार नाही. सरकार तोपर्यंत पोहोचू शकत नाही. बरे झाले त्यांनीही निवेदन काढले. जे लोक आज थंडी सहन करू शकत नाहीत त्यांच्यापर्यंत थंडीपासून बचाव करण्याकरिता काही ना काही पोहोचवता आले तर बरे होईल.

डॉ. सुशिला नाय्यरही हेच काम करत आहेत. त्या नेहमी पुराना किल्ल्यातही जातात आणि इकडेतिकडेही जातात. आज त्या कुरुक्षेत्रला गेल्या कारण तिथे नवीन शिबीर सुरू करण्यात आले आहे. तिथे सर्व लोक व्यवस्था करतच आहेत परंतु त्या मोठ्या डॉक्टर आहेत. त्यांच्याबरोबर दुसऱ्या स्त्री-डॉक्टरही गेल्या आहेत. इतर लोकही गेले आहेत. डॉ. जॉन मथाई गेले आहेत. या लोकांपर्यंत जितकी मदत पोहोचवता येईल तितके चांगले होईल.

काल मी हिंदुस्तानीबद्दल बोललो होतो. तुम्ही किती विचित्र काम करत आहा असे त्याबद्दल अनेक लोकांनी मला आज लिहून कळवले. मला वाटते की मी हिंदुस्तानी आणि संघराज्याकरिता फार चांगले काम करतो आहे. असे करून मी त्यांची सेवा करतो आहे. ते लिहितात की अखेरीस हिंदुस्तानीचा हा क्रम ज्या काळात सुरू झाला तो अशा काळात सुरू झाला की जेव्हा आम्ही खाली घसरणीला लागलेलो होतो, गुलामीत होतो. आम्ही हे विसरतो की जे लोक आले होते ते आले होते आक्रमण करण्याकरिता परंतु याच ते देशात राहून गेले. या देशात कशा प्रकारे वास्तव्य करता येईल याचा ते विचार करू लागले. खरी गोष्ट ही आहे की उर्दूचा जन्म त्यातूनच झाला व कालांतराने तिने वेगळा आकार घेतला. त्यांनी तिच्यात खच्चून फारसी आणि अरबी शब्द भरले. इतकेच नाही तर त्यांनी तिला नवीन परिवेषही दिला. तिचे व्याकरणसुद्धा त्याच भाषांमधून आले आहे. परंतु हिंदुस्तानीची ही गोष्ट नाही. तिचे व्याकरण या मातीशी निगडीत आहे. उर्दूत जे काही फारसी शब्द असतील ते किती तरी काळापासून आहेत. ते शब्द वेचून त्या भाषेतून बाहेर काढणे हे आपले काम

नाही. जे लोक आक्रमक म्हणून आले होते ते इथेच राहिले व येथील सामाजिक रीतीभाती त्यांनी अवलंबिल्या. मला वाटते की आता आपण त्यांचा तिरस्कार करू लागलो तर तो आपला स्वतःचा तिरस्कार करण्यासारखे होईल. परंतु याचा उल्लेख आज मी वेगळ्या कारणाकरिता करत आहे. याबद्दल मी भरपूर लिहिले आहे. जोपर्यंत इंग्रजी भाषेचा संबंध आहे ती वेगळी आहे. ब्रिटिश येथे साम्राज्य स्थापण्याकरिता आले होते. इथे वास्तव्य करण्याचा त्यांचा विचार नव्हता. ते भारताचे होण्याकरिता कधीही आले नव्हते. इथे ते स्वतःला परकीय समजायचे आणि तसेच राहण्याची त्यांची इच्छा होती. त्यांना त्यांच्या मुलाबाळांना भारताबाहेर वाढवण्याची इच्छा होती. नंतर त्यांनीसुद्धा येथे इंग्रजी भाषा आणली. हळूहळू त्यांनी तिला विशेष आकार दिला. परंतु उर्दूच्या बाबतीत जसे घडले तसे इंग्रजीच्या बाबतीत काहीही घडले नाही. अवधी वा त्या वेळी बोलल्या जाणाऱ्या भाषांपासून उर्दू अस्तित्वात आली होती. परंतु इग्रजीच्या बाबतीत मात्र अशी गोष्ट नाही. आता भारतातील ब्रिटिशांचे राज्य संपलेले आहे. परंतु इंग्रजी भाषेचे आपल्यावर वर्चस्व गाजवणे सुरू राहिले आणि आपण आपले प्रशासन त्या भाषेशिवाय करू शकत नसू तर आपली काय अवस्था होईल? मग देशातील करोडो लोक इंग्रजी शिकू शकतील काय? इंग्रजी आपली राष्ट्रभाषा होणार आहे काय? मी स्पष्टपणे तुम्हाला सांगतो की हे शक्य नाही. असे काही करण्याचे धार्ष्ट्यसुद्धा आपण करू नये. आपण असे काही करण्याचा प्रयत्न केला तर आपण आपला विनाश करून घेणे अपरिहार्य आहे.

एका बंधूंनी मला लिहिले आहे की मी चूक करतो आहे. ते म्हणतात की भारतात जे लोक काम करणारे आहेत त्या सर्वांना इंग्रजी येते. इंग्रजी लिहिणेवाचणे शिकलेले मूठभर होते व ते कोर्टकचेऱ्यात जायचे आणि तिथे इंग्रजीत काम करायचे कारण त्यांचे म्हणणे ऐकले जायचे. जो गुलामीत राहतो त्याला राजभाषा आवडू लागत असते. हे तर ठीक आहे परंतु ज्यांची मातृभाषा हिंदी अथवा हिंदुस्तानी आहे ते जर कोर्टकचेऱ्यात गेले आणि तिथे इंग्रजीत काम चालत असेल तर त्यांना काहीच कळणार नाही. असे करणे म्हणजे आपल्या अकलेचे दिवाळे काढण्यासारखे होईल. समजून घेण्याची आपली अगदीच इच्छा नाही. आपला स्वार्थ कशात आहे हेसुद्धा समजून घेण्याची आपली तयारी नाही. आता इंग्रजी राज्य तर गेले, आता त्याबरोबरच इंग्रजी भाषेला जे स्थान आपण दिले, आणि खरे म्हणजे ते स्थान तिचे होऊच शकत नव्हते, त्या स्थानावरून तिला दूर व्हावे लागेल. एक बंधू मला लिहितात की तुम्ही जे काही सांगता त्याचा लोक अगदी वेगळा अर्थ लावतील. कारण लोकांना सांगणाराचा हेतू कधीच कळत नसतो.

आज आम्ही सर्व बुद्धिभ्रष्ट झाल्यासारखे झालो आहो. हिंदू मुसलमानांशी भांडतील, त्यांच्याबरोबर बसणार नाहीत, त्याचा गळा कापतील इतकेच राहिले आहे. राजकुमारी अमृत कौर,

ज्या कालपरवाच सिमल्याहून परतल्या, मला सांगत होत्या की सिमल्यात जे गरीब लोक पडलेले आहेत ते मुसलमान आहेत व त्यामुळे त्यांना हटवावे लागणार आहे. आपण इतके दुष्ट झालो आहो. तिथून त्याना हलवण्यात येत असताना त्यांना किती त्रास सहन करावा लागला! पाकिस्तानमध्ये मोठ्या संख्येत हिंदू आहेत. त्यांचीसुद्धा हीच तक्रार आहे. अशा गोष्टी एकामागून एक सुरू आहेत.

काही लोक म्हणतात की संस्कृतप्रचूर हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा आहे. इंग्रजी आता जाण्याच्या मार्गावर आहे आणि लोक प्रांताच्या भाषेतून आपले काम चालवतील. तिथे भांडणे होतील अशी भीती आहे आणि ती बरोबर आहे. यामुळे आपसात घृणा निर्माण होईल. इंग्रजी तर राहू शकत नाही कारण इंग्रज तर आता मूठभर शिल्लक आहेत. ते शासन तर चालवू शकत नाहीत.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४३३-३५

# १४६. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर १९, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर १९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

तुम्हाला असे वाटते की दिवस दररोज लहान होत चालला असल्यामुळे सहा वाजता जी प्रार्थना सुरू होते ती करण्याकरिता उशीर होतो. दिवस दररोज २ ते ३ मिनीटांनी लहान होतो आणि २३ डिसेंबरला तो अगदी लहान होतो. या दिवसात लवकरच अंधार पडू लागत असल्यामुळे उद्यापासून आपण सायंकाळी ५.३० वाजता प्रार्थना सुरू करत जाऊ.

तुम्ही आधीच भजन ऐकलेले आहे. (आश्रम भजनावली, भजन क्रमांक १५१) मला वाटते की या भजनातील हृदयस्पर्षी गोष्ट मी तुम्हाला सांगितली नाही. आश्रम भजनावलीत जे भजन आहे आहेत त्यांच्यातील प्रत्येक भजनामागे एक इतिहास आहे. त्यातील सर्व भजन काही अगदी निवडक नाहीत. काही निवडक आहेत परंतु तो संपूर्ण संग्रह आश्रमात तयार करण्यात आला आहे. आश्रमात एक मोठे भक्त होते. ते संगीतशास्त्रीही होते. त्यांचे नाव पंडित खरे (नारायण मोरेश्वर खरे) होते. त्यांनी भजन निवडले. त्यांनी अर्थातच काकासाहेब आणि इतरांची मदत घेतली. या भजनांचाही संग्रहात समावेश करण्यात आला. माझा पुतण्या मगनलाल गांधी हा भजन म्हणत असे. दक्षिण आफ्रिकेतील आश्रमात तो माझ्याबरोबर दीर्घ काळ राहिला होता. असे काही नाही की पंडित खरेंनीच असा संग्रह तयार केला. इतर अनेकांनीही असे संग्रह तयार केले आहेत. कारण ते दिवस स्वातंत्र्याकरिता सुरू असलेल्या आपल्या अहिंसक संघर्षाचे होते. काही वर्षांनंतरही स्वातंत्र्य न मिळाल्यामुळे अनेक लोकांमध्ये वैफल्यग्रस्ततेची भावना निर्माण झाली. यावरून इतकाच निष्कर्ष काढता येऊ शकतो आपले कुठे तरी चुकत होते. जेव्हा काही तरी चुकते तेव्हा चांगले लोक त्याच्या कारणाचा बाहेर कुठे तरी शोध घेत नसतात. अशा गोष्टीकरिता आपले शेजारी वा आपले भाऊबंद दोषी आहेत आणि आपण नाही असा विचार करणे बरोबर नसते. हा काही बरोबर मार्ग नाही. हा चुकीचा मार्ग आहे. जेव्हा गोष्टी बिघडतात तेव्हा आपला दोष नाही आणि इतरांचा आहे असा विचार करणे चूक असते. सर्व ईश्वरभक्त हेच सांगतात. तुलसीदास हेच म्हणाले. सूरदासही “मो सम कौन कुटिल खल कामी” - माझ्यासारखा कुटिल कोण आहे, खल कोण आहे, कामुक कोण आहे असेच म्हणतात. (आश्रम भजनावली भजन क्रमांक १०६) तुलसीदास काय वा सूरदास काय आपल्या दृष्टीतून असे नव्हते,

परंतु ते स्वतःला असे समजत होते. भाऊ, बहिणी, मुले, मित्र आणि इतर सर्व गोतावळा जरी आजूबाजूला असला तरी ते जर ईश्वरापासून दूर असले तर त्यांना तितकेच दुःख व्हायचे आणि मग ते दुःखाने म्हणतात की माझ्यासारखा कुटिल, खल कामी कोणी नसेल. ते असे म्हणाले आणि त्यांनी स्वतःमध्येच दोष शोधायचा प्रयत्न केला ही चांगली गोष्ट आहे. असेच "अजहू न निकसे प्राण कठोर" हेही भजन आहे. ते भजन म्हणते की अजून ईश्वराचे दर्शन झाले नाही तर अजून प्राण का निघून गेले नाही? हे भजन नेहमी गणेश शास्त्री गात असत. परंतु एखाद वेळी ते हजर नसले, आजारी पडले तर मगललाल ते गायचे. मगललाल संगीतज्ज्ञ नव्हते परंतु त्यांचा गळा गोड होता. ते ज्या पद्धतीने भजन म्हणायचे ते अजून माझ्या कानात आहे. ते आश्रमाचे आधारस्तंभ होते. आश्रमाच्या संचालनात ते एखाद्या शिळेसारखे होते. ते फार काटक होते. कुदळीने खोदण्याच्या कामात ते सर्वांच्या पुढे असायचे. ते जेव्हा दक्षिण आफ्रिकेत होते तेव्हा ते शरीराने फार धष्टपुष्ट होते. परंतु इथे आल्यानंतर ते जरी आजारी नव्हते तरी त्यांचे वजन कमी झाले होते. तिथे जरी त्यांना संपूर्ण जबाबदारी सांभाळावी लागायची तरी इथे त्यांना करोडो लोकांसोबत काम करावे लागायचे. ही वेगळीच जबाबदारी होती. त्यांनी रचनात्मक कामाची भरपूर जबाबदारी घेतली होती. आपण रचनात्मक कार्य कसे सोडून देऊ शकतो? रचनात्मक कार्याशिवाय स्वराज्याला काय अर्थ राहील? आपण स्वातंत्र्य मिळवले आहे परंतु त्याचे किती मूल्य आहे? आपण जरी स्वातंत्र्य मिळवले असले तरी त्याचे काय? आज आपल्या लक्षात येते की त्या काळात आपण पुरेसे रचनात्मक कार्य केले असते तर आज आपल्याला जी दृश्ये पाहावी लागत आहेत ती पाहावी लागली नसती. आपल्या मनात असे स्वराज्य होते काय? त्या दिवसात आपण भरपूर काम केले असते तर आज भारताचा इतिहास वेगळा असता. याबद्दल मला मुळीच संशय नाही. मगनलालचा देव स्वराज्यात होता. त्याचे स्वराज्य रामराज्य होते.

ईश्वराचे दर्शन केवळ स्वराज्यातच होऊ शकते. अखेरीस ईश्वर काही जड देह थोडाच आहे. काही लोक सांगतात की त्याला चार हात आहेत, एका हातात शंख, दुसऱ्या हातात गदा, तिसऱ्यात चक्र आणि चौथ्यात पद्म आहे. ही सगळी आपली कल्पना आहे. ईश्वर आपल्या हातात शंख, चक्र, गदा आणि कमळ कसा धारण करू शकेल? तो निरंजन म्हणजे म्हणजे निष्कलंक आणि निराकार आहे. तो जर भौतिक अस्तित्वाच्या पलीकडे असेल तर तो भौतिक आकार कसा धारण करू शकेल? आपण ईश्वराची प्रतिमा आपल्या मनात निर्माण करतो आणि मग तिच्यावर विश्वास ठेवतो. मग आपण आपल्या ईश्वराकरिता कुणाकडे पाहावे? त्याला आपण आपल्या कृतीतून पाहू या. आपण जेव्हा यज्ञ समजून एखादी गोष्ट करतो तेव्हा आपण आपल्या अंतःकरणात ईश्वराची स्थापना करतो. उदाहरणार्थ जेव्हा एखादा माणूस चरखा फिरवतो तेव्हा त्याने कातलेल्या धाग्यात त्याला ईश्वर दिसतो.

त्याच्या मनात सर्व जग आपले आहे आणि आपले जग तर भारत आहे, आणि भारतात असे गरीब आहेत की ज्यांना खाण्याकरिता मिळत नाही असे असते व म्हणून तो दरिद्रनारायणाकरिता तो कताई करतो. सुताचा जो एकेक धागा तो कातत असतो त्या धाग्यात मग तो देवाचे दर्शन घेतो. त्या दिवसात स्वराज फार दूर होते. परंतु जेव्हा आश्रम फार चांगले नव्हते तेव्हा मगनलालच्या अंतःकरणातून शब्द निघायचे "अजहू न निकसे प्राण कठोर". नंतर त्या भजनात चार प्रहर चार युगांप्रमाणे गेले असे वाटते असे. याचा अर्थ संपूर्ण रात्र निघून गेलेली असली तरी हा जीव काही अजून गेला नाही. अजूनही देह कायम आहे. त्याला चार प्रहर चार युगांप्रमाणे वाटतात. मलासुद्धा या रात्री तितक्याच मोठ्या वाटतात. आपण तेव्हा आपले स्वातंत्र्य मिळवलेले नव्हते. आत मी मान्य करतो की १५ ऑगस्टला आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. परंतु हे खरे स्वराज्य आहे असे मी समजत नाही. माझ्या कल्पनेतील स्वराज्य हे नाही. या स्वराज्याला रामराज्यही म्हणता येऊ शकत नाही. आज आपण परस्परांना शत्रू समजू लागलो आहो. मुसलमान हिंदूंचे शत्रू आहेत आणि हिंदू आणि शीख मुसलमानांचे शत्रू आहेत. परंतु स्वराज्याच्या माझ्या संकल्पनेत आपण कोणालाही आपला शत्रू समजत नाही आणि आपल्याला कोणाचाही शत्रू होण्याची इच्छासुद्धा नसते. ते स्वराज्य अजून आलेले नाही. भारतातील हिंदूंनी आणि मुसलमानांनी परस्परांना शत्रू समजायला पाहिजे काय? आपली भावंडे एकमेकांशी शत्रूत्व पत्करून राहतील काय? मी असे का म्हणतो? मी हे एकदा थोडक्यात सांगितले आहे परंतु आपल्याला जर उंचावर जायचे असेल तर आपण सर्वांनी भावाभावाप्रमाणे राहिले पाहिजे ही गोष्ट मी परतपरत सांगेन. या क्षणी आपण पतीत झालो आहो आणि अजून आपले अधःपतन होण्याची शक्यता आहे. आपल्या अंतःकरणात द्वेष भरलेला आहे, रक्तपात भरलेला आहे. मुसलमान पाहताच आपण भडकतो. मशिदीत मुसलमानाला ईश्वराची भक्ती करताना पाहिले की आपण त्याला मारून टाकतो. त्याला आपण आपला शत्रू समजतो आणि त्याला केव्हा येथून आपण हाकलून लावू शकू याचा विचार करू लागतो. त्याच्या मशिदीचे मंदिर बनवण्याचा विचार आपण करू लागतो. परंतु मशिदीत प्रार्थना करत असताना त्याने कोणती चूक केलेली असते याचा विचार करा. देऊळ आणि मशीद सारखेच आहेत. मग मुसलमानांनी देवळांचा विध्वंस करावा आणि हिंदूंनी देवळाचा असे का? ईश्वराच्या नजरेत दोघांचाही सारखाच दोष आहे. आपण हिंदू जे करतो त्यामुळे मुसलमान दुखावत असतील आणि मुसलमान जे करतात त्यामुळे हिंदू दुखावत असतील तर आपल्याला स्वराज्य मिळाले असे आपण कसे म्हणू शकतो? आपण स्वतःला या परिस्थितीत आणले आहे परंतु आपल्याला या आगीतून बाहेर पडायचे आहे.

मी आधीच सांगितले आहे की मला दिल्लीत करायचे वा मरायचे आहे. मी इथे त्याच हेतूने आलो आहे. अजून मी काहीही केले नाही. हे खरे आहे की आजकाल आपण सांप्रदायिक

भांडणांबद्दल फारसे ऐकत नाही, वरवर पाहता आपण भावाभावासारखे राहत आहो. परंतु हे स्वतःला फसवण्यासारखे आहे. इथे पोलीस आणि सैन्य ठेवण्यात आले आहे ते इथे काही धोका आहे म्हणूनच. इथे असणारे मुसलमान भीतीमुक्त झाले आहेत काय? मी यापासून मोकळा झालो काय? मला असे वाटत नाही. इथे माझ्याबरोबर काही मुसलमानसुद्धा आहेत. तुम्ही इथेच त्यांचा अपमान करणार आहात काय? माझ्या डोळ्यासमोर तुम्ही त्यांचा खून करणार आहा काय? त्यांना मारण्याआधी तुम्हाला मला मारावे लागेल. काल माझ्यामागे शेख अब्दुल्ला बसलेले होते. त्यांच्याबरोबर काही काश्मिरी पंडितही होते. शेख आपले मित्र आहेत. कोणी तरी आपल्या रफी साहेबांच्या (रफी अहमद किडवाई) भावाचा मसुरीत खून केला. त्यांनी काहीही केलेले नव्हते. ते आपले सेवक होते. त्यांची विधवा अगदी इथेच बसलेली आहे. लोकांच्या मनांत घृणा निर्माण होऊ नये म्हणून मी ती दुःखद गोष्ट इथे सागत नाही. माझ्या अंतःकरणात अनेक गोष्टी आहेत. मी तुम्हाला सार सांगेन. मला फार थोड्या गोष्टी माहीत आहेत. परंतु मला चर्चा फार लांबवायची नाही. ते काही असले तरी भजनात म्हटल्याप्रमाणे आपल्याला ईश्वरदर्शन झाले नाही म्हणून आपल्याला मरण्याची इच्छा असेल तर आपले दोष पर्वताप्रमाणे पाहणे व इतरांच्या दोषाकडे दुर्लक्ष करणे हे त्याकरिता उचलायचे पहिले पाऊल असेल. सर्व जगासमोर आपण घोषित केले की सर्व दोष आमचा आहे व इतर सर्व चांगले लोक आहेत तर असे करणे भ्याडपणाचे होणार नाही. असे केल्यामुळे आपले अधःपतन होणार नाही, इलट आपण नवीन उंची गाठू आणि धैर्यशाली होऊ.

आपल्याला देशात देवाचे राज्य वा रामराज्य निर्माण करायचे असेल तर आपण आपले दोष मोठे करून पाहावे आणि मुसलमानांचे दोष न पाहणे हे आपले पहिले काम आहे असे मी म्हणेन. मुसलमानांमध्ये काहीच दोष नाहीत असे मला म्हणायचे नाही. त्यांनी बरीच दुखापत केली आहे. त्यांनी केलेल्या चुका लपवण्यात वा त्यांच्याबद्दलचे अज्ञान दाखवण्यात काहीही अर्थ नाही. परंतु हे माहीत असूनही मी त्याकडे पाहणार नाही. मी जर त्या चुकांचा विचार करू लागलो तर मला वेड लागेल आणि मी भारताची सेवा करू शकणार नाही. मला कोणीही शत्रू नाही असा विचार करून मी सुरुवात केली व जगासमोर मी माझे सर्व दोष उघड केले आणि इतरांच्या दोषांकडे डोळेझाक केली तर काय होईल? त्यांना पाहण्याकरिता ईश्वर आहे. कोणी मला थापड मारली वा कान कापले वा गळा कापला तर त्याचे काय? माणसाला केव्हा ना केव्हा मरावेच लागते. न्याय करण्याकरिता ईश्वर आहे. मी काहीही करत असलो तरी त्याला विसरता कामा नये. यामुळेच मी वारंवार सांगत असतो की तुम्ही तुमची अंतःकरणे इतकी शुद्ध ठेवली पाहिजे की जगाने तुमच्याविरुद्ध तक्रार करायला नको. आज मी जेव्हा तिथे गेलो (लॉर्ड माऊंटबॅटन यांच्याकडे) तेव्हा दिल्लीतील परिस्थितीबद्दल मला विचारण्यात आले. आतासुद्धा हिंदू आणि मुसलमान अंतःकरणापासून एक नसल्यामुळे मला लाजेने

मान खाली घालावी लागली. सरदार आणि जवाहरलाल यांनी पोलीस आणि सैन्य ठेवल्यामुळे ते एकमेकांचे गळे कापत नाहीत ही चांगली गोष्ट आहे. परंतु त्याचे काय? ब्रिटिशसुद्धा अशी व्यवस्था करत होते. दिल्लीमध्ये जे घडत आहे ते पाहण्याची आपली इच्छा नाही. आज माझे पंख कापलेले आहेत. मी जर परत माझे पंख वाढवू शकलो तर मी पाकिस्तानमध्ये उडत जाईन आणि तिथे हिंदूंनी आणि शिखांनी कोणते अपराध केले ते पाहीन. परंतु त्यांनी जर काही केलेच असेल तर? त्यांनी तिथे आपल्याच घरात का राहू नये? परंतु आज हे सांगण्याकरिता मला तोंड आहे काय? मी केवळ लोकांना समजावून सांगू शकतो आणि तुम्हाला ईश्वराचे दर्शन घ्यायचे असेल व खऱ्या स्वराज्याची स्थापना करायची असेल तर आपण सर्वांनी एक व्हायला पाहिजे आणि भारत अधःपतीत देश नाही असे घोषित करायला पाहिजे. यामुळे आपली प्रतिष्ठा वाढेल आणि आपल्या देशातील भूक आणि तहान दूर करण्याकरिताही आपल्याला वेळ मिळेल.

आज संपूर्ण जग आपल्याकडे पाहत आहे कारण आशियाला जर वर जायचे असेल आणि आफ्रिकेतील हब्शींची प्रगती व्हायची असेल तर भारताला उंच उठायला पाहिजे. भारत नेहमीच आशियाचाच नाही तर युरोपचासुद्धा केंद्र राहिला आहे. भारत जर काही साध्य करू शकला तर संपूर्ण जगाला त्यापासून प्रेरणा मिळू शकेल.

जग थंडीत कुडकुडत आहे. जगाला जर ऊब मिळायची असेल तर ती केवळ भारताकडूनच मिळू शकते. माझी ईश्वराला आणि तुम्हालाही प्रार्थना आहे की सर्वांना ऊब मिळू शकेल अशा प्रकारे आपण वागलो पाहिजे आणि आपल्या माध्यमातून सगळ्या जगाला ऊब मिळाली पाहिजे. संपूर्ण आशिया आणि आफ्रिकेतील लोक आपल्याकडे पाहत आहेत. इथे काही तरी घडत आहे अशी जर त्यांची खात्री पटली तर संपूर्ण जग आपल्या उदाहरणाचे अनुसरण करील.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४३६-४१

# १४७. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर २०, १९४७

(गांधीजींचे मौन असल्यामुळे हे भाषण वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २०, १९४७

एका मुसलमान आरोग्याधिकाऱ्याचा कामावर जात असताना खून करण्यात आला असे राजकुमारी अमृत कौरने काल रात्री प्रार्थनेनंतर मला सांगितले. त्यांनी मला सांगितले की तो चांगला अधिकारी होता, आपले कर्तव्य चांगल्या प्रकारे पार पाडत होता. त्याच्यामागे विधवा आणि मुले आहेत. ती विधवा आक्रोश करताना म्हणत होती की त्या खुन्याने माझ्या मुलांचा आणि माझाही खून करायला पाहिजे होता. तिचा नवराच तिचा सर्व काही होता, भाकरीही तोच कमावत होता. आता जगण्यात काय उरले आहे (हे वाक्य आकाशवाणीवरील भाषणातून घेतले आहे.)

मी कालच तुम्हाला सांगत होतो की दिल्लीत जशी शांतता दिसून पडते आहे तरी तसे नाही. जोपर्यंत अशा एखाददुसऱ्या घटना घडत राहतील तोपर्यंत दिल्लीतील वरवरची शांतता पाहून आपण समाधान मानू शकत नाही. ही तर स्मशानशांतता आहे. जेव्हा लॉर्ड इर्विन, जे आता लॉर्ड हेलीफॉक्स आहे, दिल्लीचे व्हाईसराय होते तेव्हा त्यांनी हिंदुस्तानातील वरवरच्या शांततेला स्मशानशांतता म्हणून संबोधले होते.

राजकुमारीने मला असेही सांगितले की कुराण शरीफप्रमाणे शवयात्रा काढण्याकरिता पुरेसे मुसलमानसुद्धा गोळा करणे कठीण झाले होते.

ही हकिगत ऐकून माझ्यासारख्या संवेदनशील माणसाचा जसा थरकाप होतो तसाच थरकाप झाल्याशिवाय राहणार नाही. दिल्लीची ही अवस्था! बहुमत कितीही शक्तिशाली असले तरी बहुमताला अल्पमताने घाबरावे हे भ्याडपणाचे चिन्ह आहे.

मला आशा आहे की सत्ताधारी गुन्हेगारांचा शोध घेतील आणि त्यांना शिक्षा देववतील.

हा जर अखेरचा अपराध असेल तर मला काही म्हणायचे नाही. परंतु अशा प्रकारचे अपराध नेहमीच लाजिरवाणे असतात. परंतु मला भीती आहे की हा तर केवळ एक नमुना आहे. यामुळे दिल्लीच्या अंतरात्म्याने जागे झाले पाहिजे.

कांबळ्यांकरिता पैसे येणे सुरू आहे. सर्व देणगीदारांचे मी आभार मानतो. माझे दान केवळ हिंदूकरिता वा केवळ मुसलमानाकरिता आहे असे एकही देणगीदार म्हणाला नाही याचा मला आनंद होतो.

मला अजून एका धोक्याच्या गोष्टीकडे तुमचे लक्ष वेधणे दुःखाने भाग पडत आहे. जर तो तसा असेल तर. हा धोका खरोखरीचा आहे की नाही हे मला माहीत नाही. (हे वाक्य प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४४२वरून घेतले आहे.) एक इंग्रज गृहस्थ आपल्या अनावृत पत्रात लिहितात - "ज्या कोणाशी याचा संबंध असेल त्याला -

*आपल्यापैकी अनेक लोक दंगलग्रस्त भागातील एकाकी ठिकाणी राहतात. आपण ब्रिटिश आहो आणि वर्षोगणती वैयक्तिक त्याग करून या देशातील लोकांच्या कल्याणाकरिता आपण झटत आहो...(मूळ स्रोतात इथे वगळलेले आहे.) भारतात जितके इंग्रज राहिलेले आहेत त्यांना मारून टाकण्यात यावे असा गुप्त संदेश देण्यात आला आहे असे आता मला कळते. देशाशी निष्ठावंत असलेल्या सर्व नागरिकांच्या प्राणाचे आणि संपत्तीचे रक्षण केले जाईल असे पंडित नेहरूंनी आश्वासन दिले असल्याचे मी वृत्तपत्रांमधून वाचले. परंतु ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांकरिता संरक्षणाची फार कमी व्यवस्था आहे वा नाहीच असे महटले तरी चालेल. आमच्याकरिता तर मुळीच नाही. असे करणेही अशक्य आहे.*

या अनावृत पत्रातील अजूनही बराच भाग इथे दिला जाऊ शकतो. धोक्याची जाणीव व्हावी म्हणून आवश्यक तितका भाग मी दिला आहे. शक्य आहे की ही भीती खोटी असावी. परंतु अशा गोष्टींकडे दुर्लक्ष न करणे हाच शहाणपणा आहे. मला आशा आहे की पत्र लिहिणाराच्या भीतीला काहीही कारण नाही. सैन्य आणि पोलिसांची यंत्रणा कितीही कार्यक्षम असली तरी दूरदूर ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांच्या रक्षणाकरिता सरकारजवळ कोणतेच साधन नाही, सध्या तरी नाही या पत्रलेखकाच्या मताशी मी सहमत आहे. संरक्षण आधी आतून यायला पाहिजे म्हणजे ईश्वरावरील अढळ श्रद्धेतून आणि दुसरे म्हणजे आजूबाजूला राहणाऱ्या लोकांच्या सद्भावनेतून. जर या दोन्ही गोष्टी नसतील तर भारताच्या आतिथ्याविरोधी किनाऱ्याला सोडून जाणे हाच उत्तम मार्ग ठरतो. परंतु गोष्टी अशा थराला आलेल्या नाहीत.

आपणा सर्वांचे कर्तव्य आहे की भारताचे प्रामाणिक सेवक बनून भारतात राहू इच्छिणाऱ्या इंग्रजांकडे विशेष लक्ष देणे आपले कर्तव्य आहे. त्यांचा कोणत्याही  प्रकारे अपमान व्हायला नको. त्यांच्याकडे किंचितही दुर्लक्ष व्हायला नको. स्वतंत्र आणि स्वाभिमानी राष्ट्र म्हणून आपल्याला आपले नाव टिकवायचे असेल तर वृत्तपत्रांनी आणि सार्वजनिक संस्थांनीही इतर गोष्टींप्रमाणेच या

बाबतीत काळजी घेतली पाहिजे. आपण जर आपल्या शेजाऱ्यांचा मान ठेवू शकणार नाही, मग ते कितीही अल्पसंख्य असो, तर आपलाही सन्मान कायम राहू शकणार नाही.

हरिजन, नोव्हेंबर २, १९४७

# १४८. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर २१, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २१, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आजसुद्धा एक प्रकरण माझ्या कानावर आले. यात मुसलमानाचा खून करण्यात आलेला नाही तर खून झालेला माणूस बहुधा हिंदू होता आणि तो सरकारी नोकरीत होता. त्याला जिथे पाठवण्यात आले होते तिथे तो आपले काम करत होता. तिथे कोणी असेल की ज्याच्या हातात बंदूक होती आणि त्याने बंदुकीने त्याला मारून टाकले. त्याने काही गुन्हा केला असे काही माझ्या ऐकिवात नाही. बस त्याच्या मनात आले की आपण म्हणतो तसे हा माणूस करत नाही आणि म्हणून त्याला मारून टाकले. मला यातून इतकेच सांगायचे आहे की ही जी आम्हाला सवय झाली आहे, आणि आता तर स्वातंत्र्याची केवळ सुरुवात आहे, आणि स्वातंत्र्य मिळताच आमच्या मनात आले की आमच्याजवळ बंदूक आहे म्हणून त्याला मारून टाका. एखादा माणूस उडत्या पक्ष्याला मारून टाकतो, त्याचा वेध घेतो. उडत्या पक्ष्याचा वेध घेणारा तो मोठा शिकारी होतो. असेच एक गृहस्थ आहेत. ते अमलदार आहेत. त्यांचाही तो वेध घेतो. त्याला तर तिथे काम करण्याचा हुकूम देण्यात आला होता. बस मनात आला की मारा तर मारून टाकायचे. अशाने तर भारतातआपली परिस्थिती भयानक होणार आहे. कोणी माणूस आरामात राहू शकणार नाही. असे म्हणतात असे अनेक जंगली भाग आहेत की जिथे कोणीही सुरक्षित राहू शकत नाही. एखाद्याजवळ बंदूक असेल व त्याला खून करायचा असेल तर त्याच्या मनात असा प्रश्न येत नाही की माणसाचा खून कसा करायचा. जो खून करतो तो जिवंत तर करू शकत नाही. हेच सत्य आहे. जो जिवन देऊ शकतो तोच जीव घेऊ शकतो हासुद्धा नियम आहे. परंतु हे केवळ ईश्वर करू शकतो. माणूस जर जीव निर्माण करू शकत नसेल तर त्याला जीव घेण्याचा काय अधिकार? जीव निर्माण करणे माणसाच्या हातात आहे काय? परंतु हिंदूंच्या मनात मुसलमानांची शिकार करणे असते आणि मुसलमानाच्या मनात शिखाची शिकार करणे असते आणि शिखाच्या मनात मुसलमानाची शिकार करणे असते. आज तर ते तसे करतील. पण ज्यांची शिकार करायची ते सर्व निघून गेले की मग आपसात शिकार सुरू होईल. हा जागाचा नियम आहे. आपण त्याच नियमाप्रमाणे वागायला सुरुवात केली आहे. यामुळे ही घटना तुम्हाला सांगावी असा मी विचार केला.

दुसरी गोष्ट ही की अधिकाऱ्यांनी अनेक लोकांना अटक केली आहे. भूतकाळात आपण स्वतंत्र नव्हतो. आजसुद्धा आपण स्वतंत्र नाही असे गृहीत धरले पाहिजे. त्या काळातसुद्धा लोकांना अटक होत असे. फार झाले तर व्हाईसरायकडे अर्ज करा. त्यांनी म्हटले की सोडा तर सुटका. परंतु व्हाईसराय साहेब स्वतः सोडू शकत नव्हते. ते नियमाप्रमाणे काम करायचे. सैनिकी कायदा जरी कायदा असला तरी कायद्याप्रमाणे काम. कायद्याप्रमाणे त्यांचे स्वतःचे अधिकारी असायचे व ते कायद्याप्रमाणे काम करायचे. त्यांनी जर मान्य केले की कोणाला तरी सोडण्यात यावे तर तो सोडला जायचा. इतरांच्या बाबतीत व्हाईसराय म्हणायचे की मी तुला चोकशी केल्यानंतरच सोडू शकतो.ही अगदी परिपूर्ण कायदेशीर भूमिका आहे. ज्यांना कायद्याप्रमाणे अटक झाली आहे ते जर दोषी आढळले तर त्यांना कायद्याप्रमाणे शिक्षा होईल. परंतु आता सरकार आपल्या हातात आहे. अजून आपण सरकार चालवलेले नाही. जर कोणी मंत्री असेल आणि त्याला वाटत असेल की आपण म्हणू त्याची सुटका करू शकतो तर मग आपण संपलोच. असे व्हायला नको की खुनी लोकांना अटक करायची आणि नंतर सोडून द्यायचे. गुन्हेगारांना अटक करून नंतर सोडून देण्याची परंपरा आपल्याला सुरू करायची नाही. अशा परिस्थितीत मी म्हणेन की एकदा एखाद्याला कायद्याप्रमाणे पोलिसांनी अटक केली की नंतर त्याबद्दल काही तक्रार आहे म्हणून वा अटक झालेल्या व्यक्तीने अर्ज केला म्हणूनही सरकारसुद्धा त्या व्यक्तीला सोडू शकत नाही. कोणत्या आधारावर सरकार त्याला सोडू शकेल? आपल्याकडे पोलीस, न्यायलये, वकील विनाकारण आहेत काय? माझा कोणी नातलग वा मित्र आहे म्हणून वा कोणी तरी त्याची शिफारस केली म्हणून मी त्याला कसा सोडू शकतो? तो कसा दोषमुक्त होऊ शकतो? माझ्या मते तो दोषमुक्त होऊ शकत नाही. तो जर गुन्हेगार नसेल तर त्याला शिक्षा होऊच शकत नाही. अशा प्रकारे आपण आपली संपूर्ण न्यायप्रणाली स्वच्छ ठेवली पाहिजे. आपले न्यायाधीश त्या प्रतीचे असले पाहिजे. पोलीस आणि वकील यांनी केवळ खटला चालवायाचा म्हणून चालवू नये आणि अमुक एका संख्येत न्यायालयातून शिक्षा झालीच पाहिजे असा विचार तर त्यांनी मुळीच करू नये. ज्यांना शिक्षा झाली पाहिजे त्यांनाच झाली पाहिजे. परंतु हे सर्व कायद्याचे काम न्यायालयाचे आहे. समजा एका माणसाने तक्रार केली की त्याने माझ्यावर हल्ला केला, त्याला पकडा. पकडले. त्याला सोडवण्याकरिता मी काय प्रमुखाकडे जाऊ? प्रमुख म्हणेल की न्यायालयात जा. तक्रार करणारा नंतर जर म्हणेल की पकडून काय करायचे, आमचे वैर वाढेल. त्याला सोडून द्या. तर न्यायालय त्याला सोडून देईल. वकीलसुद्धा ती गोष्ट कबूल करील. परंतु समजा की खरोखर खून झाल्याचा खटला आहे. अशा परिस्थितीत तक्रारकर्त्याची इच्छा जरीअसली तरी तो सुटू शकत नाही. जर अपराधी माणूस सुटला तर आपले काम पुढे जाऊ शकत नाही. मी वकिली केली आहे आणि अनेकांना सोडवले आहे. कसे? खुनी व्यक्तीने आपण खून केल्याचे कबूल केले

पाहिजे आणि न्यायालयाला आश्वासन दिले पाहिजे की आता माझे मन शुद्ध झाले आहे व त्याने दयेची विनवणी केली पाहिजे. तक्रारकर्तासुद्धा म्हणू शकतो की आता आम्ही मित्र झालो आहो व आरोपीला माफ करण्यात यावे व आरोपीला शिक्षा करण्यात येऊ नये. त्याने रागाच्या भरात खून केला, आता त्याला फासावर लटकवून काय फायदा? आता आरोपी माझा मित्र झाला आहे, त्याची मला मदत होऊ शकते व तो आपले मन ईश्वरभक्तीकडे वळवू शकतो. तो ईश्वराची प्रार्थना करायला सुरुवात करू शकतो आणि तसे असेल तर आपण त्याला तसे करण्यापासून का अडवावे? नंतर आरोपी म्हणेल की मी खून तर केला आहे, अपराध केला आहे, पण या वेळी माफ करा. तक्रार करणाराने मला माफ केले आहे. शक्य आहे की यानंतर मी चांगले काम करीन आणि समाजाची सेवा करीन. यामुळे मला सोडून द्या. खुनी माणसाला सोडवण्याचा हा मार्ग आहे. असे कायदेशीरपणे करता येऊ शकते. परंतु आपल्याला आता मिळालेल्या सत्तेचा आपण दुरुपयोग करू नये. आपण जर असे केले तर लोक किती तरी अपराध्यांना सोडण्याचा आग्रह धरतील. मग तो गरीब बिचारा मंत्री तरी काय करील? कल्पना करा की त्याने चुकीने कोणाच्या तरी सुटकेचा आदेश दिला. त्या व्यक्तीला सोडण्याचा त्याला अधिकार आहे असेही समजा. परंतु तरीही त्याने असे करू नये. त्याच्या भावाने, मित्राने वा पत्नीने जरी अपराध केलेला असेल तरीही त्याने असे करू नये. न्यायालयात अर्ज करा वा वकिलाकडे वा फिर्यादीकडे जा, परंतु याबाबतीत मी काही करू शकत नाही  असे त्याने सांगायला पाहिजे. पवित्र अंतःकरणाचे मंत्री असल्याशिवाय आपण हे काम करू शकत नाही.

मला एक सूचना मिळाली आहे की मी १५ मिनिटांपेक्षा जास्त बोलायला नको. माझी जास्त बोलण्याची इच्छासुद्धा नाही. मी भरपूर बोललो आहे. मला फार लांबलचक बोलण्याची हौससुद्धा नाही. जेव्हा बोलण्याची गरज असते तेव्हाच मी बोलतो. परंतु मला सांगण्यात आले आहे की मी जर पंधरा मिनिटापेक्षा जास्त बोललो नाही तर लोकांचा जास्त फायदा होईल. लोक माझे बोलणे जास्त काळजीपूर्वक ऐकतील कारण माझे शब्द ऐकण्याकरिता ते उत्सुक असतील. मग तशी सवय पडेल आणि मी १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ बोलणार नाही.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४४४-७

# १४९. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर २२, १९४७

नवी दिल्ली,
ऑक्टोबर २२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

सर्वात आधी मी तुम्हाला सांगू इच्छितो की कांबळी येणे सूरूच आहे. नुकताच मला कळले की आज दोनशे कांबळी आली. कांबळी आणि पैसेसुद्धा दररोज येत आहेत. मला आशा आहे की इथे शिबिरात असलेल्या लोकांकरिता पांघरुणांची अडचण जाणार नाही. अजूनही कांबळी उपलब्ध होतील. आपल्या लोकांत इतका उदारपणा कायम आहे ही चांगली गोष्ट आहे.

एक सद्गृहस्थ माझ्याकडे आले. मी उर्दू वृत्तपत्र क्वचितच वाचत असतो, मग दररोज वाचण्याची गोष्ट तर दूरच. मी उर्दू वाचू शकतो परंतु मला तसे करणे कठीण जाते. मूल जेव्हा अक्षर वाचणे शिकते तेव्हा ते ते हळूहळू अक्षर वाचते. मी त्याच अवस्थेत आहे. मुलापेक्षा थोडे जास्त येते परंतु वेगात वाचायचे असेल तर वाचू शकत नाही. तर त्या सद्गृहस्थांनी एका उर्दू वृत्तपत्रात ज्या गोष्टी आल्या होत्या त्या वाचून दाखवल्या. ते ऐकले आणि मला दु:ख झाले. सर्व गोष्टी तर मी इथे सांगत बसू शकत नाही. त्यात लिहिले आहे की आता आम्ही ठरवले आहे की - ते जे वृत्तपत्रवाले आहेत, संपादक साहेब आहेत त्यांनी ठरवले असेल परंतु आशा आहे की संपूर्ण भारताने ठरवले नसेल - सर्व मुसलमानांनी पाकिस्तानमध्ये निघून जावे आणि जे मागे राहतील त्यांची एक तर कत्तल होईल वा त्यांना पाकिस्तानमध्ये पाठवून देण्यात येईल. या वृत्तपत्राने वा संपादक साहेबांनी जे लिहिले आहे ते खरे असेल तर ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे. संपादकाच्या लेखणीतून अशी गोष्ट बाहर पडायलाच नको. अशी वर्तमानपत्रे तर निघायलाच नको. त्यांचे जर खरोखर असे मत असेल तर ते ते लोकांना सांगू शकतात. परंतु जर ते असे डंक्याच्या चोटीवर म्हणत असतील तर मुसलमानांनी एक तर पाकिस्तानमध्ये गेले पाहिजे वा त्या सगळ्यांची कत्तल केली जाईल. मी काल सांगितल्याप्रमाणे ते जर पाकिस्तानमध्ये निघून गेले तर नंतर काय कराल? आपसात भांडाल? अेका सज्जन गृहस्थांनी तर मला सांगून टाकले की आपसात लढाई सुरूसुद्धा झाली आहे. ही आपसातील लढाई तर होणारच होती. एकदा का रक्ताची चट लागली की मग ती सुटणे कठीण जात असते. आपलीसुद्धा अशीच परिस्थिती होणार आहे. परंतु वर्तमानपत्रवाले गृहस्थ असे म्हणाले आणि त्यांनी असे छापले हे ठीक आहे, परंतु आपलेही लोक तर अशा वृत्तपत्रांमागे वेडी झाली आहेत. गीता सोडा, बायबल सोडा, कुराण शरीफ सोडा आणि ही वृत्तपत्रेच आमची गीता झाले आहेत. त्यात जे येते त्याला आम्ही

ब्रह्मवाक्य समजतो. लोक अशा प्रकारे वेडे झाले आहेत आणि वर्तमानपत्रे त्याचा फायदा घेऊन असे छापत असतील तर ती वाईट गोष्ट आहे. याबद्दल माझी अधिक बोलण्याची इच्छा नाही.

दुसरी गोष्ट ही आहे की प्रत्येक ठिकाणावरून तक्रारी येत आहेत. हे ठीक आहे की इंग्रजांच्या काळात जी देशी संस्थाने होती ती आपल्या मनाप्रमाणे वागत होती. ब्रिटिश सरकार थोडासा लगाम तर ठेवायचे. त्यांना लगाम ठेवणे भाग होते कारण त्यांना सरकार चालवायचे होते. आज ते सरकार निघून गेले आहे. हं, पण सरदार पटेल आहेत, त्यांच्याजवळ फार मोठे खाते आहे. यामुळे त्यांनी तरी काही करावे. परंतु या परिस्थितीत गरीब बिचारे सरदार तरी काय करू शकतात? त्यांची तर स्वतःची भाषा आहे, हिंदुस्तानची सेवा केली आहे, म्हणूनच ते सरदार झाले आहेत. परंतु त्यांच्याजवळ तलवार नाही, बंदूक नाही, लष्कर नाही. ते सैन्याचे माणूसही नाहीत. ते सेनापतीही नाहीत की ज्यांच्या आदेशाचे आपोआप पालन होते. आपण यांचे मीठ खातो व ते आपले मालक आहेत असे जोपर्यंत सैनिक समजतात म्हणजेच त्यांना ते जनतेचे महान सेवक समजतात तोपर्यंत सर्व काही ठाकठीक असेल.

आता संस्थानिकांचे म्हणणे आहे की आम्ही सामिलीकरणावर सही तर केली, परंतु त्यामुळे काय होते? यामुळे आमचे काही हिसकावून तर घेण्यात आलेले नाही. आमच्याजवळही शिपाई आहेत. जेव्हा इंग्रजांचे सरकार होते तेव्हा ते खेळण्यासारखे होते. परंतु आता ते तसे थोडेच आहे? देशातील संस्थानिकांना जे करायचे असेल ते ते करू शकतात. मी स्वतःही तर देशी संस्थानिक आहे. यामुळे मला माहीत आहे की ते काय करू शकतात, किती भले करू शकतात. देशी संस्थानिकांना मी अतिशय आदरपूर्वक सांगेन की तुम्ही जर इतके अहंकारी असाल की ही जी इतकी प्रजा आहे तिला तुम्ही मारून टाकू शकता, कापून टाकू शकता तर तुम्ही राहू शकणार नाही. मी तर सांगितले आहे की जे राजे लोक आहेत ते जर जनतेचे विश्वस्त झाले तरच त्यांना स्थान आहे. ते जर जनतेचे मालक बनू पाहतील, तिचे शोषण करू पाहतील, तिला दाबून ठेवू पाहतील तर त्यांचे कोणतेही स्थान असू शकत नाही. याबद्दल मला शंका नाही. भारतात कोणती परिस्थिती असेल ते तर देवालाच माहीत. संस्थानिक आहेत खरे परंतु त्यांच्याजवळ कोणताही पर्याय नाही. ते कधीही भारताचे राज्य चालवू शकणार नाहीत. त्यानंतर आपण गुलाम जरी झालो तरी होऊ. तर काय हे संस्थानिकही गुलाम होतील? तो काळ गेला. ते एक युग होते. इंग्रजांचे शासन होते. त्यांनी विचार केला की इथे राजे लोक आहेत. बरे आहे, असू द्या. त्यांच्याद्वारेच राज्य करू. असे तर त्यांनी आपल्या स्वार्थामुळेच केले. मग यात त्यांना काय दोष द्यायचा? परंतु आज आपण इतके दुर्दैवी झालो आहो की आम्ही दोघेही वेड लागल्यासारखे आपसात भांडत आहो, त्यातून आपल्यापेकी कोणी एक जिंकेल वा दुसरी अथवा

तिसरी शक्ती अथवा दोन चार सत्ता मिळून भारताला खाऊन टाकतील. तर त्याबरोबर ते या संस्थानिकांनाही खाऊन टाकतील. जर ते भारताशी प्रामाणिक राहतील व जनतेचे सेवक बनून राहतील तर ठीक आहे. मी तर प्रजेलाही म्हणेन की त्यांनी भित्रेपणा का करावा? राजांजवळ शस्त्र आहेत आणि प्रजा निःशस्त्र आहे म्हणून काय झाले? आपणही साम्राज्याशी लढत होतो, आपणही निःशस्त्र होतो. आपण काही लपवून शस्त्र ठेवले होते अशी गोष्ट नव्हती. जर असे असते तर मला तरी याची काही तरी माहिती असती. परंतु असे नव्हते. करोडो लोकांनी त्यांचा अंतःकरणाच्या बळावर सामना केला. आपण विचार केला की मारतील, एक लाख मारतील, दोन लाख मारतील, कदाचित तीन लाखही मारतील. परंतु अखेरीस ते किती लोकांना मारणार होते? ४० कोटी लोकांचा तो प्रश्न होता. आपणा सर्वांना कापता कापता त्यांच्या हाताचा थरकाप उडाला असता. अशाच प्रकारे ही जी जनता आहे तिला स्वातंत्र्य तर मिळायलाच पाहिजे होते आणि ते मिळालेही. त्या स्वातंत्र्याचे आम्ही काय करतो ही वेगळी गोष्ट आहे. मी तर म्हणेन की राजे लोकांनी वेड्याप्रमाणे वागू नये. आपण स्वेच्छाचारी होऊ शकत नाही, व्यभिचारी होऊ शकत नाही हे त्यांनी समजून घ्यायला पाहिजे. दारू पिऊन ते दिवसभर पडून राहतील असे होऊ शकत नाही. हे तर मी तुम्हाला आणि तुमच्याद्वारे राजे लोकांना सांगितले.

एकदा मी तुम्हाला सांगितले होते की आता दसरा येत आहे आणि त्यानंतर लगेच एक दिवसानंतर बकरी ईद येत आहे. या दिवसांत हिंदू आणि मुसलमान हे दोघेही घाबरलेले असतात. आज तर ते अजूनच भयभीत आहेत कारण अत्याचार एका बाजूनेच होऊ शकतो. जर हिंंदूंना वेड लागले आणि ते म्हणू लागले की बकरी ईद आहे तर मुसलमानांना कापा. आपला दसराही झाला आहे. दसरा काय आहे? रामाचा विजय साजरा करण्याकरताच दसरा आहे. त्यानंतर एकादशी आहे. त्या दिवशी तर रामभरत मिलाप आहे. त्यावरून तर आपण संयम शिकायला पाहिजे, माणुसकी शिकायला पाहिजे. धर्म काय आहे ते शिकायला पाहिजे. जर आपण हे शिकलो तर आपण खऱ्या अर्थाने दसरा साजरा करू. दसऱ्याच्याच दिवशी दुर्गापूजाही होते. दुर्गाचा अर्थ हा आहे की ती एक मोठी शक्ती आहे व तिची उपासना करून आपण उंचावर जाऊ शकतो. याचबरोबर दसऱ्याचा अर्थ असा काही नाही आपण दिवसभर राग, रंग, रूप यांच्यातच मग्न असावे. याला गुजरातमध्ये नवरात्र म्हणतात. आम्ही लहान होतो तेव्हा आई सांगायची की नवरात्रीत जेवण करू नये. जर खायचेच असेल तर फळ खा, जमलेच नाही तर दूध प्या. जर खरोखर पूर्ण उपवास करू शकलात तर फारच चांगले. माझी आई तर खूप उपवास करणारी होती. तिची मी बरोबरी करू शकत नाही. माझे मोठे भाऊ तर मुळीच बरोबरी करू शकत नव्हते. मी थोडीशी बरोबरी करू शकत असे परंतु तिच्यात उपवास करण्याची जी शक्ती होती त्यासमोर मी एखाद्या खेळण्याप्रमाणे आहे, मुलाप्रमाणे आहे. अशा

प्रकारे आपण दसरा साजरा करत असतो. आमच्याकरिता दसऱ्याचे महत्त्व हे असे होते. हं त्यानंतर जी दिवाळी येते तिच्यात आपण थोडी मौजमजा करू शकतो, परंतु दसऱ्याला मुळीच नाही. नवरात्रीची हा जो अर्थ आहे तो सोडून काय आपण कापाकापी करणार आहो? दसऱ्यानंतर बकरी ईद आहे. जे मुसलमान बांधव आहेत त्यांना आपण घाबरवले आहे. त्यांच्यांत आमचे चांगले बांधव आहेत. जे राष्ट्रवादी मुसलमान आहेत तेही आज त्रस्त आहेत. तेही पळत आहेत, परंतु कुठे जातील? आम्ही इतके निर्दय झालो आहो की आम्ही त्यांनाही हाकलण्याच्या मागे लागलो आहो. मग शांतता कशी असेल? शांतता असू तरी कशी शकते?

तुम्ही चार वा साडेतीन कोटी मुसलमानांना मारू शकाल काय, पळवून लावू शकाल काय वा हिंदू बनवू शकाल काय? अरे असे करणेसुद्धा नाश करणेच आहे. तुमच्यावरही अशी जबरदस्ती झाली तर काय तुम्ही सर्व मुसलमान व्हाल? तुम्हाला सांगण्यात आले की कलमा वाचा आणि नाही वाचला तर तुम्हाला मारून टाकू तर तुम्ही कलमा वाचाल? मी तर पहिला असा माणूस असेन की जो म्हणेल की आधी तुम्ही आम्हा सर्वांचे गळे कापा आणि नंतर बोला. इतकी तर आपल्यामध्ये हिंमत असली पाहिजे. अशा प्रकारे मुसलमानांना हिंदू होण्याकरिता सांगणे चांगली गोष्ट नाही. मला तरी असा हिंदू नको. अशा हिंदूंनी काय मी हिंदू धर्म वाचवू शकतो? मला तर असा हिंदू पाहिजे की जो संयमाने राहील. मी असा उद्धट आणि निर्दय का होऊ? उद्धट आणि निर्दय होणे आणि धर्माचे पालन करणे या दोन्ही गोष्टी एका वेळी होऊच शकत नाहीत. तर हे जे दोन दिवस आहेत त्यांत आम्ही घाबरायला नको. शात राहायचे. आणि आमच्याकडून जो अपराध झाला आहे त्याचे प्रायश्चित्त घेतले पाहिजे वा पश्चात्ताप केला पाहिजे व भाऊभाऊ म्हणून परस्परांना भेटायला पाहिजे. जर तुम्ही इतके करू शकला तर ईदनंतर तुम्हाला मी इथे दिसणार नाही.

मी पंजाबमध्ये जाणार आहे काय असे एका हिंदू सद्गृहस्थांनी मला विचारले. मी त्यांना विचारले तुम्हाला मला पंजाबला पाठवायचे आहे काय? मी म्हणालो हो, गेलो तर त्यांच्याशीही भांडेन. माझे भांडण कसे असते हे तर तुम्हाला माहीतच आहे. त्यांच्याशी पोट भरून गोष्टी करेन. तिथून जे लाखो लोक येत आहेत, हिंदू आणि शीख, ते आपल्या जागेवर का बसू शकत नाहीत? जोपर्यंत असे होणार नाही तोपर्यंत मी शांततेत बसू शकणार नाही. त्यानंतर मुसलमानांना आणायचे आहे. मग तुम्ही म्हणाल की असे तर होऊ शकणार नाही. मी म्हणेन की तसे होऊ शकते परंतु त्याची किल्ली दिल्लीत पडलेली आहे. हे जे दोन दिवस येणार आहेत त्यात आपण दाखवून दिले पाहिजे की हिंदू आणि मुसलमान सज्जन लोक आहेत आणि दोघेही एकोप्याने राहणार आहेत.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४४७-५२

# १५०. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर २३, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

दोन बंधू लिहितात "आम्ही निर्वासित आहो. आमच्या मित्राच्या संरक्षणाखाली आम्ही राहत आहो. थंडीमुळे आम्ही फार दुःखी आहो. कांबळी आणि दुलया कुठून मिळू शकतील ते कृपाकरून आम्हाला कळवा. अशा निर्वासितांकरिता काही तरतूद आहे काय?" ते रावळपिंडीचे असल्याचे त्यांनी लिहिले आहे. आता अशा प्रकारचे तर बरेच लोक असतील. ज्या दुलया आणि कांबळी गोळा केली जात आहेत त्या शिबिरातील लोकांकरिता आहेत आणि त्यांच्याजवळ पांघरुणाकरिता काहीही नाही हे स्पष्ट आहे. त्यांच्याकरिताच ही व्यवस्था होत आहे. बरीचशी वाटली गेली आहेत आणि अजून वाटली जातील. हजारोंच्या संख्येत लोक पडलेले आहेत. काही थोडे असते तर गोष्ट वेगळी होती. शक्य आहे की असे लाखो लोकसुद्धा असतील की ज्यांना या गोष्टी मिळाल्या पाहिजे. कुरुक्षेत्र येथील एका शिबिराची व्यवस्था केंद्र सरकारने आपल्या हाती घेतली आहे. तिथे मोठ्या संख्येत लोक पडलेले आहेत आणि अनेक येण्याची शक्यता आहे.

दिल्ली शहरातसुद्धा अशा अनेक छावण्या आहेत. कमीतकमी तीन आणि कदाचित चार छावण्या पूर्व पंजाबमध्ये आहेत. येथील छावण्यांमध्ये ज्या गोष्टी पुरवण्यात येतात त्या तेथील छावण्यांमध्येसुद्धा पुरवल्या गेल्या पाहिजे. तेसुद्धा तर निर्वासितच आहेत. परंतु जे निर्वासित मित्रांच्या घरी राहतात त्यांना काही पांघरूण देणे मित्रांचे काम असते असे मला वाटते. परंतु शक्य आहे की जे लोक निर्वासितांना आपल्या घरी ठेवतात ते स्वतःकरितासुद्धा दुलई, कांबळे यांची व्यवस्था मोठ्या मुश्किलीने करू शकत असतील तर मग ज्यांना ते आश्रय देतात त्यांची व्यवस्था कुठून करतील? असे अशक्य आहे असे मला म्हणायचे नाही. परंतु मला असे वाटते की ज्या कोणाला दुलईची आवश्यकता आहे त्या सर्वांना दुलया पुरवण्यात येतील. याशिवाय जे लोक या गोष्टींची मागणी करतात ते सर्व प्रामाणिकच असतात असे नाही. लोकांना गरज असते म्हणून ते या गोष्टी मागतात असे नाही. मी अनेक शिबीर पाहिले आहेत. अशा प्रकारची कामे मी नेहमीच करत आलो आहे. मी दक्षिण आफ्रिकेत होतो तेव्हापासून मी हे काम करत आलो आहे. त्यामुळे अशा कामातील अडचणी मला माहीत आहेत. मला ज्या दोघांनी लिहिले त्यांच्याविरुद्ध मी कोणतीही तक्रार ऐकलेली नाही.

परंतु या गोष्टींची ज्यांना खरोखर गरज आहे त्यांच्यापर्यंत या गोष्टी पोहोचल्या पाहिजे यात काही संशय नाही. परंतु या लोकांबद्दल मला माहिती कशी असेल? मी ती शोधून काढण्याचा प्रयत्न करत असतो. असे काही नाही की माहिती काढण्याचा मी मुळीच प्रयत्न करत नाही. आणि मला कोणीच फसवणार नाही असेही मी गृहीत धरत नाही. यामुळे जो मागेल त्याने कांबळी घ्यावी असेही नाही. हे बंधू असे काही उदाहरण दाखवू शकतील काय? मी तर पाठवू शकत नाही, परंतु मला वाटते की त्यांना कुठून तरी मिळून जातील. माझ्याजवळ कांबळी आहेत खरे. नाहीत अशी गोष्ट नाही. परंतु ही सर्व कांबळी कुरुक्षेत्राला पाठवण्याकरिता आहेत. इतर लोकही तर गोळा करत आहेत ते या लोकांना पाठवू शकतात.

इथे रोज लोक येत आहेत. ते बिर्ला मंदिरात जातात आणि ती जागाही भरली आहे. यामुळे अजून जास्त लोकांकरिता जागा नाही. देवळातील लोकांनी शक्य तितक्या लोकांना सामावून घेतले आहे. ते इतरांच्या दुःखात नेहमीच सहभागी झाले आहेत. ते दिवसरात्र काम करत आहेत. ते लोकांना भेटायला जातात आणि त्यांच्याकरिता कांबळी व अन्नधान्य गोळा करतात व गरजवंतांना ते वाटतात. परंतु दिवसेनुदिवस माणसांचा प्रवाह येत असल्यामुळे तेही थकले आहेत. किती दिवस त्यांना ते अशा प्रकारे देत राहणार आहेत? हीच समस्या आपल्याकरिताही आहे. मी या लोकांना म्हणेन की त्यांनी स्वतःकरिता काही तरी केले पाहिजे. हे खरे आहे की जेव्हा या गोष्टी प्रत्येकाकरिता केल्या जात आहेत तेव्हा त्यांच्याकरिताही केल्या गेल्या पाहिजे. सर्वांसाठी एकच नियम असला पाहिजे. एका माणसाकरिता एक नियम असेल आणि दुसऱ्याकरिता वेगळा तर आपण मोठ्या प्रमाणात काम करू शकत नाही. यामुळेच सर्व गोष्टी समजावून सांगण्याकरिता मी इतका वेळ घेतला. दररोज वाढत चाललेल्या या थंडीला आपण कसे तोंड देणार? एक दिवससुद्धा कोणालाही या थंडीचा त्रास व्हावा अशी माझी इच्छा नाही. तर ही एक गोष्ट मी तुम्हाला सांगितली.

आज मी अजून एक गोष्ट ऐकली. आज अनेक दुकाने उघडी असल्यामुळे एका गरीब मुसलमानाच्या मनात आले की आपणही आपले दुकान उघडावे. आज तो आपले दुकान उघडण्याकरिता निघून गेला होता. तो चष्म्याचे काम करायचा. असा माणूस मुश्किलीने दिवसाला दोनचार रुपये कमावत असेल. मला माहीत नाही तो कोण होता. त्याचे नावही मला माहीत नाही. तो दुकान उघडण्याकरिता जात होता तेव्हा त्याला कापून टाकले. ही संपूर्ण दिल्लीकरिता लाजिरवाणी गोष्ट आहे. कोणी तरी कापले असेल. एकाने वा दोघांनी. परंतु दोन माणसे कशी? तेव्हा रात्रही नव्हती. दुकान तर लपूनछपून उघडले जाऊ शकत नाही. सर्व माणसे येतजात असतात. यातून कोणीही अडवण्याचासुद्धा प्रयत्न केला नाही. त्यांच्या कापण्याचे धैर्य कुठून आले? लोक अशा गोष्टीत

बेफिकीर असतात. म्हणतात एका मुसलमानाला कापले आहे ना, बरे झाले. ते जर हिंदूंना मारतात, शिखांना मारतात तर आपणही त्यांना मारावे. बदला घेण्याचा असा विचार मनात निर्माण होतो. याला अडवले पाहिजे. जर अडवले नाही तर दिल्ली आपले चारित्र्य गमावेल. दिल्लीत केवळ हिंदू आणि शिखांनी राहावे असे तुम्हाला वाटते काय? असे असेल तर दिल्ली नष्ट होईल. जग तिला सहन करणार नाही. दिल्लीच्यामागे एक फार मोठा इतिहास पडलेला आहे. तो इतिहास पुसून टाकण्याचा प्रयत्न केला तर तो वेडेपणा होईल.

आज मला तुम्हाला महारोगाने पीडीत लोकांविषयी सांगायचे आहे. भारतातही असे अनेक लोक आहेत. ते रस्त्यात दिसत नाही कारण त्यांना पाहिल्याने घृणा निर्माण होते. ज्यांना महारोग आहे ते रोगी पापी आहेत आणि इतर पापी नाहीत असे नाही. हे ठीक आहे की ज्याला रोग आहे त्याने काही ना काही चूक तर केलीच असावी. मला जेव्हा खोकला झाला तेव्हा मी समजत होतो की मी काही ना काही चूक केलीच असावी. चूक म्हणजे पाप असेच मी समजतो. खोकला प्रत्येकालाच होत असतो, तो होण्यात काही दोष नाही असे समजणारातील मी नाही. तर माझ्यासाठी जो नियम मी मानतो तो  सर्व जगाकरिताही असतो. महारोग हा कातडीचा रोग आहे. तो कसा होतो याबद्दल अनेक कथा आहेत. माझी तर मान्यता आहे की हा शरीराचा रोग आहे आणि या रोगात व खोकल्यात काहीही अंतर नाही. ज्याला महारोग होतो त्याला जास्त त्रास होतो. त्याची बोटे चालली जातात, नाक चालले जाते, हात चालले जातात. असा माणूस विद्रूप होतो. परंतु तो विद्रूप आहे म्हणून त्याला जास्त वेदना आहेत अशी गोष्ट नाही. मी तर म्हणेन की ज्याचे मन मलीन आहे त्याच्याबद्दल जास्त घृणा वाटायला पाहिजे. ज्याचे शरीर मलीन आहे, कारण तेसुद्धा मन मलीन असल्यामुळेच होते, आणि त्याचबरोबर ज्याची दृष्टी वाईट असते, जो ईश्वराचे भजन न ऐकता जगातील दुष्ट लोकांच्या इतिहासात रस घेतो तो खरा महारोगी आहे. असा आजार असलेले तर अनेक पडलेले आहेत कारण आपण सर्व असे आहो आणि याची कोणीही पर्वा करत नाही. परंतु प्रत्येकाला महारोग होत नसल्यामुळे ज्यांना महारोग आहे त्यांचा आपल्याला तिरस्कार वाटतो. आपल्यामध्ये अनेक ख्रिश्चन होते. भारतात जितकी महारोग्यांची रुग्णालये आहेत तितकी त्यांची होती आणि आजही आहेत. ते लोक परोपकाराच्या भावनेने त्यांची सेवा करतात. आज भारतातही असे लोक झाले आहेत की जे परोपकाराच्या दृष्टीने त्यांचे काम करत आहेत. एक परोपकारी पुरुष, मी तर त्यांना महात्माच म्हणेन मनोहर दिवाण आहेत. ते वर्धेत राहतात आणि विनोबा भावेंचे ते मोठे शिष्य आहेत. विनोबाजी तर फार मोठे माणूस आहेत. तर मनोहरच्या मनात आले की चला काही ना काही करू या. तर त्यांनी महारोग्यांची सेवा करण्याचे काम पसंत केले. विनोबांनीसुद्धा त्यांना तसे करण्याकरिता प्रेरीत केले होते. ते अनासक्त आहेत. पैशाची त्यांना चिंता नाही. ते डॉक्टर नाहीत. परंतु त्यांनी या रोगाचा भरपूर

अभ्यास केला आहे. अनेक लोक त्यांची मदत घेतात. आता वर्धेत एका समितीतर्फे लहान प्रमाणात एक परिषद होणार आहे. जे लोक या कामात लागलेले आहेत ते तिथे भेटतील. डॉ. सुशिला नाय्यरसुद्धा त्याच कामाकरिता जाणार आहेत.खरे म्हणजे डॉ. जिवराज (डॉ. जिवराज मेहता, महानिदेशक, आरोग्य सेवा, भारत सरकार) आणि राजकुमारी त्या कामाकरिता जाणार होत्या. राजकुमारीला तर या कामाची जास्त माहिती आहे कारण त्या माझ्याबरोबर सेवाग्रामला राहिलेल्या आहेत. परंतु इथल्या कामात त्या अतिशय जास्त गुंतलेल्या असल्यामुळे जाऊ शकत नाहीत. त्यांनी तिथे जावे म्हणून कोणीही बळजबरी तर करता येऊ शकत नाही. आणि आग्रह करणार कोण? सेवेचे काम आहे, ज्याला जायचे असेल तो जाईल. परंतु त्यांना सवड नाही म्हणून त्या जाणार नाहीत. एक अजून बंधू आहेत. त्यांचे नाव जगदीशन (टी. एन. जगदीशन, कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टतर्फे महारोग्यांच्या सेवाकार्याचे काम पाहत होते.) आहे.त्यांना स्वतःलाही महारोग झाला आहे. ते मद्रासचे आहेत. ते फार चांगले माणूस आहेत आणि विद्वान आहेत. ते श्रीनिवास शास्त्री यांचे भक्त आहेत. त्यांनी स्वतःला या कामाला वाहून घेतले आहे. इतर अनेक लोकांबरोबर ते या परिषदेला उपस्थित राहणार आहेत. ही करुण कथा आहे आणि लक्ष वेधून घेणारीही आहे. अनेक लोक या कामात गुंतलेले आहेत. कलकत्त्यात फार मोठे महारोग्यांचे रुग्णालय आहे. ते मोठ्या प्रमाणावर काम करते. हे सर्व काम परोपकाराच्या भावनेने करण्यात येते आणि ते दिवसेंदिवस वाढत आहे. मी जेव्हा कलकत्त्यात होतो तेव्हा मला तिथे नेले होते आणि मी काही तरी लिहावे अशी विनंतीही मला करण्यात आली होती. परंतु मी इथे येण्याची तयारी करत होतो. देशाच्या वेगवेगळ्या भागात अनेक महारोगी रुग्णालये आहेत. परंतु जितक्या मोठ्या प्रमाणात हे काम केले जायला पाहिजे तितक्या प्रमाणात केले जात नाही. मला असे म्हणायचे नाही की प्रत्येकाने याच कामात रस घेतला पाहिजे. परंतु आपल्याला जेव्हा सवडीचा मोकळा वेळ असतो तेव्हा आपण अशा प्रकारच्या कामात रस घेऊ शकतो हे आपल्याला माहीत असायला पाहिजे. आपण केवळ एकमेकांचा नाश करण्यातच गुंतलेलो असलो पाहिजे काय? मी तर म्हणेन की हा सर्वात वाईट रोग आहे, सर्वात वाईट प्रकारचा महारोग आहे. आपण चांगल्या कामाकडे दुर्लक्ष करतो आणि आपसात भांडून आपला स्वतःचा नाश करून घेतो. हिंदू मुसलमानांना मारतात आणि मुसलमान हिंदू आणि शिखांना मारतात. आपण किती काळ परस्परांना मारत राहणार आहो? आपल्याजवळ जो वेळ आहे त्याचा सदुपयोग करायचा व ज्यामुळे प्रेमभाव निर्माण होईल अशा कामात तो लावला तर चांगले होणार नाही काय!

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, ४५२-५६

# १५१. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर २४, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

इथे जी श्रमपरिषद भरणार आहे तिच्यात आशियातील अनेक देशाचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत ही बातमी बहुधा ४-५ दिवसांपूर्वी वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झाली होती. ही परिषद या महिन्याच्या सत्तावीस तारखेला भरणार आहे. मी त्या परिषदेचे उद्घाटन करणार आहे असेही वृत्तपत्रांनी सांगितले आहे. मला याबद्दल काहीही माहिती नाही. तसेच मी तिचा कोणाजवळ उल्लेख केल्याचेही मला आठवत नाही. तुम्हाला हे कसे कळले असे मी एका वार्ताहराला विचारले. हे वृत्त बरोबर नसल्याचे प्रकाशित करण्याकरिता मी त्याला सांगितले. आपले मजूर मंत्री श्री जगजिवन राम मला भेटायला आले होते. मी त्यांना हेच सांगितले. ते म्हणाले की तुम्हाला तर परिषदेला उपस्थित राहावेच लागेल. त्या दिवशी सोमवार आहे आणि तुम्ही दिल्लीतच असल्यामुळे विचारण्याची काही गरज नव्हती. आपली वृत्तपत्रे अशी आहेत. मी जवाहरलालजींनाही सांगितले की मी कदाचित चुकून हो म्हणालो असेन. तर त्यांनाही आश्चर्य वाटले. मला तिथे जाण्याची काही आवश्यक्ता नाही कारण मी कोणत्याही कामाचा माणूस तर राहिलो नाही. आज माझे एकच काम आहे आणि तेच किती तरी जास्त आहे. त्या कामात मी यशस्वी झालो तर माझे जिवनभराचे काम पूर्ण होईल. आपण सर्व एका देशाचे आहो आणि सर्वांनी एक होऊन राहिले पाहिजे. इथे जे हिंदू, मुसलमान, शीख, पारसी, ख्रिश्चन वगैरे आहेत ते सर्व एक होऊन राहिले तर मला इतर कशाचीही फिकीर नाही. ते सर्व भारताचे आहेत, त्यांना इथेच राहायचे आहे मग त्यांनी का भांडावे?

जो माणूस बालपणापासून हे स्वप्न पाहत आला आहे त्याच्याकरिता हा फार मोठा आघात आहे. त्याने स्वातंत्र्याकरिता मेहनत केली आणि स्वातंत्र्य मिळालेसुद्धा. परंतु त्याबरोबरच हे विष पसरले. हे मला चांगले वाटत नाही. याहून अधिक वाईट काय असू शकते? मला ही वाईट गोष्ट थांबवायची आहे. प्रयत्न करणे माझे काम आहे. तसे व्हायचे असेल तर होईल, नाही तर नाही होणार. भजनात आहे "कोणी निंदा, कोणी वंदा" (आश्रम भजनावली, भजन क्रमांक १५९, पाहा मुद्रित खंड ४४, पृष्ठ ४४२) सर्व एक आहे. कारण मला तर केवळ रामाचे भजन करायचे आहे आणि त्याला मी

सर्व काही अर्पण केले आहे. परंतु प्रयत्न तर करावेच लागतील. त्यातच सर्व जीवन व्यतीत करायचे आहे.

नेहमीप्रमाणे आजसुद्धा कांबळी येणे सुरू आहे. ज्यांना ते पाठवायला पाहिजे त्यांना ते पाठवण्यात येत आहेत. फार मोठी गरज आहे. किती तरी कांबळी हवी आहेत. आपण सर्वांचे समाधान करू शकत नाही. देव सगळ्यांना पोहोचवील. जे निराधार आहेत आणि करोडपतीचे भिकारी झाले आहेत त्यांना निर्वस्त्र उपाशीतापाशी राहावे लागेल आणि भिकारी व्हावे लागेल? आपण जर खरे असू तर ईश्वर आपल्याला खायला देईल आणि नालायक झालो तर नागडेउघडे आणि उपाशीतापाशी राहावे लागेल.

काल मी कुष्टरोगाला बळी पडलेल्या लोकांचा उल्लेख केला होता. त्या संदर्भात मी जगदीशनचा उल्लेख केला होता. ते महान विद्वान आहेत. त्यांना हा रोग झाला होता. त्यांचा हा रोग पूर्णपणे दुरुस्त झालेला नसला तरी तो बराच नियंत्रणात आहे. ते कुष्टरोग्यांमध्ये बरेच काम करतात व त्यात बराच रस घेतात. ते त्यांच्यात मोकळेपणाने मिसळतात. ते अर्थातत कठोर परिश्रम करणारे गृहस्थ आहेत. ते मद्रासला राहतात, वर्धेला नाही. परंतु गेल्या अनेक दिवसांपासून ते तिथे आहेत. या विषयावर त्यांनी माझ्याशी पत्रव्यवहार केला आहे. काही दिवसांपूर्वी मला त्यांचे पत्र मिळाले होते परंतु मी ते आजच वाचले. त्यात मला एक सूचना आढळली जी तुम्हाला स्पष्ट करून सांगण्याची माझी इच्छा आहे. त्यांचे म्हणणे आहे की महारोग्यांना महारोगी म्हणू नये. लोक त्याचा वाईट अर्थ घेतात आणि त्यांना अस्पृश्यांपेक्षाही वाईट समजतात. निदान अस्पृश्य कोणाचे नुकसान तरी करत नाहीत. अस्पृश्यांशी शारीरिक संबंध आल्यामुळे हा रोग होतो असा आपला समज आहे. मी आधीच सांगितले आहे की खरा महारोग अपवित्र मनाची अवस्था आहे. आपल्याच बांधवांचा द्वेष आणि काही जमातीच्या वा वर्गाच्या लोकांबद्दल वाईट बोलणे हे मानसिक विकृतीचे लक्षण आहे, आणि ते महारोगापेक्षाही वाईट आहे. असे लोक जर महारोग्यांपेक्षाही वाईट असतील तर मग महारोग झालेल्यांना महारोगी का म्हणावे? या लोकांचे वर्णन आपण महारोगाचे बळी असे करू या, महारोगी असे नाही. वाईट नावामुळे जर लोक वाईट आहेत असा समज होत असेल तर त्यांना तशा नावाने संबोधू नये. तुम्ही गुलाब फुलाला कोणतेही नाव दिले तरी, अगदी वाईटाहून वाईट नाव दिले तरी गुलाब आपला सुगंध गमावणार नाही. जगदीशनला जर हेच म्हणायचे असेल तर ते बरोबर आहे आणि महारोग हा काही असा एकच रोग नाही की जो शारीरिक संसर्गामुळे दुसऱ्याला होऊ शकतो. खरूज झालेला माणूस जर दुसऱ्याला स्पर्श करील तर त्याचा रोग दुसऱ्याला होण्याची शक्यता असते. महारोग हा तसाच रोग आहे आणि सर्दी, कॉलरा, प्लेग इत्यादी रोगांसारखाच तोही एक रोग

आहे. मग त्या रोगाने ग्रस्त असलेल्या माणसाकडे लोकांनी घृणेने का पाहावे? माणूस जेव्हा खरोखरच महारोगाने ग्रस्त होतो तेव्हा लोक त्याच्याकडे घृणेने पाहायला सुरुवात करतात. ते त्याला कमी प्रतीचा प्राणी समजू लागतात. परंतु खरे कमी प्रतीचे लोक ते असतात जे घृणा करतात. यामुळे या विषयावर आज मी परत बोलायचे ठरवले.

राजकुमारी वर्धा येथील परिषदेला ३० तारखेला उपस्थित राहणार होत्या. त्यांनी जायला पाहिजे होते. डॉ. जिवराजसुद्धा जाणार होते. त्यांनीसुद्धा जायला पाहिजे होते. परंतु ते कसे जाऊ शकतात? ते त्यांच्या कामाशी बांधले गेलेले आहेत. ते केवळ एक दिवस आपल्या कामापासून दूर जाऊ शकतात. परंतु त्याकरिता दोन दिवस लागले असते कारण ते त्याच दिवशी परतू शकत नव्हते. वर्धेला कोणतेही विमान जात नाही. ते केवळ नागपूरला जाते. ते दोन दिवसांनंतरच परतू शकतात.

मला एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करायचा आहे. ब्रजकिशनने तुम्हाला सांगितलेच आहे की मी उद्या तुरुंगात जाऊन प्रार्थना करणार आहे. मी तिथे जाऊन प्रार्थना करावी अशी तुरुंगात राहणाऱ्या कैद्यांची इच्छा आहे. यामुळे मला आनंद होईल आणि तुम्हालाही आनंद होईल, परंतु तुम्हाला माझ्याबरोबर प्रार्थना करता येणार नाही. तो तुरुंग आहे आणि केवळ कैदीच तिथे जाऊ शकतात. मी तिथे जात आहे कारण त्यांनी मला निमंत्रित केले आहे. आपण परवा परत इथेच भेटू.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४५७-९

# १५२. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर २५, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

या तुरुंगातील कैद्यांसमोर प्रार्थना करण्याचे आणि नेहमीच्या पद्धतीप्रमाणे भाषण देण्याचे जेव्हा मला निमंत्रण मिळाले तेव्हा मला फार आनंद झाला. सर्व कैद्यांना कदाचित माहीत नसेल की अगदी दक्षिण आफ्रिकेतील दिवसांपासून मी फार जुना कैदी होतो आणि मी सांगू शकतो की माझ्या दृष्टीतून मी अपराधी नव्हतो, परंतु शासनाच्या दृष्टिकोनातून मात्र मी निरपराधी होतो असे म्हणता येऊ शकत नव्हते. किती तरी प्रकारच्या तुरुंगात मी गेलो आहे आणि किती तरी प्रकारचे तुरुंग मी पाहिले आहेत. दक्षिण आफ्रिकेतील तुरुंग फार कडक असायचे आणि तिथे हिंदी लोकांना तर काहीच किंमत नव्हती. तिथे कोणी बॅरिस्टर असला तरी त्यांच्याकरिता कोणताच फरक पडत नसे. सर्व भारतीय कुली आहेत असे ते समजत असत. तिथे एकीकडे भारतीय होते, दुसरीकडे हब्शी होते आणि ब्रिटिशसुद्धा होते. ते सर्व आपापल्या जगात राहत असत. जेव्हा सत्याग्रह सुरू झाला (जुलै १९०७साली) तेव्हा त्यात हजारो सत्याग्रही सामील झाले कारण सत्याग्रहात काही दोनचार माणसेच असू शकत नव्हती. माझ्या पहिल्या तुरुंगवासाच्या वेळी (जानेवारी १०, १९०८; पाहा जोहान्सबर्ग खटला, जानेवारी १०, १९०८) आमच्यापैकी १५० लोकांना तुरुंगात टाकण्यात आले. सुरुवातीला तिथे फार लोक नव्हते. मी तिथे होतो आणि माझ्याबरोबर ४ वा ५ लोक अजून होते. परंतु हळूहळू आमची संख्या १५०पर्यंत पोहोचली. आम्हा सर्वांना एका वार्डात ठेवण्यात आले होते व आमच्याबरोबर हब्शी कैदीसुद्धा होते. अशा प्रकारच्या गर्दीमुळे आम्ही अगदी कंटाळलो होतो. तिथल्या तुरुंगाचे नियम किती कठोर होते आणि त्यांची अमलबजावणी किती निर्दयपणे करून घेतली जात असे हे मी तुम्हाला सांगू इच्छितो. आम्ही राजकीय कैदी आहो आणि इतर अपराधी असे म्हणून इथे भारतात तर आपण गोंधळ घालतो. दक्षिण आफ्रिकेत असा कोणताही फरक केला जात नाही. तिथे सर्वांना गुन्हेगार कैदीच समजतात. मी तर असे समजत नाही की जे राजकीय कैदी आहेत ते चांगले आहेत आणि जे अपराध करून आले आहेत ते वाईट आहेत. ज्यांनी कायदा मोडला ते तर सर्व कायद्यासमोर सारखेच असतात. मग या अपराध्यांमध्ये काय फरक करायचा? परंतु इथे तर आम्ही राजकीय कैदी झालो आणि त्यातही अ, ब, क वर्गाचे कैदी झालो. असे झाले कारण आमचे एक फार मोठे आंदोलन होते. करोडोच्या संख्येत आपण आहो आणि त्यात मोठमोठे लोकही होते.

परंतु त्या बिचाऱ्यांमध्ये कोण मोठे लोक असणार? त्यात हिंदू, मुसलमान, पारशी सर्व होते. हा हिंदू आहे, हा मुलमान, हा पारशी असा कोणी तिथे भेदसुद्धा करत नसे. सर्व कुली होते वा असे म्हणाना की सर्व हिंदुस्तानी होते. यामुळे आम्ही मोठे आहो, आम्हाला अ वर्ग द्या, आमच्यापेक्षा लहान त्यांना ब वर्ग द्या आणि त्याहून लहान त्यांना क वर्ग द्या असा मोठेपणाही तिथे दाखवू शकत नव्हतो. मी तर असे काही मानत नाही, परंतु इथे आम्ही हे सर्व केले. मी तर असे समजतो जो कैदेत गेला तो कैदी. मी असे समजत नाही की केवळ तुरुंगात गेलेले लोकच अपराध करत असतात आणि बाहेर पांढरेशुभ्र कपडे घालून बसलेल्या लोकांनी कोणताही अपराध केलेला नसतो. मला दहा वेळा तुरुंगात टाकण्यात आले होते. (ते असे - १. जानेवारी १०ते ३०, १९०८, जोहान्सबर्ग. २. ऑक्टोबर ७ ते डिसेंबर १२, १९०८ -व्होल्करस्ट, ३. फेब्रुवारी २५ ते मे २४, १९०९ - व्होल्करस्ट, ४. नोव्हेंबर ११ ते डिसेंबर १८, १९१३ - डंडी, ५. एप्रिल ९ ते ११, १९१९, कोसीहून मुंबईला जात असताना, ६. मार्च १०, १९२२ ते फेब्रुवारी ५, १९२४ - साबरमती, येरवडा, ७. मे ५, १९३० ते जानेवारी २६, १९३१ -येरवडा, ८. जानेवारी ४, १९३२ ते मे ८ १९३३ - येरवडा, ९. ऑगस्ट १ ते २३, १९३३ - साबरमती, येरवडा, १०. ऑगस्ट ९, १९४२ ते मे ६, १९४४, येरवडा आणि आगाखान पॅलेस, पुणे) मला पूर्णपणे तर आठवत नाही, परंतु तुरुंगात मी अनेक वर्षे घावलली असल्यामुळे हे सर्व मला माहीत आहे. तिथे जे तुरुंगाधिकारी होते ते तर माझे मित्र झाले होते. तिथे तुरुंगाचे एक अधीक्षक (सुपरीटेंडंट) होते. ते फार चांगले माणूस होते आणि मोठे अधिकारी होते. ते एकदा माझ्याजवळ म्हणाले होते की मी या तुरुंगाचा अधिकारी आहे खरा परंतु जगाला माहीत नाही की मी कोणकोणते अपराध केले आहेत. ते म्हणाले की इथे कैदी चार वा पाच वर्षांच्या तुरुंगवासाकरिता येतात वा असे कैदी येतात की ज्यांना मृत्यूदंडाची शिक्षा झालेली असते व नंतर ज्यांना मृत्यूदंडापासून माफी देण्यात आलेली असते. परंतु मी केलेल्या अपराधाची किती लोकांना कल्पना असेल? ते म्हणाले की कदाचित ईश्वरालाच माझ्या अपराधांची कल्पना असेल. यामुळे त्यांना एकाने तुरुंगाधिकारी असणे आणि इतरांनी कैदी ही कल्पना आवडत नव्हती. माझेही असेच मत आहे. यामुळे मी तुमच्यासमोर कशा प्रकारे आलो पाहिजे याचा विचार केला. आता इंग्रजांचे शासन तर गेले. ते स्वतःहोऊन गेले आहेत. चांगले केले. परंतु आता आपण आपल्या तुरुंगात काय करावे? ज्या वेळी इंग्रजांची सत्ता होती त्या वेळी तुरुंगात किती चांगले वा वाईट होते याचा मी साक्षी आहे. परंतु आता सरकार आपल्या हातात आहे. आपल्या तुरुंगांनी तुरुंग न राहता रुग्णालये व्हायला पाहिजे. जर कोणी खून केला असेल वा चोरी केली असेल वा डाकू झाला असेल वा कायद्याच्या पुस्तकात ज्याला अपराध म्हणतात तो केल्यामुळे अपराधी झाला असेल तर हे सर्व प्रकारचे रोग आहेत असे मी समजतो. तो विकार आहे. अपराधाकरिता अपराध कोणीही करत नाही. जर कोणी मद्याच्या प्रभावाखाली

व्यभिचार वा इतर कोणता अपराध करत असेल तर तो खुषी मिळवण्याकरिता तसे करत नसतो. आता मी म्हातारा झालो आहे आणि मला अनुभवही आला आहे. माणसाचे वर्तन त्याच्या स्वभावातून प्रेरित होत असते याची मला जाणीव झाली आहे. कसे राहावे हे कैद्यांना शिकवले पाहिजे. अधीक्षक वा उपायुक्त कैद्यांची काळजी घेत असतात आणि कोणत्या कैद्याला फटके मारावे वा कोणत्या कैद्याने शिक्षा म्हणून कोणते काम केले पाहिजे हे ते ठरवत असतात. परंतु तुरुंगाधिकारी वा उपायुक्त हे रुग्णालयातील शल्यचिकित्सकासारखे असावे व डॉक्टर ज्याप्रमाणे मद्यपीला व्यसनापासून मुक्त करण्याचा प्रयत्न करतो त्याप्रमाणे त्यांनी त्या कैद्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करावा असे मी सुचवीन. मद्याचे व्यसन लागलेल्या माणसाला मद्यापासून होणारे दुष्परिणाम सांगावे लागत असतात. आणि कल्पना करा की एखाद्याने एखाद्या मुलीचे अपहरण केले आहे - हा अर्थातच गंभीर गुन्हा आहे - परंतु त्यानेसुद्धा जे काही केले आहे तो एक प्रकारचा रोग आहे याची जाणीव करून देण्यात यावी. आपल्या तुरुंगामध्ये जर अशी सुधारणा करण्यात आली तर ती महान गोष्ट होईल आणि सर्व कैदीसुद्धा खुष होतील. खुष झाल्यामुळे आपण नेहमीकरिता तुरुंगातच राहिलो पाहिजे असे त्यांना थोडेच वाटणार आहे? याशिवाय रुग्णालयाच्या इमारती तर सुंदर असतात, इथे आपल्या तुरुंगांचे असे थोडेच असते. आपण अशा इमारती तयार तरी कशा करणार? आपला तर गरीब देश आहे. रुग्णालयासारखे जर आपण तुरुंग बनवू लागलो तर आपले दिवाळे निघेल. असे तुरुंग तर सुवर्णभूमी असलेल्या दक्षिण आफ्रिकेतही नाहीत. तिथे इंग्रज कैद्यांकरिता ज्या खोल्या वा बराकी बनतात त्या महालासारख्या थोड्याच असतात. इंग्लंडजवळ इतका पैसा आहे की तो असे तुरुंग बनवू शकतो, कारण तिथले तुरुंग मी पाहिले आहेत. हे खरे आहे की अमेरिकेतील तुरुंग मी पाहिलेले नाहीत, परंतु आपले तुरुंग रुग्णालयासारखे व्हायला पाहिजे. रुग्णालयात डॉक्टर असतो आणि तो रुग्णांचा उपचार करतो तसे असले पाहिजे. जेव्हा एखादा रोगी दुरुस्त होऊन रुग्णालयाबाहेर जातो तेव्हा तो कायमचा ऋणी होतो. तसेच रुग्णालयांचेही झाले पाहिजे. तुरुंगात कठोर वागणूक दिली जाते आणि अतिरेक केला जातो वा तुरुंगाधिकारी दुष्ट आहेत असे म्हणण्याचे कैद्यांकरिता कारण नसले पाहिजे. तिथे सर्व वाईटच वाईट आहे असे म्हणण्याची त्यांना संधी नसावी. त्यांनी म्हणायला पाहिजे की रुग्णालयाप्रमाणे आमची इथे फार काळजी घेतली जात होती, आम्हाला खायला देत होते व कसे जगावे हे आम्हाला शिकवत होते. तुरुंगाचा कारभार जे चालवतात त्यांनी काय केले पाहिजे हे तर मी सांगितले. परंतु त्याचे काय, हे सर्व करणे तर त्यांच्याही हातात नाही. याचा निर्णय सरकारला घ्यायचा आहे. अथवा ही गोष्ट पंडितजी, सरदार वा असे म्हणा की संपूर्ण मंत्रिमंडळावर अवलंबून आहे. याचा अर्थ सरकारने हे केले पाहिजे. परंतु तुरुंगाधिकाऱ्यांनी कसे वागले पाहिजे हे सरकारने त्यांना सांगितले पाहिजे. नंतर जर त्यांनी नियमांचे

पालन केले नाही तर व जुलमी पद्धतीचा अवलंब केला तर ती वेगळी गोष्ट होईल. आजकाल कोणताही तुरुंगाधिकारी वा अधीक्षक वा आयुक्त अपराधी नसला पाहिजे. आपण हे शिकलो आहो आणि ते सर्व सरकारच्या अंतर्गत काम करत असतात. सरकारजवळ मोठे सैन्य नाही आणि या अधिकाऱ्यांना शिस्त लावण्याकरिता ते बाहेरून मदतही मागू शकत नाही. ते स्वेच्छेने सरकारच्या आदेशाचे पालन करत असतात. त्यांनी जर स्वतःहोऊन आदेशांचे पालन केले नाही तर आपली प्रशासनव्यवस्था कोसळून जाईल व देशात गोंधळ निर्माण होईल. याप्रमाणे अधिकाऱ्यांनी नियमांचे उल्लंघन करू नये असे मी त्यांच्याबद्दल सांगितले आहे. आणि अशा काही लहानसहान गोष्टी आहेत की त्या ते सरकारच्या आदेशाशिवायही करू शकतात. उदाहरणार्थ त्यांनी कैद्यांशी प्रेमाने वागावे. यात शिकण्यासारखे काय आहे? त्यांनी तुरुगाला रुग्णालय समजायला पाहिजे व कैद्यांना रुग्ण. त्यांनी जर इतके केले तर निदान एक गोष्ट साध्य होईल.

आता मी कैद्यांशी कैद्याच्या भूमिकेतून बोलू इच्छितो. सत्याग्रही म्हणून मलासुद्धा तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. सत्याग्रही कैदी जाणूनबुजून कोणताही अपराध करू शकत नाही. त्याने कधीही तुरुंगाच्या अधीक्षकाला वा तुरुंगाधिकाऱ्याला त्रास द्यायला नको वा त्यांचा अपमान करायला नको. त्याने तर आदर्श कैदी होऊन राहायला पाहिजे. असे केले तरच तो आपला सत्याग्रह चांगल्या प्रकारे सुरू ठेवू शकतो. इतकेच नाही तर अपराध करून इथे आलेल्या कैद्यांनीसुद्धा सत्याग्रही व्हायला पाहिजे. त्यांनी तुरुंगाच्या नियमांचा कधीही भंग करू नये. त्यांनी तुरुंगाचे निर्बंध मान्य केले पाहिजे आणि जे मिळेल त्यावर समाधान मानले पाहिजे. कैद्यांना दिल्या जाणारे अन्न पुरेसे नसेल, वा ते पुरेसे शिजवलेले नसेल वा त्यात खडे वा जंतू असतील तर त्याबद्दल त्यांनी अधीक्षक वा तुरुंगाधिकारी यांच्याकडे तक्रार करावी. असे घडत असते. मी असे माझ्या डोळयांनी पाहिले आहे कारण मी तुरुंगात राहिलो आहे. परंतु अशा गोष्टींकरितासुद्धा तुरुंगाधिकाऱ्याकडे का जायला पाहिजे? तुरुंगात काही स्वयंपाकी तर नसतात. जे कैदी असतात तेच स्वयंपाक करत असतात. सरकार जर स्वयंपाकी ठेवू लागेल तर ते तुरुंग चालवू शकणार नाही. कैदीच आपला स्वयंपाक बनवत असल्यामुळे त्यांनी मन लावून स्वयंपाक करावा. तांदूळ निवडून मगच त्यांनी भात शिजवावा, पोळ्या अर्ध्या कच्च्या ठेवू नये. हे सर्व तुमच्या हातातच आहे. तुम्ही जसे स्वतःच्या घरी काम करता तसे हे काम इथे केले पाहिजे. तुम्ही इथे काही अपराध केल्यानंतर आला आहा. कोणीही अपराध करू शकतो. परंतु काही पकडले जातात आणि काहीनी अपराध केला नसतानाही त्यांच्यावर अपराधी म्हणून शिक्का मारला जातो. असे होत असते. मला वाटते की तुम्ही जर इतके केले तर तुम्ही आदर्श कैदी व्हाल.

तुम्ही एक गोष्ट करू शकता. तुमच्यात हिंदू, मुसलमान, शीख असले पाहिजे. मुसलमानांमध्येसुद्धा वेगवेगळ्या पंथाचे लोक असले पाहिजे. परंतु तुम्ही सर्व इथे भावाभावाप्रमाणे राहू शकता. आज आपल्या देशात एक प्रकारचे विष पसरले आहे. निदान तुरुंगात तरी ते पसरणार नाही अशी मला आशा आहे. तुरुंगातून तुम्ही आदर्श नागरिक म्हणून बाहेर पडला पाहिजे. असे झाले तर मी चांगले काम केले असे उपायुक्त आणि तुरुंगाचे अधीक्षक म्हणतील. ते मला सांगतील की आता आमचे काम सोपे झाले आहे, आम्हाला कोणी त्रास देत नाही व तुरुंगाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते व दिवसेंदिवस कैदी आपल्यामध्ये सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न करत आहेत. तुम्ही आदर्श कैदी व्हावे आणि येथून बाहेर पडताना आदर्श नागरिक व्हावे व बाहेरील लोकांना गैरवर्तन करण्यापासून परावृत्त करावे इतकीच प्रार्थना मी ईश्वराजवळ करीन. हिंदू मुसलमानांचे शत्रू आहेत आणि मुसलमान हिंदूंचे शत्रू आहेत हे तुम्ही विसरा असे तुम्ही त्यांना सांगितले पाहिजे. कोणीही चूक करू शकतो.

उद्या ईद आहे. माझ्या मुसलमान बांधवाना मी ईद मुबारक देतो. जे काही मुसलमान कैदी इथे आहेत त्या सर्वांना सर्व हिंदू आणि शीख कैद्यांनी ईदच्या शुभेच्छा द्याव्या अशी माझी इच्छा आहे.अखेरीस तुम्ही सर्वांनी बंधुभावाने राहावे इतकेच मी म्हणेन.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४५९-६४

# १५३. प्रार्थना प्रवचन, ऑक्टोबर २६, १९४७

नवी दिल्ली,

ऑक्टोबर २६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आधी तर एका गृहस्थांनी मला जो प्रश्न विचारला त्याचे उत्तर देऊन देतो. ते विचारतात - "तुम्ही म्हणता की बदल्याची भावना चांगली नसते परंतु तमचे राम-भक्त तर दरवर्षी रावणाचा पुतळा जाळून बदल्याची भावना चेतवत असतात?" यात दोन चुका आहेत. एक माझे राम-भक्त कोण आहेत हेच मला माहीत नाही. माझा राम-भक्त जर मी असेन तर ठीक आहे. परंतु त्याचीही मला माहिती नाही. राम-भक्त होणे ही काही साधी गोष्ट नाही. यामुळे "तुमचे राम-भक्त" म्हणणे ही मोठी चूक आहे. माझे राम-भक्त तर कोणीच नाहीत. परंतु असे होऊ शकते की लोक रावणाचा पुतळा तयार करतात आणि मग राम त्याला पराभूत करतो. आता तरी राम रावणाला पराभूत करतो. परंतु आपल्यापैकी कोण राम आहे आणि कोण रावण? जर प्रत्येक माणूस राम बनू शकत असेल तर रावण कोण बनेल? ही एक कथा आहे आणि कथेत राम देव आहे आणि रावण त्याचा. शत्रू. यामुळेच त्याला अशुभ समजतात, राक्षस समजतात, निशाचर समजतात. याचे कारण त्याचे कामच रामाला न मानणे आणि ईश्वराला न मानता मरून जाणे होते. नंतर ईश्वराच्या हातूनच त्याला मरण आले. ही एक कथा आहे. याचा अर्थ असा नाही की रामाचा पुतळा बदला घेण्याच्या भावनेने तयार करण्यात आला होता. माणसाने बदला घेऊ नये हा धडा मी यापासून शिकलो आहे. मी जर अशी कल्पना केली की मी राम आहे आणि इथे माझ्या आजूबाजूला बसलेले लोक रावण आहेत तर माझ्यासारखा अहंकारी आणि मूर्ख कोण असेल? मी राम आहे हे मला कसे कळणार? माझ्यात किती दुष्टपणा भरलेला आहे हे कोणाला माहीत आहे? ईश्वराच्या नजरेत मी महात्मा आहे की दुष्ट माणूस आहे हे कोणालाही माहीत नाही. मी स्वतः किती दुष्ट वा चांगला आहे हे माझे मलाही माहीत नाही. ते केवळ ईश्वरालाच माहीत. तो वर बसला आहे, सर्वांना पाहतो आहे. त्याच्यापासून कोणतीही गोष्ट लपलेली नाही. माणूस कोणाचाच बदला घेऊ शकत नाही. कोणाकडून काही वाईटही घडले तरी बदला काय घ्यायचा? जर एखादा माणूस संपूर्ण असेल, तसे कोणताही माणूस संपूर्ण असू शकत नाही, केवळ ईश्वरच संपूर्ण असू शकतो, तरीही जर आपण गृहीत धरले की एक माणूस संपूर्ण आहे आणि इतर अपूर्ण आहेत तर काय त्याने इतराना शिक्षा केली पाहिजे? इतरांचा संहार केला पाहिजे? हा जो विजयादशमीला पुतळा बनवतात त्याचा माझ्या दृष्टीतून असाच अर्थ आहे. बदला जरी म्हणालो

नाही तरी संहार वा शिक्षा वगैरे जी काही करायची आहे ती केवळ ईश्वरच करू शकतो. तर काय ईश्वरातच हा गुण आहे की हिंसाही तोच करू शकतो आणि अहिंसाही? तो निर्गुण आहे आणि गुणातीत आहे. त्याच्यासाठी या सर्व गोष्टी काहीही नाहीत. परंतु हा दृष्टांत तर असा आहे की जितके रावण या जगात आहेत, त्या सर्वांचा संहार करणारा एकटा ईश्वर आहे. काही लोक असे मानतात की आपण पूर्ण आहो आणि इतर अपूर्ण असे विजयादशमी शिकवते. यामुळेच कायदा हातात घेऊन ते स्वतःच बादशहा बनतात व कोणाला मारायचे, कोणाचा खून करायचा हे सर्व ठरवतात.

असे भारतात घडतही आहे कारण आम्ही पागल झालो आहो. जे उत्तर मी दिले आहे त्यावरून तुम्ही आणि ज्या बंधूंनी प्रश्न विचारला त्यांना कळले असेल की राम-रावणाचा दृष्टांत घेऊन आम्ही पापी होऊ नये. आम्ही पुण्यावान झालो पाहिजे. एकीकडे रामाचे नाव घ्यायचे आणि दुसरीकडे दुराचार करायचा म्हणजे ईश्वराची निंदा करणे आहे.

आता तुमच्यापैकी काही मला विचारू शकतात की तुम्ही इतक्या मोठ्यामोठ्या गप्पा तर मारता परंतु काश्मीरमध्ये जे सुरू आहे त्याचीही काही माहिती आहे? (२३ ऑक्टोबरला जवळपास २००० आफ्रिडी आणि टोळीवाले काश्मीरमध्ये घुसले आणि मोठ्या प्रमाणात लूट, जाळपोळ आणि खून करू लागले.) होय, मला त्याची पूर्ण कल्पना आहे. परंतु मला तितकेच माहीत आहे जितके वृत्तपत्रांमध्ये आले आहे. हे जर सर्व खरे असेल तर फार वाईट गोष्ट आहे. अशा प्रकारे ना धर्माचे रक्षण होऊ शकते ना कर्माचे. इतकेच मी सांगू शकतो. काश्मीरने पाकिस्तानमध्ये सामील व्हावे म्हणून पाकिस्तान काश्मीरवर दडपण आणण्याचा प्रयत्न करत आहे असा दोष तर पाकिस्तानलाच देण्यात आला आहे ना? असे व्हायला नको होते. कोणाजवळील कोणती तरी वस्तू घ्यावी म्हणून जर कोणी कोणावर दडपण आणत असेल तर तसे व्हायला नको याबद्दल मला किंचितही संशय नाही. आज तर काश्मीर आहे, नंतर ते हैद्राबादवर दडपण आणतील, मग जुनागढवर दडपण आणा, मग अजून संस्थाने आहेत. मी काही न्यायाची तुलना करण्याची इच्छा नाही. परंतु मी एक तत्त्व मानून चालतो की कोणीही कुणावरही बळजबरी करू शकत नाही.

नंतर काहीही होवो मला त्याची पर्वा नाही. काश्मीर असो, हैद्राबाद असो वा जुनागढ असो, कोणी कुणावर बळजबरी करू नये. परंतु मी अतिशय आदरपूर्वक सांगतो की आज जे काश्मीरचे महाराज आहेत ते तेथील राजे नाहीत. दुसऱ्याही संस्थानांचे जे राजे आहेत असे आपल्याला वाटते तसे ते नाहीत. त्यांना तर बनवणारे इंग्रज लोक होते. आता इंग्रज गेले आहेत. त्यांनी त्यांना सत्ताधारी बनवले होते कारण त्यांच्या माध्यमातून ते राज्य करू शकत होते. काश्मीरमध्ये अजून जनतेचे सरकार स्थापित व्हायचे आहे. अशीच परिस्थिती इतर संस्थानांचीही म्हणजे हैद्राबाद, जुनागढ इत्यादींचीही

आहे. माझ्या मते त्यांच्यात काही अंतर नाही. संस्थानांचे खरे सत्ताधारी तेथील लोक असतात. काश्मीरचे लोक जर पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता अनुकूल असतील तर जगातील कोणतीही शक्ती त्यांना अडवू शकत नाही. परंतु निर्णय घेण्याकरिता त्यांना मोकळीक असली पाहिजे. लोकांवर हल्ला करून आणि गावच्या गाव जाळून लोकांना निर्णय घेण्याकरिता बाध्य करता येत नाही. काश्मीरमध्ये मुसमान बहुसंख्य असूनही तेथील लोकांना जर भारतात सामील होण्याची इच्छा असेल तर त्यांना कोणीही अडवू शकत नाही.

काश्मीरच्या लोकांवर दडपण आणण्याकरिता जर पाकिस्तानचे लोक जात असतील तर पाकिस्तान सरकारने त्यांना थांबवले पाहिजे. जर तसे करण्यात त्याला अपयश आले तर दोषाचे सर्व खापर पाकिस्तानवर फोडले जाईल. काश्मीरच्या जनतेवर बळजबरी करण्याकरिता जर भारतातील लोक जात असतील तर त्यांनासुद्धा थांबवले पाहिजे आणि त्यांनी स्वतःहोऊन थांबले पाहिजे. याबद्दल मला काहीही संशय नाही.

मी काश्मीरच्या समस्येची तुमच्याशी चर्चा केली. आता मला वेगळ्या मुद्द्याकडे वळण्याची परवानगी द्या. मला कलकत्त्याहून तार आली आहे. कलकत्त्यात मी असताना ज्या शांतिसेनेची स्थापना करण्यात आली होती तिच्याबद्दल मी तुम्हाला सांगितले होते. ती खरोखर ईश्वराची कृपा होती. कलकत्त्यात शांतता स्थापन करणे फार कठीण वाटत होते. परंतु एकदा शांतिसेनेची स्थापना झाल्यानतर तसे सहजपणे करता आले आणि हिंदू अथवा मुलमानांना फारसा त्रास सहन करावा लागला नाही. त्याआधी मुसलमानांनी मोठ्या वस्त्यांवर नियंत्रण मिळवले होते व ते तेथून हिंदूंना हुसकावून लावत होते. नंतर हिंदूंनीसुद्धा मुसलमानांच्या झोपड्या व इतर जे काही सामानसुमान होते ते जाळले व त्यांच्यावर अत्याचारही केला. तसे घडायला नको होते. मला सर्व प्रकरणात जायचे नाही. परंतु मी जेव्हा तिथे गेलो तेव्हा ईश्वराच्या कृपेने शांतिसेनेची स्थापना करण्यात आली व विद्यार्थी आणि इतर लोक तिच्यात सामील झाले. आता ते लिहितात की दसरा आणि ईद हे दोन्ही सण मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले व हिंदू आणि मुसलमान भावाभावाप्रमाणे राहू लागले आहेत. कलकत्त्यात काल ईद साजरी करण्यात आली. परंतु दिल्लीत ती आज साजरी करण्यात आली. यामुळे दसरा आणि ईद या दोघांचाही उल्लेख असलेली तार मला पाठवण्यात आली. ते म्हणतात की शांतिसेना सर्वत्र पसरली आहे. कलकत्त्यात वा हावडात कुठेही नुकसान झालेले नाही. कोणीही कुणालाही त्रास देऊ शकला नाही आणि दोन्ही दिवशी लोक कोणताही त्रास न होता मजेत राहिले. ते पूर्व बंगालमध्ये ढाकापर्यंतही गेले.

भारतात कुठेही हिंदू मुसलमान वैमनस्य दूर झाले व परस्परांचे जे शत्रू होते ते सर्व भाऊभाऊ होऊन राहिले तर मला आनंद होतो व म्हणून ही गोष्ट तुम्हाला सांगावी असे मला वाटले. आणि कलकत्ता काही लहानसहान शहर नाही. तिथे करोडोंचा व्यापार चालतो, मोठे मोठे जहाज येतात, तिथे हिंदू आणि मुसलमान दोघेही राहतात आणि व्यापार करतात. आपण एकमेकांना शत्रू म्हणून वागवू लागलो तर संपूर्ण व्यापार उध्वस्त होणार नाही काय? कलकत्त्याच्या शांतिसेनेने लोकांना जर शांततापूर्वक राहायला शिकवले असेल तर ती फार चंगली गोष्ट असेल. कलकत्त्यापासून आपण काही पाठ का शिकू नये? इथेसुद्धा शांतिसेना का स्थापन करण्यात येऊ नये? ईदच्या निमित्ताने माझ्याकडे आज काही मुसलमान आले होते. त्यांना माहीत आहे की मी त्यांचा शत्रू नसून मित्र आहे. मी हिंदू आहे आणि तोही सनातनी हिंदू. यामुळे माझ्यात मुसलमानपणही तितकेच भरलेले आहे जितका हिंदूपणा. यामुळे मित्र समजून ते मला भेटायला आले होते. मी त्यांना ईद मुबारक म्हणालो खरे परंतु तुम्हाला मी कोणत्या तोंडाने ईद मुबारक म्हणू असेही मी त्यांना म्हणालो. (पाहा मागील शीर्षक) ते बिचारे आजही घाबरलेले आहेत. हिंदू आपल्याला राहू देतील की नाही आणि मारून तर टाकणार नाहीत असा विचार ते करत आहेत. अर्थातच सर्वच हिंदू मारत नसतात. परंतु अनेकांचे खून झालेले असल्यामुळे ते भयभीत आहेत. ते अल्पसंख्य असले म्हणून काय? तर काय ज्या ठिकाणी जे लोक बहुसंख्य आहेत त्यांनी अल्पसंख्याकांवर अत्याचार करून त्यांना मारून टाकले पाहिजे? हे अत्याचार थांबले पाहिजे नाही तर आपण नष्ट होऊ.

जे कलकत्त्यात घडले तेच आपण इथे करू शकलो तर किती चांगले होईल? असे झाले तर माझे अंतःकरण आनंदाने नाचून उठेल. आज तर माझे हृदय रक्तबंबाळ झालेले आहे. मी अश्रूही ढाळू शकत नाही कारण मी जर रडलो तर मला जे करायचे आहे ते मी करू शकणार नाही. पण माझे अंतःकरण दुःखी आहे. स्वतंत्र भारतात हिंदू आणि मुसलमान असेच राहणार आहेत काय? बहुसंख्याक अल्पसंख्याकांवर जर हल्ला करतील तर तो पाशवीपणा होईल. इतरांवर हल्ला करून कोणत्याही धर्माचे रक्षण करता येऊ शकत नाही. धर्माच्या शिकवणुकीचे जीवनात अनुसरण करूनच धर्म वाचवता येऊ शकत असतो. दुसरा कोणताही मार्ग नाही.

रतलाममध्ये जबाबदार सरकारची स्थापना केली जाईल अशी घोषणा तिथे जे महाराज आहेत त्यांनी केली असल्याची तार मला रतलामहून आली आहे. (ऑक्टोबर २४, १९४७; पाहा रतलाममध्ये हरिजन, नोव्हेंबर ९, १९४७) महाराज संस्थानाचे विश्वस्त असतील. हरिजन सेवक संघाच्या सचिवांनी मला लिहिले आहे की यापुढे तिथे हरिजन आणि इतरांमध्ये भेद केला जाणार नाही. उच्चवर्णियांबरोबर हरिजन आणि इतर लोकही महाराजांच्या मंदिरात गेले होते. यापुढे

संस्थानाच्या कोणत्याही मंदिरात अस्पृश्यता पाळली जाणार नाही. त्याचप्रमाणे सार्वजनिक विहिरीवरून हरिजन पाणी भरू शकतील. हे सर्व ऐकून मला फार आनंद झाला. हिंदू धर्माला जर प्रगती करायची असेल तर द्वेषभावना आणि अस्पृश्यता यांना त्यात स्थान कसे काय असू शकते? ज्यांनी पाप केले ते अस्पृश्य असतात. संपूर्ण समाजाला अस्पृश्य करणे हा फार मोठा कलंक आहे. प्रत्येक हिंदूने आपल्या हृदयातून अस्पृश्यतेच्या सर्व खाणाखुणा पुसून टाकल्या पाहिजे. रतलाममध्ये ज्याप्रमाणे केले त्याप्रमाणे हिंदू राजाच्या प्रत्येक संस्थानांमध्ये अस्पृश्यता नाहीशी करण्यात आली पाहिजे. असे करून आपण हिंदू धर्माला फार उंचावर पोहोचवू. मी समजतो त्याप्रमाणे अस्पृश्यता गेली तर नंतर आपण काय मुसलमानांना वा इतर कोणाला अस्पृश्य ठरवणार आहो? आज आपण जे भोगतो आहो ते अस्पृश्यतेचेच परिणाम आहेत. यामुळे रतलाममधील या घडामोडीमुळे मला आनंद झाला आणि यामुळे कलकत्ता आणि रतलाम येथील घटनांबद्दल मला तुमच्याशी बोलावेसे वाटले.

हिंदीवरून. प्रार्थना प्रवचन - १, पृष्ठ ४६५-७०